म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. ७७०
REFBK-0001680

# एक नष्टस्मृति साम्राज्य

किंवा

# विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास.

लेखक

माधवराव व्यंकटेश लेले.

इतिहास
१८२

“ होळकर सरकार ग्रंथमाला ”
ग्रंथ साहावा

क्र. १८२

# एक नष्टस्मृति साम्राज्य

किंवा

# विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास.

हें पुस्तक

रा. माधवराव व्यंकटेश लेले,

यांनीं

आर. सीवेल्, एस्क्वायर, आय्. सी. एस्. (मद्रास),

कृत

“ए फॉरगाटन् एम्पायर” नांवाच्या इंग्रजी पुस्तकावरून

इंदूर येथील म… …ीच्या आश्रयानें

REFBK-0001680

आलीजाह दरबार प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केलें.

ई० सन १९१९

क्र. ९६८०

किंमत १॥ रुपाया.

सीवेल साहेबांचें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर, त्याच्या नांवाला उत्तरादाखल 'दि नेव्हर टु बी फारगाटन एम्पायर' किंवा 'केव्हांही विस्मृत न होण्याजोगें साम्राज्य' या नांवाचें एक पुस्तक, आमचे बंगळूर निवासी ज्योतिर्विद स्नेही सूर्यनारायणराव, बी. ए., यांनीं आर्नागुंदी येथील विद्यमान राजे साहेब यांच्या आश्रयानें तयार करुन प्रसिद्ध केलें. त्याचा पुढचा भाग अद्यापि प्रसिद्ध व्हावयाचाच आहे. माझें पुस्तक लिहून तयार झाल्यावर कांहीं दिवसांनीं मी बंगळूर येथें गेल्या वेळीं त्यांनीं मला आपल्या पुस्तकाची एक प्रत सप्रेम दिली. ती वाचून पाहातां त्यांनीं दिलेल्या व सीवेल साहेबांनीं दिलेल्या हकीकतीमध्यें जागजागीं बराच फरक आहे. दोघांच्याही हकीकती अनुमानावलंबी आहेत. दुसऱ्याची विशेष स्वाभिमानपूर्ण व सीवेल साहेबांची जास्त व्यवस्थेशीर व पद्धतशीर आहे. सूर्यनारायण रावांनीं उपलब्ध शिलालेखांचा विशेष शोधकबुध्दीनें उपयोग करून तिच्या द्वारें विजयनगर येथील कांहीं रायांच्या कारकिर्दीसंबंधानें बरीच नक्की माहिती देऊन सीवेल साहेबांची कांहीं अनुमानें व मतें बरींच खोडून काढलीं आहेत. तसेंच फेरिस्ताच्या इतिहासांत दिलेल्या हिंदुलोकांच्या संबंधीं वर्णनाविषयीं व विजयनगरवाल्यांनीं कलबुर्ग्यांच्या सुलतानांना खंडणी दिल्याविषयींचीं विधानें कशीं एकतर्फी आहेत, यांचें चांगलें दिग्दर्शन केलें आहे. पुढें मागें आणखीही शिलालेख वगैरे विश्वसनीय आधार प्रसिद्धीस येऊन हल्लीं दिलेल्या हकीकतीमध्यें कांहीं फेरफार होण्याचा संभव आहे. पण तसें होईपर्यंत तुर्त उपलब्ध असलेल्या या ऐतिहासिक ग्रंथावरुन मिळणारी माहितीसुद्धां मराठी वाचकांना पुष्कळशी मनोरंजक व उपयोगी होईल असें वाटतें.

हें पुस्तक लिहून तयार झाल्यावर वर्षभराच्या आंतच युरोपांतील भयंकर महायुद्ध सुरूं झालें. यामुळें तें प्रसिद्ध करण्यामध्यें अडचण आली. पण इंदूर येथील नवीन स्थापन झालेल्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळीनें उदार आश्रय दिल्यामुळें उमेद वाटून हल्लींच्या परिस्थितीमध्येंही हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

लष्कर, ग्वाल्हेर.<br>
तारीख १० जानेवारी सन १९१९ ई०.

माधवराव लेले.

सं. ३ २२२
९६८९

श्री सांब प्रसन्न.

( आर. सीवेल कृत. )

# A FORGOTTEN EMPIRE

किंवा

# एक नष्टस्मृति साम्राज्य.

---

## विजयनगर.

---

## भाग पहिला.

---

प्रास्ताविक स्फुट विचार—माहितीचीं उपलब्ध साधनें—स. १३३६ पर्यंतचा दक्षिण हिंदुस्थानाचा त्रोटक इतिहास—मुसलमानी विजयाला भक्कम प्रतिबंध-याच्या सुरुवातीचें 'नूनीज' यानें दिलेलें साल—त्यांतील गलती—'तोगाओ मामेडी' किंवा दिल्हीचा महंमद तघलख बादशहा—त्याचें चरित्र व स्वभाव.

ई. स. १३३६ सालीं हिंदुस्थानामध्यें एक गोष्ट घडून आली, तिच्या मुळें साऱ्या दक्षिण हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीमध्यें एकदम व कायमचा फरक पडला. त्या सालापासून त्या भागाच्या प्राचीन इतिहासाचा ग्रंथ कायमचा अटपून अर्वाचीन इतिहासाला आरंभ झाला. जुन्या परिस्थितीचा पूर्ण लोप होऊन नव्याचा प्रारंभ होण्याचा तो गुडी पाडवाच होय.

ही गोष्ट ह्मणजे विजयनगरची स्थापना.

स. १३३६ पर्यंत सारें दक्षिण हिंदुस्थान प्राचीन हिंदू राजांच्या अंमलाखालीं अव्याहत रहात आलें होतें. तीं राज्यें किती तरी प्राचीन. त्यांच्या

प्रारंभाचा, फक्त सुद्धां लागूमें करील. या सालापूर्वीं सुमारें सोळा शतकें स्थापन केला गेलेला एक शिला स्तंभ आहे. त्याच्यावर बौद्धधर्मी धर्मानुशासनें कोरलेलीं आहेत. त्या लेखांमध्यें सुद्धां त्या प्राचीन राज्यांचा उल्लेख आहे. त्यांच्या मध्यें मदुरा येथील पांड्य, आणि तंजावर येथील चोल, इत्यादि राज्यांचा समावेश आहे. विजयनगराचा उदय होतांच हा दीर्घ प्राचीन काळ कायमचा मावळला, आणि तेथील राजे कृष्णातीरापासून थेट सीलोनपर्यंतच्या साऱ्या देशाचे, प्रत्यक्ष किंवा सम्राट या नात्यानें मालक बनले.

यांत कांहीं अद्भुत अलौकिक प्रकार घडला असें नाहीं. सारें हिंदुस्थान पादाक्रांत करण्यासाठीं मुसलमानांचे प्रयत्न अव्याहत चालू होते. त्याचाच हा ठरलेला व साहजिक परिणाम होता. हा भयंकर परचक्ररूपी राहू सर्व राजमंडळाचा खग्रास करीत कृष्णाकांठीं येऊन थडकलेला पाहून, तिच्या दक्षिणेकडे राहणारे हिंदूमात्र घाबरून गेले. त्यावेळीं झाला तर कांहीं बचाव करील व टिकाव धरील, असें हिंदू राजाचें हें एकच निशाण दिसत होतें. त्याच्या खालीं ते सारे एकत्र झाले. तेव्हांपासून प्राचीन व नष्टप्राय झालेल्या राज्यांचे अवशेष सर्व बुडाले व पुढें अडीचशें वर्षें विजयनगर येथील विजयी व शूरवीर राजे साऱ्या दक्षिण देशाचे तारक, धुरीण, व उद्धारक होऊन राहिले.

असें असून ही, असलें एखादें प्रचंड साम्राज्य या हिंदुस्थान देशामध्यें होतें किंवा काय, याविषयीं सुद्धां या हिंदुस्थान देशभर कोठें ज्ञान किंवा स्मरण असलेलें हल्लीं आढळत नाहीं. त्या साम्राज्याची राजधानी प्रचंड व वैभवशाली होती. ती त्याच्या ऐन उत्तर सीमेवर वसलेली होती. तिचें, विजयनगर असें अन्वर्थक व स्वाभिमानद्योतक नांव होतें. अशी ती अद्वितीय नगरी पार धुळीस मिळाली आहे. पूर्वीं नामी महाल व मंदिरें असलेल्या इमारतींचे नुसते कांहीं अवशेष, व तिच्या भोंवतीं बंदोबस्तासाठीं बांधले गेलेले मजबूत व लांबच लांब कोट व त्यांचे बुरूज जागोजागीं खंडित झालेले साक्षीभूत उभे आहेत. त्या नगराचें नांव सुद्धां लोकांच्या ध्यानीं मनीं राहिलेलें नाहीं. अवशिष्ट भाग पसरलले आहेत ते सुद्धां हंपी या खेड्याच्या नांवावर आजकाल प्रसिद्ध आहेत!

ऐन भरभराटीच्या काळांत तेथील राजांचा अंमल व प्रताप आदिल्यापेक्षांही विस्तृत बादशहातीवर गाजत होता. विस्तार, सुसंपन्नता व ऐश्वर्य या संबंधानें या साम्राज्याची राजधानी एक अजब नगरी होती अशा विषयीं पंधराव्या व सोळाव्या शतकांत तेथें जाऊन प्रत्यक्ष पाहून आलेल्या पुष्कळशा पाश्चिमात्य प्रवाशांनीं वर्णनें लिहून ठेविलीं आहेत. कोणतीही युरोपियन राजधानी, संपन्नता

व वैभव या बाबतींत तिच्या पासंगाला पुरण्या जोगी नव्हती. तिच्या महत्वाची उत्तम साक्ष हीच कीं, पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज लोकांचे [illegible] व कटकटी झाल्या, त्या सर्व, त्या राजधानीचा दर्याई व्यापार हातीं रहावा एवढ्याच हेतूनें. तें साम्राज्य ई. स. १५६५ त एकाएकी नष्ट होतांच पोर्तुगीज लोकांची गोव्यांतील सारी भरभराटी, महत्व व वैभव, लयास गेलें आणि तेंही कायमचें.

विजयनगराच्या विस्तीर्ण साम्राज्यामध्यें एका मागून एक घडून येत गेलेल्या गोष्टींविषयीं अगदींच तुटपुंजी माहिती उपलब्ध आहे. तीही त्याकाळीं इकडे येऊन गेलेल्या युरोपियन प्रवाशांच्या लेखांमध्यें जागजागीं हिंदुस्थानी लोकांच्या राजकीय परिस्थितिविषयक उल्लेखांवरून प्राप्त झालेली. मध्ययुगकालीन, 'बारोस,' 'कूटो' व 'कोरिया' यांच्या सारख्या चौकस कैफियतकारांच्या लेखांचाही याला थोडासा आधार आहे. ते लोक या देशांतील राजकीय व व्यावहारिक स्थितीसंबंधें बरीच आस्थेनें माहिती करून घेत. तरी त्यांचे लेख मुख्यतः युरोपियन वसाहातवाल्यांच्या कामगिऱ्या युरोपियन वाचकांना माहित करून देण्याच्या हेतूनें लिहिलेले. कांहीं तत्कालीन मुसलमान तवारीखकारांच्या लेखांचाही या माहितीला आधार आहे. पण ते लोक तवारीखी लिहितांना आपल्या मालकाची इतराजी न व्हावी या विषयीं नेहमी सभय असत. हिंदू मंदिरें, मठ, वगैरेंना वेळोवेळीं जमिनी वगैरे दान दिल्या गेल्या त्याविषयींचीं दानपत्रें, शिलालेख, ताम्रपट इत्यादिकांवरून ही कांहीं माहिती मिळाली आहे. पण ऐतिहासिक दृष्ट्या तिचा विशेष उपयोग नाहीं. कांहीं तारखा व कांहीं राजांची नांवनिशी यापलीकडे जास्त कांहीं त्यावरून कळत नाहीं.

या पुस्तकाच्या शेवटीं दोन कैफीयतींचीं भाषांतरें दिलीं आहेत. त्यांच्यावरून विजयनगराची सोळाव्या शतकाच्या अखेरीस असलेली स्थिती व तेथील एका मागून एक झालेली राजघराणीं यांच्या विषयीं बराचसा प्रकाश पडतो, असें दिसून येईल. वर निर्दिष्ट केलेल्या साऱ्या आधारांना धरून व त्या कैफीयतींना प्रस्तावनेदाखल असाच हा लेख लिहिण्याचा प्रयत्न आहे. पुढें केव्हां विजयनगराचा चांगलासा इतिहास लिहिला जाईल त्याच्यासाठीं हें पूर्व साधन आहे. पुढील इमारतीचा तो जणों संकलित पायाच समजावा. या प्रयत्नाचा परिणाम कदाचित् ओबडधोबड, नीरस, व खंडितसा वाटेल, तरी तो प्रथम प्रयत्न आहे हें लक्ष्यांत घ्यावें. लौकरच दक्षिण हिंदुस्थानाचा संपूर्ण इतिहास कोणी 'शुष्क अस्थींनांही सचेतन करून दाखविणारा' सरस्वतीचा लाल लिहून काढील, हें खास. तरी

तोंवर त्या विखरलेल्या अस्थींही एकत्र जमवून त्यांची जुळवाजुळव झाली पाहिजे. तदनुरूपच हें काम होय.

या विषयीं तपशीलवार विवेचन करण्यापूर्वीं चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धामधील राजकीय परिस्थितीचें सिंहावलोकन केलेलें बरें. तत्पूर्वीं सारा दक्षिणदेश लहान लहान हिंदू राजांच्या अंमलाखालीं वांटला गेला होता, आणि त्या राजांमध्यें मदुरा येथील पांड्य, व तंजावर येथील चोल, हे राजे विशेष प्रबल व महत्वाचे होते.

हिंदुस्थानावर वायव्य सरहद्दीच्या पलीकडून मुसलमान लोकांनीं अनेक स्वाऱ्या केल्या. त्यांतील अगदीं पहिली व मोठ्या प्रमाणावर अशी स्वारी झाली ती ई. स. १००१ सालीं, थोर व पराक्रमी सुल्तान महम्मद गझनवी याची. त्यानें प्रथम पंजाबांतील सपाट प्रदेशावर चढाई केली. नंतर मुलतानावर आणि पुढें इतर प्रांतांवर. प्रतिवर्षीं अधिकाधिक प्रांतांचें आक्रमण करून तो परत जात असे. तो ई. स. १०२१ त कलिंग देशावर, आणि स. १०२३ त काठेवाड प्रांतावर गेला. पण त्यानें या देशांत कायमचें असें ठाणें कोठेंही केलें नाहीं. त्याच्या स्वाऱ्या निव्वळ चोरधाडी. या पलीकडे कांहीं नाहीं. त्याच्या मागून भराभर इतर स्वाऱ्या झाल्या आणि पुढें दोन शतकांच्या आंतच दिल्ही येथें मुसलमानांनीं पक्का व कायमचा पाय रोंवला. तेव्हांपासून सारखीं युद्धें जारीं राहिलीं, आणि उत्तर हिंदुस्थानाला स्वस्थता कशी ती ठाऊक नाहींशी झाली. १३ व्या शतकाच्या अखेरीला मुसलमानांचा दक्षिणेकडे दबाव सुरूं झाला. दिल्हीच्या बादशहाचा पुतण्या अल्लाउद्दीन यानें स. १२९३ सालीं देवगिरी सर केला. पुढें ४ वर्षांनीं गुजराथेवर हल्ला झाला. स. १३०३ या वर्षीं वरंगळ काबीज करण्याचा प्रयत्न झाला. नंतर तीन वर्षांनीं पुनः देवगिरीवर स्वारी झाली. सुप्रसिद्ध मुसलमान सरदार मलिक काफूर, यानें स. १३०९ मध्यें, भल्या मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेवर धाड घातली. त्यानें वरंगळ पाडाव केलें, व पुढच्या वर्षीं 'होयसल बल्लाळ' राजांची राजधानी 'द्वारसमुद्र' हस्तगत करून तो मलबार किनाऱ्यावर पोहोंचला. तेथें त्यानें एक मशीद बांधविली. तेथून तो उमाप लूट घेऊन आपल्या मालकाकडे परत गेला. तत्कालीन दंतकथांवरून पहातां ही लूट कल्पनेच्याही बाहेर होती. तिच्या बद्दल पुढें परिशिष्टामध्यें वर्णन येईल.

ई. स. १३१२ या वर्षी पुनः लढाया झाल्या. पुढें सहा वर्षांनीं दिल्हीचा बादशहा मुबारकशहा खुद्द देवगिरीवर चालून गेला. त्यानें तेथील रामपुत्र हरपाळ-

देव याचा अमानुप, क्रूर व निर्दयपणानें चामडें सोलवून जीव घेतला व त्याचें शिर शहराच्या वेशीवर टांगाविलें. ई. स. १३२३ मध्यें वरंगळ कायमचें पादाव झालें.

याप्रमाणें या इतिहासाला आरंभ होण्याच्या सुमाराला—ई. स. १३३०—विंध्याद्रीच्या दक्षिणसीमेपर्यंतचा सारा हिंदुस्थानाचा प्रदेश पुरतेपणीं मुसलमानांच्या अंमलाखालीं गेला होता, आणि तद्धर्मीयांनीं दक्षिणदेशांत पुष्कळशा स्वाऱ्या शिकाऱ्या करून धूळधाणी उडविली होती, व त्या देशाचीही तीच वाट लागण्याची उत्कट भीती उत्पन्न करून ठेविली होती. कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेशावर अद्यापि हिंदू राजांचीच सत्ता होती. पण तेथील प्राचीन राजघराण्यांचें महत्व आणि अधिकार, यांना उत्तर दिशेकडून येऊं घातलेल्या या भयंकर तुफानामुळें जबरदस्त धक्का बसला होता. सुल्तान महम्मद तघलख ई. स. १३२५ सालीं दिल्हीच्या तक्तावर बसला, तेव्हांपासून तर ही सारीच परिस्थिती अधिकच बिघडली. त्याच्या विचित्र व अमानुप कृतींविषयक विलक्षण दंतकथा व कहाण्या साऱ्या दक्षिणदेशभर पसरल्या. त्याची परधर्मासहिष्णुता, महत्वाकांक्षा, क्रौर्य व जालिमपणा, यांना कांहींच मर्यादा नाहीं, असें सर्वत्र वाटूं लागलें.

या साऱ्या गोष्टींचें अखेर व अप्रतिहार्य असें एकच पर्यवसान होण्याचा रंग दिसूं लागला. हिंदू देश व राज्यें यांचा सत्यानाश व धूळधाणी, त्यांच्या प्राचीन राजघराण्यांचा नायनाट, त्यांचा धर्म, त्यांचीं मंदिरें, त्यांचे गांव, या सर्वांचा समूळ उच्छेद, दक्षिणेंतील रहिवाशांना जें जें म्हणून अतिशय प्रिय व आदरणीय, त्या सर्वांना जणों ही प्रळयकाळची शेवटची डळमळ लागत आहे, असें वाटूं लागलें.

या परचक्राच्या प्रचंड व अप्रतिहत ओघाला, ई. स. १३३४ मध्यें एकाएकीं व प्रथमच थोडा अवरोध झाला. त्यानें तो ओघ किंचित् थबकला. त्याच्या पुढें एक पक्का व मजबूत बांध आड उभा राहिला, आणि अखेर त्याच्यायोगानें पुढें २५० वर्षे पर्यंत दक्षिणदेशाचा बचावसा झाला.

हा अवरोध झाला तो प्रारंभीं एकजूट झालेल्या लहान लहान हिंदू संस्थानांच्या संघाच्या द्वारानें. त्यांपैकीं दोन संस्थानें, वरंगळ व द्वारसमुद्र, यांचा पूर्वींच पराभव झालेला होता. म्हणून त्यांना बहुधा स्वतःविषयीं फारसें धैर्य व स्थैर्य वाटत नसावें. तिसरें आनीगुंदी येथील चिमुकलें संस्थान. पुढें भला

भक्कम कोट झाला तो त्याचीच बढती होतहोत विजयनगरचें प्रचंड साम्राज्य झालें, त्याचाच. दक्षिणेंतील इतर राष्ट्रें व सारीं राज्यें या साम्राज्याच्या मालकाचीं ताबेदार बनलीं.

हिंदुस्थानदेशाच्या नकाशावर मुंबई व मद्रास या दोन स्थळांमध्यें सरळ रेषा काढली तर तिच्या सुमारें मध्य भागीं तुंगभद्रा नदी येते. ती दोन नद्या मिळून झाली आहे. ती म्हैसूराकडून उत्तर दिशेनें वहात येऊन कर्नूलापलीकडे भलें मोठें वळण घेऊन कृष्णेला मिळाली आहे. तुंगभद्रेच्या मध्यभागाच्या सुमाराला, बल्लारीपासून ४० मैलांवर, आणि धारवाडाकडे जाणाऱ्या रेलवेच्या उत्तरेस, ती एका बिकट, जंगली व पहाडी प्रदेशांतून मार्ग फोडीत वाहाते. या जागीं, तिच्या उत्तर तीरावर, ई. सन १३३० च्या सुमाराला, आनीगुंदी नांवाचें एक लहानसें तटबंदीदार गांव होतें. त्यालाच पोर्चुगीज बखरकारांनीं ' नागंडियम् ' असें म्हटलें आहे. आसपासच्या थोड्याशा टापूवर स्वामित्व करणाऱ्या एका लहानशा संस्थानिकाची तें राजधानी होतें. त्याच्या आसपास विपुल कुरुंदाच्या दगडाचे लहान मोठे पहाड विस्कळितसे झालेले दिसतात. त्याचा उपयोग करून घेऊन, तेथें त्या संस्थानिकांनीं पुष्कळ वर्षांपूर्वीं नदीच्या लगतच एक मजबूत गढी बांधलेली होती. तिच्या वर व खालीं नदीला बरेच कोसपर्यंत पायउतार नव्हता. बारमहा वाहतें पाणी होतें. पावसाळ्यामध्यें तर तिच्या त्या निरुंद व खडकाळ पात्रामध्यें फारच जोराचा प्रवाह असून त्याच्यांत भयंकर खळाळ व भोंवरें असत. तेथील संस्थानिकांचा पूर्वींचा इतिहास फारच कमी उपलब्ध आहे. ते बहुधा होयसलबल्लाळ राजाचे ताबेदार-मांडलिकअसावेत. तें राजघराणें तेथें ई. स. १३५० सालापूर्वीं सातशें वर्षांपासून सारखें राज्य करीत आलें होतें, असें फेरिस्तानें लिहिलें आहे. ( आनीगुंदीच्या आसपासच्या पहाडी व खडबडीत भागांमध्यें नीट शोध करविला गेला तर, चौदाव्या शतकाच्या पुष्कळ पूर्वींचें ऐतिहासिक महत्वाचे अवशिष्ट भाग सांपडतील, असें वाटते. हा प्रदेश हलीं निजामाच्या राज्याच्या हद्दींत आहे. तिकडे आजवर या बाबतींत कांहीं शोध झालेला दिसत नाहीं. विजयनगरच्या ऐन भरभराटीच्या दिवसांत आनीगुंदी व होसपेठ हीं गांवें त्या शहराच्या हद्दींत मोडत होतीं व कम्पली हें सीमेवरील ठाणें मानलें जात होतें. इतका त्या प्रचंड शहरचा विस्तार होता ! या सर्व भागाचा चांगलासा नकाशा मद्रास सरकाराकडून तयार झाला आहे. )

विजयनगरचे राजे कसकसे प्रबल होत गेले, व त्यांचें राज्य कसें विस्तार पावलें, याविषयीं ' नूनीज ' च्या बखरीमध्यें बरेंच तपशीलवार वर्णन दिलेलें

आहे. तें सर्वांशीं खरें असो वा नसो. तत्कालीन शिलालेख व इतर कागद पत्रांतील हकीकतीशीं तें बरेंच जुळतें. तो म्हणतो, 'दिल्हीच्या महंमद तघलख बादशहानें गुजराथदेश काबीज केल्यावर ई. स. १२३० सालीं दक्षिण बाळाघाट, किंवा सह्यपर्वताच्या घाट माथ्याच्या प्रदेशांतून, स्वारी करून आनीगुंदी शहर व किल्ला सर केला. तेव्हां तेथील राजा, राजघराण्यांतील सर्व माणसांसह ठार झाला.' (येथें ई. स. १३३६ साल किंवा त्यापूर्वीं कांहीं वर्षें, असें पाहिजे, सुमारें एक शतकाची गल्ती झालेली आहे.) पुढें बादशहानें तेथें एक नायब नेमून त्या प्रांतांचा बंदोबस्त करण्याचा थोडे दिवस यत्न करून पाहिला. पण तो सिद्धीस गेला नाहीं. ह्मणून त्यानें पूर्वीच्या राजाचा दिवाण- 'देवराव' किंवा 'देवराय' (नूनीज) यालाच त्या संस्थानाचा अधिपती कायम केलें-तोच पहिला हरिहरदेव. या नव्या संस्थानिकानें आनीगुंदीच्या समोर, नदीच्या पलीकडे, विजयनगर वसवून तेथेंच आपली राजधानी कायम केली. त्याला सुप्रसिद्ध महात्मा माधवाचार्य-विद्यारण्य-यांचें पूर्ण सहाय्य होतें. नेहमींच त्रासदायक व सारखे धाडे घालणारे मुसलमान लोक, यांच्यापासून बचाव होण्याला, मध्यें अशी मोठी नदी असलेली उत्तम, असें त्याला वाटलें असावें. त्याच्या मागून बुक किंवा बुकराय गादीवर बसला. त्यानें ३७ वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून 'पुरेयोरेदेव' दुसरा-हरिहरदेव-गादीवर बसला.

इतर लेखांवरून पाहतां यांतील बराच भाग खरा आहे, असें दिसून येतें. पहिला हरिहर व बुक, हे पहिले दोन राजे भाऊ भाऊ होते, व तिसरा राजा दुसरा हरिहर, हा बुकरायाचा पुत्र होता.

पहिल्या पहिल्या राजांना विलक्षणच यश मिळत गेलें. 'इब्न बटूटा' नांवाचा एक पाश्चिमात्य प्रवासी ई. स. १३३३ पासून ई. स. १३४२ पर्यंत हिंदुस्थानांत होता. (तो 'टांजीयर' येथील राहणारा, त्याचें नांव शेख अबू अबदुला महंमद. तो तारीख १ मोहर्रम स. ७३४ हिजरी ह्मणजे तारीख १२ सप्टेम्बर स. १३३३ ई. रोजीं, सिंधू नदीवर दाखल झाला, व पुढें ९ वर्षें इकडेच फिरत राहिला.) पश्चिमसमुद्र किनाऱ्यावरील एक मुसलमान संस्थानिकसुद्धां पहिल्या हरिहराच्या मांडलिकापैकीं होता. त्या रायाचें नांव 'हरायब' 'हारिब' किंवा 'हर्यप्पा' असें होतें. असें त्याच्या लेखावरून कळतें. पुढें १०० वर्षांनंतर इराणच्या शहाकडून 'अब्दुर्‌रझाक' नांवाचा वकील इकडे आलेला होता. त्यानें, 'विजयनगरचा राजा, त्या काळीं दक्षिणदेशाच्या उत्तरसीमेपासून तों कन्याकुमारीपर्यंत, आणि पूर्व व पश्चिम समुद्र यांच्या मधील सर्व देशाचा मालक

होता, 'सेरेन्डिब'-सुवर्णद्वीप-सीलोन-च्या हद्दीपासून तहत कलबुर्ग्यांच्या सरहद्दी-पर्यंत त्याचेंच राज्य होतें. व त्याची फौज ११ लक्ष होती,' असें लिहिलेलें आहे. फेरिस्ताच्या लेखाअन्वयें ई. स. १३७८ मध्यें देखील विजयनगरच्या रायाचें राज्य, वैभव, बळ, संपन्नता, विस्तार वगैरे बाबतींत, दक्षिणेंतील बाहमनी बादशाहतीहून पुष्कळच श्रेष्ठ होतें.

दक्षिणेंतील प्राचीन संस्थानें स्वस्थपणेंच या नव्या राज्याच्या ताब्यांत आलीं, असें दिसतें. ( याविषयीं ऐतिहासिक दाखला उपलब्ध नाहीं ) त्या भयंकर परचक्राची–मुसलमानांची--धाड देशांतून बाहेर ठेवतां आली तर पुरे म्हणून सुद्धां ते या ताबेदारीला राजी झाले असतील. तें चिमुकलें संस्थान भराभर वाढत वाढत त्याचें एक राज्य व पुढें थोडक्यांतच एक प्रचंड साम्राज्य–बादशाहत–बनून गेलें. या त्याच्या विलक्षण व साहसपूर्णशा उदयाला हरिहर व बुक्क यांच्या कारकिर्दी-मध्यें मुसलमानांतील गृहकलह, युद्धें व झगडे यांचीही चांगलीच मदत झाली. महंमद तघलखचे असह्य जुलूम, क्रौर्य, व वेडेवेडेचार यांना अत्यंत त्रासून व कंटाळून गेलेला सारा दक्षिणदेश ई. स. १३४७ सालीं बिथरला, व त्यामुळें स्वतंत्र अशी बाहमनी बादशाहत कांहीं काळासाठीं पक्की स्थापन झाली.

' नूनीज ' यानें आपल्या कैफीयतीच्या प्रारंभींच दिल्लीच्या राजाच्या परा-क्रमाचें वर्णन करून त्यानें गुजराथदेश काबीज केला व नंतर बालाघाटाच्या मार्गानें विजयनगरावर स्वारी केली, असें लिहून त्या सुलतानाचें नांव ' टोगाओ मामेडी' असल्याचेंही पुढें लिहिलें आहे. हा राजा महंमद तघलखच यांत शंका नाहीं. ' नूनीज ' यानें त्याची सालवारी देण्यांतमात्र एक शतकाची चूक केली आहे.

या सुलतानासंबंधें त्याच्या वेळीं प्रचलित असलेल्या पुष्कळशा दंतकथा त्यानें दिल्या आहेत. ( त्यांचा या विजयनगरच्या इतिहासाशीं संबंध नसल्यानें त्या येथे गाळल्या आहेत. आर. सीवेल साहेबांनीं याविषयीं एक कांवलच्क अवतरण घेतलेलें आहे. ) तसेंच त्यानें गुजराथदेश घेतल्याचेंही लिहिलें आहे, त्यांतही थोडी गडबड आहे. तो तिकडे गेला होता खरा, पण पुढें. ई. स. १३४७ मध्यें. विजयनगरावर–आनीगुंदीवर–स्वारी करण्यापूर्वीं नव्हे. त्यानें यावेळीं दक्षिणदेश काबीज केला, ' द्वारसमुद्र ', मलबार, आनीगुंदी–यालाच कंपली म्हटलेलें आहे–वगैरे स्थळें त्यानें–त्याच्या सरदारांनीं–पाडाव केलीं, आणि त्याच्या खालचे सारे प्रदेश, दिल्हीच्या आसपासच्या खेड्यापाड्या-च्या इतक्या पूर्णतेनें त्याच्या राज्यांमध्यें सामिल केले गेले होते, असे

— — —

फेरिस्तानें लिहिलें आहे. तेव्हां 'नूनीज' त्या पुस्तकांत गुजराथच्या जागीं दक्षिणदेश इतका फरक केला म्हणजे त्याचें 'टोगाओ मामेडी' चें वर्णन महंमद तघलख याला पुर्तेपणीं लागूं पडतें. फेरिस्ता व 'नूनीज' यांनीं केलेलीं त्याच्या स्वभावाविषयींचीं वर्णनेंही जुळतात. त्याचा अमानुष क्रूरपणा, व मनुष्यमात्राच्या प्राणाविषयीं आत्यंतिक बेपरवाइ, त्याची चीनदेशावरील मोहीम, दिल्हीसोडून देवगिरी येथें राजधानी कायम करण्याविषयींचे हुकूम, तत्प्रीत्यर्थ झालेले अनन्वित प्रकार, आपल्या किडक्या दातांवर एक भव्य मुकरबा बांधविणें, वगैरे गोष्टी तत्कालीन इतिहासामध्यें त्याच्या विलक्षण व वेड्या स्वभावाची साक्ष देण्याला प्रसिद्ध आहेत. त्याच्या कारकिर्दीच्या अव्वल अखेरीच्या तारखा पक्क्या निश्चित झालेल्या आहेत. शिवाय कृष्णदेवरायाच्या पूर्वीं होऊन गेलेल्या विजयनगरच्या राजांच्या कारकिर्दींची एकंदर वर्षसंख्या १८० येते. त्याची कारकिर्द ई. स. १५०९–१० सालीं सुरू झाली असें ठरलें आहे. या मानानें देवराय 'देहोराय' यानें या राज्याची स्थापना केल्याचें साल १३२९–३० येतें. तें अगदी नक्की न धरलें तरी, त्याच्यावरून 'नूनीज' यानें दिलेलें सन १२३० साल १०० वर्षांनीं पूर्वीचें आहे, असें ठरविण्याला साधन होतें. सबब हें राज्य स्थापन झालें तें याच सालीं, आणि 'टोगाओ मामेडी' व महंमद तघलख हे एकच, असें गृहीत धरलें आहे.

---

# भाग दुसरा.

## या साम्राज्याचा मूळारंभ.

सुलतान महंमद तघलख कंपली व आनीगुंदी घेतो–त्याचा पुतण्या बाहाउद्दीन याचा मृत्यु–आनीगुंदीच्या सुभेदारीवर मलिक नायब याची नेमणूक–गडबडी-बंडें–आनीगुंदी येथील राज्यपदावर हरिहरदेवरायाची स्थापना–माधवाचार्य-विद्यारण्य–विजयनगराची स्थापना–या स्थापनेसंबंधीं दंतकथा.

विजयनगरची स्थापना झाली ती ई. सन १३३६ सालच्या सुमाराला, असेंच बहुतेक नक्की मानतात. त्याला या पुढील दोन गोष्टी प्रमाणभूत आहेतः—

'इब्न बटूटा' यानें उल्लेख केलेला तेथील खरा राजा 'हरायब,' 'हर्य्याप्पा,' किंवा 'पहिला हरिहर' याचा एक शिलालेख ई. स. १३४० सालचा मिळालेला आहे. त्यानें दिलेलें महंम्मद तघलखाच्या दक्षिणदेशा-

वरील स्वारीचें वर्णन, 'नूनेजि' यानें दिलेल्या हकीकतीशीं बहुतेक जुळतें. तो म्हणतो, 'आपला बंडखोर पुतण्या बाहाउद्दीन यानें दक्षिणेंत पळून जाऊन 'कंबिला' येथील रायाचा आश्रय केला होता, त्याच्या विरुद्ध महम्मद तघलखानें स्वारी केली.' आनीगुंदीपासून आठ मैलांवर कंपली म्हणून गांव आहे तो व ही 'कंबिला' एकच. पूर्वी हा गांव बहुतेक विजयनगरच्या हद्दींतच होता. (ही स्वारी ई. स. १३३८-३९ मध्यें झाल्याचें फेरिस्तानें लिहिलें आहे. पण 'इब्न बटूटा' नें समक्ष हजर असल्या वेळची माहिती दिलेली असल्यानें ती जास्त विश्वसनीय होय). सुल्तानानें कंपलीवर हल्ला करितांच राजानें आनींगुंदीच्या गढीचा आश्रय केला असेल. त्यानें बाहाउद्दीनाला दुसऱ्या एका राजाकडे-त्यावेळीं म्हैसूरचा-द्वारसमुद्रचा-होयसळबल्लाळ राजा 'तानूर' येथें रहात होता-त्याच्याकडे कदाचित् पाठवून दिलें. त्याच्या स्वतःच्या व सरदार व मंत्री लोकांच्या बायकांमुलांकडून जोहार करविला, आणि सारे पुरुष सुल्तानाच्या फौजेवर तुटून पडून ठार झाले. 'किल्ला व शहर काबीज झालें, त्याच्यांत राजाचे ११ पुत्र सांपडले. त्यांना सुल्तानाकडे पाठविलें. त्यानें त्यांना मुसलमान केलें.' त्यांचें थोर कुल व त्यांच्या पित्याचे शौर्यादि गुण, याविषयीं सुल्तानाला आदर वाटला व त्यानें त्यांना मोठ्या इतमामानें व अगत्यानें ठेविलें. त्यांतील एकाबरोबर आपला पुष्कळच स्नेह जमला होता. 'आम्हीं स्नेही व सोबती झालों होतों' असेंही बटूटानें लिहिलें आहे.

या दोन्ही वर्णनांमध्यें एक दोन गोष्टींचा फरक आहे. हिंदू लोकांच्या दृष्टीनें ही मोहीम केवळ मुलूखगिरीसाठीं, आणि मुसलमानांच्या मतें ती एका बंडखोराचें पारपत्य करण्यासाठीं, झाली होती. पहिल्यांच्या मतें राजघराण्यांतील एकही पुरुष मागें उरला नाहीं. 'बटूटाचें म्हणणें, ११ राजपुत्र जिवंत राहिले व त्यांतील कांहींशीं त्याचा प्रत्यक्ष स्नेहसंबंध होता. तेव्हां त्याचें म्हणणें निर्विवाद दिसतें. तरी या दोन्हीं गोष्टींवरून या वर्णनांमध्यें विरुद्धपणा येतो असें नाहीं. बाटलेले राजपुत्र हिंदूच्या मतें, अर्थातच त्या कुलांतून कायमचे नष्ट म्हणजे मृतप्राय झाले. (येथें आणखी एक अडचण येते. मलिक नबीच्या पश्चात सुल्तानानें राज्य परत दिलें तें, पूर्वीच्या राजाच्या दिवाणाला. राजकुलांतील कोणीही पुरुष, येथें तर-प्रत्यक्ष राजपुत्र मुसलमान झालेले कां होईनात, जिवंत असतांना, त्यांना सोडून सुल्तान महम्मद तघलखासारखा कट्टा धर्मवेडा व हिंदूद्वेष्टा हिंदू दिवाणाला यांचें राज्य देईल, असें मानणें विसंगत वाटतें.)

हा किल्ला सर झाल्यावर त्याचा पुतण्या ज्याच्या आश्रयाला गेला होता त्याच्यावर सुल्तानानें स्वारी केली. तो राजधानीजवळ येतांच राजानें त्या

म.रु. १e२

पुतण्याला त्या दुष्ट राक्षसाच्या स्वाधीन केलें. त्यानें त्याचा अत्यंत क्रूरपणें वध करविला. 'सुलतानानें प्रथम त्याला आपल्या जनानखान्यामध्यें पाठविलें. तेथील स्त्रियांनीं त्याची छीः थूः करून, त्या त्याच्या अंगा तोंडावर थुंकल्या. नंतर त्यानें त्याचें जिवंतपणींच चामडें सोलविलें आणि त्याचें मांस तांदळांबरोबर शिजवून, कांहीं त्याच्या बायका मुलांकडे, आणि बाकीचें एका परातींत घालून हत्तीपुढें ठेवण्याला पाठविलें. हत्ती त्याला शिवेनात सुद्धां ! त्यानें त्याच्या चामड्यामध्यें पेंढा भरवून तें प्रेत बंगालचा ग्यासुद्दीन बहादुर बूरा याच्या प्रेताबरोबर ठेवून, दोघांचीही साऱ्या देशभर-मिरवणूक-धिंड काढविली ! '

आनीगुंदी घेतल्यावर मलिक नबी याला तेथें आपला नायब नेमून सुलतान परत फिरला. पुढें लौकरच तेथील लोक या परकीयांच्या विरुद्ध उठले. तसे कांहीं दिवसांनीं त्यानें तें संस्थान हिंदू लोकांना परत दिलें. त्यांत त्यानें पूर्वीच्या राजाच्या दिवाणाला राजपद दिलें, हें विशेष केलें. ' नूनीज ' यानें त्या राजाचें नांव 'देवराय' किंवा 'देहोराय' असें दिलें आहे. त्यानें सात वर्षे राज्य केलें. तो राज्य करीत असतांना एकदां नदीपलीकडच्या पहाडांत व जंगलांत शिकारीस गेला होता. तेव्हां एक ससा उठला. त्यानें राजाच्या शिकारी कुत्र्यांवर तोंड टाकलें व त्यांना पळवून लाविलें. याचा राजाला मोठा अचंबा वाटला. तो याबद्दल विचार करीत परत येत असतांना नदीच्या कांठीं त्याची व माधवाचार्य-विद्यारण्यांची गांठ पडली. त्यांनीं त्याला त्या जागीं नवें नगर वसविण्याला सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें नवें शहर स्थापन केलें, तेंच विजयनगर. तें ई. स. १३३६ च्या सुमाराला स्थापन झालें. पुढें तें फारच प्रसिद्ध व वैभवशाली झालें आणि त्याचा किती तरी विस्तार झाला.

त्या शहरामध्यें त्या महात्म्याच्या प्रीत्यर्थ राजानें एक भव्य मंदिर बांधविलें. तेंच हल्लींचें सुप्रसिद्ध विरूपाक्षाचें मंदिर. हल्लीं त्याच्या भोंवतीं नांवाला थोडीशी वस्ती राहिली आहे. त्याच्या जवळच उंच पहाडीवर एक लहानसें दगडी देवालय आहे. तें याच्या पूर्वीचें पण किती प्राचीन असावें तें नक्की ठरवितां येत नाहीं. तरी तें ई. स. ६००-७०० च्या सुमाराचें असावें. विजयनगर वसण्यापूर्वीं या लहानशा प्राचीन मंदिरापासून दिसणारा आसपासचा देखावा, त्याच्यांतील गिरी, नदी, घनदाट वृक्षराजी, वगैरेंनीं तसेंच जागजागीं अस्ताव्यस्त पडलेले लालवट भूऱ्या रंगाचे कुरुंदाचे प्रचंड टोळ, यांनींही व्याप्त असा देखावा तेथें एकांत वासांत तपाचरण करीत राहणाऱ्या साधू व तपस्वीजनांना कांहींसा भयाण तरी भारी प्रसन्न, शांत, व गंभीर वाटत असावा. इकडील प्राचीन महात्मे, तपस्वी व

**साधू लोक यांना अशास्थळीं राहण्याची नेहमीं आवड वाटे. अशांपैकींच माधवाचार्यही एक असावेत.** (माधवाचार्य हे आपले बंधू सायण यांच्यासह पूर्वाश्रमीं विजयनगरच्या बुक्करायाच्या पदरीं मोठ्या कामावर होते. त्यांनीं सर्व तऱ्हेनें राजाला मदत केली आणि त्याच्या राज्याचें वैभव, विस्तार व दरारा वाढविला. आपल्या योगबलानें त्यांनीं एकवार कांहीं घटका विजयनगरावर सुवर्णाची वृष्टि करविली अशी आख्यायिका आहे. पुढें त्यांनीं चतुर्थाश्रम स्वीकारून फार वर्षें शृंगेरीमठाचें आधिपत्य केलें आणि फार महत्वाची व अलौकिक अशी ग्रंथरचना केली. त्यांच्या संबंधानें पंचदशी, वेदभाष्यें, उपनिषदभाष्यें, सर्वदर्शनसंग्रह इत्यादि ग्रंथांच्या प्रस्तावनांमध्यें जास्त माहिती मिळेल.)

**विजयनगराची मूळपीठिका व स्थापना यासंबंधानें दुसऱ्याही पुष्कळशा दंतकथा प्रसिद्ध आहेत. त्यांतून कांहीं पुढें दिल्या आहेत.**

**ई. स. १३२३ सालीं मुसलमानांनीं वरंगळचें राज्य बुडविलें तेवेळीं तेथील राजाच्या पदरीं बुक्क व हरिहर हे दोघे बंधू होते. ते बरोबर कांहीं स्वार घेऊन आनीगुंदीच्या शेजारच्या प्रदेशांत आश्रयाला आले. त्यांच्या बरोबर माधव नांवाचा ब्राह्मण आला. तोच पुढें माधवाचार्य विद्यारण्य ह्मणून प्रसिद्धीस आला. पुढें ते कसे तरी त्या प्रदेशाचे मालक बनले आणि कांहीं दिवसांनंतर त्यांनीं विजयनगर वसविलें.**

( ह्मैसूरचा इतिहासकार बुकानान साहेब ई. स. १८०१ सालीं ह्मैसूरांतील ‘ वैदूर ’ या गांवीं गेला होता, तेथें त्याला रामाप्पा वर्मीक नांवाच्या गृहस्थानें ‘विद्यारण्य सिक्का’ किंवा ‘ विद्यारण्य शिक्षा ’ नांवाच्या संस्कृत ग्रंथाची एक पोथी दाखविली होती. ‘तिच्यांत, विजयनगरचे संस्थापक हुक्क व बुक्क हे दोघेही वरंगळच्या प्रतापरुद्र राजाचे कोशाध्यक्ष होते. ते दोघेही तरुण गृहस्थ त्यांचे गुरू त्यावेळचे श्रृंगेरीमठाचे जगद्गुरू विद्यारण्य, यांच्याकडे गेले. त्यांनीं त्यांच्याकरितां विजयनगराची स्थापना करून दिली. ती ई. स. १३३६ मध्यें. तेथील पहिला राजा बुक्क झाला,’ असें लिहिलें होतें पण असे पळून आलेले दोघे बंधू असें मोठें व संपन्न शहर कसें स्थापन करूं शकतील, ही या दंतकथेसंबंधी आशंका आहे. तिचा खुलासा होत नाहीं. ह्मैसूरचा इतिहास, तिसरें पुस्तक, पृष्ठ ११०. )

**दुसऱ्या एका दंतकथेप्रमाणें वरंगळ शहर मुसलमान लोकांनीं प्रथम ई. स. १३०९ सालीं पाडाव केलें. त्यानंतर हे दोघे बंधू तेथील मुसलमान सुभेदाराच्या पदरीं नोकर राहिले. मलिक काफूराची मोठ्या फौजेनिशीं ई. स. १३१० मध्यें होयसलबल्लाळ राजावर रवानगी झाली तेव्हां, त्याच्या फौजेंत हेही शामिल होते. त्या फौजेनें बल्लाळांची राजधानी द्वारसमुद्र काबिज**

केली गेली. पण हे ज्या फौजेच्या भागाबरोबर होते त्याचा पराभव झाला. तसे ते आनीगुंदीजवळच्या पहाडी व जंगली प्रदेशांत पळून गेले. तिकडे त्यांची महात्मा माधवाचार्यांची गांठ पडली. ते त्यावेळीं त्या प्रदेशांत तपाचरण करीत होते. त्यांच्याच सहाय्यानें त्या दोघां बंधूंनीं हें राज्य व राजधानी स्थापन केली.

तिसरी कथा अशी—हे दोघे बंधू वरंगळाहून थेट आनीगुंदी जवळच्या प्रदेशांत पळून आले. हिंदू या नात्यानें त्यांचें हें कृत्य विशेष आदराला पात्र होतें. प्रारंभीं निरुपायानें त्यांना त्या यवनांची सेवा करणें भाग पडलें असलें तरी, त्यांचा स्वाभिमान व देशधर्माभिमान जागृत होऊन त्यांनीं ती नीच सेवा सोडून या वन प्रदेशाचा आश्रय केला असेल.

चौथ्या एका दंतकथेअन्वयें माधवाचार्य यांनाच भूमिगत निधी सांपडला. त्यांनीं विजयनगराची स्थापना केली. तेथें त्यांनीं कांहीं काळ राज्यही केलें. नंतर तें त्यांनीं एका 'कुरुब' किंवा-धनगराच्या घराण्याकडे सोंपलें. त्या कुरुबांनींच प्रथमचें राजघराणें स्थापन केलें.

पांचवी एक कथा 'कूटो' यानें दिली आहे. त्यानें विजयनगराच्या स्थापनेचें साल ई. स. १२२० दिलें आहे. तें बहुधा 'नूनीज' याच्या बखरीवरून घेतलें असावें. माधवाचार्य हे त्या आसपासच्या जंगली प्रदेशांत तापस वृत्तीनें रहात असत. त्यांच्यासाठीं बुक्क नांवाचा एक गरीब धनगर शिधा सामग्री आणून देऊन त्यांची सेवा चाकरी करीत असे. त्याला त्यांनीं, 'तूं साऱ्या हिंदुस्थानाचा सार्वभौम राजा होशील,' असा आशीर्वाद दिला. हें दुसऱ्या धनगरांना कळलें व ते त्याला फार मान देऊं लागले. त्यांनीं त्याला आपला नायक केला. त्यानें स्वतःला राजा ह्मणवून घेऊन, जवळपासचे 'कानरा,' 'तालिगा,' 'कांजीवारो,' 'नेगापटाओ' आणि 'बडागा,' असे मिळून पांच राजांचे मुलूख काबीज केले. पुढें त्याचें नांव 'बोकाराव,' असें पडलें.' त्याच्यावर दिल्हीच्या सुल्तानानें स्वारी केली पण रायानें त्याचा पराभव करून त्याला परतून लावलें. नंतर बुक्करायानें एक नवें शहर वसविलें, व त्याचें नांव 'विसयनगर' ठेविलें. त्याचाच अपभ्रंश करून आपण 'विस्नग' ह्मणतों. साऱ्या राज्यालाही आपण तेंच नांव देतों, पण इकडील लोक त्याला कानराचें राज्य ह्मणतात.' 'कूटो'च्या ह्या वर्णनामध्यें बऱ्याच दंतकथांचें मिश्रण झालेलें दिसतें.

'निटिकिन' नांवाचा एक रशियन प्रवासी ई. सन १४७४ सालीं हिंदुस्थानांत होता. त्याच्या मतें ते दोघे बंधू बहुधा 'बनवासी' येथील प्राचीन कादंब

राजवंशांतील असावेत. त्यानें 'बिशेनघर येथील राहणारा हिंदु सुल्तान कदम' असे शब्द उपयोगांत आणिले आहेत.

यांच्या शिवायही यासंबंधानें इतर दंतकथा आहेत. त्या सर्वांवरून तुर्त पुढील मथितार्थ काढण्याला हरकत नाहीं. कुरुबजातीचे दोघे हिंदू बंधू होते. त्यांची धर्माकडे विशेष प्रवृत्ती होती. ते वरंगळच्या राजाकडे खजीन्यावर नोकर होते. वरंगळचें राज्य ई. स. १३२३ त पार बुडालें. तेव्हां ते तेथून निघून आनीगुंदी येथील संस्थानिकाच्या पदरीं राहिले. धाडेती व दुष्ट मुसलमान लोकांच्या वर्तनामुळें त्यांना व त्यांचा मालक यांना भारी त्वेष व किळस आला होता. त्यांनीं स्वदेश व स्वधर्म यांच्यासाठीं जीवापाड यत्न करण्याचें ठरविलें. ते दोघे बंधू त्या संस्थानांत दिवाण व खजीनदार झाले. ई. स. १३३४ त त्या संस्थानिकानें दिल्हीचा सुल्तान महम्मद तघलख, याचा पुतण्या बाहाउद्दीन याला आश्रय दिला सबब सुल्तानानें त्याच्यावर स्वारी केली. आनीगुंदी पाडाव झाली. सुल्तानानें मलिक नबी याला तेथें नायब नेमिलें. तो परत गेल्यावर त्या नायब नबीच्या हातून हिंदू लोकांना आंवरण्याचें काम निभेना. शेवटीं सुल्तानानें तो प्रदेश हिंदूंना परत सोंपला. पूर्वीच्या राजाचे दिवाण व खजीनदार असलेल्या दोघां बंधूंना, त्यानें तेथील राजा व दिवाण कायम केलें. तेच पहिला हरिहर व पहिला बुक्कराय नांवाचे राजे होत.

## विजयनगर येथील पहिल्या राजघराण्याचा वंशवृक्ष.

(एपिग्राफिआ इंडिकाच्या आधारानें).

- संगम.
  - १ पहिला हरिहर.
  - २ कंप.
    - संगम.
  - ३ पहिला बुक्क.
    - दुसरा हरिहर.
      - १ दुसरा बुक्कराय.
      - २ पहिला देवराय.
        - वीरविजय.
          - दुसरा देवराय.
            - १ मल्लिकार्जुन.
              - १ राजशेखर.
              - २ दुसरा विरूपाक्ष.
            - २ पहिला विरूपाक्ष.
          - प्रताप देवराय.
  - ४ माराप्पा.
  - ५ मुद्दाप्पा.

---

# भाग तिसरा.

## पहिले राजे (ई. स. १३३६ पासून १३७९ पर्यंत).

भराभर मुलुख संपादन—पहिला हरिहरराय—मुसलमानांच्या स्वाऱ्यांना अवरोध—पहिला बुक्कराय—कंपराय व संगमराय—ई. सन १३४० सालीं बाहमनी-राज्याची स्थापना—वरंगळचा राजा नागदेवराय याचा मृत्यु—विजयनगरच्या राजाचें पहिलें मोठें युद्ध—महंमदशहा बाहमनी यानें करविलेल्या कत्तली—अदोणी येथील लढाई, ई. स. १३६६—बुक्करायाचें पलायन—सुल्तान. मुजाहिद याची स्वारी, ई. स. १३७६—तो मलबार किनाऱ्यांवर जातो—विजयनगराला वेढा—अधिक मुलुखाचें संपादन—मुजाहिदशहाचें मरण, ई. सन १३७८.

विजयनगर शहर ई. स. १३३५ च्या सुमाराला स्थापिलें गेलें. तेव्हां-पासून त्याची भरभराटच होत गेली, आणि तें शहर पुढें चाल करून येणाऱ्या

मुसलमानांच्या मारामुळें स्थानभ्रष्ट झालेले लढवय्ये हिंदूलोक, तसेच निराश्रित व उनाड अशी मंडळी, यांचें आश्रयस्थानसें बनलें.

तेथील प्रथमच्या नायकांनीं स्वतःला राजे ह्मणविण्याचें साहस केलें नाहीं. त्यांच्या वेळचे शिलालेख लिहिणाऱ्या ब्राह्मण लोकांनींही त्यांना प्रथम प्रथमच्या लेखांमध्यें तें पद लावलेलें नाहीं. ह्मणूनच पहिला हरिहर व पहिला बुक्क यांना संस्थानिक ह्मटलें आहे. ई. सन १३४०च्या एका शिलालेखांत हरिहराला ' हरपय्या वोड्या ' ह्मटलें आहे. तें हरिहरराय याच्यापेक्षां कमी योग्यतेचें आहे. दुसऱ्यावरून त्याला संस्थानिक ह्मणतां येतें. त्याला ' महा मंडलेश्वर ' ह्मटलें आहे, राजा नव्हे. पहिल्या बुक्करायाचे दोन शिलालेख उपलब्ध आहेत त्यांतील एक ई. स. १३५३ सालचा आहे. त्यांच्यांतही त्याला हीच पदवी दिलेली आहे. ई. स. १३४० सालांतसुद्धां हरिहराच्या ताब्यांत पुष्कळसा मुलुख आलेला होता. मलप्रभेच्या उत्तरेस कलादगी जिल्ह्यांतील बऱ्याच भागावर त्याची सत्ता होती, असें दिसतें. त्या भागावरही महंमद तघलखाची स्वारी झालेली होती. हरिहराचा हा अंमल नुस्ता औपचारिक होता असें नाहीं. कारण त्या सालीं बदामीचा किल्ला बांधला गेला. त्याच्यासाठीं त्याच्याकडून परवानगी दिली गेली आहे.

याप्रमाणें विजयनगरच्या पहिल्याच संस्थानिकानें स्वस्थपणें व बहुशः लढाया न करितांच पुष्कळसा मुलुख कबजांत घेऊन आपलें वजन बसविलें होतेंसें दिसतें. त्याची अशी कांहीं वैभवोन्नती होत गेली कीं, बुक्करायाच्या मागून गादीवर बसलेला दुसरा हरिहरराय यानें आपणाला ' राजाधिराज ' म्हणविण्या-इतकी त्याची योग्यता वाढली होती.

'नूनीज' यानें देवराय किंवा 'देहोराय' असें नांव दिलेला पहिला हरिहरराय यानें सात वर्षें राज्य केलें. त्या अवधींत त्यानें राज्याची स्थिरस्थावर मात्र केली. त्याच्या मरणसमयीं साऱ्या राज्यांत शांतता होती. तो सुमारें ई. स. १३४३ सालीं मरण पावला. त्यानें आपल्या गुरूच्या प्रीत्यर्थ एक मोठें मंदिर बांधविलें, असें 'नूनीज' ह्मणतो. हंपी येथें तुंगभद्रातीरावर श्रीविरूपाक्षाचें भव्य व प्रचंड देवालय अद्यापि कायम असून तेथें रोज पूजा अर्चा होते. तेंच हें मंदिर होय. ई. स. १५६५ त मुसलमानांनीं विजयनगर उध्वस्त करून तेथील बहुतेक राजवाडे व मंदिरें पार पाडून फोडून टाकलीं. त्या सर्व संहारामधून हें एकच मंदिर बचावलेलें होतें. ' इब्न बटूटा ' यानें ई. स. १३४२ सालच्या सुमाराला याच राजाच्या नांवाचा 'हरायब' किंवा, 'हरिब' असा उल्लेख केला

आहे. तो ई. स. १३४४ च्या पूर्वींच मरण पावला असला पाहिजे. कारण वरंगळचा राजा प्रतापरुद्र याचा पुत्र कृष्णराय हा त्या वर्षी विजयनगर येथें आश्रयाला आला, आणि त्यानें विजयनगरचा राजा व द्वारसमुद्र येथील अवशिष्ट बल्लाळवंशीय राजपुत्र, यांच्या सहाय्यानें मुसलमानलोकांना परतून लावून कांहीं काल तरी दक्षिणदेशाच्या दक्षिण भागाचा बराचसा बचाव केला, व विंध्यपर्वताच्या दक्षिणेचें दिल्हीपतीचें साम्राज्य नष्टप्राय होण्याला मार्ग मोकळा केला. दुसरा हरिहरराय ई. स. १३४३ च्या सुमाराला मरण पावला असावा, असें ह्मटलें आहे तें यावरूनच. त्याची कारकिर्द शांततेची व स्वस्थतेची होती असें 'नूनीज' नें ह्मटलें आहे. त्याच्या विरुद्ध असा एकच उल्लेख आढळतो. दुसऱ्या संगमरायाचा ई. स. १३५६ सालचा एक शिलालेख मिळालेला आहे. त्याच्यांत 'हरिहर' रायानें 'सुल्तानाचा पराभव केला' असें ह्मटलें आहे.

पण याचा अर्थ कदाचित् महंमद तघलखाला इकडील अंमल सोडून द्यावा लागला, इतकाच असेल.

दुसरा राजा पहिला बुक्कराय, हा हरिहररायाचा भाऊ. त्यानें ३७ वर्षें राज्य केलें. त्या अवधींत त्यानें ओरीसाचें राज्य व दक्षिणेंतील सारीं राज्यें पादाक्रांत केलीं. तीं त्यानें जबरदस्तीनें घेतलीं किंवा आपण होऊन त्यांनींच त्याची ताबेदारी कबूल केली, हें नक्की ठरवितां येत नाहीं. मुसलमानलोक सारखे पुढें वाढून येत होते. त्यांच्या धाडीमध्यें चिरडून जाण्यापेक्षां एखाद्या आपल्याच प्रबल हिंदुराजाची ताबेदारी पतकरून राहिलेलें बरें, असेंही त्यांना वाटलें असेल. ( गुत्तीच्या प्रचंड किल्ल्याजवळ एका खडकावर एक शिलालेख आहे. त्याचें साल दिलेलें नाहीं. त्याच्या मध्यें, तो किल्ला बुक्करायाच्या ताब्यांत असल्याचा उल्लेख आहे. तो किल्ला विजयनगराहून पूर्वेस ७८ मैलांवर आहे. )

हा बुक्कराय ई. स. १३८० च्या सुमारास मरण पावला. त्याच्या कारकिर्दींतील शिलालेख ई. सन १३५४ पासून ई. सन १३७१ पर्यंतचे उपलब्ध आहेत. त्याच्यामागून दुसरा हरिहरराय गादीवर आला. त्याचा ई. स. १३७९ सालचा लेख मिळालेला आहे. या मानानें 'नूनीज' नें दिलेल्या कालामध्यें फायतो एक वर्षाचाच फरक पडतो.

नेलोर येथील कलेक्टर कचेरींत एक ताम्रपत्र आहे. त्यावरून पहातां पहिल्या हरिहररायाच्या मागून पहिला बुक्कराय बिनतक्रार गादीवर आला,

असें दिसत नाहीं. त्याच्या बापाचें नांव संगम. त्याला हरिहर, कंप व बुक्क, असे तीन पुत्र होते. नेलोर येथील ताम्रपट ई. स. १३५६ सालचा, दूर पूर्व समुद्राकडील प्रदेशांतून आलेला. त्याच्यांत, कंपाच पुत्र दुसरा संगमराय यानें, नेलोर जिल्ह्यांतील एक गांव कांहीं ब्राह्मणांना तारीख ३ मे स. १३५६ रोजीं अग्रहार दिला व त्यापूर्वीं एक वर्ष संगमराय गादीवर बसला होता, असा मतलब आहे. ह्मणजे स. १३४३ पासून स. १३५५ पर्यंत कंपराय गादीवर होता असें होतें. यापलीकडे माहिती तुर्त मिळालेली नाहीं. याशिवाय कंप किंवा संगम यांच्या वेळचा एकच लेख आढळलेला आहे. ( याचप्रमाणें शके १२९० किंवा स. १३६८-६९ सालचा एक लेख आहे. त्याच्यांत माधवाचार्य–विद्यारण्य–हे त्यावेळीं हयात असल्याचें लिहिलें आहे. ) 'माधवीय धातुवृत्ति' या ग्रंथाच्या एका पोथींमध्यें शेवटीं, तिचा कर्ता माधवाचार्याचा सख्खा बंधू सायनाचार्य, हा कंपरायाचा दिवाण होता, असें लिहिलें आहे. यावरून हरिहररायाच्या पश्चात गादीबद्दल झगडासा झाला, त्यांत कशा प्रकारें कां होईना, बुकरायाची सरशी झाली, तो स्वतःला स. १३५४ पासून राजा ह्मणवूं लागला, पुढें तो हरिहररायाच्या, मागूनच राजपद पावला, असें अनुमान निघतें. पुढें वेळोवेळीं नवीन राजा गादीवर बसतेवेळीं तंटे व झगडे होत गेले. प्रत्येक राज्या रोहाणाच्या प्रसंगीं राजकुलांतील पुरुषांवर गर्दी व खून होण्यापर्यंत नोबत पोहोंचत असे. अखेर सर्वांमध्यें प्रबल असेल तोच राज्याधिकारी होई. हीच व्यवस्था यावेळींही घडली असेल.

दुसरा बुकराय स. १३४३ पासून स. १३७९ पर्यंत गादीवर होता असें गृहीत धरून, कृष्णेच्या उत्तरेस सर्वतोपरी प्रबल होऊन बसलेल्या मुसलमान लोकांशीं त्याचा कसा काय संबंध राहिला होता तें फेरिस्ताच्या लेखावरून पाहतां असें दिसतें कीं, तो गादीवर आल्यानंतर लौकरच, मागें उल्लेख केलेली हिंदूराजसमूहाची स्वारी होऊन मुसलमानांची पीछेहाट करविली गेली. फेरिस्ताच्या लेखाप्रमाणें, वरंगळच्या रुद्रदेवाचा पुत्र कृष्णनायक स. १३४३–४४ सालीं खानगीरीतीनें बल्लाळदेवाकडे गेला. त्यानें त्याला मुसलमानांना दक्षिणेंतून हांकून लावण्यास्तव जमलेल्या हिंदू राजांच्या कटामध्यें सामिल होण्याविषयीं आग्रह केला. त्याची ती विनंती बल्लाळदेवानें मान्य केली. सर्व तयारी होतांच तेलंगणांतील साऱ्या हिंदू लोकांची उठावणी करून त्यांना घेऊन येण्याचें कृष्णनायकानें अभिवचन दिलें. 'बल्लाळदेवानें विजयनगर स्थापन केलें,' ( ही अर्थातच चूक आहे, असें मोठें शहर

एक दोन वर्षांत स्थापन होत नाहीं. युद्धाला निघालेला वल्लाळदेव शहर स्थापन करण्याच्या उठाठेवींत पडेल असेंही संभवत नाहीं.) त्यानें एक भारी फौज तयार केली आणि युद्धाला आरंभ झाला. वरंगळ मुसलमानांच्या कबजांत होतें तें परत घेतलें गेलें. तेथील अधिकारी इमादुल्मुल्क देवगिरी किंवा दौलताबाद येथें गेला. त्या दोघां राजांनीं मलबार व कानरा येथील राजांनाही आपल्या कटांत सामिल करून घेतलें होतें. त्या सर्वांच्या फौजांनीं सारा दक्षिणदेश परत घेऊन तेथून मुसलमानांना हांकून दिलें, ' येथवर कीं, थोड्याच महिन्यांमध्यें त्या प्रदेशांत महंमद तघलख बादशहाकडे दौलताबादेशिवाय कांहीं राहिलें नाहीं. '

हिंदू लोकांनीं संपादन केलेला हा विजय तात्पुरताच होता. त्यांचे शत्रु–मुसलमान लोक–यांचा दक्षिणदेशामध्यें सुळसुळाट अद्यापि कायमच होता. या कटकटीनंतर हिंदू लोक कृष्णापार होऊन स्वस्थ बसले. तिच्या उत्तरेस बेबंदशाही सुरू राहिली. ती तरी थोडेच दिवस. तिकडचा दिल्हीपतीचा अंमल नष्ट झाला. तरी पुढें तीनच वर्षांनीं–फेरिस्ताच्या लेखाप्रमाणें–तारीख २४ रबिलाखर स. ७४८ हिजरी किंवा तारीख ३ अगस्ट स. १३४७ रोजीं, अल्लाउद्दीन बाहमनी कलबुर्गा येथें दक्षिणचा अधिपती ह्मणून तख्तनशीन झाला व त्यानें एक नवीन राजघराणें स्थापन केलें. तें १४० वर्षें टिकलें. यानंतर त्यानें लौकरच कर्नाटकावर स्वारी केली. तिच्यांत त्याला कांहींसें यश आलें व लूटही मिळाली. पण चांगलासा विजय मिळाल्याचें फेरिस्तानें लिहिलेलें नाहीं. तरी त्यानें आपला अंमल दक्षिणेंत तुंगभद्रेपलीकडे ' अदोणीच्या जवळपासपर्यंत ' वाढविला, असें तो लिहितो. सुलतान अलाउद्दीन आपल्या वयाच्या ६७व्या वर्षीं, तारीख २ फेब्रुवारी स. १३५८ रोजीं रविवारीं, मृत्यु पावला. त्याच्या मागून महंमदशहा गादीवर बसला. अल्लाउद्दीनाला विजयनगरच्या राजानें एक बहुमोल माणिक नजर केलें होतें. तें त्यानें एका रत्नखचित ताऊसाला लावून, तो ताऊस आपल्या सिंहासनाच्या मेघडंबरीवर बसविला होता. (ही गोष्ट पुढें महंमदशहाच्या वेळीं घडली.) त्यानें तें माणिक आपल्या बादशाही छत्रावर बसविलें होतें, असेंही कोणी कोणी लिहिलें आहे.

महंमदशहाच्या कारकिर्दीच्या अवलीलाच, विजयनगर व वरंगळ येथील हिंदू लोक बाहमनी सुलतानाचीं सोन्या रुप्याचीं नाणीं पुष्कळशीं आटवितात, असें आढळून आलें. सबब त्याच्या हुकुमानें बऱ्याचशा व्यापाऱ्यांचीं डोकीं मारविलीं गेलीं. याच सुमाराला बुक्करायानें वरंगळच्या राजाच्या सहाय्यानें

कांहीं प्रांत परत देण्याबद्दल सुलतानाच्या मागें तगादा लावला. त्यावेळीं सुलतानाची नीट तयारी झालेली नव्हती म्हणून त्यानें सुमारें दीड वर्ष रायाचे वकील आपल्या व आपले रायाच्या दरबारांत पाठवून चाळवाचाळव केली. अखेर युद्धाची पुर्ती तयारी होतांच उलट त्यानें रायावर अनापसनाप मागण्या केल्या. बुक्करायानें वरंगळच्या मदतीला सैन्य पाठविलें. महंमदशहानें वरंगळच्या राज्यावर स्वारी केली, व थेट राजधानीपर्यंत मुलूख लुटून फस्त केला. त्याला पुष्कळसा करभार, दंड व नजर नजराणा मिळाला तेव्हांच तो परत फिरला. या पलीकडे कांहीं स्वाऱ्या शिकाऱ्या झाल्याचें फेरिस्तानें लिहिलें नाहीं. यावरून यावेळीं मिळालेल्या विजयाचा विशेषसा फायदा मुसलमान लोकांना घेतां आला नाहीं, असें दिसतें. वरंगळाला यानंतर फार दिवस स्वस्थता सांपडली नाहीं. विजयनगरांतील बुक्करायाची पुढची हकीकत देण्यापूर्वीं या वरंगळच्या राज्याचा पुढील कांहींसा इतिहास येथेंच देऊन टाकलेला बरा.

थोड्या दिवसांनीच वरंगळच्या राजानें केलेल्या खऱ्या किंवा लटक्याच अपमानाचें निमित्त करून महम्मदशहानें क्रोधाविष्ट होऊन एकदम तडक स्वारी केली व तो राजधानीचें शहर 'वेल्लनपट्टण' किंवा 'फिलमपट्टण' येथें पोहों-चला. त्यानें तें शहर घेतलें व तेथील लोकांची क्रूरपणें कत्तल केली. तेथील हतभागी राजा 'नागदेव'–'विनायकदेव'–त्याच्या हातीं सांपडला. त्याला त्यानें 'किल्ल्याजवळच एक भली मोठी चिता तयार करविली आणि तिच्या मध्यें एका उल्हाट यंत्रांतून फेंकून देवविलें ! तेथेंच तो जळून मेला.' सुलतान कांहीं दिवस विश्रांती घेऊन परत फिरला तेव्हां वाटेंत त्याला पुष्कळशा हिंदू फौजेनें जागजागीं भारी त्रास दिला व अखेर त्याचा पुर्ताच फडशासा पाडला. त्याच्या भारी फौजेंतून सारे १५०० लोक कलबुर्ग्याला परत आले. त्याच्या दंडालाही जबर वार लागला. (या सुमारास बुक्करायाच्या फौजेचा सेनापती 'नाडेगोंटा'–सायनाचा पुत्र नाडगोडा मल्लिनाथ नांवाचा होता असें सन १३५५-५६-५७ सालच्या कांहीं शिलालेखांवरून कळतें.)

यानंतर बुक्कराय व वरंगळचा राजा यांनीं दिल्हीच्या बादशहाकडे वकील पाठवून, 'दक्षिणेंतील आपला नष्ट झालेला अंमल कायम करण्यासाठीं फौजेची रवानगी होईल तर आपण तिला मदत करूं' असें बोलणें लावलें. 'पण त्यावेळीं फीरोजशहा गृहकलहामध्यें गुरफटलेला असल्यामुळें त्यानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. यावरून महम्मदशहाला जास्तच हुरूप आला. त्यानें दोन

मोठ्या फौजा तयार केल्या आणि त्या वरंगळावर व गोवळकोंड्यावर, अशा धाडल्या. या मोहिमांमध्यें त्याला पुर्तेपणीं यश आलें. राजानें हार खाल्लीं सुल्तानाला यावेळीं अतोनात द्रव्य, अप्रतिम रत्नखचित सिंहासन, व गोवळ-कोंड्याचा किल्ला, असें प्राप्त झालें, तेव्हांच त्यानें तह करणें कबूल केलें. त्या सिंहासनाला बिनमोल जवाहीर लागलेलें होतें. नंतरही तें किती तरी सज-विलें गेलें. एके वेळीं त्याची किंमत चार कोटी रुपयांवर झाली होती ! स. १४१४ सालीं वरंगळचें राज्य कायमचें बुडालें, आणि बाहमनी राज्यांत सामिल झालें. याप्रमाणें मुसलमानी अंमल कृष्णेच्या उत्तरकांठीं, मुखा-कडील थोड्याशा भागाशिवाय, कायमचा बसला.

स. १३६६ च्या प्रारंभाच्या सुमाराला सुलतानानें विजयनगरावर प्रथम-ची स्वारी सुरू केली. तिचा आरंभ निव्वळ मैफिलींतल्या थट्टामस्करीमध्यें झाला, पण तिच्या पायीं, फेरिस्ताच्या लेखाअन्वयें, पांच लक्ष हिंदू बळी पडले, तेव्हां कोठें त्याचें शमन झालें ! सुल्तान महंमद याचा शिकेनवीस मुल्लादाऊद बेदर-कर याच्या लेखावरून याबद्दलची हकीकत त्यानें प्रत्यक्ष पाहिलेली–फेरिस्तानें घेतली आहे-ती अशीः–

' एके दिवशीं एक मोठा जलसा झाला. त्यांत गवयांचें गाणें वगैरे ऐकून सुल्तान फारच खुप झाला. त्यानें त्या ३०० गवयांना विजयनगरच्या खजीन्यावर वराता देण्याचा हुकूम केला. तो त्यानें दारूच्या अमलांत दिला असावा, असें समजून, वजीरानें वराता तयार केल्या, पण रवाना केल्या नाहींत. सुल्तानानें त्याचा भाव ताडून दुसरे दिवशीं त्याच्या रवानगीबद्दल चौकशी केली, तेव्हां नकाराचें उत्तर मिळालेलें ऐकून, त्यानें म्हटलें 'आमच्या मुखांतून वायफळ शब्द निघतील असें तुम्हांला कसें वाटलें. मी तो हुकूम बुद्ध्या, विचारानें व कांहीं हेतूनें दिला आहे. नशेंत नव्हे.' मलिक सैफुद्दीन वजीर यानें त्या वरातांवर शिक्का मोर्तब करून, खाशा जासूदांच्या हातीं, विजयनगरच्या रायाकडे धाडल्या. रायाला यावेळीं आपल्या राज्याचा विस्तार आणि सामर्थ्य, याविषयीं मोठी घमेंड व अभिमान वाटत होता. त्यानें त्या जासूदांची साऱ्या शहरभर गाढवावर धिंड काढविली व फारच अपमान व छीः थूः करून त्यांना परत पाठविलें; आणि एकदम सैन्य सज्ज करून बाहमनी राज्यावर चढाई करण्याची तयारी केली. तीस हजार स्वार, एक लक्ष पायदळ, व तीन हजार हत्ती, यांच्या सह तो 'उदनी' किंवा अदोणी किल्या-जवळ दाखल झाला. आसपासच्या मुसलमानी अंमलांतील प्रांतांत सैन्याच्या तुकड्या पाठवून त्यानें भारी लूटमार व धूळधाणी चालविली. ( उदनी किंवा अदोणी

हा मोठा व मजबूत दुर्ग तुंगभद्रेच्या दक्षिणेस सुमारें २४ मैलांवर हल्लींच्या रेलवे लायनीवर आहे. त्याच्या सभोंवार बरेच भक्कम कोट बांधलेले आहेत. )

ते दिवस पावसाळयाचे होते तरी, रायानें मुद्गलावर चढाई केली. तें शहर कृष्णा व तुंगभद्रा यांच्या मधील दुआबामध्यें आहे. पुढें सुमारें २०० वर्षें या दुआबाच्या स्वामित्वासंबंधानें हिंदू व मुसलमान यांच्यामध्यें सारख्या लढाया व कटकटी चालू राहिल्या. रायानें मुद्गल पाडाव केलें. तेथील सारे मुसलमान पुरूष, बायका, मुलें यांची कत्तल झाली. त्यांतून एकच मनुष्य वांचून कलबुर्ग्याला पोहोंचला व तेथें त्यानें सुलतानाला हें वर्तमान कळविलें.

' तें ऐकतांच त्याला भारीच त्वेष व शोकावेग आला. त्यानें त्या बिचाऱ्या ' दूताला तात्काल ठार मारा, कारण अशा रीतीनें त्या सर्व शूर वीरांची कत्तल समक्ष पाहून जिवंत राहिलेल्या नीचाचें दर्शनसुद्धां आपणाला दुस्सह वाटतें, ' असें म्हटलें.

त्याच दिवशीं स. ७६७ हिजरीच्या जमादिलावल महिन्यांत, म्हणजे स. १३६६ च्या जानेवारी फेब्रुवारीमध्यें, त्यानें घोर प्रतिज्ञा करून शपथ वाहिली कीं 'या मुसलमान लोकांच्या कत्तलीच्या निरसनार्थ एक लक्ष काफरांचीं डोकीं मारल्यावांचून आपण तरवार म्यानांत घालणार नाहीं.' नंतर त्यानें दक्षिणेकडे प्रयाण केलें. कृष्णेवर पोहोंचतांच त्यानें 'आपणाला पैदा करून या उच्च पदावर पोहोंचविणाऱ्या सर्व समर्थ शक्तीचीच साक्ष, शत्रूच्या समोर, त्याला न जुमानतां नदीपार होई तों आपल्याला अन्न ग्रहण, आराम व निद्रा, हराम होत,' असा निश्चय केला. देवाच्या दयेनें त्यानें शत्रूच्या फौजेचा पराभव केला, आणि त्यायोगानें, मुद्गल येथें शहीद झालेल्या मुसलमानांच्या आत्म्यांना, त्या काफरांच्या रक्तपातानें आनंदित केलें. त्यानें आपला पुत्र मुजाहिदशहा, आणि वजीर मलिक सैफुद्दीन, यांना राज्याचा वारस व कुल मुख्त्यार कायम केलें. स्वतः २० हत्ती ठेवून बाकीचे सारे त्यांच्या स्वाधीन केले; आणि त्यांना राज्याच्या व्यवस्थेसंबंधें वगैरे उपदेश करून कलबुर्ग्यास परत पाठविलें. नंतर तो ९००० निवडक स्वारांनिशीं तात्काल नदीपार झाला. यावेळीं रायानें जवळ भली मोठी फौज असतांनाही घाबरून आपलें सर्व मौल्यवान सामान, खजीना व हत्ती, विजयनगराला परत पाठवून दुसरे दिवशीं प्रसंग पडेल तसें लढाई करण्याचें किंवा परत फिरण्याचें ठरविलें. सामान रवाना झाल्यावर रात्रीं फारच जोराचा पाऊस पडला. त्या मुळें हत्ती व सारीं ओझ्याचीं जनावरें जागजागीं चिखलांत रुतत होतीं. साऱ्या

रात्रींत तीं मोठ्या कष्टानें कृष्णेपासून कोस दीड कोस गेलीं होतीं. महंमदशहाला याची खबर कळली. तेव्हां त्यानें आपली छावणी तशीच उभी ठेवून त्याच्यावर धांवा केला, आणि पहाटच्या सुमारास त्यांना गांठलें. तो आल्याचें कळतांच हिंदू फौजेंत मोठीच हूल पडली आणि ते लोक सारें सोडून एकदम अदोणीकडे पळून गेले. महंमदशहानें त्या बाजाराच्या छावणींत शिरून सरसकट कत्तल चालविली. त्यांत एकंदर मुलें, बायका, व पुरुष मिळून सत्तर हजार माणसें मारलीं गेलीं, असें ह्मणतात.' ( फेरिस्ताचें लिहिणें नेहमी मुसलमानांविषयीं पक्षपातयुक्त आहे. त्यानें इतिहास लिहिला तो या पुढें सोळाव्या शतकाच्या अखेरीस व सत्राव्याच्या प्रारंभीं, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. अदोणीच्या आसपासच्या प्रदेशांत सारें काळें रान आहे. पाऊस पडल्यावर बरेच दिवस त्याच्यांतून मार्ग मिळणें मुष्किलीचें होतें. )

पुढील उन्हाळा व पावसाळयाचे कांहीं दिवस महंमदशाहानें मुद्गलासच काढले. नंतर कुमक येऊन पोहोंचल्यावर तो अदोणीवर गेला. 'रायानें त्याच्या जवळच्या सपाट प्रदेशांत तुंगभद्रेच्या कांठाजवळ तळ दिला होता. त्यानें आपल्या भाच्याला अदोणी येथें मुख्य अधिकारी नेमिलें होतें. या ठिकाणींही त्यानें भलें थोरलें सैन्य जमविलें होतें, आणि विजयनगराहून हत्ती व सारीं मौल्यवान राजचिन्हेंही आणविलीं होतीं यावरून स. १३६६ च्या सुमाराला देखील विजयनगरचें राज्य मोठ्याच महत्वाला न वैभवाला पोहोंचलें असें सिद्ध होतें.

सुल्तानाच्या फौजेबरोबर तोफखानाही होता. ( ही गोष्ट कांहींच्या मतें संभवनीय नाही. ) तो लौकरच तुंगभद्रा उतरून 'विजयनगरच्या राज्याच्या हद्दींत शिरला. त्या राज्यामध्यें मुसलमान सुल्तानानें समक्ष स्वारी करून प्रवेश केला असा हा प्रथमचाच होय.' ( हें फेरिस्ताचें ह्मणणें खरें आहे. पूर्वी आनीगुंदीवर स्वारी झाली होती ती तुंगभद्रेच्या उत्तरकांठावर होती. )

फेरिस्तानें विजयनगरच्या राजाचें नांव 'किशेनराय' 'कृष्णराय' असें दिलें आहे, पण तें ठीक नाहीं. या वेळीं बुक्करायच गादीवर होता. पुढें २०० वर्षांनीं लिहिलेल्या या इतिहासामध्यें हिंदू नांवाच्या संबंधानें अशा चुका वरचेवर आढळतात.

महम्मदशहा तुंगभद्रा उतरला, तेथून अदोणी सारी आठ कोस होती. अदोणीचा किल्ला एका पहाडाच्या कड्यावर बांधलेला आहे. या सुमाराला

तुंगभद्रेला धनुष्याकार वळण आलेलें आहे. त्याची त्रिज्या आठ कोस आणि केंद्र अदोणीवर सुमारें येतें. नदीला जागजागीं बहुतेक बाराही महिने उतार असतो. पात्रांत पुष्कळ ठिकाणीं खडक आलेले आहेत. कांठही विशेष उंच नाहींत. या मोहिमेंतील स्थळांचा पक्का निर्णय करणें कठीण आहे. सुलतान अदोणीच्या रोखानें चाललेला पाहून, मोठीशी फौज बरोबर घेऊन, त्या किल्याच्या जवळ-पासच, राय त्याला आडवा आला. सुलतान हल्लींच्या शिरगुप्पा गांवाजवळच नदी उतरला असावा. पुढें भारी मोठी लढाई झाली, तीही कौताल गांवाच्या आसपासच्या मोकळ्या काळ्या रानामध्येंच झाली असावी.

फेरिस्तानें याविषयींचें वर्णन दिलें आहे तें :–

' रायकिश्नरायाला–बुक्करायाला–सुलतान नदी उतरल्याची खबर लागली. तेव्हां त्यानें आपले सारे मुख्य मुख्य सरदार वगैरे जमवून, मुसल-मानी फौजेच्या प्रतिकाराविषयीं सल्ला विचारली. विचाराअंतीं असें ठरलें कीं, राजाचा मामा व मुख्य दळवई 'होजेमल्ल' याच्याकडे हें काम सोंपावें. 'होजेमल्ल' फारच गर्विष्ट होता. त्यानें 'सुलतानाला धरून आणावा, किंवा त्याचें शिर भाल्यावर टोंचून आणावें,' असें रायाला विचारिलें ! 'शत्रु जिवंत ठेवणें चांगलें नव्हे. तेव्हां तो हातीं येतांच ठार मारावा,' असें रायानें उत्तर दिलें ! याप्रमाणें आज्ञा मिळाल्यावर ४०,००० स्वार व ५,००,००० पायदळ घेऊन तो सुलतानाचा प्रतिकार करण्याला निघाला. 'मुसलमानांना ठार मारण्यांत मोठें पुण्य लागतें, याचें माहात्म्य प्रति दिवशीं फौजेंतील लोकांना चांगल्या रीतीनें समजावून देण्याविषयीं त्यानें बरोबरच्या ब्राम्हण पुराणिकांना सांगितलें. तसेंच त्यांचा नायनाट करण्याला हर तऱ्हेनें झटावें व सर्वांना हुरूप यावा म्हणून त्यानें, मुसलमान लोक गोवध करितात, मूर्ती फोडतात, मंदिरें पाडतात, आपल्या बायका पोरांना मारतात, भ्रष्ट करितात व बाटवितात, आणि आपल्याला सर्व तऱ्हेनें पीडा देऊन आपला अपमान करितात, या सर्व गोष्टींबद्दल सविस्तर वर्णन करून प्रयत्न करण्यालाही त्यांना सांगितलें होतें.'

ही फौज आपल्यापासून १५ कोसांवर आल्याचें कळतांच महम्मदशहानें सिपेहसालार, खान महम्मद, याला फौजेची हजीरी घेण्याला सांगितलें. त्या फौजेंत १५,०६० स्वार व ५०,००० पायदळ होतें. त्यांतून १०,००० स्वार, ३०,००० पायदळ व साऱ्या तोफा यांच्यासह त्यानें त्याची पुढें रवानगी केली.

'ता: १४ जिल्काद स. १७६७ हिजरी म्हणजे गुरुवार ता: २३ जुलाई स. १३६६ रोजीं, त्या तम आणि तेजरूपी फौजा भिडल्या. सूर्योदयापासून तिसरा प्रहर उलटेपर्यंत खवळलेल्या समुद्राच्या लाटांप्रमाणें परस्पर सारखें युद्ध चाललें होतें. दोंहीकडील पुष्कळच लोक ठार झाले. खान महम्मदच्या फौजेच्या उजव्या डाव्या पक्षाचे अधिपती मूसाखान व ईसाखान शहीद झाले, व फौजेच्या त्या भागांची दाणादाण झाली. त्या योगानें मुसलमानी फौजेला जबरदस्त धक्का बसला होता. तोंच खुद्द सुलतान तीन हजार ताज्या स्वारांसह येऊन थडकला. तसें खान महम्मदाला व त्याच्या लोकांना स्फुरण चढून ते पुनः सांवरले. मुकरिबखानही तोफखान्यासह पुढें वाढला व त्यानें शत्रूच्या फौजेंत धूळधाण उडवून दिली. आणखीही पुढें वाढून त्यांचा पुरा फडशा पाडण्याला त्यानें परवानगी मागितली. ती खान महम्मदानें दिली व शिवाय कांहीं सरदारांच्या हाताखालची फौजही त्याच्या मदतीला पाठविली. तसा त्यानें इतक्या नेटानें व आवेशानें धांवा केला कीं, शत्रूला आपल्या तोफा कामीं आणण्याला फुरसत मिळाली नाहीं. ते हातघाईला आले आणि तरवारी व जंबिये यांनींच लढूं लागले. तितक्यांत खान महम्मदाचा 'शेर शिकार' नांवाचा हत्ती मस्त होऊन माहुताला न मानतां एकदम शत्रूच्या फळीमध्यें घुसला. तेथें होजेमल्लाच्या हत्तींनीं त्याला अडविलें व माहुत मारला गेला. खान महम्मद ५०० स्वारांनिशीं त्याच्यामागें गेला. तो हत्ती अनावर होऊन शत्रूवर उलटला व त्यानें त्याच्या रांगांमध्यें गोंधळ उडवून दिला. होजेमल्लाला अगाध्य जखम लागली व त्यानें पळ काढला. तसें त्याच्या लोकांनीं लढणें सोडून दिलें. शत्रूंनीं आपला मुख्य मधला भाग भग्न झालेला पाहतांच चोंहींकडून धांवपळ सुरूं केली. मुसलमानी फौजेनें कत्तल बंद करून तरवारी म्यानांत घालण्यापूर्वींच सुलतानाचें राजछत्र तेथें झळकलें. त्यानें पुनः कत्तल सुरूं करण्याचा हुकूम दिला. तो इतक्या उत्तम रितीनें बजावला गेला कीं, गर्भार स्त्रियांच्या पोटांतील आणि ओटींतील पोरेंसुद्धां वांचलीं नाहींत.

'महंमदशहा आठ दिवस रणभूमीवरच राहिला. त्यानें या लढाईचें वर्तमान राजधानीला लिहून धाडलें. नंतर घेतलेल्या शपथेला अनुसरून त्यानें रायाच्या छावणीवर चाल केली. रायापाशीं पुष्कळच फौज होती. तरी आपला निभाव लागणार नाहीं, असें समजून, तो पहाडा जंगलांत पळून गेला. तिकडे सुलतान सारखा तीन महिने त्याचा पाठलाग करीत राहिला. त्या अवसरांत त्यानें सांपडेल त्याची बे सुमार सारखी कत्तल चालविली होती.

शेवटीं किशनरायानें आपल्या राजधानीचा–विजयनगराचा–रस्ता धरिला. सुलतानही त्याच्या मागोमाग फौजेसह त्या शहराजवळ दाखल झाला.'

पुढें सुलतानानें विजयनगराला एक महिनाभर व्यर्थ वेढा घातला. नंतर तो तुंगभद्रा पार होऊन परत निघाला. त्याला शहरांतील हिंदू लोकांनीं जागजागीं गांठून भारी त्रास दिला. त्यानें एका मोकळया मैदानांत तळ दिला. त्याचे स्वतःच डेरेही फौजेच्या छावणीजवळच लागलेले होते. शत्रूला आपल्या अंगावर ओढून घ्यावें, आणि त्यानें शेफारून योग्य बंदोबस्त किंवा खबरदारी घेण्यांत कसर करावी, एवढ्यासाठीं सुलतानानें ही माघार बुद्ध्या घेतली होती. त्याचा हेतू सफल झाला. शेवटीं वाटलें होतें तसेंच झालें. मुसलमानांनीं अवचित रात्रीं छापा घातला. बुक्कराय नाचरंग व मद्यपान यामध्यें मग्न व गाफिल होता. तो विजयनगराला पळून गेला. त्याची १०,००० फौज ठार झाली. शिवाय ही भारीच कत्तल उडाली. तरी तितक्यानें सुलतानाचा क्रोध शांत झाला नाहीं. त्यानें विजयनगराच्या भोंवतालच्या प्रत्येक जागच्या सर्व लोकांची एकसहा कत्तल करण्याचा निर्दयपणें हुकूम दिला. बुक्करायानें तहाचें बोलणें लावलें, पण सुलतान कांहीं ऐकेना. 'त्यावेळीं सुलतानाच्या मर्जीतल्या एकानें विनंती केली, 'खाविंदांनीं एक लाख हिंदू ठार मारण्याची शपथ घेतली होती. त्या सार्‍यांचा नायनाट करण्याची नव्हे, सुलतानानें उत्तर दिलें, 'त्याहून दुप्पट हिंदू मारले गेले असले तरी, राय शरण येऊन तात्रिशरी कबूल करील, आणि गवयांना दिलेल्या वरातींची भरपाई करील तोंवर आपण त्याला क्षमा करणार नाहीं, किंवा त्याचे लोक जिवंत सोडणार नाहीं.' राजाकडील कुल अख्त्यार घेऊन आलेले वकील त्यावेळीं तेथें हजर होते. त्यांनीं ही गोष्ट मंजूर करून, सारी रकम भरणा केली. इतकें झाल्यावर महंमदशहानें म्हटलें 'परमेश्वर धन्य असो. मीं जो हुकूम दिला होता त्याची बजावणी झाली. काळाच्या वहीमध्यें मजविषयीं हलका उणा शब्द लिहिला जाणें मला पसंत नव्हतें.' वकीलांनीं म्हटलें, 'गुन्हेगारा बरोबर निरअपराधी व विशेषतः बायकामुलें यांनाही कत्तल करावें, असें कोणच्याही धर्मामध्यें सांगितलेलें नाहीं. किशनरायानें अपराध केला असला तरी त्यांत त्या बिचार्‍यांचा दोष काय?' महंमदशहानें यावर उत्तर दिलें. 'हा परमेश्वराच्या घरचा नेमानेम तो टाळण्याची आपणा मानवांचा शक्ती नाहीं.'

वकीलांनीं शेवटीं विनंती केली, 'हीं दोन्हीं राज्यें एकमेकाचीं शेजारीं. व्यर्थ निर्दयपणा व क्रौर्य होत गेलें तर परस्परांविषयीं वैर व मत्सर कायमचा

वाढणार. हें योग्य नाहीं.' याचा सुल्तानाच्या मनावर योग्य परिणाम झाला व त्यानें तेव्हांच 'विजयप्राप्ती नंतर कोणाचाही व्यर्थ वध करावयाचा नाहीं, अशी शपथपूर्वक प्रतिज्ञा केली, व आपल्या पश्चात आपल्या वारसांनींही तसेंच करावें व नरमी दाखवावी असा त्यानें ठराव केला तो पुढें कांहीं वर्षें अमलांत राहिला हें खरें, पण त्याच्या नंतरच्या राजांनीं पुढें अनेकदां सरसहा कत्तली केल्याचे दाखले आहेत. महंमदशहानें पांच लाख हिंदूंची कत्तल करविली ही गोष्ट फेरिस्तानें अभिमानानें, गौरवपर आणि अभिनंदन करण्याच्या तऱ्हेवर अशी लिहून ठेवली आहे! तसेंच 'त्यानें कर्नाटकांतील जिल्हेच्या जिल्हे इतके कांहीं उध्वस्त करून टाकिले कीं, तसेंच्या तसें त्यांच्यामध्यें पूर्ववत् वस्ती झाली नाहीं,' असेंही तो लिहितो.

याप्रमाणें एकदांचा या युद्धाचा शेवट झाल्यावर पुढें कांहीं वर्षें त्या दोन्ही राज्यांत शांतता व सलूख राहिला.

महंमदशहा तारीख १९ जिल्काद स. ७७६ हिजरी, म्हणजे तारीख २१ एप्रिल स. १३७६ रोजीं, मरण पावला. त्याच्या मागून त्याचा पुत्र मुजाहिद्शहा गादीवर बसला. तेव्हां त्याचें वय १९ वर्षांचें होतें. नंतर थोड्याच दिवसांनीं 'कृष्णा व तुंगभद्रा यांच्या मधील कांहीं भाग दुअमलींत किंवा समाईक ताब्यामध्यें आहेत यामुळें नेहमीं झगडे व कटकटी होतात. सबब यापुढें आपली हद्द तुंगभद्रा कांठावर कायम करून. बंकापुरचा किल्ला आणि इतर कांहीं ठाणीं यांच्या सुद्धां सारा पूर्वभाग आम्हाला देऊन टाकावा.' असें त्यानें बुक्करायाला लिहून पाठविलें. बंकापुरचा मजबूत किल्ला धारवाडच्या पूर्वेस आहे. त्याच्यावर विजयनगरवाल्यांचा नेहमीं डोळा असे, कारण राजधानीपासून पश्चिमेस समुद्रकांठाकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर तो होता. तो परक्याच्या हातीं राहण्यांत हिंदू लोकांच्या व्यापाराला मोठा धोका होता.

यावर रायानें 'रायचूर व मुद्गल पूर्वापार आनेगुंदीच्या हद्दींतली, सबब तुम्हीच सारा दुआब खाली करावा. कृष्णानदी तुमच्या राज्याची सरहद्द खरी व पूर्वींपासून ठरलेली आहे, तसेंच सुल्तान महम्मदशहानें नेलेले हत्ती परत पाठवावे' असें उलट मागणें केलें.

याच्या उत्तरा दाखल सुल्तानानें युद्धच आरंभिलें. तो स्वतः एकदम फौजेसह दोन्ही नद्या वलांडून अदोणीवर पोंहोचला. तोंवर राय तुंगभद्रा तटाकीं तळ देऊन राहिला असल्याची त्याला खबर लागली. तेव्हां त्यानें एक फौज किल्ल्याला वेढा देण्याला ठेविली, दुसरी विजयनगरावर धाडिली, आणि

बाकीच्या लोकांसह तो स्वतः मोठ्या बेतानें, हुषारीनें व बंदोबस्तानें हळूं हळूं नदीच्या रोखानें वायव्य दिशेनें चालला. बुक्करायानें प्रारंभीं त्याला तोंड देण्याची तयारी केली पण पुढें न जाणों कशा मुळें गांगरून व घाबरून तो विजय-नगराच्या दक्षिणेकडील सोंडूरच्या पहाडा जंगलाकडे निघून गेला.

त्यावेळीं राजधानी विजयनगर स्थापन होऊन कोठें चाळीसाच्या आंत बाहेरच वर्षे झालेलीं होतीं. तरी तेथील प्रत्यहीं वाढत असलेली आबादी व तिच्या संबंधानें इकडील लोकांना वाटत असलेला आदरभाव, उत्कंठा व प्रेम यांचा फेरिस्तानें गौरवानें उल्लेख केला आहे. 'विजयनगराचें सौंदर्य व वैभव यांच्याविषयीं वर्णन ऐकून, सुल्तान मुजाहिदशहा त्याच्यावर चालून आला, पण तुर्तच वेढा घालण्याला तें फारच मजबूत आहे, असें पाहून, त्यानें शत्रूचा पाठलाग चालविला.' 'बुक्कराय पहाडा जंगलांतून सेतुबंध रामेश्वराकडे गेला. तसा सुल्तानही त्या निबिड जंगलांतून फौजेसाठीं नवे नवे रस्ते काढवीत त्याच्यामागें लागला. राय याप्रमाणें सहा महिनें भटकत होता. तो सुल्ताना समोर तोंड करीना. असल्या जंगलांतील धांवपळींमध्यें फायदा नसून फौजमात्र व्यर्थ हैराण होते, असें त्याच्या मर्जींतल्या लोकांनीं सुल्तानाला सुचविलें पण त्यानें तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. शेवटीं त्याला दैव अनुकूल झालें. जंगलांत भटकत राहिल्यानें बुक्करायाची व त्याच्या कुटुंबांतील माणसांची प्रकृती बिघडली तेव्हां बरोबरच्या वैद्यांच्या सांगण्याप्रमाणें निरुपायानें तो जंगल झाडी सोडून, आड व अपरिचित मार्गानें राजधानीला परत आला. सुल्तानानें त्याच्यामागें एक फौज धाडली. तो खुद्द अमीरुल् उमरा, बहादुर खान, आणि ५,००० निवडक स्वार, यांच्यासह सेतुबंध रामेश्वराची सेहेल करण्यासाठीं गेला.

सुल्तान अलाउद्दीन खिलजी याच्या सरदारांनीं पूर्वीं त्या ठिकाणीं एक मशीद बांधविली होती. तिचा त्यानें जीर्णोद्धार केला, काफर लोकांची पुष्कळशीं मंदिरें पाडलीं, सारा देश लुटून फस्त केला, आणि तो टाकोटाक विजयनगराकडे परतला.'

वरील मजकूराच्या सत्यतेला आधार काय तो दंतकथा. स. १३१० सालीं मलिक काफूरानें दक्षिणसमुद्रावर एक मशीद बांधविली खरी, पण ती रामेश्वरास नव्हे. चौदाव्या शतकामध्यें कोणी मुसलमान सुल्तान अशा थोडक्याशा फौजेसह इतक्या दूर देशांत दक्षिणेकडे जाऊं पावता, हें असंभवनीय वाटतें. त्याच्याघर वाटेमध्यें सहस्त्रशः हिंदू लोकांनीं हल्ले केले असते. त्यांना मुसल-

मानांचा दरारा होता हें खरें तरी ते नुसत्या ५००० मुसलमानी फौजेला १००० मैल जंगल पहाडांतून अगदीं मुक्काम्यानें जाऊं देते, ही गोष्ट कल्पनेबाहेरची वाटते. विजयनगराहून रामेश्वर ५०० मैलांवर आहे. मलिक काफूर यानें तिकडे स्वारी केली ती म्हैसूरांतील द्वारसमुद्र येथील बल्लाळ राजाचा पाडाव केल्यानंतर, आणि त्यानें मशीद बांधली ती मलबार किनाऱ्यावर. तेथून रामेश्वर किती तरी दूर पूर्व समुद्र कांठीं आहे.

फेरिस्ता म्हणतो, 'विजयनगराला दोन रस्ते होते. एक सुगम, फौज फांटा सहज जाण्या जोगा, व दुसरा अडचणीचा. त्याच्यांत घातस्थळें पुष्कळशीं होतीं. या दुसऱ्या वाटेनेंच सुलतान आपल्या निवडक लोकांनिशीं एकदम विजयनगराला दाखल झाला.'

तो कोणत्या मार्गानें परत आला तें नक्की ठरविण्याला तुर्त साधन नाहीं. 'सुलतानाचें हें अचाट धाडस पाहून बुक्काराय थक्कझाला. नगर मार्गाचें रक्षण करण्यासाठीं त्यानें हजारों लोक पाठविले. त्यांना सुलतानानें धुडकावून लावलें. तो तेथून एका जलाशयाजवळ पोंहोंचला. त्याच्या पलीकडेच राजाचे महाल असलेली गढी होती. त्याच्या नजीकच्या एका पहाडीवर, सोन्या रुप्याच्या पत्र्यांनीं मढवून जडावाचें काम केलेलें असें अत्युत्तम व संपन्न मंदिर होतें. त्याला 'पदक' म्हणत व सर्व हिंदू लोक त्याला फार पूज्य मानीत होते. त्याचा नाश करणें आपलें मुख्य धार्मिक कर्तव्य जाणून सुलतानानें पहाडीवर जाऊन तें मंदिर उध्वस्त केलें व तेथील सारें सोनें चांदी व जवाहिर हरण केलें.'

हा जलाशय म्हणजे कामलापुरचा सुरेख तलाव असेल, पण आसपास किती तरी टेकड्या आहेत व त्यांच्यावर मंदिरेंही आहेत. त्यांतून हें मंदिर कोणचें होतें, तें ठरवितां येणें कठीण आहे. अगदीं राजवाड्याजवळ असलेल्या गढीपर्यंत सुलतानाला पोहोंचतां येण्याला, मध्यंतरी नुसता एकच तलाव बाकी राहिला, असें हें स्थळ निश्चित होणें शक्य नाहीं. ही हकीकत फेरिस्तानें पुढें २०० वर्षां नंतर लिहिली, ती ही दंतकथांवरून. अब्दुर्रझाक यानें सात कोट असल्याचें वर्णन केलें आहे. ते कोट अद्यापि बांधले जावयाचे होते. ते या सुमारास किती तयार झाले होते, कोण जाणें.

या स्थळीं मुजाहिदशहावर अवचित मारा होऊन त्याच्या प्राणावर बेतलें होतें.

त्या काफर लोकांनीं आपलें पवित्र देवस्थान उध्वस्त झालेलें पाहून शोका-क्रोशानें आकाश जणों दुमदुमून सोडलें. त्यांनीं 'किशेनरायाला'-बुक्कायाला-

बरोबर घेऊन शत्रूवर हल्ला करविला, आणि फारच नेटानें चाल केली. तें पाहून सुलतानानेंही लढाईची व्यवस्था लावली. राजछत्र बाजूला ठेवून महमूद नांवाच्या एका अफगाण शस्त्ररक्षकाला बरोबर घेऊन तो शत्रूची फौज व लढाईची तजवीज, यांची टेहळणी करण्यासाठीं एका लहानशा ओहोळापलीकडे गेला. त्याच्या घोड्यावरून एका काफरानें त्याला ओळखिलें. आपल्या देवता आणि आपली मातृभूमी यांच्या नाशाबद्दल पुरा सूड उगविण्याचा व त्यायोगें आपलें नांव अमर करण्याचा निश्चय करून तो त्या ओहोळांतील वळचणी, खळगे, व खड-बडी, यांतून लपत छपत वर मैदानांत पोहोंचला. त्यानें एकदम सुलतानावर भरधांव घोडा फेंकला. तितक्यांत सुदैवानें सुलतानाची त्याच्याकडे दृष्टी गेली. त्यानें महमूद अफगाणाला इशारा केला तोंच महमूदानें त्या काफरावर घोडा दवडला. पण घोडा उपायी येऊन तो पडल्यामुळें त्याचा निरुपाय झाला. शत्रु त्याला ठार करणार इतक्यांत मुजाहिदशहा विजलीसारखा त्याच्यावर धांवला. तसा त्या हिंदूनें महमूदाला सोडून सुलतानालाच एक जोरा-चा वार केला, व मोठ्यानें जयघोष केला. त्यावरून त्या वारानें आपलें काम केलें, असेंच जणों त्याला वाटलें. सुलतानाच्या डोक्यावर पोलादी टोप होता. त्यामुळें नशीबानें त्याचें डोकें वांचलें. त्यानही तरवारीचा तडाखा मारला त्यामुळें त्या हिंदूचें धड जानव्यासारखें चिरलें व त्याचें प्रेत घोड्यावरून खालीं पडलें. सुलतानानें महमूदाला पुनः घोड्यावर बसविलें आणि दोघेही ओहोळ उतरून फौजेंत परत आले. ( मुजाहिदशहा या वेळीं सारा वीस वर्षांचा होता; तरी तो विलक्षण बलवान होता. तो चौदा वर्षांचा असतांनाच त्यानें कुस्तीमध्यें आपल्या प्रति-पक्षाची मान मोडून त्याला ठार केलें होतें, असें फेरिस्तानें लिहिलें आहे.)

पुढें लढाई झाली तिच्यांतही हिंदू लोकांचा मोड झाला. त्या यशस्वी व चढाई करून आलेल्या मुसलमानी फौजेला थोडी विश्रांती मिळते न मिळते तोंच, रायाचा भाऊ 'आपल्या जहागिरींतून २०,००० स्वार व असंख्य पायदळ घेऊन शहरामध्यें दाखल झाला.' हा बहुधा 'माराप्पा, किंवा 'मुद्दाप्पा' असावा. यावेळीं सर्व राज्याचे निरनिराळे विभाग ठरींव फौज बाळगण्याच्या शर्तीवर सरदार लोकांना सरंजाम व जाहागिरी म्हणून वांटून दिलेले होते. पुढें भारी निकराची लढाई झाली. ती चालू असतांना सुलतानाचा चुलता दाऊदखान, याला सुलतानाच्या बचावाविषयीं शंका वाटली व त्याच्या स्वाधीन असलेलें, 'धन्नासोद्रा' नांवाचें ठाण सोडून तो ऐन लढाईंत सामिल झाला. 'दक्षसूंदर' नांवाच 'ट्रिग्नामिट्रीकल सरव्हे' चें स्टेशन आहे.

त्या उंच पहाडीच्या पायथ्याच्या तलावा जवळच हें ठाणें असावें. ही पहाडी ५०० फुटांवर उच आहे. हें ठाणें विजयनगराहून वायव्येकडे जाणाऱ्या राजमार्गावर असल्यानं, तें शत्रूच्या हातीं पडलें तर, स्वारी करून आलेल्या फौजेला बाहेर पडतां येणें मुष्किल होतें; सबब तें विशेष महत्वाचें होतें. या लढाईत ही मुसलमानांनाच यश आलं, पण शत्रूनें दाऊदखान निघून गेल्याची संधी साधून तें ठाणें कब्जात घेतलें. तसें, सुलतानाला परत जातांना अडचण व धोका होण्याची भीती वाटली व त्यानें रणभूमीवरून मोठ्या युक्तीनें व शिताफीन सारी फौज त्या पहाडाच्या व अडचणीच्या जागेतून सुखरूप पार पडण्याची व्यवस्था केली. नंतर सुमारें ६०-७०००० कैदी-मुख्यत्वें बायका-धरून तो विजयनगर सोडून अदोणीला वेढा देऊन बसला. तेथें नऊ महिने घालवूनही कांहीं फायदा झाला नाहीं. शेवटीं तो आपल्या राज्यांत परत गेला.

या सुमारास-स. १३७८–विजयनगरच्या राज्यासंबंधानें फेरिस्तानें बरीच माहिती दिली आहे तिच्यांत तो म्हणतो :–

'बाहमनी राजे दम धरून होते, ते आपल्या विशेष शौर्यामुळें व ओजस्वितेमुळेंच, कारण, राज्यविस्तार, सैन्यबल, आणि सम्पत्ति व वैभव, या बाबतींत विजयनगरचें राज्य त्यांच्यापेक्षां पुष्कळच श्रेष्ठ होतें.' त्याच्या लिहिण्याचा रोख असा दिसतो कीं, यावेळीं सुद्धां,-पुढें तसें होतें यांत शंकाच नाहीं.–सारें दक्षिण हिंदुस्थान रायाच्या हातीं आलेलें होतें.

'गोवा बन्दर व मलगांव-बहुधा बेळगांवचा किल्ला-विजयनगराच्या ताब्यांत होते. तळ घाटावरील पुष्कळसा प्रांतही त्याच्याकडे होता. राज्यांत लोकवस्ती भरपूर व प्रजा गरीब व ताबेदारींत तत्पर होती. मलबार, सीलोन, व इतर टापू व राज्यें, येथील राजांनीं विजयनगरच्या दरबारांत वकील ठेविले होते व ते राजे दरसाल तिकड बहुमोल नजर नजराणे पाठवीत.'
( लिस्बन येथील एका प्राचीन सरकारी दप्तरखान्यामध्यें एका जुन्या ताम्रपत्राच्या भाषांतराची नकल मिळाली आहे. मूळ ताम्रपत्र, गोव्याच्या संस्थानिकानें विजयनगरचा राजा वीर हरिहर, दुसरा हरिहरराय,–याच्यावतीनें दिलेल्या भूमिदानाविषयीं स. १३९१ सालचें आहे, व भाषांतर स. १५३२ सालचें आहे. 'नूनीजनें' ही सीलोन, क्विलान व पालियाकाटे, येथील राजे विजयनगरच्या रायांना करभार देत असल्याचें लिहिलें आहे. )

सुल्तानाच्या चुलत्यानें महत्वाचें ठाणें सोडून विजयनगरापुढें असतांना येण्यांत केलेलें वर्तन, सुलतानाच्याच बचावासाठीं, स्वामिभक्तीनें व शुद्ध

मनानें केलें होतें. त्याविषयीं फेरिस्ता म्हणतो, 'दाऊदखानाचें निशाण पाहतांच सुलतानाला भारी क्रोध आला. पण आपल्या फौजेच्या झेंड्यावर विजयवायू फिरून तो फडकूं लागेपर्यंत त्यानें तो क्रोध आंवरून ठेविला होता. नंतर त्यानें दाऊदखानाला समक्ष बोलावून असलें अत्यंत महत्वाचें ठाणें सोडून आल्याबद्दल भारी रागानें व कडक शद्बांनीं टाकून म्हटलें, 'तसें तें ठाणें शत्रूच्या हातीं जातें तर एकसुद्धां मुसलमान त्या शहराजवळून जिवंत न येता.'

हें कठोर वर्तन दाऊदखानानें पक्कें मनांत ठेविलें व त्याचा सूड घेण्यासाठीं त्यानें सुलतानाचा खून करण्याचा कट केला. मुजाहिदशहा अदोणीहून कलबुर्ग्याच्या मार्गाला लागेपर्यंत कटवाले स्वस्थ राहिले. तारीख १७ जिल्काद स. ७७९ हिजरी, म्हणजे शुक्रवार तारीख १६ एप्रिल स. १३७८ रोजीं सुलतान निजला असतांना तीघां कटवाल्यांसह त्याच्या डेऱ्यांत घुसून दाऊदखानानें त्याला ठार केलें. त्या गडबडीनें सुलतान जागा होतो तोंच एका तरवारीच्या घावानें त्याचा अंत झाला. (कर्नल मेडोज टेलर साहेबांनीं लिहिलेल्या हिंदुस्थानाच्या इतिहासांतील १६३ पानावर लिहिलें आहे कीं, विजयनगरावर हल्ला करीत असतांना एकदां मुजाहिदशहा दुसऱ्या कोटाच्या आंत शिरला. तेथें एक प्रसिद्ध मारुतीचें स्थान होतें. त्याच्या बचावासाठीं आलेल्या ब्राह्मणांना त्यानें धुडकावून लाविलें आणि मारुतीच्या तोंडावर स्वतः घाव मारून ती मूर्ती भग्न केली. त्या मूर्तीच्या पायाशीं एक ब्राह्मण घायाळ होऊन पडला होता, त्यानें मरतां मरतां सुलतानाला शाप दिला कीं, 'या कृत्यापायीं तू आपल्या राज्यांत परत पोंहोचण्यापूर्वींच ठार होशील.' तो शाप अक्षरशः खरा झाला. ती मूर्ती एका भल्या मोठ्या टोळांतून कोरून तयार केलेली अद्यापि कायम असून तिच्यावर सुलतानानें केलेले घाव ही स्पष्ट दिसताहेत.' ही मूर्ती कोणती तें सांगतां येत नाहीं. दुसऱ्या कोटाच्या आंतल्या बाजूला मारुतीच्या मूर्ती पुष्कळशा आहेत. त्यांतून दोन माल्यवंत रघुनाथस्वामीच्या मंदिराजवळ पडल्या आहेत.) दाऊदशहानें ताबडतोब आपल्या नांवाची द्वाही फिरविली. मुजाहिदशहाला संतती नव्हती. दाऊदशहाच त्याचा अगदीं जवळचा वारस व आप्त होता. सर्व लोकांनीं व फौजेनें त्याला मानलें. तेथून तो कलबुर्ग्याला पोहोंचला.

आपल्या पुतण्याचा खून करून दाऊदशहानें राज्य बळकाविलें. पण त्याचा त्याला थोडेच दिवस उपभोग झाला. राज्यांत दोन पक्ष झाले. एकच महिन्या नंतर तो खूनी आणि राजद्रोही दाऊदशहा, तारीख २१ मोहर्रम स. ७८०

हिजरी, ह्मणजे तारीख २१ मे स. १३७८ रोजीं, कलबुर्गा येथील जुम्मा-मशींदीत निमाज पढत असतांना, मारेकऱ्यांच्या हातीं मारला गेला. त्या अवधींत बुक्करायानें दुआबामध्यें स्वारी करून कृष्णाकिनारा गांठला व रायचूराला वेढा दिला.

दाऊदशहाच्या पश्चात अलाउद्दीनाचा कनिष्ठ पुत्र महमूदशहा गादीवर बसला. दाऊदशहाचा आठ वर्षांचा मुलगा होता. त्याचे, मुजाहिदाची बहीण 'रूहूपरवर आगा' इनें डोळे काढवून झगड्याचें मूळच जणों नाहींसें केलें होतें. महमूदशहाला सारेच पत्त अनुकूळ होते, असें दिसतें. कारण रायानें रायचूराचा वेढा उठविला आणि तो महंमदशहानें ठरविलेली खंडणीही देण्याला तयार झाला, असें फेरिस्तानें तरी लिहिलें आहे.

या सुलतानानें जवळ जवळ वीस वर्षें राज्य केलें तोंवर राज्यांत सर्वत्र शांतता व आबादानी होती. बाहेरही कोणाशीं लढाया व कटकटी झाल्या नाहींत. तो तारीख २१ रजब स. ७९९ हिजरी म्हणजे तारीख २० एप्रिल स. १३९७ रोजीं मरण पावला.

विजयनगरचा राजा पहिला बुक्करायही याच सालाच्या सुमाराला मरण पावला, असें धरलें पाहिजे. याचीं कारणें मागें दिलींच आहेत. वरंगळ स. १३२३ सालीं पुर्तें पाडाव झालें, नंतर बुक्कराय आनीगोंदीला आला, असें धरलें, आणि यापूर्वी तो वरंगळ येथें कोशाध्यक्ष होता हें खरें मानलें तर मरणसमयीं त्याचें वय ८० वर्षांवर होतें असें ध्यावें लागतें. तो इतकीं वर्षें जगला होता, असें मानण्याला तितका विश्वासनीय पुरावा मिळालेला नाहीं. पुढें औरंगजेबाचें व विजयनगरच्याच शेवटच्या रामरायाचें अशीं उदाहरणें आहेत. नाहीं असें नाहीं, तरी पण ही बुक्करायाची कारकिर्द जास्त विचार करण्याजोगी आहे.

---

# भाग चौथा.

## या साम्राज्याची वृद्धि–स. १३७१ ते १४०३.

### दुसरा हरिहरराय–कलबुर्ग्यांचा सुलतान फिरोजशहा–पुनः युद्धें–स. १३९१ सालीं एका राजपुत्राचा खून–दुसरा बुक्कराय.

पहिल्या बुक्करायाच्या राणीचें नांव गौरी. तिच्या पोटीं हरिहर नांवाचा पुत्र झाला. तोच बुक्करायाच्या मागून गादीवर बसला. त्याचें नांव 'नूनीज'

यानें 'पुरियोरे' असें दिलें आहे. ते हरिहर याचें पोर्तुगीज भाषेंतील अपभ्रंश असावें. शिलालेखांवरून पहातां या दुसऱ्या हरिहरानें निदान २० वर्षें राज्य केलें. 'महाराजाधिराज' असें बीरुद असलेला हाच पहिला राजा होय. पुष्कळशा देवस्थानांना त्यानें इनामें दिलीं व आपल्या राजघराण्याची सत्ता साऱ्या दक्षिण-हिंदुस्थानामध्यें दृढमूल केली. दुसऱ्या संगमरायाचा दिवाण व माधवाचार्यांचा बंधू सायन हा याच्या वेळींही दिवाण होता असें दिसतें. (ह्मणजे मध्यंतरी बुक्करायाच्या साऱ्या कारकिर्दीं तो स्वस्थ घरीं बसून होता, व पुढें त्याच्या पुत्राच्या वेळीं पुनः काम करूं लागला असें ध्यावें लागतें. हें कांहींसें विलक्षण दिसतें. प्रोफेसर आफ्रे यांच्या मतें सायनाचार्य स. १३८७ सालीं मरण पावला.) सन १३७९ व १३८२ या सालांतील दोन शिलालेखांमध्यें 'मुद्द' हा राजाचा सेनापती असल्याचा उल्लेख आहे तसेंच बुक्क रायाचा मंत्री 'चैच' याचा पुत्र 'इरुग' हा ही एक सेनापती होता. कामलापुराजवळ एका जैन मंदिरांत एक शिलालेख आहे. त्याच्यांतही हें नांव आलेलें आहे. तो लेख सन १३८५ सालचा आहे. यावरून हा राजा धर्म संबंधांत तटस्थ होता असें दिसतें. याच्या वेळीं 'गुंड' नांवाचाही एक सेनापती होता, पण त्याचें साल ठरलेलें नाहीं. या राजानें गादीवर बसल्यावर लौकरच मुसलमान लोकांना गोव्यांतून हांकून लावल्याचा उल्लेख आणखी एका लेखांत आहे. तुर्त मिळालेल्या त्याच्या वेळच्या अखेरच्या अशा लेखामध्यें 'बचाप्पा उदेयार' नांवाचा अधिकारी गोवा येथें असल्याचें लिहिलें आहे (या लेखांत या रायाला 'चतुरुदधिपती वीर बुक्क उदेयार याचा पुत्र महामंडलेश्वर' असें वर्णिलें आहे.)

या राजाच्या पट्टराणीचें नांव 'मल्लादेवी-'मल्लांबिका'-होतें. त्याच्या वेळच्या किंवा त्याच्या संबंधाचे शिलालेख धारवाड, म्हैसूर, कांची, चिंगलपट व त्रिचनापल्ली, इतक्याजागीं सांपडले आहेत. यावरून त्याच्या राज्याचा विस्तार व्यक्त होतो. तो श्रीविरूपाक्षाचा उपासक शैव होता. तरी इतर धर्मीयांविषयीं त्याची समवृत्ती असे. त्याच्या कारकिर्दीतील तुर्त अखेरची अशी शिलालेखांवरून उपलब्ध असलेली तारीख १५ अक्टोबर सन १३९९ हीच आहे.

सुल्तान महमूद याचा वडील पुत्र ग्यासुद्दीन गादीवर बसला, तेव्हां त्याचें वय सारें सत्रा वर्षांचें होतें. पुढें सुमारें अडीच महिन्यांनींच, तारीख १७ रमजान सन ७९९ हिजरी म्हणजे तारीख १४ जून सन १३९७ रोजीं, त्याच्या एका दुष्ट व महत्वाकांक्षी गुलामानें एका मेजवानीच्या प्रसंगीं दगा करून त्याचे डोळे काढले. त्याचा धाकटाभाऊ शम्सुद्दीन याला गादीवर बसाविलें गेलें. पण पांच

महिन्यांतच, माजी सुलतान दाऊद याचा दुसरा पुत्र व त्याचा चुलतभाऊ फीरोजशहा, यानें त्याला पदच्युत केलें व त्याचे डोळे काढले. फीरोजशहा वडील घराण्यांतला होता. तो या राजवंशांत एक फारच नामांकित राजा झाला. तो तारीख २३ सफर सन ८०० हिजरी—तारीख १५ नव्हेंबर सन १३९७ रोजीं, तक्तनशीन झाला. तेव्हां सुद्धां तो बराच वयस्क असावा, कारण सन १४१९ मध्यें तो वृद्ध असल्याचें फेरिस्तानें लिहिलें आहे.

या रायाचा वडील पुत्र दुसरा बुकराय याचे सन १४०६ चे शिलालेख मिळालेले आहेत. त्याच्या मागून दुसऱ्या बुकरायाचा कनिष्ट बंधू, पहिला देवराय यानें निदान सन १४१२ पर्यंत राज्य केलें. त्याचे वरेचसे शिलालेख सांपडले आहेत.

विजयनगरचा पहिला राजा हरिहर गादीवर बसला तेव्हां तो 'नूनीज' च्या लेखाप्रमाणें वयातीत होता. त्याचा बंधू बुकराय यानें ३७ वर्षें राज्य केलें. या मानानें पहिल्या हरिहराचें वय फार झालें होतें, असें मानतां येत नाहीं. मृत्युसमयीं पहिल्या बुकरायाचें वय पुष्कळच झालेलें असावें. त्याचा पुत्र दुसरा हरिहर हाहि मध्यम वयाचाच असावा. त्यानें वीस वर्षें राज्य केलें. त्याअर्थी तो हीं मरण पावला तेव्हां बराच वृद्ध असावा, या गोष्टी लक्ष्यांत ठेवून फेरिस्तानें फीरोजशहाच्या कारकिर्दीचें वर्णन केलें आहे, तें पाहिलें पाहिजे. तो म्हणतो :—

सन ८०१ हिजरी–सं. १३९८–९९ सालीं-'विजयनगरचा राजा देवलराय' यानें ३०,००० स्वार व असंख्य पायदळ असें भारी सैन्य बरोबर घेऊन, बादशाही अंमलांतील दुआबावर स्वारी केली, आणि रायचूर व मुदगलचे किल्ले घेण्याचा घाट घातला.' ही मोहीम लौकरच सन १३९९ च्या आगस्ट महिन्यापूर्वीच आटपली त्या पूर्वीं डिसेंबर महिन्यांत-शीतकाळांत-काळें रान वाळून मार्ग मोकळें झाल्यानंतरच रायाची फौज या मोहिमेवर निघाली असावी. यावेळीं दुसरा हरिहर राय वृद्ध झालेला होता. त्यानें वीस वर्षें स्वस्थ व शांततेनें राज्य केलें होतें. तेव्हां तो स्वतः अशा मोहिमेच्या भानगडींत पडला असेल, हें संभवत नाहीं. फारतर त्याच्या तरुण पुत्रानें त्याला विचारून हें साहस केलें असेल. या वीस वर्षें या दोन्ही राज्यां मध्यें सारखा सलूख व स्वस्थता चालत आली होती, ही गोष्ट मुसलमान इतिहासकारांनीं ही कबूल केली आहे. या सर्वांवरून दुसरा बुकराय सन १३९९ च्या अखेरीलाच मरण पावला, असें दिसून येतें. या शिवाय त्याच्या कारकिर्दींतील गोष्टींबद्दल अधिक माहिती उपलब्ध नाहीं.

त्याच्या नंतर त्याचा वडील पुत्र दुसरा बुक्कराय गादीवर बसला तेव्हां त्याचें वय बरेंच झालेलें असावें, कारण त्याचा कर्ता पुत्र या मोहिमेंत सेनाध्यक्ष म्हणून बरोबर होता.

'नूनीज' म्हणतो, या 'पुरीओरे राजाला एक पुत्र होता. तो त्याच्या पश्चात राजा झाला. त्याचें नांव अजराय होतें. त्यानें ४३ वर्षें राज्य केलें. त्या साऱ्या अवधींत त्याच्या मुसलमान लोकांशीं सारख्या लढाया चालल्या होत्या.' हें. अजराय नांव 'नूनीज' नें कशावरून दिलें व त्याची कारकिर्द ४३ वर्षांची होती असें लिहिलें तें कसें, हें कळत नाहीं. त्याच्या अजरायाच्या ऐवजीं दुसरा बुक्कराय व पहिला देवराय असे दोन राजे येतात. दोघांच्याही कारकिर्दी मिळून १४ वर्षें होतात. ४३ नव्हे.

'दुसऱ्या हरिहर रायाच्या मागून गादीवर बसलेल्या राजानें विजयनगर शहराची पुष्कळच सुधारणा केली. नवे कोट व बुरूज बांधविले. कोट व शहर पुष्कळच वाढविलें आणि ते कोट दूरवर पोहोंचविलें. शिवाय सर्वांत प्रमुख काम ह्मणजे, त्यानें तुंगभद्रेला एक भला मोठा बांध बांधला आणि तेथून पांच कोस पक्के पाट बांधून, शहरांत पाण्याची समृद्धी करून दिली.' असें ही 'नूनीज'नें वर्णन केलें आहे. हल्लीं पूर्वीच्या शहराच्या बहुतेक भागांमध्यें शेती होते. तिला ज्या पाटांतून आजवर पाणी मिळतें आहे, तेच हे पूर्वीचे पाट असले तर, हें काम खरोखर अलौकिक होय. हा पाट कित्येक मैल पर्यंत पक्क्या दगडांतून खोदून कोरून काढलेला आहे, व तो पाहाडांच्या पायथ्यानें नेलेला आहे. हें पाटस्थळाचें प्रचंड काम साऱ्या हिंदुस्थानांत अप्रतिम झालेलें आहे.

मुसलमानांशीं त्याच्या लढाया झाल्या त्यांचा तपशील दिलेला नाहीं. मात्र त्यानें 'गोवें, चौल, दाभोळ, काबीज केले. आणि कारोमांडल किनाऱ्यावरील प्रदेश पुर्ता ताब्यांत आणून तेथें स्वसत्ता केल्याचेंही लिहिलें आहे.

'नूनीज' च्या बखरीपेक्षां फेरिस्ताच्या इतिहासावरून दुसरा बुक्कराय व पहिला देवराय, यांच्या कारकिर्दींबद्दल जास्त माहिती मिळते, सबब त्याच्यांतूनच बरेचसे पुढील उतारे घेतले आहेत.

दुसऱ्या बुक्करायाची पहिली मोहिम-वर निदर्शित केलेली-त्याच्या बापाच्या हयातींतच सन १३९८ च्या डिसेंबर महिन्याच्या सुमाराला सुरू झाली. सुल्तान फीरोज त्याच्याशीं सामना करण्याला चालून आला. वाटेंत त्यानें नेहमीं

अडदांडपणा करणाऱ्या व त्रासदायक अशा एका हिंदू संस्थानिकाला त्याच्या ८००० लोकांसह ठार मारिलें. राय त्याच्याशीं मुकाबला करण्यासाठीं पुढें वाढून कृष्णातटाकीं तळ देऊन राहिला होता. नदीला महापूर आलेला होता. शत्रूला नदी पार होऊं देऊं नये ह्मणून, रायानें जागजागीं आपली फौज बंदोबस्तानें ठेविली होती.

"सुलतान फीरोज नदी कांठीं पोहोंचला व त्यानें सरदार मंडळी जमवून पुढें कसें काय करावयाचें, याबद्दल सल्ला मसलत केली. तिच्यांत त्याच्या पसंती जोगी कोणतीच गोष्ट ठरली नाहीं. पुढें याच संबंधानें विचार करीत असतांना त्याला काजी शीराजी यानें पुढें होऊन नम्रपणें विनंती केली, 'खाविंदाची परवानगी होईल तर कांहीं निवडक लोकांनिशीं नदी उतरून जाऊन, सवड पाहून देवलराय किंवा त्याचा पुत्र याला ठार करितों.'

सुलतानानें याला संमती दिली. नंतर फौज नदीपार नेण्यासाठीं भराभर शेकडोंशे टोकरे तयार करविले गेले. काजी शीराजी आपल्या सात सोबत्यांसह फकीराच्यावेशानें राजाच्या छावणींत कसबिणींच्या गोटांत जाऊन उतरला. (या राजेलोकांच्या फौजांबरोबर त्याकाळीं पुष्कळशा कसबिणींही राहात असत. कृष्णरायानें स. १५२० सालीं रायचूराला वेढा दिला होता त्यावेळीं त्याच्या त्या अवाढव्य छावणीमध्यें या वेश्यांचाही बाजार होता, असें 'नूनीज' नें वर्णन केलें आहे.) काजीनें तेथील एका वेश्येवर अत्यंत आषक झाल्याचें ढोंग केलें व तिच्यासाठीं वाटेल तसा खर्च आणि चैनबाजी करण्याचा क्रम चालविला. एकदां सायंकाळीं ती वेश्या उत्तम शृंगार करून व अप्रतिम वस्त्रालंकार धारण-करून बाहेर जाण्याला निघाली. तेव्हां त्यानें अगदीं बेहोष व पराधीन आषका-प्रमाणें तिच्या पायांपडून तिला बाहेर न जाण्याविषयीं, किंवा जाणें अवश्यच असलें तर निदान आपणालाही बरोबर न्यावें, नाहीं तर आपले प्राण व्याकुळ होतील, रहाणार नाहींत, असें आग्रहानें कळविलें. त्यावर तिनें म्हटलें, 'मला आज युवराजाकडील बैठकीचें बोलावणें आहे. तिकडे गेलेंच पाहिजे. न जाऊन चालणार नाहीं. तेथें गाणाऱ्या-वाजविणाऱ्यांशिवाय इतरांना जाण्याची मुळींच परवानगी नाहीं. तेव्हां काजीनें म्हटलें, 'वा:, ठीक, मलाही तुजप्रमाणें गातां येतें व सारीं वाद्यें वाजवितां येतात. शिवाय माझ्या अंगीं असेही कांहीं अजब हुन्नर आहेत कीं, ते पाहून युवराज खरोखर भारी खुष होतील.' तो हें उगीच थट्टेनें बोलतो असें समजून तिनें परिक्षेखातर व कांहीं तिरस्कारानेंच-सें त्याला सारमंडळ वाजविण्याला सांगितलें. तें त्यानें अतिउत्तम वाज-

विलेलें ऐकून ती फारच खुप झाली. तो आपल्या साजिंद्यांमध्यें असला तर आपली साऱ्या नायकिणींवर सरशी होऊन, युवराजाची बहाल मर्जी होईल, असें तिला वाटलें. पुढें काजी व त्याचे सोबती, साजिंदे सजून तिच्या बरोबर युवराजाच्या डेऱ्यावर पोहोंचले.

" दक्षिणेंत सर्वत्र रिवाज असल्याप्रमाणें, कळवंतिणी व लवंडे-नाचे पोर-यांचे पुष्कळचसे तायफे एकदमच गाण्या नाचण्याला उभे राहिले होते. त्यांचे नाच तमाशे झाल्यावर युवराजानें भांड, व कथ्थक, आणि खुषमस्करे वगैरे हजर होण्याविषयीं हुकूम दिला. तेव्हां त्या नायकिणीनें आपल्या साजिंद्यांपैकीं काजी व त्याचा एक सोबती यांचाही तमाशा युवराजापुढें होण्याची परवानगी मिळविली. त्यांनीं स्त्रीवेष धारण केले आणि नाचत, मुरडत, हंसत व हावभाव करीत, ते युवराजाच्या डेऱ्यांत गेले. तेथें त्यांनीं सारमंडळ वाजविणें, गाणें, नाचणें, व सर्व तऱ्हेचे हाव भाव, असे उत्तम करून दाखविले कीं ते पाहून युवराज फारच प्रसन्न व खुष झाला. पुढें एकेक जंबिया घेऊन, बराच वेळ त्याचे नाच व खेळ करीत, पुढें, मागें, सभोंवार, असे नाचत नाचत एकदम पुढें सरून त्यांनीं ते जंबिये युवराजाच्या उरांत भोंसकले आणि जवळच्या लोकांवरही हल्ला केला. त्यांचे सोबती बाहेर वाटच पहात होते. त्यांनीं ही गडबड ऐकतांच, डेऱ्याच्या कनाती व पडदे फाडिले व आंत शिरून त्या दोघांना मदत केली. बैठकींत बसलेले लोक कैफांत गुंग होते. ते बहुतेक मारले गेले. काजी व त्याचे सोबती दिवे मालवून बाहेर पडले, आणि गर्दींत सामील झाले. डेऱ्याच्या आसपास भारीच गोंधळ उडाला. 'सुल्तान नदी पार होऊन आला आहे. त्याच्याच लोकांनीं हा हल्ला केला आहे,' 'त्याच्या पदरचा कोणी सरदार १२,००० फौजेसह येऊन त्यानें राय व युवराज दोघांनाही ठार मारिलें आहे.' अशा नानातऱ्हेच्या कंड्या उठल्या. ती रात्र अगदीं अंधेरी आणि छावणी तीन चार कोस पसरलेली, यामुळें खरा प्रकार कोणासच कळेना. सर्व सेनाध्यक्ष व सरदार आपापल्या जागीं सज्ज होऊन रात्रभर फौजेसह उभे राहिले. तितक्यांत सुल्तानाची ४००० फौज बुध्द्यां तयार करविलेले टोकरे व नावा यांच्यामधून नदीपार उतरली. शत्रूची फौज नदी उतरतांना प्रतिकार करण्यासाठीं रायानें बरेंच सैन्य नदीकांठीं ठेविलेलें होतें. त्या सैन्यानें एकीकडे छावणींतली गडबड आणि दुसरीकडे ही शत्रूची हालचाल पाहून प्रतिकार करणें सोडून, एकदम धूम पळ काढला. रातोरात सुल्तान साऱ्या फौजेसह पार उतरला आणि उजाडतांच त्यानें शत्रूवर खूब जोरानें व त्वेषानें हल्ला केला.

पुत्राचा–युवराजाचा–हा अवचित झालेला खून पाहून देवलराय शोकाकुल झालेला होता. तो सुलतानाच्या फौजेचा त्वेषाचा व शौर्याचा अट्टहास पाहून घाबरून गेला. त्याच्या लोकांच्यानें या माऱ्यापुढें टिकाव धरवेना. पुत्राचें प्रेत घेऊन त्यानें सूर्योदयापूर्वींच आपल्या फौजेसह पळ काढला. त्याच्या छावणीमध्यें सुलतानाला अतोनात लूट सांपडली. त्यानें विजयनगरापर्यंत राजाचा पिछा पुरविला. वाटेंत पुष्कळशा झटापटी झाल्या. त्यां सर्वांमध्यें सुलतानालाच यश येत गेलें. रस्त्याच्या दुतर्फा कत्तल झालेल्या हिंदु लोकांच्या प्रेतांचे ढीगच्या ढीग लागले होते. ”

बुक्करायानें विजयनगराच्या कोटाचा आश्रय केला. सुलतानानें आपला भाऊ–अहमदशहा–हा पुढें गादीवर बसला व त्याला खान खानान हा किताब मिळाला होता–त्याला राजधानीच्या दक्षिणेकडील संपन्न प्रांतामध्यें धाडिलें. त्यानें तिकडून अगणित लूट व कैदी आणिले. त्यांच्यांमध्यें पुष्कळसे ब्राह्मण होते. शहरांत असलेल्या त्यांच्या आप्तइष्टांनीं वृद्ध हरिहररायाची विनवणी करून खंडणी देणें कबूल करण्याविषयीं बोलणें लावलें. पुढें पुष्कळशी वाटाघाट होऊन शेवटीं सुलतानानें दहालक्ष होन–सुमारें चाळीस लाख रुपये–खंडणी घेऊन तह करणें कबूल केलें. हा तह सं. ८०१ हिजरीच्या सुमाराला झाला. त्याअन्वयें दोन्ही राज्यांच्या हद्दी पूर्ववत् कायम राहिल्या, आणि परस्परांनीं रयतेला उपसर्ग देऊं नये, असें ठरलें. यावरून सुलतानाला या मोहिमेमध्यें ह्मणण्यासारखें यश मिळालें होतें, असें दिसत नाहीं. कारण दोन्ही राज्यांमधील सरहद्दीचा नेहमींच वाद होता.

“ही मोहिम आटोपल्यावर थोड्या महिन्यांनीं सं. ८०२ हिजरी सालाच्या अवलीस, सुलतान, नरसिंग—एक वऱ्हाडाच्या सरहद्दीवरील पुंड पाळेगार—याचें पारपत्य करण्यासाठीं रवाना झाला,” असें फेरिस्तानें लिहिलें आहे. त्यावरून वरील तहाचें साल दिलें आहे.

‘बुऱ्हान इ–मआसिर’ या तवारीखमध्यें या मोहिमेचा अगदीं त्रोटक उल्लेख आहे. तिचें साल फेरिस्तानें दिलेल्या सालाशीं मिळतें. ती मोहिम सुलतानानें सुरू केली, शेवटीं भारी दंड वसूल केला आणि वार्षिक खंडणीही घेण्याचें ठरविलें, असें त्या तवारीखींत लिहिलें आहे.

या मोहिमेनंतर लौकरच दुसरा हरिहरराय मृत्यू पावला व दुसरा बुक्कराय गादीवर बसला. या बुक्करायाच्या कारकिर्दींतील गोष्टींविषयीं विशेष दाखला मिळालेला नाहीं. गुजराथ, माळवा, व खानदेश, येथील सुल्तानांच्या

चिथावणीवरून त्यानें फीरोजशहाला खंडणी देणें बंद केलें होतें, असें फेरिस्तानें लिहिलें आहे. सं. ८०८ सालापर्यंत चार सालांची खंडणी तुंबली होती, तरी तिच्या विषयीं दुर्लक्ष्य करून सुलतान चांगल्याशा संधीची वाट पहात स्वस्थ बसला होता.

दुसऱ्या बुक्करायामागून पहिला देवराय राजपदारूढ झाला. त्याचा राज्याभिषेक, ता. ५ नव्हेंबर सं. १४०६ रोजीं झाल्याचा दाखला म्हैसूरांतील हसन येथील एका शिलालेखांमध्यें आहे. बुक्करायाचा शेवटचा शिलालेख त्याच वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या तीसाव्या तारखेचा, म्हणजे शके १३२८, व्यय नाम संवत्सर वैशाख शुद्ध द्वादशीचा आहे.

---

## भाग पांचवा.

### ( पहिला देवराय सं. १४०६–१४१९ ).

विषयलोलुप व विलासी देवराय–शेतकऱ्याची रूपवती कन्या–राजाचें शाठ्य–त्यांतून निभाव–राजधानीवरील संकट–हिंदु राजकन्येचा मुसलमानाशीं विवाह–फीरोजशहाचा कोप–परतालचें लग्न–राजा विजयराय–दुसऱ्या देवरायाच्या राज्यारोहणाचें साल.

विजयनगरच्या ज्या एका राजाशीं संबंध असलेल्या एका गोष्टीचें फेरिस्तानें विशेष वर्णन केलें आहे, ती गोष्ट सं. १४०६ सालाच्या अखेरीस घडलीसें दिसतें. तो राजा बुक्कराय नसून त्याचा पुत्र असावा, कारण यावेळीं बुक्करायाचें अर्धें वय झालेलें, त्याच्या हातून असलें विपर्यांध व उनाड वर्तन घडणें संभवत नाहीं.

विजयनगरच्या राजानें अनावर विषयवासनेच्या पायीं वेडावून जाऊन एका रूपलावण्यवती कुणब्याच्या कन्येच्या प्राप्तीसाठीं, तुंगापारच्या झगड्या-मधील प्रदेशांत असलेल्या मुदगल शहरावर स्वारी केली. याचा परिणाम फार दूरवर पोहोंचून तो राज्याला चांगलाच भोंवला. त्याची हकीकत फेरिस्ताच्या लेखावरूनच दिलेली बरी.

“ मुदगल प्रांतांत एक कुणबी शेतकरी राहत होता. त्याला एक कन्या होती. तिला सर्वांगसुंदर व सर्व तऱ्हेनें परिपूर्ण निर्माण करण्याच्या कामीं, विधात्यानें जणों आपलें बुद्धीसर्वस्व खर्ची घातलें होतें. इतकी ती अप्रतिम रूप लावण्यवती होती.

"एका वृद्ध ब्राह्मणाकडे त्या मनोहर सौंदर्यलतिकेचें शिक्षण सोंपलेलें होतें. तिचें त्याला भारीच गौरव व कौतुक वाटत होतें. ती रायाच्या पदरीं पडलेलीच योग्य, असें त्याच्या मनानें घेतलें.

"तो ब्राह्मण विजयनगराला पोंहोंचला. त्यानें रायाची भेट घेऊन, त्याच्याजवळ त्या कन्येच्या सौंदर्याबद्दल, तसेंच तिचे अनुपम गुण व शिक्षण याविषयीं, असें कांहीं खुबीदार वर्णन केलें कीं, त्याच्या श्रवणानेंच रायाला तिच्या प्राप्तीविषयीं अत्युत्कट व अनावर इच्छा झाली. तिच्या आई-बापांकडून ती आपणाला मिळवून देण्याविषयीं हरतऱ्हेनें खटपट करण्याविषयीं रायानें त्या ब्राह्मणाला फारच आग्रहानें व आदरपूर्वक सांगितलें. त्याला तरी हेंच इष्ट होतें. त्यानें तसें सत्वर घडवून आणविण्याचें कबूल केलें. राजानें ती कन्या व तिचे आईबाप, यांच्यासाठीं पुष्कळ व मौल्यवान देणग्या पाठविल्या व शिवाय इनाम देण्याचें व त्या मुलीला आपली राणी करण्याचें कबूल करून त्या ब्राह्मणाला परत पाठविलें. तो टाकोटाक मुदगलास आला. ते सारे अलंकार अर्पण करून, त्या आईबापांना त्यानें राजाचें ह्मणणें कळविलें. तें ऐकून त्यांना भारी आनंद झाला. त्यांनीं मुलीचें अभिनंदन केलें व तिला ते अलंकार दिले, त्यांतच एक हार होता, तो ते तिच्या कंठांत घालूं लागले. तो जणों वाग्दान झाल्याचा सूचक हार होता. तो घातल्यानंतर लग्न ठरलें असें होऊन, तें फिरवितां येतेंना. त्या कन्यकेनें तो हार व ते अलंकार पतकरिले नाहींत. हार घालूं जातां तिनें मान मागें घेऊन, मोठ्या काकळुतीनें त्यांना ह्मटलें, 'या संपत्तीसाठीं तुह्मी मला विकून टाकणार असलां तर वेगळें. बाकी मला हें कांहीं नको. विजयनगरच्या रायाची राणी होण्याची मला मुळींच इच्छा नाहीं. एकदां तेथें राजवाड्यांत गेल्यावर आपल्या निकट आप्त इष्टांचें सुद्धां दर्शन होत नाहीं. मला असली ही कैद नको. मला तुह्मांपासून दूर व्हावयाचें नाहीं.' असें बोलून ती फारच रडून शोक करूं लागली. तेव्हां तिच्या आईबापांनीं तिचें ह्मणणें मान्य करून राजाकडून आलेले सारे वस्त्रालंकार परत केले. तसा तो ब्राह्मण निराश व नाउमेद होऊन विजयनगरास परत गेला. तेथें त्यानें झालेलें वर्तमान रायाला कळविलें. तें ऐकून तो जणों प्रेमानें वेडा झाला. आपला मनोरथ जबरदस्तीनें पुरा करण्याचा त्यानें निश्चय केला. त्याचें प्रेम जडलेली ती मुलगी फीरोजशहाच्या ऐन अमलामध्यें रहात होती. याचा त्यानें कांहींच विचार केला नाहीं. (हें वर्णन फेरिस्तानें आपल्या स्वज्ञाति-विषयक पक्षपातानें लिहिलें आहे. मुदगल फीरोजशहाच्या राज्यांत नसून तें सरहद्दीबद्दल

नेहमीं तंटे चाललेल्या प्रदेशांत होतें. ) हा उद्देश मनांत धरून राय बरोबर मोठी थोरली फौज घेऊन राज्यांत फिरतीवर म्हणून निघाला. तुंगभद्रा किनाऱ्यावर पोहोंचतांच, ५००० निवडक स्वार बोलावून त्यानें त्यांना रात्रंदिवस धांवा करून मुदगल येथें पोहोंचावें आणि ती कन्या-'परताल' किंवा 'निहाल' नांवाची-रहात असलेल्या खेड्याला घेरून, तिला घरच्या सर्व माणसांसह कांहीं इजा न होतां धरून आणावें, असा, निवळ उल्लू व कामवश होत्साता, हुकूम दिला. पदरच्या लोकांनीं असें करणें गैर व अनर्थावह असल्याबद्दल पुष्कळ निषेध केला व विनवणी केली. पण त्यानें तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं.

पण या वेळीं अवचित दुसराच प्रकार घडून आला. त्या ब्राह्मणाला परत 'परताल' च्या पित्याला पूर्वींच सूचना करण्यासाठीं पाठविलें पाहिजे होतें, तें राय विसरला. रायाची मोठी थोरली फौज चढाई करून येत असल्याचें ऐकतांच मुदगलचे लोक गांव सोडून पळाले. त्याच्यांतच 'परताल' व तिचे लोक निघून गेले. हें पाहून गेलेले स्वार परत आले. पण त्यांनीं वाटेंत लूटमार केली. तेव्हां त्यांच्यावर सुलतानाच्या जास्ती फौजेनें हल्ला केला. त्या हल्ल्यांत त्यांतील २००० स्वार ठार झाले. या मुळें युद्ध सुरू झालें.

" सं. ८०९ हिजरी किंवा सं. १४०६ ई० च्या हिंवाळ्याच्या प्रारंभाला सुल्तान भारी फौजेनिशीं चढाई करून विजयनगराजवळ आला. देवलराय राजधानीचाच आश्रय धरून राहिला होता, सुलतानानें हल्ला करून कांहीं बाजार हस्तगत केले. पण कर्नाटकी लोकांनीं त्याच्या फौजेला हार दिली. त्यामुळें त्याला परतावें लागलें. हें पाहून देवरायाला हुरूप आला व त्यानें आपली फौज शहरच्या कोटाच्या आश्रयांतून बाहेर काढली व तो सुलतानाच्या छावणीला बराचसा त्रास देऊं लागला. त्या शहराच्या जवळ पासच्या पहाडी व खडबडीत प्रदेशामध्यें मुसलमानी फौजेंतील स्वारांना नीटसें काम देतां येईना. यामुळें त्यांची थोडीशी उमेद खचली होती. त्यांतच फीरोज-शहाच्या हाताला तीराची जखम लागली. तरी त्यानें घोड्या वरून न उतरतां तो बाण खेंचून काढला व त्या जखमेवर रुमालाची पट्टी बांधली. अखेर अहमदखान खानखानान याच्या बहादरीमुळें शत्रूचा पराभव झाला व ते परत पिटाळले गेले. सुल्तान शहर सोडून थोड्या अंतरावर मोकळ्या जागेंत छावणी करून राहिला. त्यानें आपल्या थकल्या भागलेल्या व जखमी झालेल्या लोकांना विश्रांती घेऊं दिली. "

सुल्तान तेथें चार महिने राहिला. राय राजधानीमध्यें कोंडलेला होता. सुल्तानाच्या फौजेनें विजयनगराच्या दक्षिणेकडील साऱ्या संपन्न प्रदेशाची धूळधाणी उडविली व बंकापुरावर हल्ला केला. सुल्तानाच्या तळाचें हें मोकळें मैदान हल्लीं हांसपेठ शहर आहे त्याच्या भोंवतालचेंच असावें. कारण हें सारें खोरें कबजांत आल्यावांचून, त्याला दक्षिणेकडील प्रदेशांत संचार करितां येताना. बंकापूरचा किल्ला पाडाव करून व ६०००० कैदी घेऊन सुल्तानाची फौज परत आली. नंतर सुल्तानानें खानखानानाला विजयनगरावर ठेविलें व तो स्वतः अदोणी सर करण्यासाठीं रवाना झाला. हा किल्ला त्या राज्यांतील साऱ्या किल्ल्यांमध्यें पहिल्या प्रतीचा मजबूत होता.

पुढें देवरायानें तहाचें बोलणें लावलें. त्याला अत्यंत अपमानाच्या पुढील शर्ती कबूल कराव्या लागल्या. राजानें आपली कन्या सुल्तानाला द्यावी, भारी मोठी रक्कम दंडा दाखल द्यावी, आणि बंकापूरचा किल्लाही कायमचा द्यावा. "कर्नाटकच्या रायांनीं आपल्या मुली आजवर आपल्याच गण गोता बाहेर कधींही दिलेल्या नव्हत्या. पण यावेळीं रायाला निरुपायानें ही गोष्ट कबूल करावी लागली. उभय पक्षीं लग्न समारंभाची तयारी मोठ्या कडाक्यानें सुरूं झाली. शहर व सुल्तानाचा कंपू यांच्यामध्यें चाळीस दिवस सारखी रहदारी जारी होती. रस्त्याच्या दुतर्फा सलग बाजार, दुकानें, व मंडप, लागले होते. त्यांच्यामध्यें डोंबारी, नटनर्तक, तमाशेवाले, व कर्नाटकचे कसबी लोक, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना आपापलें कसब, खेळ व कौशल्य दाखवीत होते. सुल्तानाच्या वतीनें खानखानान व मीर फजलउल्ला, हे रीतीप्रमाणें वर पक्षाकडील अहेर व वस्त्रालंकार घेऊन विजयनगराला गेले. पुढें सातवे दिवशीं ते वधूला घेऊन सुल्तानाच्या कंपूंत परत आले. तिच्या बरोबर रायानें बहुमोल आंदण व अहेर दिले होते. रायानें सुल्तानाची भेट होण्याविषयीं उत्कट इच्छा दर्शविली. तेव्हां फीरोजशहानें आपल्या नववधूसह श्वशुराची भेट घेण्याचें मोठ्या उल्हासानें कबूल केलें.

"त्याप्रमाणें नेमलेल्या दिवशीं कंपूची व्यवस्था खानखानानाच्या स्वाधीन करून, फीरोजशहा आपल्या नूतन पत्नीसह विजयनगराला गेला. देवलराय त्याला मोठ्या समारंभानें व थाटानें सामोरा आला. शहराच्या अगदीं बाहेरच्या वेशीपासून राजवाडा दोन कोस होता. तेथवर साऱ्या रस्त्यावर किनखाप, मख्मल, साटिन, वगैरे उंची व बहुमोल कापडाच्या पायघड्या घातल्या होत्या. दोघेही राजे, घोड्यावर स्वार झालेले, बरोबरच मिरवत निघाले.

दुतर्फा सुरेख व सुंदर वस्त्रालंकार धारण केलेल्या मुली व मुलगे, सुवर्ण पात्रांत ठेवलेल्या आरत्या घेऊन उभे होते. ते त्या आरत्या त्या दोघांवर ते पुढें येत तसे ओवाळीत, व त्यांच्यावर रुप्याच्या फुलांची वृष्टी करीत होते. तीं फुलें मागाहून रस्त्यांतील लोक वेंचून घेत. पुढें नगरांतील स्त्री पुरुषांनीं आपापल्या योग्यतेनुरूप भेटी व नजर नजराणे केले. शहराच्या मध्यवर्ती मोठ्या चौकांतून पुढें गेल्यावर रस्त्याच्या दुतर्फा उभे राहिलेल्या देवलरायाच्या आप्त इष्टांनीं प्रणाम करून भेटी दिल्या, व ते पायींच त्या राजांच्या पुढें मिरवणुकींत चालूं लागले. राजवाड्याच्या महाद्वारावर येतांच दोघेही घोड्यावरून उतरून एका प्रशस्त सुखासनावर स्वार झाले. तें सुखासन सुवर्णाचें व रत्नखचित होतें. तेथून त्यांना वधूवरांसाठीं मुद्दाम तयार केलेल्या दिवाणखान्यांत नेलें. तेथें पोहोंचल्यावर देवलराय निरोप घेऊन आपल्या महालांत गेला. सुल्तानाला तीन दिवस राजकीय थाटानें व समारंभानें मेजवानी झाली. नंतर त्यानें रायाचा निरोप घेतला. त्यावेळीं रायानें त्याला पूर्वींपेक्षांही जास्त भेटी व अहेर दिले. तो दीड कोसपर्यंत त्याला पोहोंचवायाला बरोबर गेला व तेथून परत फिरला.

"तो आपल्या बरोबर कंपूपर्यंत आला नाहीं याचा सुल्तानाला राग आला. या अपमानाबद्दल सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं, असें त्यानें मीर फजलउल्ला याला बोलून दाखविलें. हें देवलरायाला कळलें तेव्हां तो कांहींक टाकून बोलला. परिणामीं हा संबंध घडूनही अपसांतील द्वेष व तिरस्कार कांहींच कमी झाले नाहींत."

नंतर फीरोजशहानें राजधानींत परत गेल्यावर त्या रूप सुंदरी 'परताळ-' ला बोलावून घेतलें. तिचें रूपलावण्य वाखाणलें गेलें होतें त्याहून किती तरी अधिक होतें. त्यानें तिचें, आपला वडील पुत्र शहाजादा हसनखान याच्याशीं लग्न करून दिलें. "लग्न सोहाळा व तत्संबंधी ग्रंथिबंधनविधि फारच थाटाचा व राजकीय समारंभानें करण्यांत आला."

हसनखान मनाचा कच्चा, विषयी व खराब होता, असें फेरिस्तानें लिहिलें आहे. तो गादीचा वारस होता खरा, पण शूर व तरतरीत अशा खानखानान अहंमदशहानें त्याला सहज हुसकून लाविलें. पुढें तो सुखवस्तू गृहस्थाप्रमाणें फीरोजाबाद येथें ऐष आरामांत व विलासांत मग्न होऊन राहिला होता. तेथें, अहमदशहानें त्याला राहण्याला प्रशस्तसा महाल व खर्चासाठीं एक मोठीशी जहागीर, लावून दिली होती. तेथून तीन कोसांच्या हद्दींमध्यें शिकार करीत फिरण्या-

लाही त्याला मोकळीक होती. त्याला राज्य करण्याच्या दगदगीपेक्षां याप्रमाणें चैनींत राहणें पसंत होतें. चुलत्याच्या हयातीपर्यंत त्याचे दिवस उत्तम सुखांत व चैनींत गेले. त्याला मुळींच कसा तो त्रास झाला नाहीं. पण पुढें सं. १४३४ च्या सुमारास त्याचे डोळे काढले गेले व फीरोजाबादेच्या राजवाड्या बाहेर पडण्याला त्याला अटक झाली.

पहिला देवराय सं. १४१२ पर्यंत तरी हयात होता. त्याच्या मागून त्याचा पुत्र वीरविजय–'नूनीज' चा 'विसय'-गादीवर बसला. त्यानें सहा वर्षे राज्य केलें, असें 'नूनीज' नें लिहिलें आहे. पहिल्या देवरायाचा अखेरचा शिलालेख सं. १४१२-१३ सालचा व वीरविजयाचा, पहिला सं. १४१३–१४ चा, असे मिळालेले आहेत. विजयरायाचा अखेरचा लेख सं. १४१६-१७ चा आहे. वीरविजयराया नंतर त्याचा वडील पुत्र दुसरा देवराय राजा झाला. त्याचा पहिला उपलब्ध लेख सोमवार तारीख २६ जून सं. १४२४-२५ आहे. 'नूनीज' च्या बखरीप्रमाणें त्यानें २५ वर्षे राज्य केलें.

वीरविजयरायाच्या कारकिर्दींत विशेष कांहीं घडलें नाहीं, पण दुसऱ्या देवरायाच्या कारकिर्दींत सारखीं युद्धें सुरू होतीं, असें 'नूनीज' नें लिहिलें आहे. सं. १४१७ सालीं सुलतान फीरोजशहानें तेलंगणांतील हिंदू राजेरजवाड्यांबरोबर झगडा उपस्थित करून, तिकडे चढाई केली आणि पानगलच्या किल्ल्याला दोन वर्षे सारखा वेढा घातला. तो किल्ला अद्वोणीच्या नैर्ऋत्येकडे ७५ कोसांवर आहे. त्या वेढ्यांत यश आलें नाहीं, कारण, "माणसें व घोडीं, दोहोंमध्यें ही महामारी सुरू झाली. तेव्हां पुष्कळसे प्रमुख सरदार सुद्धां फौजेचा तळ सोडून आपापल्या लोकांनिशीं भराभर आपल्या जहागीरींवर निघून गेले. या आणीबाणीच्या प्रसंगीं देवलरायानें आपली फौज जमविली व तेलंगणच्या-वरंगळच्या-राजासुद्धां आसपासच्या साऱ्या राजेरजवाड्यांची कुमक मिळवून, अगणित स्वार व पायदळ युक्त फौजेसह सुलतानावर चढाई केली." असें फेरिस्तानें वर्णन केलें आहे.

ही गोष्ट सं. १४१९ सालीं घडली. ती वीरविजय रायासारख्या शांतिब्रह्म राजाच्या हातून घडणें शक्य नसल्यानें, ती दुसरा देवराय गादीवर येतांच घडली, असें मानलें पाहिजे. यावेळीं देवरायाचें वय फारसें झालेलें नसावें. भोंवतालच्या सरदार मंडळीला चेव येऊन व त्यांची महत्वाकांक्षा अनावर होऊन त्यांनीं हिंदू लढवय्ये लोकांना प्रोत्साहन दिलें असावें आणि या नूतन राजाच्या नांवानें त्यांनीं

आपल्या पिढीजाद शत्रूशीं लढाई सुरू केली असावी.

(पहिल्या देवरायानें सहा सात वर्षें राज्य केलें. नंतर विजयरायही सहाच वर्षें गादीवर होता. यावरून विजयरायाचा पुत्र व देवरायाचा नातू दुसरा देवराय गादीवर आला तेव्हां तो तरुणच असावा.)

त्यानें २५ वर्षें राज्य केलें, असें 'नूनीज' म्हणतो. म्हणजे सं. १४४४ त तो मरण पावला. त्याच्या पश्चात त्याचा पुत्र 'पीनाराव' याला त्याच्या पुतण्यानें विषारी कट्यारीनें घायाळ केल्यामुळें तो पुढें सहा महिनें आजारी पडून वारला. या संबंधानें अब्दुर्रझाक यानेंही उल्लेख केलेला आहे. तो समकालीन इतकेंच नव्हे, तर ही गोष्ट घडली तेव्हां इकडे आलेला होता. सबब त्याचें लिहिणें अधिक विश्वसनीय आहे. त्यानें ही गोष्ट दुसऱ्या देवरायाविषयीं लिहिली आहे. त्यावरून तिचें सालही नक्की होतें. ती नव्हेंबर सं. १४४२ पासून एप्रिल सं. १४४३ पर्यंत कधीं तरी घडून आली. या दिवसांत अब्दुर्रझाक कालीकत येथें होता. तेव्हांच ही गोष्ट घडल्याचें त्यानें लिहिलें आहे.

त्यानें राजाच्या मरणाचा उल्लेख केलेला नाहीं. यावरून अब्दुर्रझाक सं. १४४३ च्या डिसेंबरमध्यें राजधानींहून परत निघाला, तोंवर ही गोष्ट घडली नव्हती, असें ठरतें. तेव्हां देवराय सं. १४४४ च्या अवलीस मरण पावला, असें म्हणण्याला बाध नाहीं. सं. १४४५ सालचा एक शिलालेख मिळालेला आहे. त्याच्यांतही देवरायाच्या नांवाचा उल्लेख आहे. पण हा देवराय त्याच नांवाचा दुसरा कोणी राजा होता असें मानून तूर्त निर्वाह करितां येण्याजोगा आहे. याप्रमाणें दुसऱ्या देवरायाची कारकिर्द सं. १४१९ पासून सं. १४४४ पर्यंत २५ वर्षांची होती, असें बहुतेक नक्की ठरतें.

---

# भाग सहावा.

## दुसरा देवराय (सं. १४१९–१४४४).

पुनः युद्ध प्रसंग-विजयनगरचा विजय–फीरोजशहाचा मृत्यु-सुलतान अहमदशहाची देवरायावर चढाई–देवरायाचें साहस–त्याच्या प्राणावर बेतणें–अहमदशहा विजयनगराच्या वेशीवर दाखल होतो–त्याच्यावर आलेलें प्राणसंकट–देवराय आपली हार कबूल करितो–वरंगळाचा पाडाव–सुलतान अलाउद्दीन–देवरायानें केलेला बंदोबस्त–त्याच्या खूनाचा प्रयत्न–सं. १४४३–यांविषयींची अब्दुर्रझाक यानें दिलेली हकीकत–कलबुर्ग्यावर स्वारी–राजधानीं–

तील सुधारणा–देवरायाच्या मृत्यूचें अंदाजी वर्ष–तिसरा ही देवराय राजा होता कीं काय ?

मागील भागांत लिहिल्याप्रमाणें दुसरा देवराय गादीवर असतांना कलबुर्गेवाल्यांबरोबर सं. १४१९ मध्यें त्यांचें युद्ध सुरू होतें. सुलतानानें वरंगळवाल्यांच्या पानगळ किल्ल्यावर हल्ला केला. त्यांत त्याला यश आलें नव्हतें आणि विजयनगरची भली मोठी फौज त्याच्यावर चढाई करून गेली होती. त्याची फौज कमी असून ही त्यानें शत्रूला तात्काल तोंड दिलें होतें. लढाई कोठें झाली तें फेरिस्तानें लिहिलें नाहीं.

" इस्लामिया फौजेचा सेनापती मीर फजलउल्ला यानें त्या धर्मलंड काफरांवर मोठ्या नेटानें व शौर्यानें हल्ला केला. त्यांच्या मध्यभागाची दाणादाण करून तो त्यांच्या उजव्या पक्षावर चालून गेला. विजय पुष्पमाला त्याच्या गळ्यांत पडतच होती इतक्यांत देवलरायानें फितविलेल्या एका नोकरानें त्याच्या मस्तकावर सपाटून घाव घातला. त्या योगानें त्याला तात्काळ शहीदपणाच्या सरबताचें पान घडलें. या अपघातामुळें त्या दिवशींची लढाई उलटली व सुलतानाचा पराभव होऊन तो मोठ्या शर्थीनें, शौर्यानें, व भारी अडचणी सोशीत, एकदांचा समर भूमीवरून जिवंत पार पडला. हिंदू लोकांनीं मुसलमानांची सर रास कत्तल केली. आणि रणभूमीवर त्यांच्या शिरांचा एक चबुत्रा बांधला. त्यांनीं सुलतानाचा पाठलाग केला आणि वाटेंतील प्रांत लुटून मारून उध्वस्त केला. तसेंच क्रूरपणानें भारीच कत्तल केली. गांवचे गांव जाळले व मशीदी व दरगे पाडून फोडून विध्वंस केला. आज युगांचीं युगें त्यांच्या पोटांत सांचलेला क्रोध व जळोपा ओकून टाकून पुरा सूड उगविण्यालाच ते जणों या वेळीं उद्युक्त झाले होते. या संकटाच्या प्रसंगीं फीरोजशहानें गुजराथेच्या सुलतानाकडून सहाय्य मागितलें, पण तो नवीनच राज्यारूढ झालेला असल्यामुळें त्याला तें देतां आलें नाहीं.

अखेर त्याचें दैव पुनः अनकूल झालें. बऱ्याचशा लढायानंतर खानखानान यानें शत्रूला सुलतानाच्या राज्याबाहेर पिटाळून लावलें. या संकटामुळें वृद्ध फीरोजशहाच्या मनाला भारी धक्का बसला. त्याला जबर दुखणें लागलें व तो भारी उदाससा होऊन गेला."

त्याच्या मनांतून आपला पुत्र–त्या रूपलावण्यवती परतालच्या पती हसनखान–याला गादी मिळावी असें होतें. पण त्याचा भाऊ अहमदशहा खानखानान

जबरदस्तीनें गादी बळकावण्याच्या इराद्यानें फौजेसह राजधानीकडे येऊं लागला. बहुतेक सरदार त्यालाच अनकूळ दिसले. त्यामुळें फीरोजशहानें हार खाऊन अहमदशहानेंच आपल्या मागून राज्य करावें, असें ठरविलें. तो तारीख ७ शव्वाल सं. ८२५ हिजरी–तारीख २४ सप्टेंबर सं. १४२२ रोजीं मरण पावला, तेव्हां खानखानान हा पहिला अहमदशहा या नांवानें गादीवर बसला.

राज्याधिकार हातीं घेतांच त्यानें आपली सारी प्रजा आपल्या अंमलाला राजी व प्रसन्न राही अशी राज्याची व्यवस्था केली व थोडे दिवस स्वस्थ राहून स्थिरस्थावर केली. नंतर रायानें आपल्या राज्यावर स्वारी केली होती त्याचा पुरा सूड उगविण्यासाठीं फौज वाढवून ती प्रबल व सज्ज केली. इतकें झाल्यावर त्यानें मोहीम सुरू केली. देवरायाच्या सेनाध्यक्षांनींही आपापल्या फौजा जमविल्या. त्यांनीं वरंगळवाल्यांकडे मदत मागितली आणि पुढें वाढून ते तुंगभद्रेच्या कांठीं तळ देऊन राहिले. मागच्या मोहिमेनंतर ते दुआबांतून आपल्या हद्दींत परत आले होते, असें दिसतें. सुलतानही त्या नदीच्या उत्तर तीरावर पोहोंचला. तेथेंच त्यानें फौजेचा तळ दिला व त्याच्या भोंवतीं रूमशामकडील तऱ्हेवर गाडे व गाड्या उभ्या करून त्यांचा तात्पुरता अभेद्य कोटसा तयार करून बंदोबस्त केला. त्यामुळें शत्रूला रात्रीं अवचित छापा घालतां येण्या जोगा नव्हता, असें फेरिस्तानें ह्मटले आहे. असा तो तेथें ४० दिवस राहिला. यावरून ते दिवस सं. १४२३ च्या अवलीचे व उघाडीचे असावेत. नदीला पूर असतां तर शत्रू पार उतरणें शक्य नसल्यानें, असा बंदोबस्त करून राहण्याची आवश्यकता नव्हती. विजयनगरच्या पूर्वेकडे या नदीला थंडीच्या दिवसांत व पुढेंही मोकळ्या मैदानाच्या भागांत फारसें पाणी असत नाहीं. पात्रांत जागजागीं उथळ पाण्याचे लहान मोठे पाट वहात असतात. या वेळीं नदीला पायउतार असल्याचें फेरिस्तानें लिहिलें आहे.

यानंतर एक विलक्षण व कादंबरींत किंवा नाटकांतच वर्णन करण्याला शोभे, असा प्रकार घडून आला. मुसलमान स्वारांचीं कांहीं पथकें नदी उतरून रायाच्या छावणीच्या आसपासच्या भागांत लूट मार करीत फिरत होतीं. देवराय स्वस्थ बसून होता. त्याच्यावर थेट समोरूनच मारा करण्याचें सुल्तानानें ठरविलें. वरंगळचे लोक राजाचा पक्ष सोडून निघून गेले.

"लोदीखान, आलमखान, व दिलावरखान यांनीं रात्रींच कूच केलें व बऱ्याच अंतरावर ते नदीपार झाले. सकाळच्या प्रहरीं लौकरच त्यांनीं रायाच्या छावणीच्या आसमंतांत भाग गांठला होता. त्या दिवशीं राय थोड्याशा

लोकांनिशीं एका लहानशा बागेंत निजला होता जवळच एक मोठा उसाचा फड होता. ( रायाची छावणी तुंगभद्रेच्या कालव्याच्या कांठींच असावी. पूर्वीच्या राजांनीं नदीला-आनेकट-बांध घालून हे कालवे काढले होते. त्यांच्या पाण्यावर उसाची लागवड होत होती. ती हल्ली सुद्धां होत आहे.) कांहीं मुसलमान स्वार त्या बागेमध्यें लूट करण्याला शिरले. तशा देवराय घाबरून, बहुतेक उघडाच, जवळच्या फडांत शिरला. तेथें त्याला कांहीं स्वारांनीं पाहिलें. तो कोणी यःकश्चित गांवढळ खेडू आहे असें समजून त्यांनीं त्याला डोकीवर उसांची मोळी देऊन आपल्या पुढें बेगारींत दवडलें. त्यांनीं आपणाला ओळखिलें नाहीं असें पाहून देवराय ही मुकाट्यानें भारा घेऊन चालला. पुढें ते आपण होऊन सोडून देतील, किंवा आपणाला निसटून जातां येईल तर पाहावें, असा त्यानें विचार केला. ते थोडे दूर जातांच सुलतान नदी उतरून आल्याची व राय नाहींसा झाल्याची खबर साऱ्या छावणींत पसरली व हिंदू फौज सैरावैरां धावूं लागली. सुल्तानानें छावणींत प्रवेश केल्याचें कानीं पडतांच त्या रायाचे तात्पुरते धनी बनलेल्या मुसलमान स्वारांना उसांच्या मोळीपेक्षां जास्त मौल्यवान लाट लागण्याची लालुच लागली व ते त्याला तसाच सोडून तडक आपल्या सोबत्यांमध्यें सामील झाले. देवरायही आपल्या फौजेंतील लोकांबरोबर पळूं लागला. दुपारच्या सुमाराला त्याचे कांहीं सरदार त्याला भेटले. त्यांनीं त्याला ओळखून मोठ्या आनंदानें त्याची सर्व व्यवस्था केली. तो सुरक्षित असल्याचें प्रगट केलें जातांच, त्याच्या फौजेंत कांहींशी स्थिर स्थावर झाली. कांहीं सैन्याचा भाग पुनः एकत्रही जुळला. तरी पण हा झालेला प्रकार अपशकुनाचा समजून त्यानें लढाईचा बेत टाकून विजयनगराचा रस्ता धरला. ( या गोष्टीमध्यें कितपत खरेपणा आहे कोण जाणें. त्यावेळीं देवराय अल्पवयी होता. तो अगदींच सामान्य माणसाप्रमाणें समजला जाणें शक्य दिसत नाहीं. राजकुलांतील दुसरा कोणी पुरुष असल्या विकट प्रसंगांत सांपडून सुरक्षित पार झाला असेल व मुसलमान लेखकांनीं नांवांचा कांहीं गोंधळ केला असेल. )

"अहंमदशहानें राजधानीला वेढा न घालतां आसपासच्या मोकळ्या प्रांतांत लूटमार व धूळ धाण चालविली. पूर्वीचा सुल्तान महंमदशहा यानें विजयनगरवाल्यांशीं केलेला ठराव धाब्यावर बसवून त्यानें भारी क्रूरपणानें आबालवृद्ध स्त्री पुरुषांची मनसोक्त कत्तल केली. नैसर्गिक भूतदया व मनुष्यपणा सुद्धां सोडून, २०००० माणसें मारलीं गेलीं कीं, तीन दिवस मुक्काम करून तत्प्रीत्यर्थ तो उत्सव करवीत असे! त्यानें देवतांच्या मूर्ती, देवालयें, विद्यापीठें, मठ, इत्यादि पार मोडून, तोडून, विध्वंस चालविला. असली ही अमानुष क्रूर-

पणाची मोहीम चालली असतांना, आपल्या देशाची ही धूळधाणी, विटंबना, देवतांचा छळ व मूर्तींचा भंग, होत असलेला पाहून ५००० हिंदू जिवावर उदार झाले व त्यांनीं या सर्व अनर्थाचें मूळ तो सुलतान त्याला कसेंही करून ठार मारून सूड उगविण्याचा निश्चय केला, व त्याप्रीत्यर्थ शपथा घेतल्या. योग्य संधि मिळण्यासाठीं त्यांनीं सुलतानाच्या हाल चालीवर बारीक नजर ठेवण्यासाठीं हेरही नेमिले होते."

"एकदां सुलतान शिकारीच्या नादांत सावजामागें दौडत आपल्या छावणीपासून चार कोस दूर मैदानांत निघून गेला. याची खबर पावतांच ते जीवावर उदार झालेले लोक एकदम त्याला घेरण्याला निघाले. त्यांनीं त्याला अशा पेचांत व ऐन वेळेवर गांठिलें कीं, त्याच्या बरोबर नेहमीं २०० मोगल स्वार खास रक्षक रहात असत, ते सुद्धां दूर राहिले होते. तेव्हां सुलतानही कांहींसा घाबरला व त्यानें आपला घोडा अधिकच वेगानें दवडून जवळच मातीचा कोट असलेली एक गुरांची दड्डी होती तिच्या आसऱ्याला जाण्याचा विचार केला. पाठलाग करणारेही फारच त्वेषानें व नेटानें येत होते. मध्यंतरी कांहीं उंच सखल जमीन आलेली बलांडून पार पडण्यापूर्वींच त्यांनीं सुलतानाला बहुतेक गांठलें. पण तितक्यांत सुदैवानें कांहीं तीरंदाज लोक त्याच्या मदतीला येऊन पोहोंचल्यानें त्या लोकांना कांहीं अडथळा झाला, व सुलतान त्या तीरंदाजांसह त्या दड्डींत शिरला. शत्रूनेंही आंत घुसण्याचा प्रयत्न केला. बरीच निकराची झटापट झाली. त्यावेळीं सर्व मुसलमानांनीं कलमा पढून, मरून जाऊं पण हातीं लागणार नाहीं, अशी शपथ केली. ते लोक थोडेसेच होते. ते बहुतेक ठार झाले. शत्रूनें आवाराजवळ पोहोंचून पहारी व कुदळींनीं कोट पाडण्याला सुरवात केली. तशी सुलतानाची अगदीं त्रेधा उडाली. अब्दुलकादर नांवाचा, सुलतानाचा कवच रक्षक छावणींत होता. सुलतानाचा कोठें पत्ता दिसेना तेव्हां त्याच्यावर तसाच कांहीं विकट प्रसंग आला असावा असा विचार करून, तो एक स्वारांची तुकडी घेऊन, त्याच्या तपासाला निघालेला अवचित त्या दड्डीजवळ येऊन पोहोंचला. शत्रूनीं कोटाचा बराच भाग पाडला होता. ते हल्ला करून आंत शिरतच होते, इतक्यांत त्यांच्यावर मागूनही हल्ला झाला. सुलतान व त्याचे दोस्तही आंतून हल्ला करीत पुढें सरसावले. फार वेळ झटापट झाली. शत्रूचे १००० लोक मारले गेले. मुसलमानही ५०० वर शहीद झाले. या प्रमाणें जणों दैवी स्फूर्तीनेंच अब्दुलकादरानें घेतलेल्या खबरदारीमुळें, सुलतानाला या दुसऱ्या प्राण संकटांतून पार पडून राज्य वैभवाच्या

शिखरावर पोहोंचतां आलें. (यापूर्वी एकदां, आपला पुत्र हसन याला निर्वेधपणें राज्य-पद मिळावें म्हणून, सुल्तान फीरोज यानें अहमदशहाचें डोळे काढण्याचा यत्न केला होता. पण याचा सुगावा लागून तो कलबुर्ग्याहून निघून गेला होता.) अशा तऱ्हेनें दोघे सुल्तान भारी फौज असूनही, वेळेवर पुरेसे लोक जवळ न राहिल्यामुळें, प्राणसंकटांत पडावे, पण त्यांतून ते वचावून निघावे, ही गोष्ट इतिहासांत नमूद करून ठेवण्याजोगी विलक्षण व अलौकिक होय."

" यानंतर अहमदशहानें विजयनगराच्या वेढ्याचें काम फारच सक्तीनें चालविलें. आंतील लोकांचे फारच हाल होऊं लागले. त्यांचा बचाव व्हावा म्हणून देवरायानें वकील पाठवून तहाचें बोलणें लावलें."

तुंबलेली सारी खंडणी उत्तमोत्तम सजविल्या हत्तीवर लादून, लवाजम्या-निशीं समारंभानें खुद्द युवराजानें आणून पोहोंचती करावी, या शर्थीवर सुल्ता-नानें तह करणें कबूल केलें. देवरायाला नाइलाजानें त्याप्रमाणें करावें लागलें. खंडणीची सारी रक्कम व इतर नजर नजराणें, तीस हत्तींवर लादून, युवराजाला बरोबर देऊन, त्यानें समारंभानें धाडलें. सुल्तानानें आपले कांहीं सरदार त्याला सामोरे पाठविले. त्या सर्वांची थाटाची मिरवणूक, छावणींतील बाजार व रस्ते याच्यां मधून फिरत फिरत, सुल्तानाच्या हुजूर आली. सुल्तानानें युवराजाला बगलगीर करून सिंहासना जवळ खालीं बाजूला बसविलें. त्यानें त्याला एक उंची पोषाख दिला त्याच्या कमरेला रत्नजडित तरवार बांधली. राजाला परत भेट म्हणून, एक नर हत्ती, देशोदेशींचे तीस उमदे घोडे, शिकारी कुत्रे, आणि तीन बाज, किंवा शिकारी ससाणे, असे पाठविले. तों पर्यंत कर्नाटकी लोकांना ससाणे ठाऊक नव्हते. पुढें तो परत निघाला. त्यानें युवराजाला कृष्णेच्या कांठावरून निरोप दिला आणि कांहीं दिवसांनीं तो राजधानीला पोहोंचला.

(यांत सुल्तानानें युवराजाची अशी मिरवणूक करून रायाची जणों बुद्ध्यां हतक केली. त्यानें युवराजाला आपल्या छावणींत मिरविलें तें त्याच्या व रायाच्या राज्याचा हलकेपणा द्योतक म्हणूनच होय. ती एक अप्रतिष्ठित धिंडच होती. त्यानें त्याला सिंहासनाच्या पायथ्याशीं बसविलें आणि परत जातांना कृष्णेच्या कांठापर्यंत जणों कैद्या सारखेंच बरोबर नेलें.)

याप्रमाणें हें आपसांतील भांडण एकदाचें मिटलें. त्याचें साल फेरिस्ता-च्या वर्णनावरूनच काढलें पाहिजे. तो म्हणतो कीं सुल्तान कलबुर्ग्याला परत आला त्या सालीं दक्षिण देशांमध्यें भयंकर दुष्काळ पडला. " दुसऱ्या वर्षीं ही पावसाचा थेंब पडला नाहीं. यामुळें प्रजा बेदिल झाली. " हीं सालें बहुधां हिजरी सं. ८२६-२७ किंवा ईसवी सं. १४२३-२४ असावींत. हिजरी सं. ८२८ सालीं

सुल्तानानें वरंगळावर स्वारी केली. विजयनगरावरील स्वारी सं. १४२२ त झाली होती. ती आटपून तह होई तों सं. १४२३ हें वर्ष बहुतेक संपत आलें असावें. पण त्या सालीं पाऊस पडला नाहीं. यामुळें सुल्तानाला त्या दिवसांत ही मोहीम करण्याला अडचण पडली नसावी.

यानंतर त्यानें वरंगळावर स्वारी केली. ती ही सं. ८२८ सालीं. त्या मोहिमेच्या वेळीं दक्षिण देशामधील माफक चढ उतार असलेल्या विस्तीर्ण, सपाट व सुपीक मैदानांमध्यें हिरवी गार शेती उभी होती. या स्वारीमध्यें सुल्तानाला पुर्तें यश आलें. वरंगळचें प्राचीन हिंदू राज्य ई. सं. १४४२ त कायमचें बुडालें, असें सामान्यतः मानतात. पण हें साल बहुधा सं. १४२५ ही असेल. ही मोहिम झटपट व फारच लौकर आटपली.

या पुढें, अहमदशहाचा पुत्र दुसरा अल्लाउद्दीन याच्या कारकिर्दीपर्यंत फेरिस्ताच्या इतिहासामध्यें विजयनगरासंबंधी उल्लेख नाहीं. अल्लाउद्दीन शहा तारीख ८ रजब सं. ८३८ हिजरी म्हणजे तारीख २७ फेब्रुवारी सं. १४३५ रोजीं गादीवर बसला.

गादीवर येतांच त्यानें आपला भाऊ मुहम्मदखान याला जैयत फौज देऊन विजयनगरावर पाठविलें.

" देवरायानें ५ वर्षें खंडणी तुंबविली होती. तिची तो फेड करीना. या सुल्तानाच्या फौजेनें जाऊन त्या राज्यांत अशी कांहीं धूळधाणी उडविली कीं, रायाला निरुपायानें दीन होऊन तह करावा लागला. या तहाप्रमाणें राजानें २० उत्तम हत्ती, पुष्कळशी नगदी रकम, २०० अव्वल प्रतीच्या कलावंतिणी आणि कुशळ दासी, खुद्द बादशहाला पाठविल्या व मुहम्मद खानाला ही बहुमोल भेट व नजर नजराणा दिला. "

याप्रमाणें विजय मिळाल्यानें मुहंमदखानाचें माथें फिरलें. त्याच्या हाताखालीं मोठी थोरली फौज होती तिच्या भरंवशावर त्यानें भावाविरुद्ध बंड केलें. यांत देवरायानेंही त्याला सहाय्य केलें, अशी फेरिस्तानें कल्पना केली आहे.

त्यानें मुद्गल, सोलापुर, विजापूर, नळदुर्ग, व रायचूर, हीं शहरें घेतलीं. पण यानंतर एक जबर लढाई झाली. तिच्यांत त्याचा पुर्ता पराजय झाला व तो पळून गेला. पुढें लौकरच त्याच्या भावानें उदारपणानें त्याला क्षमा केली व रायचूरचा किल्ला व मुलूख त्याच्याकडे दिला.

पुनः देवरायानें सं. १४४२ मध्यें आपला प्रबळ वैरी व शेजारी कलबुर्ग्याचा

सुल्तान, याच्या संबंधानें राजकारण चालू केलें. त्यानें आपले प्रमुख सरदार, मांडलिक, मंत्री, व ब्राम्हण वगैरेंना दरबारांत बोलावून म्हटलें, 'आपलें हें कर्नाटकचें राज्य, लोकवस्ती, विस्तार, उत्पन्न, वगैरे संबंधांत बहामनी राज्यापेक्षां किती तरी मोठें आहे. आपली फौजही त्याच्यापेक्षां अधिक व भारी आहे. तरी पण आपणालाच नेहमीं हार येते, आणि त्या मुसलमान लोकांना विजय प्राप्त होतो, आणि आम्हांला त्यांना खंडणी द्यावी लागते, याचें कारण काय, याचा तपास करावा.' यावर कांहीं जणांनीं उत्तर दिलें, 'याचीं कारणें दोन, त्यांचे घोडे आपल्या घोड्यांहून मजबूत. ते जास्त भार वाहतात व मेहनत व कष्ट जास्ती करूं शकतात. दुसरें त्या सुल्तानानीं आपल्या पदरीं पुष्कळसे तीरंदाज लोक बाळगलेले आहेत. ते आपल्या कडे अगदींच कमी.'

"यावरून रायानें मुसलमान तीरंदाज लोक भरती करण्याचा हुकूम दिला. त्यांना जहागिरी दिल्या. त्यांच्या साठीं विजयनगरामध्यें एक मशीद बांधविली, आणि धर्माच्या बाबतींत त्यांना कोणी उपद्रव देऊं नये, असा हुकूम दिला. त्या लोकांना रायाशीं राजनिष्ट राहूं अशी शपथ घेण्याची, ती घेण्याला अडचण पडूंनये म्हणून, त्यानें आपल्या सिंहासनापुढें एका बहुमोल चौरंगावर कुराणाची एक प्रत आणवून ठेवविली. तसेंच त्यानें हिंदू शिपायांनांही तीरंदाजीची कवायत शिकण्याला लावलें. त्यानें व त्याच्या सेनाध्यक्षांनीं या कामीं अविश्रांत परिश्रम करून लौकरच, २००० मुसलमान व ६००० हिंदू तीरंदाज लोक, आणि पूर्ववत भाले व बरच्या वगैरे शस्त्रें धारण करणारे स्वार ८००००, व पायदळ २०००००, इतकी फौज तयार केली."

सं. १४४२ चा नव्हेंबर आणि सं. १४४३ चा एप्रिल यांच्या दरम्यान, देवरायाच्या–'नूनीज' च्यामतें– पुतण्यानें आणि अब्दुर्रझाकच्या मतें–भावानें–त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला. अब्दुर्रझाकचें लिहिणें जास्त विश्वसनीय होय. तो त्या सुमाराला इकडेच हजर होता. 'नूनिज'ची हकीकत या पुस्तकाच्या शेवटीं त्याच्या कैफीयतीमध्यें दिली आहे. अब्दुर्रझाक हा इराण देशाच्या राजाकडून कालीकट व विजयनगर येथील राजांकडे वकील आला होता. त्यानें लिहिलेली हकीकत पुढें दिली आहे. ती जास्त महत्वाची आहे. तिच्या वरून या गोष्टींचें साल नक्की ठरतें.

"या कैफीयतीचा लेखक-अब्दुर्रझाक-कालीकट येथें रहात असतांना–नव्हेंबर सं. १४४२ ते एप्रिल सं. १४४३–विजयनगर येथें एक फारच विलक्षण प्रकार घडून आला."

राजाच्या भावानें एक नवीन महाल बांधविला. त्याचें काम पुरें झाल्यावर त्यानें राजा, आणि सारे प्रमुख सरदार व कामगार, यांना तेथें मेजवानीला बोलाविलें. हे काफर लोक एकटेच भोजन करितात. एक दुसऱ्याला जेवतांना पहात नाहीं. ( ही चाल लिंगाइतांमध्यें अद्यापि जारी आहे. ) सारी निमंत्रित मंडळी एका मोठ्या, प्रशस्त, व सुंदर दिवाणखान्यामध्यें येऊन जमली. राजाचा भाऊ मधून मधून त्या मंडळीकडे स्वतः येऊन किंवा कोणाला तरी तेथें पाठवून 'अमक्या अमक्यांनें भोजनाला चलण्याची कृपा करावी,' अशी विनंती करी. तसा एकेकजण भोजनाच्या जागीं जाण्याला निघे. त्या प्रसंगीं जणों शहरांतील सारीं वाद्यें आणवून त्यांचें एकदमच वादन चालविलेलें होतें. त्यांचा फारच मोठा शब्द होत होता. राजाच्या भावानें पूर्वीच मारेकरी तयार करून ठेवले होते. ते भोजनासाठीं ह्मणून जो कोणी आंत येई त्याच्यावर अवचित हल्ला करून त्याला ठार मारीत. त्याच्या प्रेताचे तुकडे करून एकीकडे नेऊन टाकल्यावर दुसऱ्याला निमंत्रण दिलें जाई. तो येतांच त्याचीही तीच वाट लागे. बाहेरील वाद्यांचा गजर व गडबड यामुळें आंत चाललेल्या प्रकाराचा कोणालाही सुगावा लागला नाहीं. याप्रमाणें राज दरबारांतील सारे प्रमुख व अधिकारी लोक मारले गेले. त्या लोकांच्या रक्तानें दूषित झालेला तो राजाचा भाऊ राजवाड्यांत गेला. तेथें पाहाऱ्यावर असलेल्या लोकांनांही भुलथापा देऊन त्यानें आपल्या वाड्यांत मेजवानीला म्हणून पाठविलें. त्यांचीही तिकडे तीच वाट लावली गेली. याप्रमाणें रक्षक नाहींसे करून तो नराधम खुद्द राजाकडे गेला. त्यानें हातांत एक विड्याचें तबक घेतलें होतें. त्यांतील पानांखालीं एक तीक्ष्ण कटयार लपविलेली होती. 'सर्व तयारी आहे. सारी मंडळी हजर असून धनीसाहेबांचीच वाट पाहाताहेत,' अशी त्यानें राजाला विनंती केली.

"मोठ्या लोकांना जणों दैवी साक्षात्कारानेंच भावी अनर्थांचें सूचन होत असतें अशी सामान्य समजूत आहे. त्याअन्वयेंच जणों, राजानें 'आज मला, बरें वाटत नाहीं,' असें उत्तर दिलें. तें ऐकून त्या नीच नरपशूनें, राजा येत नाहीं असें पाहून, लपवून ठेविलेली कट्यार एकदम उपसून राजाला पुष्कळसे वार केले. त्यामुळें तो मृतप्राय होऊन बैठकीच्या मागें पडला. तो मेला असें समजून त्यानें एका साथीदाराला त्याचें शीर तोडून आणण्याला मागें सोडिलें, व तो त्या दिवाणखान्यापुढील आगाशींत आला. तेथून त्यानें, 'राजा, त्याचे बंधू, आप्त, अमके अमके सरदार, कामगार व ब्राम्हण-मंत्री, यांनां मीं ठार केलें आहे, आतां मीं राजा झालों' असें सर्वांना जाहिर केलें. मागें ठेवलेला साथीदार देवरायाचें शिर

कापण्यासाठीं पुढें झाला तोंच राजा सावध झाला. तो ज्या बैठकीमागें पडला होता, तीच उचलून त्यानें त्या साथीदाराच्या छातीवर खूप जोरानें फेंकली. तिच्या सपाट्यानें तो हरामखोर पालथा पडला. तितक्यांत हा सर्व प्रकार पहात जवळच दडून उभा असलेला एक हुजऱ्या पुढें सरसावला. त्याच्या मदतीनें त्यानें त्या दुष्टाला ठार केलें. आणि तो जनानखान्याच्या वाटेनें राजवाड्याबाहेर पडला.

" तोंवर त्याचा भाऊ मंत्रिसभेच्या सभामंडपाच्या पायऱ्यांवर उभा राहून, जमलेल्या लोकांना, 'आपणाला राजा कबूल करा,' असें म्हणत होता. तोंच राजा, तेथें पोहोंचला व त्यानें मोठ्यानें ओरडून म्हटलें, 'हां, खबरदार, मी जिवंत आहें, त्या हरामखोराला पकडा.' हें ऐकून व सारा प्रकार पाहून तेथें जमलेले सर्व लोक त्या नीच राजबंधूवर एकदम तुटून पडले व त्यांनीं त्याचे तात्काळ तिळप्राय तुकडे उडविले.

" या भयंकर प्रसंगांतून बचावला असा काय तो दानायक वजीर. तो त्या वेळीं सिंहलद्वीपाच्या सरहद्दीवर सरकारी कामगिरीवर होता. राजानें तांतडीनें त्याच्याकडे जासूदाहातीं झालेली हकीकत कळवून त्याला ताबडतोब परत बोलाविलें. या भयंकर नीच व राक्षसी कृत्याशीं यत्किंचितसुद्धां संबंध असलेल्या साऱ्या लोकांना देहांत प्रायश्चित्त दिले गेलें. कितीतरी लोक ठार मारले, जाळले पोळले, व चामडी सोलविले गेले; आणि त्यांच्या घरच्या माणसांची सुद्धां दुर्दशा करविली गेली. निमंत्रणचिठ्ठ्या घेऊन येणाऱ्यांचे तर सर्वांत जास्ती हाल हाल करून प्राण घेतले गेले."

हा प्रकार घडल्यावर पुढें सहा महिन्यांनीं राजा मरण पावला व त्याचा पुत्र गादीवर बसला, असें 'नूनीजनें' लिहिलें आहे, अब्दुर्रझाक ह्मणतो कीं, 'पुढें सं. १४४३ च्या डिसेंबर महिन्यांत आपण खुद्द त्या राजाच्या दरबारांत गेलों, व त्याची भेट घेतली. देवरायाच्या पुत्राचें नांव व त्यानें किती वर्षें राज्य केलें, तें 'नूनीजनें' लिहिलें नाहीं. त्यानें देवस्थान धर्मादायाकडे अतोनात खर्च केला, या पलीकडे नांवाजण्यासारखें कांहीं कृत्य केलें नाहीं. त्याच्यामागून विरूपाक्षराय गादीवर बसला. तोच वंशवृत्तांतील विरूपाक्ष-त्याच्या वेळे पासूनच राज्यांमध्यें धांदल सुरू झाली आणि पहिल्या राजघराण्याचा लोप होऊन नरसिंहाला गादी बळकावण्याला सवड झाली, असेंही त्यानें लिहिलें आहे.

अब्दुर्रझाक म्हणतो, ' या सं. १४४३ च्या सुमाराला मुख्य वजीर दानायक हा कलबुर्ग्याच्या राज्यांत मोहिमेवर गेला होता.' या मोहिमेचीं कारणें अशीं

'विजयनगरच्या रायाच्या खूनाचा प्रयत्न झाला व त्याचे प्रमुख लोक बहुतेक मारले गेले, याविषयींची खबर सुल्तान अलाउद्दीनाला कळली. तेव्हां ही संधी त्या राज्याचा पुर्ता नाश करण्याला बरी आहे, असें समजून त्यानें रायाकडे ७०००० बराई-किंवा-होन (सुमारें २५,००,००० रुपये) मागणें केलें. 'तो निरोप ऐकून रायाला भारी विषाद वाटला व रागही आला.' त्यानें त्याला धिट्टाईचा जवाब पाठविला व युद्धाची तयारी केली. दोन्हीं कडील फौजा तयार होऊन मोहिमेवर निघाल्या. त्यांनीं सरहद्दीवरील प्रांतामध्यें भारी धूळधाणी केली. दानाइकानें सरहद्दीच्या भागांत स्वारी केली आणि पुष्कळसे लोक कैद करून घेऊन तो परत फिरला."

या मोहिमेचा उल्लेख फेरिस्तानेंही केला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणें या वेळीं देवरायानें निष्कारण बाहामनी राज्यावर चढाई केली. "त्यानें एकदम तुंगभद्रा उतरून मुदगल घेतलें, आपल्या पुत्रांना रायचूर व बंकाचूर घेण्याला पाठविलें, स्वतः कृष्णाकांठीं येऊन तळदिला, आणि सगर व विजापुर येथ पर्यंत मुलुखगीरी करण्यासाठीं फौजेच्या तुकड्या रवाना केल्या." त्यांनीं तो मुलूख जाळून पोळून उध्वस्त केला.

"या स्वारीचें वर्तमान कळतांच सुलतानानें तिचा प्रतिकार करण्याची तजवीज करून, तेलंगण, दौलताबाद व वऱ्हाड इकडील साऱ्या फौजा राजधानीला बोलावल्या. त्या एकत्र झाल्या तेव्हां सर्व मिळून ५०००० स्वार, ६०००० पायदळ आणि पुष्कळशा तोफा, इतकें सैन्य तयार झालें. तें घेऊन तो शत्रूवर निघाला. हें पाहून देवराय मुदगलच्या किल्ल्याच्या आश्रयानें छावणी देऊन राहिला आणि त्यानें सुलतानाच्या फौजेला त्रास देण्यासाठीं बरीचशी फौज पुढें धाडली.

"सुल्तानानें मुदगलापासून १२ मैलांवर तळ दिला. मलिक उत्तिजार याला बरोबर दौलताबादेकडील फौज देऊन देवरायाच्या फौजेवर धाडलें, आणि विजापूर, तेलंगण व वऱ्हाड कडील फौजांचे सेनाध्यक्ष खानजमान व खान आजम यांना शत्रूच्या मुख्य फौजेवर पाठविलें. मलिक उत्तिजार प्रथम रायचूराला गेला. तेथें त्यानें रायाच्या वडील पुत्राचा समाचार घेतला. राजपुत्र जखमी होऊन 'बीकापुरा' कडे पळून गेला. तेथें त्याचा कनिष्ठ बंधू वेढा देऊन बसला होता. तो वेढा उठवून त्याला मिळाला.

"दोन महिन्यांत मुदगल जवळच्या दोन्ही फौजांमध्यें तीनदां लढाया झाल्या. पहिल्या खेपेस हिंदू फौजेची सरशी झाली. दोहीं कडील पुष्कळसे

लोक मारले गेले. मुसलमान लोकांची भारी हलाकी झाली. (अब्दुर्रझाकच्या ह्मणण्याशीं हें बरेंच जुळतें आहे.) दुसऱ्या व तिसऱ्या वेळीं सुलतानाला जय मिळाला. शेवटच्या लढाईंत खानजमान याची बरची लागून वडील राजपुत्र ठार झाला. तेव्हां हिंदू फौज घाबरून उधळली, व मुद्गलच्या किल्ल्याच्या आश्रयाला गेली. पाठलाग करीत गेलेले दोघे मुसलमान सरदार त्या फौजेबरोबरच गर्दींत किल्ल्यांत शिरले होते. त्यांना हिंदू लोकांनीं धरून घेतलें.

पुढें 'इतःपर आमच्या राज्याला उपसर्ग देणार नाहीं, असें कबूल कराल तर ठरलेली वार्षिक खंडणी देवूं व दोघां सरदारांनाही परत पाठवूं.' असें रायानें सुल्तानाकडे सांगून पाठविलें. तें मान्य होऊन तह ठरला. खंडणीची रक्कम व इतर नजर नजराणा यांच्यासह ते दोघे सरदार सुल्तानाकडे पोहोंचले. देवरायाच्या कारकिर्दींत अखेर हा तह कायम राहून उभयपक्षीं त्याप्रमाणें वर्तन रहात गेलें.

सुल्तानानें खंडणीची मागणी केली होती या गोष्टीला अब्दुर्रझाकच्या लिहिण्यावरून पुष्टी मिळते, आणि दानाइक फारसा पराक्रम न गाजवितां कसा व कां परत फिरला, याचाही कांहींसा उलगडा होतो. ही मोहीम लौकरच आटपली असें दिसतें. ती सं. ८४७ हिजरी सं. १४४३ चे मे महिन्यापासून पुढील एप्रिल पर्यंत सुरूं होऊन अब्दुर्रझाक डिसेंबर सं. १४४४ मध्यें विजयनगराहून निघाला, त्यापूर्वींच आटपली होती.

सं. १४४३ च्या अखेर पर्यंतच्या उपलब्ध हकीकतीचा येथवर विचार झाला. आतां या देवरायाच्या कारकिर्दीसंबंधें दुसरे कांहीं दाखले पाहावयाचे. तो सं. १४१९ मध्यें गादीवर बसला त्यावेळीं बहुतेक तरुणच होता. सं. १४४३ पर्यंत त्याच्या कारकिर्दीचीं २४ वर्षें होऊन गेलीं होतीं. अब्दुर्रझाकच्या कैफीयतीच्या भाषांतराच्या एका प्रतीमध्यें तो राजाला भेटल्याचें, व त्यावेळीं राजा अल्पवयीचसा असल्याचें लिहिलें आहे. यावरून अब्दुर्रझाक खराच इराणच्या राजाचा वकील आहे किंवा नाहीं याविषयीं संशय वाटल्यावरून राजा प्रत्यक्ष भेटण्याऐवजीं एखाद्या राजपुत्राचीच त्याची भेट झाली असेल, असें ही संभवतें.

या कारकिर्दींतले शिलालेख बरेचसे उपलब्ध आहेत. विश्वावसू संवत्सर, शके १३४८–सं. १४२६ सालचा एक लेख आहे. त्यांत या राजाच्या नांवानें जारी केलेलें एक अनुशासन दिलेलें आहे. पुढील पराभव नाम संवत्सर शके १३४९ च्या कार्तीक शुद्ध पौर्णिमेला–बुधवार तारीख १० आक्टोबर सं. १४२६ रोजीं-देवरायानें राजधानींत पानसुपारी बाजारांत

एक जैन मंदिर बांधविलें. त्यासंबंधी उल्लेख असलेला दुसरा शिलालेख आहे. हें मंदिर राजमहालांच्या आवारामध्येंच हत्तीच्या ठाणांमागें जवळच अद्यापि कायम आहे. या लेखामध्यें रायाला, महाराजाधिराज राज परमेश्वर, अशी पूर्ण सम्राट् पद द्योतक बीरुदें लावलेलीं आहेत. या लेखावरून या बाजाराच्या स्थळाचा निर्णय ठरतो. तो हजार रामस्वामीच्या मंदिरापासून थेट नैर्ऋत्य दिशेनें मैदानांतून, हल्लीं, आनीगुंदीसमोर तुंगभद्रा नदीकांठीं असलेल्या मुख्य वेशीकडे जाणाऱ्या राजरस्त्याला मिळणाऱ्या मार्गावर होता.

सं. १४३० सालीं रायानें दक्षिणेंत, तंजावर जिल्ह्याच्याही जणों दक्षिण सीमेवर, एक भूमिदान दिलें. तें कर्कटक शुक्ल ५, शके १३५३, साधारण नाम संवत्सरे या दिवशीं दिलें गेलें. त्यासंबंधीं शिलालेखांत दान देणाऱ्याचें नांव वरिप्रताप देवराय, महाराय, महामंडलेश्वर, चतुरुदधिपति, असें दिलेलें आहे. सं. १४३३–४४ सालांतील दोन शिलालेख, उत्तर अर्काट जिल्ह्यांत पदवेड येथें आहेत. त्यांच्या मध्यें ही त्याची बीरूदावली संपूर्ण दिलेली आहे.

देवराय कदाचित् सं. १४४४ च्या अखेरीस मृत्यु पावला असेल. पण याविषयींचा नक्की दाखला अद्यापि मिळालेला नाहीं. त्याच्या संबंधाच्या इतर शिलालेखांचा पुर्ता तपास होणें अवश्य आहे.

श्रवण बेलगोल येथें ताः २४ मे सं. १४४६ चा एक शिलालेख मयत प्रोफेसर कीलहार्न साहेब, यांनीं प्रसिद्ध केलेला आहे. त्याच्यांत, त्या दिवशीं प्रताप देवराय निधन पावल्याचें लिहिलें आहे. त्याची शब्द रचना बरीच चमत्कारिक आहे. ती अशीः—" क्षय या क्षयी संवत्सरांत, निभागी अशा द्वितीय वैशाख महिन्यांत, अमंगल अशा मंगलवारीं, अशुद्ध अशा असित पक्षामध्यें, चतुर्दशीला अतुल प्रतापनिधि प्रताप देवराय अस्तास गेला." याच्या मध्यें राजेलोकांना योग्य अशी बीरूदावली दिलेली नाहीं, यावरून हा देवराय कदाचित कोणी राजपुत्रही असेल. याच सालचा एक लेख तंजावर येथें आहे. त्याच्यांत 'चतुरुदधि पती' एवढेंच पद दिलें आहे. कांजीवरम–'कांचीपुरं' येथें, तारीख २ आगष्ट शनिवार सं. १४४९ चा एक लेख आहे. त्याच्यांत वीर प्रौढप्रताप देवराय यानें दिलेल्या एका भूमिदानाचा दाखला आहे. त्यांत त्याची पूरी बीरूदावली दिली आहे.

'नूनीज' यानें दुसऱ्या कृष्ण देवरायाच्या मागून गादीवर बसलेल्या राजाचें

त्याच्यावेळीं प्रचारांत असलेलें नांव दिलें असतें तर आज याबद्दल निर्णय करण्याला साधन होतें. मध्यंतरी सं. १४४४ पासून सं. १४४९ पर्यंत तिसरा देवराय नांवाचा राजा झाला असावा असें तूर्त तरी दिसतें आहे.' पण याबद्दल हल्लींच निर्णय करितां येत नाहीं.

दुसऱ्या देवरायाच्या महा अमात्यांपैकीं एकाचें नांव नागण्णा होतें, असें मिस्तर राइस साहेबांनीं ठरविलें आहे. त्यालाच धन्नायक-दानायक-अशींही पदवी होती. ह्मणजे तोच मुख्य सेनापती होता, असें दिसतें.

---

# भाग सातवा.

## दुसरा कृष्णदेवराय याच्या कारकिर्दींतील विजयनगर शहराची स्थिति (सं. १४२०-१४४३.)

'पाओलो निकोलो' यानें 'ब्रास्सिओलिनी याला लिहून पाठविलेलें वर्णन-राजधानी-महोत्सव समारम्भ-प्रचन्ड लोकवस्ती-अब्दुर्रझाक यानें केलेलें वर्णन-त्याचा प्रवास-शहराचा कोट-राजवाडा-महाल-टांकसाळ-बाजार-महानवमीचा समारम्भ.

विजयनगर राजधानीची या सुमाराला असलेली अवर्णनीय स्थिती व वैभव यांचें वर्णन देऊन नंतर पुढचा इतिहास दिलेला बरा. सं. १३७५ सालीं सुद्धां हें शहर इतकें कांहीं भरभराटींत होतें कीं, कलबुर्ग्याचा सुलतान मुजाहिद, याला त्याचें वर्णन ऐकून तें प्रत्यक्ष पहाण्याची इच्छा झाली होती, याविषयीं मागें उल्लेख आलाच आहे. पुढील पन्नास वर्षांमध्यें तर त्याची सर्व तऱ्हेनें वैभव वृद्धीच झाली होती. सं. १४२०-२१ च्या सुमारास 'निकोलो' नांवाचा एक इटालियन प्रवासी त्या शहरामध्यें आला होता. तेथें पोहोंचलेला असा हा बहुतेक पहिलाच युरोपियन प्रवासी होय. त्यानें लिहिलेलें वर्णन उपलब्ध आहे. दुसरा कृष्णदेवराय गादीवर बसल्यानंतर तो लवकरच तेथें आला असावा. स्वतः त्यानें कांहीं लिहिलें नाहीं. त्यानें तोंडी सांगितलेल्या हकीकतीवरून, त्या वेळच्या 'पोप' चा चिटणीस 'पोजिओ ब्रास्सिओलिनी,' यानें 'पोप' च्या माहिती साठीं लाटिन भाषेंत एक कैफियत लिहून काढिली. तिचें पोर्चुगीज भाषेंत भाषांतर झालें. त्याच्यावरून 'रामूसियो' यानें इटालियन भाषेंत भाषांतर केलें. मूळ लाटिन कैफियतीचा त्यानें तपास केला. पण ती त्याला मिळाली नाहीं. ही कैफियत सं. १७२३ मध्यें पारिस येथें प्रथम छापविली गेली.

'निकोलो' हिंदुस्थानांत आला तो प्रथम खंबायत येथें पोहोंचला. तेथें २० दिवस राहून तो दर्याकिनाऱ्यानें 'पकमुरिया-' बहुधां 'बारकूर-' येथें व तेथून 'हेल्ली' या स्थळीं गेला. यालाच पुढील वृत्त लेखकांनीं 'मौंट–डी–इल्ले' किंवा 'कावोडी इलाय' असें म्हटलें आहे. त्यानंतर तो खुष्कीनें रायाची राजधानी विजयनगर येथें पोहोंचला. त्यानें त्याचें नांव 'विजेनेगालिया' असें दिलें आहे. तो म्हणतो, "विजेनेगालिया' हें फार प्रचंड शहर आहे. तें मोठ्या व ऊंच पहाड्यांजवळ वसलेलें आहे. त्याचे कोट थेट पहाड्यांना नेऊन भिडविलेले आहेत. त्याचा घेर ६० मैलांचा आहे. पहाड्यांच्या पायथ्याचीं खोरीं व मधील सपाट जमीन, यांचा त्याच्यांतच समावेश होतो. यामुळें त्याचा विस्तार भारी वाढलेला आहे. येथें शस्त्रधारणसमर्थ असे लोकच ९०००० आहेत."

विजयनगराजवळ उंच असे पर्वत नाहींत. फक्त पुष्कळशा तुटक तुटक व खडबडीत पहाड्या व खडक आहेत. त्यांतील कांहीं बरेच उंच आहेत. त्याच्या भोंवतालच्या तटबंदीचा विस्तार कांहीं विलक्षण होता. हे कोट खोऱ्यांतून आडवे व दोन्ही बाजूला थेट पहाड्यांच्या टोंकांपर्यंत मिळविलेले होते. अगदीं बाहेरचा कोट मैदानातून कोसोंगणती सारखा बांधलेला होता. त्या पहाड्यांमधील खोरीं व सपाट आणि खोलगट प्रदेश, यांच्यामध्यें शहरांतील सुखवस्तु व गरीब गुरीबांची माळवदीं घरें व खोपटीं होतीं. त्यांच्यांतच मधून मधून सरदार व श्रीमान शेट सावकार लोकांचे वाडे व पक्कीं भवनें होतीं. नदीच्या पाण्याचे पाट आणलेले होते. त्यांच्या खालीं भात जमीन व बागबगीचे होते. त्याच्यांत साळी, ऊंस व फळफळावळ उत्पन्न होत असे. ठिकठिकाणीं निरनिराळ्या देवतांचीं लहान मोठीं साधीं तशींच भव्य, मंदिरें व गोपुरें होतीं.

याच्या आसपासच्या प्रदेशाच्या देखाव्यासंबंधानें, सं. १८४५ सालीं, लेफ्टे- नॅंट न्यूबोल्ड साहेबानें लिहिलेलें वर्णन वाचण्यासारखें आहे.

तो म्हणतो "तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर विजयनगर व उत्तर तीरावर त्याच्याच हद्दींतलें आनीगुंदी शहर, यांच्या नष्टप्राय इमारतींच्या अवशेषांनीं व्याप्त, अशा विस्तीर्ण प्रांतभागामध्यें 'ग्रानाइट' व 'नीस' म्हणजे सफेत, लाल व भूऱ्या रंगाच्या कुरुंदाच्या दगडाचे अजस्त्र टोळ, गुंड, शिलातळ व कडपे, यांच्या जशा प्रचंड दीपमाळा, उतरंडी, व राशी, लागून गेलेल्या आहेत. मध्यें मध्यें खडकाळ खोरी, वळचणी व दऱ्या आहेत. त्यांच्यांतही हे टोळ व

कडपे विखरलेले आहेत. कांहीं मोठीं पसरट व सपाट खोरीं आहेत. त्यांच्या मध्यें नदीच्या पाण्याचे पाट आणलेले आहेत. त्यांच्या पाण्यावर उत्तम शेती व बागाईत होते. विजयनगर व आनीगुंदी यांच्या भोंवतालीं पर्वत शिखरें, उच्च प्रदेश, कडे, कडपे, दीपमाळी, उतरंडी, व टोळ, यांच्या मुळें क्षितिज विलक्षण व रमणीय तऱ्हेनें छिन्न विच्छिन्न झालेलें दिसतें. त्यांच्यांत, तसेंच या सर्व दक्षिण देशाच्या प्राचीन व विनष्ट राजधानींतील पुराण्या इमारतींच्या कृत्रिम नष्टप्राय अवशिष्ट भागांमध्यें, सहज पाहणाऱ्याला क्वचितच भेद वाटतो. प्राचीन कोटांचे प्रचंड अवशिष्ट भाग तरी त्या टोळ व कडपे यांच्या मधूनच मोठ मोठे तुकडे तोडून बांधलेले, भारीच ओबड धोबड, खडबडीत व राक्षसी कामा सारखे वाटतात. ते जवळच्या पहाड्यांच्या आणि कडप्यांच्या बनलेल्या दीपमाळा, व दिवाली, यांना नेऊन भिडविलेले, जणों त्या नैसर्गिक प्रकाराचा भागच, वाटतात.''

राजवाडे, महाल, मंदिरें, तट, कोट, महाद्वारें, इत्यादिकांचे अवशिष्ट पडके तुटके भाग, अद्यापिही कायम आहेत. ते विजयनगर आणि तुंगभद्रेच्या उत्तर तीरावर, आणि या साम्राज्याची जन्मभूमिभूत अशा आनीगुंदीच्या भव्य दुर्गाच्या आसपासही दूरवर पसरलेले आहेत. या जोड शहरांचा विस्तार व तेथील लोकवस्ती कितीतरी प्रचंड होती. हल्लींच्या होसपेट गांवाच्या पलीकडे दक्षिणेकडील अगदीं बाहेरच्या कोटापासून, तों आनीगुंदीच्या उत्तरेस सर्वांत पलीकडच्या तटबंदीपर्यंत, सुमारें १२ मैल लांब तसेंच, पश्चिमेस बाहेरच्या शहराच्या कोटापासून पूर्वेस दरोजी व कंपली या गांवांजवळील पहाड्यापर्यंत सुमारें १० मैल रुंद, ह्मणजे सुमारें १२० चौरस मैल विस्तीर्ण क्षेत्रांत, हे सारे अवशिष्ट भाग पसरलेले आहेत. त्यावेळचीं सारीं कच्चीं घरें व खोपटें पार मातीशीं होऊन त्यांच्या मालमसाल्याचे, या भागामध्यें थरावर थर पडले आहेत. तरी पण पूर्वीचे ते पाट कायम असून अद्यापि चांगलें काम देताहेत. त्यांच्या खालच्या जमीनींत उत्तम शेती व घनदाट, भव्य आणि रमणीय वृक्ष व वल्ली यांची गर्दी आहे. जवळपासच्या पहाड्या, कडे व उंच खडक, यांच्या शिरोभागीं इमारती, मंदिरें, कोट, यांचे अवशिष्ट भाग दृष्टीस पडतात. क्वचित स्थळीं एखादा सुळका, पुढें आलेला कडा, प्रचंड टोळ, आणि उंच शिखरांवरशीं बांधलेलीं चिमुकलीं मंदिरें व घुमट्या दिसून येतात. हीं मंदिरें व घुमट्या बांधलेल्या जागीं माकडें किंवा पक्षी यांच्या वांचून इतरांचा प्रवेश सुद्धां होणें कठिण वाटतें.

मधील भव्य पटांगणामध्यें राजवाड्यालगत व सभोंवार मोठमोठ्या इमारतींचे अवशेष पडले आहेत. त्या इमारती मूळच्या भारीच भव्य, सुरेख व प्रचंड असाव्यात. सं. १५६५ सालीं मुसलमान लोकांनीं त्या सर्वांचा असा कांहीं सैतानी त्वेषानें विध्वंस केला कीं, त्यांच्यापैकीं तशाच मोठ्या व पक्क्या इमारतींचेच कायते तळचे चूर्ण होत असलेले भाग अवशेष राहिले आहेत. खुद्द राजवाडा असलेल्या प्रशस्त आवारांत सुद्धां हल्लीं फुटक्या तुटक्या शिलांचे अवशेष, पडकें मोडकें बांधकाम, आणि खोदीव काम केलेले लहान मोठे छिन्न भिन्न दगड, यांचे ढीगचे ढीग पडलेले आहेत. पूर्ववत् एकावर एक कायम असा एकही दगड राहिलेला नाहीं.

'निकोलोनें' असेंही वर्णन केलें आहे कीं, ' इकडील लोक हव्या तितक्या बायका करितात. त्या बायकांना त्यांच्या प्रेताबरोबर जाळून घ्यावें लागतें. येथील राजा हिंदुस्थानांतील साऱ्या राजांमध्यें प्रबल व श्रेष्ठ आहे. त्याला १२,००० बायका आहेत. त्यांतून ४००० नेहमीं त्याच्या बरोबर सेवाचाकरींत हजर असतात. त्या पायींच फिरतात व मुख्यतः पाकशाळेमध्यें काम देतात. त्यांच्याहून कांहींसा जास्त थाटाचा पोषाख केलेल्या तितक्याच बायका घोड्यावर फिरतात. बाकीच्या मेणे व पालख्या यांच्यांतून मिरवतात. सुमारें २०००–३००० बायका त्याच्या खास राण्या ह्मणून निवडलेल्या असतात. त्यांना राजाच्या मागून सती जाणें कबूल करावें लागतें. तो एक बहुमान समजला जातो.'

" वर्षांतून एकवार ठरलेल्या प्रसंगीं त्यांच्या देवाच्या मूर्ती शहरांत थाटानें मिरवितात. त्या मूर्ती दोन डोलाऱ्यामध्यें किंवा रथांमध्यें बसविलेल्या असतात. त्यांच्या बरोबर उत्तम सजलेल्या पुष्कळशा स्त्रिया, नाचत, गात, भजन करीत, जात असतात. या मिरवणुकीबरोबर भारी गर्दी राहते. "

" यांतील कांहीं लोक धर्माच्या उत्साहाच्या व प्रेमाच्या भरांत, त्या रथांच्या चाकांखालीं घालून घेतात व तेथेंच चिरडून मरतात. अशा तऱ्हेनें आत्मार्पण केलेलें त्या देवतांना फार आवडतें, अशी त्यांची समजूत आहे. दुसरे कांहीं लोक आपल्या अंगांत एक आंकडा टोंचून घेतात आणि त्याला दोरी बांधून स्वतःला त्या रथाला एखाद्या अलंकाराप्रमाणें अडकवून घेतात व त्या मूर्तीबरोबर बहुतेक अर्धमेले होत्साते, मिरवित जातात. असला हा देहदंड मोठा पुण्यप्रद आहे व तो देवाला फार प्रिय आहे असें मानतात."

" येथें वर्षांतून तीन वेळ विशेष महोत्सव व समारंभ होतात. एका

महोत्सवामध्यें आबाल वृद्ध स्त्री पुरुष नदीवर किंवा समुद्रावर मंगल स्नान करितात, उत्तम वस्त्रालंकार धारण करितात, आणि तीन दिवस सारखें भजन पूजन, नृत्य गायन, व आनंद महोत्सव करितात. दुसऱ्या उत्सवाच्या वेळीं सारीं मंदिरें, देवालयें, गोपुरें, यांच्यांत आंत, बाहेर, शिखरांवर, चोहींकडे, तिळाच्या तेलाचे असंख्य दिवे रात्र दिवस लावून दीपोत्साह करितात. तिसरा उत्साह नऊ दिवस चालतो. त्या दिवसांत साऱ्या राजमार्गांवर, मोठमोठ्या व उंच उंच गुड्या व तोरणें उभारतात. त्यांना सुरेख, मौल्यवान व भरगच्ची कापडाच्या रंगीबेरंगी पताका लावतात. तोरणांवर दर रोज एक धर्म कर्म निष्ठ, ईश्वर भक्ति परायण, शांत व थोर, अशा विद्वानाला बसवितात. तेथें तो परमेश्वराचें ध्यान व पूजन करीत राहतो. त्याच्यावर लोक लिंबें, व नारिंगें, वगैरे मधुर फळें व सुवासिक फुलें यांचा वर्षाव करितात. तो त्याला शांतपणें सोसावा लागतो. आणखी ही तीन उत्सव दिवस आहेत. त्या दिवसांत हे लोक रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांवर-खुद्द राजा राणीवर देखील,-केशरी रंगाच्या पिचकाऱ्या मारितात. या रंगाचे हंडेच्या हंडे रस्त्यांवर भरून ठेवलेले असतात. त्या रंगाचा सर्व लोक हंसत खेळत व आनंदानें स्वीकार करितात."

यांतील पहिला उत्सव कर्नाटकी वर्ष प्रतीपदेचा असावा. त्याचा उल्लेख 'पायेस' याच्या कैफियतीमध्येंही आलेला आहे. तो विजयनगरास असल्या वेळीं हा उत्सव त्या सालाच्या आक्टोबर महिन्याच्या १२ व्या तारखेला पडला होता. दुसरा उत्सव दीपवाळींचा. त्या दिवसांत सर्वत्र घरोघर व मंदिरांवर ही दीपोत्सव होत असे. तिसरा उत्सव त्या वेळचा सुप्रसिद्ध महानवमीचा. तो नऊ दिवस चाले. त्याचेंही वर्णन 'पायेस' च्या कैफीयतीमध्यें तपशीलवार दिलेलें आहे. तो उत्सव त्याच्यावेळीं सप्टेंबरच्या १२ व्या तारखेला सुरूं झाला होता. तीन दिवसांच्या उत्सवाचा उल्लेख आहे तो होळीचा.

पुढें 'निकोलो कांटी' यानें हिऱ्यांच्या खाणींविषयीं बहुतेक अरेबियन नाइट्स मधील सिंधबाद दर्यावर्दी याच्या कहाणीच्या धर्तीवर-दंतकथा दिल्या आहेत. त्या खाणी विजयनगराच्या उत्तरेस, १५ दिवसांच्या वाटेवर, होत्या, असें तो लिहितो. ही दिशा ईशान्य हवी. या खाणी, सरकारी आर्डनान्स नकाशामध्यें कृष्णा किनाऱ्यावर बेजवाड्याच्या अलीकडे सुमारें ६०–७० मैलांवर दाखविलेल्या आहेत, त्याच असाव्या. 'मार्कोपोलो' यानें आपली हिंदुस्थानांतील प्रवासाची कैफियत सं. १२९६ मध्यें लिहिली. तिच्यांतही त्यांचा उल्लेख आहे.

"ते लोक वर्षांचे विभाग १२ करून त्यांना राशी वरून नांवें देतात. त्यांच्या मध्यें संवत्सराची गणना ही निराळ्या तऱ्हेनें होते."

त्यानें निरनिराळया चलनी नाण्यांचेंही वर्णन केलें आहे. पण तीं नाणीं कोठेंकोठें चालू होतीं त्याचा खुलासा केलेला नाहीं. "मध्यहिंदुस्थानांतील लोक लढायांमध्यें 'बालिस्टि' किंवा उल्हाट यंत्रें, यांचा उपयोग करितात. तसेंच आपल्याकडे 'बांबार्डास' नांवाचें यंत्र आहे, त्याचाही ते उपयोग करितात. तसेंच तटबंदीदार शहराला वेढा घालून तें पाडाव करण्याच्या कामीं इतर यंत्रेंही उपयोगांत आणितात. (विजयनगरच्या आसमंतात भागीं जुने किल्ले व दुर्ग यांच्या जवळ पास कुरुंदाचे लहान मोठे गोल गुंड पडलेले आढळतात, त्यांना तोफांचे गोळे ह्मणतात. पण ते खरोखर या उल्हाटयंत्रांतून फेंकण्याचे गोळे असावेत. ते तोफांतून मारतांना फुटून चूर होतात, व त्यांच्या मुळें तोफा तेव्हांच खराब होतात.) आह्मा लोकांना ते 'फ्रांङ्गस'-किंवा फिरंगी ह्मणतात. 'आह्मी इतर राष्ट्रांतील लोकांना आंधळे ह्मणतों, आमचे दोन्ही डोळे साबूत आहेत, व तुमचा एकच डोळा कायम आहे, असें ते बोलतात. ते आपणाला इतर सर्व राष्ट्रांतील लोकांपेक्षां चाणक्ष व हुषार समजतात. (याच सुमाराला सं. १४३६ सालीं 'बारबारो' नांवाचा एक युरोपियन प्रवासी तार्तरी देशांत गेला होता. त्यानें आपलें प्रवासवृत्त लिहून ठेविलें आहे. त्यांत तो ह्मणतो, 'कोटि-ओनें' मला ह्मटलें, त्या राजदरबारांतील मुख्याला-फ्रांची-लोक कोण व कसे आहेत, तें चांगलें अवगत आहे. आह्मा 'काटेनी' लोकांना दोन डोळे आहेत. तुह्मां 'फ्रांन्ची' लोकांना एकच डोळा आहे, आणि त्याच्याकडे आलेल्या व जवळ बसलेल्या तार्तार लोकां-कडे वळून त्यानें ह्मटलें, 'तुह्माला तर डोळेच नाहींत—तुह्मी आंधळे.' या दोन्ही वर्णनांमध्यें दिसून येणारी साम्यता चमत्कारिक वाटते.)

"खंबायतचे लोक कागद उपयोगांत आणतात. बाकीचे सारे हिंदूलोक ताडांच्या पानांवर लिहितात. त्यांच्यामध्यें गुलाम पुष्कळच आहेत. ऋण फेडण्याला असमर्थ अशा ऋणकोवर धनकोची सत्ता होते. इकडे निरनिराळीं राज्यें पुष्कळच आहेत. लोक संख्याही भारी मोठी आहे. तिच्यावर कोणाचा विश्वास सुद्धां पटणार नाहीं. त्यांची फौज दहा लक्षां वर आहे."

अब्दुर्रझाक हा विजयनगराला गेला होता, तो दुसऱ्या देवरायाच्याच वेळीं. पण 'कांटी' च्या मागून सुमारें २० वर्षांनीं. तो ईराणच्या राजाचा वकील ह्मणून इकडे येण्याला ताः १३ जानेवारी सं. १४४२ रोजीं निघाला, आणि नव्हेंबरच्या सुरुवातीला कालीकट येथें पोहोंचला. पुढील एप्रिल महिन्यापर्यंत तो तेथेंच असतांना याला विजयनगराहून निमंत्रण आलें. तसा तो तिकडे जाण्याला

निघाला. तो तेथें तारीख ५ डिसेंबर सं. १४४३ पर्यंत राहिला. तो कालीकटाहून निघाला त्याविषयीं तो लिहितो :—

" एक गृहस्थ अवचित मजकडे आला. त्याच्याकडून मला कळलें कीं, अफाट राज्यविस्तार आणि दूरव रव भारी अंमल व दरारा असलेल्या अशा विजयनगराच्या रायानें त्या गृहस्थाला सामुराय-कालीकटच्या झामोरिन-कडे--वकील म्हणून पत्र देऊन पाठविलें असून, त्या पत्रामध्यें शहानशहा खुदावंद खाखान--ईराणचा, राजा-याच्या कडून आलेल्या वकीलाला-मला-आपल्याकडे रवाना करण्या विषयींही लिहिलें आहे. सामुराय विजयनगरच्या रायांचा प्रत्यक्ष ताबेदार आहे, असें नाहीं. तरी त्याला त्याचा फारच वचक आहे. तो त्याचा भारी मान ठेवितो. त्या वकीलाचें सांगणें खरें असलें तर, या विजयनगराच्या रायाच्या राज्यांत कालीकटासारखीं ३०० बंदरें आहेत. खुष्कीच्या मार्गानें त्याच्या राज्याचा विस्तार तीन महिन्याच्या मार्गाइतका आहे.

या निमंत्रणाप्रमाणें 'अब्दुर्रझाक' तेथून मंगळूर येथें जहाजांतून गेला. "तें बंदर विजयनगरच्या राज्याच्या सरहद्दीवर आहे." तेथें २-३ दिवस राहून तो पुढें निघाला. वाटेंत पुष्कळशीं शहरें व गांव लागले. त्यांपैकीं एका गांवामध्यें एक लहानसेंच पण फारच सुरेख पंचरसी-पितळेचें-देवालय त्याच्या पहाण्यांत आलें.

" पुढें मी एका उंच पर्वताजवळ पोहोंचलों. त्याचें शिखर जणों गगनाला भेदून राहिलें होतें. हे पहाडी व जंगली भाग सोडून मी बेलूर-बहुधा बेदनूर-गांवीं आलों. तेथील घरें राजमहालांसारखीं होतीं. "

तेथें एक फारच सुरेख कोरीव काम कलेलें मंदिर त्याच्या पाहण्यांत आलें.

" जिल्काद महिन्याच्या अखेरीला-सं. १४४३ च्या एप्रिल महिन्यांत-आह्मी विजयनगरांत पोहोंचलों. रायानें आमच्या पेशवाईला पुष्कळसा लवाजमा पाठविला होता. आह्माला राहण्याला एक सुरेख व प्रशस्त वाडा दाखवून दिला गेला. या रायाचें राज्य सुवर्णद्वीपापासून तों कलबुर्ग्याच्या हद्दीपर्यंत.-कन्याकुमारीपासून कृष्णाकिनाऱ्यापर्यंत-पसरलेलें आहे. या शहरामध्यें सैतानासारखे हजारों पर्वतप्राय हत्ती पाहण्यांत येतात. या राज्यामध्यें ११ लक्ष फौज आहे. येथील राजाला राय ह्मणतात. त्याच्या इतका स्वतंत्र, अनियंत्रित व प्रबल राजा साऱ्या हिंदुस्थानामध्यें क्वचितच आढळतो.

"विजयनगर शहराइतकें रमणीय व प्रेक्षणीय शहर साऱ्या दुनियेंत

कोणाच्याही प्राह्मयांत क्वचितच येत असेल. असें दुसरें शहर आजवर कधीं होतें किंवा आहे, ही गोष्ट कोणी क्वचितच ऐकिली असेल. त्याची रचना कांहीं विलक्षण आहे. त्याच्या सभोंवार एका बाहेर एक सात कोट आहेत. पहिल्या कोटा बाहेर पुरुषभर उंच आणि अर्धे जमीनींत गढलेले दगड, जवळ जवळ, पण स्वार व शिपाई यांना सहज वलांडून जातां न येण्यासारखे उभे केलेले आहेत." ( या दगडांचा उल्लेख 'पायेस' च्या कैफीयतीमध्येंही आहे. )

हे सात कोट पुढें लिहिलेल्या प्रमाणें असावेत. पश्चिम व दक्षिणेकडून येतांना अगदीं आरंभी, होसपेठेच्या पलीकडे, पहाडांमध्यें खिंडशी आहे. तेथें बांधलेला कोट व मुख्य दरवाजा लागतो. त्याचा उल्लेख 'पायेस' नेंही केला आहे. तेथून होसपेठेजवळ दुसरा कोट, तिसरा होसपेठेच्या पलीकडे. उत्तरेस अब्दुर्रझाकच्या वेळीं होसपेठेमध्यें विशेष वस्ती नव्हती. पुढें राजधानीच्या मार्गावर दुतर्फा दुकानें आणि आजूबाजूला घरें व वस्ती अधिकाअधिक होती. चौथा कोट व वेस हल्लींच्या 'मल्लाप्पनगुडी' खेड्याच्या अलीकडे होती. ही वेस चांगली मजबूत होती. ती व जुन्या दगडी इमारतींचे अवशेष आणि एक चिरेबंदी बावडी अद्यापि कायम आहेत. ही बावडी पूर्वीं कोणा सरदारानें आपल्या बागेंत हौसेनें बांधविलेली असावी. पांचवा कोट या खेड्याच्या उत्तरेस आहे. त्यांतील मुख्य दरवाजा साबूत आहे. कोट पुष्कळसा पडला आहे. सहावा कोट कामलापुराच्या तलावाच्या दक्षिणेस, जवळच लागून आहे. सातवा अगदीं आंतील कोट–अंतर्कोट–त्या गांवाच्या उत्तरेस अद्यापि भला भक्कम व मजबूत कायम आहे. तो राजवाडे व सरकारी इमारती यांच्या भोंवतीं बांधलेला आहे. त्याच्या आंत उत्तर दक्षिण सुमारें एक मैल व पूर्व पश्चिम सुमारें सव्वा दोन मैल मैदान आहे. "हा अर किल्ल्याचा कोट बहुतेक गोल असून एका उंचवट्यावर आहे. तो दगड व चुन्याचा बांधलेला आहे. त्याचे दरवाजे भारी भक्कम व मजबूत आहेत. त्यास्थळीं पहारा देणारे सारखे जागरूक असतात. ते प्रत्येक गोष्टीची फार बारकाईनें झडती व तपासणी करितात." असें अब्दुर्रझाकनें लिहिलें आहे. हें वर्णन अगदीं बाहेरच्या कोटाला व त्यांतील मुख्य वेशीलाच लागू होतें. कारण तेथेंच झडती व तपासणी होऊन जकात घेतली जात असे.

"सातवा किल्ला उत्तरेकडे आहे. तोच राजाचा राजवाडा. अगदीं बाहेरील कोटाच्या उत्तर व दक्षिणेकडील महाद्वारांमध्यें सुमारें सात मैल अंतर आहे. पूर्व पश्चिम अंतरही बहुतेक तितकेंच आहे. ( याच्यांत आनीगुंदीच्या उत्तरेकडील कोटापर्यंतचें अंतर धरलेलें नाहीं. तें आणखी २-२॥ मैल आहे. )

"अगदीं बाहेरील पहिला, दुसरा व तिसरा, या कोटांच्या मध्यें भाग आहे- बगीचे, शेतें, वाड्या घरें व वस्ती वगैरे आहे. आंतली वस्ती फारच दाट आहे. तेथें किती तरी दुकानें, घरें व बाजार, लागलेले आहेत. हा भाग सारखा गजबजलेला असतो. राजवाड्याजवळ समोरासमोर चार बाजार आहेत. उत्तर बाजूला राजवाड्याची मुख्य देवडी आहे. प्रत्येक बाजारामध्यें एकेक भव्य दिवाणखाना असून त्याच्यापुढें सुरेख व प्रशस्त आगाशा बांधलेल्या आहेत. राजाचा मुख्य दरबाराचा दिवाणखाना सर्वांत उंच आहे. हे बाजार खूप लांब रुंद आहेत." (हें वर्णन मोघमसें आहे. राजवाड्याच्या महाद्वारापासून आनीगुंदीच्या वाटेवर नदी किनाऱ्यावरील मुख्य दरवाज्यापर्यंत मोठा व प्रशस्त राजमार्ग होता. त्याच्यांत राजवाड्याकडील टोंकाला पानसुपारी बाजार होता. कामलापुराकडील दरवाजापासून उत्तरेकडे थेट हंपीविरूपाक्षाच्या प्रचंड मंदिराला जाणारा राजरस्ता, पानसुपारीबाजाराला राजवाड्याजवळच आडवा मिळत होता. तेथें मोठा विस्तीर्ण चौक व चौपट बाजार झाला होता. मुख्य राजमार्गावर असे चौक बरेच झालेले असावेत. या बाजारांमधील ओसाऱ्या व आगाशा पार पडल्या आहेत. हल्लीं विरूपाक्षाच्या मंदिराच्या महाद्वारासमोर, सुमारें अर्धा मैल लांब व प्रशस्त रस्ता आहे. त्याच्या दोन्ही बाजूला कांहीं ओसाऱ्या व आगाशा आहेत, त्या पडत चालल्या आहेत. तरी, त्यांच्यावरून पूर्वीं मुख्य राजमार्गावरील अशा इमारतींचें कांहींसें अनुमान होतें.)

"इकडे चोहींकडे गुलाबाचीं फुलें विकावयाला ठेवलेलीं असतात. त्या फुलांवांचून या लोकांचें क्षणभर चालत नाहीं. तीं त्यांना अन्नाइतकीं किंबहुना अधिकच अवश्य वाटतात. निरनिराळ्या वर्गांतील व पेशांतील लोकांचीं दुकानें जवळ जवळ असतात. जव्हेरी लोक मोकळेपणीं, खुल्या बाजारांत, मोती माणकें, पाच, हिरे वगैरे, जवाहिर विक्रीला ठेवून बसतात. या सुंदर व रमणीय स्थळामध्यें आणि राजवाड्याच्या आवारांतही जागजागीं साफ व घोटीव चिरेबंदी पाट बांधून, त्यांमधून सुरेखसें पाणी पुष्कळच खेळविलें आहे." (जनानी स्नानगृहाच्या जवळपास याचे अवशेष आणि एक लांबचलांब चिरेबंदी हौद व त्याच्या दोन्ही बाजूंवर पाण्याचे हंडे ठेविण्यासाठीं केलेल्या गोल व खोलगटशा जागा हल्लींही कायम आहेत.)

"राजवाड्याच्या देवडीच्या डाव्या बाजूला फारच मोठा, उंच व भव्य असा मुख्य दिवाणखाना आहे. तो स्वतंत्र महाला सारखा दिसतो. त्याच्या पुढें ३० गज लांब, १० गज रुंद व पुरुष भराहून उंच, असें एक बैठंदलान आहे. त्याच्यांत दप्तरखाना व कारकून लोक बसण्याची जागा आहे. त्याच्या मध्यभागीं उंचसा चबुत्रा आहे. त्याच्यावर या सर्व आमल्याचा मुख्य अधिकारी–दानायक–नांवाचा

खोजा बसतो. तिकडेच चोबदार लोक हारीनें उभे असतात. दिवाण किंवा दानायक लोकांच्या फिर्यादी व अर्ज घेऊन त्यांचा निकाल करितो. त्याचा निकालच अखेरचा असतो. सर्व काम संपल्यावर तो सात दरवाजे वलांडून राजाकडे जातो व त्याला रोजच्या कामाची हकीकत कळवितो.

" राजवाड्याच्या मागच्या बाजूला दानाइकाचा महाल व दिवाणखाना आहे. त्याच्या डावीकडे टांकसाळ आहे.

" या राज्यांतील लोकसंख्या असंख्य आहे. तिच्या संबंधें तपशीलवार माहिती द्यावयाची झाली तर विशेष विस्तार होईल. राजाच्या खासमहाला-मध्यें पुष्कळशा हौदवजा चिरेबंदी कोठड्या आहेत. त्या साऱ्या सोन्या चांदीनें गच्च भरलेल्या आहेत.

" दिवाणखान्यासमोरच हत्तीशाळा आहे. प्रत्येक हत्तीसाठीं वेगळें वेगळें ठाण आहे. त्याच्या भिंती खूब जाड व भक्कम आहेत. वरील माडी मजबूत लांकडी तुळयांवर केलेली आहे. टांकसाळीसमोर मुख्य किल्लेदाराचा वाडा आहे. तेथें बारा हजार प्यादे नेहमीं हजर असतात. टांकसाळीमागें एक बाजार आहे, त्याची लांबी ३०० गजांवर व रुंदी २० गज आहे. त्याच्या दोन्ही बाजूंला वाडे व चौक आहेत. त्याच्या पुढें बसण्यासाठीं साध्या बैठकी व खुरच्या वगैरेंच्या ऐवजीं पुष्कळशीं, खोदींव दगडी, उंच व सुरेख सुखासनें केलेलीं आहेत. या राजमार्गाच्या दोन्हीकडे सिंह, वाघ, चित्ते, वगैरेंचीं कोरीव दगडी चित्रें ठेवलेलीं आहेत. पुढील चबुत्रे, गच्च्या, व आगाशा, यांच्या वरही सुंदरशीं सुखासनें व बैठकी आहेत त्यांच्यावर सुस्वरूप वेश्या नटून व वस्त्रालंकार घालून बसतात."

अब्दुर्रझाक याला राहण्याला एक सुरेखसा वाडा दाखवून दिला गेला होता. तेथें तो ता. १ मे सं. १४४३ रोजीं जाऊन राहिला.

" एके दिवशीं राजवाड्यांतून कांहीं जासूद मजकडे आले. संध्याकाळीं मी दरबारांत गेलों. राजा एका मोठ्या व प्रशस्त दिवाणखान्यामध्यें संपूर्ण राजवैभवा सहित बसला होता. त्याच्या दुतर्फा दरबारी लोक बसलेले होते. राजाच्या अंगांत हिरव्या साटिणीचा पायघोळ झगा आणि गळयामध्यें सुरेख व पाणीदार मोतीं व इतर रत्नें लावलेला गळपट्टा होता. तो काळसांवळया वर्णाचा आहे. त्याची शरीरकांठी सडपातळ व उंचशी आहे. त्याला थोड्याशा मिशा होत्या. दाढी उगवलेली नव्हती. त्याचा चेहरा फारच मनोहर दिसत होता. ( तो फारच तरूण होता, असेंही एका प्रतींत लिहिलें आहे. असें असलें तर या वकीलाची

भेट झाली ती खुद्द देवरायाची नसावी. कारण त्याला गादीवर येऊन या वेळीं २४ वर्षें झालीं होतीं. )

" या राजाच्या राण्या व रखेल्या मिळून ७०० स्त्रिया आहेत, अशी लोकवार्ता आहे."

अब्दुर्रझाक तेथें असतांना एक मोठा उत्सव समारंभ त्याच्या पाहण्यांत आला. त्याचें त्यानें मोठ्या उत्साहानें, गौरवानें, आणि मार्मिक वर्णन केलें आहे. तो उत्सव-महा नवमीचा-रजब महिन्यांत झाला, असें तो म्हणतो. हा उत्सव आश्विन शुद्ध प्रतीपदेपासून नवमी पर्यंत ९ दिवस होत असे. वर्षारंभ कार्तीक शुद्ध प्रतीपदेपासून होत असे. त्या सालीं रजब महिन्याची चांदरात, कार्तिक शुद्ध प्रतीपदेला पडली होती. हा उत्सव महा नवमीचाच असला तर, रजब हें नांव हस्त दोषानें पडलें असावें, असें म्हटलें पाहिजे. शिवाय तो तीन दिवसाचा उत्सव होता असें ही म्हणतो, यावरून ही वरील म्हणण्याला बाधसा येतो. त्यानें पाहिलेला उत्सव कार्तिकांतला दीपोत्सवाचा असेल. तो तीन दिवसाचा असे.

कसेंही असो. त्यानें एक फारच थाटाचा व प्रेक्षणीय महोत्सव प्रत्यक्ष पाहून त्याचें सुरस वर्णन केलें आहे. तें असें:-

" रायानें आज्ञा केल्याप्रमाणें सारे मांडलीक सरदार, सेनाध्यक्ष व प्रमुख लोक येऊन राजवाड्यांत दरबारांत हाजर झाले. त्यांच्या बरोबर २००० हत्ती आले होते. त्या हत्तींच्या अंगावर चकचकित व सुरेख चिलखतें असून, त्यांच्या पाठींवर फारच शोभिवंत अंबारी व हौदे होते. ते एका मोठ्या प्रशस्त, भव्य, व उत्तम शृंगारलेल्या मैदानांमध्यें उभे राहत असत. तीन दिवसपर्यंत तें अवाढव्य मैदान जणों खवळलेल्या सागराप्रमाणें, किंवा शेवटच्या न्यायाच्या दिवशीं परमेश्वरासमोर इन्साफ होण्यासाठीं सर्व प्राणिमात्र हजर व्हावयाचे, त्या वेळच्या देखाव्या प्रमाणें, भासत होतें. या अवाढव्य व सुशोभित पटांगणामध्यें सुंदर व भव्य मजलेदार मंडप उभारलेले होते. त्यांच्या बाहेरून वरपर्यंत सुंदर चित्रें बसविलेलीं होतीं. कांहीं फिरते मंडप होते. त्यांची वाटेल ती बाजू एकदम प्रेक्षकासमोर आणीत. त्यामुळें प्रतिक्षणीं नवीन नवीन दर्शनें व देखावे दृष्टीस पडत असत.

" या जागेसमोर एक नऊ मंडपाचा राजवाडा तयार केलेला होता. त्यांतील नवव्या मंडपामध्यें राजाचें सिंहासन ठेविलेलें होतें. या गरीब लेखकाला-मला-सातव्या मंडपांत जागा दिली गेली होती. मंडप आणि राजवाडा यांच्या

मधील मोकळ्या जागेंत नटनर्तक, भांड, कत्थक, व चित्रकथी वगैरे लोकांच्या तमाशांच्या जागा होत्या. ''

राजाच्या समोरच एका सुरेखशा पडद्याआड अप्रतिम वस्त्राभरणें घातलेल्या रूपवती स्त्रिया नृत्य गायन करीत होत्या. डोंबारी, जादूगर, व कोल्हाटी यांचे नाना प्रकारचे उत्तमोत्तम खेळ चाललेले होते. कांहीं जणांजवळ विलक्षण तऱ्हेनें शिकवून तयार केलेले हत्ती होते. ( हें अलीकडील सर्कसचें पूर्वरूप दिसतें. )

हा बादशाही महोत्सव अपूर्व थाटानें सारखा तीन दिवस सूर्यास्तापर्यंत चालत होता. रात्रींही सर्व तऱ्हेचे करमणुकीचे खेळ व दारूकाम सुरू असे. तिसऱ्या दिवशीं अब्दुर्रझाकची राजाची भेट झाली. '' राजाचें सिंहासन फारच मोठें व प्रशस्त आणि सारें सुवर्णाचें व रत्नजडित असून तें कल्पनेच्या ही बाहेर मौल्यवान होतें. त्याच्या पुढच्या अंगाला एक चौकोनी गादी घातलेली होती. तिच्यावर एका बाजूला मोत्यांचे तीन सर गुंफलेले होते. या उत्सवाच्या तीनही दिवस राजा या गादीवर बसत असे. हा महानवमीचा उत्सव आटपल्यावर संध्याकाळच्या निमाजाच्या सुमाराला मला एका चौकांत बोलावून नेलें. त्या चौकाच्या चारी बाजूंला चार दहागज समचौरस मंडप होते. ते मंडप व तो चौक यांच्या बाजूंवर व छतांवर सुमारें तरवारीच्या पात्या इतका जाड सोन्याचा पत्रा सोन्याच्याच खिळ्यांनीं ठोकून, त्याच्यावर जडावाचें काम केलेलें होतें. त्या चौकांत समोरच राजाचें सिंहासन मांडलेलें होतें. ''

पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांत या प्रचंड राजधानीचें ऐश्वर्य व वैभव कोणत्या कोटीला पोहोंचलेलें होतें, याची कैफियतीवरून साधारण चांगलीच माहिती होते. ती लक्ष्यांत बागवून पुढील इतिहास भाग पाहिला पाहिजे.

---

# भाग आठवा.

## पहिल्या राजघराण्याचा शेवट (सं. १४४९-९०).

मल्लिकार्जुन व पहिला विरूपाक्ष-दक्षिण देशच्या बाहामनी बादशाहतीचीं पांच निरनिराळीं राज्यें होतात-विजापूरचा राजा गावें व बेळगांव घेतो-तेलंगणामध्यें, व राजमहेंद्री, व कोंडापल्ली, वगैरे ठिकाणीं लढाया-महमूद गवान याचा मृत्यू-रशियन प्रवासी 'निटिकिन'-विजयनगरांतील बेबंदशाही-नरसिंहराय राज्य बळकावितो.

दुसऱ्या देवरायामागून झालेल्या राजांच्या कारकिर्दीचा इतिहास लिहि-ण्याला विशेषशीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें हें काम बरेंच अडचणीचें आहे. याविषयीं पूर्वीच उल्लेख केलेला आहे. हा काल विजयनगरांत अतिशय घोटाळ्याचा होता, असें 'नूनीज' नेंही आपल्या कैफीयतीमध्यें स्पष्ट लिहिलें आहे.

आजवर सांपडलेल्या शिलालेखांवरून या राजाच्या मृत्यूचें साल सं. १४४९ होतें, असें दिसतें. सं. १४४३ पासून सं. १४४९ पर्यंत, मध्यंतरीं कोणी तिसरा देवरायही गादीवर बसला असेल. पण याविषयींचा पुरावा अद्यापि उपलब्ध नाहीं. शिलालेखांमध्यें देवरायाचे मल्लिकार्जुन व विरूपाक्ष असे दोघे पुत्र असल्याचें आढळतें. मल्लिकार्जुनाचे शिलालेख सं. १४५२-५३ आणि सं. १४६४-६५ चे, तसेंच विरूपाक्षाचा एक सं. १४७० चा, असे मिळाले आहेत. मल्लिकार्जुनाला दोघे पुत्र होते. त्यांतील राजशेखराचे सं. १४७९-८० व १४८६ -८७ चे, आणि दुसरा विरूपाक्ष, याचा सं. १४८३-८४ सालांतील एक, असे लेख आढळले आहेत. म्हणजे राजशेखराच्या दुसऱ्या शिलालेखापूर्वी तीन वर्षें याच्या नांवाचा शिलालेख झालेला आहे.

ही सालवारी डाक्तर 'हुश्श' यांच्या 'एपिग्राफिका इंडियाच्या' तिसऱ्या भागांतून घेतली आहे. त्याच्या चौथ्या भागांत, राजशेखराचा एक शिलालेख सं. १४६७-६८ सालचा, उत्तर अर्काटजिल्ह्यांतील एदूर येथें मिळाल्याचें लिहिलें आहे. तसेंच कडपा जिल्ह्यांतील 'परनपल्लीं' गांवीं एक शिलालेख असून त्याचीच एक ताम्रपटाची नक्कल अनंतापूर जिल्ह्यांतील 'गोहूमरी' गांवीं राह-णाऱ्या नारायण रेड्डी नांवाच्या गृहस्था जवळ असल्याचें ऐकण्यांत आहे. हा लेख शके १३९८ सन १४७६-७७ सालचा असून त्याच्यांत 'विजयनगरचा प्रौढ देवराय' असें नांव आलेलें आहे.

राजशेखराच्या कारकिर्दीतील शेवटचा लेख, हें राजघराणें बुडण्यापूर्वीं थोडींच वर्षें लिहिलेला असावा. कारण राजपद बळकावणारा नरसिंहराय याचा खुद्द लेख स. १४५० तला उपलब्ध आहे.

याप्रमाणें सालवारीची गडबड झालेली आहे. तिच्या उलगड्याला 'नूनीज' च्या कैफियतीचा थोडासा उपयोग होतो. तरी पण इतर लेखांशीं विसंगतपणा राह-तोच. 'नूनीज' यानें, समस्त प्रचलित व ऐकण्यांत असलेल्या दंतकथांवरून आपली कैफियत सं. १५३५ च्या सुमाराला लिहिली. तिच्या अन्वयें असें दिसतें

कीं दुसऱ्या देवरायाला, पीनाराय नांवाचा पुत्र होता. तो त्याच्या खुनाचा प्रयत्न होण्यापूर्वी ६ महिने वारला होता. पण अब्दुरझाक याच्या कैफियतीप्रमाणें हा खुद्द दुसरा देवरायच असावा. खुनाचा प्रयत्न सं. १४४३ च्या एप्रिल महिन्यापूर्वी झाला, असें बहुतेक निश्चित झालें आहे. पीनारायाचा एक पुत्र होता. तो गादीवर बसला. पण त्याच्या कारकिर्दींत विशेष कांहीं घडलें नाहीं. त्याच्या नंतर त्याचा पुत्र विरूपाक्ष गादीवर आला. त्याला त्याच्या वडील पुत्रानें आणि त्याला त्याच्या धाकट्या भावानें ठार मारलें. त्याचें नांव पेद्दाराय. त्याच्याकडूनच नरसिंहरायानें राजपद हरण केलें.

एकंदरीत हा समय फारच गोंधळाचा व बेबंदशाहीचा होता. नरसिंहरायानें राज्यपद बळकाविल्यापूर्वी चाळीस वर्षे विजयनगरच्या राज्यांत फारच अंदाधुंदी माजली होती. एका मागून एक बरेच राजपुरुष गादीवर बसले. त्यांतून कांहींचे खून झाले, इतकें मात्र तुर्त खात्रीपूर्वक मानण्याला हरकत नाहीं. ही शेवटची राज्यक्रांती सं. १४८७ ते ९० पर्यंत घडली. त्या दिवसांमध्यें विजयनगरवाले व त्यांचे उत्तर सीमेवरील शेजारी व पिढीजाद वैरी कलबुर्ग्याचे सुलतान, यांचा परस्पर संबंध कसा काय राहिला होता, तें समजण्याला हिंदू व पोर्तुगीज लेखांपेक्षां मुसलमानी कैफियती व तवारीखीच पाहिल्या पाहिजेत. सं. १४४३ पासून सं. १४५८ पर्यंत १५ वर्षांमध्येंतरी या दोन्ही राज्यांमध्यें बिघाड आणणारी गोष्ट किंवा कलागत झाली नाहीं, असें फेरिस्ताच्या लेखावरून दिसतें. त्या अवसरांत खुद्द कलबुर्ग्याच्या राज्यांतही तशीच बेबंदशाही माजलेली होती. तिच्यामुळें त्या दरबाराला परराज्यांशीं झगडे करण्याला सवडच होण्या जोगी नव्हती. साऱ्या राज्यभर आपसांत भांडणें व रणें माजून राहिलेलीं होतीं. त्या सर्वांचा परिणाम बाहामनी बादशाहतीला भोंवला व ती बादशाहत बुडून तिच्या जागीं पांच निरनिराळीं, सारखीं भांडत राहणारीं राज्यें कायम झालीं.

सुलतान अल्लाउद्दीन ता० १३ फेब्रुवारी सं. १४५८ रोजीं मरण पावल्यावर त्याचा पुत्र हुमायूनशहा गादीवर बसला. तो अत्यंत क्रूर व दुष्ट निघाला. पुढील वर्षी त्यानें तेलंगणच्या लोकांशीं युद्ध चालविलें आणि देवरकोंडा किल्ल्याला वेढा घातला. आंतील लोक फारच शौर्यानें व नेटानें लढले. त्याच्या फौजेला हार खाऊन परत जावें लागलें. तो ता० ५ सप्टेंबर सं. १४६१ रोजीं मेला, तेव्हां आपण एकदांचे एका मोठ्याच आफतींतून सुटलों, असें सर्वांना वाटलें. त्याच्या वेळीं विजयनगरास मल्लिकार्जुन राज्य करीत असावा.

त्याच्या पश्चात निजामशहा गादीवर बसला. तो आठ वर्षांचा अगदींच अल्पवयी होता. त्याचाही ग्रंथ लौकरच आटपला. पुढें त्याचा भाऊ मुहंमद ता० ३० जुलई—सं १४६३—रोजीं तक्तनशीन झाला.

सं. १४६९ सालीं विजयनगर येथें राजशेखर किंवा पहिला विरूपाक्ष राज्य करीत असतांना मुहंमदाचा वजीर महंमद गवान यानें पश्चिमेकडील प्रांतावर स्वारी करून जलमार्गानें व खुष्कीनें हल्ला केला आणि विजयनगराच्या अमलांतील गोवें बंदर काबिज केलें.

सं. १४६९ सालीं मुसलमान लोकांची भारी क्रूरपणें कत्तल केली गेली, असें 'बारोस' याच्या कैफियतीमध्यें लिहिलें आहे. तिचा सूड उगविण्यासाठींच बहुधां ही मोहीम झाली असावी. या सुमाराला जलमार्गाचा व खुष्कीचा, सारा व्यापार मुसलमानांच्या हातीं होता. दक्षिण देशांतील निरनिराळीं राज्यें आपसांत लढत व स्वाऱ्या शिकाऱ्या करीत. त्यांच्यामध्यें मुख्यतः घोडे स्वारांचा उपयोग पडे. त्यांना लागणारे घोडे परदेशांतून आणून विकण्याचें काम मुख्यत्वें या व्यापाऱ्यांच्या हातीं असे. हिंदूराजांची सारी मदार या परदेशांतून येणाऱ्या घोड्यांवर होती. सं. १४६९ सालीं भाटकल येथील मुसलमान व्यापाऱ्यांनीं दक्षिण देशाच्या राज्यांतील मुसलमान लोकांना घोडे विकत दिले, म्हणून विजयनगरच्या रायानें होनावर येथील मांडलिकाला, साधेल तितक्या मुसलमान व्यापाऱ्यांना ठार मारावें, व बाकीच्यांना जरब देऊन घालवून द्यावें, अशी आज्ञा केली. त्याप्रमाणें १०,००० मुसलमान लोकांची भयंकर कत्तल झाली. बाकीचे गोव्यास गेले. तेथें त्यांनीं नवें शहर वसविलें. तें शहर पुढें पोर्तुगीज लोकांची राजधानी झालें. विरूपाक्ष रायाच्या कारकिर्दींत गोवें, चौल, व दाभोळ, हीं बंदरें विजयनगराच्या राज्यांतून गेलीं असें 'नूनीज' नेंही लिहिलें आहे. (ही कत्तल सं. १४७९ सालीं झाली, असें परचासू याने लिहिलें आहे.)

पुढें लौकरच यूसफ आदिलशहा याचा उदय झाला. तो प्रारंभीं सुल्तान मुहम्मद याचा एक गुलाम होता. त्याची येथवर बढती झाली कीं, पुढें त्यानें बाहामनी राज्य बुडवून विजापुरास आपलें नवें राजघराणें कायम केलें. सं. १४७० मध्यें सुल्तानानें ओरीसाच्या राजाच्या, अमलांतलीं राजमहेंद्री व कोंडवीड हीं शहरें घेतलीं, असें 'बुऱ्हान-ई-मआसीर' या ग्रंथामध्येंही लिहिलें आहे. कोंडपल्लीचा दुर्गम-दुर्ग एका मोठ्या पहाडाच्या रांगेंतील एका उंचशा पठारीवर आहे. तेथील शिलालेखांतही या गोष्टी सं. १४७०-७१ मध्यें घडल्याचें लिहिलें आहे.

फेरिस्ता ह्मणतो, " बेळगांवाचा किल्लेदार ' परवतराय ' यानें हि. सं. ८७७–सं. १४७२–७३–सालीं विजयनगरच्या राजाच्या हुकुमानें गोवें परत घेण्यासाठीं स्वारी केली. हें ऐकतांच मुहम्मदशहा फौजेसह बेळगांवाकडे रवाना झाला. बेळगांवचा किल्ला भारी मजबूत आहे. त्याच्या सभोंवार पक्का खंदक आहे. त्याच्या जवळच एक घाटी आहे. तिच्या दोन्ही बाजूला बुरूज बांधलेले आहेत." त्याच्यावर हल्ला करून सुलतानानें तो किल्ला सर केला. नंतर तो कलबुर्ग्यास परत गेला.

या बेळगांवच्या रायाचें नांव विक्रमराय असावें. तें कैफियतकारांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें दिलेलें आहे.

सं. १४७५ च्या सुमाराला साऱ्या दक्षिणदेशांत दोन वर्षे भयंकर दुष्काळ पडला. त्याच्या अखेरीला कोंडपल्लींतील हिंदू लोकांनीं बंड केलें. त्यांनीं तेथील मुसलमान किल्लेदाराला ठार मारिलें आणि ओरीसाच्या राजाकडून मदत मागितली. त्यानें येऊन राजमहेंद्रीला वेढा घातला. त्यावेळीं तेथें निजामुलमुल्क सुभेदार होता. सुलतान स्वतःच स्वारी करून येत असल्याचें पाहून ओरीसाची फौज परत गेली. हि. सं. ८८२–सं. १४७८–मध्यें मुहम्मदशहानें ओरीसावर स्वारी केली व तो थेट राजधानीपर्यंत पोहोंचला. तेथें त्यानें पुष्कळच लोकांची कत्तल केली आणि मोठ्या निर्दयपणानें तें शहर व आसपासचा बराचसा प्रदेश उध्वस्त केला. तेव्हां राजा शरण आला. त्यानें सुलतानाला पुष्कळसे मौल्यवान हत्ती नजर केले; आणि सुलतानानें या पुढें त्याच्या राज्याला त्रास देऊं नये असा ठराव होऊन तह झाला.

यानंतर घडलेल्या गोष्टी संबंधानें फेरिस्ता व 'बुऱ्हान-ई–मआसीर' यांतील वर्णनांमध्यें फरक आहे. फेरिस्ताच्या लेखाप्रमाणें याच्या पुढें मुहम्मदशहानें कोंडपल्ली पाडाव करून तेथील मंदिर पाडून टाकलें, व त्याच्या जागीं एक मशीद बांधविली आणि मंदिरांतील ब्राह्मणांची कत्तल केली. पुढें सुमारें तीन वर्षें तो राजमहेंद्री येथें राहिला. तेथून त्यानें तेलंगण देशाचा बंदोबस्त केला व तिकडील पुंडपाळेगार जमींदारांना हांकून लाविलें आणि नरसिंगरायाला जिंकून टाकण्याचा निश्चय केला.

"हा नरसिंगराय फारच प्रबळ होता. कर्नाटकचें किंवा विजयनगरचें राज्य व तेलंगण, यांच्या मधील प्रदेश त्याच्या ताब्यांत असून मच्छलीपट्टनपर्यंतचा समुद्रकांठही त्यानें काबिज केला होता. शिवाय खुद्द विजय-

नगरच्या राज्यापैकीं बराचसा भाग व पुष्कळसे मजबूत किल्ले त्यानें दाबले होते."

हा नरसिंगराय विजयनगरच्या रायांचा नातलग—ज्याच्याकडे रायानें पुष्कळशा मुलुखाच्या बंदोबस्ताचें काम सोंपविलें होतें तोच-असावा. खुद्द राय व त्याचें दरबार दुर्बल होत गेलें तसा तो आपला फौजफांटा व प्राबल्य वाढवीत भराभर डोईजड व स्वतंत्र होऊं लागला. अखेर त्यानें राजाला पदच्युत करून विजयनगरचें राज्य बळकाविलें.

सुल्तान कोंडपल्लीस गेला. तेथून दहा दिवसांच्या वाटेवर 'कांची येथें एक मोठें मंदिर आहे. त्याच्या भिंती व छत यांच्यावर सोन्याचे पत्रे जडून जडावाचें काम केलेलें आहे,' असें त्याला कळलें. तेव्हां नुसत्या सहा हजार स्वारांनिशीं धांवा मारून, त्यानें तें मंदिर लुटून फस्त केलें, असें म्हणतात.

या सुमाराच्या सुल्तानाच्या हालचाली संबंधानें 'बुऱ्हान–ई–मआसीर' कार म्हणतो कीं, 'मुहम्मदशहा राजमहेंद्रीला पोहोंचला तेव्हां, त्याला नरसिंगराय तेथें असल्याचें आढळून आलें. राया बरोबर त्या वेळीं, जणों लोहमय फिरते दुर्गच असे पांचशें हत्ती व सात लाख पायदळ होतें. अशी मोठी व थाटाची फौज असूनही ते सारे लोक व खुद्द नरसिंगराय, इसलामी फौज दृष्टी पडतांच भिऊन पळून गेले. नंतर सुल्तानानें तेथील हिंदी फौजेच्या हातून राजमहेंद्री सर केली.' फेरिस्तानें लिहिलें आहे त्याप्रमाणें, मुसलमानी फौजेपासून नव्हे.

सं. १४८० च्या नव्हेंबर महिन्यांत तो राजमहेंद्रीहून कोंडवीडकडे, विजयनगराच्या रोखानें चालला. तो किल्ला सर केल्यावर तो नरसिंगरायाच्या ताब्यांतील मालूर गांवाला गेला. "राज्यविस्तार आणि अफाट फौजफांटा यांच्या योगानें तेलंगण व विजयनगरचें राज्य, यांच्यामधील सर्व राजांमध्यें नरसिंगराय श्रेष्ठ व बलिष्ठ होता" आणि त्यानें "कन्नड व तेलंगण देशांच्या दरम्यान आपला अंमल बसविला होता. विजयनगरच्या राज्यांतील पूर्व समुद्र व अलीकडील देश, यांच्यांतील पुष्कळचसा मुलूख त्यानें बळकावला होता."

मालूरास असतांना सुल्तानाला, "तेथून ५० फरसख–१०० कोस-अंतरावर गंजी नांवाचें शहर असून," तेथें सुसंपन्न मंदिरें असल्याचें कळलें. तसा तो टाकोटाक चढाई करून तारीख १३ मार्च सं. १४८१ रोजीं तेथें पोहोंचला, व तेथें पुष्कळच लूटमार व नासधूस करून परत आला.

नंतर सुल्तान मच्छलीपट्टणाला गेला व तें बंदर घेऊन तो कोंडपल्लीला परत आला. त्याचा हा शेवटचाच विजय होय. त्याचा विश्वासू, राजनिष्ठ, व प्रामाणिक वजीर महंमद गवान, याचा त्यानें सं. १४८१ मध्यें निष्ठुरपणें खून करविला. त्यामुळें त्याचे सारे सरदार फारच बेदिल झाले, व त्यांनीं बंडें केलीं. थोड्याच दिवसांत राज्याचे तुकडे तुकडे झाले, त्याचें राजघराणें लयास गेलें व त्याच्या जागीं पांच नवीं राजघराणीं कायम झालीं.

मुहम्मदशहा ता. २१ मार्च सं. १४८२ रोजीं मरण पावला. यापूर्वीं थोडेच दिवस, त्यानें गोव्याकडे मोहीम करण्याची योजना केली होती. कारण 'विजयनगरचा राजपुत्र सेवराय' यानें गोव्यावर एक फौज धाडली होती.

त्याच्या कलबुर्गा येथील कारकिर्दीसंबंधानें 'अथेनेशियस निटिकिन' नांवाच्या रशियन प्रवाशाच्या प्रवासवृत्तावरून आणखीही कांहीं माहिती मिळते. हा 'निटिकिन' कलबुर्गा येथें कधीं आला होता तें ठरविणें बरेंच कठिण आहे. तो मूळचा रशिया देशांतील 'टवेर' येथें राहणारा. 'ग्रांड ड्यूक बोरिसोव्हिच' व त्याचा धर्मगुरू 'गेन्नाडियस' यांच्या परवानगीनें तो या प्रवासाला निघालेला होता. यावरून तो सं. १४६२ नंतर निघाला असें ठरतें. तो हिंदुस्थानांत सं. १४६८ पासून १४७४ पर्यंत होता, असें मुंबई इलाख्याच्या ग्याझेटीयरमध्यें पुणें जिल्ह्याच्या वर्णनात्मक भागांत लिहिलें आहे.

'निटिकिन' प्रथम चौल बंदराला जाऊन तेथून पाय वाटेनें जुन्नरास पोहोंचला. 'येथें आसदखान राहत होता. तो हिंदूलोकांचें शहर जुन्नर येथील खान किंवा अधिकारी असून, मलिकुत्तिजार याचा ताबेदार आहे. तो आज वीस वर्षें सारखा इकडील काफर लोकांशीं लढतो आहे. क्वचित त्याचा मोड होतो. पण बहुशः तो त्यांचा मोड करीत आला आहे.'

मलिकुत्तिजार हाच सुप्रसिद्ध वजीर महंमदगवान. हा बहुमानाचा किताब सर्वांत प्रमुख सरदारांनाच मिळत असे. तो त्याला सं. १४५७ त मिळाला होता. याचा अर्थ 'सौदागरांचा मुख्य किंवा चौधरी.' काफर म्हणजे अर्थातच मूर्तिपूजक हिंदु लोक. जुन्नर येथील फौज त्याच्या हाताखालीं होती. तेव्हां, सं. १४६९ सालीं सोनगीर-खेळणा--येथील राजे व कोंकणांतील बंडवाले यांच्याशीं त्याचें युद्ध झाल्याचें फेरिस्तानें लिहिलें आहे. या युद्धाच्या प्रसंगींच त्यानें, वर उल्लेख आल्याप्रमाणें, गोवें काबिज केलें होतें. तसेंच राजमहेंद्री,

नंतर सुल्तान मच्छलीपट्टणाला गेला व तें बंदर घेऊन तो कोंडपल्लीला परत आला. त्याचा हा शेवटचाच विजय होय. त्याचा विश्वासू, राजनिष्ठ, व प्रामाणिक वजीर महंमद गवान, याचा त्यानें सं. १४८१ मध्यें निष्ठुरपणें खून करविला. त्यामुळें त्याचे सारे सरदार फारच बेदिल झाले, व त्यांनीं बंडें केलीं. थोडक्याच दिवसांत राज्याचे तुकडे तुकडे झाले, त्याचें राजघराणें लयास गेलें व त्याच्या जागीं पांच नवीं राजघराणीं कायम झालीं.

मुहम्मदशहा ता. २१ मार्च सं. १४८२ रोजीं मरण पावला. यापूर्वीं थोडेच दिवस, त्यानें गोव्याकडे मोहीम करण्याची योजना केली होती. कारण 'विजयनगरचा राजपुत्र सेवराय' यानें गोव्यावर एक फौज धाडली होती.

त्याच्या कलबुर्गा येथील कारकिर्दीसंबंधानें 'अथेनेशियस निटिकिन' नांवाच्या रशियन प्रवाशाच्या प्रवासवृत्तावरून आणखीही कांहीं माहिती मिळते. हा 'निटिकिन' कलबुर्गा येथें कधीं आला होता तें ठरविणें बरेंच कठिण आहे. तो मूळचा रशिया देशांतील 'टवेर' येथें राहणारा. 'ग्रांड ड्यूक बोरिसोव्हिच' व त्याचा धर्मगुरू 'गेन्नाडियस' यांच्या परवानगीनें तो या प्रवासाला निघालेला होता. यावरून तो सं. १४६२ नंतर निघाला असें ठरतें. तो हिंदुस्थानांत सं. १४६८ पासून १४७४ पर्यंत होता, असें मुंबई इलाख्याच्या ग्याझेटीयरमध्यें पुणें जिल्ह्याच्या वर्णनात्मक भागांत लिहिलें आहे.

'निटिकिन' प्रथम चौल बंदराला जाऊन तेथून पाय वाटेनें जुन्नरास पोहोंचला. 'येथें आसदखान राहत होता. तो हिंदूलोकांचें शहर जुन्नर येथील खान किंवा अधिकारी असून, मलिकुत्तिजार याचा ताबेदार आहे. तो आज वीस वर्षें सारखा इकडील काफर लोकांशीं लढतो आहे. क्वचित त्याचा मोड होतो. पण बहुशः तो त्यांचा मोड करीत आला आहे.'

मलिकुत्तिजार हाच सुप्रसिद्ध वजीर महंमदगवान. हा बहुमानाचा किताब सर्वांत प्रमुख सरदारांनाच मिळत असे. तो त्याला सं. १४५७ त मिळाला होता. याचा अर्थ 'सौदागरांचा मुख्य किंवा चौधरी.' काफर म्हणजे अर्थातच मूर्तिपूजक हिंदु लोक. जुन्नर येथील फौज त्याच्या हाताखालीं होती. तेव्हां, सं. १४६९ सालीं सोनगीर--खेळणा--येथील राजे व कोंकणांतील बंडवाले यांच्याशीं त्याचें युद्ध झाल्याचें फेरिस्तानें लिहिलें आहे. या युद्धाच्या प्रसंगींच त्यानें, वर उल्लेख आल्याप्रमाणें, गोवें काबिज केलें होतें. तसेंच राजमहेंद्री,

वेणूकोंडा, वगैरेवरही त्यानें मोहिमी केल्या. सं. १४७२ सालीं वेळगांवाची मोहीम झाली तिच्याविषयीं वर लिहिलेंच आहे. प्रबल झालेला हिंदुराजा नरसिंगराय याच्यावर दौलताबाद व जुन्नर येथील फौज पूर्व किनाऱ्यावर धाडली गेल्याचेंही फेरिस्तानें लिहिलें आहे. कलबुर्ग्याची त्या वेळची स्थिती व स्वतःचा तेथील अनुभव यांविषयीं 'निटिकिन' म्हणतोः- 'हिंदुलोक बहुतेक नागडे उघडे व अनवाणी असतात. त्यांच्या एकाहातीं ढाल व दुसऱ्या हातांत तरवार असतें. लढाईमध्यें हत्तींचा पुष्कळ उपयोग केला जातो. त्यांचे दांत व सोंड यांच्यांत मोठमोठे कोयते बांधतात. त्यांच्या अंगावर नक्षीदार पोलादी पत्र्यांचें चिलखत घालतात. त्यांच्या पाठीवरील हौद्यांमध्यें बारा तीरंदाज लोक चिलखतें घालून व बंदुका घेऊन बसतात. या भागांमध्यें लोकवस्ती फारच दाट आहे. राजधानीपासून दूरच्या प्रदेशांत राहणाऱ्यांची स्थिती फारच दीनवाणी आहे. सरदार लोक अतिशय संपन्न आहेत. ते नेहमीं चैनींत व ऐष आरामांत राहतात. ते रूप्याच्या पालख्यांमध्यें बसतात. त्यांच्या पुढें उत्तम सोनेरी साज घातलेले २०।२० घोडे आणि मागें ३०० स्वार व ५०० प्यादे चालतात. शिवाय त्यांच्या बरोबर रणशिंगें, व १०।१० मशालची आणि वाजंत्री ही असतात.

'सुलतानाच्या स्वारीमध्यें असे सोनेरी साज घातलेले घोडे १०००, शुतर स्वार मशालची १००, तुताऱ्या, करणें व शिंगें वाजविणारे मिळून ३००, आणि नट नर्तक ३००, इतका लवाजमा असतो. सुलतान सुवर्णाच्या जीनावर बसतो. त्याच्या पोषाखावर नील व पुष्कराज गुंफलेले असून डोक्यावरील ताजावर एक भला मोठा हिरा लावलेला आहे. त्याच्या स्वारीबरोबर नीलमणी जडलेलें एक उत्तम सोनेरी चिलखत आणि सुरेख सुवर्णाचें काम केलेल्या तीन तरवारी असतात. सुलतानाचा भाऊ सोन्याच्या पालखींत बसतो. तिच्यावर मखमलीची पाखरी असून जडावाचें काम केलेलें आहे. मुहम्मदशहा खुद्द सोन्याच्या पालखीवजा गाडींत बसतो. तिच्यावर रेशमी कापडाची पाखरी व सोन्याचा कळस आहे. त्या गाडीला सोन्याचा मुलामेदार साज घातलेले चार उमदे घोडे जोडतात. त्याच्या पुढें किती तरी गाणारे, नाचणारे, नट, वगैरे चालत असतात. त्याच्या भोंवतीं लोकांची भारी गर्दी राहते.''

"मलिकउत्तिजार यानें हिंदू लोकांच्या ताब्यांत असलेलीं हिंदी समुद्राच्या कांठावरचीं दोन बंदरें घेतलीं. त्या बन्दरांत जवळपास चांचेपणा करणारीं गलबतें राहत असत. शिवाय त्यानें सात राजे आणि त्यांचा सारा खजीना पाडाव

केला. त्यांपैकीं एका शहराला २००००० पायदळ, १०० हत्ती, आणि ३०० उंट, यांनीं सारखा दोन वर्षें वेढा दिला होता." ( यापैकीं एक बंदर गोवें असावें. तें याच सुमाराला मुसलमानांनीं काबिज केलें होतें. )

' मायझा मलिक, मेकखान व फरहतखान यांनीं तीन मोठीं शहरें घेतलीं. तेथें पुष्कळच संपत्ती व जडजवाहीर त्यांच्या हातीं लागलें. तें त्यांनीं मलिकउत्तिजार याच्याकडे आणिलें. तें ' असेन्शनच्या ' दिवशीं बेदर येथें पोहोंचलें.'

सुलतानाचा भाऊ ' मोहिमेवर असतो तेव्हां त्याची आई व बहीण, त्याच्या बरोबरच घोड्यांवर किंवा पालखींत बसून असतात. त्यांच्या दिमतीला २००० स्त्रिया घोडेस्वार राहतात. या स्वारीच्या बिनीला सोन्याचे साज घातलेले ३०० कोतल घोडे असतात. '

' मलिकउत्तिजार यानें ५०००० फौजेसह बेदराहून निघून हिंदू लोकांवर स्वारी केली. सुलतानानेंही आपल्या जवळच्या फौजेतून ५०००० लोक त्याच्याकडे पाठविले. या साऱ्या फौजेसह मलिकउत्तिजार ' चेनुदर ' च्या राजावर चढाई करून गेला. तो राजा मोठा प्रसिद्ध व प्रबल होता. त्या ' चेनुदर च्या राजाजवळ ३०० खासे हत्ती, व १००००० पायदळ, आणि ५०००० स्वार इतकें मोठें सैन्य होतें. (हीं दोन्हीं नांवें विजयनगराचींच दिसतात.) पुढें ' निटिकिन ' यानें सुलतानाच्या फौजेचा तपशील दिला आहे त्यावरून त्या अवाढव्य फौजेची एकंदर बेरीज ९००००० पायदळ, १९०००० स्वार आणि ५७५ हत्ती, इतकी येते.

' सुलतान आपल्या फौजेसह निघून कलबुर्ग्यास मलिकउत्तिजार याला जाऊन मिळण्याला चालला. या मोहिमेमध्यें त्याला फारसें यश आलें नाहीं. हिंदू लोकांचें एकच शहर काबिज झालें. तेंही पुष्कळच लोक कामीं येऊन व अतोनात खर्च केल्यावर. ' (हें शहर कदाचित बेळगांव असेल.)

'हिंदू सुलतान कदम हा फारच बलिष्ट राजा आहे. त्याची फौज फार मोठी आहे. तो ' विरोनगर ' येथें एका पहाडी किल्यावर राहतो. या फारच मोठ्या शहरासभोंवार तीन कोट आहेत. त्यांच्यामधून एक मोठी नदी वाहते. त्याच्या एका बाजूला घनदाट जंगल व दुसरीकडे मोठें थोरलें खोरें आहे. तें शहर सर्व तऱ्हेनें फारच सोईचें आहे. एकीकडून तें अगदीं दुर्गम आहे. त्याच्या मधून एक मोठा व सरळ रस्ता काढलेला आहे. पर्वत

भाग उंच आणि जवळच खालीं खोरें आलेलें, यामुळें तें शहर बहुतेक अजिंक्य झालेलें आहे.'

'सुलतानानें त्याला एक महिनाभर वेढा घातला. त्या अवधींत अन्न-पाण्याच्या टंचाईमुळें त्याचे पुष्कळच लोक मरण पावले. पाणी अगदी जवळ खालीं दिसत होतें पण तेथें पोहोंचण्याची सोय नव्हती.'

'अखेरीस मोठ्या तोफा आणवून व वेढ्याचें काम नेटानें चालवून, अवि-श्रांत लढाई केल्यावर मलिकखान खुद्द यानें तें शहर सर केलें. त्याच्या फौजेला २० दिवस अन्नपाण्याविना फार कष्ट सोसावे लागले. त्यांच्यांतील ५००० नामी लोक कामीं आले. शहर काबिज झाल्यावर आंतील २०००० माणसें--बायका, पुरुष व मुलें--यांची कत्तल झाली आणि तितकेच लोक गुलाम म्हणून विकले गेले. तेथील खजिन्यांत कांहींच हातीं लागलें नाहीं सबब तें शहर सोडून द्यावें लागलें.'

हें वर्णन कोणत्या शहराविषयीं आहे तें सांगतां येत नाहीं. या सुमा-रास विजयनगर कोणी शत्रूनें पाडाव केल्याचा दाखला किंवा उल्लेख इतर कोठें आढळलेला नाहीं. कैफियतकारानें कदाचित पूर्व किनाऱ्यावरील राजमहेंद्री, किंवा तेलंगणांतील दुसरें एखादें शहर याच्या ऐवजीं ही नांवाची गडबड केली असेल.

दुसरा महमूदशहा कलबुर्ग्यास गादीवर बसला. तेव्हां तो अल्पवयी-सारा बारा वर्षांचा व निवळ नामधारी होता. वरचेवर बंडें व दंगेधोपे चालले होते. बऱ्याच प्रांतांतील जहागीरदार व सरदार, त्याच्या विरुद्ध उठले. त्यांतच गोव्याच्या सुभेदारानें स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला आणि समुद्रकांठचीं व घाटावरीलही बरीचशीं ठाणीं हस्तगत केलीं. राजधानीचें शहर कलबुर्गा येथें आपसांत यादवी माजली होती. थोड्या दिवसांतच मोठ्या सरदारांनीं बाहामनी बादशाहतीची ताबेदारी झुगारून दिली व तें सारें राज्य आपसांत वांटून घेतलें.

विजयनगर येथेंही या सुमारास बेबंदशाहीच होती असें दिसतें. बाहामनी बादशाहीचे तुकडे पडले त्याच वेळीं, विजयनगरास नरसिंगरायानें राज्यपद बळकावून, आपल्या नवीन, व पुढें भारी प्रबल व विख्यात झालेल्या राजघराण्या-चा पाया घातला.

दक्षिणदेशांमध्यें, १ विजापूर येथील आदिलशाही,--याचाच या इति-हासाशीं विशेष संबंध आहे--२ बेदर किंवा अहमदाबाद येथील बरीदशाही--

३ वऱ्हाडांतील इमादशाही–४ अहमदनगर येथील निजामशाही आणि ५ गोवळकोंडा येथील कुतुबशाही, अशीं पांच नवीन राज्यें स्थापन झालीं.

विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा संस्थापक आदिलशहा सं. १४८९ सालीं स्वतंत्र झाला. बिचारा दुसरा महमूदशहा, एकांतवासांत व विपन्नदशेंत सं. १५१७ पर्यंत कायम होता. त्याच्या पश्चात त्याचा वडील पुत्र अहमदशहा नांवाला गादीवर बसला. तो दोन वर्षांनीं मृत्यू पावल्यावर त्याचे दोघे बंधू–तिसरा अल्लाउद्दीन ( हा पदच्युत झाला ) आणि वलीशहा ( याचा खून झाला) हे नांवाला गादीवर बसले होते. त्यांच्या नंतर दुसऱ्या अहमदाचा पुत्र ‘ कलीमउल्ला ’ नामधारी गादीवर, पण बहुतेक सक्त कैदेंतच होता. त्याच्या मागून बाहामनी बादशाही घराण्याचा पुर्ता नष्टांश झाला.

---

# भाग नववा.

## दुसऱ्या राजघराण्यांतील प्रथमचे राजे (सं. १४९० पासून सं. १५०९ पर्यंत).

नरसिंगराय राज्यपद बळकावतो–पूर्वीच्या राजाचें पलायन–सालुवा-तिम्मा–वीर नरसिंह–विजापुरवाले पुनः विजयनगरावर स्वारी करितात–पोर्तुगीज लोकांचें हिंदुस्थानांत आगमन–ते गोवें घेतात–‘वारथेमा’ ची कैफियत–अल्बूकर्क.

“दक्षिण हिंदुस्थानांतील राजघराण्यांविषयीं त्रोटक टिपण” नांवाचें आमचें पुस्तक आम्हीं सं. १८८३ सालीं प्रसिद्ध केलें. त्यांत पुढील मजकूर आहे :–

‘आतां आपण दुसऱ्या किंवा नरसिंहरायानें स्थापन केलेल्या राजघराण्याच्या कालापर्यंत पोहोंचलों. या घराण्यांतील राजपुरुष दक्षिण हिंदुस्थानांत होऊन गेलेल्या सर्व राजकर्त्यांमध्यें अधिक प्रौढप्रताप होते. नरसिंहरायाच्या कारकिर्दीचें साल डाक्टर बर्नेल यांनीं सं. १४९० ठरविलें आहे. त्याच्या उलट शिलालेख वगैरेचें एकही प्रमाण आमच्या आढळण्यांत आलें नाहीं. बिशप काल्डवेल यांनीं आपल्या ‘ तिनेवल्लीच्या इतिहासांत या गोष्टीचें साल सं. १४८७ दिलें आहे. तरी पण नरसिंहरायानें पूर्वीचें राजघराणें कसें बुडविलें व विजयनगरचें राज्य कसें बळकाविलें, याविषयींचा खरा इतिहास अद्यापि उपलब्ध करून घ्यावयाचा आहे. ’.

याविषयीं कांहीं तरी जास्त प्रकाश पाडणारी कोणचीही गोष्ट आजवर घडलेली नाहीं. पूर्वींचेंच अज्ञान व अंधःकार जणों कायम आहेत, हें खरें. तरी पण 'नूनीज' च्या नवीनच उपलब्ध झालेल्या कैफियतीवरून याविषयीं अगदीं नवीन व मनोरम माहिती मिळते. ती सारी अक्षरशः खरी आहे असें मात्र आज खात्रीनें सांगतां येत नाहीं. सोळाव्या शतकाच्या आरंभीं या इतिहासासंबंधानें प्रचलित असलेल्या दंतकथांचा तो एक गोषवारा असून, वर्णित गोष्टी घडून आल्यानंतर ५०–६० वर्षांच्या आंतच तो लिहून काढलेला आहे, इतकें मात्र खरें.

तो म्हणतो, 'राजा विरूपाक्षराय कच्च्या दिलाचा व कुचकामाचा होता. त्याच्या वेळीं या राज्याचा जो पुष्कळसा भाग मुसलमानांनीं लुबाडला, त्यांतच गोवें, चौल व दाभोळ, हीं बंदरें होतीं.' हें त्याचें लिहिणें ऐतिहासिक दृष्ट्या खरेंही आहे. विरूपाक्षराय क्रूर, स्वयंमन्य व विषयलंपट होता. 'त्याला मद्यपान व स्त्रीसंग यांशिवाय कशाचीच परवा नसे' यामुळें सारें राज्य त्याच्यावर कातावून विरुद्ध उठलें होतें. शेवटीं त्याला त्याच्याच वडील पुत्रानें, आणि त्याला त्याच्या 'पेद्दाराय' नांवाच्या धाकट्या भावानें, असें ठार मारलें. 'पेद्दाराय' पित्या-चाच पूर्ण अवतार असा नष्ट व अत्याचारी निघाला. असल्या त्या राजकुल कलंकाचा वीट येऊन सरदार लोकांनीं बंड केलें. व अपणांपैकींच एकाला–नरसिंहरायाला–राजा केलें तो राजाचा आप्तही होता.

'नूनीज' यानें या अखेरच्या प्रसंगाचें चित्र सुरेख व यथार्थ रेखलें आहे. नरसिंहरायाच्या पदरचा एक सेनाध्यक्ष राजवाड्याच्या महाद्वारावर प्राप्त झाला, तेव्हां सारे द्वाररक्षक बेसावध पडलेले होते. त्यानें राजवाड्यांत प्रवेश केला. त्याला कोणी आड आलें नाहीं. पुढें कांहीं रक्षक स्त्रियांना ठार मारून तो थेट अंतःपुरांत सुद्धां शिरला. तसा तो भ्याड व हतभागी राजा पळून गेला. या सर्व गोष्टी फार सुरेख वर्णिल्या आहेत.

'त्या नंतर नरसिंहरायाला गादीवर बसविलें गेलें. तो फारच प्रबल, प्रख्यात व लोकप्रिय असल्यामुळें, पुढें हें विजयनगरचें राज्य, नरसिंहरायाचें राज्य, म्हणून सर्वत्र प्रसिद्ध झालें.'

पूर्वींच्या राजघराण्याशीं त्याचा काय आप्त संबंध होता, तें कळत नाहीं. तो 'साळुवा' नांवाच्या घराण्यांतला होता. त्यावेळीं व पुढेंही बरींच वर्षें त्याचे आप्त किंवा त्याचे वंशज अशा पुष्कळशा प्रमुख व प्रबल सरदारांचीं नांवें,

शिलालेख, ताम्रपट व काव्यादिक ग्रंथ, यांच्यामध्यें आढळून येतात. कृष्णदेवरायाचा महामंत्री 'साळूवा तिम्मा,' 'सालवेटिनया,' याच्या विषयीं 'नूनीज' नें पुष्कळच लिहिलें आहे. शके १३९५–सं. १४७२–७३ सालच्या एका लेखामध्यें नरसिंहरायाविषयीं, 'महामंडलेश्वर' असाच उल्लेख आहे. (महा मंडलेश्वर, मेदिनीश्वर, गंडन कट्टारी, साळुवा, धरणी वराह, नरसिंहराय, उदेयार, ही बिरुदावली सम्राटाची दिसत नाहीं.) असाच प्रकार सं. १४८२–८३ च्या लेखांमध्येंही आहे. पण सं. १४९५–९६ च्या एका लेखामध्यें त्याला 'महाराय' म्हटलें आहे. पूर्वींच्या राजाशीं असलेला त्याचा आप्तपणा, व त्यानें राज्यपद बळकावल्याचा काल, हे नक्की ठरले नाहींत. तरी तो या सुमाराला खरोखर राजा झाला होता, ही गोष्ट सिद्ध आहे. तसेंच त्याचें बल, प्रताप व सेनानिवेश, यांच्यामुळें मुसलमानांचा वरचष्मा व वाढतें पाऊल यांना रोक होऊन विजयनगरचें राज्य पुनः दृढमूल व कायम स्थितीला आलें.

या सुमाराच्या फेरिस्ता व 'नूनीज' यांनीं दिलेल्या हकीकतींमध्यें, बराच फरक असल्यामुळें, कांहींसा गोंधळ व अडचणशी झाली आहे. त्याच्या मागून नरसाराय, वीर नरसिंहराय, कृष्णदेव, अच्युतराय, व सदाशिवराय हे राजपदावर आले. त्यांच्या परस्पर आप्तपणासंबंधानें शिलालेखसुद्धां किती तरी विसंवादी आहेत. या नव्या राजघराण्यांतील राजांच्या कारकिर्दींतील कांहीं ठळक ठळक गोष्टी पक्क्या निर्णीत झालेल्या आहेत. त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन असें:– पहिल्या राजघराण्यांतील शेवटचे राजे सं. १४९० पर्यंत नांवाला तरी राजे मानले जात होते. नरसिंहराय व वीर नरसिंह यांच्या कारकिर्दी, सं. १५०९ सालीं कृष्णदेवराय गादीवर आला तोंवर राहिल्या. सं. १५३० मध्यें कृष्णदेवाच्या नंतर अच्युतराय, व त्याच्या पाठीमागून सं. १५४२ त सदाशिवराय, असे राजे गादीवर बसले. सदाशिवराय रामरायाच्या हातीं कैदचसा होता. रामराय हा तीवां भावांमध्यें वडील. तो प्रारंभी नांवाला महामंत्री होता पण पुढें स्वतःच राजा झाला. त्याचे बंधू त्रिमलराय व वेंकटाद्री. सं. १५६५ पर्यंत सारी राजसत्ता या तीवां बंधूंच्या हातीं अव्याहत राहिली. त्या सालीं पांच मुसलमान राजांनीं एक जूट होऊन त्यांच्यावर चढाई केली. तालीकोटची लढाई म्हणून प्रसिद्ध असलेल्या घोर संग्रामामध्यें त्यांची धूळधाण झाल्यावर ही प्रचंड व अपूर्व वैभवशाली राजधानी कायमची रसातळाला गेली.

या थोड्याशा प्रमुख गोष्टी लक्ष्यांत ठेऊन, फेरिस्ता व 'नूनीज' यांच्या वर्णनांवरून, या दुसऱ्या राजघराण्याच्या मूळ स्थापनेसंबंधीं कांहीं एकवाक्यत

होऊ शकते किंवा कसें तें पहातां, कांहींच मेळ बसत नाहीं. 'नूनीज' ची कैफियत सं. १५३५ च्या सुमारास, अच्युतरायाच्या कारकिर्दींत लिहिलेली असल्यानें, अधिक विश्वसनीय होय, असें अनुमान करणें गैर होणार नाहीं तो त्या हिंदू राजधानींत प्रत्यक्ष राहात होता. लिहिलेल्या गोष्टी घडल्यानंतर थोड्याच अवकाशांत, वाकबगार हिंदू लोकांकडून माहिती मिळवून, त्यानें आपली कैफियत लिहिली. फेरिस्तानें इतिहास लिहिला तो सं. १६०७ च्या सुमाराला. तो वृत्त-समकालीन लेखक अथवा तज्ज्ञ हिंदू लोकांमध्यें राहिलेलाही नव्हे. तो अहमद-नगरास निजामशाहच्या पदरीं राहात होता. या राजांच्या कारकिर्दींच्या 'नूनीज' नें दिलेल्या वर्षसंख्येचा इतर निःसंशय विश्वसनीय साधनावरून उपलब्ध होणाऱ्या वर्षसंख्येशीं मेळ नाहीं.

'नरसिंहरायानें गादी बळकाविली तेव्हां पूर्वींच्या राजघराण्यांतील शेवटचा राजा विरूपाक्षाचा पुत्र, 'पेद्दाराव' विजयनगराहून पळून गेला. नरसिंहरायानें ४४ वर्षें राज्य केलें. तो मृत्यू पावला तेव्हां त्याला दोन पुत्र होते,' असें 'नूनीज' नें लिहिलें आहे. तसेंच, हे दोन्ही राजपुत्र अल्पवयी व राज्य करण्याला असमर्थ होते म्हणून राजानें मरतेवेळीं सर्व राज्यकारभार आपला महामंत्री नरसा नायक, याच्याकडे सोंपला. पुढें ते दोघेही राजपुत्र मारले गेले. नरसानें राजपद बळकावलें. त्यानें किती वर्षें राज्य केलें तें लिहिलें नाहीं. त्याचा पुत्र 'भुजबलराय'-'बसवराय' गादीवर बसला. त्यानें ६ वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून थोर व प्रतापी कृष्णदेवराय राजा झाला. त्याच्या राज्यारोहणाचें साल सं. १५०९ होतें, असें पक्कें ठरलें आहे. तेव्हां त्याच्या पूर्वीं भुजबलराय सं. १५०३ सालीं गादीवर बसला म्हणावयाचें. नरसानें ५ वर्षें राज्य केलें असें मानलें तर तो सं. १४९८ त गादीवर बसला असें होतें, आणि नरसिंहरायाच्या ४४ वर्षांच्या कारकिर्दीचा आरंभ सं. १४५४ सालीं येतो. पण त्या वेळीं दुसऱ्या देवरायाचा पुत्र मल्लिकार्जुन याची कारकिर्द येते. कदाचित नरसिंहरायाची कारकिर्द, तो महामंत्री व प्रमुख सरदार या नात्यानें प्रबल व्हावयाला लागला तेव्हांपासून सुरू झाली, असें पुढेंपुढें धरूं लागले असेंही म्हणतां येईल.

मुहम्मदशहा बहामनी मृत्यु पावण्याच्या पूर्वीं थोडे दिवस, विजयनगर येथें 'सेवाराय'-'शिवराय'-नांवाचा राजा होता, असें फेरिस्तानें लिहिलें आहे. विजापुरचा पहिला आदिलशाही सुलतान आदिलशहा याच्या संबंधें सं. १४८९ सालाविषयीं लिहितांना, फेरिस्तानें म्हटलें आहे कीं, त्याचा प्रति-

स्पर्धी कासम बरीद यानें, आपल्या शत्रूच्या वाढत्या प्रभावाचा प्रतिकार करण्यासाठीं, त्यावेळच्या विजयनगरच्या मुख्य मंत्र्याकडे मदत मागीतली, व ' राजा अल्पवयीं असल्यानें त्याचा मंत्री ' हीमराय ' यानें फौज पाठवून रायचूर व मुद्गल पर्यंतचा प्रदेश कबजांत घेतला, ( फेरिस्ताच्या इतिहासाच्या भाषांतराच्या दुसऱ्या एका प्रतीमध्यें ' हीमराया'च्या जागीं ' तिम्मराय ' असें नांव दिलें आहे. ) ही गोष्ट हि. सं. ८९३–सं. १४८९-९०–मध्यें घडली. हीमराय हें नांव, सिंह किंवा नरसिंहराय, अथवा नरसा–ज्याला वीर नरसिंह ह्मणतात-त्याच्या ऐवजीं ही पडलें असेल.

याच गोष्टीची फेरिस्तानें दुसरीही एक हकीकत दिली आहे. तिच्या अन्वयें, विजयनगर येथें आपसांत झगडे चालले असल्याचें ऐकून आदिलशहानें बहुधां सं. १४९३ मध्यें रायचूरावर स्वारी केली. तेव्हां हीमराय आपसांतील तंटे आटपून, त्या ' तरुण राजासह ' रायचूरास पोहोंचला. तेथें लढाई झाली. तिच्यामध्यें हीमरायाचा पराभव झाला, व राजाला असाध्य जखम झाली. तिच्यामुळें तो राजधानींत परत पोहोंचण्यापूर्वींच मरण पावला. तेव्हां हीमरायानें सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं.

पहिल्या राजघराण्याचा नष्टांश होऊन हीमराय गादीवर बसला, या संबंधाचे आणखी दोन उल्लेख फेरिस्ताच्या इतिहासांत आढळतात. ' हीमराय यानें प्रथम राज्यपद बळकाविलें. विजयनगरचा राजा शिवराय याच्या पुत्राला त्यानें विष देऊन मारलें आणि त्याच्याच धाकट्या भावाला हातचें बाहुलें बनवून, हळूं हळूं पूर्वींच्या सरदार लोकांचा फडशा पाडला व साऱ्या राज्यावर आपला पूर्ण अंमल बसविला. ' ' विजयनगर येथील राज्यकारभार सारखा सातशें वर्षें एकाच राजघराण्याकडे राहिला होता. शिवराय मरण पावल्यावर त्याचा अल्पवयी पुत्र गादीवर बसला. तोही लौकरच मरण पावला. तेव्हां गादीचा वारसा त्याच्या अल्पवयीं धाकट्या भावाकडे आला. राज्याधिकाररूपी सुंदर उद्यानांतून सुखोपभोगरूपीं पुष्पें वेंचून घेण्याला अवकाश मिळतो न मिळतो तोंच, आस्मानांतून नैसर्गिक चांचल्यानुरूप प्रलयकालाचा प्रखर व विध्वंसक वायू सुटून त्याची जीवितरूपी उद्यानभूमीच उध्वस्त झाली. त्याच्या मागून एक तीन महिन्यांचें मूल गादीवर ठेविलें गेलें. त्याच घराण्यांतील राज्याचा एक प्रमुख मंत्री, ' हीमरायजी,' राज्यांत कुल मुखत्यार झाला. तो मोठा शाहाणा व अनुभवी ह्मणून प्रसिद्ध होता. त्याची ताबेदारी सारे मांडलिक व सरदार यांनीं ४० वर्षें आनंदानें मान्य केली. राजा प्रौढ होतो तोंच, त्यानें त्याला विष दिलें आणि त्याच्या अज्ञान बालकाला नांवाला राजा करून

आपली कुल मुखत्यारी कायम ठेविली. हीमरायजी मरण पावल्यावर त्याचा पुत्र रामराय त्याचें काम पाहूं लागला. शिवरायाच्या कन्येशीं त्याचें लग्न झालेलें होतें या नात्यामुळेंही त्याचें प्राबल्य विशेष वाढलें होतें.'

( विरूपाक्षाचे दोघे पुत्र तसेंच मुख्य मंत्री नरसा व त्याच्या वेळचे दोन राजपुत्र, यांच्या विषयीं ' नूनीज ' यानें दिलेल्या हकीगतीशीं वरील हकीगतीचा बराच मेळ आहे. )

फेरिस्तानें सं. १५३५ सालच्या सुमाराला घडलेल्या एका गोष्टीचा उल्लेख केला आहे. तिच्या विषयीं पुढें विचार केला जाईल.

सं. १५३० सालच्या वृत्ताविषयीं फेरिस्ता ह्मणतो, 'त्यावेळीं हीमरायजी मरण पावलेला असल्यामुळें विजयनगरच्या राज्य कारभारांमध्यें बरीच गडबड झालेली होती. त्याचा पुत्र रामरायजी नुकताच गादीवर आला होता.' या त्याच्या लिहिण्यावरून, हीमराज किंवा तिम्मराज हें नांव मुसलमानांनीं विजयनगरचे नरसिंहराय, नरसा किंवा वीर नरसिंह, आणि कृष्णदेवराय यांच्या कारकिर्दींतील राज्यकर्त्याला दिलेलें नांव होय, असें ठरविण्याला उत्तम साधन होतें. कृष्णदेवराय सं. १५३० त मरण पावला. नरसा व कृष्णदेवराय, यांचा प्रबल महामंत्री ' साळुवा तिम्मा ' यालाच त्यांच्या ऐवजीं राजकर्ता समजून, तीघांचीही मिळून एकच कारकिर्द व कैफियत लिहून, फेरिस्तानें गडबड केली असेल. सं. १५३० त अच्युतराय गादीवर बसला तेव्हांपासून तों सं १५६५ पर्यंत, रामरायजीच राजा असल्याबद्दल त्यानें लिहिलें आहे.

' नूनीज ' व फेरिस्ता, यांनीं दिलेलीं नांवें व इतर थोडा तपशील यांच्यांत कांहीं तफावत आहे, तरी दोघांच्याही हकीकतीचा मूळ आधार बराच खरा आहे असें दिसतें. दोन राजपुत्र बंधू बंधू, गादीवर आले. त्यांच्या मागून गादीच्या दुसऱ्या दोघां वारसांचे खून झाले, व अखेर मुख्य मंत्र्यानें गादी बळकाविली, असें दोघेही लिहितात.

आतां फेरिस्तानें दिलेल्या हकीगतीपकीं जास्त विश्वसनीय भागाचा विचार करावयाचा.

सं. १४७९ सालीं यूसफ आदिलखान यानें विजापुर येथें स्वतःला स्वतंत्र राजा ह्मणविलें. नंतर लौकरच त्याचा प्रतिस्पर्धी कासम बरीद–हा पुढें बेदर अहमदाबाद येथील स्वतंत्र राजा झाला–याला हेवा वाटून, त्यानें रायचूर व मुद्गलच्या आसपासचा दुआबांतील प्रदेश दंऊ करून–विजापुरवाल्यांविरुद्ध विजयनगरवाल्यांची कुमक मागितली. त्याप्रमाणें नरसिंहराय एक मोठी फौज घेऊन तुंगभद्रा पार उतरला व दुआबांतील मुलुख लुटून फस्त-करीत तो रायचूरा-वर आला. त्यानें रायचूर व मुद्गल हीं दोन्ही शहरें घेतलीं तेव्हां तीं पुनः एकदां विजयनगरच्या राज्यामध्यें सामिल झालीं.

पुढें लौकरच--सुमारें सं. १४९३ सालीं--सुलतान यूसफ आदिलशहा, हा गेलेला मुलुख परत घेण्यासाठीं मोहिमेवर निघाला. तो कृष्णातटाकीं पोहोंचल्यावर आजारी पडला. यामुळें त्याला २ महिने तेथेंच तळ देऊन राहावें लागलें. त्याविषयीं तपशीलवार हकीकत अशीः—या अवसरांत हीमराज' यानें आपलें गृहकलह मिटविले, आणि राजाच्या हाताखालच्या भारी फोजेसह, तो रायचूराला आला. त्यामुळें आदिलशाहाची फोज फारच घाबरून गडबडून गेली. सुलतान बरा व्हावा, म्हणून सर्व फोजेनें ईश्वराची मनोभावें प्रार्थना केली. (ती सफल होऊन तो बराही झाला).

हीमराज तुंगभद्रा उतरून वेगानें चढाई करून येत असल्याचें ऐकतांच आदिलशहानें आपल्या फोजेचा हजेरी घेतली, आणि पुढें चालून जाऊन हिंदू फौजेपासून थोडया अंतरावर तळ दिला. बरेंच दिवस दोन्हीं दळें स्वस्थ राहिलीं. पुढें रजब महिन्यांत एका रविवारीं, सं. १४९३ च्या एप्रिल महिन्यांत, लढाईचें तोंड लागलें. आरंभी आदिलशहाच्या फोजेतील ५०० लोक मारले जातांच बाकीचे लोक गडबडून परत फिरले. सुलतानानें त्यांना धीर देऊन थोपविलें. त्याच्या एका हुद्देदाराला शत्रूनें पकडलें होतें, पण तो सुटून आला. वाटेंत त्यानें शत्रूचें लोक अस्ताव्यस्त विखरून लूट करण्यांत निमग्न झाले असलेले पाहिले होते. अशा स्थितींत त्यांच्यावर सहज हल्ला करितां येईल हें लक्ष्यांत घेऊन त्यानें तसें सुलतानाला सुचावलें. ही गोष्ट सुलतानाला मानवली व त्यानें ती अमलांतही आणिली. लूट करण्यांत निमग्न असलेले आपले फोजेचे लोक पुनः युद्धासाठीं जमवून सज्ज करण्याला हीमराजाला फुरसत मिळाली नाहीं. वरेंचसें पायदळ, ७००० स्वार, व ३०० हत्ती, इतक्यानिशींच तो युध्दाला उभा राहिला. त्याच्या मध्य भागावर आदिलशहानें भारीच नेटानें हल्ला केला. त्याच्या पुढें शत्रूला टिकाव धरवला नाहीं. ते लोक उधळून पळाले. १००० घोडा, २०० हत्ती, ६०००००० होन्न नगदी व शिवाय पुष्कळसें जड जवाहिर, सुलतानाच्या लोकांच्या हातीं लागलें. प्रसादोन्मुख विजय वायूच्या सपाट्यानें सुलतानाचें निशाण फडकूं लागलें. तरुण राजासुध्दां हीमरायजी विजयनगराला पळून गेला. 'राजाला लढाईंत तीराची जबर जखम झाली होती, तिच्यामुळें तो वाटेंतच मरण पावला. हीमरायजीनें राज्याधिकार बळकाविला, पण कांहीं प्रमुख सरदार त्याला विरुद्ध झाले, व आपसांत तंटे सुरू झाले, आणि पुढें कांहीं काळपर्यंत आदिलशहाला तिकडून लढाई संबंधांत उसंत मिळाली.'

झगडयांत रहात आलेला दुआबाचा प्रांत पुनः मुसलमानाच्या अमलाखालीं गेला, तसेंच गोवेंही विजापूरवाल्याकडेच राहिलें.

फेरिस्ताच्या लेखाअन्वयें यूसफ आदिलशहाच्या कारकिर्दीतील शेवटची महत्वाची गोष्ट 'म्हटली ह्मणजे, 'हि. सं. ९१५–एप्रिल सं. १५०९-१०–मध्यें अवचित हल्ला करून गोवें शहर ख्रिस्ती लोकांनीं घेतलें व तेथील मुसलमान अमलदार आणि पुष्कळसे लोक ठार मारले, ही होय. याबद्दल खबर येतांच आदिलशहानें ३००० दक्षिणी व परमुलखी निवडक लोकांसह शत्रूला सुगावा लागण्यापूर्वी मोठ्या त्वरेनें तेथें पोहोंचून तेथील किल्ला परत घेतला. आणि पुष्कळशा फिरंगी लोकांची कत्तल केली. त्यांतून जे आपल्या गलबतांत बसून दर्यामध्यें आश्रयाला गेले तेवढे बचावले.'

हे ख्रिस्ती लोक अल्बूकर्कच्या हाताखालचे पोर्तुगीज. त्यांनीं ताः १ मार्च सं. १५१० रोजीं गोव्यांत प्रवेश केला होता.

या सुमाराला हिंदुस्थानांतील आपल्या या ऐतिहासिक रंगभूमीवरील प्रमुख पात्रांमध्यें पुष्कळच परिवर्तन झालेलें होतें. अहमद निजामशहा सं. १४९० सालीं अहमदनगर येथें स्वतंत्र झाला होता. तो सं. १५०८ मध्यें वारून त्याचा अल्पवयी सातां वर्षांचा मुलगा बुऱ्हाणशहा गादीवर आला होता. त्याचपाशीं पुढें यूरोपियन प्रवाशी 'गार्शिया–डाओर्टा,' याचा चांगलाच स्नेह झाला होता. (हा प्रवासी सं. १५३४ त ह्मणजे बहुतेक 'नूनीजच्या समकालींच विजयनगरांत होता.) त्यानें निजामशहाला 'माझा मित्र' असें ह्मटलें आहे. यूसफ आदिलशहा सं. १५१० मध्यें मरण पावला व त्याचा पुत्र इस्मायलशहा गादीवर बसला. सं. १५९० सालीं कृष्णदेवराय विजयनगरच्या राजपदावर आला. पुढें त्या दोघांचा वरचेवर सामना होत गेला. अखेर हिंदू बखरी अन्वयें कृष्णदेवरायाला पूर्णपणें विजय प्राप्त झाला. रायचूर येथील घनघोर व भयंकर लढाईत कृष्णरायानें इस्मायल आदिलशहाला पक्काच धक्का दिला, असें फेरिस्तानें लिहिलें आहे.

या कृष्णदेवरायाच्या कारकिर्दी विषयीं तपशीलवार लिहिण्यापूर्वी ज्या पोर्तुगीज लोकांनीं गोवें घेतलें, ते हिंदूस्थानांत येऊन व कांहींतर खास हिंदूराजधानींत पोहोंचून कसे राहूं लागले, याविषयीं माहिती देणें इष्ट आहे.

## पोर्चुगीज लोकांचा हिंदूस्थानांत प्रवेश.

सं. १४८४ मध्यें पोर्चुगालचा राजा 'जान' यानें हिंदूस्थानांविषयीं कांहीं माहिती करून घेऊन, या विलक्षण व संपन्न प्राच्य देशाचा शोध लावण्यासंबंधानें चौकशीही केली. या कामगिरीसाठीं त्यानें ३ गलबतें तयार केलीं; पण इतक्यांत तो मृत्यु पावला. त्याच्या मागून 'डाम म्यान्यूअल' गादी-

वर आला. त्यानें या कामीं चांगलेंच मन घातलें. ' वास्को-डी-गामा ' व त्याचा भाऊ ' पाउलो ' यांच्या स्वाधीन त्यानें तीं तीन्हीं गलबतें केलीं, व त्यांना ' केप आफ् गुड होप ' ला फेरा देऊन येण्यासाठीं धाडलें. त्यांनीं विलक्षण सफरी केल्या. त्यांचें वर्णन ' वास्को-डी-गामाच्या तीन सफरी ' या नांवाच्या पुस्तकांत दिलेलें आहे. तें ' कारिया ' च्या 'लेंडास-डी-इंडिया' नांवाच्या ग्रंथाच्या कांहीं भागाचें भाषांतर आहे. ' डा-गामा ' तारीख ८ जुलाई सं. १४९७ रोजीं निघालेला तारीख २६ आगष्ट सं. १४९८ रोजीं कालीकटजवळ पोहोंचला. प्रथम प्रथम तेथील सामूरी–झामोरिन–राजा स्नेहानें वागला, पण पुढें पोर्चुगीज लोकांचा गैरसमज होऊन, त्यांचें हिंदू लोकांशीं व्यापारसंबंधीं दळणवळण किंवा नुसता स्नेहसंबंध सुद्धां राहण्याला पंचाईत पडली. नंतर लौकरच ' डा-गामा ' पोर्चुगाल देशाला परत गेला. सं. १५०० च्या अवलीस 'केब्राल' हा दुसरें एक मोठें आरमार घेऊन निघाला होता, तो तारीख १३ सप्टेंबर रोजीं कालीकटजवळ दाखल झाला. त्याचें सामूरीशीं जणों सलामीलाच भांडण जुंपलें. पुढें स्वस्थ व सुरळीत व्यापार चालण्याऐवजीं पोर्चुगीज लोक इकडील लोकांवर हल्ले करीत राहिले. या मुळें त्यांच्याविषयीं त्या लोकांच्या मनांत कायमचें वैर, द्वेष व तिरस्कार उत्पन्न झालें. ते त्यांना अगदीं पाण्यांत पाहूं लागले. तरी थोडेसे युरोपियन लोक त्यांच्या मध्यें टिकून वसाहत करून राहिले. त्यांतच तत्कालीन प्रसिद्ध लेखक, 'डुआरटे–बारबोसा' हा होता.

'डा. गामा' सं. १५०४ मध्यें हिंदुस्थानांत परत आला. ( हें साल चुकीचें दिसतें. ) त्यानें पोर्चुगालचा राजा साऱ्या सागरांचा व उपसागरांचा मालक आहे, असें प्रसिद्ध करून, हिंदुस्थानाच्या किनाऱ्या जवळच एक मोठें गलबत बुद्ध्यां दुष्टपणें बुडविलें. त्याच्यांतील शेकडों लोक प्राणास मुकले. तारीख २९ आक्टोम्बरला तो कालीकट येथें पोहोंचला, व त्यानें एकदम त्याच्यावर तोफा चालविल्या तेथील बंदरामध्यें कोळी लोक होते. त्यांना पकडून, त्यातून ८०० लोक त्यानें फारच क्रूरपणें व हाल हाल करून ठार मारले. सं. १५०३ मध्यें कोचीन येथें एक वखार कायम करून तो युरोपाला परत गेला. त्याच्या दांडगाईमुळें कोचीन व कालीकट यांच्या दरम्यान युद्ध सुरू झालें पुढील वर्षीं ' लोपोसोआरेस ' हा १४ मनवारांचें आरमार घेऊन आला. कोचीनचा राजा पोर्चुगीज लोकांशीं नेहमीं स्नेहभावानें वागून, त्यांना मदत करीत होता, तरी त्यानें तें बंदर व्यापाराला बंद केलें.

सं. १५०५ सालीं ' अलमीडा ' हिंदुस्थानच्या किनाऱ्या वरील साऱ्या

पोर्तुगीज प्रदेशाचा व्हाईसराय किंवा राजाचा प्रतिनिधी नेमला गेला. तो मोठें थोरलें आरमार व १५०० शिपाई घेऊन इकडे आला. होनावर येथें त्याच्या कांहीं झटापटी झाल्या नंतर स्वस्थ, सुरक्षीत व शांततेनें व्यापार करीत राहण्यांतच आपलें खरें हित आहे, उमाप खर्च व दगदग करून यद्देशी लोकांवर त्वेशानें हल्ले करीत राहण्यांत नव्हे, हें त्याच्या लक्ष्यांत आलें. तसेंच विजयनगरचें भारी मोठें व संपन्न साम्राज्य व तेथील राजा नरसिंहराय किंवा नरसा,-याचें ऐश्वर्य व प्रताप यांविषयींची माहिती त्याला एका प्रतिष्ठित हिंदू गृहस्थाकडून कळली. त्याचा पुत्र 'लूरन्‌शो' याला सं. १५०६ सालीं कानानोर येथें इटालियन प्रवासी 'वारथेमा' याच्याकडून ही तिकडील प्रदेशाविषयीं खरी माहिती मिळाली. त्यावरून अलमीडानें भाटकल येथें एक तटबंदीदार वखार बांधण्याविषयीं नरसिंहरायाकडे परवानगी विचारली. पण त्याला उत्तरच मिळालें नाहीं. या सुमारास मिळालेला अनुभव व माहिती यानीं पूर्ण भरलेली सुरेखशी कैफियत 'वारथेमा' यानें लिहून ठेवलेली उपलब्ध आहे. तिच्यांत तो म्हणतो कीं, त्यावेळीं गोवें 'साबेन' याच्या अंमलाखालीं होतें. हा 'साबेन' विजापूरच्या राजाचा हस्तक होता. त्याचें विजयनगरचा राजा नरसा याचथार्शीं युद्ध चाललें होतें. ( साबैन म्हणजे सूभा किंवा सुभेदार असावा. मोठ्याशा प्रदेशावरील अधिकाऱ्याला सूभा किंवा सुभेदार म्हणण्याचा परिपाठ मुसलमानी अंमलांत फारा दिवसांपासून चालत आलेला आहे.)

'विजयनगर शहर फारच मोठें आणि भव्य व विस्तीर्ण असून त्याच्या भोंवतीं मजबूत कोट बांधलेले आहेत. तें एका पहाडाच्या कडेला वसलेलें आहे. त्याचा घेर सात मैल आहे. हे कोट तिहेरी आहेत.' तें शहर भारी संपन्न असून तेथें हर तऱ्हेचा माल मिळतो व तोही विपुल. शहर वसलेली जागा सुरेख असून तेथील हवा पाणी ही उत्तम आहे. रायाच्या पदरीं ४०००० स्वार व ४०० हत्ती नेहमीं राहतात. प्रत्येक हत्तीवर सहा जवान असतात. लढाईमध्यें त्यांच्या सोंडेंत लांब लांब तरवारी देतात ' असेंहि त्यानें वर्णन केलें आहे. हें वर्णन ' पायेस ' व ' निटिकिन ' यांनीं दिलेल्या वर्णनाशीं जुळतें आहे. सामान्य लोक कंबरेला एक लहानसें फडकें गुंडाळतात. बाकी ते बहुतेक उघडेच असतात. राजाच्या डोकीला दोनविती उंच किनखापाची उभी टोपी असते. त्याच्या स्वारीच्या घोड्यावर बहुमोल अलंकार घातलेले असतात. त्यां सुद्धां त्याची किंमत आपल्याकडील किती तरी शहरांच्या मोलाहून जास्त भरेल. पोर्तुगीज लोकांशीं झालेल्या युद्धांमुळें कालीकट शहर व बंदर पार बुडालें, ' असेंही त्यानें लिहिलें आहे.

कालीकट येथें मूर किंवा मुसलमान लोकांनीं या 'वारथेमा'च्या समक्ष ४८ पोर्चुगीज व्यापारी ठार मारले. ही धोक्याची स्थिती पाहून तो तेथून निघाला आणि दक्षिण किनाऱ्याला प्रदक्षिणाशी करीत पुढें रवाना झाला.

सं. १५०६च्या मार्च महिन्यांत पोर्चुगीज आरमारानें कालीकटच्या राजाच्या पदरच्या लहान लहान होड्यांचा एक अत्रा मोठा तांडा बुडविला. त्यांत पुष्कळच लोक प्राणास मुकले. पुढच्या वर्षींहि पोर्चुगीज लोकांनीं अशीच कांहीं आगळीक व अत्याचार केला. त्यामुळें त्यांच्या कानानोर येथील वखारीला वेढा पडला. पण 'ट्रिस्टन डा-कुन्हा' हा पोर्चुगाल देशाहून ऐनवेळीं नवीन आरमारासह येऊन पोहों-चला. त्यामुळं आंतील लोकांची सुटका झाली. सं. १५०८ मध्यें 'डा-कुन्हा' आणि 'अलमीडा,' दोघांनीं मिळून कालीकटावर हल्ला केला त्यांत त्यांना बरेंच यश आलें.

यावेळीं 'अलफान्सो अल्बूकर्क,' ईराणच्या आखातांत सांपडतील त्या सर्व मूर लोकांचा समाचार घेत होता. सं. १५०९ च्या अखेरीला तो 'अलमीडा'च्या मागून पोर्चुगीज इंडियाचा गव्हर्नर, आणि 'डिओगो लोपेस डी-सेकिरा,' हा कन्या कुमारीच्या पूर्वेकडील समुद्रांमध्यें पोर्चुगालच्या राजाचा हस्तक याप्रमाणें नेमिले गेले.

सं. १५०९ मध्यें कृष्णदेवराय विजयनगरच्या गादीवर बसला. तेव्हां पासून या प्रदेशाच्या इतिहासासंबंधें क्रमभंग विषयक गडबड व घोटाळा बराच कमी आहे. हा काल विजयनगरच्या इतिहासांत अप्रतिम भाग्योदयाचा व खऱ्या विज-याचा होता. त्यावेळीं तेथील फौजा सर्वत्र पराक्रम गाजवीत होत्या, आणि खुद्द राजधानीच्या भरभराटीचा हा जणों कळस झाला होता.

---

# भाग दाहावा.

## कृष्ण देवरायाची कारकिर्द—सं. १५०९ ते १५३१.

कृष्णदेवरायाचा स्वभाव व त्याचें स्वरूप—बंकापुर—'अलमीडा' आणि 'फादर ल्यूई' यांची वकीली—'डूआर्टे बारबोसा,—त्यानें केलेलें राजधानीचें वर्णन—राजाच्या प्रथम प्रथमच्या मोहिमी—कोंडापल्ली—राजमहेंद्री—कोंडवीड—उदय-गिरी—गोवळकोंडा येथील कुतुबशहाच्या तेलंगणांतील लढाया.

हंपी येथील पंपापतीच्या मंदिरांत एक शिलालेख आहे. त्याच्या मध्यें कृष्णदेवराय गादीवर बसला तेव्हां, त्यानें तेथें एक सभामंडप व गोपूर बांध-

विलें, असें लिहिलें आहे. त्या लेखांत चैत्र शुद्ध १५ शके १४३१, शुक्ल नाम संवत्सर ही मिती दिली आहे. शके १४३१ संपता शुक्ल नाम संवत्सर येतो, या मुळें वरील मिती विषयीं संशय राहून, या राज्यारोहणाची नक्की तारीख कळत नाहीं. याच्यांत शक देण्यांत चुकी आहे. संवत्सराच्या नांवांत, तसेंच मंडपस्थापना ऐन राज्यारोहणाच्या दिवशीं झाली किंवा पुढें वर्ष पुरें झाल्यावर, या विषयीं ही वादच आहे. तरी कृष्णदेवराय सं. १५०९ त गादीवर बसला, असें मानण्यांत फारशी चूक होणार नाहीं. (याच वर्षी यूरोपांत इंग्लंड देशांत आठवा हेनरी राजा गादीवर बसला. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीचें नूनीजनें केलेलें वर्णन वाचतांना, या सुमारास इंग्लंडांत तसेंच बहुतेक पश्चिम यूरोपांमध्यें, राज्यवैभवाचें आत्यंतिक प्रदर्शन, व अलंकार भूषणादिकांचें धारण, यांचा जसा ऊत आलेला व कळस झालेला दिसतो. हें चमत्कारिक व लक्षांत ठेवण्याजोगें आहे.) कृष्णदेवरायाला 'पायेस' यानें, सं. १५२० मध्यें, समक्ष पाहून त्याच्या विषयीं जोरदार भाषेत, मार्मिकपणें, मोठ्या उल्हासानें, व आदरानें वर्णन केलें आहे. त्यावरून तो प्रेक्षकांच्या मनावर चांगला ठसा उमटे असा विलक्षण व असामान्य पुरुष होता, असें दिसतें. हें त्याचें वर्णन इतर तऱ्हेनें ही अप्रतिम व महत्वाचें आहे. कारण त्याच्या अभावीं, कृष्णदेवराय खरोखर अन्वर्थक राजा होता, किंवा तो आपल्या मंत्र्यांच्या हातीं केवळ बाहुलें किंबहुना कैदी होता, या विषयीं दुनियेला संशयच राहता. फिरिस्तानें त्याचा नाम निर्देश पूर्वक उल्लेख मुळींच केलेला नाहीं. त्याचें विजय किंवा देणग्या वगैरेचें उल्लेख असलेल्या शिलालेखांवरून त्याच्या गोष्टी, त्या कारकिर्दीत, त्याच्या सरदारांच्या हातांनीं घडल्या असतील, असेंही मानण्याला अडचण येण्या जोगी नाहीं. पण 'पायेस' नें केलेलें वर्णन उपलब्ध आहे. तेव्हां आतां या बद्दल मुळींच शंका राहिली नाहीं. कृष्णदेवराय हा महाराजाधिराज, सिंहासनाधिश्वर व नांवाचा, तसाच सर्व रीतीनें कर्तृत्ववान, पूर्ण स्वतंत्र, निरंकुश सत्ता व अधिकार चालविणारा, स्वतःचें वजन, महत्व, व दबाव कायम ठेवणारा, प्रभाववान व प्रतापी राजा होता. ऐन आमदानींत तो चांगला सशक्त व कसलेला असून, पुढें सुद्धां कसरत सारखी कायम ठेवून, त्यानें आपलें शरीर तयार ठेविलें होतें. तो मोठ्या पहाटे उठून मुद्गल जोडी व दांडपट्टा, यांचे हात खच्चून करी, आणि त्या योगें शरीरांतील सर्व स्नायू व पट्ठे भरदार व प्रेक्षणीय ठेवीत असे. तो पटाईत घोडेस्वार होता. त्याचें शरीर, रूप, व चर्या, भव्य असून त्याच्याशीं प्रसंग पडणारावर त्यांच्यामुळें चांगलीच छाप बसत असे. पदरच्या अवाढव्य फौजेचें आधिपत्य तो स्वतः करी. तो फारच शूर, योग्य व राज्यकारणी असून मनाचा उदार, अंतःकरणाचा कोमल व स्वभावाचा दिलदार होता. सर्व लोकांचें त्याच्यावर भारी प्रेम

असे. तरी ते त्याला अतिशय वचकत असत व त्याला भारी मान देत. ' तो सर्व तऱ्हेनें व सर्व गोष्टींत मोठा उदात्त व परिपूर्ण होता, असें ' पायेस ' यानें लिहिलें आहे. त्याच्या या चंद्रधवल यशोराशीवर एकच डाग होता. तो हा कीं आदिलशहावर अपूर्व व अप्रतिम विजय संपादन केल्या नंतर तो फारच उद्दाम व गर्विष्ट झाला. व त्यानें फारच आत्यंतिक मागण्या केल्या. आदिलशहानें समक्ष जाऊन रायाच्या पायां पडावें, अशी मुख्य अट होती. असल्या अत्यंत मानहानीकर अटीवर तह करण्याला आदिलशहा सारखा कोणीही राजा कबूल होणें शक्य नव्हतें. हा त्याचा व इतर हिंदू राजांचा गर्व व उन्मत्तपणाच या राज्याला भोंवला व तो पुढें चाळीस वर्षांच्या आंत या प्रचंड हिंदूबादशाहीच्या समूळ निःपाताला कारण झाला. सारें दक्षिण हिंदुस्थान कृष्णरायाच्या अंमलाखालीं होतें. श्रीरंगपट्टण, बंकापूर, गरसापा, कालीकट, भाटकल व बरकूर येथील नाममात्र स्वतंत्र राजे त्याचे मांडलिक होते, असें 'नूनीज' नें लिहिलें आहे. पोर्तुगीज लोक या मांडलिकांना स्वतंत्र समजूनच त्यांच्याशीं व्यवहार करीत. ते त्यांना राजा ह्मणत व त्यांच्याकडे वकील पाठवीत. यांत त्या राजांना अर्थातच बरें वाटत असावें. (बंकापूरचा राजा मराठा असावा असें दिसतें.) ' अल्बूकर्क ' यानें विजयनगरच्या व बंकापूरच्या अशा दोन्ही राजांकडे दोन वकील पाठविले होते. विजयनगराला जाण्याचा चांगला सोईचा व बंदोबस्ताचा रस्ता बंकापूरच्या राज्यांतूनच असून, त्याच्यांत धान्यसामग्री वगैरेची सुबत्ता होती. तेथील राजांचीं नांवें ' बारोस ' यानें ' कोमाजी ' किंवा ' गोमाजी ' व ' आप्पाजी, ' अशीं दिलीं आहे.

( बंकापूरचा किल्ला साऱ्या कर्नाटकांत फारच मजबूत ह्मणून प्रसिद्ध होता. तो धारवाडच्या दक्षिणेस, सुमारें ४० मैलांवर, होनावरपासून विजयनगराला जाणाऱ्या मुख्य मार्गावर आहे. भाटकल बंदरापासून, हा मार्ग उत्तरेस होनावराला जातो व तेथून घाटावर बंकापूर, बनवासी, आणि राणेबिन्नुर या गांवांवरून होसपेठ व विजयनगराला जात असे. सं. ८४८ पासून या किल्ल्या संबंधीं माहिती उपलब्ध आहे. तेव्हां पासून तो सारखा हिंदू राजाकडेच होता. तो सं. १५७३ सालीं आदिलशहानें घेतला व तेथील सुरेख मंदिर पाडून टाकलें. यालाच फेरिस्तानें ' बीकापूर ' व ' बिंकापूर ' ह्मटलें आहे. )

हंपी येथील मुख्य पुजारी ब्राह्मण याच्या सांगण्यांत, कृष्णदेवरायानें गादीवर बसतांच, त्याचें स्मारक ह्मणून, त्या देवालयाच्या महाद्वारावरील प्रचंड गोपूर बांधविला. पुढें लौकरच त्याच्या खालोखाल असा दुसरा ही गोपूर बांधविला. ' नूनीज ' च्या लेखाप्रमाणें कृष्णदेवरायानें राजसत्ता हातीं घेतांच

'साळुवा तिम्मा' याला दिवाणगिरी दिली. माजी राजाचा पुत्र, त्याचा पुतण्या, आणि आपले तीघे बंधू, यांना त्यानें बंदोबस्तासाठीं चंद्रगिरीच्या मजबूत किल्ल्यावर नेऊन ठेवलें. तो किल्ला विजयनगराच्या आग्नेयीस सुमारें ८० मैलांवर आहे. तो स्वतः कांहीं काल राजधानींतच राहिला. हें 'नूनीज' चें लिहिणें इतर पोर्चुगीज कैफियतकारांच्या लेखांशीं जुळतें. कारण कालीकट येथून 'फादर ल्यूई' व 'शानोका' हे विजयनगरास गेले त्यावेळीं, तेथेंच त्यांची राजाशीं भेट झाली.

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला 'अल्मीडा' हा पोर्चुगालाच्या अंमलांतील प्रांतांचा व्हाईसराय होता. पण सं. १५०९ च्या अखेरीला 'अल्बूकर्क' हा गव्हर्नर होऊन आला. त्याचा कालीकट येथें बराच मोड झाला होता. सबब त्यानें 'फादर ल्यूई' याला विजयनगरास वकील पाठविलें. तो 'सेंट फ्रान्सिस' च्या पंथापैकीं पाद्री होता. रायानें खुष्कीनें फौजेसह येऊन कालीकट-च्या सामूरीला जेरीस आणावें, व आपण समुद्राच्या बाजूनें मदत करूं, असें बोलणें चाललें होतें. ('फादर ल्यूई' कोचीनहून भाटकलास व तेथून विजयनगराला गेला होता.) 'अल्बूकर्क' यानें रायाला असेंही सांगून पाठविलें कीं, 'आपणाला आपल्या राजाचा हुकूम आहे मूर-मुसलमान-लोकांशीं लढाई करण्याचा, हिंदू लोकांशीं नव्हे—व त्याप्रमाणें आपण कालीकटचा नाश करून टाकला आहे. तेथील राजा—सामूरी-वाटांवर—देशांत निघून गेला आहे. माझें आरमार मी कालीकट बंदर काबीज करण्याच्या कामीं मदतीला येतों. कालीकट हातीं येतांच मूर लोकांना तेथून हांकून दिलें जाईल. नंतर आपले शत्रू दक्षिणेंतील मुसलमान यांच्या विरुद्धही आम्ही मदत करूं.' इतःपर अरबी व इराणी घोडे विजापुरास न पाठवितां ते सारे रायाकडेच पाठविण्याचेंही त्यानें कबूल केलें. त्याला राजाकडून कांहींच जबाब मिळाला नाहीं.

पुढें 'अल्बूकर्क' यानें गोव्यावर हल्ला केला. तें त्यावेळीं आदिलशहाच्या ताब्यांत होतें. या नंतर त्यानें पुनः 'गास्पर शानोका' याला विजयनगर येथें वकील नेमून पाठविलें आणि पूर्वीं 'अल्मीडानें भाटकल येथें पोर्चुगीज लोकांच्या व्यापाराच्या बंदोबस्ताकरितां किल्लेवजा वखार बांधण्याविषयीं परवानगी मागितली होती तिच्याबद्दल पुनः विनंती करविली. 'बारोस' म्हणतो कीं, कृष्णरायानें 'शानोका' याची रीती प्रमाणें दरबारांत भेट घेतली व मोघम सामोपचाराचा जबाब दिला, पण गव्हर्नराचें म्हणणें त्यानें स्पष्ट कबूल केलें नाहीं. असें 'शानोकानें' लिहिलें आहे. याचें कारण त्यानें नुकताच

आदिलशहाशीं तह केला होता, हें असावें. आदिलशहाला गोवें परत घेतां यावें म्हणूनच हा तह केलेला असावा.

' या नंतर विजयनगराहून 'अल्बूकर्क' कडे गोवें घेतल्याबद्दल अभिनंदनपर निरोप आला व आदिलशहा विरुद्ध मदत करण्याचेंही अश्वासन मिळालें. पण त्याप्रमाणें ती मिळाल्याचें मात्र दिसत नाहीं. मुसलमानी फौजेनें मे महिन्यांत हल्ला करून गोवें परत घेतलें. तेथून जाण्यापूर्वी 'अल्बूकर्क' यानें तेथील १५० प्रमुख मुसलमानांची कत्तल करविली. ( याचा फेरिस्तानेंही उल्लेख केला आहे. )

पुढच्या नोव्हेंबर महिन्यांत विजापुरास गृह कलह माजला. त्याचप्रा मध्यें इस्माइल आदिलशहा गुंतला असतांना, 'अल्बूकर्क' यानें विजापूरकराचा हस्तक रसूलखान, व त्याच्या हाताखालचे ८००० लोक यांच्यावर हल्ला करून त्यांचा पराभव केला, आणि तारीख १ डिसेंबर रोजीं गोवें बंदर पुनः सर केलें. त्यानें तेथील ६००० मुसलमान आबाल वृद्ध, स्त्री पुरुषांची कत्तल केली. या नंतर तरुण आदिलशहाचा वजीर कुमालखान यानें युरोपियन लोकांशीं तह करून त्यांना स्वस्थराहूं दिलें. पण हें अक्षरशः खरें नाहीं. रसूलखानानें सन १५१२ सालीं पुनः तें बंदर परत घेण्याचा खूपच नेटानें प्रयत्न केला, पण भली थोरली लढाई होऊनही त्याला यश मिळालें नाहीं.

'अल्बूकर्क' यानें सन १५१० च्या डिसेंबर महिन्यांत गोवें परत काबिज केल्याचें वर्तमान विजयनगराला पोहोंचतांच कृष्णदेवरायानें गोंव्यास वकील पाठविले त्यांच्या बरोबर 'फादर ल्यूई' यानें 'अल्बूकर्ककडे पत्रें पाठवून आपल्या कडील हकीकत कळविली. त्या पत्रांतच त्यानें कृष्णदेवरायाशिवाय सर्वांनीं आपलें चांगलें स्वागत केलें, असे लिहिलें होतें. तरी रायानें भाटकल येथें तट बंदीदार वखार बांधण्याला परवानगी दिली होती. बिचारा 'फादर ल्यूई' विजयनगराहून परत आला नाहीं. त्यांचा विजयनगरामध्यें खून झाला. पण तो कां, कसा, कोणाकडून, या विषयीं कांहींच माहिती मिळालेली नाहीं.

त्यानें लिहिलेल्या पत्रांवरून विजापूर व विजयनगर येथील राज्याधिकारासंबंधानें बरीच माहिती मिळते. तिच्या पैकीं कांहीं भाग खरा आहे. त्याच्यांतच कृष्णदेवरायाच्या राजकारणांसंबंधाची माहिती आहे. ती इतर कोणत्याही लेखांवरून मिळत नाहीं. म्हणून हीं पत्रें बरींच महत्वाचीं व वाचनीय आहेत. त्यानें एका पत्रांत 'अल्बूकर्क' ला लिहिलें आहे कीं, 'आदिलशहानें विजापूरवर हल्ला

केला, व दोन महिने वेढादेऊन, अखेर तें काबीज केलें. त्यानें दक्षिणच्या राजाला कैद करून नेलें होतें या मुळें त्याचे चार सरदार त्याच्या विरुद्ध उठले होते. हे चार सरदार बाहमनी बादशहातीविरुद्ध बंड करणारे व चार निरनिराळीं राज्यें स्थापन करणारे चौघे मुसलमानी राज्यांचे संस्थापक होते. व दाक्षिणचा राजा म्हणजे बाहामनी बादशहा ' बेळगांवचे लोक बदलून हिंदू राजाच्या अंमलाखालीं गेले, ' असेंही तो लिहितो, व ' विजयनगरचा राजा ७००० लोकांनिशीं एका मांडलिकावर जाणार आहे, कारण त्या मांडलिकानें बंडकरून ' परगुंडा '—पेन्नकोंडा—शहरावर आपला पूर्वापार हक्क सांगून त्याचा कबजा केला आहे. तें शहर काबीज करून राजा दर्याकिनाऱ्यावरील कांहीं ठिकाणीं जाणार, पण तो कोणच्या उद्देशानें, तें कळत नाहीं. तरी पण तुम्ही ' अल्बूकर्क ' यांनीं-सावध राहावें. रायाशीं वरकांती स्नेह संबंधाचा पत्र व्यवहार चालू ठेवावा, पण तिम्मोजी, ज्याला तुम्ही पूर्ण विश्वासांतला समजतां, त्याच्यावर मात्र मुळीं विश्वास ठेवूं नये. पोर्तुगीज लोक नवनिच आले तेव्हां त्यांनें त्याच्याशीं चांगलें स्नेह भावाचें वर्तन ठेवलें होतें. पण तो अलीकडे दगाबाजी करीत आहे. तो व गरसोप्पा येथील राजा रायाला म्हणताहेत कीं, चांगली जय्यत फौज पाठवाल तर हे लोक गोव्याची तटबंदी पुरी करण्यापूर्वीं तें शहर व बंदर काबिज करून देऊं' असेंही त्यानें लिहिलें आहे.

' अल्बूकर्क ' यानें गोवें परत घेतल्यावर बंकापूरच्या राजानेंही त्याच्याकडे अभिनंदनपर निरोप पाठविला, आणि दरसाल ३०० घोडे मागवून घेण्या विषयीं परवानगी मागितली. ती त्याला दिली गेली. कारण तो किल्ला विजयनगराच्या मार्गावर होता. तेथील राजा पोर्तुगीज लोकांना अनुकूल असणें अवश्य होतें. शिवाय तेथें पुष्कळसे जीनगर लोक रहात होते.

कृष्णदेवरायाला घोडे मागविण्याची मोठी काळजी होती. समुद्रकिनाऱ्यावरील परद्वीपस्थांचीही चिमुकली वसाहात राजकीय दृष्टीनें त्याच्या किसगणतींतही नसली तरी, त्याला घोडे दरकार होते. आदिलशहाशीं सतत चालू असलेल्या लढाया साठीं ते किती तरी हवे होते. ' अल्बूकर्क ' यानें या बाबतींत थोडे दिवस मुसलमानी रियासतीशीं चाळवाचाळव करून पाहिली व अखेरीस कृष्णदेवरायाकडे निरोप धाडून कळविलें कीं, ' स्वारांच्या उपयोगाचे घोडे विजापुरच्या सुलतानाकडे पाठविण्याऐवजीं आपल्याकडेच पाठविणें आम्हाला अधिक पसंत आहे. ' यावर राया अर्थातच भारी खुष झाला.

स. १५१२ च्या सुमाराला विजापुरांत गडबडच चालली होती. तिची

संधी साधून कृष्णदेवरायानें सुल्तानाच्या राज्यावर चढाई केली व रायचूराला वेढा दिला. अखेर आंतील लोकांनीं तें शहर त्याच्या स्वाधीन केलें. इस्मायलशहा गृहकलहामध्यें निमग्न होता. या मुळें त्याला त्या लोकांचें सहाय्य करितां आलें नाहीं, असें फेरिस्ता म्हणतो. याबद्दल 'नूनीज' यानें कांहीं उल्लेख केलेला नाहीं. रायानें आदिलशहा विरुद्ध प्रथम मोहीम केली ती सं. १५२० त. त्यावेळीं रायचूर सुल्तानाच्या ताब्यांत होतें. या बाबतींत 'नूनीज' व 'फेरिस्ता' या दोघांच्या लेखांमध्यें तफावत आहे. त्या सालीं सुल्तानानें रायाच्या ताब्यांत असलेलीं रायचूर व मुदगल हीं शहरें परत घेण्याची तयारी केली, असें फेरिस्ता लिहितो. 'नूनीज' च्या म्हणण्याप्रमाणें रायचूर त्यावेळीं सुल्तानाकडेच होतें. तेव्हां यांतून खरें कोणचें तें कळत नाहीं.

कृष्णदेवरायानें सं. १५१४ सालीं 'अल्बूकर्क' याला घोड्यांच्या सौदागरीच्या मक्त्या पेटे दर साल २०००० पौंड किंवा २००००० रुपये देऊं केलें. पण पोर्तुगीज गव्हर्नर पक्का व्यापारी-त्यानें तें कबूल केलें नाहीं. पुढें थोड्या दिवसांनीं रायानें पुनः त्याबद्दल बोलणें लावलें आणि आदिलशहाशीं युद्ध सुरूं करणार असल्याचें ही जाहिर केलें. हें ऐकून आदिलशहानें ही गोव्यास वकील पाठविले. या मुळें 'अल्बूकर्क' ला राजकीय महत्व आलें. 'दरसाल ३०००० क्रूसेडो' द्यावे आणि घोडे नेण्यासाठीं स्वतःचे लोक पाठवावे म्हणजे आलेले घोडे प्रथम आपल्याला पसंत पडतील तितके देऊं. आपण नको म्हटल्यावर दुसऱ्याला दिले जातील. असें त्यानें रायाकडे सांगून पाठविलें. शिवाय त्यानें फौजेचा खर्च दिला तर विजापूरकराविरुद्ध मदत ही करण्याचें कबूल केलें. पुढें त्यानें विजापूरकराकडे ही निरोप धाडला कीं गोवें बंदरालगतचा कांहीं प्रदेश पोर्तुगालच्या राजाला कायमचा देणें कबूल असलें तर, घोडे खरेदी संबंधानें हवें नको म्हणण्याचा हक्क, प्रथम आपल्याकडे राहील. या प्रकरणाचा निकाल लागण्यापूर्वींच 'अल्बूकर्क' मरण पावला.

कृष्णदेवरायानें रायचूरावर चढाई करून मुसलमानी रियासतींवर मोठा थोरला हल्ला केला त्याच्या पूर्वीं पांच वर्षें तरी याबद्दल त्याचा बेत चालू होता, असें यावरून दिसतें. त्यानें उदयगिरी व पूर्वेकडील इतर किल्ले यांच्यावर स्वारी केली, त्यापूर्वींच एक वर्षभर त्याचा हा बेत चालू होता म्हणावयाचें.

सं. १५०४ पासून सं. १५१४, या दहा वर्षांत विजयनगराची स्थिती व वैभव यांच्या विषयीं 'मागेल्ला' याचा भाऊ 'डुआरटे बारबोसा' याच्या कैफीयतीमध्यें वर्णन दिलेलें आहे. तो त्या सुमारास तेथें गेलेला होता. 'तें शहर फारच

संपन्न आहे. तेथें सर्व तऱ्हेचें सामान सुमान व सामग्री विपुल मिळते. त्या राज्यामध्यें मोठ मोठे गांव व शहरें किती तरी आहेत, असें त्यानें लिहिलें आहे.

( 'डीगो बारबोसा' चा पुत्र ' डूआर्ट बारबोसा ' हा ' जो आव-डी-नोव्हा ' याच्या हाताखालीं सं. १५७१ सालीं प्रथम आरमार रवाना झालें त्याच्यांतून सफरीला निघाला. त्याच्या कैफीयतीमध्यें सालवारी दिलेली नाहीं. त्यानें तरुणपणा चीं सारीं वर्षे पूर्वेकडील देशोदेशीं फिरण्यांत घालविलीं. आपली कैफीयत सं. १५१६ सालीं पूरी केल्याचें मात्र त्यानें लिहिलें आहे. ती सफर त्यानें बहुधा सं. १५१४ मध्यें सुरू केली असावी. सं. १५०८-९ सालीं तो हिंदी महासागराच्या किनाऱ्यावर सफर करीत असावा हें खास आहे. या कैफीयतीला त्यानें ' हिंदी महासागराच्या किनाऱ्यावर असलेल्या प्राच्य देशांचें वर्णन,' असें नांव दिलें आहे. ती कैफीयत सं. १५१४ सालची आहे. तिचें पोर्चुगीज मधून स्पानिश भाषेंत केलेलें भाषांतर, सं. १५२४ मध्यें छापलें गेलें होतें. )

' भाटकळ येथें दर्यामधील व्यापार फार मोठा चालतो. तेथून लोखंड, गरम मसाल्याचे जिन्नस, औषधी व हिरडे परदेशीं रवाना होतात, आणि घोडे व मोती परदेशाहून येतात. पण ते आतां पोर्चुगिज लोकांच्या मुळें गोव्यास जातात. ' भाटकल येथें कृष्णदेवरायाचा पुतण्या अधिकारी होता. तो राजकीय थाटानें राहतो व स्वतःला राजा म्हणवितो. तरी तो आपला चुलता राय कृष्णदेव याचा आज्ञांकित राहतो.'

' बारबोसा ' कोंकण सोडून वाट वळांडून देशावर गेला. ' या पहाडापासून ४५ कोसांवर एक भलें मोठें शहर आहे. त्याचें नांव विजयनगर. तेथील लोकसंख्या फारच मोठी आहे. त्याच्या एका बाजूला भारी मजबूत कोट व दुसऱ्या बाजूस मोठी नदी आहे. तिसरीकडे उंच पहाड आहेत. तें शहर मैदानामध्यें वसलेलें आहे. नरसिंगाचा राजा नेहमीं तेथेंच राहतो. तो मूर्तिपूजक आहे. त्याला ' राहेनी ' ' रायनी ' म्हणतात. तेथें त्याचे मोठमोठे भव्य व सुरेख राजवाडे आहेत. त्यांच्या मध्यें पुष्कळ चौक व दालनें आहेत. मोठमोठे जाहगीरदार व सरदार तेथेंच राहतात. त्यांचेहि वाडे व देवड्या शहरभर जागजागीं आहेत. बाकीचीं सारीं घरें छप्परी व माळवदीं आहेत. रस्ते व चौक रुंद व प्रशस्त आहेत. त्यांच्या मध्यें नाना देशच्या, नाना जातींच्या व धर्मांच्या लोकांची भारी गर्दी राहते. या शहरामध्यें व्यापार चालतो त्याची कांहीं सीमा नाहीं. पेगून व ' सेलानी ' सीलोन—येथून पुष्कळ जवाहीर येतें या देशामध्यें हिऱ्यांच्या खाणी आहेत. त्यांपैकीं एक खाण रायाच्या राज्यामध्यें व दुसरी दक्षिण देशच्या राज्यामध्यें आहे. ओर्मझ व कायेलकडील बारीक मोती,

शिवाय रेशमी कापड, किनखाप, लाल कापड व पोंवळीं वगैरे ही पुष्कळच येतात.

'राजावर लिहिलेल्या राजवाड्यामध्यें राहतो. तो क्वचितच त्याच्या बाहेर पडतो. राजवाड्यामध्यें राजाकडे सेवा चाकरविर सान्या वायकाच असतात. खासगीकडील सर्व कामें त्याच करितात. त्यांच्या राहण्यासाठीं राजवाड्यांच्या आवारांतच पृथक जागा बांधलेल्या आहेत.

'राजाचा एक महाल आहे. तेथें तो, प्रमुख मंत्री व राज्य कारभार कुशल कामगारांबरोबर राजकार्य करितो. ( विजयनगर व आसमंतात भागच्या हल्लीं तयार झालेल्या सरकारी नकाशामध्यें 'कौन्सिल हाल' म्हणून एक नंबर २९ ची इमारत दाखविली आहे. तोच हा महाल असावा. ) ते लोक मौल्यवान पालख्यांमध्यें बसून फिरतात. राजवाड्याच्या मुख्य दरवाजावर पुष्कळशा पालख्या व स्वार सारखे उभे असतात. राजाच्या पदरीं खासगीच्या उत्पन्नातून खरेदी करून ९०० हत्ती व २०,००० नर घोडे बाळगलेले हाजर राहतात. स्वतः राजाच्या पदरीं पगारदार पायदळ व स्वार मिळून १०,००० लोक भरती केलेले आहेत.

'राजाच्या पश्चात त्याच्या प्रेता बरोबर चार पांचशें राण्या स्वतःस जाळून घेतात-सती जातात. नरसिंगाच्या राजाचें दक्षिण देशच्या मुसलमानी राजाशीं सारखे युद्ध चाललेलें असतें. कारण त्यानें त्याचा पुष्कळसा मुलूख दाबलेला आहे. तसेंच आंत, दूर देशावर असलेल्या 'ओटिश' बहुधा 'ओरीसा'-येथील हिंदूराजा बरोबरही त्याचा झगडा चाललेला असतो.'

पोर्तुगीज लोकांनीं घेण्यापूर्वीं, गोवें, 'साबायिम देलकानी' च्या किंवा दक्षिणच्या राजाच्या स्वाधीन असल्याचें, तसेंच 'अल्बूकर्क यानें तें प्रथम तारीख २५ फेब्रुआरी सन १५१० रोजीं, व पुनः तारीख १५ नोव्हेंबर रोजीं, काबिज केल्याचेंही 'बारबोसा' नें लिहिलें आहे.

या वेळीं कृष्णदेवरायाचें म्हैसूरांतील उम्मटूर येथील गंगाराज नांवाच्या एका उद्दाम मांडलिका बरोबर युद्ध चाललें होतें, असें इतर आधारावरून आढळतें. त्यांत त्याला पूर्णपणें यश आलें. त्यानें शिवसमुद्र व श्रीरंगपट्टण येथील मजबूत किल्ले पाडाव केले व त्या सर्व प्रांतामध्यें पुरा अंमल बसविला.

सन १५१३ सालीं त्यानें उदयगिरीवर स्वारी केली. हा एक भारी मजबूत किल्ला हल्लींच्या नेलोर जिल्ह्यांत आहे. त्यावेळीं तो ओरीसाच्या राज्यामध्यें होता. तेथें त्याला पूर्ण यश आलें. तेथल्या एका पहाडीवर एक मंदिर होतें.

त्याच्यांत एक श्रीकृष्णाची मूर्ती होती. ती त्यानें बरोबर आणून, तिची विजयनगरांत एका नव्या मंदिरांत स्थापना केली, व त्याच्या खर्चाला पुष्कळशी जमीन लावून दिली. या गोष्टीचा उल्लेख विजयनगरांतील एका भल्या मोठ्या शिलालेखामध्यें आहे. कृष्णस्वामीचें टोलेजंग मंदिर त्यावेळींच बांधलें गेलें हल्लीं तें बरेंच जीर्ण झालें आहे. तरी तेथील प्राचीन इमारतींच्या अवशेषांमध्यें तें एक बरेंच महत्त्वाचें स्थळ आहे. त्या मंदिरामध्यें एक मोठा व लांबलचक शिलालेख कायम आहे. त्यावरून या विषयींची माहिती मिळते. याच सुमारास रायानें राजवाड्या जवळच्या आवारांत हजार रामस्वामीचेंहि देवालय बांधविलें.

उदयगिरीवर ओरीसाच्या राजाची मावशी किंवा चुलती कृष्णरायाच्या हातीं सांपडली. तिला त्यानें विजयनगरास पाठविलें, असें 'नूनीज' नें लिहिलें आहे. नंतर तो ओरीसाच्या राज्यांतीलच कोंडवीडच्या सुप्रसिद्ध व प्रचंड किल्ल्यावर गेला. ओरीसाचा राजा त्या किल्ल्याच्या बचावासाठीं आला. दोघांची खूप निकराची लढाई झाली. तिच्यांत ओरीसावाल्याचा पराभव झाला. नंतर रायानें दोन महिने वेढा घालून तो किल्ला घेतला. त्या किल्ल्याचा व त्याच्या खालच्या मुलुखाचा बंदोबस्त करण्यासाठीं रायानें 'साळुवा तिम्मा' याला तेथें ठेविलें, व तो स्वतः शत्रूचा पाठलाग करीत उत्तरेकडे रवाना झाला. 'साळुवा तिम्मा'नें तेथें आपल्या भावाला हस्तक नेमिलें, असें 'नूनीज' म्हणतो. पण तेथीलच एका शिलालेखामध्यें या हस्तकाचें नांव नाडगोडा गोपमंत्री असें, व तो 'साळुवा तिम्मा' चा पुतण्या असल्याचें लिहिलें आहे. हा किल्ला सं. १४५४ पासून ओरीसाच्या राजाच्या ताब्यांत होता, असें दिसतें. तो कृष्णदेवरायानें सं. १५१५ सालीं काबिज केला.

( 'साळुवा तिम्मा'च्या प्रशस्तीचा एक लेख कोंडवीड येथें आहे. त्याच्यांत आषाढ शुक्ल हरिवासरे मौरौ शके १४३७, ह्मणजे तारीख २३ जून सं. १५१५ रोजीं त्यानें तो किल्ला सर केल्याचें लिहिलें आहे. ) बेजवाड्याच्या आग्नेयीस ८ कोसांवर 'मेंडुरू' नांवाच्या गांवांत एक शिलालेख आहे. त्याच्यामध्यें त्या गांवाजवळ सं. १५१६ सालीं एक लढाई झाली. तिच्यांत कृष्णदेवरायानें आपल्या शत्रूचा पराजय केल्याचें लिहिलें आहे. ( मूळांतच त्याचें नांव पुसून गेलें आहे. ) त्यावरून वरील गोष्टीला प्रत्यंतर मिळतें

कृष्णदेवराय कोंडपल्लीवर चालून गेला. त्याला तीन महिने वेढा घाल-

त्या नंतर-तें शहर त्याच्या हातीं आलें. तेथें असलेली ओरीसाच्या राजाची एक राणी व एक पुत्र त्याच्या हातीं लागले. त्या राजपुत्राचा चमत्कारिक शेवट झाला, तो 'नूनीज'च्या कैफियतीमध्यें दिला आहे. कृष्णराय पुढें राजमहेंद्रीला गेला. तेथें त्याचा सहा महिने तळ राहिला. पुढें लौकरच तह झाला. नंतर त्याचें ओरीसाच्या राजाच्या कन्येशीं लग्न झालें. या विवाहा नंतर रायानें पूर्व समुद्राच्या कांठीं असलेल्या 'कोटेरूर' नांवाच्या शहरावर स्वारी करून तें घेतलें, असें 'नूनीज' लिहितो. हें शहर कोणचें याचा पत्ता लागत नाहीं. (ही सारी हकीकत खरी असल्याचें प्रत्यंतर, कांची येथील वरदराजाच्या मंदिरांतील शिलालेखावरून मिळतें. कृष्णरायानें प्रथम उदयगिरीचा किल्ला घेतला. नंतर वेलमकोंडा, विनूकोंडा, कोंडवीड व अखेर राजमहेंद्री घेतल्याचें त्या शिलालेखामध्यें लिहिलें आहे.) याप्रमाणें मोहिमी करून विजय मिळविल्यामुळें त्याच्या राज्याचा सर्व पूर्वभाग त्याच्या पुर्तेपणीं अंमलाखालीं आला.

'नूनीज' च्या लेखाअन्वयें रायचूरची मोहीम उदयगिरी वगैरे वरील मोहिमेच्या नंतर लौकरच झाली, असा भास होतो. पण खरोखर तसें न होतां, रायचूरची मोहीम त्यानंतर पांच वर्षांनीं झाली.

दक्षिण देशांतील ईशान्य भागांत गोवळकोंड्याचा सुलतान कुली-कुतुबशहा यानें तिकडील हिंदु व मुसलमान संस्थानिकाबरोबर पुष्कळशा लढाया केल्या. त्या विषयींचें एक लांबलचक वर्णन कर्नल ब्रिग्स साहेबांनीं केलेल्या फेरिस्ताच्या इतिहासाच्या भाषांतराच्या तिसऱ्या पुस्तकामध्यें दिलेलें आहे. तें मूळचें फेरिस्ताचें नसून दुसऱ्या कोणी मुसलमान इतिहासकारानें लिहिलें आहे. त्याच्यामध्यें कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीच्या कांहीं भागाचाही समावेश होतो. सबब येथें त्याचा गोषवारा देणें वावगें होणार नाहीं. त्याच्यांत दिलेल्या गोष्टींची सालवारी मात्र अद्यापि पक्की ठरवितां येत नाहीं. आणि वर्णनही हिंदू व पोर्तुगीज कैफियतकारांनीं दिलेल्याहून कांहींसें भिन्न आहे. त्यांच्या वर्णनांत दिलेल्या तारखांना प्राचीन शिलालेखांचा प्रत्यंतरीं आधार आहे.

सुलतान कुली सं. १५१२ मध्यें स्वतंत्र झाला. पुढें लौकरच त्यानें हैद्राबादेच्या ईशान्येस तेलंगणांतील राजुलकोंडा व देवरकोंडा हे किल्ले घेतले. देवरकोंडा पाडाव झाल्यावर कृष्णदेवरायानें भली मोठी फौज घेऊन त्या सुलतानाच्या राज्यावर—बहुतेक सं. १५१३ सालीं—स्वारी केली. त्याच्या फौजेचा तळ रायचूराच्या पूर्वेस कृष्णानदीच्या वळणामध्यें पानगल येथें पडला होता. तेथें

क्र. १६८०

एक लढाई झाली. तिच्यांत सुल्तानाचा जय झाला. पुढें [illegible] वेढा पडला व तेंही शत्रूनें घेतलें. तेथून मुसलमानी फौज उत्तरेस २० मैलांवर घानपूर येथें गेली. त्या फौजेतील पुष्कळ लोक कामीं आल्यावर तें शहर शत्रूच्या ताब्यांत आलें. नंतर सुल्तानानें कोविलकोंडा सर केला. तो तेथून वायव्येकडे सुमारें २० मैलांवर इमादशाहीच्या हद्दींत होता. या मुळें इमादशाहाशीं युद्ध सुरू झालें. त्यांतही सुल्तानाला यश आलें. नंतर लौकरच या राज्याच्या पूर्व भागांत गडबड झाली. मुनेर नदीच्या कांठीं 'कबंमपेठ' नांवाचें गांव आहे. त्यालाच हल्लीं 'खम्ममेट' म्हणतात. तेथें सीतापती नांवाचा राजा होता. त्याच्याकडे वरंगळ, कृष्णेच्या दक्षिणेकडील बेल्लमकोंडा किल्ला व इतरही बराचसा प्रदेश होता. त्यानें उठावणी केली. तेव्हां सुल्तानानें तिकडे जाऊन बेल्लमकोंडा किल्ल्याला वेढा दिला व बऱ्याच दिवसां नंतर तो सर केला. पुढें सीतापतीशीं निकराची लढाई झाली. तिच्यांत पराभव पावून तो पळून गेला आणि सुल्तान गोवळकोंड्याला परत गेला. पुढें सीतापतीनें आसपासच्या संस्थानिकांना प्रोत्साहन देऊन, त्यांच्या मदतीनें 'खम्ममेट' येथें पुष्कळशी फौज जमविली. हें ऐकून गोवळकोंड्याची फौज त्यांच्यावर चालून आली. तिनें सीतापतीला उधळून लावलें. तो ओरीसाच्या राजाची राजधानी कोंडपिल्ली येथें गेला व त्यानें गजपती राजाचा पुत्र रामचंद्रदेव याचा आश्रय केला. सुल्तानानें 'खम्ममेट' वर हल्ला करून तो किल्ला घेतला व तेथील साऱ्या माणसांची कत्तल केली आणि सीतापतीचीं बायका माणसें आपल्या जनानखान्यांत घातलीं. पुढें ओरीसाच्या राजाच्या हाताखालीं आसपासच्या सर्व हिंदू लोकांचें एक भलें मोठें सैन्य स्वदेश संरक्षणासाठीं सज्ज झालें. दोन्हीं सैन्याची पालन चिन्नूर जवळच्या नदीवर घनघोर व निकराची लढाई झाली. तिच्या मध्येंही हिंदू लोकांचाच पुरा पराभव झाला. सुल्तान कुलीनें एल्लोर, कोंडपल्ली व राजमहेंद्री हीं शहरें घेतलीं. अखेर त्याचा ओरीसाच्या राजाशीं तह झाला. त्या अन्वयें गोदावरीनदी गोवळकोंड्याच्या राज्याची पूर्व सरहद्द ठरली, व बेझवाडा व एल्लोर हे दोन्हीं जिल्हे सुल्तानाच्या राज्यांत सामिल झाले.

यानंतर कृष्णदेवराय त्याच्या—ओरीसाच्या राजाच्या—मदतीला गेला. तसा सुल्तान कोंडवीडला गेला. त्यानें त्या किल्ल्याला वेढा घातला, परंतु वीनूकोंडा व बेल्लमकोंडा येथील लोकांनीं त्याच्यावर हल्ला केल्यामुळें त्याला तेथून परतावें लागलें. त्यानें लौकरच बेल्लमकोंडा किल्ला सर केला. त्यांत

त्याचे पुष्कळच लोक पडले. तेथून तो कोंडपल्लीकडे परत फिरला. तितक्यांत कृष्णराय येऊन पोहोंचला. त्यानें वेल्लमकोंडा येथील मुसलमानी फौजेवर हल्ला केला. तोंच सुलतानानें उलट खाली व त्याच्या पिछाडीवर हल्ला केला. पुढें झालेल्या लढाईंत सुलतानाला यश आलें व बेल्लमकोंडाचा वेढा उठला. नंतर त्यानें जाऊन कोंडवीड घेतलें. हें ऐकून कृष्णरायानें आपला जांवई व सेनापती शिवराय याच्या बरोबर १००००० पायदळ व ८००० स्वार असें मोठें थोरलें सैन्य देऊन त्याला शत्रूवर धाडलें. तेव्हां सुलतान कोंडवीड हिंदू लोकांकडे सोंपून परत फिरला व कृष्णेच्या कांठीं तळ देऊन राहिला. कोंडवीडचा बंदोबस्त करून हिंदू फौज सुलतानाच्या मागें गेली. तिचा सुलतानानें पराजय केला. तेव्हां ती फोज कोंडवीडला परत गेली. तिला शत्रूच्या फौजेनें येऊन वेढा घातला. तेव्हां त्यानीं हार खाऊन सुलतानाची ताबेदारी पतकारिली.

सुलतान गोवळकोंड्याकडे परत जाण्यास निघाला. विजयनगरवाल्यांच्या चिथावणी वरून विजापूरच्या इस्मायल आदिलशहानें कोविलकोंडा किल्याला वेढा दिल्याचें त्याला वाटेंत कळलें. तसा तो त्याच्यावर गेला. ही त्याची मोहिम दोन महिने राहिली. तिच्यांत पुष्कळ लढाया व झटापटी झाल्या. त्याच्या अखेरीला इस्मायलशहा ज्वरानें मृत्यू पावला. त्याच्या मागून त्याचा पुत्र मल्लूशहा गादीवर बसला. यांपैकीं एका लढाईंत सुलतान कुली याला तोंडावर जखम लगून तो कायमचा विद्रूप झाला होता.

ही सारी हकीकत येथेंच सलग दिली आहे. ती मूळ मुसलमानी कैफियतीमध्यें अशाच ओघानें दिली आहे. पण या सर्व गोष्टी एकवीस वर्षांत घडलेल्या आहेत. ही कैफियत सुलतान कुली गादीवर बसला तेव्हां पासून इस्माइलशहा मरण पावला त्यानंतर-(स. १५१२ पासून सं. १५३४ पर्यंत) च्या हकीकतीची आहे. तिच्यांतील अमुक गोष्ट अमुकच सालीं घडली, असें ठरविण्याला मार्ग नाहीं. तरी त्यांच्यांत परस्पर मेळ असलेले भाग बरेच आहेत. कृष्णदेवानें कोंडवीड किल्ला सं. १५१५ त घेतला व पुढील वर्षी त्याच्या आसपास लढाया केल्या, हें खास आहे. त्यानें कोंडवीड घेतलें तें ओरीसाच्या राजापासून-तरी त्या सुमाराला हिंदू लोकांशीं लढण्याला कांहीं मुसलमानी फौजेच्या तुकड्याही आल्या होत्या, असें 'नूनीज'नें लिहिलें आहे.

सं. १५१६ पासून सं. १५२० पर्यंतची विजयनगर येथील हकीकत कळण्याला हिंदी लेख किंवा आधार उपलब्ध नाहींत. पोर्तुगीज लोक समुद्रकांठीं व्यापार करीत होते. शेजारच्या हिंदू संस्थानिकांशीं त्यांच्या थोड्या

बहुत झटापटी झाल्या, पण खुद्द राजधानींशीं त्यांचा फारसा संबंध पोहोंचला नाहीं. तेथील रायाशीं या परद्वीपस्थांचा स्नेह संबंधच राहिला. घोडे मागवून घेण्याला त्यांचा उपयोग होऊन शिवाय रायाला त्यांच्या पासून चांगला फायदा ही होत असे. ह्मणून त्यांनीं आपला व्यापार दृढमूळ केलेला त्याला हवाच होता. त्याच्या साऱ्या राज्यांत आबादानी होती. सारी प्रजा त्याच्या ताबेदारींत व स्वस्थ सुखानें नांदत होती.

'नूनिज'च्या लेखाप्रमाणें-इतर लेखकही या गोष्टीचें समर्थनच करितात-रायानें साऱ्या राज्याचे विभाग करून त्यांच्यावर पृथक पृथक अधिकारी, संस्थानिक किंवा सरदार नेमले होते. प्रत्येक सरदार आपल्या नेमणुकीच्या शर्तीप्रमाणें पायदळ, स्वार व हत्ती बाळगून ते हवे तेव्हां कामावर जाण्याजोग्या स्थितींत जैय्यत ठेवी. ठरलेली पेशकप्‌ही त्याला नियमितपणें द्यावी लागे. असें करीपर्यंत त्याच्या ताब्यांतील प्रदेशाच्या आंतरव्यवस्थेमध्यें कोणीतऱ्हेनें दखल दिला जात नसे. यांत कांहीं व्यत्यय आला तर त्याला तात्काल काढून दिलें जाण्याचा संभव होता. सर्वांचा पूर्ण मालक खुद्द राजा. बाकी सारे त्याच्या मर्जीवर अवलंबून उपभोग करणारे होते.

पण या आबादानीच्या व स्वस्थतेच्या अवसरांत सुद्धां, नेहमीं भांडणाला कारण होत राहिलेल्या त्या दुआबाच्या प्रदेशावर एकदांचा मोठ्या प्रमाणावर हल्ला करून निकाल करण्या साठीं रायानें सारखी तयारी चालवीलेली होती. आज सुमारें २०० वर्षें त्या दुआबा संबंधी पूर्वीचे राजे आणि त्यांचे उत्तरे कडील शेजारी व निसर्ग शत्रु मुसलमान लोक, यांच्या मध्यें सारखे झगडे चालत आलेले होते. रायाचा मुख्य रोख रायचूरावर होता. तें शहर त्यावेळीं मुसलमानाच्या ताब्यांत होतें. सर्व तयारी झाल्यावर रायानें एका अवाढव्य फौजेसह त्याच्यावर स्वारी केली. या संबंधाच्या हकीकतींत 'नूनीज' व फेरिस्ता यांच्या लेखांमध्यें बराच फरक आहे, पण 'नूनीज' चें लिहिणें जास्त विश्वसनीय आहे.

---

# भाग अकरावा.

रायचूरचा वेढा व लढाई-कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीची अखेर-सं. १५२० ते १५३०-या वेढ्याची तारीख व साल-'क्यास्टानहेडा' 'कोरिया' 'बारोस' 'फ्यारिया-ई-सोझा' 'आसोरियो'-'लाफिटाओ'-'फेरिस्ता,'-'रूई-डी-

मेल्लो ' व गोव्या जवळची कोंकणपट्टी–त्या लढाईंत सामिल झालेल्या अवाढव्य फौजा–फेरिस्तानें दिलेली या लढाईची हकीकत–' ख्रिस्तवाओ डी-फिग्युरिडो '–हिंदू लोकांना मिळालेला विजय–त्या विजयाचा व नंतर घडलेल्या गोष्टींचा राजकीय परिणाम-गोव्याजवळील कोंकणपट्टीचा प्रांतभाग.

रायचूरचा वेढा व लढाई, यांच्याविषयीं ' नूनीज ' यानें सविस्तर व मजेदार वर्णन केलें आहे. तें वाचतांना चाललेल्या प्रकाराचें डोळ्यापुढें जणों चित्र उभें राहतें. त्याच्याहून निराळें वर्णन देण्याची आवश्यकता नसून त्याच्या संबंधी सूचकसे चार शब्द लिहिलेले पुरे आहेत.

' नूनीज ' नें लिहिलेल्या वर्णनाचा सारांश असा:–

आदिलशहावर हल्ला करून, झगड्यांत रहात आलेला रायचूरचा किल्ला एकदांचा कायमचा घेऊन टाकण्याचा कृष्णरायानें निश्चय केला. त्यानें आपली सारी फौज जमा केली. आपल्या अवाढव्य सैन्यासह तो राजधानी सोडून नैर्ऋत्य दिशेच्या रोखानें निघाला. तेव्हां पावसाळा संपला होता. मार्गांत व पुढें मोहिमेच्या प्रसंगीं उन्हाळा कडक असावा, असें दिसतें, रायचूरापर्यंत सारखीं सपाट काळीमार मैदानें लागतात. त्यांच्यावर फौजफांटा स्वार, तोफखाना, व सामानाच्या गाड्या वगैरेंना, त्या दिवसांत अडचण पडण्याजोगी नव्हती. या प्रचंड सैन्यामध्यें बाजार बुणग्यासुद्धां दहा लाखांवर लोक होते. 'नूनीज' च्या लेखाप्रमाणें लढणाऱ्या लोकांची संख्याच ७३६००० येते. हत्ती ५५० होते. निरनिराळ्या ११ विभागांनीं ही फौज रायचूरास दाखल झाली. तथेंही आणखी बरेच फौजेचे विभाग येऊन मिळाले.

रायचूराजवळ पोहोंचल्यावर रायानें त्या किल्ल्याच्या पूर्वेस तळ दिला व चोहींकडून मोर्चेबंदी करून त्याला पुर्ता वेढा घातला. पुढें लौकरच १४०००० फौजेसह आदिलशहा कृष्णेच्या उत्तर किनाऱ्यावर येऊन पोहोंचल्याची खबर आली.

फौजेला थोडी विश्रांती देऊन आदिलशहा नदीपार उतरला. त्यानें रायचूरापासून तीन कोसांवर छावणी केली व तिच्या भोंवती खंदक खोदवून चांगली मोर्चेबंदी करविली. कृष्णानदी तेथून सुमारें ५० मैलांवर मागें होती. फेरिस्ताच्या वर्णनाप्रमाणें हिंदू फौज कृष्णेच्याकांठीं तळ देऊन होती व तिच्या सन्मुखच मुसलमानी फौज नदी उतरली. ( सरकारी-टोपोग्राफिकल सर्व्हेच्या नकाशामध्यें कृष्णा व भीमा यांच्या संगमाखालीं जवळच ऐन कृष्णेच्या किनाऱ्यावर, सुमारें एक मैल लांब रुंद चौकोर कोटसा दाखविलेला आहे. तो हल्लींच्या आगगाडीच्या पुलाच्या वरच्या अंगाला

सुमारें अर्ध कोसावर आहे. तीच आदिलशहाच्या छावणीची निशाणी असावी, असें वाटतें. याबद्दल विशेष तपास होईल तर बरा. )

ता. १९ मे सं. १५२० रोजीं शनिवारीं दोन्हीं दळांचें दारुण द्वंद्व युध्दाचें तोंड लागलें. घोर व निकराची लढाई झाली. कृष्णरायानें शत्रूच्या बाजूंवर तुटून पडून त्या फिरविण्याच्या नादीं न लागतां फौजेच्या दोन विभागांसह एकदम समोर शत्रूच्या मध्यावर चाल करण्याचा हुकूम दिला. त्यांत त्याला यश आलें, आणि मुसलमानी फौज आपल्या गोटाच्या खंदकापर्यंत हटविली गेली. राय आपली फौज पसरून युद्ध करील असें सुलतानाला वाटून त्यानें आपली फौज फार पसरली होती. तिच्या मध्यावरच हिंदू फौजेचा नेटाचा मारा झालेला पाहून, व तो कमताकत आहे, हें समजूनच त्यानें मुध्दां राखून ठेवलेल्या तोफखान्याची त्याच्यावर एकदम सरबत्ती केली. त्या सरशीं जवळ जवळ भिडून लढत असलेल्या हिंदू फौजेचा सप्पा उडाला. ते लोक मागें परतले. मुसलमानांनीं पुढें वाढून त्यांच्यावर जोरानें हल्ला केला. तसे ते उधळून पळाले. मुसलमानी स्वार त्यांना सारखे कापीत अर्धकोस फैलावले. रायाच्या फौजेच्या पहिल्या फळीची अशी दुर्दशा झाली. दुसरी फळी खुद्द राजाकडे होती. त्याला जय मिळण्याची निराशा वाटली. तरी त्यानें आपल्या फौजेची स्थिरस्थावर व थोपाथोपी केली. त्यानें आपल्या भोवतीं बरेचसे सरदार जमविले आणि आपल्या नैसर्गिक शौर्याला अनुरूप युद्ध करून मृत्यूला तोंड देण्याचा निश्चय केला. तो घोड्यावर स्वार झाला व त्यानें बाकीच्या साऱ्या सैन्याच्या विभागांसह उठावणी करण्याचा हुकूम दिला. तो एकदम त्या विखरलेल्या मुसलमानी फौजेतील लोकांवर त्वेषानें व नेटानें तुटून पडला. यांत त्याला पुर्तेपणीं यश मिळालें. शत्रूचे लोक चोहींकडे फाकाफाक झाले. त्यांना एकत्र जमून लढण्याचें साधेना. त्याच्या सपाट्या पुढें ते पळाले. ते थेट नदीपर्यंत व नदीच्या पात्रांतही घुसले. तेथवर त्यानें त्याचा पाठ पुरविली. त्यांची भारी कत्तल उडाली आणि सारी फौज उधळून पळाली.

नंतर रायानें नदी पार उतरून सुलतानाची छावणी लुटली. खुद्द सुलतान, आसद खानाच्या सल्लेनें व सहाय्यानें एका हत्तीवर चढून जीव घेऊन पळाला. हा आसदखान पुढें फार प्रसिद्धीस आला. ( आदिलशहा नदी उतरून अलीकडे येऊन तळ देऊन राहिला होता, या ह्मणण्याला रायानें नदीपार जाऊन त्याची छावणी लुटली या म्हणण्यानें विरोध येतो. )

हिंदू फौजेच्या माऱ्या पुढें मुसलमान फौज पळून जात असतांना, सिपाह

सालार सलाबतखान, यानें मोठ्या शौर्यानें व मर्दुमकीनें पुनः जय मिळविण्याचा यत्न केला. त्याचे खास गारदी—बाटलेले पोर्तुगीज शिपायी—त्याच्याकडे होते. त्यांच्यासह तो भारी त्वेषानें पुढें सरसावला व शत्रूवर तुटून पडला आणि त्यांच्यामध्यें त्यानें फारच मर्दुमकी गाजविली व आपलें नांव चिरकाल कायम राहील असें केलें. ते लोक हाण मार करीत बहुतेक थेट रायाजवळ पोहोंचले. तेथें खानाचा घोडा मारला गेला. तो ताबडतोब दुसऱ्या घोड्यावर चढून पुढें निघाला पण शेवटीं या रणशूर टोळींतील सारे लोक मारले गेले व सलाबतखान घोड्या सुद्धां पडला असतांना शत्रूच्या हातीं सांपडला.

लढाई नंतर उमाप लूट राजाच्या हातीं लागली. या लढाईचा परिणाम निकराचा व कायमचा झाला. पुढें बरींच वर्षें कृष्णराय व त्याची पराक्रमी फौज यांचा मुसलमान लोकांना चांगलाच वचक बसला. खुद्द सुलतानानें सुद्धां जणों दहशत खाल्ली व पुढें कृष्णराय जिवंत असे पर्यंत त्यानें विजयनगराचें नांव काढलें नाहीं.

याप्रमाणें पराक्रम गाजवून विजयी होत्साता कृष्णदेवराय प्रसन्न चित्तानें रायचूराला परत आला. पुढें थोड्याच दिवसांनीं तो किल्ला त्याच्या स्वाधीन झाला.

तो पाडाव होण्यांत, त्याला 'खिस्तवाओ-डी-फिग्युरिडो' व त्याच्या बरोबरचे पोर्तुगीज लोक, यांचा चराच उपयोग झाला. ते आपल्या बंदूकीच्या गोळ्यांनीं तटावरील रक्षक व त्यांचे म्होरके यांना नेमके टिपून घेत होते. त्यामुळें वेढा घालणाऱ्या रायाच्या लोकांना तटाच्या अगदीं पायथ्याला, बहुतेक बिनधोक, पोहोंचतां येऊन त्यांतील दगड उखडण्याला सवड झाली. आंतील लोकांचा सेनाध्यक्ष मारला गेला व ते निराश होऊन निरुपायानें शरण आले. आणि त्यांनीं किल्ला खाली केला.

या लढाई नंतरच्या महत्वाच्या गोष्टी पुढें दिल्या आहेत.

१. गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरानें गोव्याजवळच्या कोकण पट्टींतील साष्टी, बारदेश, व पोंडा, हे प्रदेश कृष्णदेवरायाच्या सूचनेवरून कबजांत घेतले.

२ कृष्णदेवरायानें बेळगांवचा किल्ला व त्याच्या खालचा प्रदेश घेतला.

३. 'पायेस' यानें महानवमीचा व वर्ष प्रतीपदेचा, दोन्हीं महोत्सव समक्ष हजर व सामील राहून पाहिले. त्या प्रसंगीं रायानें 'खिस्तवाओ-डी-फिग्युरिडो' याचा बहुमान केला.

ठाणे.

४. ते उत्सव तारीख १२ सेप्टेम्बर व १२ ऑक्टोबर रोजीं झाले. असें त्यानें लिहिलें आहे.

तत्कालीन इतर बहुतेक लेखांवरून पाहतां ही लढाई तारीख १९ माहे मे सं. १५२० रोजीं, शनवारीं झाली, असें बहुतेक ठाम ठरतें.

कृष्णदेवरायाच्या फौजेची या लढाईच्या प्रसंगीं दिलेली संख्या सकृद्दर्शनी अवाढव्य व अविश्वसनीय वाटते. ती खरी खोटी मानणें प्रत्येकाच्या मर्जीवर आहे. तरी पण या देशांत प्राचीन काळापासून अगदीं अलीकडेपर्यंत, राजे-लोकांच्या पदरीं किती तरी लोक, निदान नांवाला, फौजेंत भरती राहण्याचा प्रघात दिसून येतो. या विषयीं कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. (पौराणिक-काळच्या भारती युद्धामध्यें उभय पक्षाच्या फौजेची संख्या ११ व ७ मिळून १८ अक्षौहिणी म्हणजे जवळ जवळ २५ लक्षांवर होती, असें वर्णन आहे. त्याच्याही पूर्वीं राम रावण युद्धामध्यें नुस्तें वानरदळच १८ पद्म होतें ! ).

ऐतिहासिक प्राचीनकाळीं शिकंदरबादशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां, मगध देशाच्या राजापाशीं ६००००० पायदळ, ३०००० स्वार, व ९००० हत्ती, इतकी फौज असल्याचें शिकंदराच्या बरोबर असलेल्या ग्रीक लोकांनीं अनुमान केलें होतें. पण 'क्विरस् कर्टियस' यानें ही संख्या बरीच बेताची दिली आहे.

सं. ११९२ सालीं मुसलमानांनीं या देशावर स्वारी केली. त्यावेळीं उत्तर हिंदुस्थानाच्या बचावासाठीं पुष्कळच हिंदू राजे एकत्र झाले होते. त्यांच्या फौजांची बेरीज, अगदीं बेताच्या हिशेबाप्रमाणें सुद्धां, तीन लक्ष स्वार, तीन हजार हत्ती, व अगणित पायदळ, इतकी होती, असें 'लार्ड ईगर्टन ऑफ टॅाटन' यांनीं लिहिलें आहे. सं. १२५९ सालीं दिल्हीस मोगलांकडून एलची आले होते. त्यांच्या पेशवाईला ५०००० स्वार गेले होते, व त्यांना दोन लाख पायदळाच्या रांगांमधून लवाजम्यानिशीं मिरवत नेलें होतें.

ईराणदेशावर स्वारी करण्यासाठीं महम्मद तघलख बादशहानें ३७०००० फौज जमविली होती, असें फेरिस्तानें लिहिलें आहे. तसेंच तो हवे तेव्हां नऊ लाख स्वार जमा करूं शकत होता, असें शहाबुद्दीनानें म्हटलें आहे. आप-ल्या कैफियतीच्या प्रारंभींच 'नूनीज'नें 'आठ लक्ष फौजेसह महम्मद तघलख यानें बाला घाटावर स्वारी केली,' असें लिहिलें आहे.

स्काट साहेबाचा 'दक्षिणदेशाचा इतिहास' या ग्रंथांत, औरंगजेबानें दक्षिणेंत

स्वारी केली त्यावेळीं, त्याच्या बरोबर एक बुंदेला सरदार होता. त्यानें लिहि-लेल्या कैफियतीचें भाषांतर दिलें आहे. तो इकडे सं. १६९० सालीं मोहिमे-वर होता. विजयनगरचें राज्य अत्युच्च वैभवाच्या स्थितींत असतांना, तेथील इतिहासासंबंधें लिहितांना तो ह्मणतो कीं, ' तेथील रायांच्या पदरीं ३०००० स्वार व १०००००० पायदळ, इतकी फौज असे, व त्याच्या जवळ संपत्ती केवळ अगणित होती.'

पंधराव्या शतकांत विजयनगरवाल्यांजवळ दहा लक्ष फौज असल्याचें 'कांटी' यानें लिहिलें आहे.

सं. १४४२ मध्यें ही फौज ११००००० असून तिच्यांत १००० हत्ती होते, असें ' अब्दुरझाक ' म्हणतो. पुढें २० वर्षांनीं ' निटिकिन ' यानें गुलबर्ग्याच्या फौजेचें वर्णन लिहिलें. त्याच्यांत ती हिंदू फौजेवर चढाई करून गेली त्यावेळीं तिच्या मध्यें नऊ लक्ष पायदळ, एक लक्ष नव्वद हजार स्वार, आणि ५७५ हत्ती होते, असें म्हटलें आहे. सरदार लोकांच्या फौजां शिवाय खुद्द सुलतानाच्या पदरीं तीन लाख लोक असत. तो शिकारीला जाई तेव्हां सुद्धां त्याच्याबरोबर पांचलक्ष पायदळ, दहा हजार स्वार व दोनशें हत्ती असत. मलिकुत्तिजार यानें एका शह-राला वेढा घातला होता. तेथें त्याच्या हाताखालीं दोन लक्ष लोक होते, असें ही तो म्हणतो.

सं. १५३४ सालीं गुजराथ–खंबायत–चा राजा बहादुरशहा याच्या पाशीं ४१५००० पायदळ, १००००० स्वार व ६०० हत्ती होते, असें ' फारिया–ई-सौझा' यानें वर्णन केलें आहे.

अगदीं अलीकडे सं. १७६२ त मराठ्यांच्या फौजेंत एक लाख स्वार असत, असें म्हणतात. (पानीपतच्या भयंकर लढाईत मराठ्यांचें लष्कर व बुणगें मिळून दोन लक्षांवर होतें. तसेंच अगदीं पडत्या काळांत, सं. १८४४ सालीं, शिंद्यांच्या लष्करांत ४०००० स्वार व शिवाय पायदळ व तोफखाना होता. )

विजयनगरांत २०० वर सरदार व मांडलिक होते. त्यांच्या पैकीं १८ जण प्रमुख होते. त्यांच्या पाशीं एकंदर १९००० स्वार, व १७१००० पायदळ आणि ६३३ हत्ती होते, असें 'नूनीज' नें लिहिलें आहे.

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीच्या अखेरीच्या सुमाराला 'कॉस्टेनहेडा' नांवा-चा प्रवासी विजयनगर येथें आला होता. तो म्हणतो कीं, तेथें अगणित पायदळ होतें. त्या राज्याचा विस्तार फारच भारी, त्याच्यांतील आबादी उत्तम, व लोक

वस्ती दाट असल्यामुळें रायाला वाटेल तेव्हां १०, व प्रसंग विशेषीं २० लाख, फौज उभी करण्याला अडचण पडत नसे. खास राजाच्या पदरीं एक लाख स्वार व चार हजार हत्ती होते.

हल्लीं सुद्धां निजामाच्या राज्यांत हैद्राबाद येथें दर साल लंगर नांवाचा समारंभ होतो. त्या वेळीं कितीतरी हजार खरे व नाम धारी लष्करी लोक हजिरीला येतात. त्यांची रस्त्यांतून तासान्तास सारखी रीघ चाललेली असते.

या फौजेच्या संख्येसंबंधें प्रत्येकानें मर्जीनुरूप मत ठरवावें, असें वर म्हटलेंच आहे. पूर्वींच्या लेखकांनीं दिलेल्या संख्येमध्यें सारीच अतिशयोक्ती आहे असेंही म्हणवत नाहीं. ती सारी फौज उत्तम हत्यारबंद व अलीकडील फौजेच्या अर्थाप्रमाणें लढाईच्या कामाची होती, असा अर्थ नाहीं. कशीं बशीं शस्त्रें घेऊन शिपाई या नांवाला पात्र होणाऱ्या हजारों माणसांचा हा एक प्रचंड घोळका असे इतकेंच घ्यावयाचें.

हत्तींच्या दांतांना बांधलेल्या व सोंडेंत दिलेल्या लांब लांब तरवारींच्या योगानें लढाईंत ते बरीच कामगिरी करीत, या संबंधांतही पुष्कळशा कैफियतकारांच्या वर्णनांमध्यें एकवाक्यता आहे.

या लढाईचें फेरिस्तानें केलेलें वर्णन विरुद्धपक्षाकडील असल्यानें वाचनीय व महत्वाचेंसें आहे. इस्माइल आदिलशहा 'विजयनगरवाल्यांकडून रायचूर व मुदगल परत घेण्यासाठीं मोहिमेवर निघाला. रायाला याची खबर वेळींच मिळाल्यानें तोही मोठ्या फौजेसह कृष्णेच्या कांठावर तळ देऊन राहिला. तेथेंच त्याचे सरदार व मांडलिक येऊन त्याला मिळाले. तेव्हां त्याच्या जवळ ५०००० स्वार व असंख्य पायदळ जमलें होतें. कृष्णेवरील सारे उतार, नावा, व टोकरे, त्याच्या स्वाधीन होते. तेव्हां तुर्त मोहीम मुलतवी करावी असें सुलतानाच्या मनांत आलें. पण त्याचे डेरे लागून छावणी कायम झालेली होती. तेव्हां माघार घेण्यांत अपकीर्ती होईल, म्हणून तो ७००० परदेशी स्वारांसह पुढें वाढला. त्यानें रायाच्या छावणीच्या समोरच नदीच्या दुसऱ्या—उत्तर—तीरावर तळ दिला. नदी उतरून शत्रूवर हल्ला करितां येण्याला नावा व टोकरे वगैरे तयार होऊन येण्याची तो वाट पहात राहिला.

'पुढें तो एके दिवशीं डेऱ्यामध्यें आराम करीत असतांना बाहेर हजर असलेल्या एका दरबाऱ्याच्या तोंडून निघालेलें पुढील अर्थाचें पद्य त्याच्या कानीं आलें. 'ऊठ आणि सुवर्णाच्या पेल्यांतून—तो पेला मातींत मिळून जाण्यापूर्वीं—आनंद,

ऐप व मजारूपी मद्य भर.' हें ऐकतांच त्याला एकदम भारी उल्हास आला. त्यानें मर्जींतले लोक बोलावून ऐषआरामाची जशी बिछायत पसरली व मद्यपान व नाचरंग आणि गायन इत्यादिकांनीं मन रमविणें सुरू केलें. ही मैफिल फारच वेळ सुरूं राहिली. मद्याच्या नशेनें आपला पुरा अंमल बसविला. अशा स्थितींत, तात्काल नदी उतरून शत्रूवर एकदम हल्ला करावा, असें त्याच्या मनानें घेतलें. त्या धुंदींतच त्यानें नदी पार होण्याचा निश्चय केला. व हत्तीवर स्वार होऊन हा बेत कोणालाही न कळवितां, तो नदी कांठावर जणों शत्रूच्या तळाची टेहळणी करण्यासाठीं पोहोंचला. तयार असतील तितक्या टोकऱ्यांमध्यें व तराव्यांवर बसून होईल तितक्या फौजी लोकांनीं एकदम नदीपार होण्याचा व बाकीच्यांनीं हत्तींवर बसून नदी उतरून यावें, असा त्यानें हुकूम दिला. अशी घाई व गडबड करणें धोक्याचें आहे, असें त्याच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं पुष्कळ समजाविलें. पण सुल्तानानें तोंडांतून ब्र अक्षर काढलें नाहीं. त्यानें आपला हत्ती नदींत उतरविला, तसें इतर सरदार व उमराव आपआपल्या जवांमानिशीं सुमारें २५० हत्तींवरून निरुपायानें ह्याच्या मागें गेले.

सुदैवानें ते सारे सुखरूप नदीपार उतरले. तराबे व टोकरे यांच्यांतून दोन खेपा मिळून बरेंचसें लष्करही उतरलें. तोंवर शत्रूचें लोकही मोठ्या हिमतीनें त्याला आडवे आले. ते सुमारें ३०००० आणि सुल्तानाचे लोक पुरे २००० ही नव्हते. अशा स्थितींत सुल्तान बचावून येण्याची मुळीं उमेद कमीच होती. इसलामी वीर भारीच हिमतीनें व शौर्यानें लढले. त्यांनीं शत्रूचे १००० वर लोक मारले. त्यांच्यांतच शत्रूचा मुख्य सेनापती संजीतराय पडला. अखेर तोफा, बंदूका, बाण, इत्यादिकांच्या अनावर व असह्य माऱ्यामुळें त्यांच्यांतून अर्धे अधिक वीर शहीद झाले. बाकीच्यांनीं माघार खाऊन प्राण वांचण्याच्या उमेदीनें नदींत उड्या टाकल्या. नरसू बहादुर व इब्राहीम बे, हे सुल्तानाबरोबरच हत्तीवर होते. त्यांनीं तो हत्ती मोठ्या शर्थीनें नदींतून पार उतरविला. पाण्याचा जोर फारच होता. खास सुल्तानाचा हत्ती व दुसरे सात शिपायी या शिवाय इतर सर्व हत्ती व लोक गर्क झाले. सुल्तानानें हा अविचार व आततायीपणा केला. त्याच्या पायीं त्याला असें हें भयंकर नुकसान सोसावें लागलें. अपजयाचा सूड उगविल्याशिवाय पुनः मद्याला शिवायाचें नाहीं, अशी त्यानें शपथ वाहिली आणि आलेला उद्वेग व उदासीनता टाकून तो या दैवाच्या विपरीत घाल्याचा प्रतीकार करण्याच्या उद्योगास लागला. मिरझा जहांगिर लढाईंत पडला होता.

सबब सुल्तानानें या कठिण प्रसंगीं आसदखानाशीं सल्ला मसलत केली. त्यानें विनंती केली कीं, तूर्तच भारीच नाश झालेला, व सारी फौज नाउमेद झालेली. तेव्हां विजापुराला परत गेलेलें बरें. हें पसंत पडून सुल्तान परत रवाना झाला त्यानें आसदखानाला 'सिपाह सालार'–मुख्य सेनापती–हा किताब व बरचि मोठी नवी जाहगीर दिली. सर्व महत्वाच्या मामल्यांत त्यानें त्याला आपला मुख्य मंत्री केलें.'

'नूनीज' नें दिलेली व ही, दोन्हीं हकीकती एकाच प्रसंगासंबंधाच्या आहेत, यांत शंका नाहीं. तपशीलामध्यें कांहीं फरक आहे. पण 'नूनीज' ची हकीकत प्रत्यक्ष पाहून किंवा प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकांच्या तोंडून ऐकून लिहिलेली आहे. सबब ती जास्त विश्वसनीय आहे. आपला इतिहास फेरिस्तानें पुढें ६० वर्षांनीं लिहिला. त्याच्या लेखामध्यें बराचसा भाग असंभवनीय दिसतो.

'नूनीज' चें वर्णन वाचतांना आपण जणों तत्कालीन एक प्रेक्षक आहों, असा भास होतो. या प्रसंगाची इतकी तपशीलवार हकिकत एवढीच उपलब्ध आहे, हा तिच्या मध्यें एक विशेष आहे.'

या लढाईचे राजकीय परिणाम फारच दूरवर पोहोंचले. हिंदू लोकांना मिळालेल्या या पूर्ण विजयामुळें आदिलशहाची जणों पुर्तीच खोड मोडली. दक्षिणेंत चढाई करून नवीन प्रांत काबीज करण्याच्या विचारांचें त्यानें तूर्त तरी नांव सोडून दिलें. या शेजारच्या प्रबळ काफर शत्रू विरुद्ध, इतर मुसलमानी राजांच्या संघाची व सहकारितेची अत्यंत आवश्यकता आहे, असें त्याला वाटलें, व ती साध्य करण्याविषयीं त्यानें झटून खटपट चालविली. दक्षिणेंतील राजकिय परिस्थितीचा त्या राजे लोकांना विशेष काळजी पुरस्कर विचार करणें भाग पडलें. अखेर त्या सर्वांचा एक प्रबळ संघ कायम झाला. अशा संघा शिवाय कांहींच कार्यसिद्धी होण्याजोगी नव्हती. शेवटीं त्याच्याद्वारेंच हें प्रचंड साम्राज्य रसातळाला जाऊन मुसलमानांना थेट दक्षिण टोंकापर्यंत पोहोंचण्याला मार्ग मोकळा झाला.

या विजयाचा परिणाम हिंदू लोकांवर भारी अनिष्ट घडला. ते फारच उद्दाम व गर्विष्ट झाले. त्या मुळें हिंदू मुसलमानांच्या परस्पर द्वेषभावरूपी आगींत तेलसें पडलें. हिंदू लोक आपल्या शेजारी मुसलमानांच्या डोळ्यांत फार खुपूं लागले. आणि त्यांचा व्हास होण्याला दुजोरा झाला.

याच्यामुळें समुद्रकिनाऱ्यावरील पोर्तुगीजलोकांच्या स्थितीमध्येंही फार फरक पडला. विजयनगरच्या दुसऱ्या राजघराण्याच्या बरोबरच गोव्याची ही उन्नती

व अवनती झाली तेंही ठीकच. त्या बंदरांतील सारा व्यापार त्या हिंदू राजधानीवर व तेथील दरबाराच्या मदतीवर अवलंबून होता. पोर्तुगालचा राजा मूर–मुसलमान–लोकांना आपले निसर्ग शत्रू समजणारा. त्या लोकांशीं त्याचें केव्हांच सलोख्याचें वर्तन नसे. ही गोष्ट, पोर्तुगीज वसाहतीचा इतिहास लिहिणारांनीं नीट लक्ष्यांत घेतली नाहीं. त्या वसाहती पलीकडे, मूळ देश, राज्य व राष्ट्र, यांच्या राजकीय परिस्थितीकडे व घडामोडीकडे त्यांनीं अगदीं दुर्लक्ष केलें आहे. या वसाहती मुळीं व्यापाऱ्यांनीं, व्यापाराच्या उद्देशानें, केलेल्या. तो व्यापार ज्यांच्या गरजा पुरविण्यासाठीं व्हावयाचा त्या लोकांच्या राजकीय व सांपत्तिक स्थितीमध्यें फेरफार होईल तसा त्या वसाहतींच्या भरभराटीमध्येंही झालाच पाहिजे. विजयनगरचें प्रचंड साम्राज्य, तेथील विलक्षण व उमाप ऐश्वर्य, संपत्ती, थाटमाट, अवाढव्य फौज फांटा कायम असे तोंवर त्यांना लागणाऱ्या बहुतेक वस्तू हे जणों मक्त्यानें–पुरविणाऱ्या या वसाहतींच्या व्यापाराची भरभराटही कायम होती. विजयनगरचें राज्य बुडालें व ती विस्तीर्ण व लोकोत्तर राजधानी धुळीस मिळाली तसें, त्या व्यापारालाही ठिकाण न राहिल्यानें, तो बुडत चालला व आखेर या वसाहतींचें राजकीय महत्वही संपुष्टांत आलें. या दृष्टीनें तरी त्यांचा इतिहास लिहिणारांनीं या रायचूरच्या लढाईच्या परिणामाकडे लक्ष्य देऊन तिचें तपशीलवार वर्णन दिलें पाहिजे होतें, पण त्यांनीं तिचा नामनिर्देश सुद्धां केलेला नाहीं.

या लढाईनंतर घडून आलेल्या गोष्टी विषयीं ‘ नूनीज ’ नें तपशीलवार वर्णन केलेलें आहे. तें पुढें पंधरा वर्षांच्या आंतच केलेलें असल्यानें बरेंच विश्वसनीय आहे. फेरिस्तानें याबद्दल मुळींच उल्लेख केलेला नाहीं.

‘ नूनीज ’ म्हणतो, ‘ रायचूर हस्तगत झाल्यावर कृष्णदेवरायानें तेथें मोठ्या थाटानें नगर प्रवेश केला व आंतील शिबंदीला चांगल्या रीतीनें वागविलें. इतर मुसलमान राजांनीं या विजयासंबंधें त्याच्याकडे निरोप पाठविले. त्यांना त्यानें उद्दामपणाचे जबाब दिले. नंतर तो विजयनगराला परत गेला. तेथें त्यानें मोठ्यान्न समारंभानें महोत्सव केला. पुढें लौकरच आदिलशहानें जेरीस आल्यामुळें वकील पाठविला. त्याची रायानें महिनाभर दादच घेतली नाहीं. एकदाची रायानें दरबारांत भेट घेतली, व त्याच्या मार्फत त्याच्या मालकाला निरोप पाठविला कीं, समक्ष येऊन ताबेदारी कबूल करावी, व आमच्या पायां पडावें–चुंबन घ्यावें–असें केलें तर घेतलेला मुलुख परत होईल.’ तिकडे शहानें लक्ष्यच दिलें नाहीं, असें पाहून राय स्वतःच त्याच्या शोधाला निघाला. आदिलशहा आपलें

म्हणणें ऐकेल असें रायाला वाटलें असलें तरी त्या बरोबरच दक्षिणेंतील मुसलमानी राजपंचकांतील एकाची आपण अशी मानहानी करूं पाहतो, यामुळें इतरांच्या मनाला किती विषाद वाटेल, याचा त्यानें विचार केला नाहीं, असें दिसतें. आदिलशहा ताबेदारींत हाजर झाला नाहींच. कृष्णराय त्याच्या शोधार्थ उत्तरेस थेट विजापुरापर्यंत फौजेसह पोहोंचला, व कांहीं दिवस तेथेंच राहिला. तो परत निघण्यापूर्वीं त्या शहरामध्यें बरीच नासधूस झाली. या नंतर लबाड व कृष्णकारस्थानपटु अशा आसदखानानें, आपला शत्रु सलाबतखान, याचा राजा करवीं प्राण घेवविला. यांत केवळ स्वार्थाकडे दृष्टी देऊन त्यानें शहाचें नुकसान केलें व इकडे राजालाही चकाविलें.

विजापुरास असतांना, आदिलशहानें धरून कैदेंत ठेवलेले बाहामनी सुलतानाचे तीघे पुत्र रायाच्या हातीं लागले होते. त्यांतील वडील पुत्राला त्यानें दक्षिण देशचा–राजा म्हणून गादीवर बसविलें. मूळच्या एकच असलेल्या बाहामनी राज्यांतून स्वतंत्र पांच राज्यें नुकतींच उत्पन्न झालेलीं होतीं. त्यांच्या ऐवजीं पुनः एकच राज्य कायम करण्याचा हा त्याचा अजागळ प्रयत्न होता. त्याचा उपयोग तर झाला नाहींच. पण उलट ते पांचही नवे राजे त्याला आपला एकटा. च निसर्ग शत्रू समजूं लागले आणि त्यांचें वैर व तेढ यांना मात्र जास्त चेव आला. (या राजपुत्राला गादीवर बसविण्याच्या संबंधानें फेरिस्तानें कांहींच लिहिलें नाहीं.)

यानंतर कृष्णरायानें आपल्या अल्पवयी पुत्राला गादीवर बसविलें आणि स्वतः गादीचा हक्क व कबजा खुषीनें सोडून दिला. तो त्याचा पुत्र एकाएकी विष. प्रयोगानें मरण पावला. त्यावेळीं स्वतः राजाही असाध्य आजारी होता. अशा स्थितींत त्यानें आपला मुख्य मंत्री 'साळुवा तिम्मा' व त्याच्या घरचीं मुलें माणसें, यांना धरून कैदेंत टाकलें. त्यावेळीं दरबारांत हजर असलेल्या कांहीं पोर्तुगीज लोकांचीही त्याला या कामीं मदत मिळाली. 'साळुवा तिम्मा' चा एक पुत्र कैदेंतून पळाला. तो राजधानीच्या दक्षिणेस सोंडूरच्या आसपासच्या डोंगर पहाडीच्या आश्रयाला गेला. या पहाडामध्येंच एका उंच पठारीवर रामनदुर्ग नांवाचा जुना पडकासा गड आहे. त्याच्या कोटाचें काम अजस्र व मोठमोठ्या टोळांनीं व धोंडींनीं बांधलेलें आहे. तो पळून गेलेला पाहून कृष्णरायाला अनावर द्वेष व संताप आला व त्यानें 'साळुवा तिम्मा,' त्याचा भाऊ व दुसरा पुत्र, यांना समक्ष बालावून त्यांचें डोळे फोडले.

या सुमाराला आदिलशहानें अपयश धुवून टाकण्याच्या हेतूनें पुनः चढाईशी केली, पण कृष्णदेवराय स्वतः आडवा येत असल्याचें कळतांच, तो धूम

पळून गेला. इतका आजारी असतांनाही तो खरोखरच मोहिमेवर निघाला होता. याचें प्रत्यंतर, त्यानें वाटेंत पोर्तुगीज लोकांकडून ६०० घोडे खरेदी केले, असें 'नूनीज' यानें लिहिलें आहे, त्यावरून मिळतें. याच सुमाराला रायानें आदिलशहाच्या ताब्यांतील बेळगांवचा किल्ला घेण्यासाठीं स्वारी करण्याची तयारी चालविली होती. या साठीं त्यानें पोर्तुगीज लोकांचीही मदत मागितली. पण तितक्यांतच तो सं. १५३० सालीं मरण पावला. त्यावेळीं त्याचें वय ४२-४५ वर्षांचें होतें. त्याच्या मागून अच्युतराय गादीवर बसला.

येथवरची हकीकत 'नूनीज' च्या कैफियतीप्रमाणें दिली आहे. इतर लेखकांच्या कैफियतींवरूनही आणखी वरीचशी माहिती मिळते. 'बारॉस' यानें लिहिलें आहे कीं, सं. १५२५ च्या सुमाराला गोव्या लगतच्या कोंकणपट्टीवर 'साळुवा तिम्मा' यानें स्वारी केली व थोड्याशा लोकांनिशीं तो पोंड्यावर गेला. हा प्रदेश 'राय-डी-मेल्लो' याच्या हातांखालच्या पोर्तुगीज लोकांनीं नुकताच कबज्यांत घेतला होता. त्या लोकांनीं 'साळुवा तिम्माला' पिटाळून लावलें. पुढच्या वर्षी याच प्रदेशावर विजापूरवाल्यांनीं हल्ला केला त्यांत त्यांना यश मिळालें. त्यावेळीं 'डान-डुआर्टे डी-मेनेझेस' गव्हर्नर होता. सं. १५२४ सालच्या अक्टोबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस, गोव्याच्या चेंबरनें-मंत्री मंडळानें- पोर्तुगालच्या राजाकडे लिहून पाठविलेल्या रपोटांत पुढील मजकूर आहे, "या शहराचा अधिकारी 'राय-डी-मेल्लो' यानें जिंकून घेतलेल्या कोंकणपट्टीच्या प्रदेशामध्यें सं. १५२४ च्या एप्रिलपासून मूर लोक घुसले आहेत. पूर्वी हा प्रदेश त्यांच्याकडेच होता. हल्लीं तो त्यांनीं पुनः घेतला आहे. प्रारंभीं त्यांनीं समुद्रकांठीं असलेलें पेरणें-पेडणें-ठाणें हल्ला करून घेतलें व खुद्द ठाणेदार व दुसरे पोर्तुगीज यांना धरून नेलें. त्यांना 'बायल गान'-बेळगांव-च्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें आहे. तेथें 'साकिलारिम' ची-आसदखानाची-हुकूमत आहे."

यावरून त्यावेळीं मुसलमान लोकांना जय मिळाला होता, हें खास आहे. पण याविषयीं फेरिस्तानें किंवा इतर कोणी इतिहासकारानें उल्लेख केलेला नाहीं. तेव्हां हे मूर लोक विजापुरचे नसून खुद्द आसदखानानेंच भरती करून धाडलेले असतील.

रायचूर येथील पराजयानंतर आदिलशहानें अहमदनगरचा सुल्तान बुऱ्हाण निजामशहा, याला आपली बहीण दिली. सं. १५२३ त त्याचें त्याच्याशीं पुनः भांडण व युद्ध चालू झालें. तसेंच सं. १५२८ त दोघांमध्यें एक लढाई

झाली. त्यानें आपल्या दुसऱ्या बहिणीचें, वऱ्हाडचा सुलतान अलाउद्दीन याच्याशीं लग्न करून दिलें. बेदरचा सुलतान बरीदशहा याच्याशीं ही त्याचें वांकडें पडून लढाई झाली व त्यानें अमीर बरीदला धरून घेतलें. कृष्णराय मरण पावल्यावर विजयनगर येथें गडबड चालली- तिचा फायदा घेऊन, त्यानें रायचूर व मुदगल हीं परत घेतलें.

शेवटच्या दोन गोष्टींची सालवारी फेरिस्तानें दिलेली नाहीं. पण सं. १५२९ च्या नंतरच अमीर बरीद आदिलशहाच्या हातीं लागला असावा. कारण 'बारोस' च्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं, गोव्यावर तीघां हिंदू राजांनीं हल्ला केला, त्यांच्या विरुद्ध तेथील लोकांनीं गोव्याचा गव्हर्नर 'नूनो–डा– कुन्हा' याची मदत मागितली होती. त्यानंतरच ही गोष्ट घडली. 'डा–कुन्हा' सं. १५२९ नंतर गव्हर्नर झाला. "याच वेळीं 'मेलिक व्हेरिडो'–मलिक बरीद, 'हिढलखान'– आदिलशहा, याला, 'माद्रेमुलुको'–इमादशहा,–आणि 'कोटा मुल्को'–कुतुबशहा–यांच्या सल्लेप्रमाणें शरण गेला. त्यानें आदिलशहाच्या छावणींत अगदी दीन वेशानें जाऊन त्याच्या पायावर लोटांगण घातलें," असें 'बारोस' म्हणतो. फेरिस्ताचें लिहिणें खरें असेल तर, अमीर बरीद धरला गेल्यावर घडलेल्या प्रकाराचेंच हें वर्णन दिसतें. (ही हकीकत वस्तुतः अच्युतरायाच्या कारकिर्दीच्या वर्णनांत यावयाची. पण कदाचित ती कृष्णराय जिवंत असतांनाही घडली असल्याचा संभव आहे. सबब ती येथेंच दिली आहे.)

सं. १५२६ त बाबरानें दिल्ही काबिज करून पुढें विख्यात झालेलें मोगल बादशाही घराणें स्थापन केलें. त्याच्या मागून सं. १५३० त त्याचा पुत्र हुमायून आणि पुढें सं. १५५६ मध्यें परम थोर, भाग्यशाली व पुण्यश्लोक, असा अकबर यांच्या कारकिर्दी सुरू झाल्या. या गोष्टींचा विजयनगरच्या तत्कालीन कथेशीं संबंध आहे असें नाहीं, तरी त्या याच सुमारास घडल्या एवढ्या पुरत्या महत्वाच्या आहेत.

---

# भाग बारावा.

## कृष्णदेवरायाचीं सार्वजनिक कामें.

मंदिरें—पाट बंधाऱ्याचीं कामें—नरसिंहाची प्रचंड मूर्ती—कामलापुरम्—शिलालेख.

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दींत विजयनगर शहराचा विस्तार, वैभव, सौंदर्य इत्यादिकांविषयीं 'पायेस' व 'नूनीज' यांनीं समक्ष पाहून लिहून ठेवलेलें

वर्णन इतकें कांहीं सुरेख, सरस, व वस्तुस्थितीचें प्रतिबिंब उमटविणारें आहे कीं, त्याच्या मध्यें यत्किंचितही भर घालण्याची अवश्यकता नाहीं.

तरी पण या प्रतापी रायानें आपल्या कारकिर्दींत खुद्द विजयनगरांत व जवळपास तयार करविलेलीं कामें व त्याच्या वेळच्या शिलालेखांपैकीं कांहीं लेख, यांचा उल्लेख केल्यावांचून राहवतच नाहीं.

विजयनगरच्या राज्याच्या स्थापनेला कारणीभूत झालेल्या श्रीमाधवाचार्यांचें स्मारक म्हणून पूर्वींच्या राजांनीं श्रीविरूपाक्षाचें भव्य मंदिर बांधविलें. कृष्णदेवरायानें गादीवर बसतांच त्या मंदिरापुढें नवा व मोठा गोपूर बांधविला व दुसऱ्या आंतील गोपूराची दुरुस्ती करविली. तो पूर्व देशांत मोहिमेवर गेला होता. तिकडे विजय व यश संपादन करून परत आल्यावर त्यानें सं. १५१३ मध्यें, कृष्णस्वामीचें भारी मोठें व प्रशस्त देवालय बांधविलें. त्याच वर्षीं राजवाड्याच्या आवारांत त्यानें हजार रामस्वामीच्या देवालयाचें काम चालू केलें. तें पुढें केव्हांतरी पूर्ण झालें असावें, असें त्याच्या बांधणीवरून दिसतें.

विजयनगरच्या भोंवतालची जमीन भारी रुक्ष होती. तिला विपुल पाणी मिळून तिच्यांत बागायताची सोय व्हावी म्हणून, त्यानें सं. १५२१ सालीं 'कोरंगल'–कुरवीगड्डा–येथें तुंगभद्रेला भला भक्कम बांध घालविला आणि बसवण्णा नांवाच्या कालव्याचें काम करविलें. हीं दोन्हीं कामें अद्यापि कायम आहेत. त्यांचा त्या भागाला किती तरी उपयोग होत आहे.

राजधानी लगतच त्यानें दुसरें एक भारी मोठें तलावाचें काम करविलें. त्या कामा साठीं त्यानें गोव्याच्या गव्हर्नराकडून 'जाओ-डी-ला-पाटे,' या पोर्तुगीज इंजिनियराला मागवून घेतलें. 'पायेस' व 'नूनीज' या दोघांनींही या कामाचें वर्णन केलें आहे. तें चालू असतांना 'पायेस' नें समक्ष पाहिलें होतें. त्या अर्थीं त्याची सुरुवात सं. १५२० मध्यें झाली असावी. होसपेठेच्या पश्चिमेस, सोंडूरच्या पहाड्यांमधील एका मोठ्या खोऱ्याच्या तोंडाला, भला थोरला बांध घालून, एक मोठा विस्तीर्ण तलाव झालेला, सुकून गेलेला आहे. तोच हा असावा. त्या बांधावरून बळ्ळारी जिल्ह्यांतील दक्षिण भागांतील तालुक्यांकडे जाणारा एक रस्ता काढलेला आहे. फारां वर्षांपासून या तलावांत पाणी येत नाहीं व आलें तरी टिकत नाहीं, याचीं कारणें विचार करण्यासारखीं आहेत. 'नूनीज' नें दिलेल्या वर्णनावरूनही हाच तो तलाव असावा, असें दिसतें. आसपासच्या जमीनीला बागायतीसाठीं व नवें वसविलेलें शहर होसपेठ–नागलापूर– यालाही पाणी पुरावें

म्हणून, तो बांधला होता. त्याच्या दोन्हीं बाजूला उंचसे पहाड असून, तोंडावर भक्कम बुरूज व दरवाजे होते. राजधानीला दक्षिण भागाकडून येण्याचा मुख्य रस्ता इकडूनच होता. असें त्यानें लिहिलें आहे. या सर्व गोष्टी या कोरड्या तलावाला व रस्त्याला लागू पडतात. हे पोर्तुगीज प्रवासी या दरवाजांच्या व बुरजांच्या मधूनच राजधानीला पोहोंचले होते.

हे बुरूज, दरवाजे, तटबंदी, व नागलापूर या सर्वांचा 'पायेस' नें ही उल्लेख केला आहे. त्या शहरा जवळच रायानें एक मोठा थोरला तलाव बांधविला, असें तो म्हणतो. त्या कामावर लागलेले हजारों लोक त्यानें प्रथम पाहिले. तसेंच बांधाचें काम कायम राहावें म्हणून, ६० माणसांचे बळी दिले गेलें, असें त्यानें व 'नूनीज' नें, दोघांनींही लिहिलें आहे.

कृष्णदेवरायानें नागलापूर हें नवें शहर, आपली आवडती राख नागलादेवी, इच्या प्रीत्यर्थ सं. १५२० पूर्वींच वसविलें. तिच्याशीं त्यानें पुढें लग्न केलें व तो तेथें स्वतः आवडीनें राहूं लागला.

तुंगभद्रेच्या कांठावरच विट्ठलस्वामीचें देवालय आहे. त्याचें काम त्या राज्यांतील इतर साऱ्या मंदिरांच्या कामांपेक्षां अधिक कुसरीचें व नक्षीदार आहे. त्याचें कामही कृष्णरायानेंच सुरूं करविलें. त्याच्यांत इकडील खोदीव व कुसरीच्या कामाचा जणों कळसच झालेला दिसतो. हें काम पुढें अच्युतराय व सदाशिवराय यांच्या कारकिर्दींतही जारी होतेंच. तें सं. १५६५ सालीं राजधानी धुळीस मिळाली तेव्हांच बंद पडलें. या देवालयाला देणगी दिली गेली तिच्याबद्दल एक एक शिलालेख, सं. १५६१ चा, उपलब्ध आहे.

या राजधानींतील विचित्र, अप्रतीम, आणि प्रेक्षणीय अशा कामांत शेखरीभूत, असें एक काम सं. १५२८ सालीं करविलें गेलें. तें उग्र नृसिंहाची अवाढव्य व अखंड मूर्ती हें होय. कृष्णस्वामीच्या देवालयाच्या नैर्ऋत्य कोपऱ्या जवळच एक भला मोठा कुरुंदाचा टोळ पडला होता, त्यांतून ही अठरा फूट उंच व दहा फूट रुंद मूर्ती बसलेली, अखंड कोरलेली आहे. सं. १५६५ त ती मुसलमानांनीं फोडली, त्यामुळें बरीच खंडित झाली आहे. तरी सुद्धां ती फारच भव्य व प्रेक्षणीय आहे. त्या देवाच्या पूजे अर्चे साठीं रायानें जमीन लावून दिली होती.

कृष्णदेवराय गादीवर बसला त्यावेळीं राज्यारोहणाचा महोत्सव व समारंभ मोठ्याच प्रमाणावर झाला. त्या प्रसंगीं त्यानें श्री विरूपाक्षाच्या मंदिराला देणग्या दिल्या त्यांच्याविषयीं पूर्वीं उल्लेख आलाच आहे. याच्या कारकिर्दींतील सं. १५१३-१४

सालचा एक लेख विरिंचीपुरम् येथील मंदिराच्या गोपुराच्या आंतील पायाच्या दगडावर आहे. राजधानी जवळच संकलापूर येथें, राजवाड्याच्या आवारामधील गणपतीच्या मंदिराला, त्या गांवच्या जमीनी लावून दिल्या बद्दल, एक लेख आहे. त्याची मिती मंगळवार तारीख २० सेप्टेंबर सं. १५१३ आहे. तसेंच सं. १५०९–१०, १५१२–१३–१४–१५–२२–२३ व २७–२८, या सालांतीलही शिलालेख सांपडलेले आहेत.

या सर्वांत अगदीं अखेरचा लेख वर सांगितलेल्या उग्र नृसिंहाच्या मूर्तीपुढें कोरलेला, शुक्रवार तारीख २३ एप्रिल सं. १५२९ चा आहे.

---

# भाग तेरावा.

## अच्युतरायाची कारकिर्द.

अच्युतराय–रायचूर व मुदगल यांचा पाडाव–आसदखान आणि गोवें–विजापुरांतील धामधूम–इब्राहीमशहाचें विजयनगरांत आगमन–विजयनगरच्या राज्यकारभारासंबंधें फेरिस्तानें केलेलें वर्णन–रामराय व त्याचे बंधू यांचा अभ्युदय–होजे–हुच्च–तिम्मलराय–विसंगत दंतकथा–वेंकटाद्रीचा अदोणी येथें आसदखानाच्या हातीं पराजय–आसदखानाचें चरित्र–बेळगांव व गोवें–आसदखानाचें दुटप्पी वर्तन–पोर्तुगीज लोक चढाई करून मुलुख दाबतात–अच्युतरायानें देवस्थानांना व धर्मादाय दिलेल्या देणग्या–तत्संबंधी लेख.

'नूनीज' व दुसरे कांहीं कैफियतकार यांच्या लेखांप्रमाणें, अच्युतराय हा कृष्णदेवरायाचा भाऊ होता. त्याला व त्याचे दुसरे दोघे बंधू, व एक पुतण्या, इतक्यांना, फंद फितूर होऊं नये म्हणून, कृष्णदेवरायानें चंद्रगिरीच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. आपल्या पश्चात त्यानेंच गादीवर बसावें, असें स्वतः कृष्णदेवरायानेंच ठरविलें होतें, असें 'नूनीज' म्हणतो. हें खरें असलें तर, त्याची ही निवड फारच निभागी झाली म्हणावयाचें. तो अगदींच बुळकट निघाला व त्याच्या कारकिर्दीत राज्याच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला. ( कृष्णदेवरायानंतरच्या राजांचे परस्पर नातें काय होतें, या विषयीं दंतकथा, लेख, प्रशस्ती पत्रें, व काव्यें यांच्या मध्यें फारच गोंधळ झालेला आहे. 'नूनीज' समकालीन असल्यानें त्याच्या लिहिण्याला अर्थातच अधिक महत्व आहे. )

कृष्णरायाचा मुख्य मंत्री 'साळुवा तिम्मा' हा ही त्याच्या प्रमाणेंच 'साळुवा' या प्रमुख व प्रबल घराण्यांतला होता. त्याचें नांव 'नूनीज' नें 'सा-

लवानें' असें दिलें आहे. अच्युतरायाच्या कारकिर्दीच्या अगदीं अवलीच्या उपलब्ध लेखाची तारीख १५ आगष्ट सन सं. १५३० सोमवार ही आहे. तो गादीवर बसतो न बसतो तोंच, जणों अपशकुनादाखल, रायचूर व मुदगल, हे सरहद्दीवरील महत्वाचे किल्ले हातचे गेले. ते परत घेण्यासाठीं आदिलशहाचा यत्न, कृष्णराय मरण पावण्या पूर्वींपासूनच चालला होता, असें फेरिस्तानें लिहिलें आहे. तो म्हणतो, 'सुल्तानानें आपल्या फौजा रवाना केल्या. त्यांच्या बरोबर रुम्मदशहा व अमीर बरीद हेही फौजेसह होते. 'हीमरायजी' च्या मृत्यूमुळें विजयनगर येथील राज्यकारभारामध्यें धांदल उडालेली होती. त्याच्या मागून 'रामरायजी' गादीवर आला होता. पुष्कळसे सरदार त्याच्या विरुद्ध होते. यामुळें सुल्तानाच्या फौजेला अटकाव झाला नाहीं. त्यानें त्या कि यांना सुमारें ३ महिने वेढा घातल्यावर ते शरण येऊन स्वाधीन झाले. तोंवर ते सत्रा वर्षे काफर लोकांच्या ताब्यांत होते. ( हीं दोन्हीं शहरें सारीं १० वर्षेंच हिंदू अंमलाखालीं राहिलीं होतीं.)

आपला प्रबल हाडवैरी कृष्णराय मरण पावला व रायचूर आणि मुदगल येथें यश आलें. यामुळें आदिलशहाला भारीच उसंत वाटली व आनंद झाला असावा. त्यानें ते किल्ले परत घेईपर्यंत मद्याला न शिवण्याची शपथ वाहिली होती. सरदार लोकांच्या आग्रहामुळें त्यानें खूप मोठा जलसा व समारंभ करून मोठ्या थाटानें, पुनः मद्य सेवन व नाच रंग वगैरे केलें. त्या नंतर पुढें कधीं तीं दोन्हीं शहरें हिंदू लोकांच्या ताब्यांत गेलीं आलीं नाहींत.

नवीनच गादीवर आलेल्या अच्युतरायाच्या स्वभावाचें खरें चित्र 'नूनीज' याच्या वर्णनांत दिलेलें आहे. येथें इतकेंच लिहिणें पुरे आहे कीं, त्यानें क्रूर व जुलमी वर्तनानें सारी प्रजा व स्नेही यांचा मनें विटविलीं. त्याचा उपजत भागूबाईपणा साऱ्या साम्राज्यभर मशहूर होऊन गेला. त्याचें वर्तन व राज्यकारभाराची तऱ्हा यांच्यामुळें दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदु लोकांचा अधिकार व राजकारण, यांचा समूळ नाश होण्याला साधन होऊन, परकीयांना साऱ्या देशांत धुमाकुळ घालण्याला चारी वाटा मोकळ्या झाल्या. पुर्ता उच्छेद पाहण्याला मात्र तो उरला नाहीं.

रायचूर दुआब काबिज केल्यावर आदिलशहाची, त्याचा प्रतिस्पर्धी अहमदनगरचा सुल्तान, याच्याशीं पुनः कलागत लागली. सं. १५३१ त लढाई झाली. तिच्यांत त्यानें त्याचा पराजय केला. पण पुढें परस्पर पक्का मेळ होऊन त्या मेव्हण्या मेव्हण्यांनीं एक संघ कायम केला. त्या नंतर तीन वर्षांनीं आदिल-

शहानें गोवळकोंडा येथील कुतुबशाही सुल्तानाच्या ताब्यांतील एका किल्ल्याला वेढा घातला. तेथें त्याला ज्वर लागला. त्याच्या पायीं तो ता. १६ सफर सं. ९४१ हि. ता. १३ आगष्ट सं. १५३४ रोजीं मरण पावला व त्याचा पुत्र मल्लूशहा गादीवर बसला. तो राज्यकारभारा विषयीं अजाण, सबब आसद-खान त्याचा प्रतिनिधी व पालक नेमला गेला. पण मल्लूशहानें त्याला इतकें वाईट रितीनें वागविलें कीं, तो नाराज होऊसाता बेळगांवाला निघून गेला. सुल्तान मल्लूशहानें भारीच अनन्वित प्रकार व अत्याचार चालविले. त्यामुळें सहा महिन्यांतच त्याला पदच्युत करून, खुद्द त्याच्या आजीनें त्याचे डोळे काढ-विले आणि त्याचा धाकटा भाऊ इब्राहीमशहा याला गादीवर बसविलें.

गोव्याचा पोर्तुगीज गव्हर्नर ' डा-कुन्हा ' यानें ही धांदलीची वेळ साधून, दीव येथें किल्ला बांधला. तसेंच सं. १५३६ च्या अवलीसच गोव्यालगतची कोंकणपट्टी व घाट माथ्याचा भाग परत घेतला. हे दोन्ही—आज १० वर्षें आस-दखानाच्या कबजांत राहिले होते.. ते परत घेण्यासाठीं आसदखानानें फौज धाडली. फेब्रुआरी महिन्यांत एक लढाई झाली. तिच्यांत पोर्तुगीज लोकांची सरशी झाली. मुसलमानांनीं पुनः हल्ला केला. त्याचीही तीच दशा झाली. पुढें जुलई महिन्यांत मुसलमानांनीं तिसरे वेळां लढाई केली. तेव्हां ही त्यांचा पराजय झाला. अखेर खुद्द आसदखानानें भली मोठी फौज घेऊन स्वारी केली. तेव्हां त्या परकीयांचा निरुपाय होऊन त्यांनीं तो किल्ला उडवून दिला व तेथून पाय काढला.

याच सुमारास, कोंडवीडच्या राजानें ठरलेली खंडणी दिली नाहीं, सबब कुली कुतुबशहानें त्याच्यावर स्वारी केली. त्यानें तो किल्ला सर केला, व याचें स्मारक म्हणून त्याच्या मध्यभागीं एक मिनारा बांधविला, असें म्हणतात.

सं. १५३२ व १५३३ या सालांतले दोन शिलालेख कांजीवरं–कांचीपुरं–येथें आहेत. त्यांच्या वरून त्या सुमाराला तिनवल्लीच्या आसपासचा प्रदेश अच्युतरायानें सर केला, असा आशय निघतो. या मोहिमेमध्यें तो हजर नव्हता हें खास, पण या स्वारीबद्दल इतर कोठें अधिक माहिती मिळालेली नाहीं.

या पुढील कथाभागाचें यथास्थित वर्णन होणें बरेंच कठीण आहे. त्याच्या विषयीं निरनिराळ्या लेखकांनीं निरनिराळी माहिती दिलेली आहे. फेरिस्ता म्हणतोः—"गादीवर बसल्यावर एक वर्षानीं–सं. १५३६ सालीं, रायाच्या निमंत्र-णावरून इब्राहिम आदिलशहा, फौजेसह विजयनगराला गेला." पण अशी

विलक्षण घालमेल होण्याचें कारण काय? आपल्या पिढींजाद हाडवैऱ्याला सहाय्यार्थ बोलावणें भाग पडण्या इतकी, अच्युतरायाची दीन व अनन्यगतिक स्थिती झाली होती, असें मानावयाचें कीं काय?

'नूनीज' नें याचें कारण दिलेलें नाहीं. तरी त्यानें तिचा उल्लेख केलेला आहे. फेरिस्ता लिहितो तें ही कदाचित खरें असेल. त्या जुलमी राजानें, खरें कारण प्रजेला कळूं न देतां ही, त्याला निमंत्रण पाठविल्यावरून आदिलशहाला विजयनगराला जावें लागलें असेल. तो फौजेसह तेथें पोहोंचला. त्यावेळीं 'नूनीज' तेथें होता, हें खास. पण त्याच्या लेखामध्यें या प्रसंगासंबंधानें जी उणीव आहे ती फेरिस्ताच्या लेखावरूनच भरून काढणें शक्य आहे. सुलतान व त्याची फौज यांना अच्युतरायानें अटक न करितां कसें व कां येऊं दिलें, व त्याला भारी नजर नजराणे देऊन कसें परत वाटे लावलें, याची कल्पना फेरिस्ताच्या वर्णना वरून होते. हें रायाचें वर्तन 'नूनीज' च्या दृष्टीनें अतीशय नेभळेपणाचें, गर्ह्य व तुच्छ, वाटणें साहजिक आहे. तो म्हणतो, "सुलतानानें नागलापुरांत प्रवेश करून त्याचा सत्यानास केला" विजापुरास गेल्या वेळीं–कृष्णरायाच्या फौजी लोकांनीं, सरपणासाठीं तेथील घरें व वाडे पाडून नासधूस केली, त्यांतलाच हाही प्रकार असेल. या संबंधाची हकीकत 'नूनीज' नें आपल्या कैफियतीच्या २० व्या भागांत दिली आहे. तिच्याविषयीं फेरिस्ता म्हणतो:– 'हीमराजा' किंवा 'तिम्मराजा'–'सालुवा तिम्मा'–यानें ४० वर्षांपूर्वीं, शिवरायाचे दोन्ही पुत्र मरण पावल्या नंतर, सारा राज्यकारभार स्वतः बळकावला होता. पुढें कनिष्ट राजपुत्राच्या अल्पवयी पुत्राचा खून करून, तो सर्व राज्याचा कुल मालक बनला. त्याची आज्ञा व ताबेदारी ४० वर्षें सर्व लोक मानीत आले होते. त्याच्या मरणानंतर त्याचा पुत्र रामराय मुख्य अधिकारी झाला. शिवरायाच्या पुत्राच्या एका कन्येशीं त्याचें लग्न झालें होतें. यामुळें त्याचा अधिकार व मानमरातब पुष्कळच वाढला होता. स्वतः व मागून आपल्या वंशजांसाठीं राजपद बळकाविण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. पण सरदार लोकांनीं त्याला मुलीच्या वंशांतील एका मुलाला गादीवर बसविण्याला लावलें. त्या मुलाला रामरायानें त्याच्या एका मामाच्या स्वाधीन केलें. त्याचें नांव 'होजे तिरुमलराय'–'हुच्च त्रिमलराय' होतें. पुढें ५।६ वर्षांच्या आंतच त्यानें आपल्या विरुद्ध असलेल्या बहुतेक प्रमुख लोकांना दगा करून ठार मारलें. नंतर त्यानें मलबारावर स्वारी केली. तेथील जमींदारानें सहा महिनें लढाई करून अखेर त्याच्या फौजेला धुडकावून लावलें. तो स्वतः या स्वारीच्या शिकाऱ्या-

मध्यें गुंतला असतांना, त्यानें आपल्या एका गुलामाला विजयनगर येथें मुख्य अधिकारी नेमिलें होतें. स्वारीच्या खर्चाला राजधानीहून नगदी रकम धाडण्यासाठीं रामरायानें त्याला लिहिलें. सरकारी खजीन्यांतील उमाप संपत्ती पाहून तो गुलाम चकित झाला, व तिचा अपहार करण्याची त्याला दुर्बुद्धी झाली. त्यानें बालराजाला कैदेंतून मोकळा केला. हुच त्रिमलरायाचें सहाय्य मिळविलें, स्वतःच मुख्य प्रधान झाला, आणि आपणाला पुढें आणण्याला कारण होणाऱ्या रामरायाशीं कृतघ्न होत्साता तो फौज भरती करूं लागला. "पुष्कळसे मांडलिक व सरदार रामरायाला अगदीं त्रासून पाण्यांत पहात होते. ते भराभर आपल्या हक्कदार राजाच्या ताबेदारींत हजर होण्याला विजयनगराला येऊं लागले. थोड्याच दिवसांत त्या गुलामाच्या हाताखालीं कितीतरी पायदळ व तीस हजार स्वार, अशी भारी फौज जमा झाली." या नंतर त्रिमलरायानें त्या नगरांतील मुख्य अधिकाऱ्याचा खून करविला. रामराजा तावडतोब राजधानीला परत आला. पण त्याला त्यावेळीं आपला अधिकार नीटपणें चालवितां येईना. पुष्कळसे सरदार बिथरलेले असल्यानें त्यानें या वेळीं अस्सल राजाशीं तह केला. त्या अन्वयें त्याची सरदारी स्वतंत्र संस्थानासारखी मानण्यांत आली. तो तिकडेच जाऊन राहिला. पुढें लौकरच त्रिमलरायानें राजाचा गळा दाबून प्राण घेतला, व स्वतःच गादी बळकाविली. तो राजघराण्यांतला, आणि रामरायाहून बरा असल्यानें, सरदार लोकांनीं त्याची ताबेदारी कबूल केली. पण पुढें त्याची जुलूम जबरदस्ती व दुष्टपणा केवळ दुःसह झाला तसें त्यांनीं रामरायाला परत बोलाविलें.

त्यावेळीं त्रिमलराय भारीच कचाटींत सांपडला होता. त्यानें इब्राहीम आदिलशहाकडे बहुमोल भेटी व नजराणे देऊन आपले वकील पाठविले व त्याला अगदीं दीनपणें मदतीला बोलाविलें. विजापूरचा मांडलिक, या नात्यानें विजयनगरचें राज्य करण्यालाही तो कबूल झाला. याचा आदिलशहाला अर्थातच अत्यानंद झाला. त्यानें याविषयीं आसदखानाचीही सल्ला घेतली. अखेर तो सं. ९४२ हिजरींत—सं. १५३५ जुलईपासून सं. १५३६ च्या जून पर्यंत—फौजेसह विजापुराहून विजयनगराला पोहोंचला. " हुच त्रिमलरायानें त्याला शहरांत नेलें. आणि तेथें त्याला राजाच्या सिंहासनावर बसवून सात दिवस भारी मोठा उत्सव व समारंभ केला."

हा सर्व प्रकार पाहून, रामराय व तसक्षीय सरदार, यांना आपला सर्वच रोख बदलावा लागला. 'आपली मातृभूमी व स्वाभिमान यांच्याकडे लक्ष्य देऊन

तरी सुलतानाला शहरांतून वाटे लावावें, म्हणजे आम्ही पुनः ताबेदारींत हजर होण्याला तयार आहों,' असें त्यानें त्रिमलरायाकडे नम्रपणें सांगून धाडलें. सुलतानाला ठेऊन घेण्याची अवश्यकता उरली नाहीं असें पाहून, त्यांनेंही त्याला परत जाण्याला विनंती केली, व ठरलेली खंडणीची रक्कम–जवळ जवळ तीन कोट रुपये–व इतर बहुतसा नजराणा दिला. पण याचा अनर्थकारकच परिणाम झाला. तो असाः—

"इब्राहीम आदिलशहा कृष्णा पार होण्यापूर्वीच रामराय व त्याचे साथीदार यांनीं विजयनगरांतील सैन्यांतले पुष्कळ लोक फितवून ठेविले होते. ते केलेले करार मदार मोडून एकदम विजयनगराला आले. पूर्वीच्या राजाचा त्रिमलरायानें खून केला होता, त्याचा बदला घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. दगा होतो असें पाहून त्रिमलराय राजवाड्यामध्येंच कोंडून घेऊन राहिला. केवळ निराश झाल्यामुळें त्याला वेड लागलें. त्याच्या भरांत, शत्रूला उपयोग होऊं नये म्हणून, त्यानें सरकारी हत्ती व घोडे, यांचे डोळे फोडविले, व घोड्यांच्या शेपट्या तोडविल्या. पूर्वींपासून पिढ्यान पिढ्या संचित केलेले हिरे, माणकें, मोती, पांच वगैरे रत्नें व जवाहीर काढवून त्यानें तें सर्व आपल्या समक्ष जात्यांत घालून भरडविलें. व त्याची पूड करून उधळून दिली. नंतर महालांतील एका खांबाला एक तरवार घट्ट बांधवून शत्रूला महालाचे दरवाजे फोडून आंत येण्याला फुरसत सांपडते तोंच. त्यानें त्या तरवारीवर जोरानें घालून घेतलें. ती तरवार त्याच्या छातींत घुसून पाठींतून पार गेली. अशा रितीनें त्यानें आपला शेवट करून घेतला. नंतर रामराय विजयनगराचा निस्सपत्न राजा झाला."

या पुढें या दुसऱ्या राजघराण्यांतले, तरुण किंवा बाल, राजे, गादीवर बसलेले पदच्युत झालेले, अथवा मारले गेलेले, यांचा फेरिस्ताच्या इतिहासामध्यें मुळींच उल्लेख नाहीं. येथून रामरायालाच विजयनगराचा राय म्हटलें आहे. अच्युतराय व सदाशिवराय यांचा नाम निर्देश सुद्धां नाहीं. सदाशिवराय प्रतिबंधांत होता तरी, तो खरा राजा समजला जात होता. त्याचें ही नांव दिलेलें नाहीं.

इब्राहीम आदिलशहा फौजबंद विजयनगराला आला, व भली मोठी खंडणी व नजर नजराण्याची रक्कम घेऊन परत गेला, याविषयीं फेरिस्ता व 'नूनीज' या दोघांच्याही लेखांमध्यें एकवाक्यता आहे. या गोष्टी सं. १५३५-३६ त

घडल्या. 'नूनीज' च्या कैफियतीपैकीं ऐतिहासिक भाग येथवरच आहे. ( राजाच्या वर्तनामुळें सर्व लोक बेदिल झाल्याचें 'नूनीज' यानें लिहिलें आहे. सुलतान परत गेल्यावर लौकरच ही गोष्ट घडली असावी, तेव्हां 'नूनीज' नें आपली कैफियत सं. १५३६-३७ सालांत लिहिली असें मानलें पाहिजे.)

अच्युतरायाच्या कारकिर्दीत पुढें घडलेल्या गोष्टींची हकीकत फेरिस्ताच्या इतिहासावरून मिळते. ती अशीः—

हुच्च त्रिमलरायाचें मरण व रामरायाचें राज्यारोहण, यांची बातमी येतांच, सुलतानानें आसदखानाला अदोणीचा किल्ला सर करण्याला पाठविलें. तो किल्ला या राज्यांत विशेष महत्वाचा होता आणि तो विजयनगरवाल्यांच्या अमलांतला असल्याबद्दल केव्हांच वाद नव्हता. रामरायानें आपला धाकटा भाऊ वेंकटाद्री, याला त्याच्या मदतीला धाडलें. त्यावर आदिलशहाही मोठ्या फौजेनिशीं तिकडे जाण्याला निकडीनें निघाला.

"वेंकटाद्री येत असलेला पाहून आसदखानानें वेढा उठवून त्याला तोंड दिलें. पुढें बरीच निकराची झटापट झाली. शत्रूची फौज जबरदस्त सबब आपल्याला कदाचित अपयश येईल, असें पाहून आसदखानानें काढता पाय घेतला आणि ४।५ कोस मागें जाऊन फौजेचा तळ दिला. तेथवर शत्रूनें त्याचा पिच्छा पुरविला. दुसरे दिवशीं ही निर्वेध पाठलाग करितां यावा म्हणून वेंकटाद्रीनें त्याच्या पासून दोन मैलांच्या आंत तळ दिला, व तो बिनघोर व स्वस्थ राहिला. अशी संधी आसदखानाला हवीच होती. त्यानें ऐन पहांटे उठून, ४००० निवडक स्वारांनिशीं, वेंकटाद्रीच्या छावणीवर अवचित छापा घातला. तेथें कांहींच जाग किंवा बंदोबस्त नव्हता, किंवा अशा अवचित घाल्याच्या प्रतिकाराची कांहींच तजवीज केलेली नव्हती. वेंकटाद्रीला हल्ला झाल्याची खबर कळण्यापूर्वीच आसदखान त्याच्या डेऱ्यापर्यंत सुद्धां पोहोंचला. तेव्हां वेंकटाद्री सारें सामान सुमान, खजीना, हत्ती व मुलें माणसें, शत्रूच्या तावडींत सोडून, कसाबसा जीव घेऊन पळून गेला. पुढें फटफटीत उजाडल्यावर विखरलेले बरेचसे लोक जमा करून, तो लढाईच्या तयारीनें उभा राहिला. पण आसदखानाचा पक्का लढण्याचा निश्चय पाहून व स्वतःच्या मुलां माणसांच्या हिफाजतीविषयीं काळजी वाटून त्यानें लढाईचा नाद सोडला, आणि कांहीं कोस माघारा जाऊन, तेथें आपल्या फौजेचा तळ दिला. तेथून त्यानें झालेली हकीकत रामरायाला लिहून पाठविली व सैन्याची कुमक मागितली. ती रामरायानें तावडतोब त्याच्याकडे पाठविली, व शिवाय खर्चालाही पाठविलें. तसेंच ही मोहीम निकोपाला लावण्याचा आपला

निश्चय त्यानें वर वर प्रगट केला तरी त्यानें अंतस्थ रीतीनें वेंकटाद्रीला सांगून पाठविलें कीं, 'अदोणीवर स्वारी करण्याची बुद्धि व बेत खुद्द आदिलशहाचा नाहीं. त्याला तिकडीलच कांहीं फितूर जमीनदारांनीं याबद्दल सांगून पाठविलें होतें, हें खास. शिवाय आपले बरेचसे सरदार आदिलशहाला अनुकूल आहेत. सबब तुर्त मुसलमान लोकांशीं युक्ती प्रयुक्तीनें तह करून, मुलें माणसें सोडवून घ्यावीं.' त्यावरून वेंकटाद्रीनें सुलतानाकडे तहाचें बोलणें लावलें. त्यानें आसदखानाला ही मिळवून घेतलें होतें. अखेर सर्व गोष्टींचा हवातसा निकाल लागल्यावर आदिलशहा आसदखान व सारी फौज यांच्यासह परत गेला."

यानंतर आसदखानाविरुद्ध बरींच कारस्थानें झालीं. तरी सुलतानानें त्याची बडेजाव केली व त्याचा मान मरातब वाढविला. पुढें विजापूर दरबारांत गृह कलह व गोंधळ माजला. तो सं. १५४२ पर्यंत जारीच होता. त्यावर्षी अच्युतराय मरण पावला व सदाशिवराय नांवाला गादीवर बसला. त्याच्या साऱ्या काराकर्दीत सर्व राज्यकारभार रामराय व त्याचे बंधू वेंकटाद्री व त्रिमलराय, यांच्याच हातीं होता.

फेरिस्ताला आसदखानाविषयीं भारीच कौतुक व पक्षपात वाटत होता. त्यानें त्याच्या प्रत्येक कृत्याचें समर्थनच केलें आहे. (फेरिस्तानें आसदखानाचें वैभव, थोरवी, व कर्तबगारी, यांची भारीच प्रशंसा केली आहे. "तो हुषारी, विद्वत्ता, आणि चातुर्य यां विषयीं फारच विख्यात होता.······सरदार लोक, सुप्रसिद्ध विद्वान, व गुणी लोक, यांचा तो साऱ्या दक्षिण देशांत सारखा ४० वर्षे नामी पुरस्कर्ता व आधारस्तंभ होता. आमरण त्याची मानमर्यादा व बडेजाव सारखी कायम राहिली. त्याची राहाणी, व त्याचें ऐश्वर्य, तत्कालीन इतर सर्व सरदारांपेक्षां किती तरी अधिक व प्रशंसनीय होतें. विजयनगरचे व आसपासचे देशी विदेशी राजे महाराजे त्याच्या अंगच्या अद्वितीय गुणांचा नेहमी गौरव करीत, आणि त्याच्याकडे वरचेवर प्रशंसापत्रें व मौल्यवान भेटी पाठवीत. त्याचे खानगी नोकर २५० होते. त्याच्या जवळ भले मोठे ६० व मध्यम १५० हत्ती होते. त्याच्या पागेंत खासे अरबी व इराणी घोडे ४०० व देशी घोडे किती तरी होते. त्याच्या जवळ अगणित संपत्ती होती.") आसदखान मूळचा एक तुर्की गृहस्थ. त्याचें नांव खुस्रू. तो मूळ इस्मायल आदिलशहाच्या पदरीं नोकर राहिला. सं. १५११ मध्यें विजापुरावर हल्ला झाला त्यावेळीं त्यानें त्या सुलतानाचा बचाव करून नांव मिळविलें. त्या हल्ल्याच्या प्रसंगीं, सुलतानाची चुलती दिलशाद आगा, इनें भारीच पराक्रम केला. यामुळें तो हल्ला इतिहासांत प्रसिद्ध झालेला आहे. याच्या बदल्यांत सुलतानानें त्याला आसदखान हा किताब, व बेळगांवची जाहगीर दिली. पुढें तो आमरण याच नांवानें मशहूर राहिला. तो वाढत वाढत विजापुर दरबारांत मुख्य वजीर

व सर्व फौजेचा सेनापती झाला. अखेर संपूर्ण वैभव, मान मरातब आणि दीर्घायुष्य, यांचा उपभोग घेऊन तो सं. १५४९ सालीं मरण पावला.

त्याच्या विषयीं गोव्याच्या पोर्तुगीज लोकांचें मत भारी वाईट झालेलें होतें. त्यांच्यांतील बहुतेक कैफियतकारांच्या मतें, तो पक्का कृष्ण कारस्थानी, लबाड, स्वहितार्थ धन्याशीं बेइमानी करणारा असा होता. त्याच्या चरित्राचा एक स्वतत्र भाग होईल. (फेरिस्तानें तें चांगलें २०।२५ पानांत लिहिलें आहे.) त्याच्या विषयीं नमूद करण्यासारख्या किती तरी गोष्टी उपलब्ध आहेत. त्यांपैकीं 'बारोस' याच्या 'एशया' मधून एक अशीः—पोंड्याला वेढा पडला असतांना, तीघां हिंदू संस्थानिकांनीं गोव्यालगतच्या कोंकणपट्टीवर स्वारी केल्याचा मागें उल्लेख आलाच आहे. तेथील लोकांनीं गोव्याचा गव्हर्नर 'नूनो-डा-कुन्हा' याच्याकडे मदत मागितली, पण आदिलशहाशीं बिघाड होऊन युद्ध सुरूं होईल, या भीती मुळें त्यानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. त्याला बेळगांवचा जहागिरदार आसदखान याची मुख्य भीती होती.

"स्वतः एखाद्या उंच व बिनघोर ठिकाणीं बसून आसपासच्या मैदानांत चाललेल्या वणव्याचा कल्लोळ व नाश मुकाट्यानें पहात राहणाऱ्या प्रमाणें, आसदखान बेळगांवच्या किल्यांतून हा चाललेला प्रकार पहात होता."

विजापुरास येऊन राज्यकारभारांमध्यें मदत करण्यासाठीं सुलतानानें त्याला पाचारण केलें, तोंवर त्यानें याविषयीं कांहींच तजवीज केली नाहीं. नंतर त्यानें सुल्तानाला उत्तरीं विनंती केली कीं, "या नश्वर संसाराचा वीट आल्यामुळें, त्याचा सर्वस्वी त्याग करून आपण मक्केस जाऊन तेथेंच आमरण काळ काढण्याचा पक्का विचार ठरविला आहे." हें ऐकून इस्मायलशहा फारच नाराज व क्रुद्ध झाला, व त्यानें या प्रबल व डोईजड सरदाराचा चांगला समाचार घेण्याचें ठरविलें. आसदखानानें 'डा-कुन्हा' याला लिहून पाठविलें कीं "आम्ही पोर्तुगीज सरकाराचे अकृत्रिम स्नेही आहोंत. तुम्हीं येऊन कोंकणपट्टीपैकीं व घाटावरीलही कांहीं प्रदेशाचा कबजा करावा." 'आमचा मालक विजयनगरच्या भारी फौजेपासून आपलें रक्षण करून घेण्याला समर्थ नाहीं.' असेंही त्यानें त्याला लिहून पाठविलें. तेंही रायचूरास सुलतानाची फजीती झाल्यानंतर किती तरी दिवसांनीं, हें ही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. कृष्णदेवरायाशीं आसदखानाचा मेळ होता सबब 'डा-कुन्हा' यानें 'ख्रिस्तवाओ-डी-फिग्यूरिडो' याला त्याच्याकडे धाडलें. तो रायाच्या मर्जींतला होता, व त्यानें रायचूरच्या वेढ्यामध्यें रायाला मोठ्या शौर्यानें सहाय्य केलें होतें. त्याचें आसदखानाशीं बोलणें

झालें. त्यांत आसदखानानें आपणाला आपल्या मालकाचें भारी भय वाटतें. तो स्वभावानें चंचल व बेभरवशाचा आहे. तेव्हां पोर्तुगीज लोकांशींच कसेंही करून पक्का व कायमचा स्नेह करण्याची आपली इच्छा आहे. आपण समक्ष गोंव्यास येतों. तेथेंच याविषयीं पक्का ठराव करूं. तेव्हां तिकडे येण्याला परवानगी मिळावी. ते दोन्ही प्रांत पोर्तुगिज लोकांच्या राजाच्या कायमचे स्वाधीन करून देतो वगैरे, त्यानें 'फिग्यूरिडो' ला म्हटलें. त्याप्रमाणें 'डा-कुन्हा' नें त्या प्रांताचा कबजा केला. तोंच आसदखानानें विजयनगराच्या दरबारांत राजकारण चालूं केलें. महानवमीच्या उत्सवाला रायानें त्याला निमंत्रण केलें. तेव्हां तो १३००० स्वार व २०० हत्ती, यांच्यासह तिकडे गेला. निघण्यापूर्वी त्यानें 'डा-कुन्हा' ला सांगून पाठविलें कीं पूर्वी ते प्रांत रायाच्या ताब्यांत होते. सबब 'फिग्यूरिडो' ला पाठवावें म्हणजे रायाकडून त्याबद्दलची सोडचिठ्ठी घेऊन देववितों. त्या प्रमाणें 'फिग्यूरिडो' निघाला. पण त्या पूर्वीच आसदखान विजयनगराला पोंहोंचून रायाला भेटल्याचें त्याला कळलें. रायानें आसदखानाची चांगल्या तऱ्हेनें भेट घेतली व त्याला 'तुंगे आणि तुरुगज'—बहुधा तुंगळ व तोरगल—हे दोन गांव इनाम दिले. सुलतानाच्या विरुद्ध त्याची मदत मिळेल अशी रायाची समजूत होती.

याप्रमाणें आसदखान आपल्या विरुद्ध असल्याचें ऐकून सुलतान फारच नाउमेद झाला, व मोठा कठिण प्रसंग आला असें त्याला वाटलें. तरी तो फौज घेऊन रायाच्या छावणीपासून बारा कोसांवर आला. आसदखानानें आपले डेरे रायाच्या सरदार लोकांच्या डेऱ्यांपासून कांहीं अंतरावर निराळे दिले. 'आपल्या त्या बदमाष व निमकहराम गुलामाला स्वाधीन करावें,' म्हणून सुलतानानें रायाकडे लिहून पाठविलें. त्यानें तें पत्र आसदखानाकडे धाडलें. त्यावर त्यानें 'आपण नेहमीं आपल्याच-रायाच्या-पक्षाला कायम राहूं. मुसलमानांकडे मिळणार नाहीं, असें रायाला पुनः पुनः सांगितलें, पुढें कांहीं दिवस गेले. त्या अवधींत आसदखान व सुलतान यांच्या छावण्यांमध्यें सारखें दळणवळण चालूं आहे, असें रायाला कळून आलें. सुलतानाकडून रायाला रायचूराचा कबजा घ्यावयाचा होता. सबब दोन्हीं फौजा त्या रोखें निघाल्या. रायावर अवचित हल्ला करण्याची सुलतान संधी पहात होता. आसदखानानें तिसऱ्या दिवशीं, राजाच्या फौजेच्या आधींच, आपल्या फौजेचा तळ हालविला व उजाडण्यापूर्वीच नदीपार होऊन, तो सुलतानाच्या फौजेंत जाऊन मिळाला. तेथें त्याची आदिलशहानें बाह्यतः मोठ्या आदरानें भेट घेतली. आसदखानानें त्याला नम्रपणें विनंती केली कीं, 'पोर्तुगीज लोक व राय, यांच्याशीं चालविलेली

सारीं कारस्थानें व डावपेंच केवळ हुजूराच्या हितासाठीं व बुद्ध्यां केले होते, यावर सुलतानानें त्याला पूर्णपणें माफी दिली. याप्रमाणें दगा देऊन निघून जाण्याच्या नुकतेंच पूर्वीं, त्याचें 'फिग्यूरिडो' शीं बोलणें झालें होतें. त्यांतही त्यानें, रायाकडून गोव्याच्या खालच्या प्रदेशाबद्दलची सोडचिठ्ठी मिळवून देण्याच्या संबंधानें पुनः आश्वासन व वचन दिलें होतें. रायाशीं आपला उत्तम स्नेह आहे, असेंही त्यानें सांगितलें.

अखेर आदिलशहालाही आसदखानाच्या या दुटप्पी वर्तनाची भीती वाटली. त्यानें रायाशीं खानगी रीतीनें समेट करून तह केला. त्या अन्वयें रायचूर सुलतानाकडेच राहिलें, त्याच्या ऐवजीं दुसरा कोणचासा प्रांत रायाला मिळाला. ही सारी हकीकत 'बारोस' च्या कैफीयतीवरून दिलेली आहे.

या व फेरिस्तानें दिलेल्या हकीकतीमध्यें कित्येक बाबतींत फरक आहे. पुढें याच संबंधानें लिहीत असतांना 'बारोस' यानें सं. १५३६ सालचा उल्लेख केला आहे. यावरून ही हकीकत, सं. १५३५ सालीं सुलतान विजयनगराला गेला होता, त्या संबंधाची असेल, असेंही मानतां येईल. 'नूनीज,' 'बारोस,' आणि फेरिस्ता, यांच्या कैफियतींतील हकीकतींची एक वाक्यता करण्याचा प्रयत्न करणें सुद्धां व्यर्थ आहे. तरी यावरून आसदखानाची धूर्तता, कावेबाजपणा, व लबाडी, यांचें बरेंच निदर्शन होतें. सं. १५२० सालीं रायचूरच्या लढाईनंतर त्यानें सुलतानाला वचावून नेलें, तें तरी आपमतलबानें, व रायाला थापा देऊन त्याच्या हातून सलाबतखानाचा वध करविला तोही स्वार्थ साधना साठींच, निवळ हरामखोर व बेइमानपणानेंच, असें बहुतेक तत्कालीन कैफियतकारांनीं म्हटलें आहे.

या कारकिर्दीमध्यें पोर्चुगीज लोक समुद्र किनाऱ्यावर जागजागीं ठाणीं कायम करून वसाहती करण्यांत गुंतलेले होते. आपल्या व्यापाराच्या बचावासाठीं म्हणून त्यांनीं बरेच किल्लेकोट बांधले. कालीकटचा सामूरी व विजयनगरचे मांडलिक व इतर संस्थानिक, यांच्याबरोबर त्यांच्या वरचेवर लढाया व झगडे होत. पण खुद्द रायाशीं त्यांचा सलूख कायम होता. सं. १५४० सालीं त्यांनीं विजयनगरचा राय, विजापूरचा सुलतान, व सामूरी यांच्याशीं तहनामे करून सलूख कायम केला.

पोर्चुगीज लोकांशीं हिंदू लोकांच्या घडलेल्या साऱ्या सहवासांत, या आगंतुकाशीं हिंदू लोकांनीं केलले करार मोडले, असें एकही उदाहरण नाहीं. पण पोर्चुगीज पक्षाविषयीं मात्र तसें म्हणतां येत नाहीं. हिंदू लोकांची कसल

करावी, त्यांना लुटावें, त्यांच्यावर दरोडे घालावे, याविषयीं या युरोपियन लोकांच्या परमेश्वरानें त्यांना जणों कायमची सनदच दिली आहे, किंवा असें करण्याचा त्यांना जणों दैवी हक्कच प्राप्त झालेला आहे, असेंच त्यांना वाटलें होतें किंवा काय कोण जाणें. स्पष्ट व निर्भीडपणें लिहावयाचें म्हणजे, त्यांचें सारेंच वर्तन क्रूरपणा व अत्याचार यांची एक सारखी मालिका आहे, असें म्हणावें लागतें. त्या 'थोर व सर्व गुण संपन्न' रायाच्या मनांत सारे पोर्तुगीज लोक, व विशेषतः 'ख्रिस्तवा ओ-डी-फिग्यूरिडो,' विषयीं पूर्ण प्रेम व स्नेहभाव वागत होता. या विषयींचें 'पायेस' नें केलेलें हृदयंगम वर्णन वाचून नंतर पोर्तुगीज व्हाइसरायानें या थोर हिंदू साम्राज्याशीं केलेल्या हरामखोरीच्या व गळे कांपण्याच्या वर्तनाकडे पाहिलें म्हणजे, मनाला विषाद वाटल्या वांचून राहात नाहीं. रायाशीं या लोकांनीं केलेले स्नेहभावाचे व सलोख्याचे करार मदार कायम होते. त्याच्याशीं निस्सीम स्नेह असल्याबद्दल ते उघडपणें बोलून दाखवीत. तरी त्यांचें वर्तन कसें असे, याबद्दलचें एकच उदाहरण पुढें दिलें आहे. गोव्याच्या गव्हर्नरानें स. १५४५ सालीं एक मोठें थोरलें आरमार व ३००० फौज अगदीं गुप्तपणें तयार केली. तें कोणीकडे जावयाचें हें अगदीं बाहेर पडूं दिलें नाहीं. किनाऱ्या किनाऱ्यानें जाऊन कन्याकुमारीला वळसा देऊन सर्व आरमार व फौज मद्रासे जवळ सेंट थोम येथें न्यावयाची, व फौज उतरून तेथून टाकोटाक थेट तिरुमाल, किंवा त्रिपती येथील अत्यंत संपन्न व सुप्रसिद्ध देवस्थानावर जाऊन हल्ला करावयाचा. व तेथील अगणित संपत्ती लुटून आणावयाची, असा त्याचा बेत होता. तो निवळ द्रव्यलोभमूलक आणि चोर व दरोडेखोर यांनाच साजे असा होता. सुदैवानें मोठें तुफान होऊन, आरमार हांकारण्याला हरकत झाली. तरी त्यानें पश्चिम किनाऱ्यावरील पुष्कळशीं संपन्न देवस्थानें लुटलीं व उध्वस्त केलीं. आणि तेथील सारी संपत्ती आपल्या खजीन्यांत आणिली. त्या देवालयांतील निवळ शांति ब्रह्म ब्राह्मण लोकांनीं केव्हांही पोर्तुगीज लोकांना त्रास दिल्याबद्दल, कोठें कोणी म्हटलेलें नाहीं. तीं मंदिरें विजयनगरच्या मांडलिकांच्या अमलांतलीं. त्यांच्यावर केलेला हा अत्याचार केवळ चोर व दरोडेखोराच्या तऱ्हेचा, अन्यायानें परस्वाचा अपहार करण्याच्या उद्देशानें केलेला होता.

अच्युतरायाच्या कारकिर्दींत दक्षिण हिंदुस्तानामध्यें सरदार, संस्थानिक वगैरेंनीं देवस्थानांना पुष्कळच देणग्या दिल्या. त्या संबंधाचीं दानपत्रें व शिलालेख किती तरी उपलब्ध आहेत. त्यांतील एक महत्वाचा लेख प्रोफेसर कील

हानें, यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्याची तारीख १२ आक्टोबर सं. १५४० दिलेली आहे. ( त्या दिवशीं बहुधा दसरा असावा. ) त्यांत तुंगभद्रा तीरावरील विठ्ठल स्वामींच्या मंदिरामध्यें, रायानें, मद्रासे जवळचा एक गांव विद्वान व वेद पाठी ब्राह्मणांना दान दिला, असें लिहिलें आहे. हल्लीं या प्रचंड व भव्य मंदिराचे तुटलेले व पडकेसे मंडप कायम आहेत. त्यांच्यांतील कोरीव काम पाहून हल्लीं सुद्धां प्रेक्षकांना आश्चर्य व कौतुक वाटल्या वांचून रहात नाहीं.

अच्युतरायाचा उल्लेख असलेला तूर्त उपलब्ध असा शिलालेख तारीख २५ जानेवारी सं. १५४१ चा आहे. *त्याच्या मागून गादीवर आलेल्या सदाशिव रायाच्या अगदीं अवलीच्या शिलालेखाची तारीख २७ जुलाई सं. १५४२* चा आहे.

---

# भाग चौदावा.

## अखेरीचा प्रारंभ.

सदाशिवरायाची कारकिर्द–तो बहुतेक प्रतिबंधांत असूनही राजा मानला जात होता–रामराय–आदिलशहाचें विजयनगर येथें आगमन–विजापुरावर धाड–तिचें आसदखानाच्या हातून निवारण–शहाजादा अबदुल्ला याचें बंड–सुल्तानाची कृतज्ञता–बेळगांव येथें आसदखानाचा मृत्यू–पोर्तुगीज लोकांचें शहाजाद्याला सहाय्य–तह–ऐनुल्मुल्क–गोव्याच्या आसपास लढाया–रामराय मैलापुरावर स्वारी करणार अशी हुल–तो आदिलशहाशीं मिळून अहमदनगरच्या राज्यांत धुमाकूळ घालतो–मलबार किनाऱ्यावर पोर्तुगीज लोकांचे अत्याचार–गोव्याचें ‘इन्किझिशन.’

सदाशिवराय सं. १५४१ किंवा १५४२त गादीवर आला. तो नावांचा राजा होता. सारा राज्याधिकार रामराय, त्रिमलराय व वेंकटाद्री यां तीघां बंधूंकडे होता. तरी खरा हक्कदार राजा असा तोच मानला जात होता. हें सं. १५४२ पासून सं. १५६८ पर्यंतचे पुष्कळसे शिलालेख उपलब्ध आहेत, त्यांच्यावरून सिद्ध होतें. त्यांच्यांतील बहुतेकांचें अद्यापि नीट परीक्षण व्हावयाचें आहे. (अशा ८८ लेखांची यादी पूर्वींच प्रसिद्ध केलेली आहे. तिच्यांतील ८४ लेखांच्या नित्या ‘लिस्टस् आफ आंटिक्विटीज–मद्रास’ यामध्यें दिलेल्या आहेत.) त्यांतील एक लेख सं. १५६८ सालचा, म्हणजे, ताळीकोटच्या लढाईंत हिंदू लोकांचा भयंकर पराभव झाला व खुद्द राजधानी धुळीस मिळाली, त्या नंतर दोन तीन वर्षांचा आहे. त्यांचें डाक्तर ‘ हुल्श ’ यांनीं बारकाईनें परीक्षण केलेलें आहे. त्यावरून, सदाशिवराय नांवाचा राजा होता, तो प्रतिबंधांतसा होता,

सर्व राजसत्ता त्या प्रबल बंधुत्रयाकडे होती, तरी, ते सुद्धां त्यालाच हक्कदार व खरा राजा मानीत होते, याविषयीं प्रत्यंतर मिळतें. या लेखांतील वर्ण्य व प्रमुख व्यक्ती त्रिमलरायच आहे, तरी, त्याला 'महामंडलेश्वर' इतकेंच म्हटलें आहे. सदाशिवरायाला मात्र पूर्णपणें साम्राज्यपदद्योतक बिरुदावली लावलेली आहे. कोणी एकानें 'महामंडलेश्वर रामराज त्रिमलराज' यांना एक अर्ज दिला होता. त्यावर त्यांनीं 'सदाशिवदेव महाराय'. यांच्या चरणाची परवानगी मिळविल्यानंतर वेलोर येथील देवस्थानाला एक गांव दान दिला, असें लिहिलें आहे. रामराय व वेंकटाद्री दोघेही या वेळीं मरण पावले होते. व त्रिमलराय हाच मुख्य राज्याधिकारी होता. 'कूटो' यानें लिहिलें आहे कीं, 'तीघेही बंधू, वर्षांतून एक वेळ खऱ्या हक्कदार राजाकडे जाऊन त्याच्या ताबेदारीचें द्योतक म्हणून, त्याचें पादवंदन करून येत असत.' अच्युतराय व कृष्णदेवराय, यांचें नातें, आणि त्या दोघांशीं सदाशिवरायाचें नातें काय होतें, याविषयीं अद्यापि संशयच आहे.

कृष्णदेवानें गादीवर बसतांच आपले तीघे बंधू व एक पुतण्या यांना कैदेंत टाकलें, याविषयीं वर लिहिलेंच आहे. ही गोष्ट सं. १५०९ मध्यें घडली. तेव्हां कृष्णदेवाचें वय वीस वर्षांवर झालेलें होतें. इतर कोणचाही इतिहास किंवा उपलब्ध लेख यांच्या वरून भुजबल-कृष्णदेवाच्या पुतण्याचा बाप-किंवा तत्सदृश नांव असलेला कोणी राजा झाल्याचें आढळत नाहीं. तसेंच कृष्णदेवाच्या तीघां भावांचीं नांवें 'नूनिज' नें दिलीं आहेत. तीं, कांहीं लेखांमध्यें आलेल्या त्याच्या सावत्र भावांच्या नांवांशीं जुळतीं नाहींत.

अनेक लेखांमध्य पुढील वंशवृक्ष आढळतोः—

तिम्मा—स्त्री देवकी.

वसव—स्त्री बुकुम्मा.

नरसा अथवा नरसिंह—तीन स्त्रिया—तिप्पम्मा, नागलाई, अंबांबिका.

यानें सन १४९८ च्या सुमाराला राज्यपद बळकाविलें.

तिप्पाईच्या पोटीं — १ वीर नरसिंह. (स. १५०९-१० मध्यें थोडे दिवस राजा होता)

नागलाईच्या पोटीं — २ कृष्णदेव. (सं. १५१० ते १५३० पर्यंत राजा होता.)
- कन्या (रामरायाची पत्नी)
- कन्या (त्रिमलरायाची पत्नी)

अंबांबिकेच्या पोटीं —
- ३ रंगराय. (स्त्री तिम्मांबा) — सदाशिवराय (सं. १५४२ ते ६७ पर्यंत नामधारी राजा.)
- अच्युतराय (सं. १५३० ते १५४१ राजा) — वेंकट

त्याच्यांत कृष्णदेवरायाचे दोघे सावत्र बंधू रंगराय व अच्युतराय दिलेले आहेत. अच्युतराय राजा निवडला गेला. तसेंच एक पुतण्या सदाशिवराय ही दिलेला आहे. 'स्केच आफ दि डायनास्टीज़ आफ़ सदर्न इंडिया' नांवाच्या आमच्या पुस्तकामध्यें दिलेल्या दोन शिलालेखांत अच्युतराय हा कृष्णदेवाचा पुत्र असें लिहिलें आहे. तो दुसऱ्या नरसिंहरायाचा पुत्र असल्याचें 'मनुचरित' नांवाच्या तेलगू पुस्तकामध्यें दिलेलें आहे, व तो कृष्णदेवाचा पुतण्या होता असें 'कूटो' लिहितो. सदाशिवराय हा रंगरायाचा पुत्र, व कृष्णदेवाचा पुतण्या होता, आणि तो अच्युतरायाचा पुत्र होता, असेंही कोणी कोणी म्हटलें आहे.

अच्युतरायाला वरदादेवीच्या पोटीं वेंकट नांवाचा पुत्र झाला, असें कांची येथील एका शिलालेखांत लिहिलें आहे. वेंकटरायाला गादी मिळाली, पण तो थोड्याच दिवसांत मरण पावला. त्याच्या पश्चात् अल्पवयी सदाशिवरायाला गादीवर बसविलें गेलें.

या साऱ्या भानगडी एकीकडे ठेवून तुर्त वर दिलेली वंशावळच खरी मानून निर्वाह केला बरा. पुढें शोध लागेल तसा तिच्यांत फरक करितां येईल.

रामराय व त्याचे बंधू हे रंगरायाचे पुत्र होते. असें पुष्कळशा शिलालेखांमध्यें लिहिलें असून, त्यांच्या पूर्वजांचीं नांवेंही दिलेलीं आहेत. प्रोफेसर कीलहार्न यांच्या मतें, कृष्णदेवाच्या कन्येशीं रामरायाचें लग्न झालेलें होतें, हें ही बहुतेक नक्की ठरलें आहे. लग्नांत ती बहुधां अल्पवयी असावी. कृष्णदेवराय मरण पावला तेव्हां तिचा एक दीड वर्ष वयाचा भाऊ विद्यमान होता, असें 'नूनीज' म्हणतो. पण त्याचें पुढें काय झालें तें कळत नाहीं. कृष्णदेवरायाची दुसरी कन्या, रामरायाचा भाऊ त्रिमलराय याला दिली होती, असें म्हणतात. रामरायाची पत्नी ही सदाशिवरायाची बहीण होती, असेंही कोणी लिहिलें आहे. ( रामराय हा कृष्णदेवरायाचा जांवई असल्यानें, त्याला अळ्या म्हणण्याचा प्रघात पडला. कानडी भाषेंत अळया म्हणजे जांवई, असा अर्थ होतो. )

सन १५४२ त अच्युतराय मरण पावल्यावर राजधानीमध्यें बरीच गडबड व मारामारी झाली, यांत शंका नाहीं. तसें झाल्यांत आश्चर्य ही नाहीं. त्यानें साऱ्या राज्यांत बजबजपुरी माजवून सर्व सरदारांना नाराज केल्यामुळें त्यांच्यामध्यें सहजच गादीविरुद्ध बंडबखेडा करण्याची इच्छा उत्पन्न झाली होती, व ते अगदीं त्रस्त व अनावर झालेले होते.

त्या सुमाराला विजयनगर येथें घडलेल्या प्रकारासंबंधानें 'गॅसपार कोर्रिया' यानें लिहिलेली हकीकत कितपत विश्वसनीय आहे, हें सांगतां येत नाहीं. त्यानें सं. १५३५-३६ सालीं घडलेल्या गोष्टींची या स्थळीं पुनरावृत्ती केलेली दिसते. याचें वर्णन पूर्वीं आलेलेंच आहे. या वेळीं हा आदिलशहा विजयनगराला गेला होता असें तो लिहितो. तो दोन वेळां तेथें गेला असला तर नकळे. नाहीं तर 'कोर्रिया'च्या या लिहिण्यांत कांहीं तरी चूक असावी. फेरिस्ता व 'नूनीज' यांनीं दिलेल्या सालांमध्यें मेळ आहे व 'नूनीज' खुद्द अच्युतरायाच्या कारकिर्दींत विजयनगर येथें होता.

'कोर्रिया' म्हणतो:-" सं. १५४२ सालीं विजयनगरचा राजा अच्युतराय मृत्यू पावला. त्याचा अल्पवयी पुत्र त्याच्या चुलत्याच्या-माजी राजाच्या-भावाच्या ताब्यांत होता. माजी राजा राज्याचा खरा हक्कदार वारस नव्हता. ( मागें दिलेली वंशावळ पाहतां हा मुलगा वेंकटराय व चुलता रंगराय असावा, असें दिसतें.) सरदार मंडळानें त्या बाल राजाला मोकळें ठेवण्याचा विचार करून दोन प्रमुख मंत्री राज्याचे मुखत्यार नेमण्याचें ठरविलें. ही गोष्ट त्या चुलत्याला मान्य नव्हती. या योगानें तो निमाल्य झाला असता. त्यानें आपल्या पक्षाचे लोक वाढविले. तसें राज्यकारभार सुरळीत चालण्याची मुळींच उमेद राहिली नाहीं, असें पाहून, सरदार लोक आपापल्या जहागिरींत परत गेले, व स्वतंत्र होऊं लागले. त्या बालराजाची आई राणी इनें आदिलशहाला, मुबलक द्रव्य देणें कबूल करून, त्या बालराजाला गादीवर स्थापन करण्याविषयीं बोलावणें धाडलें. सुल्तान विजयनगराला येण्याला निघाला. त्याला वाटेंतच त्या मुख्य मंत्र्याच्या वकीलांनीं गांठलें व उदंड द्रव्य घेऊन परतविलें. खरा हक्कदार राजा—बहुधा रंगराय-याला एका किल्ल्यामध्यें अटकेंत ठेविलेलें होतें. त्याची तेथून सुटका झाली. त्यानेंही आदिलशहाची मदत मागितली. या नवीन निमंत्रणाचा फायदा घेऊन सुल्तान, बाह्यतः त्या हक्कदार राजाच्या मदतीला, पण खरोखर विजयनगरचें राज्य गिळंकृत करण्याच्या उद्देशानें निघाला. हिंदू लोकांनीं स्वतःच्या बचावासाठीं भिऊन, माजी रायाच्या भावाला गादीवर बसविलें व आदिलशहाचा राजधानीजवळच पराजय केला. त्या नूतन राजानें आपला अधिकार दृढमूल करण्यासाठीं आपले सारे प्रतिस्पर्धी, तो बालराजा, त्याचे दोघे चुलते व माजी राजा अच्युतराय, यांना ठार मारविलें. ( हे सारे कोण होते कळत नाहीं. ते कदाचित बालराजा वेंकटराय याचे चुलते किंवा मामा म्हणजे रंगरायाचे किंवा अच्युतरायाच्या राणीचे भाऊ असावेत. येथें अच्युतरायाचा पुतण्या सदाशिवराय घेतां येत नाहीं.

तो मागें हयात राहिला. तो राणीचा कोणी भाचा असेल. बालराजाचा वध झाल्याचें लिहिलें आहे. त्यावरून, फेरिस्तानें, हुचात्रिमलरायानें एका अल्पवयी राजाचा खून करविल्याचें लिहिलें आहे, त्याचें स्मरण होतें. ) पुढें त्याला प्रमुख सरदार डोईजड वाटूं लागले. त्यानें त्यांना हुजूर बोलाविलें व त्यांतून प्रथम प्रथम येऊन पोहोंचले त्यांचे डोळे काढविले. तसे बाकीचे सरदार क्रुद्ध होऊन परत गेले. त्यांनीं ही सुल्तानाशीं राजकारण सुरूं केलें. हरतऱ्हेनें या दुष्टराक्षसाच्या जाचांतून राज्याची सुटका करावी. सारें राज्य आपण घ्यावें, आम्हीं मदत करूं, असें त्यांनीं बोलणें लावलें. त्याप्रमाणें आदिलशहानें पुढें वाढून विजयनगरांत प्रवेश केला. तेथें पुष्कळ लोकांनीं त्याला मालक म्हणून त्याचें स्वागत केलें. लौकरच तो ही अशा कांहीं उद्दाम झाला व दांडगाई करूं लागला कीं, त्यामुळें त्याच्या जवळ पासच्या सर्व लोकांचीं मनें त्याच्या संबंधानें विटलीं, व ते त्याच्या विरुद्ध झाले. अखेर स्वतःच्या बचावासाठीं तो विजापुराला परत गेला. "तितक्यांत एका नव्याच राजानें विजयनगरची गादी बळकावली होती. तो ' पालियाकाटे '—पुलीकट—कडील एक मोठा जमींदार होता. त्याचें माजी राजाच्या बहिणीशीं लग्न झालें होतें. शेवटीं त्यानें सर्व राज्य आपल्या अमलाखालीं आणिलें." ( ही कृष्णदेवाची बहीण होते. पण येथें उल्लेख आहे तो रामरायाचा. त्याचें कृष्णदेवाच्या मुलीशीं लग्न झालें होतें, बहिणीशीं नव्हे. )

या अनेक परस्पर विरोधी कथांमधून अस्सल मथितार्थ काढण्याचा तुर्त प्रयत्नसुद्धां करणें व्यर्थ होय. प्रत्येकानें मिळालेल्या दंतकथांच्या आधारानें आपआपली कैफियत लिहिली. पण त्या दंतकथांमध्येंच वेळोवेळीं विसंगतपणा आणणारा फरक पडलेला होता. सदाशिवराय सं. १५४२ ते ६७ पर्यंत गादीवर होता. सं. १५४३ सालीं बुऱ्हाण निजामशहानें रामराय व गोवळकोंड्याचा सुल्तान जमशीद कुतुबशहा, यांच्याशीं मेळ करून, आदिलशहावर चढाई केली. यांतच रामरायानें वेंकटाद्रीला रायचूर व त्याच्या खालचा सारा दुआब काबीज करण्याला पाठविलें. "तेव्हां विजापूरच्या राज्यावर तीहींकडून तीघां प्रबल राजांनीं एकदमच उठावणी केल्यामुळें त्याची फार त्रेधा उडाली," असें फेरिस्तानें लिहिलें आहे. ते वेळीं आदिलशहानें पूर्वीच्या परिपाठाप्रमाणें "आसदखानाला बेळगांवाहून हुजूर बोलाविलें व या प्रसंगीं कसें काय करावें, याबद्दल सल्ला विचारिली." त्याच्या सल्लाप्रमाणें त्यानें सोलापूरच्या आसपासचा संपन्न प्रदेश बुऱ्हाण निजामशहाला देऊन त्याची मूठ दाबली, व त्याच्याशीं सल्ला करून त्याला त्या संघांतून फोडलें; विजयनगरवाल्यांशीं तह ठरविण्यासाठीं वकील

धाडले संघांतील दोघांची अशी व्यवस्था लावून, त्यांना फोडून परत लावल्या-वर, आसदखानानें कुतुबशहावर चढाई केली. राजधानीपर्यंत त्याचा पिच्छा पुरवून तेथील कोटाखालीं त्याचा पराभव केला. त्यासमयीं हात घाईची लढाई झाली तिच्यांत त्यानें त्याच्या तोंडावर एक तरवारीचा जबर वार केला. (असें फेरिस्तानें लिहिलें आहे. पण कुतुबशाही घराण्याच्या मुसलमानी इतिहासकारानें ही गोष्ट कुली कुतुबखानाविषयींची लिहिली आहे.)

याच सुमाराला पोर्तुगीज लोकांनींही बरीच चळवळ चालविली होती. त्यांनीं वेळोवेळीं स्वाऱ्या केल्या. त्यांमध्यें त्यांना यशही आलें होतें. गव्हर्नर 'अल्फान्सो-डी-सौसा' यानें पोर्तुगालच्या राजाला ठरल्याप्रमाणें खंडणी न दिल्या-च्या सबबीवर, भाटकलच्या राणीच्या राज्यावर स्वारी करून, फारच धूळधाण उडविली, भाटकल सर केलें, व जाळलें. पुष्कळच हिंदू लोकांची मनसोक्त कत्तल केली आणि राणीला आपली ताबेदारी कबूल करण्याला लाविलें.

सं. १५४४ च्या सुमारास रामराजाच्या चिथावणीवरून बुऱ्हाणशहानें आदिलशहावर पुनः हल्ला केला. पण त्यांत त्याचा पुरेपणी पाडाव झाला.

"याप्रमाणें जय मिळाल्यामुळें इब्राहीमशहा फारच उद्दाम व गर्विष्ठ झाला. तो निजामशहाच्या वकीलांना अगदीं तुच्छपणानें वागवूं लागला, आणि, रयतेशीं व सरदारांशीं ही फारच क्रूरपणाचें वर्तन करूं लागला. त्यांतील पुष्कळांना त्यानें यःकश्चित् अपराधाबद्दल ठार मारविलें. त्यामुळें राज्यांतील लोक त्याच्याशीं बेदिल झाले."

बुऱ्हाणशहानें पुनः विजापुरावर स्वारी केली. त्याचवेळीं इब्राहीमशहाला पदच्युत करून, त्याच्या जागीं त्याचा भाऊ अबदुल्ला याला गादीवर बसविण्या-साठीं झालेला कट उघडकीस आला. तेव्हां तो शहाजादा गोव्यास पळून गेला. तेथें त्याची चांगली बरदस्त ठेवली गेली. पण इब्राहीमशहानें गव्हर्नर' डी-सौसा' याच्याशीं बोलणें लावलें कीं, शहाजाद्याला आपल्याला त्रास देतां न येईल अशा जागीं नेऊन ठेविलें तर, कांहीं मुलूख दिला जाईल. तें त्यानें मान्य केलें. तेव्हां साष्टी व बारदेश हे प्रांत पोर्तुगालच्या राजाला कायमचे देण्याचें व आसदखानानें बेळगांव येथें सांठविलेली उमाप संपत्ती 'डी-सौसा' याला जात इनाम दिली जाण्याचें ठरलें. त्यांतील हातीं लागली तितकी संपत्ती त्यानें घेतली, व शहाजाद्याला कानानोरपर्यंत पोहोंचवून पुनः गोव्यास परत आणिलें. पुढें साल अखेरीला 'डी-सौसा' याच्या जागीं 'डी-कास्ट्रो' हा गव्हर्नर होऊन आला. तो त्या बागी शहाजाद्याला सुलतानाच्या

स्वाधीन करीना. या धरसोडीच्या वर्तनामुळें सुलतानाला मोठें संकट पडलें. सं. १५४६ च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यानें पोर्चुगीज लोकांशीं तह व सलूख केला. त्या अन्वयें, आदिलशहा खास पोर्चुगालच्या राजाकडे वकील पाठवून या प्रकरणासंबंधें निकाल करून आणीपर्यंत, शहाजादा अबदुल्ला, किंवा त्याच्या कुटुंबांतील माणसें, यांच्याशीं, दक्षिणेंतील-विजापूरच्या पदरचे, तसेंच रामराय व निजामशहा यांच्या दरबारांतील सर्व लोक व कांहीं विवक्षित माणसें, यांच्याशीं भेट होऊं देऊं नये, असें मुख्य कलम व दुसरींही कांहीं कलमें ठरलीं. पण त्याप्रमाणें गोवेकरांनीं वर्तन ठेविलें नाहीं. सबब सुलतानानें सं. १५४७ सालीं साष्टी व बारदेश या प्रांतांमध्यें बरीच फौज धाडला. तिच्याशीं नेटानें लढाई करून गव्हर्नरानें त्यांना पिटाळून लाविलें.

त्याच वर्षी सेप्टेंबरच्या १७ व्या तारखेला विजयनगराशीं व आक्टोबरच्या ६ व्या तारखेस अहंमदनगराशीं डी-कास्ट्रो' यानें तह केले. त्यावरून गोव्यांतून येणाऱ्या घोड्यांच्या व्यापाराचा रामरायाला जणों मक्ता सांपडला. गोवेवाल्यांशीं निजामशहाचा परस्पर साहाय्यकारी हित संबंध व मेळ कायम झाला. ( विजयनगरवाल्यांशीं झालेल्या तहाचीं कलमें लक्ष्यांत ठेवण्या जोगीं आहेत. त्यावरून त्यांच्या निकटवर्ती प्रबल राजांशीं पोर्चुगीज लोकांचा त्यावेळीं कशा तऱ्हेचा संबंध होता तें कळतें. ) ' हा तह पोर्चुगाळच्या राजाच्या तर्फे त्याचा ताबेदार मुखत्यार, गोव्याचा क्याप्टनजनरल, ' एम-जाओ-डी-कास्ट्रो '-आणि विजयनगरचे वैभवशाली व प्रतापी महाराज सदाशिव देवराय यांच्यामध्यें झालेला होता. त्यांतील कलमें येणें प्रमाणेः—१ उभयपक्षीं एकाचा मित्र व शत्रू तो दुसऱ्याचा मित्र व शत्रू समजला जावा. उभयतांनींही जरूर पडेल, व निमंत्रण होईल तेव्हां, निजामशहाच्या शिवाय, हिंदुस्थानांतील इतर सर्व राजे रजवाडे व सरदार यांच्या विरुद्ध आपलें सारें सैन्य वगैरे सह, एकमेकाच्या सहाय्याला गेलें पाहिजे. २ गोव्याच्या बंदरांत येतील ते सर्व अरबी व ईराणी घोडे तेथील गव्हर्नरानें विजयनगरवाल्यांनाच विकत घेऊं द्यावे. त्यांतून एकही घोडा विजापुराला जाऊं देऊं नये. घोडे आल्याची विजयनगरास योग्य व वक्तशीर खबर द्यावी. त्या घोड्यांची योग्य किंमत विजयनगरवाल्यांकडून मिळावी. ३. विजयनगरवाल्यांनीं साऱ्या राज्यांतील समुद्रकांठच्या बंदरांशीं व्यापार करणाऱ्या सौदागरांना, पोर्चुगीज वखारी व अधिकारी असतील त्या बंदरांतच आपला माल पाठविण्याला लावावें. विजापूरच्या हद्दींतील बंदरामध्यें व्यापार करण्याची त्यांना सक्त मनाई करावी. ४. विजयनगरवाल्यांनीं आपणाला लागणारें सारें मीठ व लोखंड विजापूर दरबारच्या हद्दींतील बंदरांतून न मागवितां पोर्चुगीज बंदरांतूनच मागवावें. ५ कापड, कथील, तांबें,

चिनी रेशीम, वगैरे जिनसाबद्दलही हीच व्यवस्था करावी. ६. विजयनगरच्या दरबारानें आपल्या हद्दींतील बंदरामध्यें मूर–मुसलमान–लोकांचें आरमार किंवा गलबत येऊं देऊं नये. आलेंच तर तें धरून गोव्यास पाठवावें. ७. उभयपक्षांनीं मिळून आदिलशहाशीं युद्ध करण्याचें ठरविलें आहे. त्याच्याकडून काबिज केलेला सारा मुलूख विजयनगर दरबाराकडे राहील. फक्त घाटां खालची कोकणपट्टी, उत्तरेस बांद्यापासून दक्षिणेस सिंताकोरापर्यंत, पोर्चुगालच्या राजाच्या अमलांत राहील.'

दुसऱ्या तहाच्या अन्वयें, पोर्चुगीज व निजामशहा, आणि रामराय यांच्या दरम्यान परस्पर सहाय्यकारी संघ विशेषतः विजापुराविरुद्ध कायम झाला.

नंतर विजापूरवाल्यांनीं गोव्यानजीकच्या कोंकणपट्टीच्या भागावर पुनः अधिकच नेटानें हल्ला केला. त्यावेळीं लढाई झाली. तिच्यांत विजापूरकरांचा एक मोठा व प्रमुख सेनाध्यक्ष व सरदार पडला.

सं. १५४८ त पोर्चुगीज व्हाइसरायानें, विजापूर दरबार व भाटकलची राणी, यांच्याशीं बरेच अधिक फायदेशीर, असें नवीन तहनामे केले.

'डी–सौसा' व आसदखान दोघांनींही शहाजादा अब्दुल्ला याचा पक्ष उचलला. आसदखानानें सुल्तान इब्राहीम, याचा पराभव केल्यानंतर, सारी कोकणपट्टी पोर्चुगीज लोकांना देण्याचें कबूल केलें होतें. पण व्हाइसराय, आपला विचार बदलून, त्या पक्षांतून निघाला. आणि आसदखानही मरण पावला. यामुळें त्या भागांतील सर्वच बखेडे मिटले, असें पोर्चुगीज इतिहासकारांनी लिहिलें आहे.

या सुमाराच्या आसदखानाच्या वर्तनाचें वर्णन व सालवारी फेरिस्तानें दिली आहे. तिच्यामध्यें बराच फरक आहे. तो म्हणतोः—'आपल्या मनांतील संशय व बेपर्वाई व त्यानें केलेला पाणउतारा वगैरे पाहून, आसदखानाला खेद झाला, हें खरें, तरी तो स्वतः नेहमीं सारखा स्वामीभक्तच राहिला. त्यानें चाललेले कट व बखेडे मोडून टाकण्याची शर्थ केली.' पोर्चुगीज लोकांसंबंधें तो लिहितो कीं, 'त्यांनीं अब्दुल्लाचा पक्ष सोडला नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट ते त्याला बरोबर घेऊन विजापुरावर चाल करून आले. त्यांना निजामशहाची मदत होती. ते बेळगांवापर्यंत पोंहचलेही. पण आसदखानाला फितविणें अशक्य पाहून विजापूरचे सरदार राजनिष्ठपणाला जागून पुनः आपल्या मालकाच्या पक्षाला आले. तेव्हां हा बखेडा मोडला.' सं. ९५६ हिजरीच्या मोहरमांत सं. १५४९ च्या फेब्रुआरीमध्यें, सुल्तान इब्राहीम बेळगांवाकडे जाण्याला निघाला. वाटेंतच आसदखानाच्या मृत्यूची खबर आली.

आदिलशहा बेळगांवास आल्यावर घडलेल्या गोष्टींचें अर्थप्रचुर वर्णन फेरिस्तानें दिलें आहे. तें असें:—" सुल्तानानें आसदखानाच्या मुलांमाणसांची चांगली मातंपुरसी केली व परामर्ष घेतला, त्यानें त्यांना पोषाख दिले व आपल्या शाही मेहेरबानी विषयीं अभिवचनें दिलीं. पण त्याची सारी संपत्ती व जहागीर त्यानें जप्त करून खानगी उपयोगांत आणिली. " तीही अशा एका नामी सरदारानें संपादन केलेली कीं, ज्याची खुद्द फेरिस्तानें भारी तारीफ केली आहे. फेरिस्तानें लिहिलें आहे:—" त्यानें आपलें पुष्कळच दीर्घ आयुष्य, आपल्या धन्याची अगदीं एकनिष्टपणें सेवा व ताबेदारी करण्यांत खर्च केलें. धन्याविषयीं खरी निष्ठा व कळकळ बाळगणारा त्याच्या सारखा ताबेदार विरळा. इतरांना बहुतेक दुस्साध्य, अत्यंत बिकट व आणी बाणीच्या प्रसंगांतून त्यानें केवळ स्वतःच्या कर्तबगारीनें, त्या मालकाला बचाविलें होतें. तें ही कितीदां तरी. " या आसदखानाच्या संपत्तीच्या विनियोगासंबंधानें पोर्चुगीज लोकांचें मत ' डान्व्हर्स ' साहेबांनीं आपल्या ' धी पोर्चुगीज इन् इंडिया ' या ग्रंथाच्या प्रथम पुस्तकाच्या ४६५-६६ पानांवर दिलें आहे. तें आसदखानाला एक निव्वळ स्वार्थसाधू बंडखोर समजून म्हणतात, ' आदिलखान, अब्दुल्ला-यानें हें बंडाचें काम तडीस नेण्याच्या उद्देशानें पोर्चुगीज लोकांना साष्टी व बारदेश हे प्रांत आणि ' मार्टिन आल्फान्सो ' याला ( डी-सौसा-व्हाइसराय याला ) आसदखानानें सांठवून ठेवलेली अगणित संपत्ती देऊं केली होती-ती सुमारें एक कोट ड्यूकट इतकी होती. तिच्यांतून सारे दहा लक्ष ड्यूकट डा. सौसाला मिळाले. अर्धे त्यानें खासगी खर्चासाठीं पोर्चुगालला पाठविले असें कोणी कोणी लिहिलें आहे. कोणाच्या मतें ती संपत्ती त्यानें बहुतेक हिंदुस्थानांतच आपल्या दरबारच्या व सरकारी नोकरांच्या हिताकरितां खर्च केली व कांहीं पोर्चुगालच्या राजाकडे पाठविली. या दोन्ही हकीकतींतील तपशीलामध्यें बराच फरक आहे.

या वेळीं जमशीद् कुतुबशहाचा धाकटा भाऊ इब्राहीमशहा-जो वलीअहद किंवा युवराज होता-तो सुल्तान जमशीदच्या क्रोधी व जुलमी वर्तनाला त्रासून व भिऊन, विजयनगर येथें येऊन राहिला होता. त्याच्या संबंधानें फेरिस्तानें एक गोष्ट दिली आहे. ती त्या हिंदी राजधानीमध्यें घडली. यावेळीं इकडे द्वंद्वयुध्दाची चाल जारी होती असें ' नूनीज ' नें लिहिलें आहे. त्या चालीचें या गोष्टीवरून निदर्शन होतें. विजयनगरचे राजे आपल्या राज्यांतील हव्या त्या भागाच्या उत्पन्नाची पाहिजे तशी विल्हेवाट लावीत असत, असेंही ' नूनीज ' नें लिहिलें आहे. त्याचेंही यावरून प्रत्यंतर मिळतें. सबब ती गोष्ट येथ देणें वावगें होणार नाहीं. ती अशी:—

रामरायानें अंबूरखान नांवाच्या एका सिद्दी सेनाध्यक्षाची जहागीर जबरदस्तीनें काढून घेऊन, ती शहाजादा इब्राहीम याच्याकडे जात खर्चाला दिली. "आपली जहागीर काढून दुसऱ्याला दिली, हें पाहून अंबूरखान संतापलेला होता. शहाजादा इब्राहीम व अंबूरखान यांची विजयनगरच्या रस्त्यांत गांठ पडली. तेव्हां त्यानें शहाजाद्याला आपली जहागीर हिरावून घेतल्याबद्दल दूषण दिलें. शहाजाद्यानें उत्तर दिलें, 'आपल्या मिळकतीचा हवा तसा विनियोग करण्याचा राजे लोकांना हक्क आहे. ती रायानें मला दिली आहे.' असें बोलून तो जाऊं लागला. तेव्हां त्या सिद्यानें, तो आपला हक्क द्वंदयुद्ध करून साबित करण्याला तयार नसल्या बद्दल त्याला भित्रा, भ्याड, वगैरे शिव्या दिल्या. याचा भलताच परिणाम होईल, असें करणें ठीक नाहीं, असें शहाजाद्यानें त्याला सौम्यपणें समजाविलें. पण या सामोपचाराचा त्या सिद्यावर उलट परिणाम झाला. तो जास्तच रागावला व त्यानें आविक अधिक दुरुत्तरें देणें सुरू केलें. शहाजादा घोड्यावरून उतरला व तरवार उपसून लढण्यास तयार झाला. तो सिद्दी त्याच्या अंगावर धावला. शहाजादा अधिक स्वस्थचित्त असल्यानें, त्यानें त्या सिद्याला ठार केलें. त्याचा भाऊ जवळच उभा होता. त्यानें ही द्वंदयुद्धाचा आग्रह धरिला. तोही आपल्या उतावळपणाला बळी पडला."

शहाजादा इब्राहीम, सं. १५५० मध्यें, गोवळकोंड्याच्या गादीवर बसला. त्याच्या पूर्वी एक वर्ष विजापूरचा सुलतान इब्राहीम आणि बेदरचा नवा सुलतान, अमीर बरीदाचा पुत्र, अलीबरीद, यांच्यामध्यें स्नेह संबंध व तह झाल्याचें फेरिस्तानें लिहिलें आहे.

या सुमाराला निजामशहानें रामराजाकडे वकील पाठवून आपला स्नेहभाव व आदर व्यक्त केला. तो रायानें मान्य केला. हें ऐकून इब्राहीम आदिलशहा आपल्या दरबारीं असलेल्या रायाच्या वकीलांवर फारच नाराज झाला. व त्यानें त्यांची भारी अप्रतिष्ठा केली. त्यांना मरणाची पाळी येईल अशी भीती वाटल्यानें ते तेथून पळून गेले. यामुळें रामरायालाही संताप आला. त्यानें बुऱ्हाण निजामशहाला चिथावून, आदिलशहावर हल्ला करविला. त्यानें कल्याणीचा किल्ला घेतला. इब्राहीमशहानेंही उलट स्वारी करून अहंमदनगरच्या हद्दींतील एक किल्ला घेतला. तेव्हां बुऱ्हाण निजामशहा व रामरायांच्या मध्यें उघडपणें परस्पर सहाय्य करण्य साठीं स्नेहभावाचा तह ठरला. सं. १५५१ रायचूर दुआबांत रायचूराजवळच दोघांची भेट होऊन, त्यांनीं रायचूरचा किल्ला हस्तगत केला. पुढें मुद्गल ही पाडाव झालें. व सारा दुआब पुनः एकदां हिंदू राजांच्या अमलाखालीं परत आला.

या संबंधांत रामराय बाहेर असतांना त्याच्या दोघां भावांनीं राजधानींत त्याच्या विरुद्ध फिसाद केला, असें एका मुसलमान इतिहासकारानें लिहिलें आहे. त्यांनीं अदोणीचा किल्ला घेतला. त्यावर रायानें कुतुबशहाकडे कुमक मागितली. ती आल्यावर त्यानें त्या किल्ल्याला सहा महिनें वेढा घालून तो सर केला. नंतर रामारायानें आपल्या बंधूना क्षमा केली.

सं. १५५३ त बुऱ्हाण निजामशहा मरण पावल्यावर त्या दोन्हीं प्रमुख मुसलमानीं राज्यांमध्यें सलूख राहिला. पण तो फारवेळ टिकण्याजोगा नव्हता. अपसांतील मत्सर, द्वेष, कारस्थानें व कलागती, सारख्या चालूच होत्या. सुलतान इब्राहीम यानें रायाशीं सलोख्याचें बोलणें चालू केलें, त्यावरून पुनः रण माजलें.

सोलापुराजवळ लढाई झाली, तिच्यांत इब्राहिमाला हार आली.

ऐनउलमुल्क नांवाचा त्याचा एक सरदार होता. त्याच्याशीं सुल्तान इब्राहिमानें कृतघ्नपणाचें व दुष्टपणाचें वर्तन केलें होतें. त्यामुळें त्या सरदारानें निरुपायानें वैतागून बंड केलें होतें. त्याच्यावर इब्राहिमशहानें बाद–शाही फौज पाठविली. तिचा पुर्ता पराभव झाला व सुलतानानें पळून येऊन विजापूरचा आश्रय केला. हा पराजय त्याला सोलापूरच्या लढाईपेक्षां जास्त भोंवणारा होता, म्हणून त्यानें निरुपायानें रामरायाला मदतीला बोलाविलें. तेव्हां रामरायानें, आपल्या नामधारी राजाच्या वतीनें, वेंकटाद्रीला, मोठी थोरली फौज देऊन, शत्रूला विजापुरच्या अमलाखालच्या मुलुखांतून हांकून लावण्याला पाठविलें. त्याप्रमाणें त्यानें जाऊन ऐनुल्मुल्काचा पराभव केला. त्याविषयीं फेरिस्तानें लिहिलें आहे कीं:- "सैफुल्मुल्क यानें, आसदखानाप्रमाणेंच, काफर लोकांवर अवचित घाला घालण्याचा विचार केला. पण त्याच्या या बेताची वेंकटाद्रीला खबर लागली. त्यानें आपली फौज सावध ठेविली. लांब लांब काठ्यांच्या टोकांना कापडांचे पलीते बांधवून, त्यांच्या उंच उंच मशाली तयार करविल्या गेल्या. शत्रूची चाहूल लागतांच त्या मशाली पेटवून उंच धराव्या, व शत्रूच्या लोकांवर चांगला उजेड पाडावा, अशी तजवीज केली गेली. ठरावाप्रमाणें ऐनुल्मुल्क २००० निवडक लोकांसह शत्रूच्या छावणीकडे निघाला. सलबातखानही त्याच्या बरोबर होता. शत्रूनें त्याला स्वस्थपणें छावणींत येऊं दिलें. ठरल्याप्रमाणें इशारा होतांच साऱ्या मशाली पेटविल्या. वेंकटाद्री आपल्या लोकांसह सिद्धच होता. त्यानें त्या छापा घालणाऱ्यांवर एकदम तुटून पडून, त्यांच्यांतील ५०० लोक कांपून काढले. त्यांना, असें कांहीं होईल, अशी मुळींच शंका नव्हती. तेव्हां ते लोक घाबरून गडबडीनें

परत फिरले. ऐनुलमुल्क व सलाबतखान, मोठ्या शर्थीनें प्राण वांचवून परत आले. पण रात्रीं अंधेरांत वाट चुकले. प्रथमच परत आलेल्या लोकांनीं, ते मारले गेल्याची बातमी पसरली. त्यामुळें फौज घाबरली व एकदम वाट फुटेल तिकडे पळून गेली. उजाडतां ते दोघेही सुमारें २०० स्वारांनिशीं आपल्या छावणीवर येऊन पोहोंचले, तों हा प्रकार झालेला. तसे ते माणदेशाच्या मार्गे निजामशहाच्या राज्यांत आश्रयाला गेले. तिकडेच दग्यानें व दुष्टपणें त्यांचा खून झाला."

( लिस्बन येथील प्राचीन लेख संग्रहामध्यें सं. १५५५ चा एक दस्तऐवज मिळाला आहे. त्याच्यांत, विजयनगरच्या राजानें इब्राहीम आदिलशहाला, ऐनुलमुल्क व शहाजादा अब्दुल्ला यांच्या विरूद्ध मदत करण्याचें व त्या पेटीं ७,००,००० परदाओ घेण्याचें कबूल केल होतें असें लिहिलें आहे. )

सं. १५५५ सालीं पोर्तुगीज लोकांनीं स्वतंत्रपणें शहाजादा अब्दुल्ला याला विजापूरच्या गादीवर बसविण्याचा यत्न केला. त्यांत यश आलें तर खूपच भारी मोबदला मिळण्याची त्यांना लालूच दाखविली गेली होती. तिच्या मुळें त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें होतें. शहाजादा पोंडा येथें होता. तेथेंच त्याला गादीवर बसवून त्याच्या नांवाची द्वाही सुद्धां फिरविली गेली. त्याचवर्षीं 'डी-मास्कारेन्हास' मरण पावल्यावर त्याच्याजागीं 'फ्रान्सिस्को बॉरेटो' हा गव्हर्नर नेमला गेला. त्यानें शहाजाद्याची पोंडा येथें स्थापना करुन व स्वतःच वसूल वासलात करण्याला प्रारंभ केला. इब्राहीम आदिलशहाचा एक सरदार ७००० फौजेनिशीं त्याला आडवा आला. दोघांच्या बऱ्याच झटापटी झाल्या. तोंवर इब्राहीम आदिलशहाही स्वस्थ बसला नव्हता. त्यानें त्या महत्वाकांक्षी शहाजाद्याला धरून पदच्युत केलें व पोर्तुगीज फौजेवरही पुष्कळसे हल्ले केले. ही कटकट सं. १५५६ च्या हिंवाळाभर चालूच होती. पण निकाल असा कांहीं लागला नाहीं. पुढच्या वर्षीं विजापुराहून नवीन फौजा आल्या व त्यांनीं साष्टी व बारदेश यांच्यावर हल्ले केले. पण पोर्तुगीज लोकांच्या थोड्याशा फौजेनें पोंड्याजवळ त्यांचा पराभव केला. पुढें कांहीं काळ हे झगडे बंद राहिले.

सुलतान इब्राहीम आदिलशहा सं. १५५७ त मरण पावला. व त्याचा वडील पुत्र अली आदिलशहा सुलतान झाला. "इब्राहीम आदिलशहा आजारी असतांना त्यानें पुष्कळशा हकीम लोकांच्या उपचारापासून गुण आला नाहीं म्हणून, त्यांना हत्तीच्या पायीं दिलें, व कांहींचा शिरच्छेद करविला. तसे बाकीचे हकीम घाबरून पळून गेले."

गादीवर बसतांच अली आदिलशहानें, वडिलोपार्जित स्नेहसंबंध दृढ करण्यासाठीं, सदाशिवराय व रामराय यांच्याकडे नवीन तह करण्याच्या हेतूनें वकील पाठविले. बुऱ्हाण निजामशहाच्या मागून अहंमदनगरास हुसेन निजामशहा सुलतान झाला होता. त्याच्याकडेही त्यानें याच उद्देशानें वकील धाडले. त्यांच्याशीं त्या दरबाराचें वर्तन योग्य राहिलें नाहीं. सदाशिवरायाकडे पाठविलेल्या वकीलाचा मान मरातब व आदरातिथ्य उत्तम प्रकारें राहिलें होतें. सबब त्यानें विजयनगराशीं कायमचा घरोबा व स्नेह संबंध जोडण्याचा निश्चय केला. यासाठीं त्यानें नवीनच क्लृप्ती काढली. तिचें वर्णन फेरिस्तानें केलें आहे. तें असें:–"आपल्या वडिलांच्या वेळच्या झगड्या बखेड्यांमुळें राज्याला पोहोंचलेलें नुकसान भरून काढण्याचा अली आदिलशहानें निश्चय केला. त्या प्रीत्यर्थ त्यानें रामरायाशीं पूर्णस्नेह संबंध कायम करण्याचें ठरविलें. रामरायाचा पुत्र मृत्यू पावल्याचें कळलें तेव्हां तो मोठ्या धूर्तपणानें, मनाचा धडा करून, केवळ १०० स्वारांसह, विजयनगर येथें, दुखवट्यासाठीं गेला. (हा राजपुत्र रामरायाचा असावा. कारण यावेळीं सदाशिवरायाचें वय पुत्र असण्याइतकें नव्हतें.) रामरायानें आदिलशहाचें थाटानें व सभारंभानें स्वागत केलें. प्रेमपूर्ण व कळकळीचीं भाषणें करून सुलतानानेंही रामरायाचें सांत्वन केलें व त्याला पुत्र मरण जन्म शोक व सूतक सोडून देण्यास लावलें. (या प्रसंगीं सदाशिवरायाला मुळींच पुढें आणिलें नव्हतें, असें दिसतें) रामरायाच्या पत्नीनें सुलतानाला आपला पुत्रसा मानलें. तीन दिवस परस्पर भेटी मेजवान्या, व आनंद महोत्सव, सारखा चालू होता. प्रेमाचीं व स्नेह संबंधाचीं भाषणें झालीं. नंतर सुलतान निरोप घेऊन परत निघाला. रामराय त्याला नगरा बाहेर पोहोंचविण्याला आला नाहीं, याचा आदिलशहाला राग आला व विषाद वाटला. पण त्या प्रसंगीं त्यानें तो शहाणपणानें व्यक्त केला नाहीं. मनांतच ठेविला."

या वेळीं आदिलशहा खरोखरच विजयनगराला गेला होता याचें प्रत्यंतर, गोवळकोंड्याच्या एका मुसलमानी इतिहासकाराच्या लेखावरून मिळतें. त्या लेखाचें भाषांतर 'ब्रिग्स' साहेबाच्या फेरिस्ताच्या ग्रंथाच्या भाषांतराच्या तिसऱ्या पुस्तकामध्यें ४०२ पानांवर दिलें आहे. (सुल्तान फीरोज बाहामनी सं. १४०६ सालीं देवरायाच्या वेळीं विजयनगरास गेला होता त्या संबंधाच्या हकीकतीशीं हें वर्णन बरेंच जुळतें आहे. दोन्हीं वेळीं शेवट एक सारखाच झाला.)

या क्लृप्तीचा उद्दिष्ट हेतु फसला. सुलतानाच्या मनांत कायमची आढी बसली व रामरायाचा स्वयंमन्यपणा व उद्दामपणा जास्त वाढला. आपला

पिर्झादे वेरी इतक्या लीनतेनें व विनयानें वागण्याला तयार झाला, त्याअर्थी त्याचें वैभव व महत्व अगदींच ओहटीला लागलें असलें पाहिजे, अशी त्याची भलतीच समजूत झाली.

पुढील-सं. १५५८ वर्षी रामरायानें मद्रासे जवळ 'मेलियापूर'-मैलापुर-याच्यावर स्वारी केली. तेथें रोमन क्याथलिक धर्माच्या पाद्र्यांचा मोठा मठ व सेंट थोमचें देवालय होतें. या संबंधानें 'सीनार लोपेस' यानें लिहिलें आहे कीं 'सेंट थोमच्या पुण्यात्मा पंथांतील गरीब पाद्री व मठपती यांनीं नेगापट्टनपासून सेंट थोमपर्यंतचा समुद्र किनारा कबजांत घेतला होता. तिकडे पवित्र धर्मग्रंथ बायबलचा व दिव्य शुभ वर्तमानाचा प्रचार व प्रसार करण्याचा उपक्रम प्रथम त्यानींच केला होता. तिकडील पुष्कळशीं देवस्थानें, मंदिरें, व मठ त्यांनीं नासून फोडून टाकले होते. यामुळें तेथील ब्राम्हण लोकांना फारच दुःख व त्रास झालेला होता. ते रामरायाच्या पदरचे व आश्रित होते. त्यांनीं याविषयीं त्याच्याकडे गिल्ला करून, आपला धर्म व आपले देव यांच्या अभिमानास्तव तरी तावडतोब मदतीला यावें, म्हणून विनंती केली होती." हे नवीन आलेले परदेशी लोक संपन्न आहेत अशी त्यांनीं रायाची समजूत करून दिली होती. तो त्यांच्यावर जाऊन पोहोंचल्यावर, ही गोष्ट खरी नाहीं, असें त्याला कळून आलें. ते राजनिष्ठ असल्याचें पाहून त्यानें त्यांना माफी दिली व सुखासम धानांत राहूं दिलें.

विजापुरास परत आल्यावर अली आदिलशहानें हुसेन निजामशहाला कल्याणी व सोलापुर परत देण्याबद्दल सक्तीनें तगादा चालविला. त्याला निजामशहानें, "इतक्या अश्लील शद्बांनीं जवाब पाठविला कीं, तो नमूदसुद्धां करितां येत नाहीं." असें फेरिस्तनें म्हटलें आहे. त्यावरून अर्थातच पुनः युद्ध सुरू झालें.

"सं. ९६६ हिजरी सं. १५५८-५९ सालीं, आदिलशहानें रामरायाला मदतीला घेऊन, हुसेन निजामशहाच्या राज्याचे विभागसे करून, अशी कांहीं सरसकट लूटमार व धूळधाणी चालविली कीं, परेंड्यापासून खिबेर व अहंमदनगरापासून दौलताबादपर्यंत, आबादीचें नांव निशाण उरलें नाहीं. विजयनगरचे काफर अशी संधी मिळण्याला टपलेलेच होते. हर तऱ्हेचें क्रौर्य व जुलूम जबरदस्ती करण्यांत त्यांनीं कसर कशी ती केली नाहीं. मुसलमान स्त्रियांवर जबरी केली, मशीदी पाडून फोडून टाकल्या, व पवित्र कुराणाचीही पत ठेवली नाहीं."

हिंदू लोकांच्या या वर्तनामुळें गोवळकोंड्याच्या राज्यांतील विरुद्ध पक्षीयच नव्हे, तर त्यांच सहकारी विजापूरचे लष्करी व रयत लोक सुद्धां फारच

खवळून गेले. पुढें लौकरच विजयनगराचा पुर्ता सत्यानास झाला त्याच्या या वर्तनानें जणों पाया खोदला गेला.

सं. १५५८ त 'डाम-कान्स्टटाइन-डी-ब्रागांझा,' हा गोव्याचा व्हाइसराय झाला. त्याच्या अमदानींत त्या प्रांतांत सर्व तऱ्हेची जुलूम जबरदस्ती व क्रूरपणा, यांची कमाल झाली. पुढील वर्षी 'लूइज–डी-मेल्लो' यानें मलबार किनाऱ्यावरील गांवांमध्यें हाण मार व आग लावणें, यांचा जणों प्रलय उडवून दिला. त्यानें मंगलोरावर हल्ला केला. तें बंदर व शहर जाळून टाकलें व तेथील सर्व लोकांची कत्तल केली. पुढें साल अखेरीपर्यंत त्यानें दुसऱ्या पुष्कळ बंदरांची व शहरांची तीच वाट लावली. आणि समुद्रकांठचा सारा प्रदेश उध्वस्त करून टाकला.

सं. १५६० सालीं गोव्याचें धर्मपीठ बिशपरिकच्या योग्यतेचें केलें गेलें व तेथें 'इन्किझिशन' स्थापन झालें. त्याच्या द्वारें होणारे जुलूम व अत्याचार इतके कांहीं अनिर्वचनीय होते कीं, स्पेन देशांतील 'इन्किझिशन' च्या प्रतापाला ही त्यांनीं मागें टाकलें. गोवें व त्याच्या खालच्या साऱ्या प्रदेशांतील सर्व लोकांना, जबरदस्तीनें खिस्ती करण्याचा यत्न केला गेला. याला कबूल न होणाऱ्या किंवा कांकूं करणाऱ्यांना कैदेंत टाकून तेथें त्यांचे हाल हाल करीत. या सालीं व पुढील वर्षीं ही पोर्तुगीज लोकांच्या मोहिमी किंवा मुलुखगिरीचे दरोडे सारखे राजरोस चालू होते. सं. १५६४ सालीं व्हाइसरायानें मलबारी लोकांचीं गलबतें बुडविण्यासाठीं तीन गलबतें देऊन, 'मेस्किटा' याला पाठविलें. त्यानें त्याची दोन दोन, तीन तीन, अशीं मिळून २४ जहाजें बुडविलीं, पुष्कळचशा खलाशांचीं डोकीं मारविलीं, व किती तरी लोकांना शिडाच्या कापडामध्यें किंवा गोणत्यामध्यें शिवून समुद्रांत लोटून देवविलें! असे त्यानें २००० वर लोक ठार मारले.

यामुळें मलबारप्रांतांत प्राणांतिक व निकराचें युद्ध सुरू झालें. तेथील लोक हताश व जिवावर उदार झाले व त्यांनीं या परस्थ, क्रूर, नरपशूचा सर्व तऱ्हेनें व सर्व उपायांनीं नाश करून सूड उगविण्याचा निश्चय केला. कानानोर येथें पोर्तुगीज लोकांवर हल्ला झाला. पुष्कळच आणी बाणीच्या झटापटी झाल्या त्यांमध्यें पोर्तुगिज सेनापती 'नोरोन्हा' यानें सारा प्रांत उध्वस्त केला व ४०००० माडाचीं झाडें तोडून कायमचें नुकसान केलें. अखेरीला एकदांचा तह व सलोखा झाला.

# भाग पंधरावा.

## विजयनगरचा नाश–सं. १५६५.

रामरायाचा उद्धटपणा–अहंमदनगरावर हल्ला–विजयनगराविरुद्ध मुसलमानांचा संघ–पांच मुसलमान राजांचा संघ–ते तालीकोटावर पोहोंचतात–निकराची लढाई–सन १५६५–हिंदू लोकांचा अतोनात व अश्रुत पूर्व पराभव–रामरायाचें मरण–विजयनगर येथें हलकल्होळ–राज कुळाचें पलायन–विस्तीर्ण व अपूर्व वैभवशाली, अशा विजयनगर राजधानी मध्यें लूट मार–तेथील आत्यंतिक धूळधाण–पुरा व कायमचा विध्वंस–'फेडिरिसी' सं. १५६७ याचा–पुरावा–पोर्तुगीज व्यापाराचा न्हास व गोव्याच्या भरभराटीला लागलेली ओहोटी–व पूर्ण नाश.

मागील भागांत लिहिलेल्या गोष्टी कोंकणांत घडत होत्या तोंवर इकडे देशांत घाटावर किती तरी उलाढाली चालल्या होत्या व त्याही मोठ्याच त्वरेनें. रामराय व आदिलशहा यांनीं निजामशहाच्या राज्यांत धुमाकूळ घालून धूळधाणी केल्या नंतर कल्याण विजापूरवाल्यांना परत दिलें गेलें व एकदांचा तह झाला.

( या संबंधांत फेरिस्तानें अहंमदनगरच्या इतिहासामध्यें एक गमतीची हकीकत दिली आहे. हुसेन निजामशहाच्या मनांतून विजयनगरवाल्यांशीं सलूख करावयाचा होता. त्यानें कल्याण विजापूरकरांना परत द्यावें, आणि समक्ष भेटीला येऊन, आपल्या हातून विडा पान घ्यावें, अशा कांहीं अटीवर रामरायानें ती गोष्ट मंजूर केली. निजामशहा त्यावेळीं फारच कचाटींत सांपडलेला असल्यामुळें त्याला या कठिण शर्थी कबूल कराव्या लागल्या. तो रामरायाच्या छावणींत त्याच्या डेऱ्यावर पोहोंचल्यावर रामरायानें त्याला खडी ताजीम दिली. तो त्याला डेऱ्या बाहेर सामोरा गेला नाहीं. त्यानें त्याच्या हाताचें चुंबन केलें. सुल्तानानें खुळेपणाच्या आढ्यतेनें जणों रामरायाच्या स्पर्शामुळें आपले हात दूषित झाले, असें दाखवीत, तस्त तांब्या मागवून त्याच्या समक्ष हात धुतले. हें पाहून व त्यामुळें झालेला अपमान जाणून रामरायाला भारी खेद व संताप आला, व तो आपल्या भाषेंत म्हणाला, 'हा पाहुणा आलेला, नाहीं तर याला याबद्दल चांगलीच अद्दल घडती.' नंतर त्यानेंही पाणी मागवून हात धुतले. पुढें त्या हुसेनशहानें कल्याणच्या किल्ल्या त्याच्या हातीं दिल्या.) याप्रमाणें दोघेही साथी झालेले असतांना हुसेनशहानें, परत येतांच इब्राहीम कुतुबशहाशीं मेळ केला व पुनः आदिलशहावर चढाई केली. आदिलशहानें परत रामरायाला मदतीला बोलाविलें. तेव्हां तो ५०००० स्वार व मुबलक पायदळ घेऊन निघाला. दोन्ही पक्षांच्या फौजेची कल्याणीवर गांठ पडली. कुतुबशहा दगा करून आदिल-

शहाकडे गेला, यामुळें हुसेनशहाला अहंमदनगराला परत जावें लागलें. तेथें ही त्याच्यावर हल्ला झाला तथा तो दुसरी कडे गेला. "तीघांही राजांनीं अहंमदनगराला वेढा घातला, आणि आसपासचा सर्व प्रदेश लुटून फस्त करण्यासाठीं, त्यांनीं आपापल्या फौजांच्या तुकड्या चोहीकडे धाडल्या. विजयनगरच्या हिंदू फौजी लोकांनीं फारच अनन्वितपणानें अत्याचार केले. लहान मोठीं घरें दारें व इमारती जाळून पाडून जमीनदोस्त केल्या, मशीदींत घोडे बांधले, तेथील पवित्र जागेंत आरळ मूर्ती पूजेचे गलिच्छ प्रकार केले. इकडे वेढ्याचें व त्याच्या प्रतिकाराचें काम फारच नेटानें चाललें होतें. आंतील लोकांनीं मोठ्या धैर्यानें टिकाव धरला होता. पावसाळा सुरू होतांच शत्रूला परत जावें लागेल अशी त्यांना उमेद होती.

त्याप्रमाणें पावसाळा सुरू होतांच वेढा घालणाऱ्या लोकांना ओल, पाण्याचे पूर, रसदीची टंचाई, वगैरे मुळें फारच हाल सोसावे लागले. कुतुबशहानें आंतील लोकांशीं गुप्तपणें दळणवळण ठेवून, त्यांना सामान सुमान पोहोंचण्याची तजवीज केली होती. यामुळ वेढा उठविणें भाग पडलें. सर्व फौजा वेगळ्या वेगळ्या झाल्या आणि हिंदू फौज आपल्या हद्दींत परत गेली.

" हुसेनशहाच्या वर्तनामुळें आदिलशहाला पहिल्या स्वारीच्या वेळीं निरुपायानें रामरायाची कुमक मागावी लागली होती. त्यावेळीं हिंदू फौजेनें अहंमदनगर येथें फारच जुलूम व अत्याचार केले होते. मुसलमानी धर्मा संबंधें तुच्छ बुद्धी व तिरस्कार व्यक्त करणारी अशी कोणचीही गोष्ट करण्याची त्यांनीं बाकी ठेविली नाहीं. त्यांनीं मशीदींमध्यें, नाच तमाशे, व मूर्तीपूजा वगैरे अश्लाघ्य प्रकार केले. यामुळें सुलतानाच्या मनाला भारी उद्वेग झाला होता. पण त्याचा प्रतिकार करण्याचें त्यावेळीं त्याच्या हातीं नव्हतें. सबब त्यानें तिकडे लक्षच दिलें नाहींसें केलें. त्या मोहिमेनंतर रामरायाला हे सारे सुलतान विकिर व यःकश्चितसे वाटूं लागले होते. तो त्यांच्या वकीलांचा योग्य मान मरातब ठेवण्याच्या कामीं बेपर्वाई व टाळाटाळी करूं लागला. ते दरबारांत जात तेव्हां तो त्यांना आपल्या समक्ष बसूं देईनासा झाला. आणि त्यांच्याशीं आधींच तुच्छदृष्टीनें व उद्दामपणानें वागूं लागला. त्यांनीं आपल्या स्वारीमध्यें पायीं यावें, व हुकूम मिळाल्याशिवाय स्वार होऊं नये, असा त्यानें हुकूम दिला. शेवटच्या नळदुर्गावरील मोहिमेतून परत आल्यावर त्याच्या सैन्यांतील सारे हुद्देदार व शिपाई मुसलमानाशीं फारच उमेटपणानें

वागूं लागले. ते त्यांची हेटाळणी करीत व त्यांना हलकट व तुच्छ शब्द बोलत. कुतुबशहा व आदिलशहा यांचा निरोप घेतल्यावर सुध्दां, रामरायानें त्याच्या अमलांतल्या प्रदेशावर नजर ठेवून त्यांच्या सरहद्दीवर फौजा धाडल्या."

यामुळें त्या दोघांही प्रबळ सुलतानांनीं हिंदू लोकांकडे कांहीं प्रांत सोडून दिले. रामरायानें गोवळकोंडेवाल्यांकडून घ.नपूर व पानगल घेतलें. हीच हिंदू लोकांची शेवटची सरशी

"रामराय दिवसेंदिवस मुसलमानी अमलांतील मुलुखावर सारखी चढाई करीत चाललेला पाहून, शेवटीं आदिलशहानें त्याच्या उद्दामपणाला आळा घालून, त्याचें प्राबल्यकमी करण्यासाठीं, साऱ्या मुसलमान राजांचा संघ जमविण्याचें ठरविलें, व या कामीं त्यानें आपले विश्वासांतील वजीर, स्नेही, व मंत्री, यांची सल्ला घेतली.

"त्याच्यांतील कांहींच्या मतें, रायाच्या राज्याचा विस्तार, लोकसंख्या, व उत्पन्न, फारच भारी. सांठ बंदरांपासून त्यांन करभार मिळत असलेला, पदरीं मोठ मोठे सादार व मांडलिक असंख्य, आणि फौजफांटाही मनस्वी, अशा स्थितींत कोणच्याही एकट्या मुसलमानी राजाच्यानें त्याच्याशीं टक्कर मारणें अशक्य, सबब दक्षिणेंतील साऱ्या मुसलमानी राजांनीं एकत्र व्हावें, व सर्वांनीं मिळून त्याच्याशीं युद्ध करावें, हेंच योग्य, असें ठरलें. ही सल्ला आदिलशहाला मनापासून पसंत पडली, आणि त्यानें इब्राहीम कुतुबशहाकडे गुप्तपणें वकील पाठवून या कामाला सुरुवात केली. कुतुबशहानेंही ही गोष्ट मोठ्या उत्सुकतेनें कबूल केली, व आदिलशहा आणि त्याचा प्रतिस्पर्धी निजामशहा यांच्या मध्यें मध्यस्थी करून समेट करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें अहंमदनगराला एक वकील पाठविला गेला. हुसेनशहाला पूर्वीच खबर दिली गेली होती. त्यानें त्या वकीलाची एकांतांत गांठ घेतली. वकीलानें विजापूरवाल्यांच्या बेतापासून होणारा परिणाम व फायदे यांविषयीं तपशीलवार हकीकत व साधक बाधक प्रमाणें समजावून दिलीं "तो म्हणाला:-बाहामनी बादशहांच्या अमदानींत मुसलमानी राजसत्ता एक मुखी होती. त्या वेळीं त्यांचें व विजयनगरच्या रायांचें सामर्थ्य, बहुतेक सारखेंच होतें. हल्लीं आपली सत्ता विभागली गेली आहे. साऱ्या मुसलमानी राजांनीं एक होऊन एक दिलानें वागावें व आपला प्रबल शेजारी व शत्रू याच्यापासून आपला बचाव करून घ्यावा, यांतच शहाणपण आहे. विजयनगरच्या बलिष्ट रायानें कर्नाटकांतील सारे रजवाडे अंकित केले आहेत. या मुळें त्याचें प्राबल्य जास्त वाढलें

आहे. तें कमी करून त्याचा मुसलमानी अमलांतील प्रदेशाशीं संबंध अगदीं नाहींसा करणें अवश्य झालें आहे. असें झालें तरच इश्वरेच्छेनें त्याच्या अमलाखालीं आलेल्या मुसलमान रयतेला काफर लोकांच्या जुलुमजांचापासून बेफिकर राहतां येईल व त्यांच्या मशीदी, दरगे, व पवित्र स्थळें काफर लोकांचीं वसतिस्थानें होऊं पावणार नाहींत." या त्याच्या बोलण्याचा व मुद्यांचा हवा तसा उपयोग झाला. हुसेन निजामशहानें आपली कन्या चांदबीबी इचें अली आदिलशहाशीं लग्न करून द्यावें, सोलापूरचा किल्ला तिच्या अंदणा दाखल द्यावा, त्याच्या वडील पुत्राशीं आदिलशहाच्या बहिणीचें लग्न व्हावें, आणि दोन्हीं राज्यांनीं मिळून विजयनगराचा नाश करण्यासाठीं एक दिल व एक जीव व्हावें, असें ठरलें. त्याप्रमाणें दोन्हीं लग्नें उरकली व दोघांनींही जणों या धर्म युद्धाची तयारी चालविली.

"सर्व तयारी होतांच आदिलशहानें, कुरापतीला निमित्त व्हावें म्हणून, तोंवर दोस्त असलेल्या रामरायाकडे वकील पाठविला व त्याच्या हातीं, आपलें जबरदस्तीनें दाबलेले कांहीं प्रांत परत मिळाले पाहिजेत, असें मागणें केलें. याचा जबाब काय मिळणार तें त्याला ठाऊकच होतें व तेंच त्याला हवें होतें. त्याप्रमाणें रामरायानें त्या वकीलाला भारी अप्रतिष्ठाकरून हांकून लाविलें. तोंवर सर्व सुल्तान एकत्र जमले होते. ते रामरायाला साऱ्याच मुसलमानांचा कट्टा शत्रू समजत होते. त्याचा पुरताच समाचार घेण्याची त्यांनीं जारीनें तयारी चालविली.

इब्राहीम कुतुबशहाही या संघांत सामिल झाला. चारही सुल्तान आपापल्या फौजांसह विजापूरास पोहोंचले व जवळच्या मैदानामध्यें त्यांनीं तळ दिले. ता: २० जमादिउस्सानी सं. ७९२ हिजरी सोमवार ता: २५ डिसेंबर सं. १५६४ रोजीं त्यांनीं तेथून दक्षिण दिशेनें कूच केलें. त्यावेळीं तिकडील काळीभोर मैदानें सुकून मोकळीं झाली होतीं. त्यांच्यांत रब्बीच्या पिकाचीं शेतें जागजागीं उभीं होतीं. त्या शेतांमध्यें साऱ्या फौजांतील सहस्रावधि स्वारांच्या घोड्यांना चरण्याला उत्तम सोय होती. कूच दरकूच ती प्रचंड फौज कृष्णेजवळ तालीकोटच्या लहानशा किल्ल्याजवळ पोहोंचली. या गांवाचें नांव पुढें आचंद्रार्क दक्षिणदेशाच्या इतिहासामध्यें चिरस्मरणीय झालें. (लढाई या गांवाजवळ झाली नाहीं. ती कृष्णेच्या पलीकडे दक्षिणेस बऱ्याच कोसांवर झाली. तालीकोट कृष्णेच्या उत्तरेस २५ मैल आहे. रामरायाची छावणी कृष्णेच्या दक्षिणेस कोठेंतरी होती. तेथून १० मैलांवर ही लढाई झाली. ती अमुकच जागीं झाली या बद्दल नक्की माहिती उपलब्ध नाहीं.

मुदगलाच्या सुप्रसिध्द किल्ल्याजवळही ती कदाचित झाली असेल. इंगळगी गांवाजवळ कृष्णला मोठेसें वांकण आहे. त्या सुमाराच्या उतारानेंच बहुधां संघवाल्यांची फौज नदी उतरली असावी. इंगळगीहून मुदगलास जाणाऱ्या रस्त्यावर बायापूर किंवा भोगपूर नांवाचें लहानसें खेडें आहे. त्याच्या आसपासच्या मोकळ्या मैदानांत ही लढाई झाली असेलसें वाटतें. )

तालीकोट गांव डोण नदीवर आहे. तेथून डोण व कृष्णा यांचा संगम १६ मैल आहे मद्रासेहून मुंबईस जाणाऱ्या रेलवे लाइनीवर कृष्णेला भला मोठा पूल बांधलेला आहे. त्याच्या पश्चिमेस सुमारें ६५ मैलांवर हा गांव येतो.

थंडीच्या दिवसांत मोठमोठ्या फौजा वावरण्याला हा प्रदेश सोईचा असतो. त्या दिवसांत दिवसभर स्वच्छ व कडक ऊन पडतें. तरी गार वारा चालतो त्यामुळें मनाला हुशारी व उल्हास वाटतो.

त्या प्रदेशाचा मालक या नात्यानें अली आदिलशहानें आपल्या सार्थदारां-चा राजकीय थाटानें परामर्श घेतला. त्यांनीं तेथें बरेच दिवस मुक्काम केला आणि फौजेची भारबरदारी व सामान सुमान यांची व्यवस्था केली. नदीपार होण्याला सोईचे उतार पाहून येण्यासाठीं त्यांनीं पूर्वीच हेर पाठवून दिले होते.

त्यावेळीं विजयनगर येथें अगदीं स्वस्थता होती. तेथील लोक अगदीं निर्धास्त, विश्वस्त व बेफिकिर होते. या प्रचंड राजधानीला नुकसान पोहोंचविण्यासाठीं मुसलमान लोकांनीं कितीदां तरी प्रयत्न केले होते. पण ते सारे व्यर्थ गेले होते. त्या लोकांनीं दक्षिणेंत प्रवेश करण्यासाठीं सारखे २०० वर्षें प्रयत्न केलेले निष्फळ झाले होते. यामुळेंच जणों, तेथील लोक भावी नाशाविषयीं कोणत्या प्रकारची शंका किंवा भय न वाटतां, आपापला नित्य-क्रम व व्यवहार यांमध्यें निमग्न होते. निरनिराळ्या बंदरांमधून लमाण लोक हर तऱ्हेच्या मालानें लादलेल्या बैलांचे तांडेच्यातांडे हांकीत त्या धुळीनें भरलेल्या मार्गावरून नेहमींप्रमाणें मार्गक्रमण करीत होते. त्या आसन्नप्रलय नगरावर कर्दनकाळ उद्यतायुध उभा असेल, अशी शंका किंवा विचार कोणाच्याही मनांत येणें मुळींच शक्य नव्हतें. नामधारी राजा सदाशिवराय आपल्या निर्माल्यवत आयुष्याचे दिवस अमंगळ एकांत वासांत कंठीत होता. खरा राजा रामराय यानें, आपल्या शत्रूच्या हालचालीकडे तुच्छ व उन्मत्त दृष्टीनें पाहण्यांत कांहींभरही फरक केला नाहीं. "त्यांच्याकडून आलेल्या

धकीलांशीं त्यानें झिडकाऱ्याचीं व हलकटपणाचीं भाषणें केलीं. त्या लोकांस शत्रुत्व तो केवळ कस्पटाप्रमाणें समजत राहिला." असें फेरिस्ता म्हणतो. ('कूटो' च्या म्हणण्याप्रमाणें, 'असा कांहीं हल्ला होणार याविषयीं रामरायाला गंधवार्ता सुध्दां नव्हती. शत्रू आपल्या राज्यामध्यें चढाई करून आले, हें सुध्दां त्याला ठाऊक नव्हतें. तो भोजनास बसला असतांना सहज ती गोष्ट प्रथम त्याच्या कानीं आली.' पण हें 'कूटो'चें म्हणणें असंभाव्य वाटतें.)

तरी त्यानें अवश्य तो बंदोबस्त करण्यामध्यें कोताई केली नाहीं. 'त्यानें कनिष्ट बंधू त्रिमलराय-फेरिस्ताचा 'यलतुमराज' व 'इलतुमरायजी'—याला २०,००० स्वार, १,००,००० पायदळ व ५०० हत्ती यांच्या सह, कृष्णेवरील सारे घाट व उतार यांची नाकेबंदी करण्याला पुढें धाडलें. मागून दुसरा भाऊ वेंकटाद्री यालाही भली मोठी फौज देऊन पाठवून, शेवटीं राज्यांतील सारा फौज फांटा बरोबर घेऊन, तो स्वतः शत्रूला तोंड देण्याला निघाला. त्या फौजेमध्यें राज्यांतील सर्व प्रांतांमधील लोकांच्या झुंडांच्या झुंडी निमंत्रण करून जमा केलेल्या होत्या. सरहद्दीवरील कानडे व तेलंगे, पश्चिमेकडील व मध्यदेशाचे म्हैसूरी लोक, व त्यांतच दूरच्या दक्षिण भागांतील तामील लोक यांचीही भर पडली होती. प्रत्येक प्रदेशांतील सैनिकांवर त्यांचे त्यांचे पृथक पृथक सेनाध्यक्ष होते. त्या सर्वांवर रायानें तात्पुरते प्रांतवार प्रमुख सेनानायक नेमिले होते. या फौजेंत एकंदर ६,००,००० पायदळ व १,००,००० स्वार होते. असें 'कूटो' म्हणतो. प्रतिपक्षाची फौज सुमारें याच्या निम्मी होती. या लोकांचे पेहराव, शस्त्रें व भपका, या विषयींची माहिती 'पायेस' च्या कैफीयतीवरून मिळते. या पूर्वी सुमारें ४५ वर्षें विजयनगर येथें झालेली फौजेची हजीरी समक्ष पाहून त्यानें तिच्या थाटाचें व वैभवाचें फारच सुरेख वर्णन लिहून ठेविलें आहे. त्या वेळीं तो रायाच्या थाटाच्या स्वारी बरोबर लष्करी लोकांच्या लांबच लांब रांगांमधून मिरवत गेला होता. ते लोक साऱ्या फौजेंतील निवडक व समारंभासाठीं बुध्द्यां जमविलेले होते, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शिपायांचा पोषाख व सरंजाम भगदीं साधा, मेहनत मजूरी करणाऱ्या लोकां सारखा असे. पुष्कळशा लोकांना कपड्याचा स्पर्श क्वचितच असावयाचा. त्यांचीं हत्यारें भाले व कट्यारी. अशी स्थिती होती. (हल्लीं सुद्धां पूर्वीच्या तऱ्हेवर पोशाख केलेले पुष्कळसे लोक एकत्र जमलेले पाहण्यांत येतात ते विशेषतः गुरगुंटा, गदवाल, वनपती, व आनीगुंदी वगैरे संस्थानांमध्यें. त्यांच्या अंगांत खादीचे जाडे भरडे कांडे अगरखे व मखूड मांड चोळणे असतात त्यांना मळकट पिवळा कावेचा रंग दिलेला असतो. तो जंगलाच्या कामाला फार सोईचा असतो. तो रंग खाकी रंगापेक्षां जास्त

गहिरा असतो' जखमा लागून रक्त बाहेर आलेलें या रंगामुळें दिसून येत नाहीं, असें, ते लोक म्हणतात. बहुतेकांच्या हातीं बरच्या व कांहीं थोड्यांच्या हातांत जुन्या तरवारी व जंबिये असतात. )

सार्थीदार सुल्तान बरेच दिवस तालीकोट येथें राहिले असावेत. तों वर पाठविलेले हेर परत येऊन त्यांनीं बातमी दिली कीं, नदीचे सारे उतार व घाट यांचा पुर्तेपणीं बंदोबस्त केला गेला आहे. तेव्हां फौजा नदीपार उतरावयाच्या त्या तालीकोटालगतच्या पाणवठ्यावरून शत्रूच्या समोर जबरदस्तीनें नेल्यावांचून गत्यंतर नाहीं. तो पाणवठा व उतार शत्रूच्या ताब्यांत होता. दक्षिण कांठावर त्यांनीं भक्कम मोर्चेबंदी करून बंदोबस्त केला होता. जवळच मातीचे कोट तयार करून शत्रूला नदी उतरतांना अडचण पडावी म्हणून पुष्कळशा तोफाही ठेविल्या होत्या.

या घाटाची हिफाजत करणारी फौज मुसलमानी फौजेच्या हालचालीची दररोज पक्की बातमी ठेवीत असे. सुलतानांच्या फौजेनें तळ उचलून नदी कांठा कांठानें कूच केल्याची खबर कळतांच, ते आपली जागा सोडून त्यांच्या समोरा समोर नदीच्या दक्षिण कांठानें जात, व शत्रू नदी उतरूं लागले तर त्याला अडथळा करण्याला तयार असत. मुसलमान लोकांनीं ही हालचाल निवळ धोका देण्यासाठीं बुद्ध्या तीन दिवस लागोपाठ अमलांत आणिली. तिसरे दिवशीं रात्रींच सुलतानांनीं जलदीनें तळ हालवून कूच केलें व ते पुनः तसेंच पूर्वस्थळीं परत आले. समोरच्या बाजूस शत्रूची छावणी मोकळी पाहून त्यांनीं तावडतोब आपली बरीच फौज पार उतरली. त्या योगानें बाकीच्या साऱ्या फौजेला मोकळपणीं उतरून येण्याला व रामरायाच्या मुख्य फौजेवर जाऊन पडण्याला मार्ग मोकळा झाला. असा धोका झाला तरी रामराय घाबरला नाहीं. त्यानें आपल्या बचावाच्या सर्व कांहीं तजविजी योजल्या. उजाडतां शत्रूची फौज त्याच्या तळापासून १० मैलांवर येऊन पोहोंचली. वेंकटाद्री व त्रिमलराय हेही आपापल्या फौजांसह रामरायाला येऊन मिळाले.

दुसऱ्या दिवशीं—या दिवशीं शुक्रवार होता असें फेरिस्तानें लिहिलें आहे. पण हिशेबानें तो मंगळवार येतो.—ता. २० जमादीउस्सानी सं. ९७२ हिजरी. मंगळवार तारीख २३ जानेवारी सं. १५६५ रोजीं, दोन्हीं फौजा नीट व्यवस्थशीर लढाईला उभ्या राहिल्या. लढाई फारच निकराची व निर्वाणीची झाली. तिच्यामध्यें उभयपक्षांचे बहुतेक सारेच लोक सामिल झाले. फेरिस्तानें

या लढाईचें वर्णन केलें आहे त्यांत एके स्थळीं, त्यानें नुसत्या विजयनगरच्या फौजेंत ९,००,००० पायदळ, ४५,००० स्वार, व २,००० हत्ती, या शिवाय १५,००० लोक दुसरे मदतगार असल्याचें लिहिलें आहे. त्याच्यांत व त्यानें या फौजेची संख्या इतर निरनिराळ्या जागीं दिली आहे, तिच्यांत किती तरी फरक आहे, तेव्हां हीच नक्की संख्या होती असें नाहीं. पण ती अतिशयच भारी होती यांत शंका नाहीं. हिंदू फौजेची डावी बाजू त्रिमलरायाच्या हाताखालीं होती. मध्य भागाचें आधिपत्य खास रामरायाकडे होतें आणि उजव्या बाजूवर वेंकटाद्री आपल्या फौजेसह तयार होता. त्रिमलरायासमोर अली आदिलशहा विजापूरच्या फौजेसह होता. मध्य भागावर हुसेन निजामशहा होता. वेंकटाद्रीच्या समोर मुसलमानी फौजेच्या डाव्या पक्षाला अमदाबाद बेदर व गोवळकोंडा, येथील सुलतान अलीबरीद, व इब्राहीम कुतबशहा, यांच्या फौजा होत्या. सारी मुसलमानी फौज सारखी फळी बांधून उभी होती. तिच्या मध्यभागीं तोफखाना होता. ते लोक शत्रूच्या हल्ल्याची वाट पहात होते. फौजेच्या प्रत्येक विभागापुढें बारा इमामांचे झेंडे व निशाणें फडकत होतीं. निजामशहाच्या पुढें बचावासाठीं ६०० तोफा, तीन रांगांनीं उभ्या केलेल्या होत्या. त्यांतील पहिल्या रांगेंत सर्वांत भारी, दुसरींत मध्यम, आणि सर्वांमागें लहान लहान तोफा व जेजाला होत्या. ही तोफांची व्यवस्था शत्रूच्या ध्यानांत न यावी म्हणून २,००० वर मुलुखी तीरंदाज लोक पुढें वाढवून उभे केलेले होते. शत्रू पुढें चाल करून येत असतांना, ते त्याच्यावर सारखा शरवर्षाव करीत होते. रामरायाच्या भागांतील लोक पुढें मारव्यांत येऊन पोहोंचतांच, तीरंदाज लोक तोफांच्या रांगांतून एकदम मागें झाले. त्या सरशीं भयंकर सपाट्यानें तोफखान्याची सरबत्ती सुरू झाली. तिच्या मुळें रायाच्या फौजेंतील लोकांचा फडशा पडला. ते लोक भांबरले, गोंधळले व एकदम माघार फिरले.

या वेळीं रामराजा वयातीत झालेला होता. ‘ कूटो ’ म्हणतो, ‘ यावेळीं तो ९६ वर्षांचा वृद्ध असूनही, एखाद्या ३० वर्षांच्या जवानाप्रमाणें शूर व धाडसी होता.’ फार वेळ घोड्यावर बसल्यामुळें कंटाळून तो पालखींत बसूनच लढाईची व्यवस्था लावीत व पहात होता. असें न करण्याबद्दल त्याच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं त्याला पुष्कळ विनवणी केली. पण त्यानें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. अशा वेळीं पालखींत बसून लढाईंत राहणें फारच धोक्याचें होतें, कारण कदाचित लढाई अंगावर आली तर, तात्काल माघारें फिरून निसटण्याला अडचण पडती. तो कांहीं केल्या कोणाचेंच कांहीं ऐकेना. ‘शत्रूनें किती ही

ग्रंथ संग्रहालय
नं.......

ढोल आणिला तरी, तीं कालची पोरें. आतां उधळून देऊं.' असें बोलून तो पालखींतच बसून राहिला. आपलाच विजय होणार यांविषयीं त्याला अशी कांहीं खात्री वाटत होती कीं, 'हुसेन निजामशहाचें शिर कापून आणावें, पण अली आदिलशहा व इब्राहीमशहा यांना जिवंत धरून आणावें, म्हणजे त्यांना जन्मभर लोखंडी पिंजऱ्यांत कोंडून ठेवूं,' असा त्यानें हुकूम दिला होता.

पुढें लढाईचें चोहींकडून तोंड लागलें. हिंदू फौजेनें पुष्कळशा तोफा, व गरनाळा, आणि बाण सोडण्याच्या बंदुका वगैरेंचा भारीच मारा चालविला. मुसलमानी फौजेच्या फळीच्या दोन्ही पार्श्व भागांवर निकराची व हातोहातीं लढाई झाली व त्यांना मागें हटावें लागलें. दोहीं कडील किती तरी लोक कामीं आले. या ऐन वेळेला रामराय पालखींतून उतरून आपल्या लोकांना जास्त प्रोत्साहन देण्यासाठीं "एका मोठ्या तक्तराव्यावर बहुमोल सिंहासनावर बसला. त्याच्यावर जडावाचें अप्रतिम काम केलेलें होतें व लाल मखमलीची भरगच्ची व मोत्यांच्या झालरी वगैरे लावलेली मेघडंबरी होती." त्यानें आपल्या सभोंवार द्रव्याच्या, सुवर्णाच्या आणि जडावाच्या दागिन्यांच्या राशी, खजिनदाराकडून घालविल्या. जे कोणी बहादुरी करतील त्यांना, तात्काळ त्यांच्यांतून इनाम देत जाण्याचा त्याचा विचार होता. मध्यभागांतील तोफखान्यावर हिंदू लोकांनीं पुनः एकत्र जमून हल्ला केला. त्याला यश येईल, व मुसलमानी फौजेची फळी फुटून त्याचा नाश होईल, असें वाटत होतें तोंच, त्यांनीं पुढच्या रांगेतील सारा तोफांमध्यें पैशांच्या थैल्या भरून, हिंदू लोक जवळ पोहोंचून हात घाईवर येतात तोंच, त्यांना सरबत्ती दिली. त्या भयंकर माऱ्यामुळें क्षणार्धांत ५,००० हिंदू ठार झाले. या अनर्थ पातामुळें हिंदू फौजेच्या मध्यभागामध्यें अगदींच गोंधळ उडाला. तितक्यांत ५,००० मुसलमान स्वार त्या तोफांच्या रांगांमधून बाहेर पडले. ते अस्ताव्यस्त झालेल्या हिंदू फौजेंतून मार्ग कांपीत थेट रामराय होता त्या रोखानें निघाले. त्या सुमारास राजा सिंहासनावरून उतरून पुनः पालखींत बसला होता. तो पालखींत बसतो न बसतो तोंच, लढाईच्या सपाट्यांत अनावर झालेला निजमशहाचा एक हत्ती, त्या पालखीकडेच जोरानें धांवत आला. हें पाहून भोई घाबरले. त्यांना आपल्या जिवाची काळजी पडली. ती पालखी व तिच्यांतील ती रायाची अनमोल स्वारी, तेथेंच टाकून ते धूम पळाले. रामरायाला त्यांतून सांवरून घोड्यावर स्वार होण्याला अवकाश मिळण्या पूर्वीच, शत्रूच्या फौजेची एक तुकडी तेथें पोहोंचली व तिनें त्याला पकडलें.

यामुळें हिंदू फौजेंत घबराट उडाला. ती पिछेहाट करूं लागली. तोफखान्यावरील अधिकाऱ्यानें रामरायाला निजामशहाकडे नेलें. तसें त्यानें त्याचें तत्काळ डोकें कापून, तें साऱ्या हिंदू फौजेंतील लोकांना दिसें, अशा उंचच उंच भाल्यावर टोंचून उभें करण्याचा हुकूम दिला.

रामराय मारला गेलला पहातांच हिंदू फौजेंतील लोक उधळून पळाले. एकत्र झालेल्या सुलतानाच्या फौजेनें त्यांचा पाठलाग केला व अशी सपाटून कत्तल केली कीं समरभूमी जवळच असलेली नदी रक्तानें वाहूं लागली. लढाई व नंतरचा पाठलाग यांमध्यें एकंदर एक लाखावर काफर लोक नर्कांत रवाना झाले, असें चांगल्या वाकबगार लोकांनीं म्हटलें आहे."

याप्रमाणें मुसलमान लोकांना पूर्णपणें जय मिळाला. हिंदू लोक राजधानीकडे पळून गेले. या वेळीं भारीच गोंधळ झाला व गडबड उडाली. उधळलेल्या फौजेची थोपाथोपी करणें, मध्यें कोठेंतरी मजबूत जागीं दबाव टिकाव धरून शत्रूचा प्रतिकार करण्याचा पुनः एकदां तरी प्रयत्न करून पहाणें, किंवा शहराच्या असपासच्या बिकट जागेंत मार्गावर किंवा खुद्द शहराच्या तटबंदीच्या आडून बचाव करणें, यांपैकीं कांहींच कोणाला सुचलें नाहीं किंवा कोणी केलें नाहीं. न भूतो न भविष्यती असला पराजय व पळापळ झाली. तिची नुसती कल्पनासुद्धां होणें कठिण.

"या लढाई नंतर अशी कांहीं मनमुराद लूट झाली कीं त्या विजयी फौजेंतील यःकश्चित खानगी माणसाजवळ सुद्धां सोनें, जवाहीर, कींमती सामान, घोडे, तम्बू, हत्यारें, व गुलाम नको नको इतके विपुल झाले. ज्याच्या जें हातीं लागलें तें त्याच्याकडेच सुलतानांनीं राहूं दिलें. फक्त हत्ती मात्र सरकारांत घेतले गेले."

रामरायाच्या मरणा संबंधानें 'कूटो' लिहितो कीं, हुसेन निजामशहानें त्याचा शिरच्छेद स्वतः हातानें करीत म्हटलें, 'आतां मी हा तुजवर खरा मनाप्रमाणें सूड घेतों आहें. याबद्दल पुढें परमेश्वर मला वाटेल तें करो.' रामरायाच्या मरणामुळें अदिलशहाला भारी दुःख झालें. (ब्रिग्स साहेबांनीं फेरिस्ताच्या इतिहासाचें भाषांतर सं. १८२९ सालीं प्रसिद्ध केलें. त्यांत त्यांनीं या संबंधतां एक टीप दिली आहे. तिच्यांत लिहिलें आहे कीं, सुलतानाच्या मनांत या हिंदु राजाविषयीं किती द्वेश व तिरस्कार वागत होता व त्या वेळीं या थोर म्हणविलेल्या लोकांची सुद्धां बुद्धी व परिस्थिती कशी नीचावस्थेला पोहोंचलेली होती याचें प्रत्यंतर त्यांच्या या वेळच्या वर्तनावरून व्यक्त होतें.

विजापूर येथील एका मोठ्या मोरीच्या तोंडावर रामरायाचें शिर कोरून, त्याच्या मुखांतून घाण पाणी वाहविलें आहे! रामरायाचें शिर त्याचा शिरच्छेद करणाऱ्याच्या हातीं पडलें. पुढें त्याचे वंशज या लढाईच्या प्रत्येक वर्षगांठीच्या दिवशीं, त्याच्या वर तेल व शेंदूर फासून आज २५० वर्षें अहमदनगरच्या लोकांना दाखवीत आले आहेत.)

या भयंकर पराजयाची व सत्यानाशाची बातमी भराभर राजधानीला पोहोंचली. असा कांहीं कल्पांतिक अवचित अशनिपात होईल, अशी तेथील लोकांना मुळीं कल्पना सुद्धां नव्हती. ते स्वस्थ चित्तानें नित्य व्यवहार करीत होते. त्यांचे सेनानायक व अधिपती, असंख्य शूर वीर बरोबर घेऊन, या स्वारीला मोठ्या उल्हासानें व थाटानें, त्यांच्या देखत निघालेले. त्याच्या परिणामाविषयीं त्यांना पूर्ण खात्री व भरंवसा असलेला. फौजेचा पराभव झाला. मुख्य अधिकारी व सेनापती मारले गेले, फौज उधळून परतली, अशी भयंकर बातमी आली. तीही एकाएकी. तरी या आकस्मिक अशनिपाताचें खरें स्वरूप कोणाच्या लक्ष्यांत आलें नाहीं. पूर्वी असे प्रसंग आले होते. नाहीं असें नाहीं. त्यावेळीं शत्रूचा पराभव करून त्याला धुडकावून लावलें गेलें होतें, किंवा सरकारी अतूट भांडारांतून द्रव्य दंड देऊन मूठ दाबून त्याला परत वाट लावलें गेलें होतें. तसेंच कांहीं तरी आतांही घडून येईल. खुद्द शहराला असा थोडाच धक्का बसेल. त्याचा खचित बचाव होईल. असें लोकांना वाटत होतें. पण लौकरच पराभूत, खिन्न व दीनवदन झालेले फौजी लोक आणि त्यांच्याही सर्वांच्या पुढें घाबरून व गोंधळून गेलेले राजपुरुष व राजपुत्र वगैरे परत येऊन पोहोंचले. ती भ्याड व भेभळी मंडळी परत आल्यावर त्यांनीं थोड्याच अवकाशामध्यें हातीं लागलें तेवढें जड जवाहिर राजवाड्यांतून बाहेर काढलें. तें ५५० हत्तींवर लादलें, आणि राजवाडा तसाच सोडून त्यांनीं तांतडीनें कूच केलें. जवाहीर, सोनें, व इतर संपत्ती मिळून, सुमारें १५० कोटी रुपये किंमतीची होती. शिवाय सारीं अनमोल राजचिन्हें, तें सुप्रसिद्ध बहुमोल सिंहासन, आणि इतर सर्व मौल्यवान वस्तूही त्यांनीं बरोबर घेतल्या. हिफाजतीसाठीं बरेचसे खात्रीचे व राजनिष्ठ शिपाई प्यादे, नोकर व लष्करी लोक होते. रामराय व वेंकटाद्री, दोघेही मारले गेल्यामुळें आतां साऱ्या राज्याची दारमदार त्रिमलरायावर येऊन पडली. तोच साऱ्या राज्याचा मुख्य व अद्वितीय मालक किंवा प्रतिनिधी राहिला होता त्यानें नामधारी पण बहुतेक प्रतिबंधांत असलेल्या सदाशिवरायाला बरोबर घेतलें, आणि याप्रमाणें ही राजकुलांतील मंडळी व त्यांचे आश्रित लोक यांची लांबचलांब रांग दक्षिणेकडे पेन्नूकोंड किल्ल्याचा आश्रय करण्याला निघून गेली.

हें पाहिल्यावर मात्र शहरभर एकच हुल्लड झाली व घबराट उडाला. खरा प्रकार काय तो स्पष्ट नजरेस पडूं लागला. हा नुसता अपजय नव्हे भयंकर प्रलय, अशी सर्वांची खात्री झाली. आशेला थारा असा कोठूनच कांहीं उरला नाहीं. शहरांतील दहा लाख लोकांचा कोणा त्राता संभवता उरला नाहीं. माघार घेऊन कोठें थांबण्याची किंवा कोठेंतरी पळून जाण्याची वाट, कांहीं थोड्याशा लोकांशिवाय कोणाला मुळींच उरली नाहीं. ओझ्याच्या गाड्या व भरतीचे बैल चटसारे लढाईला गेलेले. ते परत आले नव्हते. सारी मौल्यवान चीजवस्त पुरून टाकावी व तरण्या ताठ्या माणसांना शस्त्रें देऊन सज्ज करून वाट पहात राहावें, या पलीकडे आतां दुसरें कांहींच करतां येणें शक्य नव्हतें. दुसऱ्या दिवसापासून आसपासचे चोर, लुटारू व जंगलीलोक यांचा शहरामध्यें सुळसुळाट सुरू झाला. बंजारी, लमाण, कुरब, बेरड, इत्यादिकांच्या टोळयाच्या टोळया त्या हतभाग्य शहरावर गिधाडांप्रमाणें उतरल्या व त्यांनीं दुकानें व कोठारें यांची लूट चालविली आणि पुष्कळच संपत्ति लांबविली. या लोकांनीं जथ्यानें जमून घेऊन एका दिवसांत सहा वेळ लागोपाठ लूटमार व हल्ले केले, असें ' कूटो ' नें लिहिलें आहे.

तिसरे दिवशीं खऱ्या प्रळयाला प्रारंभ झाला. ( या पुढील हकीकत 'कूटो'च्या कैफीयतीच्या आधारानें दिली आहे. गोवळकोंड्याच्या मुसलमानी इतिहासकारानें लिहिलें आहे कीं, लढाईनंतर त्या एकत्र झालेल्या सुल्तानांच्या फौजा दहा दिवस समर भूमीवरच राहून, नंतर विजयनगराकडे रवाना झाल्या. या दोन्हीं हकीकती खऱ्या असण्याचा संभव आहे. मुसलमानी फौजेचे बिनीचे लोक पुढें राजधानीकडे वाढून गेले असतील, आणि वाटेंत अडथळा करण्याला कोणी नाहीं असें कळल्यानंतर, मुख्य फौजेचा तळ दहा दिवसांनीं हलला असेल. )

विजयी मुसलमान लोकांनीं समर भूमीवर विश्रांती घेतली व ते ताजे तवानें झाले. नंतर लौकरच ते राजधानीला जाऊन पोहोंचले. तेव्हां पासून पुढें पांच महिनेपर्यंत विजयनगराला उसंत कशी ती मिळाली नाहीं. ते लोक तेथें पुर्ता सूड उगवून नायनाट करण्याला आलेले. त्यांनीं तें काम अव्याहत व मनांत कांहीं एक किंतू न ठेवतां उरकलें. तेथील लोकांची काडीभर गय न करितां कत्तल केली. सारे महाल व मंदिरें यांचा विध्वंस केला. तोही इतक्या कांहीं क्रूर व निर्दयपणानें आणि एखाद्या हिंस्र पशुप्रमाणें कीं, थोडीशींच प्रचंड, मोठीं व पक्कीं देवालयें, भक्कम तटबंदी आणि कोट, यांच्या शिवाय आज मितीला त्या सुसंपन्न व भव्य इमारती असलेल्या भागांत,

भग्न व छिन्न भिन्न दगडी कामाच्या राशी शिवाय, कांहीं एक अवशिष्ट राहिलेलें नाहीं. त्यांनीं साऱ्या मूर्ती व पुतळे फोडून टाकले. उग्रनरसिंहाची प्रचंड एकसंधी मूर्तसुध्दां भंगून टाकला. त्यांच्या तडाख्यांतून सुटलें असें कांहींच नाहीं. ज्या मोठ्या सुरेख व भव्य चबुत्र्यावर थाटानें बसून तथील राजे महानवमीचा व दुसऱ्या महोत्सवांचा समारंभ पहात असत, त्यांच्या वरील मंडप व दलानें त्यांनीं पार पाडून, सारें कारीव काम उधडून विच्छिन्न केलें. नदी कांठावरील प्रचंड, विस्तीर्ण, व सुरेख, कोरीव काम केलेल्या, विठ्ठलस्वामीच्या मंदिराच्या व त्याच्या भोंवतालच्या इमारतींमध्यें मोठमठ्या होळ्या पेटविल्या. त्यांच्यांतील अपूर्व, अप्रतिम, दर्शनीय, दगडाचें कोरीव खोदीव काम, सारें छिन्न भिन्न केलें. अग्निप्रयोग, शस्त्रास्त्रें, कुऱ्हाडी, पहारी, कुदळी, इत्यादिकांनीं हें नासधूशीचें काम सारखें चाललें होतें. जगाच्या इतिहासांत अशा अप्रतिम संपन्न, प्रेक्षणीय, सुरेख, व वैभवयुक्त शहराचा असा सर्वस्वी विध्वंस व नायनाट, व तोही असा अकस्मात व इतका तडका फडका, दुसऱ्या कोठें कधींतरी झाला असेल किंवा नाहीं, याची शंकाच आहे. आज संपन्न व उद्यमशील लोक वस्तीनें गजबजलेलें शहर, उद्यांच शत्रूच्या कबजांत जाऊन लूटमार, नासधूस, व विध्वंस, पावलेलें आणि तेंही अनिर्वचनीय व अनन्वित राक्षसी कत्तल व क्रूरपणा यांचप्रासह!

'सीझारो फ्रेड्रिक' किंवा 'सीझर फ्रेड्रिक' या नांवानें इंग्रज लोकांमध्यें प्रसिद्ध असलेला इटालियन प्रवासी तेथें पुढें दोन वर्षांनीं सं. १५६७ त गेला होता, त्यानें लिहिलें आहे कीं "अशा तऱ्हेचा पुरा विध्वंस करून ते सुल्तान परत गेल्यावर, त्रिमलरायानें पुनः तें आबाद करण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नांवाला थोडेसे लोक तेथें जाऊन राहण्याला कबूल झाले." "विजयनगर शहराचा अगदींच विध्वंस झाला आहे असें नाहीं. घरें अद्यापि उभीं व कायम आहेत. पण त्यांच्यामध्यें कोणी रहात नाहीं. व्याघ्रादि हिंस्र पशूंची तेथें वस्ती झाली आहे."

तेथें मिळालेली लूट अपरंपारच असली पाहिजे. त्या लूटीमध्यें एक हिरा कोंबडीच्या अंड्या एवढा मोठा सांपडला होता, असें 'कूटो' लिहितो. तो आदिलशहानें ठेविला. (तो सुल्तानानें आपल्या घोड्याच्या मस्तकावरील शिरोभूषणाच्या तुऱ्याखालीं बसविला होता, असें 'कूटो' नें वर्णन केलें आहे.)

या थोर वैभवशाली राजधानीच्या नशीबीं जी ही दुर्दशा आली, ती कायम-चीच. तिला पुनः केव्हांही उर्जितदशा आली नाहीं. विशेष मोठ्या व टिकाऊ अशा इमारतींचे पडके व तुटक अवशिष्ट भाग, तुटपुंज्या कुणबी शेत-कऱ्यांनीं जोतलेल्या, खिरटी पिकें येणाऱ्या, शेत जमीनींमध्यें, जागजागीं डोंकी वर उचलित असलेले, हल्लीं तेथें आढळून येतात. एका काळीं गजबजलेल्या लोकवस्तीमुळें पाऊल ठेवण्याला रीघ मिळत नसे, अशा भागांमध्यें हे लोक, हल्लीं लहान लहान खोपटीं बांधून रहात आहेत. एन उर्जितावस्थेमध्यें सुद्धां गोर गरीबांचीं बहुतेक घरें मातीचीं व धाब्याचींच असलेलीं, सारीं जमीनदोस्त होऊन, त्यांचें नांव निशाण सुद्धां उरलेलें नाहीं. त्यांचा मलमा खडकाळ जमीनी-वर पडून झालेल्या तुटपुंज्या शेतामध्यें खुरटीं व तुरळक झाडें झुडपें व बिकिर शेती, यांना कांहींसा आधार झाला आहे. पूर्वींचे पाण्याचे पाट कायम आहेत. त्यांच्या पाण्यावर सखल भागामध्यें हिरवेगार मळे व बगीचे झालेले आहेत. त्यांच्यांत ऊंस व साळ चांगली पिकते. विजयनगर कायमचें नष्ट होऊन त्यानें स्थापिलेल्या क्षेत्रामध्यें हल्लीं लहान लहान खेडीं वसलीं आहेत. त्यांच्यांत आज-काल उद्योगी, सुखी, व तृप्त असे लोक राहातांहेत.

येथें विजयनगरच्या इतिहासाचें हें त्रोटक वृत्त संपलें म्हणावयाचें. तरी पुढील कथेबद्दल दोन शब्द लिहिणें योग्य व अवश्य आहे.

त्रिमलराय कायमचा पेन्नूकोंड्यासच राहिला. तेथून त्यानें गोव्यास पोर्तुगीज लोकांकडे घोडे हवे असल्याबद्दल सांगून पाठविलें. त्याप्रमाणें गोव्या-हून पुष्कळसे घोडे धाडले गेले. ते त्या स्वयंमन्य व जुलमी रायानें ठेवून घेतले. पण त्यांची किंमत दिली नाहीं. सौदागरांना हात हालवीत परत जावें लागलें. 'फ्रेड्रिका' म्हणतो, 'त्यानें त्या व्यापाऱ्यांना परत जाऊं दिलें, पण घोड्यांची किंमत दिली नाहीं. तेंव्हां ते बिचारे सौदागर दुःखा शोकामुळें वेडे व हताश झाले.' त्या राज्यामध्यें कोणी धनी धोरी उरला नव्हता. यामुळें 'फ्रेड्रिकी'ला सात महिने तेथेंच पडून रहावें लागलें. कारण चोर व लुटारू यांचा बंदोबस्त होऊन, रस्ते मोकळे होईतों त्याला पेन्नूकोंड्यासच राहणें भाग होतें. सगळ्याच मार्गांवर या लुच्चा लफंग्या चांचा सुळसुळाट होता. तो गोव्याला परत पोहांचे तों मोठीच मारा-मार पडली. त्याला बरोबरच्या मंडळीसह लुटारू व चोर वरचेवर पकडीत व सोडण्यासाठीं बराच मुद्दंड घेत. एकदां दरोडेखोरांनीं हल्ला करून त्याची सारी चीजवस्त नेली.

मराठी ग्रंथ संग्रहालय

तिमलराय हा सदाशिवरायासह पेनुगोंडा येथें राहूं लागल्यावर राज्यांतील सरदार लोक पुढा मागून एक स्वतंत्र होऊं लागले. सार्‍या राज्यांत बेबंदी व लोटिंग पातशाही माजली. आजवर सुरक्षित, सुयंत्र व एकनूर असलेलें साम्राज्य विस्कळित होऊं लागून पुढें लौकरच त्याचा भराभर नाश झाला.

ही राज्यक्रांती पोर्तुगीज लोकांना भारीच भोंवली. त्यांचा विजयनगराशीं व्यापार चालत असे. त्याविषयीं 'फ्रेडिकी' यानें ठेविलेल्या टिपणावरून पुढील उतारा घेतला आहे:–

" गोव्याहून प्रतिवर्षी विजयनगराला व्यापारी माल जाई त्यांत अरबी घोडे, मखमल, दमास्कचें उंची कापड, साटिन, पोर्तुगाल देशांतील ताफ्ता, तऱ्हेतऱ्हेचीं चिनी मातीचीं भांडीं, केशर व लाल रंगाचें कापड, हे जिन्नस असत. त्यांच्या बदल्यांत विजयनगरांतून तुर्की रत्नें ( अलंकार ) होन, सोन्याचीं नाणीं, वगैरे मिळत. तेथील लोक आपापल्या दर्जाप्रमाणें साटिन, मखमल, दमास्कसी कापड, लालरंगाचे अलवान, किंवा पांढरें बंगालचें कापड, इत्यादिकांचे कपडे वापरीत. ते लोक डोक्यावर कोलाई नांवाची उंच टोपी घालतात."

'सास्सेटी' नांवाचा प्रवासी सं. १५७८ ते १५८८ पर्यंत या देशांत फिरत होता. विजयनगर नष्ट झाल्यावर पोर्तुगीज लोकांचा व्यापार बसल्याबद्दल इतरांनीं जें लिहिलें आहे, त्याची त्यानेंही पुष्टी केली आहे. तो म्हणतो, 'हा व्यापार इतका भारी होता कीं, त्याची नुसती कल्पनासुद्धां होणें कठिण होतें. तें शहर फारच मोठें, विस्तीर्ण, व अफाट पसरलेलें होतें. तेथें राहणारे लोक धनाढ्य होते. तेही आपल्याकडील संपत्ती मानाप्रमाणें नव्हे; तर प्राचीन काळचे 'क्रीसस' वगैरेंच्या प्रमाणें प्रति कुबेरा सारखे. तथील व्यापाराच्या जिन्नसांचें तरी किती म्हणून वर्णन करावें! हिरे, माणकें, मोतीं वगैरे रत्नें, या सर्वांशिवाय तेथील घोड्यांचा व्यापार! एकट्या त्या च व्यापारापासून या गोवें शहरामध्यें दर साल १,२०,००० ते १,५०,००० ड्यूकट्स इतका महसूल येत असे. तो आतां सारा ६,००० ड्यूकट्स राहिला आहे."

'कूटो'नेंही असेंच वर्णन केलें आहे:–" बिसनग–विजयनगर-च्या राज्याचा असा हा नाश झाल्यामुळें, सार्‍या हिंदुस्थानाला व आमच्याही राज्याला, भारीच धक्का बसला. कारण सार्‍यांचा व्यापार बहुतेक या एका राज्यासाठीं. ते व्यापारी लोक तिकडे घोडे, मखमल, साटिन व इतर हर तऱ्हेचा माल नेत. त्याच्यावर त्यांना मनस्वी नफा मिळे. गोव्यांतील महसूली उत्पन्नाला मोठीच

ठोकर बसली. येथ पावेतों कीं, अलीकडे त्या तेथील लोकांची राहाणी पूर्वीपेक्षां फारच कमी दर्जाची झाली आहे. बेझ नांवाचें कापड व तलम कपडा यांचा व्यापार इराण व पोर्तुगाल या देशांना फारच महत्वाचा होता. तो घटला. पोर्तुगीज गलबतांमध्यें दरसाल ५,००,००० पर्यंत होन भरती होऊन जात. ते त्यावेळीं ७॥ टांक किंमतीचे असत. तेच हल्लीं ११॥ टांकपर्यंत चढले आहेत. इतर सर्व नाण्यांचीही हीच स्थिती झाली आहे."

गोव्यांतील पोर्तुगीज लोकांचा व्यापार व त्यांचें महत्व कमी होण्याचें आणखीही एक कारण 'संस्पेरी' यानें दिलें आहे. तें ही येथ दर्ज होणें अवश्य आहे. तें कारण म्हणजे तेथें स्थापन झालेली ती राक्षसी 'इन्किझिशन' होय. तेथील पाद्री लोकांनीं गोव्याच्या अमलांत राहणाऱ्या हिंदू लोकांना आपापल्या पवित्र धर्म ग्रंथांचे पठण पाठण करण्यास करविण्याची सक्त मनाई केली. ती मनाई मोडणाऱ्यांना भयंकर शासन होण्याचा सपाटा चालला. त्यांनीं देवस्थानें व मशीदी यांचा पार उच्छेद केला. साऱ्या लोकांचा असा कांहीं भयंकर छल चालू झाला व हर एक बाबतींत पाद्री लोकांचा असा कांहीं दखल सुरू झाला कीं गांव्यांतील पुष्कळसे लोक गांव सोडून गेले. स्वातंत्र्याचें नांव सुद्धां राहिलें नाहीं. अशा त्या नष्ट व निभाग्या जागीं राहण्याला हिंदू लोक बिलकुल कबूल होईनात. तेथें राहून वाडवडिलांना पूज्य व मान्य सनातन धर्माप्रमाण वर्तन करावें तर कैदेंत पडावें, क्रूरपणाचा छल सोसावा, व निष्ठुरपणें प्राण देखील घेतला जाण्याला तयार असावें अशी भयंकर स्थिती झाली होती. ( सं १६७५ सालीं 'फ्रायर' नांवाचा एक इंग्रज प्रवासी इकडे आला होता. त्यानें त्या सुमाराला 'इंकिझिशन' संबंधानें गोव्यास समक्ष पाहिलेल्या प्रकाराचें वर्णन, त्याच्या चौथ्या पत्राच्या दुसऱ्या भागांत, केलें आहे. तें असें-
" दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही राजवाड्याच्या मुख्य व मोठ्या जिन्या जवळ पोहोंचलों. तेथें 'इन्किझिशन' चा राक्षसी तुरुंग आम्ही पाहिला. त्यालाच 'सेशन हौस' म्हणतात. मुख्य बाजाराच्या चव्हाट्यावर एक भल उंच यंत्र उभें केलें आहे त्याच्या वरचा भाग फांशी देण्याच्या चौकटी सारखा होता त्याला एक चाक होतें झेंड्याच्या लांब उंच ढोलकाठीच्या प्रमाणें, त्याच्यावर चढून जाण्यासाठीं पायऱ्या ठोकलेल्या होत्या. त्या यंत्रानें शरीरांतील सांधेन सांधे उखडले जातात व फारच दुस्सह हाल व यातना होतात. याच्या पलीकडे जवळच एक बेट आहे. तेथें 'इन्किझिशन' नें शिक्षा दिलेल्या लोकांना नेऊन जिवंत जाळतात. अशा लोकांना विलक्षण विरूप व भयानक भुतं खांचीं व सैतानाचीं सोंगें देतात. अशा स्थितींत त्यांना 'सांक्टो आफिशिओ,' येथून आणून फांशी देणाऱ्यांच्या स्वाधीन करितात. 'सेंट-जागो' किंवा 'सेंट जेम्स' यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं येथ एक अजस्र होळी पेटवून, तिच्यामध्यें, असे शिक्षा झालेले लोक, जिवंत टाकण्याचा प्रघात आहे." तसेंच पुढें पांचव्या भागांत त्यानें लिहिलें आहे कीं, तो गांवांत असतांना 'डुकराच्या शिवाय इतर मांस विकण्याची व खाण्याची सक्त मनाई होती.' अशा कायद्यापुढें, मांसाशनाविषयीं अनिर्बंध युरोपियन रहिवाशांना व नवाव हिंदू लोकांना सुद्धां कंटाळा व किळस यावयाचा.)

सं. १५६७ सालाच्या सुमाराला दक्षिण हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थिती पुढें लिहिल्याप्रमाणें होती :-

दक्षिणेंतील मुसलमान विजयप्राप्तीमुळें उत्साहपूर्ण झालेले होते. तरी पण, त्यांच्यामध्यें अपसांत वैर व भांडणें लागलेलीं होतीं. त्यांचीं निरनिराळीं व स्वतंत्र राज्यें होतीं. त्या सर्वांचा परस्पर वैरभाव होता. सुप्रसिद्ध व प्रचंड हिंदु साम्राज्याला प्राणांतिक धक्का बसलेला व त्याची राजधानी कायमची उध्वस्त व नष्ट झालेली होती. तेथील राजघराण्यांतील मंडळी पळून जाऊन पेन्नूकोंड्याच्या आश्रयाला राहिली होती. राजा सदाशिवराय अद्यापि अटकेंतच होता. प्रबल व जालिम बंधुत्रयापैकीं अवशिष्ट उरलेला त्रिमलराय कसाबसा राज्यकारभाराचा गाडा हांकीत होता. सरदार लोक क्रुध्द व खिन्न होऊन ते स्वतंत्र होऊं पहात होते समुद्रकिनाऱ्यावरील पोर्तुगीज लोक ओहोटीला व मरगळीला लागून त्यांचा व्यापार सफा व कायमचा बुडालेला होता.

त्या मोठ्या व भयंकर रणकंदनानंतर घडलेल्या गोष्टीविषयीं फेरिस्ता म्हणतो :-" लढाईनंतर थोड्या दिवसांनीं सारे सुलतान रामरायाच्या राज्यांत 'आनीकोंडे'-आनीगुंदी-पर्यंत चालून गेले. बिनीचे लोक विजयनगरांत घुसले. तें शहर त्यांनीं पार लुटलें. तेथील मुख्य मुख्य इमारती जमीनदोस्त केल्या. आणि तेथें मनसोक्त प्रहार केले. या फौजेतील लोकांच्या धामधूमी-मुळें आसपासचा सारा प्रदेश वैराण होऊन गेला. पुढें वेंकटाद्रीनें फारच नम्रपणानें त्यांच्याकडे सलोखा व तह होण्याविषयीं बोलणें लावलें. त्या लढाईंतून तो वांचून एका दूरच्या किल्ल्यांत आश्रयाला गेला होता. ( लढाईच्या जागेपासून मुदगल, धारगिरी व कनकगिरी वरून आनीगुंदी ५५ मैल आहे. तें शहर तुंगभद्रेच्या उत्तर तीरावर विजयनगरच्या समोरच होतें. तेथें सारे सुलतान सैन्यासह पोहोंचले. इतर इतिहासकारांच्या लेखांवरून वेंकटाद्री लढाईंत पडला व त्रिमलराय वांचून परत आला होता. फेरिस्तानेंही केवळ ऐकीव माहिती दिली आहे. ) रामरायानें या सुलतानांकडून हिरावलेले सर्व प्रदेश वेंकटाद्रीनें त्यांना परत दिले. याप्रमाणें सफल मनोरथ पूर्ण होऊन ते सारे सुलतान रायचूरला आले व तेथून आपापल्या राज्यांत परत गेले. या लढाईनंतर विजयनगरच्या राजाला पूर्व वैभव कधींच प्राप्त झालें नाहीं. तें शहर इतकें कांहीं उध्वस्त होऊन गेलें कीं, तेथें आबादी कधीं ती राहिली नाहीं. आसपासचा सर्व प्रदेश जमीदारांनीं दाबला असून, जो तो आपापल्या हद्दीमध्यें स्वतन्त्र सत्ता चालवूं लागला आहे. " ( फेरिस्तानें ही हकीकत सोळाव्या शतकाच्या शेवटीं लिहिली. )

सं. १५६८ सालीं त्रिमलरायानें सदाशिवरायाचा खून करून गादी बळकाविली. तोंपर्यंत तो त्या हतभागी राजाला आपला हक्कदार मालक मानीत होता. ही गोष्ट वेलोर येथील सं. १५६७ सालच्या फेब्रुवारी महिन्याच्या ५ व्या तारखेस लिहिलेल्या चार शिलालेखांवरून सिद्ध होते.

याप्रमाणें या तिसऱ्या राजघराण्याला-याला विजयनगरचें राजघराणें म्हणावयाचें किंवा काय हा प्रश्नच आहे-प्रारंभ झाला.

# भाग सोळावा.

## तिसरें राजघराणें.

वंशावळ-मुसलमानी राज्यें=बंकापूर-कोंडवीड-बेल्लमकोंडा-विनूकोंडा-हैदराबाद शहराची नवीन स्थापना-अदोणा येथें मुसलमानांचा अंमल-पुढील संकलित वृत्त.

या तिसऱ्या राजघराण्याची वंशावळ पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. (ती एपिग्राफिया इंडिकामधून घेतलेली आहे. तिच्यांतील नांवापुढें दिलेले अंक मूळामध्यें डाक्तर 'हुल्श' यांनीं दिल्याप्रमाणेंच आहेत. यांत दुसरा रामराय म्हटला आहे तोच पहिला म्हटलेला जास्त शोभेल कारण, त्याच्या पूर्वजांपैकीं कोणी नांवालासुद्धां राजा असल्याचें विश्रुत नाहीं. या संबंधानें 'कोंड्यांत' येथील सं. १६३६ चें, 'विरुपाक्ष' येथील सं. १६०१ चें, आणि 'कल्लकुर्ती' येथील सं. १६४४ चें, हीं दानपत्रें व 'पल्लोर' येथील सं. १६२३ चा शिलालेख पाहण्याजोगे आहेत.)

१ रंगराय.
पत्नी तिरुमलांबा.

- १ 'अळ्या' रामराय, पत्नी कृष्णदेवाची कन्या तिरुमलांबा. सं. १५६५मध्यें मारला गेला.
  - रंगराय ४ था. पांच भावांपैकीं एक.
    - पेद्द वेंकटराय २ रा. पत्नी बंगरम्मा. सं. १६३४-१६३६
      - चिन्न वेंकटराय ३ रा.
        - रंगराय ६ वा. गोपालरायानें दत्तक घेतला.
- २ तिरुमलराय, पत्नी कृष्णदेवाची कन्या बेंगलांबा सं. १५६७ त राजा झाला.
  - रघुनाथ-दुसरा. रंगराय. सं. १५७५ व सं. १५८४.
  - आराम.
    - तिरुमलराय दुसरा.
    - रंगराय ३ रा.
      - रामराय चौथा (हा अनेक बंधूंपैकीं एक होता.)
  - वेंकट १ ला. सं. १५८६-१६१४
- ३ वेंकटाद्री, सं. १५६५ त मारला गेला.
  - रंगराय ५ वा.
    - गोपालराय.

हल्लीं अनागुंदी येथें असलेल्या राजांचें परंपरागत आलेलें नांव पंपापती आहे. ते हल्लीं निजाम सरकारच्या अमलाखालीं एक लहानसे जमीदार आहेत. त्यांच्याकडे या घराण्याच्या मूळ ठिकाणची थोडीशी मिळकत आहे. त्यांनीं या घराण्याची आजपर्यंतचा वंशावळ दिलेली पुढें दाखल केली आहे.

साहावा रंगराय–किंवा हल्लीं प्रसिध्द असल्याप्रमाणें श्रीरंगराय–हा, तिसरा चिन्न वेंकटराय याचा कनिष्ठ पुत्र. ते तीघे बंधू. त्यांच्यामध्यें वीर वेंकटपतिराय वडील होता. या घराण्यांतील कनिष्ठ शाखेपैकीं गोपालराय गादीवर बसला व त्यानें साहाव्या रंगरायाला दत्तक घेतलें. तो वडील शाखेंतला, पण पिढीनें खालच्या दर्जाचा होता. त्याच्या वडील भावाचा गादीवरील हक्क उडविला गेला होता. ही हकीकत खरी खोटी ठरविण्याला तूर्त मार्ग नाहीं. सर्वांत वडील शाखेचीही वंशावळ पुढें दिली आहे.

पंपापती राजालाच निजाम सरकारच्याकडून या घराण्यांत प्रमुख समजलें जातें. तें दोन कारणांमुळें. एकतर वडील शाखेचा नष्टांश झालेला व त्या शाखेंतील कृष्णदेवरायाची राणी व त्याची स्वतःची बहीण कुप्पम्मा इनें त्याला दत्तक घेतलें. दुसरें, त्यांच्या दोघांही वडील भावांनीं बेदावा लिहून दिला आहे. हल्लींच्या संस्थानिकाचें नांव, श्रीरंगदेवराय आहे. त्याचा पुतण्या कुमार राघव नांवाचा आहे. या प्राचीन राजघराण्यापैकीं पुरुष संततींतले वंशज काय ते हे दोघच. इतक्याच पुर्ते यांचें वाचकांच्या दृष्टीनें महत्त्व आहे.

विजयनगराची धूळधाणी झाल्यानंतर त्या राज्यांतील निरनिराळ्या भागांमध्यें भारीच गोंधळ झाला. या इतिहासाचें पुढें महत्व न राहिल्यामुळें, येथें त्याच त्रोटक दिग्दर्शन मात्र केलें जात आहे.

सं. १५६५ साला नंतर मुसलमानी राजघराण्यांमध्यें आपसांत मेळ, वितुष्ट, संघ, संप, झगडे, विश्वासघात, राजकीय उलाढाली, भानगडी, लढाया, वगैरे पुष्कळच्या घडून आल्या. त्याचा पुढील इतिहासभागाशीं विशेष संबंध नसल्यानें, त्यांविषयीं येथें लिहिणें अवश्य नाहीं. त्या भाग्यशाली व वैभवसंपन्न विजयनगरच्या साम्राज्यांतील भागांशीं निकट संबंध असलेल्या कांहीं ठळक गोष्टी मात्र पुढें दिल्या आहेत.

गोवळकोंडा येथील कैफीयतीप्रमाणें, विजयनगराचा समूळ उच्छेद होण्याला कारण झालेल्या त्या घनघोर संग्रामा नंतर कुतुबशहाचा सरदार रफअतखान लारी, किंवा मलिक नायब यानें राजमहेंद्रीवर स्वारी केली. अखेर सं. १५७१–७२ मध्यें तें शहर हिंदु लोकांच्या हातून कायमचें गेलें.

फेरिस्तानें लिहिलें आहे कीं, ' आदिलशहानें विजापुराला परत गेल्यावर लौकरच पुनः एकदां विजयनगराकडे मोर्चा फिरविला, पण निजामशहा आडवा येत असल्याचें पाहून तो परतला. पुढें थोड्याच दिवसांनीं त्यानें गाव्यावर मोहीम केली. पण ती वायफळ झाली. दर्या किनाऱ्यावरून परतून त्यानें अदोणीवर हल्ला करण्याचा उपक्रम केला. तिकडे विजयनगरच्या एका मांडलिकानें स्वतंत्र सत्ता चालविली होती. तो किल्ला लौकरच पाडाव झाला. या ऊपर आदिलशहा व निजामशहा यांचा सलूख होऊन असें ठरलें कीं, वऱ्हाड प्रांत घेण्याला आदिलशहानें निजामशहाला हरकत करूं नये, व कृष्णेच्या दक्षिणेकडील प्रांत सर करण्यामध्यें निजामशहानें आदिलशहाच्या आड येऊं नये.' त्या नंतर सं. १५७३ सालीं आदिलशहानें धारवाड व बंकापूर यांच्यावर स्वारी केली. बंकापूर येथें या वेळीं वेलप्पा नाईक स्वतंत्रपणे सत्ता करीत होता. त्या किल्ल्याला दीड वर्ष वेढा राहिला. अखेर आंतील लोक अगदीं निरुपाय होऊन शरण आले. तेथें असलेलें एक अप्रतिम सुरेख व भव्य मंदिर, आदिलशहानें पाडून, त्याच्या जागीं एक मशीद बांधविली, तिच्या पायाचा दगड त्यानें स्वतः बसविला, असें फेरिस्ता लिहितो. नंतर त्यानें कोंकणांत मोहीम करून विजयसंपादन केलें. पुढें तीन वर्षांनीं वेल्लमकोड्यावर हल्ला केला तेव्हां रायाला भीती पडली व तो वीनूकोंडा सोडून चंद्रगिरीवर राहण्यास गेला. या स्वारीमध्यें गोवळकोंडेवाल्यांची हिंदू लोकांना मदत राहिली असावी व त्यामुळें आदिलशहाला नेटसें यश आलें नसावें, असें दिसतें. सं. १५७९ मध्यें कुतुबशहानें झालेला ठराव धाब्यावर बसवून वीनूकोंडा, कोंडवीड व खम्मम, या किल्ल्यांवर चढाई करून त्यांच्याखालीं कृष्णेच्या दक्षिणेस असलेले विस्तीर्ण प्रांत व ते तीन्ही किल्ले काबीज केले.

सं. १५८० मध्यें अली आदिलशहा मारला गेला. कुतुबशाहीच्या कैफीयतीमध्यें फेरिस्तानें याची तारीख गुरुवार ता. २३ सफर सं. ९८७ हि. दिली आहे. पण खरी तारीख सोमवार ता. २४ सफर सं. ९८८ हि. असावी, कारण ती तारीख म्हणजे—सोमवार ता. ११ एप्रिल सं. १५८०—रफीउद्दीन शिराजी यानें दिली आहे. तो त्यावेळीं तेथें व दरबारांत मोठ्या हुद्यावर होता.

गोंवळकोंड्याचा सुलतान इब्राहीम कुतुबशहा याच सालीं मरण पावला व त्याचा तिसरा पुत्र महंमद-कुलीशहा गादीवर बसला. त्यानें सं. १५८९ मध्यें हैदराबादचें शहर नवें वसविलें. त्याचें मूळचें नांव भागानगर होतें. त्यानें हल्लींच्या कर्नूल व कडाप्पा जिल्ह्यांमध्यें स्वाऱ्या केल्या, व कर्नूल, नंद्याळ, डोले, व गंडीकोट हस्तगत करून पुढें नेल्लोर जिल्ह्याच्या पूर्व भागांतही स्वाऱ्या केल्या.

त्रिमलराय सं. १५७५ मध्यें वारल्यावर त्याच्या जागीं त्याचा दुसरा पुत्र दुसरा रंगराय व नंतर त्याचा भाऊ पहिला वेंकटराय, गादीवर बसले असावे. या वेंकटरायानें २८ वर्षें तरी राज्य केलें. तो सं. १६१४ मध्यें मरण पावला तेव्हां चांगला वयातीत होता. त्याच्या पश्चात साऱ्या राज्यांत जागजागीं बंडें, दंगे धोपे, आणि अपसांतील लढाया सुरू झाल्या. याविषयींची बरीच तपशीलवार माहिती 'बारोडास' याच्या कैफियतीच्या आधारानें पुढें देण्यांत येईल. त्याच्या कारकिर्दींतील सं. १६०१-२ सालचा एक महत्वाचा ताम्रपट डाक्टर 'हुश्श' यांनीं प्रसिद्ध केला आहे.

सं. १५९३ मध्यें इब्राहीम आदिलशहानें म्हैसूरावर स्वारी केली. तेव्हां तो प्रांत रायाच्या अमलाखालीं होता. तीन महिने वेढा राहिल्यावर तें शहर त्याच्या हातीं आलें. त्याच वर्षीं, या सुलतानाचा भाऊ इस्मायल यानें त्याच्या विरुद्ध बंड करून आपणाला स्वतंत्र राजा म्हणविलें. तो या सुमारास बेळगांव येथें कैद होता. सुलतानाच्या फौजेनें येऊन त्याला तेथेंच घेरून ठेविलें. पण फितूरामुळें त्या फौजेला तो किल्ला पाडाव करितां येईना. आसपासही कांहीं काळ झोटिंग पाच्छाईच राहिली. अखेर एकदांचा किल्ला पाडाव होऊन तो शहाजादाही मारला गेला. याच सुमारास हिंदू लोकांनीं अदोणी परत घेण्याचा यत्न केला, पण तो व्यर्थ गेला. विजापूर व अहमदनगर या दरबारामध्यें चुरशीचें व चढाओढीचें युद्ध सुरू झालें. (सं. १५६६ च्या सुमाराला आदिलशहानें मलिक रहिमानखान याला अदोणी येथें किल्लेदार नेमिलें. तो तेथें सारखा ३९ वर्षें राहिला. तेथेंच त्याची कबर आहे. पूर्वीप्रमाणें तिच्या दुरुस्तीसाठीं सरकारांतून नेमणूक चालू आहे. यामुळें ती कबर व मुकबरा अद्यापि चांगल्या स्थितींत आहेत. तेथें एक मुजावर व कांहीं नोकरही राहतात. तेथील मोठी जुम्मामशीद सं. १६६२ त बांधली गेली. तेव्हां तेथें नबाब सिद्दी मासूदखान हा किल्लेदार होता. विजापूर येथील शेवटच्या सुलतानानें त्याच्याकडे एक संगमरवरी शिलालेख व एक हजार मोहरा धाडल्या. तो लेख आंतील एका मेहरापीवर कायम आहे. मशीदीची आरास करून तिच्यांत सोनेरी काम करविण्याकडे त्या मोहरा उपयोगांत आणिल्या गेल्या. सं. १६८६ सालीं औरंगजेबानें विजापूरचें राज्य बुडवून, तें सारें मोगलबादशाहींत सामिल केलें. तेव्हां त्यानें नबाब गाझीउद्दीनखानाला अदोणीचा सुभेदार नेमिलें. त्यानें विजापूरकराचा किल्लेदार मासूदखान याच्याशीं लढाई करून तो किल्ला घेतला. त्यानें जुम्मामशीदीवर तोफा डागल्या–त्या

मायफळ मारायां होत्या–तरी तें पाहतांच, मासूदखानाला ती मशीद प्राणाधिक प्रिय असल्या-मुळें, तो हतवीर्य झाला, व त्यानें एकदम किल्ला खाली केला. या नवीन किल्लेदाराच्या घराण्यांतील लोक तेथें सं. १७५२ पर्यंत अधिकार करीत होते. त्या सालीं तो प्रांत हैदराबादचे नबाब बसालतजंग यांना दिला गेला. ते तेथेंच सं. १७७६ मध्यें मरण पावले. त्यांचा मुकबरा तेथें आहे. त्याची नेहमीं दुरुस्ती ठेविली जाते. पुढें सं. १८०२ सालीं हा प्रांत व हें शहर 'सीडेड् डिस्ट्रिक्टस '–फौजेच्या खर्चाकडे लावून दिलेले प्रांत–बरोबर इंग्रज सरकाराकडे आले. ते अद्यापि त्यांच्याकडेच आहेत.)

फेरिस्तानें विजापूरचा इतिहास लिहिला आहे तो येथवरच. पुढील भाग त्यानें एकदम आटपला आहे. याच्यांत व गोवळकोंड्याच्या कैफीयतींतील वर्णनामध्यें पुष्कळच फरक आहे. पण त्याबद्दल परीक्षण करण्याची येथें अवश्यकता आहे, असें नाहीं.

दक्षिण हिंदुस्थानाच्या सत्राव्या शतकांतील राजकीय परिस्थितीच्या इतिहासावरून पाहतां, त्यावेळीं तिकडे फारच गडबड, घोटाळा, व बेबंदी होती, असें दिसून येतें. निरनिराळ्या प्रांतांचे अधिकारी आपापल्यापरी स्वतंत्र झाले. नष्ट झालेल्या साम्राज्याचे नामधारी राजे यांनीं जवळची संपत्ती, तसेच राज्याचे भाग भराभर गमविले. येथवर कीं, पुढें ते निवळ नामधारी राजे राहिले. एकाकाळीं अत्यंत प्रबल असलेल्या या साम्राज्याची केवळ छाया असा घराण्याचा मोठेपणा नांवाचा शिल्लक उरला. तरी पुढें सं. १७९२-९३ पर्यंत देखील, दक्षिणेंतील एका राजनिष्ठ रेड्डीनें, कांहीं भूमी दान देऊन तिच्याबद्दल ताम्रपत्र करून दिलें. त्याच्यामध्यें, आपण ही गोष्ट ' विजय-नगरचे महाराय वेंकटपती ' यांच्या परवानगीनें करीत आहों, असें लिहिलेलें आढळतें ! अशा रीतीनें या प्राचीन हिंदू राजघराण्याचें नांवाचें तरी स्वामित्व-द्योतक अशीं दुसरीं अठराव्या शतकांतील आठ दानपत्रें मिळालेलीं आहेत.

इक्केरी किंवा बेदनूर येथील संस्थानिक किंवा नायक, सं. १६५० पर्यंत विजयनगरचे अंकित म्हणवीत होते. ( ' पड्रा डेला व्हाले ' नांवाचा इटालियन प्रवासी सं. १६२३ च्या अखेरीला इक्केरी येथें होता. त्यानें तेथें पाहिलेल्या व त्याच्यावर तेथें गुदरलेल्या गोष्टीचें सुरेखसें वर्णन लिहून ठेविलें आहे. तो गोवेंकराकडून वकील म्हणून

मराठी ग्रंथ संग्रहालय, नं.


तेथें गेला होता. तो म्हणतो, " हा राजा वेंकटाप्पा नायक. विजयनगर येथील [illegible] सार्वभौम राजाचा मांडलिक व कांहीं काल मंत्री होता. त्या साम्राज्याचा नाश झाल्यावर तो आपल्या राज्यांत स्वतंत्र झाला. तो शूर व बहादूर असल्यानें, त्यानें आपलें राज्य पुष्कळच वाढविलें आहे ") विजयनगर येथील एक सुभेदार सं. १६१० पर्यंत म्हैसूरावर अंमल करीत होता. त्यानंतर पूर्वीच्या सुभेदाराचे वंशज स्वतःच मालक व राजे बनले. मधुरा आणि तंजावर येथील नायक सं. १६०२ मध्यें स्वतंत्र झाले.

दाक्षिणेंतील सारीं मुसलमानीं राज्यें, दिल्लीच्या मोगल बादशहांनीं गिळंकृत केलीं. सारें दक्षिणहिंदुस्थान एक रीतीनें त्यांच्याच अमलाखालीं आलें. पण याच सुमाराला दुसरीच एक प्रबल राज्यसत्ता पुढें सरसावून एकदम उदयाला आली, आणि तिनें एकवेळ सारें हिंदुस्थान पादाक्रांत करून व्यापून टाकण्याचा प्रसंग आला होता. ही राजसत्ता मराठ्यांच्या साम्राज्याची. शिवाजी राजानें सं. १६७३ पर्यंत सारें कोंकण जिंकून घेतलें. पुढें ४ वर्षांनीं त्यानें कर्नूल, जिंजी, व वेल्लोर, जिंकून विजयनगरच्या नष्टप्राय राजसत्तेचा अधिकार, नामशेष केला. त्याचा भाऊ व्यंकोजी यानें सं. १६७४ त तंजावर हस्तगत करून तेथें एक आपलें राजघराणें स्थापन केलें. तें सुमारें शंभर वर्षे टिकलें. या शिवाय मराठ्यांनीं खुद्द दक्षिणेमध्यें खरा व कायमचा अंमल असा कोठें बसविला नाहीं.

हैदरअल्ली व त्याचा पुत्र टिपू सुलतान यांनीं राजपद बळकावीपर्यंत, म्हैसूरचें राज्य, तेथील हिंदू राजघराण्याकडे कायम चालत आलें. या दोघांनीं सुमारें ४० वर्षे अंमल गाजविला. सं. १७९९ मध्यें इंग्रजांनीं श्रीरंगपट्टण येथें टिपूचा पाडाव केला व तो लढाईंत पडला. नंतर त्यांनीं तें राज्य पूर्वीच्या हिंदूराजाच्या हवालीं केलें.

मद्रास येथील फोर्ट सेंट जॉर्ज किल्ल्या खालची जमीन, साहावा श्रीरंगदेवराय यानें त्यावेळचा इंग्रजांचा सदर मुनीम, मिस्तर ' फ्रान्सिस डे,' याला सं. १६३९ च्या मार्च महिन्यांत दिली. त्यावेळीं राय चंद्रगिरीवर रहात होता. मद्रास येथील इंग्रजलोकांची पहिली वखार सं. १६२० मध्यें कायम झाली होती.

## तिसऱ्या चिन्न वेंकटरायाच्या पुढील वंशवृक्ष.



# भाग सत्रावा.

## 'बारोडास' याची कैफियत (सं. १६१४).

ई. सं. १६१४ सालची चंद्रगिरी येथील स्थिती–वेंकटरायाचा मृत्यू–जगरायाचें बंड–राजघराण्यांतील माणसांची कत्तल–एचम्मा नायकाची स्वामिभक्ति–पोर्चुगीज लोक 'सान थोम' येथें स्वतंत्र होतात–या नाटकांतील पात्रें–पालियाकाटे येथील कटकट–शेवट.

ई. सं. १६१४ सालीं चंद्रगिरी येथें वेंकटराय मरण पावला. त्यानंतर तेथें घडलेल्या गोष्टींबद्दलची ही कैफियत आहे. तिच्यांत वर्णन केलेल्या गोष्टींची माहिती विशेष प्रसिद्ध नाहीं. यामुळें ती बरीच वाचनीय व मनोरंजक होईल असें वाटतें. 'मान्युअल बारोडास' नांवाच्या एका पोर्चुगीज गृहस्थानें कोचीन येथून ताः १२ डिसेंबर सं. १६१६ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांतील कांहीं भागावरून ही माहिती घेतली आहे. लिस्बन येथें राष्ट्रीय महत्वाचे कागद पत्र संग्रहीत केलेले आहेत. त्यांच्यामध्यें इतर पुष्कळशा पत्रांमध्यें हें अस्सल पत्र 'सीनोर लोपेस' यांना थोड्या दिवसांखालीं सांपडलें. त्याची नकल त्यांनीं कृपा करून पाठविली. त्याचें हें भाषांतर आहे. (आर. सीवेल.)

"आतां मी आपणाला, विजयनगरचा वृद्ध राजा वेंकटपती रायलू मरण पावला व त्यानें आपल्या मागें आपला पुतण्या चिक्करायलू याला गादीचा वारस केला, याविषयींची हकीकत लिहून कळवितों. त्यानें एका मुलाला आपला पुत्र मानलें होतें. तो खरोखर त्याचा पुत्र नव्हता. त्याला त्यानें आपला वारसही केला नाहीं. याविषयींची खरी स्थिती अशी :– रायाचें लग्न 'जगरायाच्या बयम्मा नांवाच्या कन्येशीं झालें होतें. तिला मुलगा व्हावा अशी भारी इच्छा होती. त्या साठीं तिनें बरे वाईट सर्व कांहीं उपाय केले. पण व्यर्थ. तिच्या माहेरची एक ब्राह्मणाची स्त्री होती तिनें, राणीची मूल होण्याविषयींची अत्यंत उत्कट इच्छा व ती सफल न होण्याचा परमेश्वरी नेमानेम पाहून राणीला म्हटलें, 'मी एक महिन्याची गरोदर आहें. आपण आपल्या यजमानांना–रायांना–स्वतःही एक महिन्याच्या गरोदर असल्याचें कळवून त्याबद्दल प्रसिद्धी करवा, आणि

गरोदर असल्याचा बहाणा व बतावणी उत्तम रितीनें करा. मी प्रसूत होतांच माझा मुलगा अगदी गुप्तपणें आपणाकडे पाठवीन. तो अपणालाच झाल्याचें प्रगट करवा.' हें तिचें ह्मणणें राणीला आवडलें. तिनें गरोदर असल्याचें ढोंग केलें. पुढें ती ब्राह्मण स्त्री प्रसूत होऊन मुलगा होतांच तिनें तो राजमहालांत पाठविला. राणी बयम्मा प्रसूत होऊन पुत्र झाल्याची बातमी सर्वत्र प्रसिद्ध करण्यांत आली. राजाला खरा प्रकार माहीत होता. तरी त्याचें राणीवर भारीच प्रेम असल्यानें, खरी स्थिती बाहेर कळूं नये म्हणून, त्यानें याविषयीं वर-वर संमती दिली, व पुत्र जन्म संबंधीं योग्य ते सर्व उत्सव केले व मेजवान्या दिल्या. त्या मुलाचें नांव चिक्कराय असें ठेविलें गेलें. तें बहुधा युवराजा-लाच दिलें जातें. तरी राजानें त्याला औरस पुत्राप्रमाणें कधींही वागविलें नाहीं. त्यानें त्याला चंद्रगिरी येथील राजवाड्यांतच ठेविलें. आपल्या खास पर-वानगीनें व राणी बरोबर असेल तेव्हांच तो त्याला बाहेर जाऊं देत असे. तो मुलगा १४ वर्षांचा झाल्यावर त्यानें त्याचें आपल्या एका भाचीशीं लग्न केलें. त्या प्रीत्यर्थ चांगलाच थाट व समारंभ केला. याप्रमाणें त्यानें आपला मेव्हणा 'ओबो-राय, याला खुष केलें. (यालाच पुढें चिन्नोबोराय असें म्हटलें आहे.)

मरणापूर्वी तीन दिवस रायानें हा कृतक पुत्र सोडून आपला पुतण्या चिक्क-राय व आपले बरेच सरदार समक्ष बोलावून राज्याच्या शिक्का मोर्तबाची आंगठी चिक्करायाकडे करून, ती त्यानें घ्यावी, आणि आपल्या पश्चात गादीवर बसावें म्हणून सुचविलें. पण चिक्करायानें डोळ्यांत पाणी आणून दीनपणें 'मला ती नको व तें राजपद ही नको. आपण ती वाटेल त्याला द्यावींत' अशी विनंती करीत त्या वृद्ध रायाच्या पायावर डोकें ठेविलें. रायानें जवळच्या लोकांना त्याला उठविण्याविषयीं खुणविलें, तसें त्यांनीं त्याला उठवून रायाच्या उजव्या बाजूस बसविलें. त्यानें आंगठी घ्यावी म्हणून रायानें पुनः हात पुढें केला. तरी, त्यानें दोन्हीं हात मस्तकावर उंच केले—जणों त्या आंगठीच्या पायीं येणारीं संकटें त्याला आधींच कळलीं होतीं व मला ती नको, याविषयीं मला क्षमा करा अशी पुनः प्रार्थना केली त्यावर त्या वृद्ध राजानें आंगठी आपल्या बोटांतून काढून पुढें करून पुनः एकदां त्याला देण्याला पुढें केली. तेव्हां तेथें हजर असलेल्या सरदार व सेनाध्यक्ष यांच्या आग्रहावरून चिक्करायाला ती घ्यावी लागली. ती त्यानें प्रथम आपल्या मस्तकावर ठेवली. नंतर बोटांत घातली. त्यावेळीं त्याला रडूं कोसळलें. राजानें आपला सुमारें २०००० क्रूसेडोस किंमतीचा दरबारी पोषाख, ६०००० क्रूसेडोस वर किंमतीचीं कानांत असलेलीं हिऱ्याचीं कुंडलें, २०००० क्रूसेडोसपेक्षां जास्तच किंमतीचीं बिनमोल मोत्यें, इत्यादि सारीं राजचिन्हें आप-

वून तीं वारस म्हणून त्याच्या हवालीं केलीं. नंतर चिक्करायाच्या नांवाची द्वाही फिरविली गेली. याचा कित्येकांना आनंद झाला व कांहींना वाईट वाटलें.

पुढें ३ दिवसांनीं राय मरण पावला. त्याचें वय ६७ वर्षांचें होतें. सुवासिक परिमळ द्रव्यें व चंदन काष्ठें वगैरे घालून त्याच्या बागेंतच त्याचें दहन केलें गेलें. त्याच्या बरोबर त्याच्या तिघी राण्या–एक त्याच्याच वयाची व दोघी सुमारें ३५ वर्षांच्या–सती गेल्या. त्यावेळीं त्यांनीं फारच हिम्मत व धैर्य दाखविलें. त्यांनीं अंगावर पुष्कळसे सुवर्णाचे व रत्नखचित अलंकार घातलेले होते. मोठ्या समारंभानें त्या चितेजवळ पोहोंचल्या. तेथें सारे अलंकार काढून त्यांनीं ते आपल्या आप्त इष्टांना इनाम व ब्राम्हणांना दान व बाकीचे इतर लोकांसाठीं उधळून दिले. सर्वांचा निरोप घेतल्यावर त्या एका उंचशा जागीं चढून गेल्या व तेथून त्यांनीं त्या भल्या मोठ्या चिताग्नीमध्यें उड्या घातल्या. याप्रमाणें त्या अनंत काळाच्या विशाल उदरामध्यें गडप झाल्या.

पुढें नवीन राजा चिक्कराय राज्यकारभार करूं लागला व कांहीं सरदार व सेनाध्यक्ष यांना जवळ ठेवून बाकीच्यांना त्यानें किल्ल्या बाहेर काढलें. तीघां शिवाय सारे सरदार त्याच्या ताबेदारींत हजर झाले व त्यांनीं त्याला रीतीप्रमाणें प्रणाम केले व नजर नजराणे रुजू केले. व आलेल्या तीघांपैकीं जगराय प्रमुख होता. त्याचें उत्पन्न ६००००० चें होतें व त्याच्या पदरीं २०००० फौज होती. दुसरा तिम्मा नायक. त्याचा सरंजाम ४००००० चा. त्याला १२००० फौज ठेवावी लागते. तिसरा 'मकराय.' त्याची जाहगीर २००००० ची व त्याच्या पदरीं ६००० लोक राहतात. या नूतन रायाची ताबेदारी मुळींच पतकरावयाची नाहीं, अशी त्यांनीं शपथ वाहिली व माजीरायाच्या मानीव पुत्राला गादीवर बसवायाचा निश्चय केला. तो जगरायाचा भाचा होता. ( तो त्याचा भाचा नव्हे नातू. त्याची पत्नी बयम्मा ही राणीची भाची तसेंच वेंकटरायाची भाची किंवा पुतणी होती व खुद्द बयम्मा त्याची कन्या होती. ) या कटामध्यें जगरायच प्रमुख होता. हा आपला बेत पार पाडण्याची त्यांना लौकरच संधी मिळाली. ती अशीः—

चिक्करायानें आपल्या तीघां सरदारांना नाराज केलें. १ दळवै किंवा राज्यांतील सर्व फौजेचा सेनापती. तो आपल्या जहागिरींतून ५००००० होन सरकारांत पेशकष देत असे. त्याच्याकडील दोन किल्ले रायानें खाली करून मागितले ते किल्ले तो आपल्या दोघां मुलांना देणार होता. २, त्याचा मुख्य दिवाण होता. त्याला त्यानें माजीरायाच्या वेळीं अपहार केलेले म्हणून, एक लक्ष क्रूसेडोस परत देण्याबद्दल तगादा लावला. तिसरा माजीरायाच्या एका राणीचा भाऊ.

त्या राणीनें त्या भावाला–नरपा रायाला–कांहीं दागिनें दिले होते. ते त्यानें परत मागितले. या हुकुमांची बजावणी करण्याला त्या तीघांनींही दोन दिवसाची मुदत मागून घेतली. त्या अवधींत, जगरायाशीं खलबत चालविलें व त्याच्या भाच्याला गादीवर बसविण्याची मसलत केली आणि ती त्यांनीं पुढें लिहिल्या-प्रमाणें अमलांत आणिलीः—

जगराय, तिम्मानायक व मकानायक यांनीं आपण हुजूराच्या तावेदारींत हजर होऊं इच्छितों अशी राजाकडे विनंती करून पाठविली. तेव्हां रायानें त्यांना येण्याला परवानगी दिली. जगरायानें ५००० निवडक लोक बरोबर घेतले व त्यांच्यासह तो किल्ल्यामध्यें गेला. बाकीच्या लोकांना त्यानें बाहेर ठेविलें. दुसरे दोघे कटवालेही दोन दोन हजार निवडक लोकांनिशीं किल्ल्यांत आले. किल्ल्याला दोन कोट आहेत. बाहेरच्या द्वारांवर येतांच जगरायानें त्या दरवाजावर एक हजार व दुसऱ्या दरवाजावर एक हजार असे आपले लोक ठेविलें. किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूचे दोन दरवाजे दळवैनें आपल्या ताब्यांत घेतले. तोंवर दगा अस-ल्याबद्दल पुकारा झाला. तसें रायानें राजवाड्याचे दरवाजे बंद करण्याला हुकूम दिला. कटवाले लोक तेथें पोहोंचले व त्यांनीं ते दरवाजे फोडण्याला सुरुवात केली. मकाराय सर्वांत पुढें पोहोंचला होता. त्याला प्रथम यश प्राप्त झालें. मुकाट्यानें स्वाधीन झालां तर आपल्याला कांहीं धक्का पोहोंचणार नाहीं अशाबद्दल माझी जिम्मेदारी आहे, पण माजी राजाचा पुत्र, जगरायाचा भाचा, याला गादी मिळाली पाहिजे, असें त्यानें रायाकडे सांगून पाठविलें.

राजा या वेळीं चोहींकडून घेरला गेलेला. कोणी नोकर चाकर किंवा फौज फांटा ही जवळ नाहीं. अशा स्थितींत त्यानें निरुपायानें त्याच्यावर विश्वास ठेवून, हें म्हणणें कबूल केलें व तो आपल्या बायकां मुलांसह बाले किल्ल्यांतून बाहेर पडला. तेथें जमलेल्या शिपायांच्या मधून तो मुकाट्यानें खालीं मान घालून गंभीर व रुष्ट अशा चेहऱ्यानें व मुद्रेनें जात होता. त्याला त्यावेळीं कोणी सुद्धां हात उचलून रितीप्रमाणें प्रणाम केला नाहीं.

राजा निघून गेल्यावर जगरायानें आपल्या भाचाला आणवून गादीवर बस-विलें व तेथें हजर असलेल्या सर्व सरदार लोकांकडून त्याची तावेदारी कबूल करवून त्याला प्रणाम करविले. गादीवर बसल्यानंतर लगेच तो नूतन राजा राजवाड्यांत गेला. त्यानें तेथें असलेली सर्व संपत्ती व जड जवाहीर आपल्या कबजांत घेतलें. या संबंधांत लोक बोलतात तें खरें असलें तर, तेथें त्याला नुसत्या

हिऱ्यांनीं गच्च भरलेल्या तीन संदुका सांपडल्या. त्यांच्यांतील हिरे फारच नामी व पाणीदार होते.

जगरायानें चिक्करायाला कडेकोट पहाऱ्यांत ठेविलें. सारे सरदार व सेनाध्यक्ष यांनीं चिक्करायाचा पक्ष सोडून दिला. एच्चम्मा नायक नांवाचा एक सरदार काय तो त्याच्या वतीनें टिकून राहिला. तो ८००० फौज निशीं येऊन किल्ल्या बाहेर तळ देऊन राहिला होता. जगरायाच्या पक्षाला मिळण्याला तो कबूल होईना. किल्ल्यांतील दग्याचा व राजद्रोहाचा प्रकार कळून येतांच तो तेथील तळ उठवून आपल्या किल्ल्यांत जाऊन बंदोबस्तानें राहिला व त्यानें जास्ती फौज भरती करण्याची तजवीज च लविली.

' तावडतोब हजर होऊन राजाची--आपल्या भाच्याची--ताबेदारी कबूल करावी व त्याला प्रणाम करावा, नाहींतर आम्हीं समक्ष येऊन तुमचें पारपत्य करूं, असा जगरायानें त्याला निरोप पाठविला. त्याला एच्चम्मा नायकानें उत्तर दिलें कीं, ' ज्या मुलाचे आई बाप कोण, व जात कोणची, याचा पत्ता नाहीं, अशा पोराला प्रणाम करून त्याची ताबेदारी कबूल करणाऱ्यांपैकीं मी नाहीं. माझा पारपत्य करण्याचें, त्यास, किल्ल्या बाहेर निघून सामना करण्याचें आपल्या मनांत असलें तर, आम्ही ही फौजेसह त्याचीच वाट पाहातों आहों. '

हें उत्तर ऐकून जगरायानें त्याच्याशीं मोठेपणाचें व गोडी गुलाबीचें बोलणें चालविलें. पुष्कळसें इनाम व जहागीर आणि बहुमान, यांचा लालूच दाखवून पाहिलें. पण त्याचा दृढ निश्चय ढळेना. इतकेंच नव्हे, तर तो खुद्द फौजसुद्धां चढाई करून आला व जगरायाबरोबर लढाई करण्याला सिद्ध झाला. त्यानें जगरायाला सांगून पाठविलें कीं, ' सारे सरदार व सेनाध्यक्ष तुमच्या पक्षाला आहेत. तरी हिंमत असेल तर येऊन माझा पाडाव करा व मग तुमचा भाचा निष्कंटक राजा होऊन खुशाल राज्य करूं दे. ' त्याला स्वपक्षाला मिळवून घेण्याविषयीं जगरायाची निराशा झाली. पण त्यानें इतर पुष्कळ सरदार व सेनाध्यक्ष इनामें व आश्वासन देऊन आपलेसे करून घेतले.

जगराय या खटपटींत गुंतला असतांना, एच्चम्मा नायकानें, हर तऱ्हेनें अटकेंत असलेल्या चिक्करायाकडे प्रवेश होण्याचा प्रयत्न चालविला होता. तो साध्य होत नाहींसें पाहून त्यानें, निदान त्याचा एक पुत्र हस्तगत करून घेण्याचा उद्योग चालविला. तो असा:--चिक्करायाचे कपडे धुणाऱ्या धोब्याला बोलावून घेऊन, त्याला, कसेंही करून राजाच्या मधल्या मुलाला बाहेर आणून द्यावें, असें

सांगून त्याबद्दल पुष्कळच इनाम देण्याची लालूच दाखविली. ही गोष्ट अगदीं गुप्त ठेवावी, तर प्रयत्न करून पाहातों, असें धोब्यानें सांगितलें. धुतलेलीं वस्त्रें परत नेऊन चिक्करायाकडे पोहोंचविण्याचा दिवस आला तेव्हां त्यानें तीं तिकडे नेतांना त्यांतूनच एचम्मा नायकानें चिक्करायाच्या नांवानें लिहिलेली ताडपत्रावरील एक चिट्ठी लपवून नेली. 'आपल्या तिघांपैकीं एका मुलाला त्या धोब्याच्या मार्फत अवश्य पाठवावें. तो धोबी त्याला संभाळून आणून पोहोंचवील;' असें त्या चिट्ठींत फारच आग्रहानें लिहिलें होतें. त्या अन्वयें रायानें आपला मधला मुलगा बारा वर्षांचा त्याच्या स्वाधीन केला. वडील पुत्र १८ वर्षांचा होता, त्याला नेण्याचें धोब्याला धैर्य होइना. त्यानें त्या मुलाला मळक्या कपड्यांत लपविलें व 'अगदीं भिऊं नका, व कशीही इजा पोहोंचली तरी, रडूं ओरडूं नका,' असें बजाविलें. पाहरेवाल्यांमधून अगदीं बिनधोक निघून जातां यावें म्हणून त्यानें त्या कपड्यांवर अगदीं मळके व लोकांनीं घाण व विटाळ चे म्हणून टाळावे, अशा बेताचे कपडे घातले आणि मोठ्या मोठ्यानें 'टळा, टळा,' 'दूर व्हा, एकीकडे व्हा,' असें ओरडत तो निघाला. हें ऐकून अर्थातच सर्वांनीं बाजूला होऊन त्याला रस्ता दिला. तसा तो किल्ल्यांतून आपल्या घरीं पोहोंचला. राजपुत्राला त्यानें तीन दिवस लपवून ठेवून, चौथे दिवशीं एचम्मा नायकाकडे त्याच्या छावणींत एक कोसावर नेऊन पोहोंचविलें. तेथें नाईक व इतर सरदार यांनीं त्याचा मोठ्या आनंदानें स्वीकार केला.

ही गोष्ट पुढें बाहेर फुटली, व त्या किल्ल्यांत जगराय मुख्य अधिकार चालवीत होता त्याच्या कानीं गेली. त्यानें झडती घेतली तेव्हां ती खरी असल्याचें कळून आलें. ही गोष्ट त्याच्या मनाला फारच लागली. तो बरेच दिवस घराबाहेर पडला नाहीं. त्यानें चिक्करायावर दुहेरी पाहरे ठेविले व राजवाड्याचे आणि किल्ल्याचे दरवाजे बंद करविले. आणि रायाला जाडे तांदूळ व भाजी या शिवाय कांहीं देऊं नये असा हुकूम केला.

चिक्करायाचा मुलगा एचम्मा नायकाकडे आहे, ही गोष्ट प्रसिद्ध होतांच, जगरायाकडील चौघे सरदार ८,००० लोकांनिशीं त्याला सोडून एचम्मा नायकाकडे मिळाले. आतां त्याच्या जवळ ९६,००० लोक झाले. तसे, खऱ्या हक्कदार राजाच्या बचावा प्रीत्यर्थ लढण्यामध्यें यश मिळण्याची त्याला बरीच उमेद वाटूं लागली. त्यानें त्याबद्दल तजवीज चालविली. त्यानें आपल्या लोकांतून वीस निवडक व विश्वासू शिपाई शोधून काढले. त्या लोकांनीं बाजे किल्ल्याच्या बाहेरून थेट चिक्कराय कैदेंत असलेल्या ठिकाणापर्यंत एक गुप्त मार्ग-

सुरुंग-खोदून काढण्याचें कबूल केलें. त्यांनीं किल्ल्यांत जाऊन दळवैकडे नोकरी मागितली. त्यानें त्यांना नोकर ठेऊन पगारही दिला. थोड्या दिवसांनंतर त्यांनीं गुप्त मार्ग खोदण्याला सुरुवात केली. तो तयार होतांच त्यांनीं राजा असलेल्या कोठडींत प्रवेश केला, आपल्या कोठडींत अकस्मात शिपाई आलेला पाहून राजाला अचंबा वाटला. ते शिपाई त्याच्या पायां पडले व त्यांनीं त्याला एच्चम्मा नायकानें दिलेलें ताडपत्र दिलें. हें पाहून राजा अगदीं आश्चर्यचकित झाला. एच्चम्मा नायकानें त्याला 'त्या शिपायांवर विश्वास ठेवावा. ते आपणाला सुखरूप किल्ल्या बाहेर नेण्याला आले आहेत,' अशी विनंती केली होती. राजा कबूल झाला. त्यानें कपडे उतरले व एका वस्त्रानिशीं तो तेथून निघण्याला तयार झाला. त्यानें बायका मुलांचा निरोप घेतला, आणि बाहेर पोहोंचतांच 'तुमच्या बचावाची तजवीज करितों तोंवर धैर्य धरा, भिऊं नका,' असें सांगितलें.

याच सुमारास राजवाड्यावरील पाहारेकऱ्यांपैकीं लोक रात्रीची वेळ असल्यानें मशाली घेऊन गस्तीला निघाले होते. त्यांच्यांतून एकजण अवचित एका खळग्यांत पडून ओरडूं लागला, तसे इतर लोक जवळ आले. त्यांनीं नीटपणें तपास करून पाहतां, तें भुयार असल्याचें दिसून आलें. त्याच्यांतून ते राजवाड्यापर्यंत पोहोंचले. तेही तो हतभागी चिक्कराय, त्या भुयारांत उतरत होता अशा ऐन वेळीं. त्यांनीं त्याला पकडलें व जगरायाला वर्दी दिला. त्यानें त्याला एका अगदीं संकुचित व एकांतस्थळीं पाठवून, त्याच्यावर जास्तच कडक पाहारा ठेवून बंदोबस्त करविला. तेव्हां चिक्करायाची सुटका होण्याची पुरी निराशा झाली.

अशी ही मसलत फसल्यावर कांहीं दिवसांनीं एच्चम्मा नायकानें पुनः याबद्दल प्रयत्न केला. किल्ल्यामध्यें 'इटि ओबलेश्वर' नांवाचा एक ५०० शिपायांवरील हुद्देदार होता, त्याला त्यानें फितविलें. त्याला खूप मोठी रकम देण्याचें कबूल केलें व 'चांगलीशी संधी पाहावी, पाहाऱ्यावरील सर्व लोक ठार करावे, व रायाला सोडवावें,' असें सांगितलें. एके दिवशीं कोणी प्रमुख सरदार ताबेदारींत येण्याला तयार होता, त्याच्या मुलाखातीसाठीं जगराय आपल्या सर्व लवाजम्यासह बाहेर पडला. किल्ल्यांत सारे ५००० लोक राहिले होते. ही संधी साधून 'इटि ओबलेश्वरानें' एकदम हल्ला केला व पाहाऱ्यावरील लोक घटका भरांत ठार मारले. किल्ल्याचे तीन दरवाजे ताब्यांत घेतांच त्यानें एच्चम्मा नायकाकडे निरोप पाठवून ताबडतोब येऊन किल्ला कबजांत घेण्याला सुचविलें. पण जगराय तितक्यांत त्वरा करून परत आला. 'इटि ओबलेश्वराला'

माहित नसलेल्या एका दिंडी दरवाजानें तो आपल्या साऱ्या लोकांसह किल्ल्यांत पोहोंचला व त्यानें त्याला त्याच्या ५०० लोकांसुद्धां ठार मारलें.

हा प्रकार पाहून जगरायाला भारी संताप आला. आपल्या भाच्याचा पक्ष निष्कंटक करण्यासाठीं त्यानें चिक्करायाला, त्याच्या साऱ्या मुलां माणसांसह, जीवें मारविण्याचें ठरविलें. तें काम त्यानें आपल्या 'चिन्न ओबाराय' नांवाच्या भावाकडे सोंपविलें, आणि त्याला हुकूम दिला कीं, 'तूं स्वतः राजाकडे जा, व त्याला एक जांबिया देऊन आत्महत्या करण्यास सांग. त्यानें तसें न केलें तर तूं स्वतः त्याचा वध कर.' त्याप्रमाणें तो चिक्करायाकडे गेला. त्या हतभाग्या व प्रतिबंधांत असलेल्या चिक्करायानें या गुप्त कटाशीं आपला कांहीं संबंध नसल्याचें, व आपला कांहीं दोष नाहीं, वगैरे सांगून आपला बचाव करण्याचा यत्न केला, पण चिन्नाबारायानें त्याला एकच साफ सांगितलें कीं, 'तुम्हाला स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या हातानें ठार हें झालेंच पाहिजे' त्याचा असा निश्चय पाहून—ही अत्यंत हृदयद्रावक, कठिण व कळवळा आणणारी गोष्ट कथन करतांना सुद्धां, कितीतरी वाईट वाटतें—त्या हताश राजानें आपल्या बायकोला बोलावून घेतलें. तिच्याशीं थोडेंसें बोलून त्यानें तिचा शिरच्छेद केला. नंतर सर्वांत कनिष्ठ पुत्राला व मुलीलाही ठार मारलें. हें झाल्यावर त्यानें वडील पुत्राला बोलाविलें—त्याचें नुकतेंच लग्न झालेलें होतें—चिक्करायाच्या आज्ञेप्रमाणें त्या मुलानें आपल्या पत्नीचा प्राण घेतला. या उपर रायानें एका चार बोटें रुंद व खूब लांब, अशा तरवारीवर किंवा खांड्यावर स्वतः ला घालून घेतलें. मागून युवराजानेंही त्याचें अनुकरण केलें. त्यांच्या पैकीं एकच लहान मुलगी राहिली होती. तिला रायाच्यानें ठार मारवेना. तिला चिन्नाबा यानें स्वतः ठार मारिलें. कारण यांच्या पैकीं सर्वांनाच ठार केल्यावांचून आपल्या भाच्याचें राज्यपद निष्कंटक व कायमचें होणार नाहीं, अशी त्याची समजूत होती.

ही राक्षसी व भयंकर कत्तल झालेली ऐकतांच बोच सरदार लोक अतिशय कातावले. त्यांना त्याचा विलक्षण क्रोध व किळस आला. ते ताबडतोब एच्चम्मा नायकाकडे जाऊन मिळाले. त्यांनीं त्या धोब्यानें बचावलेल्या राजपुत्राचें रक्षण करण्याचा निश्चय केला. तेवढाच काय तो मूळ राजघराण्यामध्यें अवशिष्ट राहिलेला होता. हें अमानुष, क्रूर व लाजिरवाणें, कृत्य घडलें ऐकून 'एच्चम्मा' नायक क्रोधावेशानें जणों वेडावून गेला. आपला पक्ष सत्पक्ष व न्याय्य आहे, अशी त्याची खात्री होती. त्यानें १०००० निवडक लोक बरोबर

घेऊन जगरायाशीं तात्काळ सामना करण्याचा संकल्प केला. जगरायाजवळ ६०००० वर पायदळ व पुष्कळसे स्वार व हत्ती, इतकी भारी फौज होती. 'आपला खरा हक्कदार राजा व त्याची सारीं मुलें माणसें तूं मारविलीं आहेसच-तुझ्या तावडींतून सोडविलेला हा एकच राजपुत्र माझ्या हवालीं उरलेला आहे. साऱ्या सैन्यासह एकदांचा किल्ल्या बाहेर पड व लढण्याला तयार होऊन मला व त्यालाही मारून टाक म्हणजे तुझा भाचा कायमचा निर्वैर व निष्कंटक सिंहासना-वर कायम होऊं दे' असें त्यानें जगरायाला आव्हान पाठविलें. जगरायानें बरेच दिवस लढाईला तोंड देण्याचें टाळलें. अखेरीस एचम्मा नायकाचा आग्रहच पाहून व आपली फौज पुष्कळच भारी, तिच्या योगानें जय मिळेल इतकेंच नव्हे, पण 'एचम्मा' नायक व तो राजपुत्र यांनांही पाडाव करितां येईल, असा विचार करून, त्यानें लढाई करण्याचें ठरविलें. तो सारी फौज सज्ज करून निघाला 'एचम्मा' नायकानें १०००० लोकांसह राजपुत्राला कोसभरावर मागें सुरक्षित ठेविलें व तितकेच लोक बरोबर घेऊन तोही लढाईला सिद्ध झाला, इतकेंच नव्हे तर, त्यानें स्वतःच पुढें वाढून प्रथम हल्ला केला. तो ही इतक्या आवेशानें व त्वेषानें कीं, जगराय व त्याचा भाचा यांच्या भोंवतालच्या लोकांची दाणादाण झाली. त्यांच्या फौजेंत जागजागीं वाटा मोकळ्या पडल्या व त्यांच्यातून प्रति-पक्षाला पुढें वाढून मारा करण्याला चांगलाच अवकाश सांपडला. या लढाईंत पुष्कळच लोक मारले गेले. 'एचम्मा' नाईक विजयी होत्साता थेट जगरायाच्या डेऱ्यावर पोहोंचला. तेथें पूर्वीच्या वृद्ध राजाचीं सारीं राजचिन्हें होतीं तीं त्याच्या हातीं लागलीं. चिकरायाचा पुत्र, तो राजपुत्र त्याच्या बरोबर होताच. त्याला तीं अर्पण करून त्यानें त्याच्या नांवाची द्वाही फिरविली व तोच विजयनगरच्या साऱ्या राज्याचा खरा व हक्कदार वारस, असें सर्वत्र जाहिर केलें.

त्याला तेथें किती तरी भारी लूट सांपडली. नुसतें जवाहिर वीस लक्ष होन किंमतीचें होतें, असें म्हणतात.

या विजयानंतर पुष्कळसे सरदार 'एचम्मा' नायकाला मिळाले. लौकरच त्याच्याजवळ ५०००० वर फौज जमा झाली. जगरायाचें पारडें फिरलें व त्याच्याजवळ केवळ १५,००० लोक राहिले. त्यांच्यासह त्यानें जंगला पहा-डांच आश्रय केला आहे. तेथें त्याच्यांकडे इतर बरेच लोक जमत आहेत. अशी ही गडबड व धांदल आज-सं. १६१६-दोन वर्षे सारखी चालली आहे. कधीं दैव या पक्षाला अनुकूल होतें, कधीं त्या पक्षाला. मधुरा येथील थोर नाय-कानें जगरायाचा पक्ष धरला आहे. दुसऱ्या पक्षाला तंजावर येथील नायक

आहे. त्या राजपुत्राच्या पक्षाचीच दिवसेंदिवस सरशी होत आहे. मधुरा येथील नाईक मूळचा विजयनगरच्या राजाचा पानदान ठेवणारा हुजऱ्या. तो दर साल ६,००,००० होन पेशकष देतो. त्याच्या हाताखालीं त्रावणकोरच्या राजासारखे इतर बरेच राजे व सरदार मांडलिक आहेत. तंजावरचा नाईक तितका प्रबल नाहीं तरी, त्याच्या मदतीनें राजपुत्राचा पक्ष प्रबल व यशस्वी होत आहे. त्रिच-नापल्ली जवळच्या विस्तीर्ण मैदानामध्यें उभयपक्षाचें एकेक लाखावर सैन्य समर-भूमीवर जमलें आहे. सर्व शिपाई माणसें मिळून १०,००,००० वर संख्या जुळली आहे. (या वेळीं मधुरा येथें मुत्तू विरप्पा नायक होता. तो सं. १६०९ पासून १६२३ पर्यंत गादीवर होता. त्याचें तंजावरवाल्याशीं युद्ध चाललें असल्याचा दाखला आहे. 'नूनीज' ची कैफियत सं. १५३३ त लिहिलेली. तिच्यामध्यें त्या वेळीं कोणी मोठासा नामां-कित सरदार मधुरा येथें असल्याचें लिहिलेलें नाहीं. पण याविषयीं इतर उपलब्ध ऐतिहासिक गोष्टींतही मतांतर आहे. सं. १६१४ च्या सुमाराला मधुरा येथील नायक फार प्रबल झाले होते. तरी पूर्वीच्या पांड्य वंशांतील राजाला बरेच लोक मानीत होते. त्या राजाचा उल्लेख सं. १६२३ पर्यंत आढळतो.)

या अवसांनील लढाया व गडबडीचा फायदा घेऊन, मद्रासजवळच्या 'सानथोम' येथील लोकांनीं स्वतंत्र होण्याचा निश्चय केला. येथवर हें शहर विजयनगरच्या राजांच्या अमलाखालीं होतें. तेथील लोक–पोर्तुगीज–त्या राजांना वसूल व जकात देत असत. तें उत्पन्न त्यांनीं कांहीं सरदार लोकांना लावून दिलें होतें. ते सरदार त्या लोकांना नेहमीं भारी त्रास देत असत. सबब त्यांनीं पोर्तुगालच्या राजाच्या अमलाखालीं पुर्तेपणीं जाण्याचें ठरविलें. त्यांनीं व्हाईसरायाला फौज पाठवून कबजा घ्यावा व बंदोबस्त करावा, अशी विनंती केली. त्याप्रमाणें तजवीज केली गेली. पण ती पुरी होईपर्यंत तेथील अधिकारी 'म्यान्यूएल डी फ्रिया' यानें त्या शहराजवळच असलेला व त्याच्यावरून शहरावर चांगला मारा असलेला किल्ला होता, तो तेथील किल्लेदार निमूटपणें स्वाधीन करीना म्हणून, त्याला वेढा घातला, व आंत कोणाचाही प्रवेश होऊं नये, असा पक्का बंदोबस्त केला.

अखेरीस पोर्तुगीज लोकांना यश आलें. तो किल्ला पाडाव झाला. आंतील १,५०० शिबंदी शरण आली. हा विजय पुरा करण्यासाठीं जलमार्गानेंही एक आरमार आलें होतें.

वर दिलेली हकीकत बहुतेक इंग्रज वाचकांच्या पहाण्यांत कधीं आलेली नाहीं. ती महत्वाची व मनोवेधक आहे. तरीच ती अगदीं खरी आहे, असें धरून, या घराण्याच्या उपलब्ध वंशवृक्षाच्या मानानें त्याविषयीं विचार करून पाहूं.

पहिला वेंकटराय—सं. १५८६–१६१४–याची एक बहीण होती. तिचें एका सरदाराशीं लग्न झालें होतें. त्याचें नांव 'बारांडास' यानें 'ओबो'–कदाचित 'ओबळ' राय–असें दिलें आहे. आजपर्यंत उपलब्ध प्रमाणांवरून पाहतां त्याचा भाऊ तिमरा रामराय याचे पुत्र दुसरा त्रिमलराय, व तिसरा रंगराय, हेच, त्याचे पुतणे आपणाला माहित आहेत. दुसऱ्या त्रिमलरायाला पुत्र नव्हते, असें दिसतें. दुसऱ्या रंगरायाला एक पुत्र चौथा रामराय हा होता. शिलालेखामध्यें या रामरायाला 'पुष्कळ बंधूंपैकीं एक' असें म्हटलेलें आहे. यावरून 'बारांडास' नें उल्लेख केलेला, व्यंकटरायाच्या मागून सं. १६१४ सालीं गादीवर बसविला गेलेला व तीन पुत्र असलेला पुतण्या तिसरा रंगरायच होय. 'बारांडास' च्या लेखांत चिक्कराय किंवा युवराज म्हटलें आहे, तो हाच असावा. तो सं. १६१४ त गादीवर बसला. पण लौकरच पदच्युत होऊन प्रतिबंधांत राहिला, व अखेर त्याला स्वतःला मारून घ्यावें लागलें. त्याच्या वडील पुत्रानेंही तसेंच केलें व धाकट्याला चिक्करायानें ठार मारिलें होतें. मधला मुलगा सुटून आला त्याला त्याच्या पक्षाच्या एचमा नायकानें गादीवर बसविलें. तोच बहुधा चौथा रंगराय असावा. व्यंकटरायाच्या बायकांपैकीं एक बय्यम्मा ही जगरायाची कन्या, दुसरी नरपा नायकाची कन्या. तिचें नांव दिलेलें नाहीं. व्यंकटरायाची एक भाची एका ब्राह्मणाच्या मुलाला दिली होती. त्या मुलाला बय्यम्मानें चोरून राजवाड्यांत आणविलें व तो आपला व व्यंकटरायाचाच पुत्र असा बहाणा केला व त्याचें पालण पोषण केलें. त्यालाच गादी मिळण्याविषयीं केलेल्या कटाला कांहीं काल यश आलें व त्यांतच तिसरा रंगराय व त्याच्या राजकुलांतील सर्व मुलें मारलीं गेलीं. एकच मुलगा वांचला होता. तो पुढें चौथा रंगराय नावानें गादीवर बसविला गेला. या कैफियतीपैकीं किती भाग खरा आहे तें नक्की सांगतां येत नाहीं. तरी ती सारीच काल्पत कादंबरी असणें शक्य नाहीं. तुर्त ती खरी मानून, तिच्यांत वर्णिलेल्या गोष्टी सं. १६१४ ते १६१६ पर्यंत घडल्या, असें मानून चालण्याला अडचण नाहीं. 'बारांडास' नें हें पत्र तारीख १२ डिसेंबर सं. १६१६ रोजीं लिहिलेलें आहे.

वर दिलेला वंशवृक्ष 'एपिग्राफिया इंडिका' मध्यें शिलालेखांवरून दिलेला आहे. त्याच्या वरून सं. १६१४ पासून सं. १६३८ पर्यंत कोणत्या हि सालाचा उल्लेख सांपडत नाहीं. त्या सालीं दुसरा पेद्द व्यंकटराय गादीवर असल्याचा दाखला आहे. स. १८८३ सालापर्यंत उपलब्ध असलेल्या शिलालेखांच्या आधारानें विजयनगरच्या राजांच्या नांवांची एक यादी त्या सालीं

आम्ही प्रसिद्ध केली होती. त्या यादींतील नांवें अगदीं नक्की आहेत, असें नाहीं. त्यांचा पुनः नीट छान करावी लागेल, हें खरें. ती यादी अशी-१ रंगराय, स. १६१९, २ रामराय, सं १६२०-२२, ३ रंगराय, सं. १६२३, ४ व्यंकटराय, सं. १६२३, ५ रामराय, सं १६२९, ६ व्यंकटराय, सं. १६३६.

यांतील शेवटचें नांव व साल खरीं दिसतात.

सं. १६३३ सालीं विजयनगरचा राय चंद्रगिरी येथेंच होता. त्याच्या प्रोत्साहनावरून पोर्तुगीज लोकांनीं पुलीकट 'पालिया कोट' येथें ठाणें देऊन राहिलेल्या 'डच' लोकांना तेथून हुसकून लावण्याचा प्रयत्न केला. त्यांत पोर्तुगीज लोकांनीं समुद्रांतून व रायाच्या फौजेनें खुष्कीनें एकदमच हल्ला करण्याचें ठरलें होतें. त्याप्रमाणें व्हईसरायानें आपलीं बारा मनवॉर पाठविलीं. पण अंतस्थ दंगे धोपे मोडण्याच्या कामीं ती फौज गुंतल्यामुळें रायाकडून फौज येऊन हल्ला व्हावयाचा तो झाला नाहीं अशी खबर सांगितली गेली. पुनः ही स्वारी झाली. तिलासुद्धां यश आलें नाहीं. राजाकडून ठरल्याप्रमाणे कार्यभाग न घडून आल्यामुळें पोर्तुगीज लोकांचे बेत फसले. त्यांचें आरमार परत गेल्यावर रायाच्या फौजेनें तेथें पोहोंचून हल्ला केला. पण त्यांची मूठ दाबून त्यांना परत वाटेस लावलें गेलें. पुढें त 'वलंदेजी' लोक कांहीं उपसर्ग न होतां तेथें राहिले.

या सुमाराला विजयनगरचा राजा अगदीं ओजहीन झालेला असून, तिम्मराय नांवाच्या एका नायकानें त्याच्या विरुद्ध बंड केलें होतें, असें त्या वेळच्या कांहीं उपलब्ध हस्तलिखित कागद पत्रांवरून दिसतें.

सं. १६३९ सालीं विजयनगरचा राजा चंद्रगिरी येथेंच राहात होता. त्याचें नांव रंगराय किंवा श्रीरंगराय होतें. त्याच्याकडून त्या सालीं मद्रासच्या इंग्रजी व्यापाऱ्यांच्या ठाण्याचा मुख्य अधिकारी मिस्तर 'डे' यानें, मद्रास येथें एक मैल रुंद व पांच मैल लांब इतक्या जमीनीच्या तुकड्याची सनद करून घेतली. त्या जमीनीवरच पुढें फोर्ट सेंट जॉर्ज किल्ला बांधला गेला. त्यावेळीं मद्रासच्या आसपासच्या प्रदेशावर रायाच्या एका मांडलीक सरदाराचा अमल होता. त्यानें आपला नामधारी मालक रंगराय याच्या हुकुमाची बजावणी करण्यांत फारच बेपरवाई केली. राजानें त्या नव्या शहराचें नांव श्रीरंगरायल पट्टण, ठेवण्याविषयीं हुकूम दिला होता. तो धाब्यावर बसवून त्यानें त्या शहराचें नांव आपल्या बापाच्या नांवावरून 'चिन्न पट्टण' असें ठाविलें. तेंच हिंदू लोकांमध्यें आजवर चालू आहे. निदान या विषयींची स्थानिक दंतकथा अशी आहे. 'एपिग्राफिया इंडिका'

मधील यादीमध्यें, सं. १६४४ मध्यें साहावा रंगराय हयात असल्याचा उल्लेख आहे. तो बहुधां हाच असावा.

या सालानंतरच्या रायांचीं नांवें व त्यांचीं सालें पुढें दिलीं आहेत, तीं बऱ्याच संशयित आणि अद्यापि पुर्तेपणीं तपासले जाण्याच्या शिलालेखांवरून तयार केलीं आहे.

| | |
|---|---|
| १ रंगराय सं. १६४३,४७,५५ १६६२-६३-६५, ६७-६८ | २ वेंकटराय, सं. १६७८-८० |
| ३ रंगराय, सं. १६९२ | ४ वेंकटराय, सं. १७०६ |
| ५ रंगराय, सं. १७१६ | ६ महादेवराय, सं. १७२४ |
| ७ रंगराय, सं. १७२९ | ८ वेंकटराय, सं. १७३२ |
| ९ रामराय, सं. १७३९ | १० वेंकटराय, सं. १७४४ |
| ११ वेंकटराय, सं. १७९१-९२-९३ | |

सर टामस मनरो साहेबांच्या कागद पत्रावरून पाहतां, अठराव्या शतकाच्या अखेरीस, विजयनगरच्या राजाच्या मूळपुरुषांपासून त्याच्या वंशजाकडे चालत असलेली आनीगुंदी येथील जमीनदारी, तेथील रायांच्याकडे मोगल बादशहांनीं त्यांना आपले ताबेदार व मांडलीक या नात्यानें तशीच चालविली होती. तें संस्थान सं. १७४९ त मराठ्यांनीं दाबलें. पुढें सहा वर्षांनीं तें हैदरअल्लीनें सर केलें. तरी टिपूच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपर्यंत तें ताबेदार मांडलिक संस्थान म्हणून कायम होतें. स्वतःच्या हितसंबंधाच्या प्रसंगांत टिपूला दया, माया, किंवा कोण्या प्रकारची क्षिती यांची बाधा क्वचितच होत असे. त्यानें सं. १७८६ मध्यें तें संस्थान खालसा केलें. पुढें १३ वर्षांनीं तो श्रीरंगपट्टणच्या लढाईंत मारला गेला. नंतर मुलुखाची वाटणी व बंदोबस्त झाला त्यांत तें चिमुकलें संस्थान हैदराबादच्या निजामाकडे गेलें. त्यापैकीं तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील भाग इंग्रज सरकारानें ठेविला. याप्रमाणें जमीनीचें नुकसान झालें त्या पेटें इंग्रज सरकाराकडून अगदीं अलीकडे पर्यंत आनीगुंदीच्या घराण्यांतील मुख्य पुरुषाला ६,००० रुपये नगदी नेमणूक मिळत होती. ती अलीकडे बंद झाली आहे. ( ही नेमणूक पुनः लार्ड कर्झन यांनीं चालू केली आहे )

# ' डामिंगो पायेस् ' याची कैफियत.

## ( ई. स. १५२०-२२ च्या सुमारास लिहिलेली. )

नरसिंगाच्या राज्याविषयीं ज्या गोष्टी माझ्या पाहण्यांत आल्या आणि ज्यांच्या विषयीं मीं माहिती मिळवून घेतली, त्या अशाः—

( पोर्तुगीज ) इंडिया-किंवा या वेळीं आम्हां पोर्तुगीज लोकांच्या अमलाखालीं असलेल्या हिंदुस्थानाच्या भागांतून नरसिंगाच्या राज्याकडे जातांना, समुद्र सोडल्यावर, एका पर्वताच्या—सह्याद्रीच्या—रांगेतून जावें लागतें. समुद्र कांठचा प्रदेश व नरसिंगाचें राज्य, यांच्यामध्यें सरहद्द असलेली ही रांग हिंदुस्थानाच्या साऱ्या पश्चिम किनाऱ्याशीं समांतर गेलेली आहे. तिच्यामध्यें जागजागीं वाट्या आहेत, त्यांच्यांतून देशावर जाण्याचे रस्ते आहेत. बाकीचा सारा पहाडाचा प्रदेश भारी डोंगराळ व दुर्गम आहे. त्याच्यावर निबिड अरण्य लागलेलें आहे. त्या राज्यांतील पुष्कळशीं शहरें समुद्रकांठीं आहेत. तेथें चांगलीं बंदरें आहेत. त्यांच्याशीं हल्लीं आमचा—पोर्तुगीज लोकांचा—सलूख आहे. त्या बंदरांपैकीं—'आमकोल.'—(अकोला), 'मिरगियो,' 'होनोर'-(होनावर), 'बटेकला'—(भाटकल), 'भामगलोर'—(मंगलोर), 'बाकालोर'—(बाकानोर), *इत्यादि ठिकाणीं आमच्या वखारी आहेत. ही पर्वताची रांग* चढून पलीकडे गेल्यावर सपाट प्रदेश लागतो. त्याच्यांत उंच पहाड व पर्वत नाहींत. लहानसहान पहाड्या व टेकड्या आहेत. हा प्रदेश पोर्तुगाल देशांतील 'सांतारेम' प्रदेशाप्रमाणेंच बहुतेक आहे. भाटकलापासून 'जनूजा' गांवाला जातांना वाटेंत लहानशा पहाडाच्या रांगा लागतात. त्यांच्यावरच कांयतें थोडें बहुत जंगल लागतें. रस्ता एकंदरींत सपाटच आहे. भाटकलापासून ' जबूर ' सुमारें ४० कोस आहे. ( हें बहुधा सोंडूर असावें. भाटकलापासून तें अंदाजें १२० मैल आहे, तें एक लहानशा मराठी संस्थानाची राजधानी आहे. तेथून विजयनगर सुमारें २५ मैल व श्रीकार्तीक स्वामीचें प्रसिध्द देवस्थान सहा सात मैलांवर आहे.) या रस्त्याला पुष्कळसे नदीनाले आहेत. या रस्त्यावर भाटकलापासून फार रहदारी चालते. प्रतिवर्षीं ५।६००० लमाण लोकांचे भरतीचे बैल जातात येतात.

पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील प्रदेश व विजयनगरचें राज्य, यांच्या दरम्यानच्या पहाडाशिवाय या राज्यांत झाडी झुडी तुरळकच आहे. जागजागीं रस्त्याच्या दुतर्फा कोसों गणती झाडांच्या रांगा व वनराया लागतात. लहान

मोठे गांव व शहरें यांच्या आसपासही आंबा, फणस, चिंच, महुवा, वगैरेच्या वृक्षांचीं घनेच्या वनें लागलेलीं आहेत. त्यांच्या मध्येंच पडाव आहेत. तेथें व्यापारी लोकांचा माल व लमाणाचे बैलांचे तांडे उतरतात. वाटेंत ' रिकलेम ' येथें एक प्रचंड वटवृक्ष आहे. त्याच्या खालीं आम्ही ३२० घोडे चांगले ठाण बंद व सारखे रांगेत बांधून उतरलों होतों. साऱ्या प्रदेशभर असले मोठ मोठे वृक्ष किती तरी आढळतात. या राज्यांत उत्तम तऱ्हेची शेती होते. जमीन चांगली सुपीक असून गाई, म्हशी, बकरी वगैरे पाळीव व वन्य पशु पक्षी यांची समृद्धी आहे. तितकी ती आपल्या हद्दींतील भागामध्यें नाहीं. तांदूळ, मका, व सर्व जातींचीं द्विदळ धान्यें व इतर पिकेंही पैदा होतात. तशीं व तितकीं तीं आमच्या हद्दींत होत नाहींत. या जमीनींत कापूस किती तरी पैदा होतो. धान्यही विपुळ उत्पन्न होतें. तेंच लोक खातात, व घोड्यांनाही घालतात. इकडे जव होत नाहींत, पण गहूं व तो ही चांगला कसदार, पुष्कळ पिकतो. साऱ्या प्रदेशांत दाट वस्तीचीं शहरें, गांव, खेडीं पुष्कळ आहेत. त्यांच्यांतील सरहद्दीवरील शहरां गांवांना मात्र पक्के दगडी कोट बांधण्याची राजाकडून परवानगी मिळते, इतरांना नाहीं, कारण तीं हातीं राहण्याला अडचण पडण्याची राजाला भीती राहते. त्यांना मातीचेच कोट बांधण्याला परवानगी मिळते. सरहद्दीवर किल्ले कोट बांधण्याला राजाची सदर परवानगी आहे.

हा सारा प्रदेश सपाट आहे. यामुळें येथें फारच जोराचा वारा सारखा वाहत असतो. ( हल्लीं सुद्धां हीच स्थिती आहे. ) या भागांत तेलाचा उपयोग फार करितात. तें इकडेच पैदा झालेल्या बीजांपासून देशी घाण्यांनीं काढतात. या प्रांतांत पाण्याची फारच वाण आहे. या राज्याच्या मोठ्या विस्ताराच्या मानानें त्याच्यांत नद्या नाले नाहींत. जागजागीं तलाव बांधून पावसाचें पाणी तुंबवितात. त्याच्यावरच गुजराण होते. कांहीं तलावांमध्यें गोड्या पाण्याचे झरेही असतात. तेथील पाणी सांचविलेल्या पाण्याहून चांगलें असतें. त्या झऱ्याच्या पाण्यावरच लोकांना गुजर करावी लागते. पुष्कळचसे तलाव व नाले सुकून जातात. तेव्हां त्यांच्यामध्यें लांबवर लहान मोठे खड्डे खोदून काय थोडें बहुत पाणी मिळेल त्याच्यावर लोकांना निर्वाह करावा लागतो. आपल्या पोर्तुगाल देशाप्रमाणें किंवा आपल्या ताब्यांतील इकडील भागांतल्याप्रमाणें या राज्यांत हिंवाळा पडत नाहीं व हिंवाळ्यांतला पाऊसही पडत नाहीं, या मुळेंच ही पाण्याची तूट पडते. वर्षानुवर्ष कमी अधिक जोराच्या वावटळी मात्र सुटतात. त्यांच्यांत धुळीचा सुकाळ असतो. पाण्याची झड कमी. बहुतेक तलावांतील त्यांत ही झरे किंवा नाले नसलेल्या

तलावांतील पाणी फारच गढूळ असतें. सपाटून वारा चालतो त्याच्या बरोबर आलेली धूळ त्याच्यांत पडते. वाऱ्यामुळें पाणी संथ राहून निवळण्याला अवकाश मिळत नाहीं. शिवाय गाई, बैल, म्हशी, वगैरे त्यांच्यांतच बसतात व पाणी पितात. या देशांत गुरें मारून खात नाहींत. आपल्या कडील भारबरदारी खेचरांप्रमाणें, इकडे बैलांचा उपयोग करितात. सर्व मालाची ने आण त्यांच्या वरच होते. इकडील लोक गाई, व बैल यांना पूज्य मानितात व त्यांच्या दगडी मूर्ती—नंदी—करवून, त्या देवालयांमध्यें ठेवितात. पुष्कळसे बैल-सांड-देवळांमध्यें मोकळेच सोडून देण्याचीही चाल आहे. ते गांवभर खुशाल फिरत असतात. त्यांना कोणी छेडीत व मारीत नाहींत. इकडे गाढवेंही पुष्कळ आहेत. पण तीं लहान चणीचीं असल्यामुळें थोडकेसेंच ओझें वाहण्याला उपयोगी पडतात. परीट लोक त्यांच्यावर कपडे लादतात.

पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें, या राज्याच्या पश्चिम सरहद्दीवर पर्वताची रांग आहे. तिच्या पश्चिमेस व बहुतेक समांतरावर, समुद्र किनारा आहे. त्यांची लांबी सुमारें ३०० ग्राव किंवा कोस आहे. पूर्वेकडे बालाघाट, व कारोमांडल किंवा प्राचीन चोलमंडलपर्की, समुद्राला समांतर असा समुद्र कांठचा भाग आहे. तोही सुमारें तितकाच लांब आहे. एक सामान्य ग्राव एक कोस व मोठा ग्राव दोन कोस भरतो. या मानानें समुद्र किनारा सुमारें सहाशें कोसांहून अधिक भरेल. पश्चिमेस भाटकलपासून पूर्वेस ओरियाच्या सरहद्दीपर्यंत, या राज्याची रुंदी अंदाजें २५० कोस आहे. तिकडे त्याची हद्द बंगालयालाही जाऊन लागली आहे. उत्तरेकडे ‘ दखनी रियासत ’ आहे, तिच्यांत आदिलशाही व निजामशाही अंमल आहे. हल्लीं आपलें—गोव्याच्या पोर्चुगीज लोकांचें-आदिलशहाशीं युध्द चालूं आहे. कारण गोवें शहर मूळचें आदिलशहाचें होतें. तें आम्ही घेतलें आहे.

वर लिहिलेलें ओरिया किंवा ओरीसाचें राज्य नरसिंगाच्या राज्याहून पुष्कळ मोठें आहे म्हणे. त्याची सरहद्द बंगालयाला सारखी लागलेली आहे. हल्लीं त्या दोन्हीं राज्यांमध्यें झगडा चालू आहे. त्याची सरहद्द पेगू व मलाका समुद्रालाही भिडलेली आहे. पश्चिमेकडे त्याची सरहद्द कंबाया-खंबायतच्या व ‘दखन’ च्या-राज्याला लागलेली आहे. ती तशीच पुढें पर्शिया किंवा इराणच्या राज्यापर्यंत पोहोंचली आहे, असें विश्वसनीय माहितगार लोक सांगतात.

इकडील लोकांचा वर्ण नीमगोरा व गव्हाळ असतो. पुरुषांची आंगकाठी धिप्पाड व सशक्त दिसते. येथील राजाजवळ अगणित संपत्ती, अफाट फौजा,

व कितीतरी हत्ती आहेत. या राज्यांत हत्तींचा सुकाळ आहे. मला या सर्व गोष्टींविषयीं माहिती मिळाली ती, चांगल्या वाकबगार लोकांनीं दिलेली आहे. त्यांच्या मतें या राजा इतका थोर व प्रबल राजा दुसरा कोणीच नाहीं. तो राजा मूर्तीपूजक आहे. पण हें विषयांतर झालें.

नरसिंगाच्या राज्यांतील शहरें गांव, खेडीं, वगैरे संबंधानें तपशीलवार माहिती देण्यांत विस्तार फार होईल. त्यांतलि एकच शहर 'दारचा' याविषयी मात्र उल्लेख करणें अवश्य आहे. इतर कोठेंही क्वचितच पाहण्यांत येणारी अशी तेथें एक अप्रतिम इमारत आहे. त्या शहराला तटबंदी आहे. पण ती दगडाची नाहीं. याचें कारण वर दिलेंच आहे. आमच्या अमलाच्या बाजूला म्हणजे पश्चिम बाजूला त्या शहराच्या तटाभोंवतीं एक सुरेखशी नदी वाहते. त्याच्या पूर्वेला सपाट मैदान आहे. तिकडील तटा बाहेर भला मोठा खंदक आहे. तेथें एक मंदिर आहे. वर ज्या इमारतींबद्दल लिहिलें ती हेंच मंदिर. त्याच्या इतकें सुरेख व प्रेक्षणीय मंदिर फार दूरवर सुध्दां क्वचितच आढळतें. तें एकसंधीदगडी व गोल आकाराचें आहे. त्याचें सारें काम उत्तम व चतुर सुतारी कामा सारखें, शाळा शुध्द व बिनतोड केलेलें आहे. त्याच्यांत मूर्ती कोरलेल्या आहेत. त्या चांगल्या हात हातभर पुढें आलेल्या उठावदार आहेत. त्या चारी बाजूनें स्पष्ट दिसतात. त्या मूर्तींचे चेहरे किंबहुना सर्वच भाग फारच अप्रतिम घडलेले आहेत. तितकें चांगलें कोरीव काम इतरत्र होणें बहुतेक अशक्यच होय. प्रत्येक मूर्तीच्या भोंवतालीं सजावटदार फूलपत्तीची प्रभावळ आहे. मंदिराचा वरचा भाग 'रोमानेस्क'—रोम येथील सुंदर देवालयांच्या-तऱ्हेवर बांधलेला आहे. त्याच्या मध्यें जास्त शोभा आणणें शक्यच नाहीं. त्याच्या पुढें एक लहानसा मंडप आहे. तो दगडी खांबांवर उभारलेला आहे. ते खांब व त्यांच्या तळच्या उथळ्या इतक्या कांहीं साफ व सुरेख घडलेल्या आहेत कीं, हें सारें काम जणों इटाली देशांतूनच बनवून आणल्या सारखें दिसतें. या मंदिरांतील उभ्या आडव्या तुळया व वासे दगडाचेच आहेत. त्याच्यांत लांकडाचें कोठें नांवनिशाण नाहीं. मंदिरांत, बाहेर व सभोंवार, त्याच दगडाची फरशी केलेली आहे. मंदिरांतील गर्भगृहाभोंवतीं याच दगडाचा जाळीदार कठडा असून त्याच्या बाहेर भक्कम चिरेबंदी कोट, शहराच्या कोटाहूनही जास्त मजबूत, बांधलेला आहे. या मंदिराच्या आवाराला तीन महाद्वारें आहेत. त्याचें कामसुध्दां फारच भव्य व सुरेख आहे. मंदिराचें मुख्य महाद्वार पूर्वेला आहे. त्याच्या दुतर्फा लहान लहान व ठेंगण्या ओऱ्या बांधलेल्या आहेत. त्या ओऱ्यांमध्यें जोगी—बैरागी—लोक

राहतात. या आवारांमध्येंच आणखी कितीतरी लहान लहान देवळें आहेत. तीं लालदगडाचीं बांधलेलीं आहेत. त्यांच्यामध्यें एक भला मोठा डोल काठी सारखा उंचच उंच दगडी-गरुड-खांब आहे. त्याच्या खालचा दासा व चौकी चौकोर आहे. दांडी अष्टपैलू आहे. रोम येथील सेंट पीटर्स देवालयांत उभा केलेला सुळका ( बहुधां इजिप्शियन ' ओबेलिस्क ') मीं पाहिलेला आहे. तो बहुतेक याच्या इतकाच उंच असावा. यामुळें मला याचें तितकें आश्चर्य वाटलें नाहीं. ( हें ' दारचा ' कोणचें, तें पक्केपणीं कळण्याला मार्ग नाहीं. तें धारवाड असेल असें कोणी कोणी अनुमान केलें आहे. पण धारवाडच्या किल्ल्या खालीं नदी नाहीं. किंवा तेथें अशा मोठ्याशा मंदिराचा अवशेषही नाहीं. हें कदाचित द्वारसमुद्र किंवा हळेबीड असेल. )

या व अशा मंदिरांमध्यें हे लोक पूजा व प्रार्थना करितात. तेथें त्यांच्या देवांच्या मूर्ती बसविलेल्या असतात. त्या मूर्ती स्त्री, पुरुष, बैल, माकड, इत्यादिकांच्या असतात. कांहीं देवळांमध्यें नुसता एक गोल दगड असतो त्याचीच पूजा करितात. ' दारचा ' येथील देवालयांतील मूर्तीचें धड माणसाचें व मस्तक हत्तीचें आहे. त्याला सोंड, दांत, तीन तीन भुजा व सहा सहा हात आहेत. ( या वरून हें गणपतीचें मंदिर असावें असें दिसतें. ) त्यांतील चार भुजा पूर्वींच गेलल्या आहेत. बाकीच्याही भुजा जातील त्या वेळीं महाप्रलय होईल, असें इकडील लोक ह्मणतात. या ह्मणण्या-वर त्यांचा दृढ विश्वास आहे. ही गोष्ट कधीं तरी खचित घडणार असें ते समजताहेत. प्रति दिवशीं या देवाला खाऊं जेऊं वातलें जातें. तो प्रत्यक्ष होऊन खातो ह्मणे! या खाण्याच्या वेळीं त्याच्या पुढें स्त्रियांचा नाच होत असतो. त्या स्त्रिया देवालाच वाहिलेल्या-देवदासी-असतात. त्यांना अन्न वस्त्र तेथूनच मिळतें. त्यांना झालेल्या मुलीही देवालयाच्याच समजल्या जातात. या सर्व स्त्रिया कसबिणीचा धंदा करितात. त्यांचीं घरें शहरांतील प्रमुख राजमार्गांवर आहेत. इतर मुख्य मुख्य शहरांमध्येंही हीच स्थिती आहे. वेश्यांच्या मोहल्यांतील घरें अव्वल प्रतीचीं असतात. त्यांतही अधिकारी व श्रीमान लोकांच्या अंगाखालीं असणाऱ्या वेश्यांचा अधिकच मान असतो. सभ्य व संभावित गृहस्थ लोक सुध्दां त्यांच्याकडे राजरोस जातात येतात. असें करण्यांत कांहीं कमीपणा मानीत नाहींत. या स्त्रियांना राज कुळांतील स्त्रियांकडे सुध्दां जाण्याची परवानगी असते. त्या त्यांच्याकडे जाऊन राहतात व त्यांच्या समक्ष व बरोबर पानपट्टी खुशाल खातात. असें करण्याची दुसऱ्या कोणालाही-तो कोणच्याही दरजाचा असो-परवानगी नाहीं.

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

हीं विड्याचीं पानें मिरवेलीच्या किंवा आपल्या कडील दुसऱ्या पानांसारखीं असतात. तीं हे लोक नेहमीं सुपारी बरोबर खाऊन तोंडांत धरतात. सुपारी आपल्या 'मेडलर' फळा सारखी, पण जास्त टणक असते. ती खाल्यानें मुखशुद्धी होते व ती इतर तऱ्हेनेंही गुणकारी आहे, असें ह्मणतात. आपल्याप्रमाणें खाना खाण्याचा रिवाज नसलेल्या लोकांना त्यांचा फार उपयोग होतो. इकडील कांहीं लोक गायी, बैल, व डुकरें, यांचें मांस सोडून बाकीचें सर्व प्रकारचें मांस खातात, ते लोकही दिवसभर विडा पान खाण्याला कमी करीत नाहींत. (येथें तंबाकू खाण्याचा उल्लेख नाहीं हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. देवदासी व वारांगना यांचा रिवाज बहुतेक आज कालच्या प्रमाणेंच त्या वेळींही—सुमारें ४०० वर्षा पूर्वीही—होता. तंबाकू या नंतर प्रचारांत आला असेल.)

येथून पुढें 'विसनग' विजयनगरच्या मार्गावर बरींचशीं शहरें व तटबंदीदार गांव आहेत. विजयनगर, या शहरापासून अठरा कोस आहे. तेथेंच नरसिंगाच्या राज्याची राजधानी आहे. राजा नरसिंग नेहमीं तेथेंच राहतो. राजधानीच्या अलीकडे दोन कोसांवर एक उंचशी पहाड्यांची रांग आहे. तिच्यांतून शहरांत जाण्याला घाट्या लागतात. (ही रांग सोंडूर व होसपेठ यांच्या मधील रामनमलीची, किंवा होसपेठच्या पश्चिमेस तुंगभद्रा नदी ज्या पाहाड्यां मधील खिंडींतून वाहते ती, पहाडांची रांग असावी.) या घाटींतून किंवा खिंडींतूनच शहरांत जावें लागतें. दुसरा मार्ग नाहीं.

पहाड्यांचें या शहराला कडेंसें पडलें आहे. तें कडें सुमारें आठ कोसांचें आहे. त्याच्या आंत दुसऱ्याही पहाड्या आहेत. त्यांनीं शहराचा आसपासचा बहुतेक प्रदेश व्यापला आहे. मध्यंतरीं जागजागीं मोकळी व सपाट जमीन लागते. तेथें दोन्ही बाजूच्या पहाड्यांमध्यें भक्कम तटबंदी केलेली आहे. बाहेरच्या कड्यामधील खिंडी व या तटामधील वेशी यांच्याशिवाय दुसरीकडून कोठूनही पहाड्या वलांडून शहरांत प्रवेश करण्याला मार्ग नाहीं. क्वचित स्थळीं पक्क्या दगडांत खोदलेल्या लहान लहान घाट्या आहेत. थोडेसेच शिपायी त्यांचें रक्षण करूं शकतात. खुद्द शहरांतही या पहाड्या पोहोंचलेल्या आहेत. त्यांच्यामध्येंही जागजागीं मोकळी व सपाट जमीन आहे. तिच्यांत भात खाचरें व बागबगीचे आहेत. त्यांच्यांत भात पिकतें व नारिंगें, संत्रें, लिंबें, वगैरेचीं फळ झाडें आहेत. शिवाय त्यांच्यामध्यें आपल्या देशांतल्याप्रमाणेंच सर्व तऱ्हेच्या भाज्या पैदा होतात. लेट्यूस व कोबी मात्र होत नाहींत. या पहाड्यां-मधून पुष्कळसे लहान मोठे तलाव आहेत. त्यांच्या पाण्यावरच हीं सारीं पिकें

तयार होतात. या पहाड्यांवर जंगल मुळींच नाहीं. क्वचित स्थळीं लहान सहान झाडें झुडपें आढळतात, व कोठें कोठें कांहींशी हिरवळही दिसून येते, नाहीं असें नाहीं. पण फारच कमी. या पहाड्या व टेंकड्या अगदीं चमत्कारिक आहेत. त्यांतील दगड पांढऱ्या रंगाचा आहे. त्या दगडाचे लहान मोठे टोळ व कडपे, कसे तरी, कोठें तरी, एकमेकावर रचून ठेवलेलेसे, पण अगदीं अधांत्री असलेले विलक्षण दिसतात. असल्या या पहाड्यांच्या ऐन मध्यभागीं हें शहर वसलेलें आहे. त्यांनीं तें जसें व्यापून टाकलेलें आहे. (हल्लीं या पहाडीवर झाडी थोडी बहुत वाढलेली आहे.)

हे डोंगर सारखे 'दखन' च्या राज्याच्या हद्दीपर्यंत पोहोंचले आहेत. आदिलशाही राज्याच्या सरहद्दीलाहि ते लागलेले आहेत. ते रायचूर शहरापर्यंत गेलेले आहेत. हें शहर पूर्वीं नरसिंगाच्या राज्यांत सामील होतें. त्याच्या पायीं पुष्कळच रण माजत आलें आहे. हल्लींच्या राजानें तें आदिलशहाकडून नुकतेंच घेतलें आहे. या पहाडाच्या रांगेची आडकाठी, हीं दोन्हीं राज्यें एक व कायम न होण्याला व त्यांच्या मध्यें सारखें युद्ध जारी राहण्याला साधन होऊन राहिली आहे.

ओरिसाच्या बाजूलाही असेच पण कांहीं निराळ्या तऱ्हेचे पहाड आहेत. त्यांच्यावर आपल्या देशांतील पहाडांप्रमाणें झाडी व हिरवळ पुष्कळशी आहे. ते इतके उंच नाहींत, व त्यांच्यामध्यें पुष्कळच सपाट जमीन आहे. या दोन्ही राज्यांच्या पूर्वेकडे निबिड जंगल आहे. त्यांत मोठाले वृक्ष नाहींत, नुसतीं झाडें झुडुपेंच दाट लागलेलीं आहेत. तशीं तीं इतरत्र क्वचितच पाहण्यांत येतात. त्या जंगलांत वनपशू विपुल आहेत. हा सारा वन प्रदेश जणों एक मोठा व भक्कम किल्लाच झाला आहे. त्याच्या योगानें दोन्हीं राज्यांचा परस्पर बचाव होतो. जंगलामधून जाणारे मार्ग ठरलेले आहेत. त्यांनींच एका राज्यांतून दुसऱ्यामध्यें जावें लागतें. या सरहद्दी वरील घाट्यांवर नरसिंगाच्या राजानें एक सेनाध्यक्ष नेमलेला आहे. त्याच्या हाताखालीं पुष्कळशी फौज आहे. अशी व्यवस्था आमच्या हद्दीच्या बाजूला केलेली नाहीं. कारण त्यांचा आमचा सलूख आहे.

गोव्याहून येणारे लोक पश्चिमेकडून येतात. त्या बाजूच्या पहाडा मधील मुख्य घाटी जवळच राजानें एक मुख्य वेस बांधून तिच्या आंत थोड्या अंतरावर एक नवें शहर वसविलें आहे. त्याला भारी मजबूत कोट आहे. कोटामध्यें जागजागीं बुरूज व दरवाजे आहेत. हें सारें काम पक्के दगडाचें

आहे. इतर शहराप्रमाणें मातीचें नाहीं. त्याच्या इतकें चांगलें व मजबूत काम इतर कोठें क्वचितच केलेलें आढळेल. त्या शहरांतील इमारती रस्त्याच्या दुतर्फा बांधलेल्या व माळवदी आहेत. तरी त्या चांगल्या सुरेख व इकडील रिवाजाप्रमाणें सोईवार आहेत. या शहरामध्यें व्यापारी लोकांची वस्ती विशेष आहे. इतर लोकांनींही पुष्कळ घरें बांधलीं आहेत. यामुळें येथील आबादी पुष्कळच वाढली आहे. इतर ठिकाणच्या भल्या भल्या व्यापाऱ्यांनीं येथें येऊन रहावें म्हणून राजानें त्यांना बऱ्याच सवलती दिल्या आहेत. या जागीं पाण्याची सुबत्ता आहे. ( हें शहर नागलापूर, हल्लींचें होसपेठ होय. ) शिवाय राजानें जवळच एक मोठा तलाव तयार करविला आहे. तो तलाव तोफेच्या गोळ्याच्या टप्या इतका रुंद असावासें दिसतें. तो दोन पहाड्यांच्या मध्यें टोंकाला बांध बांधून तयार केला आहे. त्या टेकड्यांच्या बाजूनीं येणारें सर्व पाणी तेथें जमा होतें. शिवाय तीन कोस लांब नाल्या व चर खोदवून व नळ घालून पहाड्यांच्या बाहेरच्या बाजूचें पाणीही आंत घेण्याची तजवीज केली आहे. याच्यावर दुसरा एक तलाव आहे. त्यांत भरून वाहणारें पाणी, एका लहानशा नदींतून वहात, या तलावांत येतें. या तलावामध्यें तीन भले मोठे व लांब असे दगडी खांब व चबूत्रे आहेत. त्यांच्यावर मूर्ती कोरलेल्या आहेत. या खांबांच्या वरच्या अंगाला असलेल्या नळांतून पाणी येतें. तें खालच्या जमीनींतील भात गहे, व बागबगीचे, यांना दिलें जातें. या ठिकाणीं असलेली एक टेंकडी खोदवून, राजानें हा तलाव बांधविला. हें काम चालू असतांना माझ्या पाहण्यांत आलें होतें. त्यावेळीं तेथें १५०००।२०००० माणसें काम करीत होतीं. त्यांची जशी मुंग्यांप्रमाणें रीघ लागलेली होती. त्यांच्यामुळें खालची जमीनसुद्धां दिसत नव्हती. हें सारें काम राजानें आपल्या लष्करी अधिकाऱ्यांकडे वांटून दिलें होतें. हातांखालच्या कामकरी लोकांकडून ठीक, चांगलें, कसून, व वेळेवारीं, काम पुरें करून घेण्याची जिम्मेदारी या अधिकाऱ्यांकडे होती.

तलावाचें काम दोन तीन वेळ फुटलें. तेव्हां राजानें, ब्राह्मण, उपाध्ये व गुरू बोलावून, देवाला कौल लावून याचें कारण शोधून काढण्याला सांगितलें. त्यांनीं, मुख्य देवता क्षुब्ध झाली आहे, ती, नर, अश्व व महिष-बली घेतल्या वांचून तृप्त होणार नाहीं, असें कळाविलें. त्यावर राजानें आज्ञा दिल्याप्रमाणें त्या देवतेपुढें ६० नर आणि पुष्कळसे अश्व व महिष बली दिले गेले. ( होसपेठेच्या पश्चिमेस दोन पहाडांमध्यें बांधलेला तलाव दिसतो तोच हा असावा. तो हल्लीं गाळानें भरून गेलेला आहे. )

हे ब्राह्मण लोक आपल्याकडील 'प्रायस' किंवा पाद्री लोकांप्रमाणें आहेत. त्यांना इकडील लोक पवित्र समजतात व पूज्य मानतात; तेंही विशेषतः मंदिरांमध्यें पूजा अर्चा करणारे व विद्वान अशा ब्राह्मणांना. या राज्यांत ब्राह्मणांची वस्ती पुष्कळ आहे. त्यांतील बरेच लोक राज दरबारी कामावर आणि बहुतेक शहर व गांव यांच्यामध्यें ग्रामाधिकारी आहेत. कांहीं व्यापारधंदा करितात, बाकीचे सुखवस्तू शेतीवाडी करून उपजीवन करितात. देवालयांमधील अधिकारी ब्राह्मण बरे विद्वान असतात. हे लोक प्राणिहिंसा करीत नाहींत व मांस मासोळी वगैरे खात नाहींत, इतकेंच नव्हे तर, ज्याच्यामुळें अन्नाला तांबडा रंग येईल, असे पदार्थही सेवीत नाहींत. कारण त्यांना ते रक्ताप्रमाणें समजतात. यांच्या शिवाय इतर पुष्कळसे ब्राह्मण वगैरे ईश्वर प्राप्तीचें साधन ह्मणून उपास तापास व व्रतें वैकल्यें करीत असतात. तेही देवालयांतील ब्राह्मणांचें अनुकरण करीत, मांसाशन वर्ज करितात व केवळ उद्भिजान्न सेवन करितात. ते तूप व फळें मिश्रित तांदुळाचे पदार्थ ग्रहण करितात. हे ब्राह्मण लोक विवाह करितात. त्यांच्या स्त्रिया गौरवर्ण, सुस्वरूप, व मर्यादाशील असतात. त्या फारशा घरांबाहेर पडत नाहींत. या राज्यांत गौरवर्ण, सुस्वरूप व प्रेक्षणीय माणसें आढळतात तीं बहुतेक या ब्राह्मण जातींतच. इतर जातीमध्येंही असे लोक आहेत, पण फार कमी. इकडे नुसते ब्राह्मण ह्मणविणारे दुसरेही पुष्कळ लोक आहेत, पण त्यांची वागणूक वर वर्णन केलेल्या अस्सल ब्राह्मणांप्रमाणें क्वचितच असते. खऱ्या ब्राह्मणांवर राजाचा भारी विश्वास आहे. तो त्यांना नेहमीं मोठ्या आदरानें वागवितो व त्यांच्यावर त्याची सदोदित कृपा राहते.

राजानें या नव्या शहराला आपल्या एका आवडत्या राणीचें नांव दिलें आहे. तें शहर तरी तिच्याच मर्जीस्तव वसविलें गेलें. (त्याचें नांव नागलापूर असें आहे. राणीचें नांव 'चित्रदेवी,' छोटीराणी, होतें, असें 'नूनीज' यानें आपल्या कैफीयतीमध्यें लिहिलें आहे. होसपेठ मूळची राजाच्या एका प्रिय राखेनें वसविली, अशी आख्यायिका हल्लींसुद्धां तेथील लोकांमध्यें प्रसिद्ध आहे.) हें शहर मैदानांत वसलें आहे. त्याच्या सभोंवार लोकांनीं आपल्या सोई व ऐपतीप्रमाणें लहान मोठे बाग बगीचे केले आहेत. राजानें तेथें एक देवालय बांधून त्याच्यांत पुष्कळशा मूर्ती स्थापन केल्या आहेत. त्या देवळाचें बांध काम चांगलें आहे. त्या शहरामध्यें इकडील पद्धतीप्रमाणें बांधलेल्या पुष्कळ सुरेखशा बावड्या व विहिरी आहेत. इकडे आपल्या कडल्या प्रमाणें घरें मजलेदार नाहींत. त्यांत एकच मजला

असतो. तोही माळवदी. त्यांच्यावर शिखरेंशीं बांधलेलीं असतात. (ही गैर समजूत दिसते. माळवदी घरांवर शिखरें नसतात. धुरांडीं मात्र वरींच उंच बांधलेलीं असतात. तींच याला शिखरांसारखीं वाटलीं असतील.) एका माळवदांवरून दुसऱ्यावर जातां येतें. घरांमध्यें खांब दिलेले असतात व आंत बाहेर मोकळया पडव्या आणि ओसऱ्या असतात. त्यांच्यामध्यें पाव्हण्यांना उतरविण्याची बसविण्याची सोय असते. यामुळें हीं घरें कांहींशीं राजवाड्यासारखीं दिसतात.

खास राजवाड्या सभोंवार कोट आहे. त्याच्या आंत रस्त्याच्या दुतर्फा पुष्कळसे महाल व वाडे बांधलेले आहेत. राजा राहण्याच्या ठिकाणीं जाण्याच्या मार्गावर दोन मोठीं राजद्वारें आहेत. तेथें पुष्कळसे पाहारेकरी असतात. ते अधिकारी व कामगार वगैरे शिवाय इतरांना आंत सोडीत नाहींत. या दोन्हीं महाद्वारांच्या दरम्यान मोठें थोरलें पटांगण आहे. त्याच्या भोंवतालीं पडव्या, ओसाऱ्या व दलानें बांधलेलीं आहेत. राजदर्शनाला किंवा सरकारी कामानिमित्य आलेले दरबारी व इतर लोक आणि राजाकडे आलेले पाव्हणे लोक, आंतून परवानगी होई पर्यंत येथें बसून राहतात.

राजाचा बांधा मध्यम, वर्ण गौर, शरीर काठी सदृढ, तरी स्थूलच वाटणारी-सडपातळ नव्हे अशी आहे. त्याच्या तोंडावर देवीचे वण आहेत. त्याचा सर्वत्र व सर्वांवर भारी दरारा आहे. तो सकळ गुण संपन्न आहे. तो नेहमीं आनंदी व हंसत मुख असतो. त्याच्या सारखा सर्व तऱ्हेनें परिपूर्ण दुसरा राजा क्वचितच आढळेल. तो परद्वीपस्थ लोकांना फार चाहतो, त्यांचा मान सन्मान करितो, त्यांची हौसेनें व प्रेमानें भेट घेतो, आणि ते कोणच्याही दर्जाचे असले तरी, त्यांच्या कामा काजाविषयीं सर्व तऱ्हेनें विचारपूस करितो. हा थोर व सार्वभौम राजा असून चांगला न्यायीही आहे. तरी त्याला कधीं मधीं क्रोधावेशाचे अनावर झटके येतात. त्याचें संपूर्ण नांव व बिरुदावळी 'कृष्णराव' महाशहा, महाराज, राजराजेश्वर, भारत भूपाधिराज, त्रिसमुद्राधिपति, भूमंडलेश्वर, अशी आहे. तो इतर सर्व राजांहून श्रेष्ठ व थोर असून त्याच्या पाशीं फौज फांटा सर्वांत अधिक आहे. तसेंच त्याचें राज्यही इतर सर्व राज्यांपेक्षां विस्तीर्ण आहे. यामुळेंच त्याला ही बिरुदावली मिळालेली आहे. ती वास्तविक पाहतां त्याच्या सारख्या थोर व वीर पुरुषाच्या खऱ्या योग्यतेच्या मानानें कांहींच नाहीं. असा तो सर्व गुण परिपूर्ण आहे. ओरिसाच्या राजाशीं त्याचें नेहमीं युद्ध चालतेलें असे. त्यानें त्या राज्यावर पुष्कळदां स्वाऱ्या केल्या व त्याच्यांतील अनेक शहरें व गांव काबिज केले, लुटले व मारले. त्या राजाचें किती तरी सैन्य व हत्ती त्यानें

उधळून दिले, आणि त्याच्या पुत्राला धरून विजयनगर येथें कैदेंत ठेविलें. तेथेंच तो राजपुत्र कांहीं वर्षांनीं मरण पावला. पुढें आपसांत सलोखा होऊन तह झाला. त्याअन्वयें ओरिसाच्या राजानें कृष्णरायाला आपली कन्या दिली. तिच्याशीं त्यानें लग्न केलें. ती त्याच्या पट्टराण्यांपैकीं एक आहे.

या राजाच्या बारा विवाहित राण्या आहेत. त्यांत तीघी पट्टराण्या आहेत. त्यांचेच पुत्र राज्याला वारस व्हावयाचे. तीघींनांही पुत्र झाले तर ही व्यवस्था. पण एकच पुत्र असेल, मग तो कोणच्याही राणीचा असो, तोच वारस व्हावयाचा. या तीघी पट्टराण्यांपैकीं एक ओरीसाच्या राजाची कन्या, व दुसऱ्या दोघी, या राजाचा मांडलिक, श्रीरंगपट्टण येथील राजा, याच्या मुली आहेत. तरुणपणीं गादीवर येण्यापूर्वीं, त्यानें एक राख ठेवली होती. तिनें, त्यावेळीं त्याच्याकडून, गादीवर बसल्यास लग्न करण्याचें वचन घेतलें होतें. त्याप्रमाणें तीही एक राणीच आहे. तिच्या प्रीत्यर्थ त्यानें हें नवें शहर वसविलें आहे--त्याचें नांव नागलापूर.

प्रत्येक राजपत्नीचा महाल पृथक् असून त्यांच्या तैनातीच्या दासदासी, नोकरचाकर, पाहारेवाल्या बायका, वगैरे वेगळाल्या आहेत. हे सारे नोकरचाकर बायकाच असतात. त्यांच्यावर महालांत पाहऱ्यावर व देखरेख करण्याला हिजडे नेमलेले आहेत. पुरुषांना राणीवशांत जाण्याची मनाई आहे. या राजस्त्रिया कधींही पुरुषांच्या दृष्टी पडत नाहींत. कधीं मधीं राजाच्या खास परवानगीनें त्याच्या कृपेंतला कोणी वृद्ध अधिकृत पुरुष त्यांच्याकडे गेला तर जातो. त्या पडदे लावून बंद केलेल्या पालख्यांमध्यें बसून बाहेर पडतात. तेव्हां-सुद्धां त्यांचें इतरांना दर्शन होत नाहीं. पालख्यां बरोबर सुमारें ४०० हिजडे पाहरेकरी असतात. त्या बाहेर निघतात तेव्हां सर्व लोकांना दूर व्हावें लागतें. प्रत्येक राणीकडे कितीतरी नगदी रकम, शिवाय सुवर्णाचे व जडावाचे बाजूबंद, कंकण, पैंजण, रत्नांचे व मोत्यांचे हार व इतर अलंकार, नित्य आणि विशेष प्रसंगीं वापरण्याचे दिलेले आहेत. एकेका राणीपाशीं सहा तरुण वरिष्ट दासी--सख्या--असतात. त्या प्रत्येकीचें सर्वांग हिरे, मोती, माणकें, इत्यादि रत्नांच्या बहुमोल आभरणांनीं जणों तुसतें मढविलेलें असतें. त्यांतील कांहीं जणी, आह्मी प्रत्यक्ष पाहिल्या. त्या कशा व कोठें, हें पुढें लिहिण्यांत येईलच. त्यांना पाहून आह्मी खरोखर आश्चर्यचकित झालों.

साऱ्या महालांत मिळून १२००० बायका आहेत ह्मणें. या बायकांमध्यें ढाल तरवारी बांधून त्या उपयोगांत आणणाऱ्या, दांडपट्टा खेळणाऱ्या, कुस्ती

लढणाऱ्या, तसेंच, तुताऱ्या, करणे, बासऱ्या, शिंगें, वगैरे वाद्यें वाजविणाऱ्या, व इतर इर तऱ्हेचीं कामें करणाऱ्याही बायका आहेत. इकडील वाद्यें आपल्याकडील वाद्यांपेक्षां निराळ्या तऱ्हेचीं आहेत. भोई व परीटही बायकाच आहेत. सारी व्यवस्था थेट राजाकडील व्यवस्थेप्रमाणेंच असते. इकडेही खासगी कडील नोकर व कामगार असतात. आपसांत चुरस लागून भांडणें होऊं नयेत म्हणून, तीन्हीं पट्टराण्यांकडे तैनाती माणसें व लवाजमा अगदीं सारखा आहे. तीघींचा-ही परस्पर चांगला मेळ, स्नेहभाव, व प्रेम आहे. त्या वेगळाल्या राहतात. यावरून या साऱ्या बायका व नोकरचाकर वगैरेंना राहण्याला किती थोरली जागा लागत असेल आणि त्या आवारामध्यें किती महाल, वाडे, चौक, रस्ते, गल्ल्या, वगैरे असतील याची सहज कल्पना होऊं शकते.

खुद्द राजा या महालांमध्येंच राहतो. त्याची राहण्याची जागा अगदीं स्वतंत्र आहे. कोणीही राणी जवळ असावी असें वाटेल तेव्हां तो हिजड्याच्या हातीं तिच्याकडे निरोप पाठवितो. तो हिजडा खुद्द राणीपर्यंत पोहोंचत नाहीं. तो तिच्या महालांत जाऊन पाहऱ्यावरील कुणबिणीला कळवितो. ती राजाकडून निरोप आल्याची आंत वर्दी देते. नंतर तिची श्रेष्ठ दासी–सखी–बाहेर येऊन विचारून घेते. इतकें झाल्यावर राणी राजा असेल तेथें पोहोंचते, किंवा स्वतः राजाच तिच्या महालांत येऊन वाटेल तितका वेळ तेथें राहतो. याबद्दल इतर कोणाला बातमी कळत नाहीं. कांहीं हिजडे राजाच्या विशेष मर्जींतले व भरंवशाचे आहेत. ते राजा निजतो तेव्हां पलंगाचा पाहारा देतात. त्यांना मुबलक पगार असतो.

हा राजा दररोज मोठ्या पाहांटे उठतो. तो पाऊणशेर तिळाचें तेल पितो. (हा कांहीं तरी गैरसमज असावा. तिळाचें तेल पिण्याची चाल असल्याचें इतर कोठे उपलब्ध नाहीं.) तो सर्वांगाला तेल माखवून, लंगोट बांधून, खूप भारी वजनदार खापराचे मुदगल फिरवितो, आणि घामाबरोबर सारें तेल निघून जाई तोंवर तरवारीचे व दांडपट्ट्याचे हात करितो. मग तो पदरच्या एखाद्या मल्लाबरोबर कुस्ती व कसरत करितो. हें झाल्यावर तो घोड्यावर बसून अरुणोदयापर्यंत सारखा फेर फटका करितो. त्याचा हा सारा व्यायाम सूर्योदयापूर्वीच पूरा होतो. नंतर तो स्नानगृहांत जातो. तेथें एक ब्राह्मण त्याला स्नान घालतो. त्या ब्राह्मणावर राजाची भारी विश्वास व मेहेरबानगी आहे. तो मोठा संपन्न आहे. (येथेंही कांहींसा गैरसमज दिसतो. स्नान इतर ब्राह्मण घालीत असतील व राजोपाध्ये किंवा राजगुरू स्नानाच्या वेळीं संकल्प सांगण्याला हजर रहात असतील.) स्नान करून तो राजवाड्यां-

तीज देवगृहामध्यें जातो. रीतीप्रमाणें नित्य नेम व पूजा पाठ उरकल्यावर तो एका मोकळया मंडपवजा बाराद्वारींत जातो. त्या बाराद्वारीच्या खांबांवर व छताला किनखाब मढविलेलें आहे. तेथें दोन फारच सुबक पुतळया आहेत. ( हल्लीं कौन्सिल हाल ह्मणून नांव दिलेली जागा कायम आहे तीच कदाचित ही असावी. ) या जागीं तो राजकार्यकुशल मंत्री, कारभारी व इतर कामगार यांच्या बरोबर राजकार्यामध्यें निमग्न राहतो. त्या वेळीं त्याच्या मर्जीतले लोक हजर असतील त्यांच्या बरोबर तो मधून मधून गमतीनें भाषण करीत असतो. या सर्व लोकांमध्यें 'तिम्मा अर्सा' नांवाच्या वृद्ध गृहस्थावर त्याची बहाल मर्जी आहे. ( हा कृष्णदेवरायाचा मुख्य महामंत्री 'साळुवा तिम्मा' होय. त्याला 'अर्स'–राजा–ही पदवी राजानेंच दिली असावी किंवा त्याच्यावरील राजाचा लोभ व विश्वास आणि त्याची योग्यता पाहून लोक त्याला 'तिम्मा अर्सा' किंवा 'तिम्मा राय' ह्मणूं लागले असतील. ) हाच राजाच्या अंतर खासगीवरील कुल मुख्त्यार आहे. दरबारचे सारे लहान मोठे सरदार व कामदार, खुद्द राजाप्रमाणेंच त्याच्याशीं भिऊन, आदबीनें व आदरानें वागतात. या लोकांशीं राजाचें यथारुचि भाषण आटपल्यावर, बाहेर देवडीवर वाट पहात असलेले राजपुरुष, मांडलिक व लहान मोठे सेनाध्यक्ष, यांना राजदर्शनाला येण्याची आज्ञा व परवानगी होते. तसे ते एकदम आंत येऊन राजाला यथा प्रकार प्रणाम करितात, व दूर अंतरावर भिंतीशीं आदबशीर उभे राहतात. राजासमक्ष ते एकमेकाशीं बोलत नाहींत व विडापान खात नाहींत. हात अस्तन्यांमध्यें गुंडाळून–आदबीनें हात बांधल्यासारखे धरून—खालीं पहात चूप उभे असतात. त्यांतून कोणाशीं राजाला कांहीं बोलावयाचें असलें तर, तो दुसऱ्या एका माणसाला बोलतो. तो जाऊन त्या गृहस्थाला विचारितो. तेव्हांच तो मान वर करून तेवढ्या पुरतें उत्तर देतो, आणि पुनः खालीं पहात उभा राहतो. राजाकडून निरोप होई तों सर्व जण असेच उभे असतात. निरोप होतांच ते सारे परतून राजापुढें येऊन प्रणाम करितात, व नंतर बाहेर निघून जातात. हा प्रणाम ह्मणजे अतिशय आदबीचा व आदराचा प्रकार आहे. दोन्ही हात जोडून, ते तसेच मस्तकावर उंच करून, हा प्रणाम करितात. हे सर्व लोक राजाला याप्रमाणें प्रणाम करण्याला दररोज जातात.

आह्मी इकडे आलों तेव्हां राजा नव्या शहरांत-होसपेटेंत-होता. 'ख्रिस्त-वाओ-डी फिग्यूरिडो' ( पोर्तुगीज सरकाराकडून गोव्याहून या राजाकडे धाडलेला वकील ) आह्मां साऱ्या पोर्तुगीज मंडळीला बरोबर घेऊन राजाच्या भेटीला गेले. त्यावेळीं

आह्मी आमच्या रिवाजाप्रमाणें, पण सुरेख व भपकेदार पोषाख केले होते. राजानें त्यांची चांगल्या तऱ्हेनें भेट घेतली. त्यांच्या भेटीमुळें राजाला जणों कोणी खाशा मंडळीच्या भेटीतुल्य आनंद झाला व त्यानें त्यांच्याविषयीं कळकळ व काळजी दाखविली. तसेंच त्यानें बरोबर गेलेल्या आह्मां मंडळीवरही अशीच मेहेरबानगी दाखविली. आह्मी राजाच्या अगदीं जवळ पोहोंचलों होतों. त्यानें आह्मा सर्वांशीं हाताला हात मिळविला. आह्माला कोठवर पाहूं न पाहूं असेंच जणों त्याला झालें होतें. नंतर 'ख्रिस्तवाओ डी फिग्यूरिडो' यानीं क्याप्टन-मेजर यांच्याकडून आणलेले खलीते व नजर नजराणे पेश केले. ते पाहून राजाला फारच आनंद झाला. त्यांतही कांहीं बाजाच्या पेट्या व दुसऱ्या कांहीं वस्तू होत्या त्या पाहून तर त्याची मर्जी फारच प्रसन्न झाली. राजानें अंगांत पांढऱ्या कपड्याचा झगा घातला होता. त्याच्यावर जरीचें काम केलें होतें व कलाबत्तूचीं गुलाबाचीं फुलें काढलेलीं होतीं. त्या झग्याला गळपट्यावर पुष्कळच बिनमोल हिरे गुंफलेले होते. त्याच्या डोक्यावर शिरस्त्राणवजा जरतारी टोपी होती. तिच्यावरून फारच तलम व सुरेख रेशमी कापडाचा पटका गुंडाळलेला होता. त्याचे पाय उघडेच होते. राजा जवळ कोणीही जोडे घालून जात नाहीं. इकडे बहुतेक सारेच लोक नेहमी सर्वत्र अनवाणीच फिरतात. इकडील जोडे प्राचीन तऱ्हेप्रमाणें अणकोचीदार असतात. कांहीं तऱ्हेच्या जोड्यांना नुसता तळवा असतो. तो पायाखालीं राहावा ह्मणून त्याला चामड्याच्या पट्ट्या लावलेल्या असतात. इटाली देशांतून आलेले प्राचीन लेख, चित्रे व मूर्ती यांच्यामध्यें, प्राचीन रोमन लोकांच्या जोड्यांची तऱ्हा आपण पाहिलेली आहे. त्याच तऱ्हेचे हेही जोडे असतात. (त्या अर्थातच चपल्या किंवा वाहणा होत. हल्लीं सुद्धां तिकडे त्याच प्रचारांत आहेत.)

'ख्रिस्तवाओ डी फिग्यूरिडो'ना निरोप देतेवेळीं राजानें त्याना बहुमानाचा पोषाख दिला. त्यांत एक भरगच्ची झगा व स्वतःच्या टोपीसारखी टोपी होती. इतर सर्व पोर्तुगीज लोकांनाहीं चांगलें नक्षीदार जरीचें काम केलेला एकेक कपडा (बहुधा जरीकांठी दुशाला) दिला.

या दरबारामध्यें स्नेहाचें, प्रेमाचें व बहुमानाचें लक्षण समजून याप्रमाणें कपडे देण्याचा रिवाज आहे.

'ख्रिस्तवाओ' यांना निरोप झाल्यावर आह्मी विजयनगराला आलों. तें मध्या शहरापासून एक कोसावर आहे. आह्माला तेथें कांहीं चांगल्या वाड्यांमध्यें उतरविण्याबद्दल राजानें आज्ञा केला होती. 'फिग्यूरिडो'कडे पुष्कळ

सरदार, मांडलिक व कामगार लोक भेटीला आले. राजाकडूनही बरीच मंडळी भेटून गेली. पुष्कळशीं बकरीं, कोंबडीं, व मध आणि लोणी यांनीं भरलेले घडे, व इतर तऱ्हे तऱ्हेचे खाण्याचे पदार्थ, राजानें 'खिस्तवाओ' कडे पाठविले. ते त्यांनीं तसेच बरोबरचे शिपायीप्यादे वगैरे लोकांना वांटून टाकले. राजानें त्याच्याशीं मोठ्या प्रेमानें भाषण केलें व आमच्या पोर्तुगालच्या राजाचा दरबारी थाट व रीत रिवाज, यांविषयीं चौकशी केली. त्याविषयीं तपशीवार माहिती सांगितलेली ऐकून तो खुष व प्रसन्न झालासें दिसलें.

नव्या शहरापासून विजयनगरापर्यंत एक भला रुंद राजमार्ग केलेला आहे. त्याच्या दुतर्फा घरें व दुकानें सारखीं लागलेलीं आहेत. या दुकानांत हर तऱ्हेचा माल मिळतो. रस्त्यांत चालणाऱ्यांना सांवली असावी ह्मणून, राजाच्या हुकुमानें या रस्त्याच्या दुतर्फा सारखीं झाडें लाविलीं आहेत. या रस्त्यावरच त्यानें एक भलें मोठें व भव्य, चिरेबंदी देवालय बांधविलें आहे. ( होसपेठेहून कामलापुराला जातांना रेलवेच्या सडकेपासून थोड्या अंतरावर मुख्य रस्त्यावर हल्लीं एक जुनें व पडकेंसें अनंतशयनाचें ह्मणून देवालय दिसतें, तेंच हें असावें. या इमारतीचें काम भारी मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचें छत कलमदानी कमानदार आहे. पण त्याच्यांत विशेष कुसर किंवा शिल्पचातुर्य दिसत नाहीं. )

मांडलिक राजे, सरदार, व सेनाध्यक्ष यांनींही या रस्त्यावर लहान मोठीं देवळें बांधविलीं आहेत. खास राजधानीचा मुख्य कोट व वेशीपर्यंत पोहों-चण्यापूर्वी अगदीं प्रारंभीं सर्वांच्या बाहेरचा भला मोठा चिरेबंदी कोट लागतो. त्याच्यांतील मुख्य वेशींतूनच शहरांत जावें लागतें. हा कोट हल्लीं जागजागीं थोडासा नादुरुस्त झालेला आहे. त्याच्यांत ठिकठिकाणीं लहान लहान चौबुर्ज्या, दुर्गम बुरूज व आश्रयाच्या व बचावाच्या जागा पुष्कळचशा केलेल्या आहेत. त्यांच्याच बाहेरच्या अंगाला बचावासाठीं आणखीही एक तजवीज केलेली आहे. मोठमोठे अणकोचीदार व छाती इतके उंच दगडाचे सुळके वांव दीड वांव रुंद व तितक्याच फासल्यानें जमीनींत पक्के उभे केलेले आहेत. मैदानांतून पुढें हा कोट सारखा दोन्ही बाजूंच्या पहाड्यांपर्यंत नेऊन मिळविला आहे. या कोटापासून शहराचा आंतील भाग बराच दूर आहे. मध्यंतरीच्या जमीनींत भातगद्दे व बागबगीचे आहेत. त्यांना दोन तलावांपासून पाणी मिळतें. या भागांत पाणी विपुल आहे. तें सर्वांत बाहेरच्या मुख्य कोटापलीकडून आंत आणिलें आहे. तलावामध्येंही नाले व झरे असल्यानें विपुल पाणी राहतें. या भागांतही बरेच बागबगीचे, ताडवनें आणि घरें आहेत.

शहराच्या मुख्य व पहिल्या दरवाजाजवळ येतांना एक जलाशय लागतो. त्याच्या पुढें तट आहे. तो चिरेबंदी व मजबूत आहे. दरवाजापुढेंच तटामध्यें एक वांकण केलेलें असून, त्याच्या दोन्ही बाजूला दोन बुरूज बांधून त्याची मजबूती केलेली आहे. मुख्य वेशीचा दरवाजा चांगला व मोठा असून त्याचें बांधकाम सुबक व प्रेक्षणीय आहे. वेशीच्या आंत जवळच दोन देवालयें लागतात. त्यांतील एकाभोंवतीं लहानसा कोट असून, त्या आवारांत बरींच झाडें आहेत. दुसऱ्या देवळाच्या आसपास इमारती आहेत. पहिला कोट साऱ्या शहराभोंवतीं आहे. त्याच्या आंत आणखी एक कोट व दरवाजा लागतो. तोही सर्व शहरासभोंवार आहे. त्या दरवाजापासून राजवाड्यापर्यंत सारखे सरळ राजमार्ग आहेत. त्यांच्या दुतर्फा वाडे व घरें बांधलेलीं आहेत. तीं सेनाध्यक्ष, व इतर सरकारी कामगार आणि सुखवस्तू, संपन्न व संभावित लोक यांचीं आहेत. पुष्कळशा वाड्यांमध्यें चांगली सुरेख नक्षी व चित्रकारी केलेली आहे. मुख्य राजमार्गानें पुढें गेलें म्हणजे एक मोठा दरवाजा लागतो. त्याच्या आंत राजवाड्यापुढील मोठें व भव्य पटांगण लागतें. समोरच दुसरा मोठा दरवाजा आहे. त्यांतून शहराच्या पलीकडच्या भागाला रस्ता जातो. हें पटांगण शहराच्या मध्यभागीं असल्यानें शहराच्या निरनिराळ्या भागांत जाणाऱ्या व येणाऱ्या सर्व गाड्या, घोडे, सामान नेआण करणारे छकडे इत्यादि त्याच्यांतूनच जातात येतात. यामुळें तें मैदान फारच सोईवार व उपयोगी आहे.

राजवाड्याच्या सभोंवारही चांगला मजबूत तट बांधलेला आहे. त्याचा प्राकार, व विस्तार आपल्या लिस्बनच्या राजवाडा असलेल्या किल्ल्याहून अधिक आहे.

येथून पुढें गेल्यावर दुसऱ्या महाद्वारापाशीं बाहेरच्या बाजूला लागूनच दोहीकडे दोन देवालयें लागतात. त्यांतील एकाच्या दाराशीं रोज पुष्कळशीं बकरीं मारलीं जातात. बाजारांत मांस विक्रीसाठीं, किंवा शहरांतील हिंदू लोकांच्या उपयोगासाठीं बकरीं मारलीं जातात तीं याच ठिकाणीं. दुसऱ्या कोठेंही तीं कांपीत नाहींत. तीं या देवळांतील देवतेला बळी दिलीं जातात. त्यांचें रक्त व शिर-मुंडी-देवाला वाहतात. प्रत्येक बकऱ्यामागें एकेक चक्र-सुमारें पाव आणा-दक्षिणा द्यावी लागते. प्रत्येक शेळी, बोकड, किंवा बकरें, कांपलें जातांच देवाचा पुजारी हजर असतो तो बळी अर्पण झाल्याचें द्योतक

ह्मणून एकवार शिंग वाजवितो. या देवळाजवळच एक रथ आहे. त्याच्यावर सुरेख चित्रें, मूर्ती व नक्षी कोरलेली आहे. तो रथ प्रतिवर्षी उत्सवामध्यें शहरांतील मोठमोठ्या रस्त्यांतून एकवार समारंभानें मिरवत ओढून नेतात. तो फार मोठा असल्यानें कोपऱ्यावरून वळवितां येत नाहीं.

येथून पुढें एक राजमार्ग लागतो. तो पुष्कळच प्रशस्त व रुंद आहे. त्याच्यामध्यें जागजागीं आडवे रस्ते आलेले आहेत. त्यांच्या दुतर्फांही चांगले सुरेख व भव्य वाडे व घरें आहेत. तीं पुष्कळच खर्च करण्याला समर्थ, अशा धनाढ्य व संपन्न लोकांचींच आहेत, हें निराळें सांगणें नकोच. या रस्त्यावर अनेक व्यापारी, सावकार व सौदागर, राहतात. त्यांच्या दुकानांत मोती, हिरे, माणकें, पाच वगैरे जवाहिर व तऱ्हेतऱ्हेचें कापड तसेंच साऱ्या दुनियेंतील हवा तो माल मिळतो. दर रोज सायंकाळीं बाजार लागतो. त्याच्यांत लहान मोठे घोडे, तट्टू, स्वारीचे घोडे, घोड्या वगैरे विक्रीला येतात. संत्रे, लिंबें, नारिंगें, द्राक्षें, वगैरे हरतऱ्हेची फळफळावळ व बागायती जिन्नस, आणि जळाऊ लांकूडही येतें. सर्व माल रस्त्याच्या बाजूलाच विक्रीसाठीं ठेवलेला असतो. या रस्त्याच्या दुसऱ्या टोंकाला, असाच एक पक्का कोट असून त्याच्यांत दरवाजा आहे. तो कोट पहिल्या दरवाजाजवळच्या कोटाला मिळाला आहे. राजवाड्यासह या कोटाला एका भोंवतीं एक असे तीन कोट आहेत. या दरवाजा बाहेर पडल्यावर जो रस्ता लागतो त्याच्यामध्यें कारागीर लोकांची वस्ती व दुकानें आहेत. तेथें ते लोक तऱ्हेतऱ्हेचे कलाकुसरीचे जिन्नस तयार करून विकतात. या बाजारामध्येंही दोन लहानशीं मंदिरें आहेत. अशीं मंदिरें प्रत्येक बाजारामध्यें बांधलेलीं असतात. तीं आपल्याकडील कारागीर व व्यापारी लोक यांच्या पंचायती जागे सारखीं असतात. महत्वाचीं व मोठीं मंदिरें शहराबाहेर आहेत. 'खिस्तवाओ डी फिग्यूरिडो' यांचें बिऱ्हाड याच बाजारामध्यें होतें. येथें दर शुक्रवारीं बाजार भरतो. त्यांत पुष्कळशीं डुकरें, कोंबडीं, वाळविलेले व खारे मासे, व इकडे पैदा होणारे, पण आम्हाला अविश्रुत असे कितीतरी पदार्थ विक्रीला येतात. साऱ्या शहरांत दर रोज कोठेंना कोठें कोणच्यातरी रस्त्यावर बाजार भरतच असतो.

या रस्त्याच्या अगदीं टोंकाला व शहराच्या जणों अगदीं बाहेर मूर-मुसलमान-लोकांचा मोहल्ला आहे. या लोकांमध्यें पुष्कळचसे एतद्देशी मुसलमान आहेत. ते राजाच्या पदरीं नोकर आहेत. त्यांना राजानें आपल्या जवळच्या खास पाहारेवाल्यांमध्यें भरती केलेलें आहे. या शहरामध्यें हर

तऱ्हेचा व्यापार भारी मोठा चालतो. त्यांतही विशेषतः हिरे व जवाहीर यांचा, या मुळें येथें नानादेशचे लोक आलेले पाहण्यांत येतात.

या शहराचा विस्तार व आकार यांविषयीं मीं पक्केपणीं लिहूं शकत नाहीं, कारण सारें शहर एकदम एकाच जागेवरून पाहण्याला मिळत नाहीं. तरी पण मी बुद्धयां एका टेकडीवर चढून पाहिलें. तेथून शहराचा पुष्कळचसा भाग दिसत होता. बऱ्याचशा पहाड्यांमध्यें मिळून हें शहर वसलेलें आहे. यामुळें तेथून सारें शहर दिसत नव्हतें. तरी जेवढा भाग दिसत होता, तो माझ्या दृष्टीला फारच सुरेख व प्रेक्षणीय वाटला. त्याचा विस्तार रोम शहरा-इतका खचित असावा. त्याच्यामध्यें पुष्कळसे बागबगीचे आणि आमराया आहेत. शिवाय लहान मोठ्या वाड्यांच्या जवळपासही बगीचे आहेत. मधून मधून पाण्याचे लहान मोठे पाट वाहतात. त्यांतच कांहीं टांकीं व पुष्करण्याही आहेत. राजाच्या महालाजवळच एक ताडवन आणि खासबाग आहेत. त्यांतील झाडें फळांफुलांनीं लादलेलीं दिसत होतीं. मुसलमानी मोहल्ल्याच्या लगत खालच्या अंगाला लहानसा ओढा आहे. तिकडेही बागबगीचे आहेत. त्यांच्यांत मुख्यतः आंबा, फणस, सुपारी, तसेंच लिंबें, नारिंगें, वगैरेचीं फळझाडें इतकीं दाट लागलेलीं आहेत कीं, तो सारा भाग गर्द जंगलासारखा दिसतो. त्यांतच पांढऱ्या द्राक्षाचे वेलही आहेत. शहरांत पाणी खेळविलेलें आहे. तें शहराच्या अगदीं बाहेरच्या कोटालगतच्या दोन्हीं तलावांतूनच येतें.

या शहरांत अगणित लोकवस्ती आहे. तिची संख्या मी दिलेली खरी सुद्धां वाटणार नाहीं. ह्मणून तिच्याबद्दल कांहींच लिहीत नाहीं. पण मी इतकें खात्रीनें सांगूं शकतों कीं, तेथील गल्लोगल्लींत व रस्तोरस्त्यांत हमेशा इतकी कांहीं माणसांची गर्दी व हत्तींची भीड राहते कीं, कशीही स्वार शिपायांची मोठी फौज आली तरी, तिला त्यांच्यांतून झटपट मार्ग काढून जातां येणें शक्य होणार नाहीं.

सामानसुमान व धान्यसामग्री यांनीं गच्च भरलेलें असें दुसरें कोणचेंही शहर साऱ्या दुनियेंत नाहीं. तांदूळ, गहू, कडधान्य, व मका वगैरेचा येथें भरपूर सांठा आहे. तसेंच जव, पावटे, मूग, तुरी, हरबरे, मसूर, कुळथी, इत्यादि इकडील लोकांच्या नेहमीं खाण्यांत येणाऱ्या धान्यांचा सांठाही विपुल असून त्यांची धारणही स्वस्त असते. मुसलमान लोकच बहुशा गहू खातात. इतर लोकांमध्यें ते खाण्याचा रिवाज नाहीं.

मी वर्णन केलेल्या गोष्टी इच्छ्या तेव्हां कोणालाही पडताळतां येण्यासारख्या आहेत. येथील बाजार व रस्ते नेहमीं असंख्य लादलेल्या बैलांनीं गजबजलेले असतात. त्यांच्यामधून वाटसुद्धां मोठ्या अडचणीनेंच मिळते. केव्हां केव्हांतर ते एखाद्या रस्त्यांतून सारे पार होईतों वाट पाहावी, किंवा तो रस्ता सोडून दुसऱ्या रस्त्यानें जावें, या वांचून गत्यंतर रहात नाहीं. इकडे कोंबडीं पुष्कळ पैदा होतात. तीं शहरांत सुमारें दीड आण्याला तीन आणि शहरा बाहेर चार चार मिळतात. ( येथें दिलेल्या नाण्याच्या किंमतीमध्यें कांहीं फरक असावा असें दिसतें. मूळांत इकडील नाण्याचें नांव 'फावाअ' आणि पोर्चुगीज नाण्याचें नांव 'व्हिटेम' दिलेलें आहे. हें नाणें इंग्रजी १$\frac{७}{२०}$ पेनी ह्मणजे सुमारें एक आणा चार पै बरोबर होतें. कोंबडीं कितीही स्वस्तीं झालीं तरी सहा पैला एक मिळणें अशक्य वाटतें. ) इकडे तीतर ही पुष्कळ मिळतात. पण ते आपल्याकडच्या सारखे नसून इटाली देशांतील 'इस्टानीस' पक्ष्याप्रमाणें असतात. त्यांच्या तीन तऱ्हा असतात. एका तऱ्हेच्या तितरांना पोर्चुगालच्या तितरांप्रमाणें पायांना लहान लहान खूर-मेंत्ररेज-असतात. तेच दुसऱ्या तऱ्हेंत दोन्ही पायांवर चांगले मोठे व नोकदार आणि बोटभर जाड व लांब असतात. तिसरी तऱ्हा चित्रविचित्र वर्णाची असते. या तिसऱ्या जातीचाच बाजारांत खूप भरणा असतो. लवे, जंगली कोंबडें, पाणकोंबडें, बदकें वगैरे वन पक्षी आणि ससे यांची तर गिणतीच नसते. ही सर्व शिकार जिवंतच विकायास आणितात. ती भारीच स्वस्ती मिळते. सुमारें दीड आण्याला सहा किंवा आठ तीतर व एक किंवा कधीं कधीं दोन ससे मिळतात. पारवे, खबूतरें, तऱ्हे तऱ्हेच्या चिमण्या इत्यादि तर गिऱ्हाइकांला गिणती करण्यालासुद्धां कंटाळा येईल, इतक्या स्वस्त मिळतात. पारवे दोन तऱ्हेचे असतात. कांहीं आपल्याकडच्या प्रमाणें मोठे आणि दुसरे त्यांहून बरेच लहान. ते दीड आण्याला बारा चौदा मिळतात. खबूतरांनाही इतकीच किंमत पडते. दर रोज बकरीं कापलीं जातात त्यांची गणती होणेंसुद्धां अशक्य आहे. रस्तोरस्तीं बकऱ्यांचें मांस हवें तितकें विकण्याला टांगलेलें, फारच चांगलें व स्वच्छ असतें. तें आपल्याकडील डुकराच्या मांसासारखें दिसतें. कांहीं खाटकांकडे डुकरेंही विकीला असतात. त्यांच्या मांसाइतकें स्वच्छ व तुळतुळीत मांस, इतरत्र क्वचितच सांपडेल. एका डुकराला चार किंवा पांच 'फानम'-सुमारें सहा सात आणे पडतात. ओझ्यांचीं ओझीं लिंबें दररोज येतात. त्यांच्यापुढें आपल्या लिस्बन शहराजवळच्या 'पोव्हास' गांवचीं लिंबें कांहीं माल नाहींत. आंबट व गोड संत्रीं आणि रानवांगीं व इतर फळभाजी,

इत्यादिकांचा भरणा पाहून पहाणारा थक्क होऊन जातो. खाण्यापीण्याच्या जिनसांचा पुरवठा व सांठा यांच्या बाबतींत इतर शहराप्रमाणें येथें तोटा पडण्याचा मुळींच संभव नाहीं, हा या शहरांमध्यें एक विशेष आहे. सर्व जिनस विपुल व सवंग मिळतो. दूध, दही, लोणी, तूप, तेल, यांचा दररोज केवढातरी खप होतो. तोही या स्थळीं लिहिणें विसरतां कामा नये. या शहराइतक्या काळजानें बाळगलेल्या गाई म्हशी इतर कोठें क्वचितच असतील. इकडे डाळिंबें विपुल होतात. तीं एका फानमाला दहा दहा मिळतात. तसेंच द्राक्षाचे घड एका फानमाला तीन तीन विकत मिळतात.

या शहराच्या उत्तर बाजूला एक मोठी नदी वाहते. तिच्या अथांग पाण्यांत मासे विपुल सांपडतात. पण ते खाण्याला चांगले नसतात. दुसऱ्या बऱ्याच लहान सहान नद्या मिळाल्यामुळेंच ही नदी इतकी मोठी झाली आहे. ( ही नदी तुंगभद्रा. त्यावेळीं तिच्यांत अधिक पाणी रहात असेल. हल्लीं तें म्हणण्यासारखें असत नाहीं. ) या नदीच्या कांठीं पुष्कळशा इमारती आहेत. ‘सेनागुंडियम’ अनागुंदी शहर इच्याच कांठीं आहे. तेंच प्रारंभीं या राज्याची राजधानी होतें. पण हल्लीं तेथें थोडी वस्ती आहे. ( हें हल्लीं एक लहानसें गांव आहे, तें व त्याच्या जवळपासचे कांहीं गांव, अद्यापि विजयनगरच्या राजघराण्यांतील पुरुषांकडे जाहगीर चालत आहेत.) त्याच्या भोंवतीं ही मजबूत तटबंदी आहे. ते दोन पहाडाच्या रांगांमध्यें वसलेलें आहे. त्या रांगांच्या दोन्हीं टोकांलाच काय त्या दोन वाटा आहेत. तेथें एक राजाचा सेनाध्यक्ष राहतो. तिकडे जाण्याला टोकऱ्यांतून नदी उतरून जावें लागतें. हे टोकरे वेताचे किंवा वेळूचे असून त्यांना बाहेरून चामडें मढविलेलें असतें. प्रत्येक टोकऱ्यामध्यें पंधरा वीस माणसें बसतात. कधीं कधीं घोडे व बैल ही त्यांतून पार उतरवितात. पण जनावरें बहुतेक पोहूनच पार नेतात. हे टोकरे एका तऱ्हेच्या वल्ह्यानें आंबिये लोक वल्हवीत नेतात. ते इतर नावांसारखे सरळ जात नाहींत. या राज्यांत नदी उतरण्याला नावांच्या ऐवजीं सर्वत्र यांचाच उपयोग करितात. ( विठ्ठल स्वामीच्या देवळाजवळच नदीच्या पात्रांत पुलाचे एकसांधी दगडी खांब उभे आहेत. ह्या पुलाचा उल्लेख आलेला नाहीं. यावरून तो या वेळीं बांधलेला नसावा. )

या शहरांत कांहीं जागीं जिवंत बकरीं विकतात. शहराच्या आसपास साऱ्या प्रदेशांत हजारों गायी, म्हशी, बकरीं, चरत असलेलीं पाहून मनाला किती तरी समाधान वाटतें. त्यांतच शेळ्या, मेंढ्या, कोंकरें, व करडें हीं असतात. कांहीं बोकड मोठाले असतात. त्यांच्यावर खोगीर घालतात व तोंडांत लगाम देतात. त्यांच्यावर व कांहीं मोठाल्या बकऱ्यां-एडक्यां-वर मुलें स्वारी करितात.

शहराच्या कोटाबाहेर उत्तरेकडे तीन मोठालीं मंदिरें आहेत. त्यांतील एक विठ्ठल स्वामींचें मंदिर, आनीगुंदीच्या समोरस, नदीच्या दक्षिण तीरावर आहे. दुसरें ' आउपराडियानार'चें-हंपी विरूपाक्षाचें-आहे. तें सर्वांत विशेप पूज्य व श्रेष्ठ मानतात. तेथें मोठमोठ्या यात्रा भरतात तेव्हां दूरदूरचे लोक दर्शनाला येतात. या देवळाच्या प्राकारांतील मुख्य मंदिरासमोर पूर्व बाजूला महाद्वार आहे. त्याच्या पुढें मोठा प्रशस्त, रुंद, आणि सुरेख बाजार व राजमार्ग आहे. त्याच्या दोन्ही बाजूला चांगलीं पक्कीं व सुंदर मकानें आहेत. त्यांना रस्त्यावर प्रशस्त व सुरेख ओऱ्या व पडव्या आहेत. त्यांत यात्रेकरू उतरतात. कांहीं घरांमध्यें सभ्य व संपन्न गृहस्थ राहण्याचीही सोयी आहेत. याच बाजारांत राजाचा महाल बांधलेला आहे. तेथें तो यात्रेच्या प्रसंगीं येऊन राहतो. या महाद्वारावर एक डाळिंबाचें झाड आहे. (येथें कांहीं तरी गैर समज झालेला आहे. मूळांतला शब्द नकल करणाऱ्याच्या चुकीनें भलताच लिहिला गेलेला दिसतो. महाद्वाराबाहेर हल्लीं एक मोठा वटवृक्ष आहे. तसाच तो कदाचित त्यावेळीं ही असेल. किंवा कदाचित एखादें मोठेंसें डाळिंबाचें झाडही असेल.) या महाद्वारावर फारच मोठा गोपूर बांधलेला आहे. त्याच्यावर चारी बाजूस तऱ्हेतऱ्हेच्या स्त्री पुरुषांच्या व स्वाऱ्या शिकाऱ्यांच्या चित्रांच्या अनेक रांगा आहेत. गोपूर निमुळता होत गेला आहे. त्याच मानानें हीं चित्रेंही लहान लहान केलेलीं आहेत. (हीं चित्रें वीट चुन्याचीं, वर चुने गची असून पौराणिक व्यक्ती व कथा यांचीं निदर्शक आहेत. मूळांत तीं चांगलीं प्रमाणशीर व सुरेख असावींत. पण हल्लीं तीं अगदी छिन्न भिन्न व जीर्ण झालेलीं आहेत. खुद्द गोपुराचें काम ही कांहीं जागीं चिराळले आहे.) या महाद्वाराच्या आंत मोठें थोरलें पटांगण आहे. त्याच्या पुढें असाच पण लहान गोपूर आहे. त्याच्या खालीं ही द्वार आहे. त्याच्या आंत गेल्यावर आणखी एक पटांगण लागतें. त्याच्या सभोंवार ओऱ्या बांधलेल्या आहेत. त्यांना सुरेख दगडी खांब दिलेले आहेत. मुख्य मंदिर याच पटांगणामध्यें आहे.

सभामंडपासमोर चार गरुडखांब उभे केलेले आहेत. त्यांपैकीं दोहोंवर सोन्याचा मुलामा दिलेला तांब्याचा पत्रा आहे. बाकी दोहोंवरील तांब्याच्या पत्र्यावरील मुलामा दिवसगतीमुळें उडालेला आहे. अगदीं मंडपाला लागून असलेला गरुडखांब किंवा ध्वजस्तंभ हल्लींच्या कृष्णदेवरायानें चढविलेला आहे. बाकीचे पूर्वींच्या रायांच्या वेळचे आहेत. मुख्य मंदिराच्या महाद्वारावर छतापर्यंत तांब्याचे पत्रे मढविलेले असून त्यांवर सोन्याचा मुलामा केलेला आहे. दरवाजावर छताला लागून दोन्हीं बाजूंस वाघसे कोरलेले दिसतात. त्यांच्यावर ही मुलामा आहे. (हीं भद्र मुखें असावींत.) या मंडपांत व मंदिरांतील

सर्व खांबांवर लहान लहान कोनाडे कोरलेले आहेत. त्यांत रोज रात्रीं दिवे लागतात. हे दिवे सुमारें ३,००० वर आहेत ह्मणे. त्याच्या पलीकडे गर्भ गृहांत मुख्य देव आहे. त्याचेंच पूजन होतें.

मुख्य देवाच्या मूर्तीपर्यंत पोहोंचण्याला तीन दरवाजे वलांडून जावें लागतें. गर्भ गृहावर घुमट आहे. त्याच्यांत बाहेरून उजेड येण्याची मुळींच तजवीज नाहीं. आंत मेणबत्तीच्या दिव्यांचाच कायतो उजेड असतो. ( मेणबत्तीचा उल्लेख केलेला आहे. त्या मेणबत्या खऱ्या मेणाच्या असाव्यात. अलीकडे त्या चरबीच्या करितात. त्या देवळांत वापरल्या जाण्याचा संभव कमी दिसतो. ) पहिल्याच दारावर पाहरेकरी असतात. ते पुजारी ब्राह्मणांशिवाय इतरांना आंत जाऊं देत नाहींत. पण मीं त्यांना कांहीं चिरीमिरी दिली. त्यामुळें त्यांनीं मला आंत जाऊं दिलें. ( हें कांहींसें विलक्षण दिसतें. हिंदू सम्राटाच्या ऐन भरभराटीच्या अमलांत अशा प्रसिद्ध देवालयांत असा फिरंग्याचा चोरूनच कां होईना-प्रवेश झाला, हें आश्चर्यकारक आहे. हल्लीं तेथें ब्राह्मणेतरांना जाऊं देत नाहींत, आणि ब्राह्मणांनाही ठरल्या वेळे शिवाय देव दर्शन घडत नाहीं. अलीकडचा जास्त कडक बंदोबस्त कदाचित मुसलमानांच्या धामधुमीनंतरचा असेल. ) दरवाजाच्या आंत देवतांच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. मुख्य देव नुसता एक गोल दगड आहे. त्याला हे लोक फार पूज्य व पवित्र मानतात. मंदिराच्या बाहेरच्या बाजूला तांब्याचा पत्रा मढवून त्याच्यावर सोन्याचा मुलामा केलेला आहे. ( हल्लीं काशीविश्वेश्वराच्या मंदिरावर व अमृतसर येथील मुख्य गुरुद्वाऱ्यावर याप्रमाणें मुलामा केलेला आढळतो. ) देवळामागें बाहेरच्या ओऱ्यांजवळ एक संगमरवरी षड्भुजा मूर्ती आहे. तिच्या एका हातांत..., दुसऱ्यांत खड्ग व बाकीच्यामध्यें इतर आयुधें आहेत. तिच्या पायाशीं एक महिष आहे. त्याला मारण्याला आणखी एक प्राणी प्रयत्नसा करीत आहे. ( ही अष्टभुजा देवीची मूर्ती. सहाच हात दिले आहेत, त्या वरून आणखी दोन हात या गृहस्थाच्या नजरेस पडले नसावेत. दुसरा प्राणी ह्मटला आहे तो अर्थातच देवीचें वाहन सिंह. पहिल्या हातांतील आयुधाचें नांव मूळांतच देण्याचें राहिलें आहे. )

या देवालयांत एक तुपाचा नंदादीप सारखा जळत असतो. मुख्य मंदिराच्या सभोंवार लहान लहान मंदिरें व कोठड्या आहेत. तेथें पूजापाठ चालू असतात. ( येथें एकच तुपाचा नंदादीप लिहिला आहे. त्या वेळेची स्थिती पाहतां हें थोडें चमत्कारिक दिसतें. हल्लीं तेथें ५।७ नंदादीप सारखे जळत असतात. )

दुसरीं मंदिरें याच तऱ्हेवर बांधलेलीं आहेत. पण त्या सर्वांमध्यें हेंच मुख्य व प्राचीन आहे. त्यांच्या आसपास व त्यांना लागून पुष्कळ इमारती

व घरें आहेत. जवळच्या बगीच्यांत पुष्कळशीं झाडें लागलेलीं आहेत. त्या बागेंत भाजीपाला व फुलें तुळशी, पैदा होतात. तीं पुजारी लोक उपयोगांत आणितात. देवालयापुढें मोठमोठे रथ आहेत. मंदिरांतील मुख्य देवाचा प्रतिवर्षी उत्सव होतो, तेव्हां त्याच्या मूर्ती या रथांत बसवून बाजारामध्यें मोठ्याच समारंभानें मिरवितात. रथापुढें कळवंतिणी गात नाचत व नानातऱ्हेचीं वाद्यें वाजवीत चालत असतात. मला तो रथोत्सव पाहण्याला सांपडला नाहीं, सबब तो कसा काय होतो त्याबद्दल कांहीं लिहितां येत नाहीं. या स्थळीं दुसरीही पुष्कळशीं मंदिरें आहेत, पण येथें त्यांच्या विषयीं लिहीत राहिलों तर व्यर्थ विस्तार होईल.

आमच्या प्रमाणेंच या मूर्तीपूजक लोकांमध्यें विवक्षित दिवशीं निरनिराळे महोत्सव होत असतात. त्यांच्यामध्यें उपवासाचेही दिवस ठरलेले आहेत. त्या दिवशीं ते दिवसा कांहीं खात नाहींत. मध्यरात्रीं भोजन करितात. मुख्य महोत्सवाच्या दिवसांत राजा नव्या शहरांतून राजधानींत-विजयनगरांत-येऊन राहतो. सर्व उत्सव समारंभ राजधानींतच होण्याचा प्रघात आहे. या प्रसंगीं साऱ्या राज्यांतील कळवंतिणी, तसेंच सर्व मांडलिक राजे, सरदार, मानकरी व मोठमोठे कामदार यांना आमंत्रण असतें. त्याप्रमाणें ते सर्व लवाजम्यानिशीं हजर होतात. राज्याच्या सरहद्दीवर, दूरदेशीं किंवा मोहिमेवर गेलेले सरदार व सेनाध्यक्ष, तसेंच ओरीसाचें राज्य व आदिलशाही अंमल यांच्या तोंडावर परचक्रापासून हिफाजत राहण्यासाठीं मुकरर केलेली फौज व सरदार, हे अर्थातच या प्रसंगीं येऊं शकत नाहींत. पण त्यांच्या तर्फे त्यांचे वकील व मुतालीक हजर असतात. हा-महानवमीचा-नवरात्राचा-महोत्सव सप्टेंबरांत सुरू होतो. मी तेथें असतांना तो तारीख १२ सप्टेंबर रोजीं सुरू झाला होता. तो ९ दिवस चालतो. तो सर्व राजवाड्यांतच होतो.

या राजवाड्याचा मुख्य दरवाजा पूर्वीच वर्णन केलेल्या मोठ्या पटांगणाच्या एका बाजूला आहे. त्याच्यावरही बराच उंच गोपुर आहे. त्याच्याही बाजूला ओसाऱ्या व दलानें आहेत. राजवाड्या भोंवतालच्या कोटांमध्यें हा दरवाजा आहे. त्याच्यावर पुष्कळसे पाहरेवाले लोक आहेत त्यांच्या हातीं चामड्याचे चाबूक व सोटे असतात. लष्करी अंमलदार व इतर मुख्य मुख्य कामगार, सरदार आणि त्यांच्या नायकाचा विशेष हुकूम असेल तितक्यांनाच ते पाहरेवाले आंत जाऊं देतात. या दरवाजाच्या आंतल्या बाजूलाही एक मोठा चौक आहे. त्या चौकापलीकडे दुसरा दरवाजा आहे. त्याच्यावरही

पाहरे चौक्या आहेत. त्याच्या पलीकडे पुनः मैदानसें आहे. व त्याच्या बाजूला ओसाऱ्या व दलानें आहेत. तेथें फौजेचे अधिकारी व प्रमुख लोक समारंभ पाहण्यास बसतात. याच्या डाव्या बाजूला उत्तरेकडे एक मोठी थोरली एकमजली इमारत आहे. बाकीच्या साऱ्या इमारतीही एकमजलीच आहेत. या इमारतीला पुढच्या बाजूला हत्तीच्या आकाराचे खांब आहेत. त्यां-यावर दुसरींही चित्रें कोरलेलीं आहेत. ते पुढच्या बाजूला सुरेख आहेत. त्याच्यावर चढून जाण्याला एक भला थोरला चिरेबंदी जिना आहे. त्याच्या खालच्या अंगाला चोहींकडे ओऱ्याशा बांधलेल्या आहेत व फरसबंदी केलेली आहे. तेथेंही पुष्कळसे लोक महोत्सव पाहण्याला बसतात. या राजवाड्याला विजयमहाल ह्मणतात. कृष्णदेवरायानें ओरीसाच्या राजावर विजय मिळवून परत आल्यावर तो बांधविला. या मैदानाच्या उजव्या बाजूला निरुंद व उंचच उंच मचाणें बांधलेलीं आहेत. तीं तटाच्याहीवर उंच दिसत होतीं. त्यांच्यावर हिरवी व लाल मखमल मढवून व तऱ्हेतऱ्हेच्या कापडानें खालीं वर सारखी शृंगारून शोभा आणलेली होती. हें कापड सुताचें असून फारच तलम होतें. इकडे लोकरी कापड होत नाहीं. हीं उत्सवापुरतीं तयार केलेलीं मचाणें अकरा होतीं. दरवाजाला लागून दोन गोल व आगाशीदार आवारांमध्यें साऱ्या नायकिणी उत्तमोत्तम पोशाख व सोन्या मोत्या जवाहिराचे अलंकार यांनीं खूपच सजलेल्या जमल्या होत्या. पटांगणापुढें पूर्व बाजूला मुख्य दरवाजासमोर मध्यभागीं विजयमहाला सारख्याच आणखी दोन इमारती आहेत. त्यांच्यावर जाण्यालाही सुरेख घोटीव दगडाचे व नक्षीदार कामाचे दोन दोन जिने, एक मध्यभागीं व दुसरा शेवटाला, असे बांधलेले आहेत. या इमारतींचे सर्व खांब, भिंती व छतें सुरेख कापडानें मढविलेलीं होतीं व त्या कापडावर किनखापा सारखी जरतारी वेलबुटीदार नक्षी काढलेली होती. या इमारतींचे एकावर एक दुहेरी चवुत्रे आहेत. त्यांच्या बाजूचें कोरीव काम फारच सुबक आहे. या चौथ्यावर राजाच्या मर्जीतल्या लोकांचीं मुलें लेकरें व कधीं कधीं त्याच्या पदरचे हिजडे लोक उत्सव पाहण्याला येऊन उभे राहतात. यांतील वरच्या चवुऱ्यावर राजाच्या जवळच 'खिस्तवाओ-डी फिग्यूरिडो' यांना बसविलें होतें. आह्मी सारे त्यांच्या बरोबर गेलों होतों. आह्मालाही तेथेंच जागा दिली गेली होती. त्यांना व आह्माला सारा समारंभ नीट दिसे अशा जागीं बसविण्याबद्दल राजानें मुद्दयां हुकूम दिला होता.

राजवाड्यांतील सर्व रस्त्यांचें वर्णन आतांच केलेलें बरें, नाहीं तर तें विस्मरणानें राहून जाईल. राजा राहण्याचा मुख्य महाल राजवाड्याच्या आवा-

रांतच आहे. तसेंच त्याच्या बारा राण्या व दुसऱ्या १२००० स्त्रियां राह-ण्याच्या पृथक पृथक जागा व महालही त्यांतच आहेत. त्यांना जाण्याचे रस्ते निरनिराळे आहेत. विजयमहाल व हे दुसरे महाल यांच्या भोंवतालच्या भावागांमध्यें, मध्यंतरी एक दरवाजा आहे. आंतल्या बाजूस एकंदर ३४ रस्ते आहेत.

विजयमहालामध्यें एक कापडी मंडप बनविलेला आहे. त्याचें द्वार बंद असतें. त्याच्यांत मुख्य देवाचें–उत्साह मूर्तीचें–स्थान तयार केलेलें असतें. मधल्या दालानांत, मुख्य जिन्या समोर, मध्यभागीं, एका उंचशा चबुऱ्यावर एक चौकोनी सिंहासन मांडलेलें आहे. त्याच्यावर गोल मेघडंबरी आहे. त्याच्या मध्यभागीं बसण्याच्या जागेसाठीं गोलसा खळगा केलेला आहे. सिंहासन लांकडी असून तें सुरेख रेशमी कापडानें मढविलेलें आहे. त्याला सोन्याचे सिंह केलेले आहेत. खांबाच्या मधील तबकड्या सोन्याच्या असून त्यांच्यावर माणिक, मोती, गच्च जडलेलें आहेत व त्याला मोत्याच्या झालरी लावलेल्या आहेत. बाजूला सोन्याच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यांच्यावरही जडावाचें काम केलेलें आहे. या सिंहासनावर एक सोन्याची मूर्ती बसविलेली होती. सिंहासन असलेल्या चबुऱ्यावर एक मुगुट ठेव-लेला आहे. तोही रत्नखचित आहे. तो सुमारें वीतभर उंच आहे. त्याच्या-वरील भाग गोलसर आहे. त्याच्यावर नवरत्नें जडलेलीं असून सर्वांवर शेखरी-भूत असें एक सुपारी एवढें मोठें मोती बसविलेलें आहे. तें फार पाणीदार आहे. तरी पण तें अगदीं गोल व घाटदार आहे असें नाहीं. दुसऱ्या बाजूला असाच एक रत्नखचित तोडा किंवा पैंजण ठेविलेला आहे. त्याच्यांत ही कितीतरी मोठीं मोतीं, माणकें व शिवाय बिनमोल पन्ने, हिरे वगैरे रत्नें बसविलेलीं आहेत. हा तोडा किंवा पैंजण सुमारें माणसाच्या दंडा इतका जाड आहे. (हा तोडा किंवा पैंजण नसून उत्साव मूर्तीच्या राजचिन्हांपैकीं चक्र किंवा इतर कांहीं आयुध असावें. दंडाइतका जाड पैंजण किंवा तोडा पायांत कोण व कसा घालणार ?) या सर्वांपुढें चबुऱ्याच्या कोपऱ्याला गाद्या वगैरे घालून तयार केलेल्या बैठकी-वर राजा या समारंभाच्या व उत्सवाच्या वेळीं येऊन बसतो.

या उत्सवाचा प्रकार असा :—

राजा अगदीं पहांटेच विजयमहालांत येतो आणि देवता मंडपांत जाऊन देवाची पूजा अर्चा करितो. तेथील ब्राह्मण त्याला पूजा पाठ सांगतात. मंडपा·

बाहेर त्याच्या मर्जींतले लोक जमलेले असतात. पुढें चौकामध्यें नाच सुरू असतो. चौकाच्या सभोंवार ओऱ्या व दलानांमध्यें लष्करी अधिकारी, शहरांतील व दरबारची प्रमुख मंडळी, उत्सव समारंभ पाहण्याला येऊन बसलेली असते. चबुऱ्याजवळच खालच्या बाजूला सोन्याचे व जडावाचे साज घालून उत्तम शृंगारलेले अकरा घोडे व त्यांच्या मागें चार हत्ती उभे केलेले असतात. पूजा अर्चा आटपून राजा मंडपांतून बाहेर येतो. त्याच्या बरोबर एक उपाध्या ब्राह्मण हातीं एका द्राऱ्यामध्यें पांढरीं गुलाबाचीं फुलें घेतलेला असतो. त्यांतून तीन तीन ओंजळी फुलें राजा त्या घोड्यांवर टाकतो व त्यांना धूप दीप दाखवितो आणि आरती करितो. याप्रमाणें घोड्यांची पूजा आटपल्यावर तशीच तो हत्तींची पूजा करितो. नंतर तो ब्राह्मण खालीं जाऊन हाऱ्यांतील फुलें, घोडे व हत्ती यांच्यावर उधळतो. तो परत आल्यावर राजा परत देवतामंडपांत जातो. तो तेथें पोहोंचतांच मंडपाच्या पुढच्या बाजूचे पडदे उचलतात. त्याच्याजवळच राजा बसतो. नंतर सारे पडदे उचलतात. राजाच्या समक्षच देवापुढें २४ रेडे व १२५ बकरीं बळी देतात. नेहमीं हेंच काम करणारा एक मनुष्य, त्यांचीं मुंडकीं एका लांबटशा कोयत्यानें अचूक घाव मारून, एकेकाच झटक्यासरशीं उडवितो. बलिदान आटपल्यावर राजा दुसऱ्या एका इमारतींत–देवालयाकडे–जातो. त्याच्या भोंवतालीं चबुऱ्यावर ब्राह्मण मंडळीची गर्दी जमलेली असते. राजा जवळ येतांच ते-लोक त्याच्यावर पुष्पवृष्टि करितात–मंत्रपुष्पांजळी टाकतात–नंतर तो चबुऱ्यावरून देवालयाला प्रदक्षिणा घालून येतो, आणि आपला मुकुट उतरून देवापुढें उपडा पडतो–त्याला साष्टांग नमस्कार घालतो. हें झाल्यावर तो त्या इमारतीच्या आंतल्या आवारांतील बागेंत जातो. तेथें थोडासा अग्नी पेटविलेला असतो म्हणे. त्या अग्नीमध्यें तो नवरत्नें व सुवासिक-परिमलद्रव्यांची पूड टाकतो. ( आंतल्या आवारांत होमकुंड तयार केलेलें असतें. तेथें जाऊन तो कांहीं आहुती टाकतो व होम हवन करितो. ) तेथून पुनः देवालयांत जाऊन थोडावेळ आराम करितो. तेथें त्याच्या मर्जींतली मंडळी परभारें पोहोंचून त्याला प्रणाम करितात. नंतर तो घोडे व हत्ती यांची पूजा केलेल्या जागीं येतो. तेथें लष्करी अधिकारी, सरदार व प्रमुख मंडळी पुढें सरून त्याला प्रणाम करितात, व कोणी कोणी नजराही करितात. हें झाल्यावर सर्वजण घरीं परत जातात. राजाही बाजूच्या दारानें आपल्या महालांत जातो. देवदासी व वारांगना यांचें नृत्य व गायन देवापुढें मंडपांत पुष्कळ वेळ चालूंच राहतें. याप्रमाणें नऊ दिवस दररोज याच क्रमानें हा उत्सव चालूं असतो. तो उत्सव समारंभ रोजच्या रोज अधिकाधिक प्रमाणावर होत असतो.

तिसरे प्रहरीं पुनः सर्व लोक राजवाड्यांत परत येतात. सर्वांनाच पहारेवाले एकदम आंत सोडीत नाहींत. आम्हाला त्यांनीं आंतल्या पटांगणामध्यें जाऊं दिलें. कळवंतिणी, मल्ल, जेठी, आणि हत्ती, हे मात्र आंत सोडले जातात. हत्ती सारा साज घालून सजवून आणतात. त्यांच्यावरील माहूत व इतर लोक यांच्या अंगांत रुईदार डगलीं व हातांत बरच्या व ढाली असतात. ते आंत जाऊन मल्लांच्या कुस्त्या वगैरे साठीं तयार केलेल्या रिंगणाभोंवतीं ठरलेल्या जागीं उभे रहातात. हें रिंगण महालाच्या मध्यभागीं मोठ्या जिन्याच्या बाजूला पृथक तयार केलेलें असतें. मल्ल व कळवंतिणी तेथें जातात. महालासमोरच्या महाद्वाराजवळ असलेल्या ओच्या, पडव्या, ओसऱ्या, दलानें, व त्यावरील गच्च्या, यांच्यावर पुष्कळशी मंडळी जमलेली असते. तिच्यांत मुख्यतः ब्राह्मण मंडळी, राजाच्या मर्जीतल्या लोकांचीं मुलें बाळें, व आप्त इष्ट मित्र वगैरे असतात. मर्जीतल्या लोकांचे तरुण व होतकरू पुत्र राजाजवळ उमेदवारी करीत असतात. जमलेल्या लोकांमध्यें गडबड व गोंधळ होऊं नये म्हणून राजवाड्यांतील कामगार व्यवस्था करीत फिरत असतात. बहुतेक दलानांमध्यें येण्या जाण्याला परभारे रस्ते, जिने व द राजे आहेत. त्या दरवाजांतून फक्त निमंत्रित लोक जातात येतात.

या समारंभामध्यें येणाऱ्या लोकांमध्यें 'साळुवा तिम्मा' हा मुख्य व प्रधान पुरुष आहे. त्याच्या कडेच येथील सारी व्यवस्था कुल मुखत्यारीनें सोंपलेली असते. हल्लींच्या राजाचें पालनपोषण करून त्याला राज्याधिकारावर आणिलें, तें यानेंच. यामुळें राजा त्याला पित्यासमान लेखतो. तो त्याला नेहमीं 'देवरू, सालुवा तिम्माप्पा,' असें संबोधून हाक मारितो. राज्यांतील कुल सरदार व कामदार त्याला प्रणाम करितात–ताजीम देतात–( हा त्या काळचा नानाफडणीस होता असें दिसतें. ) तो मुख्य समारंभाच्या व उत्सवाच्या जागीं एका दाराशीं उभा राहून तेथूनच हर एक गोष्टीबद्दल हुकूम देत व व्यवस्था करवीत असतो.

सर्व तयारी व व्यवस्था झाल्यावर, राजा मागें वर्णन केलेल्या सिंहासनाच्या चवुथ्यावर जाऊन बसतो. राजचिन्हेंही तेथेंच असतात. तो बसल्यावर आंत हजर असलेले लोक त्याला प्रणाम करितात. हें सर्व अटोपल्यावर मल्ल आखाड्यांत उतरून बसतात. राजा समक्ष बसण्याची व पान खाण्याची या लोकांना आणि वेश्यांना तेवढी मुभा आहे. इतर कोणालाही, मग तो कोणच्याही दर्जाचा सरदार किंवा मांडलिक असो-राजा समक्ष-आज्ञेवांचून बसण्याची पर-

ग्रंथ संग्रहालय
क्रं. ........

खानगी नाहीं. राजा आपल्या जागीं बसल्यावर तो आपल्या कुटुंबांतल्या तीघां चौघांना—त्यांतच स्वतः राजे असून राजाला आपल्या मुली दिलेले प्रमुख मांडलिक यांना—बसण्याला आज्ञा करितो. त्यांच्या मध्यें श्रीरंगपट्टण व मलबारच्या सरहद्दीला लागलेल्या प्रदेशाचा राजा मुख्य आहे. त्याचें नांव वीरय्या. त्याची बैठक तक्तावरच राजाच्या ओळीला कांहीं अंतरावर असते. बाकीच्यांच्या बैठकी थोड्या मागें असतात. (या सुमारास श्रीरंगपट्टण येथें राज्य करीत असलेल्या राजाचें नांव बेट्टाद चामराय. तो सं. १५१२ पासून सं. १५५४ पर्यंत गादीवर होता. त्यानें आपल्या दोघां वडील पुत्रांना राज्यांत हिस्से वांटून दिले होते. ते निपुत्रिकच वारले. तिसऱ्या पुत्राचें नांव हिरे किंवा वीर चामराय होतें. त्याच्यावर राजाची विशेष मर्जी होती व तो जास्त प्रबल होता, असें दिसतें. कारण बापाच्या मागें त्यालाच खास म्हैसूर व त्याच्या भोंवतालच्या प्रदेशाचें राज्य मिळालें. विजयनगरचें साम्राज्य सं. १५६५ त बुडाल्यावर तो बहुतेक स्वतंत्र झाला. त्याला सं. १५७८ मध्यें त्याचाच आप्त 'राजउदेयार' यानें राजसत्ता बळकावून मागें टाकलें. कुमार म्हणजे राजपुत्र. 'पायेस' नें राजकुमार वीरय्या असे लिहिलें आहे. याचा अर्थ बापाच्या ऐवजीं राजकुमार वीरय्या हजर होता, असा घेतला पाहिजे, असें दिसतें.)

यावेळीं राजानें सफेद कापडाचा पोषाख केला होता. त्याच्यावर कला-बत्तूचीं गुलाबाचीं फुलें काढलेलीं होतीं. त्यानें सर्व अलंकार अंगावर घातले होते. तो बहुतेक नेहमीं असाच पोषाख करितो. निदान मी त्याला पाहिलें तेव्हां तेव्हां याच पोषाखांत. पानदान, तरवार, व इतर राजचिन्हें घेऊन त्याचे हुजरे मागें जवळच उभे होते.

सिंहासनावर देवाची मूर्ती बसविलेली असते. ब्राह्मण लोक सभोंवार उभेराहून त्या मूर्तीवर घोड्याच्या केसांच्या व सोनेरी दांडीच्या चौऱ्या वारीत होते. ह्या चौरीचा मान फारच मोठा समजला जातो. राजावरही याप्रमाणेंच चौऱ्या ढाळीत असतात. (या चौऱ्या वनगायींच्या शेपटीच्या केसांच्या असतात, घोड्याच्या केसांच्या नव्हेत.)

राजा बसल्यानंतर बाहेर वाट पहात असलेले सेनाध्यक्ष, लहान मोठे सरदार व कामगार आपापल्या प्रमुख लोकांसह क्रमवारीनें आंत येऊन राजापुढें जाऊन प्रणाम करितात आणि परत आगाशीमध्यें जातात. हें संपल्यावर स्वारांचे हुद्दार येतात. त्यांच्या हातीं ढाली व भाले असतात. ते, तसेच तीरंदाज लोकांचे नायक, हे सारे आखाड्याच्या बाजूला हत्तींच्या समोरच्या अंगाला उभे राहतात. राजाजवळ रक्षक व शस्त्रधारी पाहारेवाले असे

कामते हेच. दुसऱ्या कोणीही या जागीं सशस्त्र येण्याची किंवा राजाकडे जाण्याची मनाई असते. हे लष्करी लोक आपापल्या जागीं उभे राहतांच कळवंतिणींचा नाच उभा राहतो. बाकीच्या नाटकशाळा, दरवाजाजवळच्या गोल भागाशिवाय मंडपामध्यें जाऊन बसतात. या स्त्रियांच्या अंगावर असलेल्या कितीतरी तऱ्हेतऱ्हेच्या व बिनमोल अलंकारांचें व आभरणांचें यथास्थित वर्णन तरी कोण करूं शकेल. त्यांच्या गळ्यांत मोती, माणकें, हिरे, वगैरे रत्नें जडलेले सुवर्णाचे हार व इतर अलंकार; भुजदंड, कोपरें व मनगटें यांच्या मध्यें गच्च घातलेले तसलेच बाजूबंद, व अनेक तऱ्हेचीं कंकणें, कमरेंतील रशना, व कमरपट्टे, पायांत तोरड्या, पैंजण, तोडे, सांखळ्या, इत्यादि दागिने घातलेले असतात. असला अनीतीचा धंदा करणाऱ्यांना इतकी संपत्ती असावी, हेंच विशेष आश्चर्य होय. यांच्यांत कांहींना जहागीरी, इनामें, जमीनी, पालख्या, दास दासी, वगैरे सुद्धां बेसुमार मिळालेल्या आहेत म्हणे. अशांतली एक नाटकशाळा खुद्द या शहरामध्यें एक लक्ष परदाओ--होन--बाळगून आहे म्हणतात. या पाहिलेल्या प्रकारावरून हें कांहीं खोटें नसेल, असें वाटतें.

पुढें मल्लांच्या कुस्त्या सुरू होतात. त्या व आपल्याकडील कुस्त्यांमध्यें फरक आहे. तरी त्या खेळतांना ते लोक एकमेकांना अशा कांहीं जोरानें थप्पडा व धक्के धडाके मारतात कीं, त्यांच्या मुळें डोळे फुटतात, दांत पडतात, व थोबाड फुटून विद्रूप होऊन जातें. कांहीं मल्ल बेहोष सुद्धां होतात. तेव्हां त्यांचे स्नेही त्यांना उचलून नेतात. ते एकमेकाला चांगलें गमतीनें पाडतां संवरतात ही. त्या लोकांचे हुद्देदार व परीक्षक नेमलेले असतात. ते आखाड्यांत हजर राहून, प्रत्येकाला योग्य व कायदेशीर रीतीनें कुस्ती खेळतां येण्याची तजवीज करून, हार जीत ठरविण्याचा आणि इनाम देण्याची व्यवस्था लावतात. हें कुस्त्यांचें व कळवंतिणींच्या नाचाचें काम तिसरे प्रहरापासून संध्याकाळपर्यंत चालतें. सूर्यास्त होतो न होतो तोंच, असंख्य मशाली व पोत पेटविले जातात. त्यांच्या योगानें सर्वत्र प्रति सूर्य प्रकाशच असा लख्ख उजेड पडतो. या मशाली व पोत आणि अगणित बत्त्या आसपासच्या भिंती, तट, त्यांतील मेहरापी व कुंभ्या वगैरे वरही लावलेल्या असतात. खुद्द राजाच्या बैठकीच्या आसपास तर त्यांची फारच गर्दी असते. रोषनाई झाल्यानंतर नाना तऱ्हेचे चमत्कारिक खेळ व तमाशे चालू होतात. ते जणों भराभर राजापुढें हजरीशी देऊन परततात. मागाहून कृत्रिम घोड्यांवर स्वार झालेले दुसरे तमाशेवाले स्वारांची लटकीच लढाई दाखवीत पुढें सरसावतात. आपल्या

पोर्तुगाल देशांत, 'कार्पो. डी. डीयो,' या उत्सवामध्यें लांकडी घोडे केलेले असतात त्याच तऱ्हेचे हे घोडे असतात. त्यांच्या मागून कांहीं लोक पारध्यांचीं सोंगें घेऊन जाळीं टाकून आखाड्यांतील लोकांना माशांप्रमाणें जाळयांत धरूं पाहतात. हे खेळ व तमाशे आटपतांच आतषबाजी-दारूकाम-सुरूं होतें. त्यांत तऱ्हे तऱ्हेचे बाण, नळे, फुलबाजी, झाडें, चक्रें, औटें, तारांगणें, झाबरी, जाळया वगैरे असतात. कांहीं मधून ते वर उडाल्यावर आकाशांत मोठा आवाज होतो व रंगी बेरंगी तारे निघतात.

दारूकाम संपल्यावर लष्करी अधिकाऱ्यांच्या श्रृंगारलेल्या रथांची हजिरी होते. त्यांतील बरेचसे रथ स्वारी शिकारीवर आणि पर राज्यावर मोहिमेवर गेलेल्या अधिकाऱ्यांनीं व सेनाध्यक्षांनीं पाठविलेले असतात. 'सालुवा तिम्माप्पा'चा रथ सर्वांपुढें असतो. त्याच्या मागून ज्याच्या त्याच्या योग्यते-प्रमाणें इतर सरदार व अधिकारी यांचे रथ येतात. कांहीं रथांवर मौल्यवान व सुरेख कापड लावलेलें असतें व कळवंतिणी तसेंच स्त्री पुरुषांचीं चित्रें-मूर्ती-असतात. कांहीं रथ मजलेदार असतात. ते सारे रथ राजापुढें जाऊन परत फिरतात.

त्यांच्या मागून खाशा पागेंतील पुष्कळसे उमदे उमदे व उत्तम सजविलेले खासे घोडे येतात. त्यांच्यावर राजाच्या आवडत्या रंगाच्या मौल्यवान कापडाच्या झुली व डोक्यांवर आणि गळयांत गुलाबाचे तुरे व हार असतात. सर्वांच्यापुढें एक अप्रतिम घोडा होता. त्याच्यावर अबदागिरी व दोन छत्र्या, अशीं राजचिन्हें होतीं. त्याच्या अंगावर इतर घोड्यांपेक्षां श्रेष्ठ व मौल्यवान अलंकार घातलेले होते. राजाच्या खास पागेंतील कोणी हुद्देदार स्वतः त्याला हातीं धरून कोतल चालवीत होता. त्याच्या अघाडीला तसाच श्रृंगारलेला एक घोडा ऐटीनें उड्या मारीत, नाचत व निरनिराळया चालींवर मोठ्या झोंकानें जात होता. या गोष्टी त्याला युद्ध्यां-शिकविलेल्या होत्या. हा थाटदार घोडा जणों पूजेचा असतो. त्याच्यावर येथील राजे सिंहासनारूढ होते वेळीं शपथ घेतात. हल्लींच्या राजाच्या मागून गादीवर बसणाऱ्या राजाला सुद्धां याच किंवा असल्याच अश्वावर राज्यारोहण समयीं शपथ घ्यावी लागेल. या घोड्याच्या ऐवजीं त्याच्या मागून दुसरा तस-लाच घोडा कायम केला जाईल. कोणा राजाची मर्जी अशा घोड्यावर शपथ घेण्याची नसली तर, त्याला एकाद्या हत्तीवर ती शपथ घ्यावी लागते. त्यानंतर त्या हत्तीलाही या घोड्याप्रमाणेंच मोठ्या थाटानें व बरदास्तीनें ठेविलें जातें. ( ही चाल कशीकाय असावी कळत नाहीं. हल्लीं ती कोठें संस्थानांमध्यें जारी असल्याचें

उपलब्ध नाहीं.) याप्रमाणें मिरवत सारे घोडे राजापुढें जाऊन उभेराहतात. त्यांच्या एकामागें एक सहा सात रांगा असतात. सर्वांपुढें राजाचा घोडा असतो. त्याच्या भोंवतीं गर्दी नसते. ते उभे राहून सारी गडबड मिटली म्हणजे, एक वरिष्ठ ब्राह्मण-राजोपाध्या-दुसऱ्या दोघां ब्राह्मणांसह एका ताटांत पूजेचें साहित्य, फुलें, नारळ, तांदूळ, कलश, वगैरे घेऊन देवघरांतून येतो व त्या सर्व घोड्यांना प्रदक्षिणा घालून त्यांची पूजा करून परत जातो. यानंतर राजमहालांतून हातीं हरकाऱ्याच्या छड्या घेतलेल्या द्वारपालिका आल्या. त्यांच्या खांद्यावर चाबूक लोंबत होते. त्यांच्या मागून पुष्कळसे हिजडे, व त्यांच्या नंतर तुताऱ्या, सनया, ढाल वगैरे नाना तऱ्हेचीं वाद्यें वाजवीत पुष्कळशा स्त्रिया आल्या. हीं सारीं वाद्यें आपल्याकडील वाद्यांहून निराळीं असतात. या वाजंत्री बायकांमागून सुमारें २० बायका चोबदार आल्या. त्या पितांबर नेसलेल्या असून, त्यांच्या डोक्यांवर उंचशा टोप्या असतात. त्यांना कुलाई म्हणतात. त्या टोप्यांना मोत्यांचे तुरे व लफ्फे लागलेले होते. कंबरेला सोन्याचे पट्टे होते. त्यांना पाच, हिरे, माणकें, मोतीं, जडलेले असून, गळ्या मध्यें व खांद्यांवरून मोत्यांच्या लांबलांब माळा व हार लोंबत होते. त्यांच्या हातांमध्यें तऱ्हे तऱ्हेचीं जडाऊ कंकणें व दंडांत भुजबंद वगैरे घातलेले होते. त्यांच्या अर्ध्या बाह्या उघड्याच होत्या. कंबरपट्ट्याखालीं अर्ध्या मांड्यापर्यंत घोळदार सोन्या मोत्यांच्या व रत्नखचित मेखला लोंबत होत्या. पायांतही रत्नखचित तोडे, तोरड्या, पैंजण, वगैरे घातलेले होते. तेसुद्धां इतर दागिन्यांप्रमाणें भारीच सौंदर्यवान होते. लहानशा दारूच्या पिपा सारख्या आकाराच्या रत्नजडित सुवर्णाच्या रोळशा त्यांच्या हातांत होत्या. त्यांच्या आंतून व बाजूला मोत्यांच्या लड्या लटकत होत्या व आंत दिवे-निरांजनें-ठेवलेलीं होतीं. (या सरत्न सुवर्ण पात्रांमध्यें लावून आणलेल्या आरत्या असाव्यात.) अशा सुमारें ६० स्त्रिया अनुक्रमानें बाहेर आल्या. त्या फारच सुरेख, गोऱ्यापान आणि ऐन पंधरा वीस वर्षांच्या होत्या. त्यांतील एकेकीच्या अंगावर असलेल्या अलंकारांचें व आभरणांचें योग्य मोल होणें कठिण. या जड जवाहिराचा व दागिन्यांचा कांहीं जणींना इतका कांहीं भार झाला होता कीं, त्याच्या खालीं त्या दबून जात होत्या. त्यांना दुसऱ्या बायका सांवरून धरीत होत्या. अशा अप्रतिम थाटानें व वैभवानें त्यांनीं त्या साऱ्या घोड्यांना तीनदां प्रदक्षिणा घातल्यानंतर त्या राणी महालांत परत गेल्या. या स्त्रिया राण्यांजवळच्या वरिष्ट दासी किंवा सख्या होत्या. बाकीच्या साऱ्या बायकाही राण्यांच्याच तैनातींतल्या होत्या. या नवरात्राच्या उत्सवामध्यें

प्रत्येक राणीनें आपल्या पदरच्या स्त्रियांना उत्तमोत्तम सजवून व शृंगारून ठरलेल्या निरनिराळ्या दिवशीं याप्रमाणें धाडण्याचा प्रघात आहे. राजाज्ञा व पूर्वापार वहिवाट, यांना अनुसरून सरकारी अधिकारी या उत्सवासंबंधें व्यवस्था लावीत असतात. त्याप्रमाणें प्रति दिवशीं एकेका राणीकडील उत्तमोत्तम स्त्रिया आणि रत्नालंकारादिकांचें वैभव, यांचें जणों सर्व लोकांना प्रशस्तपणें प्रदर्शन पाहाण्याला मिळतें.

त्या स्त्रिया परत गेल्यावर घोडेही रवाना होतात. त्यांच्या नंतर हत्ती पुढें सरतात, ते मुजरा व हजरी आटपून परत जातात. इतकें झाल्यावर या महालाच्या कडेला असलेल्या पदद्वारांतून राजा निघून जातो. त्यानंतर ब्राह्मण मंडळी उत्साहमूर्ती मंडपांत परत नेतात. तीं विजयमहालांत पोहोंचल्यावर राजा मंडपांत येतो व पूजा अर्चा करितो. पुनरपि रेडे व बकरीं मारतात व बलि-दान होतें. कलावंतिणींचा नाच सुरूं होतो. बलिदानानंतर राजा अंतःपुरांत जाऊन उपास सोडतो. नवरात्रांत नऊ दिवस हे लोक उपास करितात, व मध्यरात्रीं पारणें फेडतात. या पुढें ही देवासमोर पुष्कळ वेळ नाच चालूच असतो. ( कदाचित सप्ताहाच्या तऱ्हेवर नाच अहोरात्र चालत असावा. )

असा हा नवरात्राचा समारंभ व उत्सव होतो. शेवटच्या दिवशीं २५० रेडे व ४,५०० बकरीं मारतात. ( धर्माच्या नांवावर कोण ही भयंकर प्राणिहिंसा ! )

सर्व उत्सव आटपल्यावर राजा आपल्या साऱ्या फौजेची हाजिरी घेतो. तिचा प्रकार असा :—

राजाच्या आज्ञेनें शहराबाहेर एक कोसावर एका नियमित जागीं एक भव्य मंडप उभा केलेला असतो. तेथें नवरात्रोत्सवांतील उत्साह मूर्ती नेऊन बसविलेली असते. सर्व लष्करी अधिकारी आपापल्या दर्जाप्रमाणें, राजमहाला-पासून या मंडपापर्यंत मार्गावर दुतर्फा हारीनें नेमलेल्या जागीं आपापलें सैन्य, लवाजमा व बुणगें, उभे करितात शिपायीलोक ओळीनें उभे राहतात. त्यांची एकेरीच ओळ असते असें नाहीं. दोन दोन तीन तीन सुद्धां रांगा असतात. मध्यंतरीं तलावादिक अडचणी आल्या तर त्यांच्या भोंवतालीं, निरुंद रस्ता असेल तेथें जवळच्या मोकळ्या जागेंत, आणि पहाडी व उंचवटे आले तर त्यांच्या माथ्यावर व उतारावर, असे हे लोक उभे करितात. मोकळी जमीन, मैदान, पहाडीचा माथा, उतार, इत्यादि स्थळीं, शिपायी नाहींत अशी जागा क्वचितच दृष्टी पडते. सर्वांपुढें पायदळ, त्याच्या मागें स्वार, आणि स्वारां मागें हत्ती, याप्रमाणें आपली फौज उभी करून खुद्द सेनाध्यक्ष उभे राहतात.

खास शहरांतील लष्कर रस्त्याच्या दुतर्फा व माळवदावर उभे करण्याच्या ऐवजीं, येऊन मिळणाऱ्या रस्त्यांच्या तोंडांवर, मचाणें बांधून त्यांच्यावर उभे केलेलें होतें. याप्रमाणें शहराच्या आंत व बाहेर चोंहीकडे सर्वत्र सैन्यचसैन्य झालेलें होतें.

स्वारांचे सर्व घोडे उत्तम तऱ्हेचे साज घालून सजविलेले होते. त्यांतील कांहीं घोड्यांच्या कपाळांवर चांदीचे, पण बहुतेकांच्या कपाळावर सोन्याचे किंवा सोन्याचा मुलामा दिलेले पत्रे बांधलेले होते. त्यांना पिळदार वळीव रंगी बेरंगी रेशमी झालरी लाविलेल्या होत्या. लगामही वळीव रेशमी होते. कांहींच्या पाठींवर मक्केच्या मखमलीचे मोठे गाशे होते. ही मखमल निरनिराळ्या रंगाची व नक्षी काम केलेली असते. गाशांनाही झालरी लाविलेल्या असून घोड्यांच्या अंगावरही अलंकार घातलेले होते. कांहींवर साटिन, मश्रू, वगैरे रेशमी कापडाचे व कांहीं वर चीन व इराण देशाच्या किनखापाचे गाशे व झुली घातलेल्या होत्या. कांहीं स्वार व शिपायी यांनीं मुलामेदार पत्र्याचीं व रत्नजडित चिलखतें घातलीं होतीं त्यांच्यावर लहान लहान नवरत्नें व मोती यांच्या जाळ्या व झालरी लावलेल्या होत्या. कांहीं घोड्यांच्या डोक्यांवर नागफण्या व इतर तऱ्हे तऱ्हेचे प्राणी यांच्या आकाराचीं शिरोभूषणें केलेलीं होतीं. किनखाप, मखमल, वगैरे रेशमी कापडाची रुईदार चिलखतवजा डगलीं पुष्कळशा स्वारांच्या अंगांत होतीं. हीं डगलीं मजबूत व चिवट असें कच्चें चामडें घेऊन त्याचे थरावर थर देऊन व मध्यें मध्यें लोखंडी पत्रे देऊन बनविलेलीं होतीं. त्यांतील कांहीं पत्रे दोहींकडून मुलामा केलेले व कांहीं चांदीचे होते. त्यांच्या डोक्यांवर शिरस्त्राणें किंवा टोप होते. त्यांना मानेच्या बचावासाठीं मागें लोंबत्या जाळ्या किंवा पट्ट्या व पुढें तोंडाच्या बचावाच्या पट्ट्या असतात. हे टोपही डगल्यांच्याच तऱ्हेवर केलेले व भारी मजबूत असतात. या शिवाय मानेच्या संरक्षणासाठीं, स्वच्छ कांचे सारखे चकचकीत सोन्याचे, मुलाम्याचे, रुप्याचे, किंवा पोलादाचे, पत्रे, रेशमी कापडावर बसवून तयार केलेले नीमकवचासारखे असतात. त्यांच्या कंबरेला तरवारी आणि लहान लहान फरस व हातामध्यें भाले आणि बरच्या होत्या. त्यांच्या दांड्या व काठ्या सोन्या रुप्यानें मढविलेल्या असतात. त्यांच्या डोक्यावर छत्र्या धरलेल्या असतात. त्या थाटदार जरतारी काम केलेल्या मखमलीच्या किंवा मश्रूच्या असतात. त्यांच्या घोड्यांवर अनेक तऱ्हेचें रेशमी कापड घातलेलें असतें. त्यांच्या निशाणांना व झेंड्यांना नानारंगी चौऱ्या बांधलेल्या असतात.

हीं निशाणें व हे झेंडे, ते लोक भारी आदरानें, आस्थेनें, व हिमतीनें बाळगतात. ( हें वर्णन बहुधा कांहीं प्रमुख शिलेदार व एकांडे आणि त्यांच्यावरील हुद्देदार, ज्यांना छत्री अबदागिरी व चौरीचा बहुमान मिळालेला होता अशा लोकांचेंच असावें. )

याच प्रमाणें हत्तींवरही किनखापाच्या किंवा जरतारी काम केलेल्या मखमलीच्या झुली होत्या. त्यांना जाळया व झालरी लावलेल्या होत्या. शिवाय इतरही रंगी बेरंगी कापड घातलेलें होतें. दोन्ही बाजूंना घंटा लोंबत होत्या. त्यांचा नाद सर्वत्र पसरत होता. त्यांच्या गंडस्थळावर तऱ्हे तऱ्हेच्या मूर्ती व चित्रें काढलेलीं होतीं. प्रत्येक हत्तीवर तीन किंवा चार इसम बसलेले होते, ते स्वारी शिकारीला जाण्याच्या वेशानें सजून बसलेले होते. त्यांच्या अंगांमध्यें रूदार डगलीं असून, हातांमध्यें ढाली व बरच्या होत्या. या समारंभाला इतके कांहीं पायदळ लोक हजर होते कीं, त्यांच्यामुळें आसपासच्या सर्व पहाड्या, मैदानें व दऱ्याखोरीं गच्च भरून गेलेलीं दिसत होतीं. असा देखावा साऱ्या दुनियेंत इतरत्र क्वचितच पाहण्यांत येत असेल. त्यांतील कांहींच्या अंगांतील कपडे व पोषाख विलक्षण उंची व उत्तम कापडाचे होते. ते कोठून पैदा झाले व त्यांच्या मध्यें किती तऱ्हेचे रंग असतील याचा थागच लागत नाहीं. ढालाईत लोकांच्या ढालींपैकीं कांहींवर नाना तऱ्हेचीं सोन्या चांदीचीं फुलें जडलेलीं होतीं. कांहींवर व्याघ्रादिक वनपशूंचीं चित्रें कोरलेलीं होतीं. कांहींवर नुस्तें कोरीव काम केलेले रुप्याचे पत्रे होते. तसेंच रंगाचें व मीन्याचेंही काम होतें पुष्कळशा फक्त उत्तम जिल्हई देऊन आरशासारख्या साफ व स्वच्छ केलेल्या होत्या. त्यांच्या तरवारींवर केलेलें कामही अप्रतिम, सुरेख व कीमती होतें. तसें सामान्यतः इतरत्र पाहण्यांत येणें सुद्धां मुष्किलच होय. तीरंदाज लोकांच्या तीरकमानींवरही सोन्याचांदीचें काम केलेलें होतें व कांहीं केवळ जिल्हई देऊन चकचकीत केलेल्या होत्या. त्यांच्या जवळचे बाण, फारच सुरेख, प्रेक्षणीय व नीट नेटके असतात. त्यांच्या तोडीचे बाण आपल्या तर इतर कोठें पाहण्यांत आले नाहींत. कंबरेला बांधलेल्या कंबरबंदामध्यें जंबिये व फरस असतात. त्यांची पाती व दांडे यांच्यावर उत्कृष्ट सोन्यारुप्याची नक्षी केलेली असते. बंदूका व कडाबिनी बाळगणाऱ्या लोकांच्या अंगांत चिलखतवजा डगलीं असतात व त्यांच्या बंदुका व कडाबिनीही नीटनेटक्या व व्यवस्थित असतात. एकंदरींत या लोकांचा पेहराव, आभरणें, व शस्त्रें शूरवीरांना साजण्यासारखीं थाटदार व चांगलीं असतात.

हा सारा देखावा अपूर्व व पाहण्यालायक होता. या शिवाय मुसलमान लोक-यांनाही विसरतां कामानये-ही या हजरीला आलेले होते. त्यांच्या

त्या ढाली, बरच्या, भाले, तुर्की तीरकमानी व ओटे, गरनाळी, वगैरे अस्त्रें त्यांनीं बरोबर आणलेलीं होतीं. त्या लोकांमध्यें उत्तम हत्यारें बाळगून तीं चालवितां येणारे असे लोक पाहून मला आश्चर्य वाटलें.

मागें वर्णन केलेल्या अश्वरत्नावर राजा या वेळीं स्वार झाला होता. त्यानें सफेद भरगच्ची पोषाख करून आजच्या प्रसंगाला उचित अलंकार भूषणें धारण केलीं होतीं. त्याच्यावर दोहीं बाजूंस दोन लाल मखमलीचीं उत्तम छत्रें धरलेलीं होतीं. या महाराजाधिराजाच्या अंगावर अशा विशिष्ट प्रसंगीं काय काय व किती किती किंमतीचे अलंकार असतील, याची योग्य कल्पना, ते नेहमीं घालण्याचा किंवा घातलेले पाहण्याचा प्रसंग असेल तोच करूं जाणे.

या स्वारीमध्यें त्याच्या बरोबर राजे, मांडलिक सरदार, वगैरे होते, त्यांचें त्यावेळचें वैभव पाहून, त्याचें यथास्थित वर्णन करणें मला शक्य नाहीं. शिवाय मीं तें केलें तरीं, इतरांचा त्याच्यावर क्वचितच विश्वास बसेल.

या मिरवणुकींत कोतल घोडे पुढें चालले होते. त्यांच्या वरील साज व चिलखतें सोने, चांदी, व उत्तम पोलाद, यांच्या पत्र्यांनीं मढवून टाकलेलीशीं वाटत होतीं. एकमेकाला आड आल्यामुळें साज घालून शृंगारलेले शेकडों घोडे नीटपणें दिसत नसत. त्या सार्‍यांचें यथार्थ वर्णन करण्याला मला शब्दच सुचत नाहींत. केवळ आश्चर्यचकित होऊन मी चोहींकडे सारखा पहात उभा होतों. त्या वेळीं माझ्या नजरेस पडलेल्या देखाव्याचें साग्र व यथार्थ वर्णन मजकडून होणें अगदीं अशक्य होय. मी घोड्यावर स्वार होतों. मागें, पुढें, चोहीं बाजूला, विस्मयानें पहात असतांना माझें देहभानच जणों उडालेलें होतें. मी घोड्यावरून पडतों कीं काय असें मला झालें होतें. या सर्व सजवणुकीकडे अवाढव्य खर्च झालेला असावा. तरी या विषयीं आश्चर्य करणें नलगे. कारण हा देश किती तरी धनाढ्य व संपन्न आहे. यांतील राजे, मांडलिक सरदार वगैरे सर्वच सारखें अतोनात श्रीमान व संपन्न आहेत.

राजाच्या पुढें बिनीला उत्तमोत्तम साज घालून शृंगारलेले पुष्कळसे हत्ती चालले होते. त्यांच्या मागें चोवीस कोतल घोडे होते. त्यांच्यावर थाटदार व उंची खोगीरें, भारी मोल्यवान अलंकार व त्यांच्याच तोडीचे सुंदर लगाम होते. त्यांच्या साजांवर व जीनांवर बहुमोल जरतारीचें व जडावाचें काम केलेलें होतें. त्यावरूनही त्यांच्या मालकाच्या अप्रतिम ऐश्वर्याची चांगलीच कल्पना होत होती.

राजाच्या जवळच एक-पिंजरा-डोलारासा चालला होता. लिस्बन येथें 'कार्पो-डी-डीयो,' या उत्सवांत मिरवणुकीमध्यें तसा डोलारा पाहण्यांत येतो. तो खूप मोठा होता. तो तांब्याचा किंवा चांदीचा असावा. त्याला सोन्याचा मुलामा दिलेला होता. त्याला दोन्हीं बाजूला आठ आठ असे सोळा भोई लागलेले होते. बदलीचे दुसरेही भोई बरोबर होते. त्याच्या मध्यें पूर्वी वर्णन केलेली देवाची उत्सव मूर्ती बसविली होती. ( हें मोठें थोरलें डोलाऱ्याचें सिंहासन असावें. स्वारी बरोबर ही उत्सव मूर्ती मिरवत नेण्याची चाल होती. तिच्या बरोबर राजा घोड्यावर बसून समारंभानें जात असे. )

याप्रमाणें सर्व लवाजम्यानिशीं राजा मोठ्या थाटानें आपली फौज पहात चालला होता. तो दृष्टी पडतांच सर्व लोक मोठमोठ्यानें जयघोष व गर्जना करीत चालले होते. ढालीवर तरवारीच्या व इतर शस्त्रांच्या आघाताचा शब्द, घोड्यांचे हेषारव, हत्तींची भयंकर गर्जना व तो सहस्रावधि लोकांनीं केलेला जयघोष, यांच्या तुमुळ व प्रचंड नादानें सारें शहर उलथून पडतें कीं काय, असें वाटे. तोफा व बंदूकाही सोडल्या जात होत्या. त्यांच्या दणक्यानें साऱ्या पहाड्या, दऱ्या, खोरीं, व भूभाग दणाणून व हादरून जात. साऱ्या मैदानांत औटे व दारूकाम सुटत होतें. तें भारीच विलक्षण व प्रेक्षणीय वाटे. तेथें त्यावेळीं सारें भूमंडळ एकवटलेसें भासत होतें.

अशा अद्वितीय थाटानें, समारंभानें व धामधूमीनें, राजाची स्वारी मंडपापर्यंत पोहोंचली. तेथें राजानें रीतीप्रमाणें देवदर्शन व पूजा अर्चा उरकली.

राजा पुढें जातांच लष्करी लोकांना सुट्टी होऊन ते परतत, असें मात्र समजूं नये. स्वारी परत येईपर्यंत ते सर्व तसेच उभे असत. पूजा वगैरे आटपल्यावर राजा पुनः घोड्यावर स्वार होऊन पूर्ववत् थाटानें शहरांत परत गेला. त्यावेळींही सारी फौज सारखा जयघोष करीत होती. तो पुढें जातांच मागील फौज रवाना होई. पहाड्या, त्यांचे उतार, खोरीं, व मैदानें, यांच्यावरून परत निघूनजातांना, सर्व लोक एकसारखे उल्हासानें आरोळ्या ठोकीत, जयघोष करीत, शस्त्रें परजीत, व ढालीवर शस्त्राघात करीत चालले होते. तो देखावा भारीच मनोहर व उल्हासजनक होता. तो पहात असतांना माझी चित्तवृत्ती खरोखरच चमत्कारिक झालेली होती. हें स्वप्न आहे का कोणी अपूर्व अद्भुत दैवी चमत्कार आहे, असें मला वाटत होतें. मैदानामध्यें असंख्य तंबू, डेरे, राहुट्या, दिलेल्या होत्या. त्यांच्यामध्यें हे लष्करी लोक गेले. पण

सेनाधीश राजाच्या स्वारी बरोबर राहून त्याला राजवाड्यांत पोहोंचविल्या नंतर परत आपापल्या जागीं विश्रांती घेण्याला गेले.

या राजाच्या पदरीं कायमची जय्यत दहा लाख फौज राहते. तिच्यामध्यें चिलखतें वालणारे स्वार ३५,००० आहेत. ही सारी फौज सरकारी नोकरींत असुन, हवी तेव्हां, जरूर पडेल तेथें, मोहिमेवर जाण्याला तयार असते. तिला सरकारांतून तनखा मिळते. आह्मी येथें असतांना राजानें एका बंदरावर फौज तयार करून धाडलेली आह्मो समक्ष पाहिली. तिच्यामध्यें ५० सेनाध्यक्षांच्या हाताखालीं मिळून, दीड लक्ष लोक होते. त्यांतच पुष्कळसे स्वार होते. या राजाच्या पदरीं पुष्कळसे हत्ती आहेत. आपल्या सरहद्दीवरील तीनही प्रतिपक्षी राजांना आपलें संपूर्ण बल व वैभव दाखविण्याचें या राजानें मनांत आणिलें तर, तो एकदम एका वेळीं वीस लाख फौज जमा करवूं शकतो, असें म्हणतात. म्हणूनच या देशांतील सर्व राजे त्याला फारच भिऊन असतात. फौजेसाठीं इतके लोक अडकलेले असतात म्हणून राज्यामध्यें कधीं माणसांची वाण पडली असें मुळींच होत नाहीं, असें पक्कें समजावें. या राज्यांत इतकी कांहीं आबादानी व आबादी आहे कीं, हे सारे लोक पर राज्यांत स्वारी शिकारीला गेले असले तरी, एक मनुष्य सुध्दां कोठें उणा झालासें दिसत नाहीं. याचें कारण, या राज्यांत व्यापार कितीतरी चालतो, आणि व्यापाऱ्यांचा भरणाही फारच मोठा आहे. तसेंच कामकरी, मजूर व इतर रोजगार धंदा करणारे लोक विपुल आहेत. शिवाय शेतकीचा धंदा करणारे लोक आहेत ते निराळेच. ब्राम्हण लोकांचीही संख्या फारच मोठा आहे. ते लोक जीव हत्या व हिंसा होऊन तयार होणारे मांसादिक पदार्थ मुळींच खात नाहींत. त्यांना शस्त्रधारणाविषयीं ही अभिरुची कमीच, किंबहुना मुळींच नसते, म्हणाना.

हा राजा अशा या प्रचंड सैन्याला तनखा देऊन पोसतो. शिवाय पदरचे कितीतरी उत्पन्नदार राजे मांडलिक व सरदार यांचा खर्च ज्याच्यांतून भागवितो, असें या राजाच्या राज्याचें उत्पन्न तरी किती आहे आणि त्याचा खजीना तरी किती भरलेला आहे असें कोणाला वाटेल तर, यावर माझें उत्तर हेंच कीं, या साऱ्या फौजेवर जितके म्हणून सेनाध्यक्ष व अधिकारी आहेत तेच या राज्यांतील राजे मांडलिक व सरदार आहेत. ते सारे खुद्द जमीदार आहेत. राज्यांतील सारीं खेडीं, गांव व शहरें, आणि त्यांच्या खालची सारी जमीन, त्यांच्याच कडे वांटली गेली आहे. त्यांच्यांत कांहीं जणांचें सालीना उत्पन्न दहा पंधरा लक्ष परदाओ—होन—आहे. दुसऱ्या कित्येकांचें पांच पांच, तीन तीन, दोन

दोन, एक एक लक्ष परदाओ–होन्न–उत्पन्न आहे. प्रत्येकानें किती किती पायदळ, स्वार व हत्ती, ठेवावयाचे, ते त्यांच्या त्यांच्या उत्पन्नाच्या मानानें राजा स्वतः ठरवितो. ही सारी जमात केव्हांही पाचारण झालें व कोठेंही नोकरी-वर जाणें असलें तरीं, स्वारी शिकारीसाठीं, नेहमीं हजर व जय्यत असली पाहिजे, असा ठराव आहे. या व्यवस्थेमुळें त्याची ही दहा लाख फौज सारखी तयार राहते. सेनाध्यक्षही या लोकांना तनखा देतात. सबब ते उत्तमोत्तम लोकच निवडून भरती करितात. म्हणूनच हजिरीच्या प्रसंगीं इतरत्र कोठेंही आढळणें मुष्किलच, असे धट्टे कट्टे, मजबूत, तरुण बांड, लोक माझ्या नजरेस पडले. त्यांच्या मध्यें माघार घेणारा किंवा बागूबाईपणा करणारा असा एक-ही इसम मला वाटला नाहीं. या सेनाध्यक्षांना इतकीही कायमची फौज बाळगून शिवाय खुद्द राजाला खंडादाखल कांहीं ठरीव रकम द्यावी लागते. खास राजाच्या पदरींही पगारी फोज भरती असते. त्याच्या जाती तैनातीचे आठशें हत्ती आणि खाशा पागेंत ५०० घोडे स्वार आहेत. या दोहोंच्या खर्चा-कडे त्यानें खुद्द विजयनगर शहराचें उत्पन्न लावून दिलें आहे. हे हत्ती घोडे व त्यांच्यावरील नौकर चाकर यांचा एकंदर खर्च किती भारी असेल याची कल्पना करावी, म्हणजे त्या मानानें विजयनगरचें उत्पन्न किती असेल तेंही ध्यानांत येईल.

या विजयनगरच्या राजाच्या हाताखालीं दुसरे पांच राजे मांडलिक आहेत. (ते 'नूनीज' च्या कैफीयतीप्रमाणें–तिचें भाषांतर या पुढें दिलें आहे–वंकापूर, गरिसप्पा, बाकानूर, कालीकट व भाटकल, येथील राजे होत.) याशिवाय मोठ्याशा जहागिरी व भारी उत्पन्न असलेले दुसरेही सरदार व सेनाध्यक्ष आहेत. राजाला अपत्य होतें तेव्हां, राज्यांतील सर्व राजे मांडलिक, सरदार, जहागिरदार व सेनाध्यक्ष, मोठमोठ्या मोल्यवान वस्तू, व नगदी रकमा, आणि अलंकारादिक राजाला नजर करितात. तसेंच राजाच्या प्रति वाढदिवशींही नजर नजराणे देण्याचो वहिवाट आहे.

येथवर वर्णन केलेला हा महोत्सवाचा समारंभ आटपल्यावर अकरा दिवसांनीं आक्टोबराच्या–कार्तिकाच्या–प्रारंभीं दिवाळीच्या दिवसांत, सर्वत्र भारी आनंदोत्सव करण्यांत येतो. त्यावेळीं सर्वजण आपापल्या आवडी ऐपती प्रमाणें नवीं नवीं, सुरेख, उंचीं वस्त्रें धारण करितात. तसेंच सारे सेनाध्यक्ष आपापल्या पदरच्या लोकांना तऱ्हे तऱ्हेचे, रंगी बेरंगी, उमदे पोषाख, लष्करी वर्द्या आणि नवीन निशाणें व जरी पटके देतात. प्रत्येक निशाण व जरी पटका याचा रंग व

त्यांच्यावरील चिन्हें निरनिराळीं असतात. त्या दिवशींही राजाला नगदी भेट व नजर नजराणे केले जातात. त्याचें उत्पन्न सुमारें पंधरा लक्ष परदाओ–होन्न–होतात, असें कोणी कोणी सांगतात. एक परदाओ म्हणजे ३६० रेस. या मानानें याचे कितीतरी रेस होतात, तें पहा.

याच दिवशीं या लोकांचें नवें वर्ष सुरू होतें. त्या संबंधाचाच हा उत्सव असतो. मेजवान्याही देण्यांत येतात. याबद्दल कांहीं आश्चर्य मानण्याला नको. कारण आपल्यामध्येंही वर्षारंभाच्या दिवशीं असाच उत्सव करण्याची चाल आहे. हा वर्षारंभ या महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेपासून होतो. महिनेही चांद्रमानानेंच धरितात.

प्रतिवर्षी नियमित शिल्लक टाकावयाचीच, अशी चाल, येथील राजघराण्यामध्यें फारांवर्षांपासून चालत आलेली आहे. ही शिल्लक प्रत्येक कारकिर्दीची अगदीं निराळी व गुप्त–कोणालाही सहसा माहित न होय–अशी, निरनिराळ्या भांडारांमध्यें कडेकोट–किल्ली कुलुपांत ठेवीत आले आहेत. याप्रमाणें मागील राजांच्या वेळची कितीक संपत्ती, कोठें, कशी ठेवली आहे, हें पुढील राजे पहात नाहींत, किंवा तीं भांडारें ते उघडीत नाहींत, अशी यांची पूर्वापार वहिवाट आहे. राजावर किंवा राज्यावर तसाच कांहीं जबर, अनिवार्य, आपत्प्रसंग आल्या वांचून, हीं भांडारें उघडण्याचीं नसतात. त्यामुळें राज्याला अतिशय जरूरीच्या प्रसंगीं उपयोगी पडण्यासाठीं चांगलाच द्रव्य संचय नेहमीं कायम असतो.

या राजानें आपलें भांडार पृथक केलें आहे. त्याच्या मध्यें तो दरवर्षी एक कोट परदाओ शिल्लक टाकतो. खासगी खर्चासाठीं लागणाऱ्या रकमे शिवाय तिच्यांतून तो एक सुद्धां होन्न बाहेर काढीत नाहीं. खासगीकडील व त्याच्या राण्या आणि त्यांच्या तैनाती १२००० स्त्रिया, या सर्वांचा खर्च भागूनही त्याच्या जवळ दर साल कितीतरी शिल्लक पडते. यावरून या राज्याची स्थिती किती उदंड संपन्न आहे, आणि या राजाजवळ आज मित्तीला किती संपत्ती सांठलेली असेल, याची सहज कल्पना होईल.

परदाओ हें सोन्याचें नाणें आहे. तें गोल असतें. तें या राज्याशिवाय साऱ्या हिंदुस्थानांत इतर कोठें पाडलें जात नाहीं. त्याच्या एका बाजूवर दोन प्रतिमा व दुसरीकडे तें पाडविणाऱ्या राजाचें नांव असतें. हल्लींच्या राजानें पाडविलेल्या नाण्यावर एकच प्रतिमा आहे. हें नाणें साऱ्या हिंदुस्थानांत चालतें.

हे सारे उत्सव समारंभ व फौजेची हजिरी वगैरे आटपल्यावर राजा मागें वर्णन केलेल्या नव्या शहराला परत गेला. तें त्यानें स्वतः नवें दोनच वर्षांत वसविलेलें आहे. यामुळें त्याला तेथें भारी आनंद वाटतो. राजा तेथें गेला तेव्हां तेथील लोकांनीं मोठा आनंद महोत्सव करून त्याचें स्वागत केलें. त्यावेळीं तेथें जागजागीं उंचा कपड्याचीं गुढ्या तोरणें वगैरे टांगून चांगली शोभा आणिली होती. रस्त्यावर ठिकठिकाणीं सुरेखसे विजयस्तंभ, तोरणें व कमानी उभ्या केल्या होत्या. तेथें पोहोंचल्यावर राजानें खाशा गारदी लोकांची हजिरी घेतली आणि त्यांना वर्षाचा मुशाहिरा वांटून दिला, इकडे वर्षाचा पगार प्रारंभीं अगाऊ देण्याची वहिवाट आहे. खासगीकडील एक अधिकारी सर्वांची तपासणी करितो. प्रत्येकाचें नांव, चेहरे पट्टी व तोंडावर किंवा अंगावर असलेल्या खाणाखुणा लिहून घेतात. त्यांतील कांहीं लोकांना मागूर पाहून अधिक उणी १००० पासून ६०० परडाओ–किंवा त्याहूनही कमी–तनखा असते. कांहींच्या तैनातीला दोन तीन घोडे असतात, त्यांचा विशेष मान असतो. बाकीच्यांकडे एकेकच घोडा राहतो. या स्वारांवर निरनिराळे हुद्देदार नेमलेले आहेत. ते आपापल्या खात्यांनिशीं ठरलेल्या वेळीं पाळीपाळीनें राजमहालावर पाहारा देतात. हे खासे पाहारेवाले ५०० आहेत. ते आपापलीं हत्यारें बांधून सज्ज होत्साते राजवाड्याच्या देवडीवर पाहारा देतात. आंतल्या बाजूस दोन पाहारे निराळे राहतात. त्यांच्या खेरीज ढाल तरवारी बांधणाऱ्या लोकांचेही पाहरे असतात.

याप्रमाणें राजा त्या नव्या शहरांत असतांना 'फिग्यूरिडो' यांनीं त्याला विनंती केली कीं, माझ्या बरोबर पुष्कळसे नवीनच आलेले जातभाई आहेत. त्यांनीं विजयनगर कधीं पाहिलेलें नाहीं. त्यांना तेथील राजमहाल दाखविला जाण्याबद्दल कृपाकरून परवानगी व आज्ञा व्हावी. तो त्यांच्या पाहण्यांत आल्यानें, देवाच्या दयेनें ते स्वदेशीं परत जातील तेव्हां, त्यांना त्याचें तिकडे वर्णन करण्याचा प्रसंग मिळेल व तें वर्णन करण्याचा त्यांना मोठा आनंद वाटेल. यावर राजानें ताबडतोब त्यांना आपले कांहीं महाल दाखविले जाण्याची परवानगी दिली. जनानखान्याचे महाल पहाण्याची कोणालाच परवानगी मिळत नाहीं.

आम्हीं विजयनगराला परत गेलों तोंच, तेथील मुख्य अधिकारी 'सालुवा तिम्मा' याचा भाऊ गामडा राजा–गौडा राजा–यानें आम्हाला राजमहाल दाखविला. उत्सवांत जणों प्रदर्शनासाठीं आलेल्या राण्यांच्या कडील स्त्रिया ज्या दरवाजानें परत गेल्याचें मागें लिहिलें आहे, त्याच्या आंत गेल्यावर

समोरच तसाच दुसरा दरवाजा लागतो. त्या दाराशीं पोहोंचल्यावर बरोबरच्या हुद्देदारानें आम्हाला उभे करून सर्वांची गणती केली, व एकेकाला आंत सोडलें. तसे आम्हीं एका चौकांत जाऊन पोहोंचलों. त्या चौकाच्या भिंती व जमीनी साफ व चुनेगच्ची होत्या. आम्ही आंत शिरलेल्या दरवाजाच्या समोर पलीकडे डाव्या हाताला आणखी एक तसाच दरवाजा आहे. त्याच्या लगत तिसरा दरवाजा आहे तो बंद होता. समोरचा दरवाजा खास राजाच्या महालांत जाण्याचा. त्याच्या दोहीकडे दोन रंगीत व हुबेहुब पुतळे तयार करून ठेवलेले आहेत. त्यांतील डावीकडचा हल्लींच्या राजाचा व उजवीकडील त्याच्या बापाचा. त्यावरून पुत्रापेक्षां बाप जास्त काळसांवळा, सदड, व उंच आणि भरदार बांध्याचा दिसतो. या पुतळ्यांवर नेहमींच्या रिवाजाप्रमाणें व जिवंत असतांना घालीत असल्याप्रमाणें पोषाख चढविलेला आहे.

या दरवाजांतून पलीकडे जाऊं लागलों तरी त्यांनीं पुनः आमची गणती केली. नंतर आम्ही एका लहानशा महालांत शिरलों व तेथील वस्तू पाहूं लागलों. आंत जातांच डावीकडे दुमजला दलानें आहेत. त्यांतील तळचा मजला कांहींसा खोलगट असून, दोन पायऱ्या उतरून त्याच्यांत जावें लागतें. त्या पायऱ्या मुलामा केलेल्या तांब्याच्या पत्र्यांनीं मढविलेल्या आहेत. आंत जमीनीपासून छतापर्यंत सर्वत्र खरा सोन्याचा पत्रा जडलेला आहे. नुसता मुलामा केलेला नव्हे. त्याला बाहेरून मेघडंबरीशी केलेली आहे. त्याच्या पुढें चौकोनी मंडपी आहे. ती वेताच्या जाळीची आहे. (या राजवाड्यांतील सर्व इमारतींची पुर्ती नासधूस होऊन आतां त्यांचा मागमूस सुद्धां उरलेला नाहीं. तथापि त्या जागीं जपून काळजीपूर्वक खोदविलें गेलें तर साऱ्या राजवाड्याचा तळभाग स्पष्ट निघून येईल हें खास आहे. हल्लीं दिसत असलेल्या ढिगांमध्यें, येथें वर्णन केलेल्यापैकीं पुष्कळसें अप्रतिम कोरीव काम व त्याचे अवशेष निघून येतील. 'पायेस' यानें वर्णन केलेल्या ज्या शोभिवंत सुंदर, व विस्तीर्ण चवुत्र्यावर बसून राजा उत्सवसमारंभ पहात असे त्याच्या, म्हणजे नुकतेंच वर्णन आलेल्या दरवाजाच्या जागे जवळ दोन भले मोठे दाराच्या कवाडांचे सुबक, कोरीव, दगडी भाग दगड मातीमध्यें गडलेले बरेचसे वर दिसताहेत. हीं कवाडें एकेकाच दगडाचीं-एकसंधी आहेत. त्यांच्यावर लांकडी कामाप्रमाणें तवकें पाडलेलीं असून, मोठमोठीं कुसेंही काढलेलीं आहेत. या वर्णनामध्यें लक्ष्यांत न येण्याजोगे इमारतीचे भाग आहेत त्याविषयीं निवाडा जागजागीं खोदून पाहिल्यानें होणार आहे. दगडी कोरीव काम सारें तोडलें फोडलें गेलें तरी जागच्या जागींच पडलेलें असावें.) माणकें, हिरे, मोती, वगैरे तऱ्हेतऱ्हेचीं रत्नें लावून, या मंडपींत जडावाचें काम केलेलें आहे. तिच्यावर दोन

सुवर्णाचें गोल टांगलेले आहेत. हें जडाऊ काम पेठेघाटी असून त्याच्या मध्यें बारीक मोत्यांचें जाळीदार वेलबुट्टीदार भरतीचें काम केलेलें आहे. घुमटावरही अनेच गोलंदर किंवा कळस आहेत. या कमऱ्यामध्यें एक पलंग होता. त्याचे खूर त्या मंडपीच्या खांबाच्या आकाराचेच होते. पलंगाच्या ईसांना-आडव्या उभ्या बाजूंना—सोन्याचे पत्रे जडून चोहोंकडे सुमारें वीतभर उंच सोन्याचा कठडा केलेला होता. पलंगावर काळ्या साटिणीचा गादी घातलेली होती. तिच्यावर दोन उशा होत्या. सरपोस घातलेला नव्हता.

वरच्या कमऱ्यांत काय होतें कोण जाणें. तो आम्हाला पाहण्याला मिळाला नाहीं. उजवीकडील तळमजल्याची कोठडी आम्ही पाहिली.

या महालांत एक दलान आहे. त्याच्यांतील खांब कोरीव दगडाचे आहेत. बाकीचें सारें काम हस्तीदंती आहे. खालपासून वरपर्यंत भिंती, खांब, तुळया, जंते, वासे, कडीपाट, वगैरे सर्व कांहीं हस्तीदंताचे आहे. तुळया व पाटणी यांच्यावर गुलाबाचीं फुलें व कमळें कोरलेलीं आहेत. तींही हस्तीदंताचीं व फारच सुरेख आहेत. हें सारेंच काम भारीच सुंदर व मौल्यवान आहे. त्याच्या तोडीचें काम इतर कोठेही क्वचितच आढळेल. याच बाजूला, या राज्यांत येणाऱ्या सर्व तऱ्हेच्या लोकांच्या-आम्हां पोर्चुगीज लोकांच्या सुद्धां- तसबिरी व चित्रे काढलेलीं आहेत. तीं हुबेहुब आहेत. त्यांच्यामध्यें त्या त्या लोकांचे पहराव, रीत रिवाज व राहणी, फार सुरेख दाखविलेली आहे. जनानखान्यांतच पडद्यांत आयुष्य काढावें लागणाऱ्या राण्या वगैरे स्त्रियांना, बदल्या जागींच या सर्व लोकांची राहणी वगैरे उत्तम तऱ्हेनें पाहण्याला मिळते. त्या त्या लोकांतील अंध, पंगू, भिकारी, यांचीं सुद्धां चित्रे आहेत.

या महालामध्यें दोन सोन्याचीं सिंहासनें आणि एक मच्छरदाणी लागलेला चांदीचा पलंग आहे. येथेंच एक हिरव्या गारेचा—लाजवर्दी दगडाचा-लहानसा पण व्यासारखा तुकडा आहे. तो भारीच मौल्यवान व महत्त्वाचा मानतात. याच्या लगतच कांहीं कमानी मधून महालांत जाण्याचा दरवाजा आहे. त्याला लागून एक लहानसें दार आहे, त्याला कुलुपें लागलेलीं आहेत. त्याच्या आंत कोणा मागील राजाच्या वेळची शिल्लक सांठविलेली आहे, असें आम्हाला बरोबरच्या लोकांनीं कळविलें.

या महालांतून निघतांच आम्ही एका चौकांत गेलों. हत्तीची साठमारी किंवा तशाच अरण्य वनपशूंच्या टकरा होण्याच्या आखाड्या प्रमाणें हा चौक विस्तीर्ण होता. त्याला चोहीकडून सारखी चुनेगच्ची केलेली होती. त्याच्या

मध्य भागाच्या सुमाराला दोन लांकडी खांब उभे करून, त्यांच्यावर एक आडवें बहाल घातलेलें होतें. त्याच्यावर मुलामेदार तांब्याचे पत्रे मढविलेले होते. त्या बहालांतील आंकड्यांना राण्यांचे झुले किंवा झोपाळे टांगण्यासाठीं चांदीच्या सांखळ्या लाविल्या होत्या. ( ही दोलोत्सवाची जागा असावी. ) या चौकाच्या दरवाजा जवळच उजवीकडे चार पायऱ्या चढून आम्ही असल्याच दुसऱ्या कांहीं सुंदर महालांमध्यें गेलों. ते एक मजली माळवदाचे होते. कांहींवर गच्च्या व दुसरे मजले होत. हीं माळवदें चुने गच्चीही असतात. तेथेंच एक सभामंडप आहे. त्याचे खांब दगडी आहेत. त्याच्यावर छतही दगडीच आहे. सारें दगडी व लांकडी काम, याच्यावर मुलामा केलेला आहे. यामुळें हा मंडप सारा सोन्यानें मढविलेला दिसतो.

या मंडपाच्या तोंडाशीं मधल्या खणामध्यें चार खांबांवर एक देव्हारा किंवा मंडपीशी आहे. तिच्या मध्यें नृत्य करणाऱ्या स्त्रियांचीं पुष्कळशीं चित्रें आहेत. दगडी कामामध्येंही लहान लहान मूर्ती कोरून त्यांना मुलामा केलेला आहे. त्यांतच पानाफुलांचें उठावदार मोकळेंसें काम केलेलें आहे. त्या पानांच्या पाठीलाही एक तऱ्हेचा लाल रंग दिलेला आहे. हा मंडप देवालयाचा असल्यानें दुसऱ्या कामीं उपयोगांत आणीत नाहींत. त्याच्या एका बाजूला एक लहानसा दरवाजा आहे. तो बंद होता. त्याच्या आंत देवाची मूर्ती होती. या देवाचा उत्सव होतो तेव्हां त्याची उत्सव मूर्ती एका सुवर्ण सिंहासनावर बसवून मिरवत या बुद्ध्या तयार केलेल्या मंडपींत नेऊन बसवितात. तेथें ब्राम्हण तिची पूजा करितात. तिच्या पुढें नाच, गाणें, भजन, चालतात.

या जागेतून उतरून आम्ही चौकाच्या डाव्या बाजूला गेलों. तिकडे एक पडशाळा आहे. तिच्यांतही पुष्कळशा बिनमोल वस्तू पाहण्यांत आल्या. एक रुप्याच्या सांखळ्यांनीं टांगलेला झोपाळा होता. त्याचे खूर सोन्याचे, व बाजवा सोन्यानें मढविलेल्या होत्या. त्यांचें काम फारच सुरेख होतें. तशी कारागिरी इतर कोठेंही दृष्टी पडण्याजोगी नाहीं. या पलंगासमोर एक कमरा होता. त्याच्यांत सोन्याच्या कड्यांनीं टांगलेला झोपाळा होता. त्याच्या सोन्याच्या खुरांवर अप्रतिम जडावाचें काम केलेलें होतें. अडवटें सोन्यानें मढविलेलीं होतीं. या कमऱ्यावर एक लहानशीच कोठडी होती. तिला सोन्यानें मढवून उत्तम रंगाचें कामही केलेलें होतें. या कोठडीवरून त्या दलानांतूनच पुढें गेल्यावर, समोर एक कोठडी या राजानें बुद्ध्या तयार करविलेली आहे. तिच्या बाहेरच्या बाजूस वीर स्त्रियांचे हातीं धनुष्यबाण धारण केलेले पुतळे

आहेत. या कोठडीचें रंगाचें काम चालूच होतें. तें बाकीच्या सर्व कोठड्यांतल्या कामापेक्षां सुरेख व्हावयाचें असून, तेथील जमीन, छत सर्व कांहीं सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलें जावयाचें आहे, असें बरोबरच्या लोकांनीं कळविलें. या पडशाळेपलीकडे दुसरी एक तशीच पडशाळा कांहींशी उंच होती. तिच्यामध्यें आम्ही गेलों. तेथें एका कोपऱ्यामध्यें सोन्याचे मोठमोठे तीन टोप ठेवलेले होते. प्रत्येकामध्यें एकदम सहज अर्धी खंडी तांदूळ शिजतील. त्यांच्या शेजारींच रुप्याचे कितीतरी मोठमोठे टोप व पुष्कळशीं लहान मोठीं सोन्यारुप्याचीं भांडीं व हंडे ठेविलेले होते. तेथून एका लहानशा जिन्यानें वर चढून आम्ही एका लहान दारांतून एका महालांत शिरलों. तेथें राजवाड्यांतील नृत्यशाळा होती. राण्या नृत्य शिकण्यासाठीं येथेंच येतात. त्यांतील मुख्य दलान चांगलें लांब आहे. त्या मानानें त्याची रुंदी नाहीं. त्याच्यांतील दगडी खांबांवर मूर्ती कोरलेल्या आहेत. ते खांब व त्या मूर्ती बाजूच्या भिंतीपासून सुमारें दोन दोन हात पुढें आणलेल्या आहेत. खांबा खांबामध्यें सुमारें तीन तीन हात अंतर आहे. हे खांब साऱ्या दलानभर आहेत. ते अर्धे अर्धे दिसतात. त्यांचा बराच भाग कोरून सुटा केलेला आहे. या साऱ्या कामावर सुरेख मुलामा केलेला आहे. खांबावरील टोपीच्या दगडांत हत्ती व इतर वनपशू मोकळे व उठावदार कोरलेले असल्यानें त्यांच्या पलीकडील तशींच चित्रें दिसण्याला अडचण पडत नाहीं. मूर्ती विविचित स्थिती, ध्यान व मुद्रा द्योतक आहेत. पठीला पाठ लागलेलीं माणसें व इतर प्राणी यांचीं ही चित्रें कोरलेलीं आहेत. दोन दोन खांबांवर एकेक आडवट दिलेलें आहे. तें कवडाप्रमाणें तबकडीदार विभागलेलें आहे. दोन खांबांच्या मध्यें असे बरेचसे तबकडीदार दगड बसविलेले आहेत. तेथें हात हात भर उंच अशा वृद्ध माणसांच्या मूर्ती कोरून, त्यांच्यांवर मुलामा केलेला आहे. प्रत्येक तबकडीमध्यें एकेक याप्रमाणें साऱ्या दलानभर या मूर्ती बसविलेल्या आहेत. खांबांवरही अशाच मूर्ति पण कांहींशा लहान, त्यांचवरुन त्याहून लहान, याप्रमाणें उतरत्या प्रमाणांत थेट घुमटापर्यंत अशा मूर्ती पोहोंचविलेल्या आहेत. या घुमटाच्या आंतल्या बाजूला सर्व खांबांवरून अशाच लहान लहान होत आलेल्या चित्रांचीं तबकें एकत्र मिळालीं होतीं. त्यांच्या पोकळींतलें कोरीव काम फारच सुरेख व सुंदर होतें. तें आम्हीं पाहिलेल्या साऱ्या कामांमध्यें आम्हाला मेरुमणी सारखें वाटलें. या मूर्ती व हे खांब यांच्या दरम्यान एक फूल पत्तीदार बेलसा कोरलेला आहे. त्यांतील साऱ्या पत्तीला मुलामा केलेला असून तिच्या पाठीला लाल व निळा रंग दिलेला आहे. खांबांवर हरिणादिक वनचर

प्राण्यांचीं चित्रें कोरलेलीं आहेत. त्यांच्या तोंडावरील आरक्त वर्ण सुद्धां साफ दिसे, असा त्यांना सुरेख रंग दिलेला आहे. हत्तींच्या वर व तबकांच्या मध्यें अप्सरांच्या बसक्या मूर्ती कोरलेल्या आहेत. त्या अप्सरा लहान लहान खंजिऱ्या वाजवीत आहेत.

प्रत्येक नृत्यविशेषामध्यें अखेरीला नर्तकीचा जो पवित्रा असतो किंवा असावा, त्याचीं या तबकड्यांमधील चित्रें द्योतक आहेत. प्रत्येक तबकांत निरनिराळा नृत्याचा प्रकार दाखविलेला आहे. त्याच्यावरून नृत्य शिकत असतांना प्रत्येक तऱ्हेच्या नृत्याच्या शेवटीं कशा रीतीनें उभें राहिलें पाहिजे, तें जणों प्रत्येक नर्तकीला प्रत्यक्ष दिसून येऊन, नृत्याचा पाठ आपोआप मिळतो व तो घटवितांना विसरण्याला जागा रहात नाहीं. केव्हां काय करावयाचें तें त्यांच्या तेव्हांच लक्ष्यांत येत राहतें.

या दलानाच्या टोंकाला डावीकडे एक आडोशाची व सुरेख रंगवून तयार केलेली जागा आहे. तेथें नृत्य शिकणाऱ्या स्त्रिया आपले हातपाय व सर्वांग चांगलें साफ ताणलें जावें, शीण कमी होऊन हुशारी वाटावी आणि चपलपणा यावा म्हणून कसरत करितात. त्याच्या समोरच्या टोंकाला उजवीकडे जागा केलेली आहे. तेथें नृत्यशिक्षा चालू असतांना राजा बसून पाहतो. या जागेची जमीन भिंती वगैरे सोन्यानें मढविलेल्या आहेत. भिंतीच्या मध्यभागीं सुमारें एक बारा वर्षांच्या कन्यकेची सुवर्णमयी प्रतिमा आहे. तिचे हात एका विवक्षित प्रकारच्या नृत्याच्या अवसानाच्या वेळीं असावे तसे उंच केलेले आहेत.

याहून जास्त भाग कांहीं त्यांनीं आम्हाला पाहूं दिला नाहीं. राणी महालामध्ये परपुरुषाचा प्रवेशच होत नाहीं. तेथें सारे हिजडेच असतात. या विषयीं मागें लिहिलें आहेच. येथूनच परत फिरून आम्ही आलेल्या मार्गानें आंत प्रवेश केलेल्या मुख्य दरवाजाशीं आलों. तेथें आमची पुनः गणती झाली.

या विजयनगर शहरांत राहतीं नांदतीं घरें एक लाख आहेत म्हणे. तीं सारीं बहुतेक एकमजली व माळवदी आहेत. (या मानानें घरटी ५ पासून १० पर्यंत माणसें धरलीं तरी, सर्व लोकसंख्या ७।८ लाखांच्या आंतच येते.) प्रत्येक घरासभोंवार लहानशी भिंत बांधलेली असते. राजा बहुतकरून याच शहरांत राहतो. या शहराच्या उत्तरेला खडबडीत पाहाड्या आहेत. त्यांच्या व शहराच्या दरम्यान नदी वाहाते. शहराचा कोट थेट पाहाड्यांच्या शिखरांपर्यंत पोहोंचविलेला आहे. पलीकडे 'नागांदियम'–अनागुंदी,–शहर आहे. त्याला कायत्या

तीनच वेशी आहेत. त्यांतून एक नदीवर आहे. तेथूनच टोकऱ्यांतून जाणारे येणारे लोक नदी पार होतात. ( हा दरवाजा व वेस अद्यापि आनीगुंदीच्या पाणवठ्यावर कायम आहेत. ) दुसरी वेस उत्तरेकडे आहे. हा दरवाजा व या बाजूचा तट सर्वांत अधिक मजबूत आहे. तिसरी लहानशी वेस वायव्येकडे, दोन लहानशा पहाड्यांच्या मध्यें बांधलेली आहे. तिकडील वाट फार बिकट आहे. तिच्यावरून एकेकच स्वार सरळ जाऊं शकतो.

विजयनगराच्या वायव्येला लागूनच कृष्णपूर शहर आहे. ( तेथें एका उत्कृष्ट मंदिराचे अवशेष अद्यापि कायम आहेत. ) या शहरांत सारीं मंदिरेंच बांधलेलीं आहेत. त्या सर्वांमध्यें पूजा अर्चा होते. या शहराचें सारें उत्पन्न या मंदिरांच्या खर्चाकडे लावून दिलेलें आहे. तें एक लाख परदाओ-होन-आहे म्हणे. हीं मंदिरें कितीतरी उंच बांधलेलीं आहेत. त्यांच्या बाहेरच्या बाजूवर स्त्री पुरुषांचीं पुष्कळशीं-बहुतेक बीभत्स अशीं-चित्रें आहेत.

दक्षिणेकडे नगलपूर गांव वसलेलें आहे. तें मैदानांत आहे. आदिलशहानें विजयनगराला वेढा घातला त्या वेळीं त्याचा व त्याच्या साऱ्या फौजेचा तळ त्याच जागीं पडला होता. तें त्यानें उध्वस्त करून टाकलें. पण तें पुनः आबाद झालें आहे. तें विजयनगरापासून सुमारें एक कोसावर आहे.

पूर्व बाजूला ? 'ओंडे गेमा' (ओंडेगेमा, किंवा नागलापूर-हल्लींचें होसपेठ.) नांवाचें गांव आहे. हें नांव त्याला राजाच्या आवडत्या राणीच्या नांवावरून दिलें गेलें आहे. राजानें तें तिच्या प्रीतीस्तव नवें वसविलें. ( हे वाक्य किंबहुना हे शेवटचे चारी प्यारे क्षेपक असावेत. आदिलशहाची स्वारी सं. १५३५-३६ सालीं झाली. तिचा उल्लेख या सं. १५२२ सालीं लिहिलेल्या कैफीयतीमध्यें येणें शक्य नाहीं. )

# ' फरनाओ नूनीज ' याची कैफियत.

(सं. १५३५-३७ सालच्या सुमारास लिहिलेली.)

## भाग पहिला.

---

ई० सं. १२३० सालीं ' बिसनग '-विजयनगर--च्या राज्याची वाताहत झाली तेव्हांपासून तेथें राज्य करीत आलेल्या राजांच्या बखरीची नक्कल व सारांश. (येथें ' बिसनग ' च्या राज्याची वाताहत झाल्याचा उल्लेख आहे तो बहुधा महंमद तघलख बादशहानें आनीगुंदीचें राज्य पादाक्रांत केलें व तें शहर उध्वस्त करून टाकलें, त्यालाच उद्देशून आहे. कारण त्या वेळीं विजयनगर स्थापन झालेलें नव्हतें.)

ई० सं. १२३० या सालीं या हिंदुस्थानच्या दक्षिण भागावर दिल्हीच्या सुलतानाचा अमल होता. त्याच्या इतका थोर, प्रतापी, व भाग्यशाली राजा पूर्वी कधींच झालेला नव्हता. त्यानें स्वतःच्या पराक्रमानें व सैन्याच्या बळावर खंबायतच्या राजा बरोबर पुष्कळ वर्षें युद्ध चालवून, त्या राज्यांतील गुजराथ देश काबीज केला व तेथें धूळधाण उडविली. अखेर तो देश त्यानें आपल्या राज्यांत सामिल केला. (हें साल सुमारें एक शतकानें चुकलें आहे. तें ई. सं. १३३० च्या सुमाराचें पाहिजे. खंबायत गुजराथच्या राज्यांत सामिल होतें. अशी चुकी परद्वीपस्थ लोक पुष्कळदां करीत आलेले आहेत.)

अशा शत्रूवर विजय संपादून व हें राज्य घेऊन सुद्धां त्याला संतोष वाटला नाहीं, किंवा त्याची महत्वाकांक्षा पूर्ण झाली नाहीं. त्यानें भली मोठी फौज तयार केली. तिच्यांत कितीतरी स्वार व पायदळ होतें. ती फौज घेऊन त्यानें बिसनगच्या रायांशीं लढाई करण्याचा निश्चय केला. स्वतःच्या राज्या मध्यें सुद्धां त्याला पुष्कळ शत्रू होते. त्यांच्यापासून आपल्या राज्याचा बचाव करण्यासाठीं त्यानें मागें कांहीं सरदार फौजबंद ठेविले. याच अवसरांत त्याचें बंगाल्यांत, आणि शेख इस्माइलच्या राज्यांतील ईराण देशाच्या सरहद्दीवर तुर्कोमन लोकांशींही युद्ध चालूच होतें. हे तुर्कोमन लोक गौरवर्ण व शरीरानें धिप्पाड असतात. त्यांच्या देशांत पुष्कळ घोडे पैदा होतात. त्या घोड्यांवर स्वार होणाऱ्या फौजेनिशींच या दिल्हीच्या राजानें खंबायतच्या राजाशीं युद्ध करून, तो प्रदेश उध्वस्त केला होता. तें राज्य काबीज झाल्यावरही त्याच्या जवळ आठ लक्ष स्वार शिल्लक होते. पायदळाची संख्या देणें व्यर्थ. त्याची

गणती होणें सुद्धां मुष्कील, इतकें तें असंख्य होतें. अशा फौजेसह त्यानें 'बिसनग' वर स्वारी केली.

बिसनगरचें राज्य आपल्या अमलाखालीं आणण्याचा निश्चय करून सुलतानानें तावडतोप त्या राज्याच्या हद्दींत प्रवेश केला. हें राज्य त्यावेळीं चांगलें विस्तीर्ण होतें. खंबायतचें राज्य सोडून त्यानें बालाघाटाकडे मोर्चा फिरविला. हा भाग त्या वेळीं आदिलशाही अमलाखालीं होता. (बालाघाट किंवा घाटावरचा प्रदेश वरच्या बाजूनें सपाट व सुपीक असल्याविषयीं आणि तो निरनिराळ्या राजांच्या अमलाखालीं असल्याविषयीं तत्कालीन इतर लेखकांनींही वर्णन केलें आहे. यांतील निरनिराळ्या भागांवर बिसनगर—आनेगुंदी,—बालाघाट व खंबायत येथील राजांचा अंमल होता, असा उल्लेख आहे. आदिलशाही राज्याची राजधानी बिजापूर येथें होती. पण महंमद तघलखाच्या वेळीं तें राज्य अस्तित्वांत आलेलें नव्हतें.)

महंमद तघलखानें त्या प्रदेशांतील पुष्कळशीं शहरें व ठाणीं घेतलीं. तसे तेथील सर्व लोकांनीं त्याला आपलें सर्वस्व अर्पण केलें. त्यांचीं हत्यारें मात्र त्यांच्याजवळ राहिलीं. तीं काढून घेण्याचा त्याचा इलाज चालेना.

बालाघाट सर करून तो 'दुरी' नदीवर पोंहोचला. ती बिसनगरचे सरहद्दीवर होती. ('ही बहुधां मलप्रभा असावी. दुरी म्हणजे धारवाड असेल.' असें सीवेल साहेब म्हणतात. पण हे दोन्ही कयास ठीक नाहींत. ही नदी गोदावरी किंवा कृष्णा असणें अधिक संभवतें. बालाघाटाहून दक्षिणेंत आनीगुंदीकडे येतांना या नद्या उतराव्या लागतात.) त्या नदीवर त्याला कोणी अटकाव करण्याला नव्हतें. ती तो टोकऱ्यांतून पार उतरला. या भागांत त्यावेळीं फारशी वस्ती नव्हती. पुढें विजयनगरच्या राज्यांत सामील असतांना हा भाग चांगला आबाद झाला. मोठें व आबाद शहर असें आनीगुंदी हेंच होतें. तेंच 'बिसनग' च्या राजाची राजधानी होती. तें शहर फारच मजबूत होतें. त्याच्या इतका मजबूत व दुर्गम किल्ला त्या वेळीं त्या राज्यांत दुसरा कोणचाही नव्हता. तेथील राजा जणों आपल्या नाशाचीच वाट पहात तेथें राहिला होता. (यावेळीं आनीगुंदीचें लहानसें राज्य होतें. विजयनगर पुढें स्थापित होऊन भरभराटीस आलें.)

सुलतान टोकऱ्यांतून नदी उतरला तेथून, आनीगुंदी शहर सुमारें २५ कोसांवर होतें. हा मधला प्रदेश सपाट मैदानाचा होता. फौजेला घास दाणा व पाणी मिळण्याला हा नदीकांठचा मोकळा व मैदानाचा भाग चांगला असल्यानें तेथच तळ दिलेला बरा, असें सुलतानाला वाटलें. त्यावेळीं उन्हाळा लागून पाण्याचें भारी दुर्भिक्ष झालेलें होतें. त्या सपाट प्रदेशांतील थोड्याशा

तलावांत असलेलें पाणी त्याच्या बरोबरचीं माणसें, हत्ती, घोडे, वगैरेंना दहा पांच दिवस सुध्दां पुरतेंना. सबब आपल्या प्रचंड फौजेला पाणी पुरण्याइतका पाऊस पडे पर्यंत, तो त्या नदी कांठींच तळ देऊन राहिला.

दिल्हीच्या राजाबरोबरचा अफाट फौजफांटा व सरंजाम यांच्या पुढें निभाव लागणार नाहीं, हें जाणून 'बिसनग' च्या राजानें आनीगुंदी शहर सोडून जाण्याचें ठरविलें. तें शहर फारच बळकट होतें व त्याला बहुतेक अभेद्य तटबंदी होती. त्याच्या खालींच 'नागंदी' नांवाची नदी आहे. तिच्या वरून त्याला हें नांव पडलें. तो राजा 'श्रीनमट' नांवाच्या किल्ल्याच्या आश्रयाला निघून गेला. तो किल्ला त्याच नदीच्या कांठावर होता. तेथें धान्य सामग्री व पाणी विपुल होतें. तरी, तें शहरांतून त्याच्या बरोबर जाणाऱ्या ५०००० लोकांना पुरे इतकें नव्हतें. (हा किल्ला कोणता तें नक्की सांगतां येत नाहीं. तो कदाचित आनीगुंदीचाच वाले किल्ला असेल.) सबब राजानें त्यांच्यांतून निवडक ५००० लोकांना त्यांच्या सामान सूमानासह बरोबर किल्ल्यांत घेऊन बाकीच्यांना दुसऱ्या किल्ल्यांच्या आश्रयाला जाण्यास सांगितलें.

याप्रमाणें राजा किल्ल्यांत व्यवस्था करून राहिल्यावर दिल्हीच्या फौजेनें येऊन त्याला घेरा दिला. यापूर्वी सुमारें बारा वर्षांपासून दोघांचें युध्द जारीचसें होतें. किल्ला फार दिवस वेढला राहण्याचें कारण पडलें नाहीं. आंतील लोकांची सर्व धान्य सामग्री लौकरच संपली. (आनीगुंदीच्या राजाला स्वत: दिल्हीच्या सुल्तानाशीं बारा वर्षें युध्द जारी ठेवण्याचा प्रसंग केव्हां व कां आला तें कळत नाहीं व तसें तें जारी राहिल्याचा ऐतिहासिक दाखलाही नाहीं. दिल्हीच्या सुल्तानाशीं, गुजराथेचा राजा, होयसल बल्लाळ राजे व वरंगळ येथील राजा, यांचे पुष्कळ वर्षे सारखे झगडे चालू होते. त्यांमध्यें हा राजा प्रत्यक्ष नाहीं तरी परंपरया गुंतण्याचा संभव नव्हता असें नाहीं.)

आपल्या साऱ्या लोकांचा नाश केल्या शिवाय वेढा उठवावयाचा नाहीं असा दिल्हीच्या फौजेचा निश्चयसा पाहून राजानें आपले सारे लोक एकत्र जमविले व आपल्या आणीबाणीच्या स्थितीबद्दल त्यांना कळकळीनें वर्णन करीत म्हटलें, 'दिल्हीच्या राजाच्या फौजेनें आपल्या राज्यांत जी कांहीं धूळधाणी केली आहे ती तुम्हाला माहितच आहे. ते लोक इतक्यावर ही तृप्त न होतां आतां आपल्याला वेढून बसले आहेत. येथें तर खाण्यापिण्याला कांहीं उरलें नाहीं. या स्थितींत नेटानें लढून धारातीर्थी प्राण अर्पण करण्या वांचून गत्यंतर नाहीं. राजधानींतील साऱ्या लोकांतून मीं तुम्हालाच खरे जिव्हाळ्याचे

सोबती म्हणून निवडून बरोबर घेतलें. तुम्ही आजवर जसें प्रेम व स्वामिभक्ति दाखवीत आलां तशीच ती या निर्वाणीच्या प्रसंगींही कायम राखा, हीच माझी शेवटची प्रार्थना आहे. आज दिल्हीच्या राजाच्या फौज बरोबर निकरानें लढण्याचा मी निश्चय केला आहे. यावेळीं माझें सारें राज्य, सारी प्रजा, व राजसत्ता, यांच्यांतून कायतो हा किल्ला व हे तुम्ही जिव्हाळयाचे लोक उरलेले आहां. तुम्ही सारे सज्ज होतसाते आज मज बरोबर या शेवटच्या प्रसंगालाही तयार व्हा, आणि आपलें सर्वस्व हरण करणाऱ्या या शत्रूला आपण निकरानें व निश्चयानें लढून आपले प्राणही अर्पण करूं या.'

हें भाषण ऐकून त्या सर्वांना भारी समाधान वाटलें. लौकरच ते शस्त्रास्त्रें घेऊन सिध्द झाले. तेव्हां राजानें त्यांना पुनः म्हटलें, 'या धारातीर्थाचा आश्रय करण्यापूर्वीं आणखी एक रणकंदनसेंच करावयाचें आहे. तें स्वतःच्या कन्या, पुत्र, कुटुंब, इत्यादिकांशीं. आपल्यामागें त्यांना शत्रूनीं धरून नेऊन कामीं आणावें, हें ठीक नाहीं. मीच प्रथम स्वतःच्या कुटुंबांतल्या माणसांची वाट लावतों.' यावेळीं ते सर्वजण एका मोठ्या मोकळया चौकांत उभे होते. तो चौक बाले किल्ल्याच्या पुढेंच होता. तेथें खुद्द राजाच्याच हातानें त्याच्या राजपत्न्या, कन्या, व पुत्र, वगैरे मिळून सुमारें पन्नास बळी पडले. त्याचेंच अनुकरण इतरांनींही करून आपापलीं बायका मुलें ठार केलीं.

याप्रमाणें हें त्यांच्या दृष्टीनें मंगल, पण इतरांच्या मतें, त्वेष व किळस आणणारें राक्षसी कर्म आटपल्यावर त्यांनीं किल्ल्याचे दरवाजे उघडले व ते शत्रूवर तुटून पडले. त्या दरवाजांतून आंत शिरून शत्रूनें त्या सर्वांची कत्तल उडविली. त्यांतून कायते सहा वृध्द गृहस्थ जिवंत शत्रूच्या हातीं लागले. त्यांना त्यांनीं कैद करून दिल्हीपती पुढें नेलें. त्यानें त्यांना, ते कोण, काय, व कसे बचावले, तें विचारिलें, तेव्हां त्यांनीं त्या बद्दलचा खुलासा कळविला. तो ऐकून सुलतानाला भारी आनंद झाला. कारण ते सर्व माजी राज्याचे प्रमुख अधिकारी होते. त्यांतून एक मुख्य मंत्री व दुसरा मुख्य खजानदार होता. सुलतानानें त्यांना राजाच्या खजीन्याविषयीं माहिती विचारिली तेव्हां त्यांनीं त्या किल्ल्यामध्यें पुरून ठेविलेलें सारें द्रव्य काढून दिलें आणि राज्याच्या वसूल बासलाती संबंधेही माहिती दिली ती मिळाल्यावर सुलतानानें त्यांना आपल्या एका सेनापतीच्या हवालीं केलें व किल्ल्यांत पडलेलीं प्रेतें जाळून टाकविण्याविषयीं दुसऱ्या एका अधिकाऱ्याला हुकूम दिला. त्या सहा जणांनीं सुलतानाला विनंती करून राजाचें प्रेत समारंभानें आनीगुंदी येथें नेऊन

जाळण्याची परवानगी मागितली. ती सुलतानानें दिली. त्या दिवसापासून आनागुंदी, हें या वंशांतील राजघराण्याची स्मशानभूमीचशी कायम झाली. तिकडील लोक अद्यापपर्यंत त्या राजाला मोठा पुण्यवान मानतात.

---

# भाग दुसरा.

---

विजयनगरचें राज्य पार बुडवून, त्याचें संरक्षण करण्याची सुलतानानें केलेली व्यवस्था.

दिल्लीच्या सुलतानानें याप्रमाणें आपला संकल्प पार पाडला. कांहीं गांवाच्या लोकांनीं त्याच्या विरुध्द उठावणी केली. ते गांव जमीनदोस्त करण्याविषयीं त्यानें आपल्या कांहीं सरदारांना हुकूम दिला. शरण आलल्यांना त्यानें अभय दिलें. राजाच्या मरणानंतर तो सुमारें दोन वर्षें त्या राज्यांत राहिला. त्यापूर्वी सुमारें बारा वर्षें त्याचें त्याच्याशीं युध्द चाललें होतें. तो आपल्या वतनापासून-दिल्लीपासून-फार दूर-५०० कोसांहून अधिक अंतरावर-होता. त्याची अफाट फौज दूरवर पसरलेली होती. तितक्यांत काबीज केलेले प्रांत व राज्यें यांच्यामध्यें जागजागीं बंडें उद्भवल्याविषयीं त्याच्याकडे खबरा आल्या. त्या ऐकतांच त्यानें एकदम आपली सारी फौज परत एकत्र होण्याविषयीं हुकूम दिला. त्याप्रमाणें ती एकत्र जमूं लागली. त्या साऱ्या राज्यांत हा किल्ला फारच मजबूत होता. तेथें त्यानें कसाही प्रसंग आला तरी तूट पडूंनये इतकी, सर्व तऱ्हेचें सामान सूमान व सरंजाम, यांची बेगमी करून ठेविली आणि 'एनिबिकी मेली'-मलिकनायब-नांवाच्या सरदाराला तेथें पुष्कळशा फौजेसह हस्तक नेमून ठेविलें. त्या फौजेंतील प्रत्येक इसमाला त्यानें पुष्कळ व सढळ हातानें इनाम, जमीनी व इतर देणग्या दिल्या. त्यामुळें ते खुष झाले. त्यांनीं आपल्या वतनाला परत जाण्याची इच्छा व आशा साडून दिली व ते संतुष्ट होत्साते तिकडेच कायमचीं घरें करून राहिले.

---

# भाग तिसरा.

दिल्लीचा सुलतान फौजेसह परत निघाला. त्यानें किल्ल्यांत हातीं आलेल्या त्या सहा गृहस्थांना बरोबर घेतलें.

दिल्लीकडून आलेल्या खबरा ऐकून सुलतान आपल्या फौजेसह तिकडे जाण्याला निघाला. त्यानें विजयनगरच्या राज्याचा कुल अधिकार मलिक नबी-कडे सोंपून दिला होता. सुलतान या राज्याच्या बाहेर गेल्याचें कळतांच डोंगरांत व रानावनांत आश्रय धरून राहिलेले व केवळ आपापलें गांव उध्वस्त होण्याच्या भीतीमुळेंच सुलतानाची ताबेदारी पतकरून त्याची स्वामिभक्ति करण्याविषयीं शपथा घेतलेले लोक, मलिक नबीच्या विरुध्द उठले. त्यांनीं येऊन त्या किल्ल्याला वेढा दिला व त्याच्यांत रसद पोहोंचणें बंद करून त्यांच्यावर जबरदस्तीनें लादले गेलेले कर देणें बंद केलें. 'इकडे राहून कांहीं फायदा किंवा धडगत नाहीं, आपला हुकूम कोणी जुमानीत नाहीं व हुजूरा-कडून येणारी कुमक किती तरी दूर, सारा देश आपल्या विरुध्द उठलेला, जो तो आपल्या जागीं शिरजोर होऊन मालक बनलेला, आपल्या पक्षाला कोणीच नाहीं, तेव्हां पुढें काय करावें, याविषयीं आज्ञा व्हावी', अशा अर्थाचे निरोपावर निरोप सुलतानाकडे पाठविले. ते पोहोंचतांच सुलतानानें आपले मोठमोठे सरदार, सेनाध्यक्ष व कामगार, यांना बोलावून, मलिक नबीकडून विजय-नगरच्या स्थितीसंबंधें आलेल्या निरोपांतील मजकूर त्यांना कळविला व त्यांची सल्ला विचारिली. तो म्हणाला, 'तिकडील सारे जमीदार व सरदार मलिक नबीच्या ताबेदारींतून निसटून चालले आहेत. ते त्याच्या विरुध्द झाले आहेत. प्रत्येक जण थोडीशी सत्ता हातीं येतांच तिचा दुरुपयोग करून, सांपडेल त्याच्यावर मनसोक्त जबरदस्ती करूं लागला आहे. जो तो स्वतंत्र राजा बनतो आहे. न्याय इन्साफ कोणीच पहात नाहीं. हे लोक ज्याला वचकतील व ज्याची ताबेदारी मान्य करतील असा तिकडच्याच पैकींही कोणी तेथें उरलेला नाहीं, अशा स्थितींत तुम्ही उत्तम तजवीज कोणची व काय करूं शकाल तें सांगा. आपले इतके लोक कामीं येऊन व इतका खर्च व परिश्रम पडून संपादन झालेला हा सुरेख व संपन्न मुलुख हातचा जाऊं देणें ठीक नाहीं.'

यावर त्या मंडळींनीं विनंती केली 'तिकडचे ते सहा गृहस्थ हुजूरांकडे कैदेत आहेत. त्यांना बोलावून तिकडील माजी राजाचा कोणी नातेवाईक

धसल्यास विचारावें.' त्याप्रमाणें विचारपूस करितां तसा कोणीही मसल्याचें कळून आलं. त्या सहाजणांपैकीं एक पूर्वीच्या राजाचा प्रधान होता. कोणी नात्या गोत्याचा नव्हे. तरी त्यालाच हें राज्य सोंपावें अशी त्या मंडळीची सल्ला पडली. ती सुल्तानाला मान्य झाली. त्यानें त्या सहाही गृहस्थांवर कृपा करून त्यांना बंदमुक्त केलें. त्यांचा बहुमान केला. त्यांच्यांतील प्रधानाला राजा व खजीनदाराला त्याचा दिवाण कायम केलें. त्यांच्याकडून ताबेदारी व स्वामीभक्तीच्या शपथा घेवविल्या. त्यांना कोणी त्रास देऊं नये व आडवें येऊं नये म्हणून, त्यांच्या बरोबर मोठीशी फौज भरती करून दिली आणि त्यांना त्यांच्या मुलुखाकडे तावडतोब धाडिले. तसे ते आनीगुंदीस परत आले. तोंवर तेथाल सारीं घरें उध्वस्त होऊन नुसत्या भिंती व जोतीं उभीं होतीं व थोडेसे कंगाल लोक तेथें कसेबसे राहिलेले होते.

देवराव–( हें त्या नवीन राजाचें नांव होतें. ) तेथें दाखल झाल्याची खबर लौकरच सर्व राज्यांत पसरली. त्याला राजपद कसें मिळालें तेंही सर्वांना कळून आलें. विधर्मी राज्याधिकाऱ्यांची ताबेदारी त्यांना फार डंवचत होती. सबब या नवीन व्यवस्थेचें त्यांना समाधानच वाटलें. त्या दिवसापासून पुढें या राज्यावर राज्य करणारे सर्व राजे या देवरावाच्याच कुळांतले आहेत. सर्व लोकांनीं देवरायाचें आनंदानें स्वागत केलें. त्याला खाशा भेजवान्या दिल्या व मूळ राज्यापैकीं दाबून घेतलेले भाग ज्यांनीं त्यांनीं स्वतःच परत दिले. सर्व लोक मोठ्या खुषीनें त्याच्या ताबेदारींत राहूं लागले.

दिल्हीपतीचा हस्तक मलिक नबी याला हा सर्व प्रकार पाहून समाधान वाटलें व आनंद झाला. त्यानें आपल्या मालकाच्या हुकुमाप्रमाणें सर्व राज्य व तो किल्ला देवरावाच्या हवाली केला. सर्व व्यवस्था सुरळीत लावून व आपल्या कूचाची तयारी करून तो लौकरच निघून गेला.

नंतर देवराय स्वतन्त्रपणें राज्य करूं लागला. राज्यांतील बिघडलेले लोक व सारी प्रजा यांचें त्यानें समाधान केलें व त्यांच्या हिफाजताचीही त्यानें तजवीज केली. तो आपल्या प्रजेवर नेहमीं हरतऱ्हेनें कृपादृष्टी ठवीत असे. यामुळे लोकांचीही त्याच्यावर मर्जी बसली. तो वरचेवर राज्यांत फिरून शहरें व किल्ले पाही. या राज्याच्या अमलाखालून निघून गेलेल्या बऱ्याच भागांचें त्यानें नांव सोडून दिलें, कारण ते परत काबीज करण्याला लागणारी फौज व खर्चाला पुरसा पैका त्यावेळीं त्याच्या जवळ नव्हता. शिवाय त्यांच्यासाठीं लढण्याचीही त्यावेळीं तितकी अवश्यकता नव्हती त्याचें या सुमारास वयही पुष्कळ झालेलें होतें. ( विजयनगरच्या सर्वच राजांना देवराय म्हणण्याचा प्रघात आहे. या अगदीं पहिल्या राजाचें नांव 'नूनीज' यानें दिलेलें नाहीं. त्याच प्रमाणें पुढेंही मूळ नांव उपलब्ध नसलेले दोन राजे, पहिला देवराय व दुसरा देवराय या नांवानें प्रसिध्द आहेत. यांतील बराच भाग ऐकीव व काल्पनिक दिसतो. )

# भाग चौथा.

'विसनग' किंवा विजयनगर शहर देवराज राजानें नवीन स्थापन केलें या विषयीं.

हा राजा नेहमीं 'नागंडियम' खालच्या नदी पलीकडे शिकारीस जात असे. त्याप्रमाणें तो एकदां पलीकडील पहाडांमध्यें शिकारीस गेला. त्या पहाडांमध्यें त्यावेळीं शिकार पुष्कळशी असे. त्या पहाडांतच हल्लींचें विजयनगर वसलेलें आहे. राजा तेथें नेहमीं शिकारीस जात असे. तें जंगल त्यानें शिकारीसाठीं राखून ठेविलें होतें. त्याच्या बरोबर शिकारी कुत्रे वगैरे होते. त्या दिवशीं राजाच्या पुढेंच एक ससा उठला. त्याच्यावर कुत्र्यांनीं धावा केला. तसा तो पळून न जातां त्या कुत्र्यांवर उलटला, आणि साऱ्या कुत्र्यांना चावला. एकही कुत्रा त्याच्यावर जाईना. सारे कुत्रे त्याला भ्याले. (अशाच तऱ्हेच्या आख्यायिका दक्षिणेंतील पुष्कळशा राजांविषयीं प्रचलित आहेत. 'तजिकरत-उल्मुल्क' या ग्रंथामध्यें अशीच एक आख्यायिका सुल्तान अहंमदशहा बाहामनीविषयीं दिली आहे. त्यानें स. १४२२-३५ पर्यंत राज्य केलें. त्या आख्यायिकेअन्वयें, तो शिकार करीत असलेल्या एका सशाच्या वर्तनावरूनच त्याला बेदर येथें राजधानी कायम करण्याची प्रेरणा झाली.)

राजाला याचें आश्चर्य वाटलें. ज्या कुत्र्यांनीं वाघाची व सिंहाची शिकार केलेली. त्यांना यःकश्चित दुबळ्या सशानें चावून मागें हटवावें हें चमत्कारिकच होतें. हा केवळ सशाचा पराक्रम नव्हे, यांत कांहीं करामत आहे, असें त्याच्या मनानें घेतलें. व तो तसाच आनागुंदीला परत आला.

तो नदीवर पोहोंचला. तों तेथें त्याला नदीकांठीं एक महात्मा आढळला. त्याला सर्व लोक फार पूज्य मानीत होते. राजानें त्याला सशासंबंधीं हकीक कळविली. तिचें त्यालाही कौतुक वाटलें. असा अलौकिक प्रकार घडलेली जागा परत चलून दाखवा असें म्हणून त्यानें ती पाहिल्यावर तेथें 'शहर वसवून राजधानी स्थापावी. या अलौकिक प्रकारावरून येथें वसविलेलें शहर साऱ्या दुनियेंत अजिंक्य, प्रसिद्ध, व अभेद्य, होईल, तें शत्रूंना कधींही घेतां येणार नाहीं. आणि तें साम्राज्याची राजधानी होईल,' असें सांगितलें. यावर राजानें त्याच दिवशीं तेथें आपल्या नव्या राजमहालाचें काम सुरू करविलें. शहरा-भोंवतालच्या कोटाचें कामही जारी झालें. महाल व घरें बांधलीं जातांच तो आनागुंदी सोडून तेथेंच राहावयास गेला. लौकरच तेथें दुसरे लोकही येऊन

राहूं लागले व तें शहर चांगलें आबाद झालें. तें वसविण्याला सांगणाऱ्या त्या महात्म्यावरून राजानें त्या शहराला 'विद्याजुन' असें नांव दिलें. पुढें कालें-करून त्या नांवाचा अपभ्रंश होऊन, आतां त्याला 'विसनग'–विजयनगर–असें नांव पडलें आहे. (हे महात्मा तत्कालीन थोर व प्रथित यश जगद्गुरू शंकराचार्य मठ शृंगेरी हे होत. त्यांचेंच माधवाचार्य असें नांव व विद्यारण्य असें बहुमानाचें उपपद होतें, तें त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता व विशाल विद्याव्यासंग, यावरून पडलें होतें. या शहराला विजयनगर नांव पडण्याला हें कारण बहुमुखी दिलें जातें, पण तें अगदीं खरेंच आहे असें मात्र समजलें जात नाहीं.)

तो महात्मा मरण पावल्यावर राजानें त्याच्या प्रीत्यर्थ एक फारच विशाल व भव्य मंदिर बांधविलें. (हंपी येथील विरूपाक्षाचें प्रचंड मंदिर.) अ गे त्याला पुष्कळसें स्थावर उत्पन्न लावून दिलें. तेव्हांपासून विजयनगर ं नवीन राज्यारोहण होऊन राजा प्रथमतः सिंहासनावर आरूढ होईल य ं अशीं राज-वाड्यांत प्रवेश करण्यापूर्वीं त्यानें या मंदिरामध्यें देव दर्शनासाठीं गेलें पाहिजे असा परिपाठ पडला आहे. त्या मंदिरांत नेहमीं पुष्कळशी पूजा अर्चा चालू असते. व प्रतिवर्षीं अनेक लहान मोठे उत्सव होतात.

देवरायानें ७ वर्षें राज्य केलें. : अवसरांत त्यानें राज्याची स्थिरस्थावर केली. या पलीकडे कांहीं केलें नाहीं. त्याच्या मरणसमयीं सर्व राज्यांत शांतता व आबादानी होती.

त्याच्या मागून गादीवर बसलेल्या राजाचें नांव बुक्कराय होतें. पूर्वीं राज्याची वाताहत होऊन झालेल्या गडबडींत राज्याचा पुष्कळसा भाग ज्यानें त्यानें दाबला होता. तो सारा त्यानें पुनः आपल्या अमलाखालीं आणिला. तसेंच त्यानें ओरियाचें मोठें थोरलें राज्यही पादाक्रांत केलें. या राज्याची हद्द बंगाल्या-पर्यंत जाऊन लागली आहे. त्यानें ३७ वर्षें राज्य केलें. त्या अवधींत त्याचा सर्वत्र दरारा व तसाच मानही होता.

बुक्करायाच्या पश्चात् त्याचा पुत्र 'पुरयोरे देवराय' गादीवर बसला. कानडी पुरयोरे शब्दाचा अर्थ महासमर्थ असा होतो. या राजानें 'परदाओ' नांवाचें सोन्याचें नाणें पाडलें. त्याला हल्लींसुद्धां 'पुरोरे देवराय' म्हणतात. पुढें हें नाणें ज्या ज्या कारकिर्दींत पाडलें जाई, त्या त्या राजाच्या नांवावर मोडे. यामुळेंच हल्लीं या राज्यांत इतके निरनिराळ्या नांवाचे 'परदाओ' आढळतात. (पुरेओरे म्हणजे कदाचित हरिहर, असें असेल, पण त्यानेंच 'परदाओ' नाणें प्रथम पाडलें असें नाहीं. पहिल्या बुक्करायाच्या वेळचा एक पगोडा–परदाओ–होन्न–उपलब्ध आहे.) या

राजानेंही आपल्या कारकिर्दींत बापाच्या इतकेंच नवें राज्य जिंकून घेतलें. या शिवाय त्यानें इतर कांहीं केलें नाहीं.

तो मरण पावल्यावर त्याचा पुत्र 'अजराय' याला राज्य मिळालें. तो ४३ वर्षे गादीवर होता. (या राजवंशांत या किंवा एतत्सदृश नांवाचा कोणी राजा असल्याचें उपलब्ध नाहीं. या नांवाचें इतर उपलब्ध राजांच्या नांवाशीं तादृश साम्यही नाहीं.) त्याच्या साऱ्या कारकिर्दींत त्याचें मुसलमान लोकांशीं सारखे युद्ध चालू होतें. गोवा, चौल, दाबुल–दाभोल–सीलाओ–सीलोन-हे त्यानें हस्तगत केले. आणि चारामांडेल–चोलमंडळ–किंवा कारोमंडल, हा प्रदेश पूर्वी याच राज्यांत सामिल असलेला. हें राज्य नष्टप्रायसें झाल्यावेळीं बंडावा करून स्वतंत्र झाला होता, तोही परत जिंकून घेतला. या शिवायही त्यानें पुष्कळशा गोष्टी केल्या पण त्यांचा येथें उल्लेख केलेला नाहीं.

या राजानें विजयनगराला पुष्कळसे कोट व बुरूज बांधले, व नवी तटबंदी केली. या शहराला चांगलासा पाण्याचा पुरवठा नव्हता, सारें पाणी नागंडियम नदीचें यावयाचें. ती दूर होती. शहराजवळ बागबगीचे होण्याला साधन नव्हतें. व शहरही विशेष कामाचें नव्हतें. या भागांत नदीच्या शिवाय सारें पाणी मचूळ जमीनीला व पिकाला न मानवणारें होतें. शहरांतील आबादी वाढावी व तें सर्व राज्यांत प्रथम प्रतीचें व्हावें यासाठीं, या राजानें त्या शहराजवळून वाहणारी तुंगभद्रा नदी, पांच कोसवरून आडवून, वळवून, शहरामध्यें तिचें पाणी आणविण्याचा विचार ठरविला. असें केल्यानें पुष्कळच फायदा होईल असें त्याला वाटलें होतें. त्याप्रमाणें त्यानें खुद्द नदीच्या पात्रामध्यें मोठमोठे दगड टाकवून नदींतील पाण्याचा प्रवाह रोकून हें काम तयार केलें. असें म्हणतात कीं खुद्द राजानें नदीच्या पात्रामध्यें एवढा मोठा दगड टाकला कीं तेवढ्यामुळेंच ती नदी त्याच्या मर्जीप्रमाणें वाहूं लागली. त्या नदीला त्यानें हत्ती जोतून खेंचून आणलें. हे हत्ती त्या राज्यामध्यें पुष्कळ आहेत. याप्रमाणें आणलेली ती नदी त्यानें शहरभर हवी तशी खेळविली. हें आणलेलें पाणी त्या शहराला इतकें फायदेशीर झालें कीं, तेथील वसूल साडे तीन लक्ष ' परदाओनीं वाढला. त्या पाण्याच्या द्वारें शहराच्या आसपास पुष्कळच बागबगीचे, आमराया, वनें, द्राक्षवेलीचे बाग, लिंबें, नारिंगें, संत्रें, गुलाब, वगैरेचे बगीचे, तयार झाले. त्याच्यामध्यें वरील सर्व फळें व फुलें फारच नामी येतात. पण या नदी फिरविण्याच्या कामीं या राजानें सारा वडिलोपार्जित भारी खजीना खालीं केला, असें म्हणतात.

या राजाच्या नंतर त्याचा पुत्र 'विसराय '–'विजयराय.'–गादीवर बसला, त्यानें सहा वर्षें राज्य केलें. त्या अवकाशांत त्याच्या हातून विशेष कांहीं घडलें नाहीं.

त्याच्या नंतर त्याचा पुत्र देवराय याला राज्य मिळालें. तो पंचवीस वर्षें गादीवर होता. त्यानें भारी संपत्ती सांठविण्याचा निश्चय केला होता पण युद्धें, झगडे, व कटकटी सारख्या चालूं राहिल्यामुळें त्याला पंचायशीं कोट होन्नांहून अधिक रकम जमा करितां आली नाहीं. याशिवाय जड जवाहीर होतें तें निराळें. ही रकम विशेष मोठी होती असें नाहीं. कारण त्यावेळीं 'कौलाओ'–क्विलान, 'सेलाओ'–सीलोन, 'पालिया काटे'–मद्रासेजवळचें पुलीकोट, आणि पेगू व तेनासरीम येथील राजे त्याला खंडणी देत असत. (येथें दिलेल्या आंकड्यामध्यें कांहीं चूक दिसते. कारण २५ वर्षांच्या कारकिर्दीत सुद्धां ८५ कोट होन्नांइतकी अवाढव्य रकम शिलक पडणें संभाव्य दिसत नाहीं. कदाचित हा आंकडा साडेआठ कोटीचा असेल.)

हा राजा मरण पावला तेव्हां हें राज्य त्याचा मुलगा पिन्नाराय याला प्राप्त झालें. त्यानें १२ वर्षें राज्य केलें. तो उत्तम ज्योतिषी होता. तो भारी विद्या व्यसनी होता. त्यानें पुष्कळसे ग्रंथ रचिले, आणि साऱ्या राज्यामध्यें अनेक धर्मानुशासनें जारी केलीं. त्याच्या कारकिर्दींत एकंदर २० प्रधान होते. हें प्रधानगिरीचें काम सामान्यतः एकाच मनुष्याकडे असें. हा राजा फारच विद्वान व बुद्धिमान होता. तो राज्य कार्यामध्यें नेहमीं भारी दक्ष असे. त्याची बुद्धिमत्ता व अनेक सद्गुण, यांच्यावरून त्याला लोकांनीं 'पिन्नराय' असें नांव दिलें होतें. 'पिन्न' हा कानडी शब्द आहे. त्याचा अर्थ 'भारी शहाणा' असा आहे. ('पिन्न' याचा समानार्थक तेलगू शब्द 'चिन्न' हा आहे. त्यालाच कानडीमध्यें प्रतिशब्द 'चिक्क' असा आहे. याचा अर्थ 'लहान.' हा शब्द युवराजाला लावण्याचा प्रघात आहे. 'नूनीज' यानें दिलेली व्युत्पत्ती चुकलेली आहे.) या राजाच्या पुतण्यानें त्याच्याशीं विश्वासघात व राजद्रोह करून त्याचा खून केला. त्याला पिन्नरायानें जवळ बाळगून पुत्रवत पालन पोषण केलें होतें. (अब्दुर्रझाक यानें याच गोष्टीचा उल्लेख केला आहे. तो स्वतः कालीकट येथें असल्यावेळीं सं. १४४२ च्या नव्हेंबरापासून सं. १४४३ च्या एप्रिलपर्यंत, मध्यंतरी ही गोष्ट घडली असें तो म्हणतो.) या राजाच्या लबाड पुतण्यानें स्वतःचें लग्न करण्याचें ठरवून, त्या संबंधी मेजवानीला खुद्द युवराजानीं हजर राहून आपला बहुमान करावा, अशी त्यांना आज्ञा होण्याबद्दल त्यानें राजाला विनंती केली. त्याच्यावरील प्रेमामुळें व

त्याचा बहुमान होणें राजाला इष्ट व आनंददायकच होतें सबब त्यानें युवराजाला सर्व लवाजम्यानिशीं हजर होण्याला आज्ञा केली. प्रधान व दरबारांतील प्रमुख अधिकारी व सेनाध्यक्ष यांनाही युवराजाबरोबर जाऊन विवाह प्रसंग साजरा करावा असा हुकूम दिला. त्याप्रमाणें ते सर्व लोक तेथें गेले. ते सर्वजण मेजवानीला बसले असतांना त्यांना मारेकऱ्यांनीं जंबिये खुपसून ठार मारिलें. हे मारेकरी त्या दुष्ट पुतण्यानें आधींच बुत्र तयार करून ठेविले होते. असा कांहीं घाताचा प्रकार होईल अशी कोणालाच शंका नव्हती. भोजनाचे सर्व पदार्थ एकदमच पात्रांमध्यें वाढून ठेवण्याची, व मंडळी जेवीत असतांना दुसरे कोणी वाढपीसुद्धां तिकडे न जाण्याची आणि अगदीं एकेकटेच जेवण्याची, या लोकांमध्यें चाल आहे. बाहेरही कोणी निमंत्रित मंडळी शिवाय रहात नाहीं. यामुळें आंत घडलेल्या प्रकाराची खबर बाहेर नोकर चाकरांना सुद्धां कळण्याचा मार्ग नव्हता. अशा तऱ्हेनें युवराज व त्याच्याबरोबर आलेले अधिकारी यांचा खून करविल्यावर तो पुतण्या घोड्यावर बसून राजाकडे कांहीं नजराणा पोहोंचविण्यासाठींच जणों निघाला. तोही एक प्रधान होता. राजवाड्याच्या दाराशीं पोहोंचतांच त्यानें राजाकडे आपण नजराणा घेऊन आल्याबद्दल वर्दी पोहोंचविली. त्यावेळीं राजा स्वस्थपणें जनानखान्यांत राण्यांबरोबर गमतीनें वेळ घालवीत होता. त्यानें त्याला आंत येण्याला परवानगी दिली. पुतण्यानें आंत पोहोंचतांच एक सोन्याचा थाळा राजापुढें केला. त्याच्यांत विष पाजलेली कट्यार होती. त्या कट्यारीनें त्यानें राजाला जखमी केलें. राजा मोठा शूर व कर्ता पुरुष होता. त्यानें तितक्यांत आपली छोटी तरवार काढून मोठ्या शिताफीनें व युक्तीनें आपला बचाव केला व त्या पुतण्याला ठार केलें. शस्त्रधारणामध्येंही राजाच्या तोडीचा कोणी इसम साऱ्या राज्यांत सांपडण्याजोगा नव्हता. यानंतर राजा, घोडा तयार करवून त्या पाजी पुतण्याचें शिर हातीं घेऊन त्याच्या घराकडे निघाला. तेथें कांहीं दगा होऊन आपला पुत्र मारला गेला असावा, अशी त्याला शंका वाटली. ती खरीच झाली. त्या नीच पुतण्यानें केलेलें घोर विश्वासघातांचें कृत्य त्याला दिसून आलें. त्या कृतघ्न व राजद्रोही दुष्टानें आपला पुत्र व सर्व सरदार यांचा घात केला; तसाच तो डाव साधता तर आपलाही घात करिता, हें त्याच्या प्रत्यक्ष अनुभवाला आलें होतेंच. यामुळें त्याला भयंकर क्रोध आला. त्याच्या सपाट्यांत हें नीच कृत्य करण्यामध्यें अंशतःसुद्धां संबंध असणाऱ्या साऱ्या, व संबंध नसलेल्याही पुष्कळशा लोकांना त्यानें फारच उग्र शासन करविलें. त्या विषारी कट्यारीच्या जखमांमुळें पुढें तोही सहा महिने आजारी राहून मरण पावला.

त्याच्या मागून त्याचा अवशिष्ट पुत्र [illegible] गादीवर आला. त्यानें राज्यकारभार हातीं घेतांच, प्रधान, खजानिदार व फडनीस यांच्याकडून राज्याच्या कुल वसूल वासलातीविषयीं चौकशी केली. तेव्हां साऱ्या राज्याचा वसूल एक कोटि तीस लक्ष होन्न होत असल्याचें कळून आलें. त्यांतील पंचमांश त्यानें धर्मादाय व देवस्थान यांच्या खर्चाला लावून दिला. या मंदिरें असलेल्या भागांत ब्राह्मण लोकांनींच केलेले कायदे अमलांत असतात. इतर दरबारी कायद्यांचा अंमल चालणें मुष्कील असतें. त्यांचे कायदे धर्माधिकारी-भटभिक्षुक-यांनीं केलेले. त्यामुळें लोकांना भारी जुलूम व त्रास भोगावा लागतो.

या राजानंतर त्याचा पुत्र विरूपाक्षराय गादीवर बसला. तो अत्यंत विषयासक्त होता. सारा दिवस रात्र मद्यपान, स्त्रीसंग, आणि ऐषआराम या शिवाय त्याला कांहींच सुचत नसे. सरदार, सेनाध्यक्ष, व प्रजा, यांना त्याचें दर्शन होणें सुद्धां दुर्लभ झालें. यामुळें वाडवडिलांनीं जिंकून संपादन केलेलें व त्याच्या हातीं आलेलें राज्य व ऐश्वर्य यांच्यापैकीं पुष्कळसा भाग त्यानें थोड्याच दिवसांत गमविला. त्याचे ढंग व वर्तावं पाहून पदरच्या सरदार लोकांनीं बंडें केलीं. प्रत्येकजण आपापल्या हाताखालचा भाग दाबून बसला. याप्रमाणें त्याच्या कारकिर्दींत गोवें, चौल, दाभोळ व इतर मुख्य मुख्य भाग त्याच्या हातून गेले. त्यानें नशा करून पशुतुल्य वृत्ती स्वीकारली असतांना कित्येक सरदारांना जीवें मारविलें. कोण्या रात्रीं स्वप्नांत कोणी सेनाध्यक्ष किंवा सरदार आपल्या खोलींत आल्याचें पाहून जागा झाल्यावर, तो त्याला बोलावून आणवी व तू गत रात्रीं माझ्या खोलींत माझा खून करण्यासाठीं आला होतास, असें मीं स्वप्नांत पाहिलें, असा आरोप ठेवून, तो त्याला ठार मारवी. या राजाला दोन पुत्र होते. ते चांगले, मोठे, व कर्ते संवरते झालेले होते त्यांनींही आपल्या बापाची स्थिती पाहिली. व त्याच्या दुर्वर्तनामुळें राज्य धूळधाण होत चाललेलें व विस्तार कमी होत चाललेला पाहून त्याला नाहींसा करण्याचा विचार केला. व त्याप्रमाणें वडील पुत्र राज्याचा वारस होता त्यानें तो अमलांतही आणिला. पित्याच्या पाठीमागून गादीवर बसण्याविषयीं त्याला आग्रह झाला तेव्हां त्यानें म्हटलें, ‘ हें राज्य माझ्या हक्काचें असलें तरी, पितृवधरूपी महापातक माझ्या हातून घडलें आहे, तें न घडतें तर बरें होतें. मज सारखा पितृघातीं, महापातकी, कुपुत्र, सिंहासनावर बसण्याला योग्य नव्हे. माझ्या धाकट्या भावाला राज्य द्या. त्यानें पित्याच्या रक्तांत हात बुडविण्याचें महापातक केलेलें नाहीं. तोच राज्य करूं दे.’ त्याप्रमाणें धाकट्या भावाला

[illegible] त्याचें नांव 'पद्माराव' होतें [illegible]
[illegible] त्याला हाणून जातात, आपल्या वडील बंधूंनी
[illegible] मनांत येतांच आपलीही वाट लावतील.
सबब त्यांची उपेक्षा करूं नये. ही गोष्ट त्यालाही पसंत पडली. कारण असें घडणें कांहीं अशक्य नाहीं. याचा त्याला स्वानुभव होता. त्यानें त्याचा प्राण घेण्याचें ठरवून त्याला बोलावून घेतलें व स्वतःच त्याला ठार केलें. दुष्कृत्याचा परिणामही वाईटच व्हावयाचा, हें ठरलेलें आहे. त्याअन्वयें त्याला हें योग्य शासन मिळालें, ह्मणावयाचें.

पद्मारायानेंही बापाचाच कित्ता पूर्णपणें गिरविण्याला सुरुवात केली. तो नेहमीं जनानखान्यांत स्त्रियांमध्यें निमग्न असे. त्याला राज्य कारभाराबद्दलची काळजी किंवा पर्वा मुळींच नव्हती. तो सारखा ऐष आराम व तदनुषंगीक सर्वप्रिय वाटणारे दुर्गूण यांच्यामध्यें चूर होत्साता सदां सर्वदां राजधानींतच बसून राहिला होता. या राजाचा एक सेनाध्यक्ष 'नरसिमगुआ'-नरसिंग-नांवाचा होता. त्याचें राजाशीं कांहीं नातेंही होतें. राजाची ही स्थिती व असला राजा जिवंत व गादीवर राहण्यांत, राज्याचें कसें व किती नुकसान होतें हें त्याच्या लक्ष्यांत येऊन चुकलें होतें. राजाचा सर्वस्वीं नाश होण्यापूर्वींच त्या निरुपयोगी राजावर हल्लाकरून त्याला पदच्युत करण्याचा त्यानें निश्चय केला. व तो तावडतोप अमलांतही आणण्याची तजवीज चालविली.

राज्यांतील प्रमुख सरदार व सेनापती यांना त्यानें पत्रें लिहिलीं. त्यांत आपल्यावर चांगल्या रीतीनें राज्य करणारा राजा नाहीं ही गोष्ट किती वाईट आहे, व हल्लींचा राजा आपल्या विलक्षण दुर्वर्तनानें राज्याचा नाश करण्यामध्यें आपल्या बापावरही ताण करील यांत मुळीं शंका नाहीं, वगैरे गष्टी लिहिल्या. शिवाय त्यानें त्यांच्याकडे पुष्कळशा भेटी व इनामें पाठवून त्यांतील पुष्कळसे लोक आपलेसे करून घेतले, आणि राजा विजयनगरांत रहात होता, तेथेंच त्याच्यावर हल्ला करण्याची तयारी केली. नंतर उठावणी करून तो मार्गांतले प्रांत ताब्यांत घेत निघाला. जवळच्या लोकांनीं याविषयीं राजाला वेळोवेळीं खबर दिली, पण त्यानें तिकडे लक्ष्यच दिलें नाहीं. असा घातक प्रकार चालला असतांनाहीं तो स्वस्थ राहिला. त्याच्या प्रतिकारार्थ त्यानें कांहींच तजवीज केली नाहीं इतकेंच नव्हे. उलट ही बातमी सांगणाऱ्याला क्रूरपणें शासन करविलें. पुढें नरसिंहाचा एक सेनाध्यक्ष विजयनगराच्या मुख्य दरवाजावर पोहोंचला. तेथें त्याचें संरक्षण किंवा त्याचा प्रतिकार करण्याला कोणी नव्हतें. तो

आल्याची राजाला खबर दिली गेली. तेव्हां त्यानें, 'छेः असें होणें शक्यच नाहीं,' असें उत्तर दिलें! तो सेनाध्यक्ष राजवाड्यांत पोहोंचला. तेथील कांहीं लोक त्यांतच कांहीं स्त्रिया-त्याला आड आल्या, त्यांना ठार करून तो थेट राजाच्या कमऱ्यापर्यंत पोहोंचला. तेव्हां राजाला हें सारें खरें वाटलें व ओढवलेल्या प्रसंगाचा खरा भयंकरपणा त्याच्या दृष्टी पुढें उभा राहिला. शेवटीं तो त्या कमऱ्याच्या दुसऱ्या बाजूच्या दरवाजानें आपला महाल व राजधानी सोडून पळून गेला.

त्या सेनाध्यक्षानें राजा पळून गेल्याचें कळल्यावर ही, त्याचा पाठलाग केला नाहीं. त्यानें राजवाड्यांतील सारा खजीना, खुद्द राजवाडा व राजधानी कबजांत घेऊन आपल्या मालकाकडे-नरसिंहाकडे-खबर पाठविली. पुढें तत्पक्षी यांनीं नरसिंहालाच राजा केलें. तो फार प्रबळ व सर्व लोकांना आवडता झाला. यानंतर हें विजयनगरचें राज्य नरसिंगाचें राज्य म्हणून प्रसिद्ध झालें.

इतकें होऊन लोक त्याची सत्ता मानूं लागल्यावर नरसिंगराय विजयनगराला आला. तेथें त्यानें सर्व राज्य कारभार न्याय इन्साफानें चालविला आणि किती तरी चांगलीं व उपयोगीं कामें केलीं. माजी राजाच्या राज्यापैकीं बरेचसे भाग पुष्कळांनीं दाबले होते ते त्यानें परत घेतले. त्यानें ४४ वर्षें राज्य केलें. तो मेला तेव्हां त्याच्या राज्यांत सर्वत्र आबादानी व शांतता होती. त्यानें पूर्वीच्या राजांनीं घालविलेले राज्याचे सर्व भाग परत कबजांत आणिले. ओर्मज व अदीम-एडन-येथून तो घोडे मागवीत असे. (हे घोडे इराणी व अरबी असत.) त्या मुळें व्यापारी लोकांना मोठा फायदा होत असे. त्यांना तो मागतील तशी किंमत देत असे. हे सारे घोडे हजार परदाओला तीन रास, मेलेले व जिवंत मिळून सरसकट पडत असत. समुद्रांतून येतांना वाटेंत मरतील त्यांची शेपटी हजर करण्याचा दस्तूर असे. ती पाहून तो घोडा हिशेबांत धरला जात असे.

तो राजा मरण पावला त्यावेळीं त्याच्याशीं फिरंट झालेले व त्याच्या कबजांत न आलेले असे किल्ले राचोल-रायचूर-ओडेगिरी-उदयगिरी-व कोनडोगली-बहुधा कोंडवीड-हे तीनच होते. ते या साऱ्या राज्यांत मोठे व मजबूत म्हणून प्रसिध्द होते. त्यांच्या खालीं बराचसा मुलूखही होता. त्याच्या पश्चात त्याचे दोनपुत्र हयात होते. 'नर्से नायक' किंवा 'नरसिंह' नायक

कुल राज्य कारभार पहात होता. त्याचाच पुत्र पुढें विजयनगरचा राजा झाला. ( हा नरसिंह नायकाचा दिलेला संबंध इतर ऐतिहासिक पुराव्यावरून निघणाऱ्या संबंधाला व इतिहासाला जुळत नाहीं, त्यांच्या अन्वयें हा दुसरा नरसिंह पहिल्याचा वडील पुत्र होता. व कृष्णदेव धाकट्या नरसिंव्हाचा दुसरा पुत्र होता, असें दिसतें.) नरसिंहरायानें मरणापूर्वी नरसी नायक दिवाणाला जवळ बोलावून त्याच्याशीं पुष्कळसें भाषण केलें, व अखेर म्हटलें, ' मीं तुम्हाला, हे माझे पुत्र, वयांत येई पर्यंत राज्याचे कुल मुख्त्यार नेमण्याचें ठरविलें आहे. मी तरवारीच्या जोरावर राज्यपद मिळविलें. त्या नंतरचा सारा खजीना स्वतः संपादन केलेला आहे. यावेळीं काबीज करण्याचे असे तीनच किल्ले बाकी आहेत. पण ते काबिज करण्याचें आतां माझ्या नशीबीं नाहीं. माझा काल समीप आला आहे. तुम्ही मोठ्या दक्षतेनें लक्ष्य ठेवून या राज्याचा सांभाळ करावा व माझे मुलगे मोठे झाल्यावर त्यांच्यांतून खरोखर योग्य निपजेल त्यालाच तें सोंपावें.' राजाच्या मागें नरसीनायकानें त्याप्रमाणें कुल कारभार व खजीना हातीं घेतला व पुढें लौकरच एका राजपुत्राला गादीवर बसविलें.

एक सेनाध्यक्ष त्याच्या विरुद्ध होता. त्यानें त्या बालराजाचा खून करण्याचा बेतकेला. यांत नरसी नायक साऱ्या राज्याचा कुल मुख्त्यार दिवाण, सारें राज्य त्याच्या हातीं, त्यानेंच हें दुष्टकृत्य करण्याला सांगितलें, असें प्रगट करावें, म्हणजे आयतेंच नरसी नायकाला या राजद्रोहाबद्दल देहांत प्रायश्चित्त मिळेल, असें त्याला वाटत होतें. पुढें त्यानें संधी साधून रात्रीच्या वेळीं एका हुजऱ्याच्या हातीं, त्या बालराजाचा तरवारीनें खून करविला. त्या हुजऱ्याला या कामीं त्यानें कितीतरी इनाम देण्याची लालूच देऊन सिद्ध करविलें होतें. या बद्दलची हकीकत नरसी नायकाला कळली. तसेंच त्या हुजऱ्याला आपण हें नीच कृत्य करण्याला प्रेरणा केली होती, अशी अफवा उडविलेली ही त्याच्या कानीं आली होती. त्यानें ताबडतोप तिम्माराय नांवाच्या दुसऱ्या भावाला गादीवर बसविलें. तोंवर त्याला त्या सेनाध्यक्षाच्या सर्व कारस्थानाची पूर्ण खबर असून ही, त्याचे आप्त इष्ट विशेष प्रबळ असल्यानें त्याचवेळीं त्याचें पारिपत्य करितां येण्या जोगें नव्हतें. पुढें लौकरच आपलीं मुलें माणसें विजयनगरांतच ठेवून नरसी नायक एक दिवशीं शिकारीसाठीं म्हणून बाहेर आनीगुंदीला गेला. तेथून तो २४ कोसावर असलेल्या पैन्ना गुंडियम-पेन्नाकोंडा—येथें पोहोंचला. तेथें त्यानें एकदम चांगली भारी फौज तयार केली. तिच्यांत पुष्कळसे हत्ती व स्वार होते. नंतर त्यानें आपण निघून जाण्याचें खरें

कारण तिम्मारायाकडे सांगून पाठविलें कीं, 'सेनाध्यक्ष तिम्माअर्स यानें राजद्रोह व विश्वासघात करून आपले बंधू पूर्वींचे राय यांना ठार मारविलें, व या मुळेंच आपण राजे झालां. आपल्या वडिलांनीं मला आपण दोघे, व हें राज्य, सोंपलें होतें. त्यांप्रमाणें मी आपणा उभयतां बंधूंची कशी काळजी पुरस्सर जोपासना केली. तें आपण जाणतांच. त्या सेनाध्यक्षानें राजद्रोह करून आपल्या वडील बंधूचा खून केला. त्याबद्दल त्याचें योग्य शासन होणें अवश्य आहे.' तरी पण यावेळीं नव्या राजाची त्या सेनाध्यक्षावर बहाल मर्जी झालेली होती कारण आपणाला राज्य मिळालें तें त्याच्यामुळेंच असें तो समजत होता. त्याचें पारिपत्य करण्यांऐवजीं रायानें त्याचावर जास्त मेहरबानगी केली, आणि दिवाण नरसीच्या विरुद्ध त्याचाच पक्ष धरिला. हें पाहून नरसी नायकानें चढाई केली, व विजयनगराला वेढा घातला. चार पांच दिवस रायाला चांगलीच भीती घातली. अखेर त्याचा दृढ निश्चय पाहून रायानें तिम्माअर्स याला ठार मारण्याची आज्ञा दिली. व त्याचें शिर नरसी नायकाकडे धाडलें. त्याचा त्याला आनंद झाला. नंतर नरसी नायकानें सारी फौज परत धाडून, तो स्वतः विजयनगरांत परत आला. तेथें सर्व लोकांनीं त्याचें मोठ्या समारंभानें स्वागत केलें. तो अगदीं चोख व न्यायी असल्याचें लोकांना दिसून आल्यामुळें तो भारी लोकप्रिय झाला होता.

पुढें थोड्या वर्षांनीं राजाला अद्यापि अजाणच समजून त्यानें पेन्नूकोंडा येथेंच ठेविलें होतें. तेथें हिफाजतीसाठीं पुष्कळसे शिपायी प्यादेही ठेवून दिले होते. त्याच्या खर्चासाठीं दरसाल २०००० सोन्याचें क्रूसेडास-बहुतेक होन्नाची नेमणूक ठरवून दिली होती. सारा राज्य कारभार तो स्वतःच पहात होता. कारण माजीरायानेंच तो त्याच्याकडे सोंपला होता. असा सर्व बंदोबस्त केल्यावर त्यानें राजाला म्हटलें 'मला राज्याच्या हिताच्या कांहीं गोष्टी करण्यासाठीं विजयनगराला जाणें अवश्य आहे.' हें ऐकून राजाला आनंदच झाला, व त्यानें बरें म्हटलें; कारण त्याच्या गैर हजीरींत आपणाला बरेंच स्वतंत्रपणें वागतां येईल, व नेहमीं त्याच्या धाका दाबांत राहावें लागतें, तें चुकेल, असें त्याला वाटलें. विजयनगरास आल्यावर नरसी नायकानें आपल्या विश्वासांतील प्रमुख सेनापती तिम्माप्पा याच्या बरोबर २०००० फौज देऊन त्याला राजाकडे विशेष बंदोबस्त करण्यासाठीं पाठविलें, व राजाला शहरा बाहेर निघूं देऊं नये असाही त्याला हुकूम दिला होता. तसेंच कोणी विश्वासघातानें रायाला इजा न पोहोंचवे याचीही काळजी घेऊन त्याचें संरक्षण करण्याला ताकीद दिली होती.

ही सर्व व्यवस्था लावल्यानंतर नरसी नायकानें बऱ्याच स्वाऱ्या शिकाऱ्या करून फिरंट झालेलीं पुष्कळशीं ठिकाणें परत घेऊन धुळीस मिळविलीं. या सुमारास कांहीं सेनाध्यक्षांनीं त्याला ह्मटलें, 'हा राजा राज्य करण्याला योग्य नाहीं. त्याचा कांटा काढून टाकलेला बरा.' पण त्यानें तिकडे दुर्लक्ष्यसें केलें. व कांहींच जवाब दिला नाहीं. पण त्यांचें ह्मणणें लक्ष्यांत ठेवून कांहीं दिवस त्याच्यावर विचार केला. त्यांत, असें करणें राजद्रोह व विश्वासघात होय तरी त्याच्या योगानें आपला मोठेपणा व वैभव वाढेल व हल्लींच्या नुसत्या कुल मुखत्यारीच्या दिवाणगिरीऐवजीं आपण सहज खुद्द मालक बनूं. असें मनांत येऊन तो लालचला. त्यानें त्या सेनाध्यक्षांना बोलावून राजाचा नाश करण्यांत आपलें अंग बिलकुल नाहीं, असें लोकांना वाटून ही मसलत कशी पार पडणार वगैरे प्रश्न केले. तेव्हां त्यांच्यांतील एकानें,—(त्याचें नांव 'कोडे मेरडे' 'कोदंड रेड्डी,' असल्याचें पुढें लिहिलें आहे.) त्याला उत्तर दिलें कीं, 'हें काम विनबोभाट पार पाडण्याचा मार्ग असा:—आपण मजवर फार नाराजी प्रगट करून मला आपल्या पुढें हाजर होण्याचा हुकूम करावा, मी तो मानणार नाहीं. त्यावर या दांडगाईबद्दल मला शासन झालेंच पाहिजे, असें आपण ह्मणा. ह्मणजे मी शहर सोडून पेनगुंडी–पेन्ना कोंडा–येथें राजाकडे पळून जाईन, व राजाला चिथावून आपल्या विरुद्ध उभारीन. त्याची मर्जी संपादन करून त्याच्याशीं अशा कांहीं मसलती योजीन कीं त्यांमुळें तो आपल्या मर्जी विरुद्ध वागूं लागेल. त्याला विशेष भरंवसा वाटावा म्हणून दुसऱ्या एका प्रबळ सरदाराचीं बनावट पत्रें तयार करून, तोही अशीच सल्ला देत असल्याचें रायाला सांगून तीं पत्रें दाखवीन. त्या पत्रांमध्यें राजाला उद्देशून आपण हल्लीं जेथें आहां तेथें स्वतंत्र नसून बंदीवासांत अहां. तें स्थळ सोडून बाहेर पडा. आपणच खरे राजे व मालक. नरसी नायक आपला ताबदार सरदार तो भारीच डोईजड झाला आहे. त्यानेंच आपणा हक्कदार धन्याला कैदेंत ठेविलें आहे. यांत त्यानें बंडावा व राजद्रोह केला आहे. वगैरे मजकूर पाहून राजाला मी दिलेल्या सल्लेप्रमाणेंच इतरांचेंही मत आहे असें वाटेल. नंतर मी त्याला त्या किल्ल्यांतून पळून त्या दुसऱ्या सरदाराच्या किल्ल्याच्या आश्रयाला जाण्याला सुचवीन. तेथें गेल्यावर थोडी बहुत फौज उभी करा, हे व आपला दृढ निश्चय इतर सरदारांना कळतांच तेही आपल्या सहाय्याला येतील. नंतर सर्व मिळून नरसी नायकावर हल्लाकरून त्याचा पाडाव करूं. हल्लीं त्यानें आपणाला हा कैदखाना केला आहे, तो खराच त्याच्या वाटेला आणून देऊं. मग आपण खरे व यथार्थ राजे व्हाल. याप्रमाणें राजाच मन वळवि-

त्यानंतर मी त्याला तेथून निघून जाण्याची सल्ला देईन व तो तसा जात असतांना त्याला ठार करीन. आपणाला खरें राजपद प्राप्त होण्याचा हाच एक मार्ग आहे.'

हें त्याचें भाषण व त्यांतील विचार नरसीनायकाला बरेच रुचले. तो त्या सरदारावर पुष्कळच प्रसन्नता दाखवूं लागला. पुढें कांहीं दिवसांनीं तो सरदार नरसीनायकाजवळून जणों त्याच्या भीती मुळेंच पळून जाऊन पेन्यूकोंडा येथें पोहोंचला. ही गोष्ट लौकरच बाहेर फुटली. तेथें त्यानें सर्व कारस्थान पूर्वी ठरल्याप्रमाणें अमलांत आणिलें. आज एकाकडून तर उद्यां दुसऱ्या किल्ल्यावरील सेनाध्यक्षाकडून, आलेलीं म्हणून, तो प्रतिदिवशीं निरनिराळीं बनावट पत्रें दाखवी. तीं पाहून व त्यांतील सुचविलेले विचार व उपाय बरे योग्य व उपयोगी आहेत असें वाटून, राजाचें मन लालचलें व त्यानें आपली संमतीही बोलून दाखविली. तरी पण तो म्हणाला, 'असें असलें तरी, नरसीनायक राज्याचा कुल मुखत्यार-दिवाण-राज्यांतील स्वार, पायदळ, हत्ती, वगैरे सर्व, आणि खजीना त्याच्या हातीं तो आमच्याशीं तेव्हांच सामना करील याची वाट काय?' यावर त्या लबाड, राजद्रोही, घातक्यानें उत्तर दिलें, महाराज, आपण म्हणतां तें खरें तरी आपणाला परत सिंहासनावर बसविण्याला प्रवृत्त झालेल्या पुष्कळशा सेनाध्यक्षांचें मन त्याच्याविषयीं कलुषित झालेलें आहे. त्यांना तो मुळींच आवडत नाहीं. आपण चंद्रगिरीला पोहोंचलेले पाहतांच, ते सारे आपल्या मदतीला धांवून येतील. आपला पक्ष खरा व न्यायाचा, हें ते जाणत आहेत. (चद्रगिरी किल्ला त्यावेळीं स्वतंत्र होता, तिकडेच पळून जाण्याला त्यानें रायाला सांगितलें होतें.) हें ऐकून रायानें विचारिलें, 'मीं येथून कोणाला न कळत बाहेर पडावें तें कसें? माझ्यावर येथें पाहारा आहे व हिफाजतीला म्हणून २०,००० लोक ठेवलेले आहेत.' यावर तो म्हणाला, 'याविषयींची युक्ती मीं योजून ठेवली आहे. ती अशी; आपण व मीं दोघांनींच या आपल्या बागेच्या बाजूनें जाऊन शहराच्या कोटांतील एका दिंडी दरवाजाजवळ पोहोंचावें. ती दिंडी मला माहित आहे. तिच्यांतून आपण बाहेर पडूं. आपण एकटेच जात असलेले पाहून, आपणाला राजा, असें कोणी ओळखणार नाहींत. याप्रमाणें किल्ल्या बाहेर पडूं. तेथें मीं घोडे तयार ठेवीन. तेथून आपणाला हवें तिकडे जाण्याला अडचण पडणार नाहीं. या साऱ्या गोष्टी राजाला पसंत पडल्या. त्यानें सारी व्यवस्था त्या लबाडाच्या हातींच सोंपली, सर्व प्रकार मनाप्रमाणें जुळून आलेला पाहून त्या सेनाध्यक्षानें राजा ज्या बागेच्या बाजूनें निघून जावा असें ठरलें होतें, तिकडील पाहारेवाल्यांना म्हटलें, 'मी अमुकरात्रीं अमक्या वेळीं

इकडून निघेन. मज बरोबर आणखी एक इसम असेल. त्याला तुम्ही ठार मारा, याचें तसेंच कारण आहे. याबद्दल मी तुम्हाला चांगलें इनाम देईन' हा किल्ल्याचा भाग राजाच्या महालाला लागूनच होता. या जवळच्या बागेंत राजा आपल्या जनानखान्यासह नेहमीं क्रीडा करण्यासाठीं जात असे या बाजूला सुमारें ३०० प्याद्यांचा पाहारा असे. त्या सर्वांनीं ' ही कामगिरी आपल्या सारख्याच्या मानानें अगदीं यःकश्चित, ती आम्ही जरूर करूं ' असें त्याला आश्वासन दिलें. सूर्यास्ता नंतर तो पाजी गृहस्थ राजाकडे जाऊन म्हणाला, ' महाराज, आज करितां येण्या जोगी गोष्ट उद्यांवर टाकूं नये म्हणतात, मी घोडे तयार ठेविले आहेत. तसेंच बरोबर जाण्याचीही तजवीज लावून ठेवली आहे. आपण कोठें व केव्हां गेलां, हें राणी साहेबांकडे सुद्धां कळणार नाहीं. मग दुसऱ्या कोणाला पत्ता कसचा लागणार. जरूर बागेंत यावें. मी वाट पहात राहतों.' त्याला राजानें, 'ठीक आहे, मी येतों, ' असें सांगितलें. ठरलेल्या घटकेला राजा फारच हुपारीनें व बेता बातानें बाहेर पडला, तो सेनाध्यक्ष पूर्वींच वाट पहात बसला होता, तोही तसाच सावधपणें चालला होता. त्यानें त्या सशस्त्र पाहारेवाले लोकांना सूचना केली. ते दोघेही बागेशीं येतांच सेनाध्यक्ष दोघां पाहारेवाल्यांच्या आड झाला. तसें त्यांनीं राजावर अवचित तुटून पडून त्याला ठार केलें व जवळच एका झाडाखालीं त्याचें प्रेत पुरून टाकलें. आपण कोणाला मारून पुरून टाकलें, हें त्यांना मुळींच कळलें नाहीं. त्या दुष्ट सेनाध्यक्षानें त्यांचे भारी आभार मानले, व तावडतोप, आपल्याविषयीं या खुनासंबंधें बोभाटा होऊं नये म्हणून आपल्या बिऱ्हाडीं आला व शहर सोडून जाण्याच्या विचाराला लागला. दुसरे दिवशीं सकाळींच राजा कोठें नाहींसा झाल्याचें कळलें. त्याचा साऱ्या शहरभर व किल्ल्यांत तपास केला गेला. पण कोठेंच पत्ता लागला नाहीं. तो कोठें तरी पळून जाऊन, नरसीनायकाशीं युद्ध करण्याच्या खटपटींत असेल, अशीच सर्वांची समजूत झाली.

याविषयींचें वर्तमान नरसीनायकाला कळलें, तेव्हां त्यानें बाह्यतः भारी दुःख झाल्याचें दाखिवलें. आणि रायाच्या निधनामुळें दंगा फिसाद माजेल त्याच्या प्रतिकारार्थ म्हणून त्यानें आपलें सारें सैन्य, स्वार, हत्ती सुद्धां तयार करविलें. हें कसें काय झालें याविषयीं पक्की तपशिलवार खबर अद्यापि आली नव्हती. राजा नाहींसा झाला एवढें मात्र प्रसिद्ध झालें होतें. पुढें तो मुख्य मारेकरी किंवा तो चालविणाराच येऊन, त्यानें, सर्व व्यवस्था कशी गुप्तपणें केली गेली, खुद्द मारेकऱ्यांनादखील आपण कोणाला मारलें याविषयीं कसें कळूं दिलें नाहीं, वगैरे तपशील हकीकत कळविली. नरसीनायकानें त्याला पुष्कळस इनाम

दिलें. पुढें राजाचा कांहींच पत्ता पडेना. सारी राजसत्ता त्याच्या हातीं होतीच. सबब तोच वस्तुतः तसाच नांवानेंही नरसिंहाच्या राज्याचा राजा झाला.

हा राजा मरण पावला त्यावेळीं त्याचे ५ पुत्र जिवंत होते. १ बुसबळराय—भुजबलराय, २ क्रिस्माराय—कृष्णराय, ३ तेतराय, ४ रामैगुप्पा, ५ औच्वाभ्युस्यूवा. (प्राचीन शिलालेखावरून त्याच्या पुत्रांचीं नांवें अशा तऱ्हेचीं असल्याचें पावलें जात नाहीं. यांतील कृष्णराय हा पहिल्या नरसिंहाचा पुत्र व दुसऱ्या किंवा वीर नरसिंहाचा भाऊ असेल.)

नरसीनायकानंतर भुजबलराय गादीवर बसला. त्यानें ६ वर्षें राज्य केलें. त्या अवसरांत सारख्या लढाया जारी होत्या. त्याचा बाप नरसीनायक मरण पावतांच जागजागच्या सेनाध्यक्षांनीं बंडें केलीं. त्या सर्वांचा भुजबळरायानें फडशा पाडला. व त्यांच्या ताब्यांतले सारे प्रांत परत घेतले. तसेंच राज्याची आबादानी पूर्ववत कायम करण्यासाठीं तितक्या अवधींत ८०,००,००० सोन्याचे परदाओ खर्च केले. तो राजधानींतच अजारी पडून मरण पावला. मरणापूर्वीं त्यानें आपला मुख्य मंत्री 'सालवाटिना'—सालुवातिम्मा—याला आणि आपल्या अष्ट वर्षीय पुत्रालाही बोलावून घेतलें. आणि त्याला आज्ञा केली कीं 'माझ्या ८ श्चात् तुम्ही माझ्या अल्पवयी पुत्रालाच गादीवर बसवा; माझा भाऊ कृष्णराय याचा गादीवर वारसा पोहोंचतो हें खरें, तरी तुम्ही आतांच त्याचे डोळे काढून मला आणून दाखवा. असें झाल्यानें मागें राज्यांत फिसाद राहणार नाहीं.

सालुवातिम्मानें 'बरं, आज्ञा' म्हणून निरोप घेतला. (हा सालुवातिम्माही या नवीन राजघराण्यांतला असावा. सालुवा हें या घराण्याचें नांव असावें. हाच पुढें कृष्णदेवरायाचा प्रबल, प्रमुख, महामंत्री झाला. अखेरीस त्याची भारी दुर्दशा झाली. त्याचे डोळे काढले गेले व तो कैदेंत हाल अपेष्टा होऊन मरण पावला. तत्कालीन शिलालेखांमध्यें त्याच्याविषयीं उल्लेख पुष्कळदां आलेला आहे.) त्यानें कृष्णरायाला एकीकडे एका तबेल्यांत बोलावून नेलें आणि राजानें केलेली आज्ञा कळविली. त्याला कृष्णदेवानें उत्तर दिलें, 'मला राज्य मुळींच नको. व माझा राज्यांतील हक्क व वारसा मी सोडून देतों. मी बैरागी होऊन परमार्थ साधन करणार. माझे डोळे काढूं नका. असें शासन व तेंही आपल्या भावाच्या हातून प्राप्त होण्याजोगा मी त्याचा कांहीं अपराध केलेला नाहीं.' त्या वेळीं कृष्णराय वीस वर्षांचा तरुण बांड. भुजबलरायाच्या अल्पवयी पुत्रापेक्षां राज्याधिकाराला किती तरी अधिक योग्य असलेला पाहून, सालुवातिम्मानें त्याचें म्हणणें मान्य केलें. त्यानें एका शेळीचे डोळे काढवून ते त्या आसन्न मरण भुजबलरायाला नेऊन दाखविले. राजा भुजबलराय मरण पावतांच ज्याचे डोळे काढविण्याविषयीं त्यानें आज्ञा केली होती त्याच कृष्णदेवरायाला राज्यपद प्राप्त झालें.

# भाग पांचवा.

## कृष्णदेवरायाची कारकिर्द.

कृष्णराय गादीवर बसला. त्याची सत्ता साऱ्या राज्यांत जारी झाली. पूर्वीं-च्या राजाच्या-भुजबलरायाच्या-वेळीं दिवाण असलेला 'सालुवातिम्मा' याच्या कारकिर्दीतही कुल मुखत्यार प्रधान राहिला. ( भुजबलराय हें नांव कदाचित वसवराव असेल. पण कृष्णरायाचा कोणी या किंवा अशाच नांवाचा भाऊ असल्याचें उपलब्ध नाहीं. ) कृष्णरायानें गादीवर येतांच आपला भाऊ भुजबलराय याचा पुत्र—ह्मणजे आपला पुतण्या आणि आपले तीघे बंधू यांना 'चौडेगरी'-चंद्रगिरी-च्या किल्ल्यांत पाठविलें, आणि एका तऱ्हेनें स्वतःच्या बचावाची पूरी तर्तूद केली. तो दीड वर्ष विजयनगरांतच राहिला. व त्यानें पूर्वीच्या राजाच्या वेळच्या कागदपत्रांची व सर्व राजकारभाराची पूर्णपणें माहिती करून घेतली. पूर्वीच्या कागदपत्रांमध्यें नरसिंहरायाचा-ह्मणजे, त्याचा बाप ज्या नरसीनायकाचा दिवाण होता त्या राजाचा एक लेख सांपडला. त्याच्या मध्यें लिहिलें होतें कीं, त्यानें स्वपराक्रमानें व तरवारीच्या जोरावर कमविलेल्या साऱ्या राज्याचे त्याच्या मागून त्याचे पुत्र किंवा इतर कोणी वारस होतील त्यांनीं पूर्वीं याच राज्यांत असलेले, रायचूर, मुद्गल, व उदयगिरी, हे तीन किल्ले काबिज केले पाहिजेत. त्याला ते आपल्या हयातींत घेण्याला सवड झाली नव्हती.

कृष्णरायानें हा लेख पाहिला. पूर्वीच्या राजानें या कामाबद्दल इतक्या आग्रहानें लिहून ठेविलें असून त्याच्या पश्चात त्याच्याकडे सर्वांनीं अगदींच दुर्लक्ष्य केलें होतें. हें अगदीं गैर व गर्ह्य झालें, असें त्याला वाटलें. त्यानें या कामगिऱ्या एकदम अमलांत आणण्याचें ठरवून फौजा तयार केल्या. उदयगिरी ओरीसाच्या राजाच्या अमलांत होता. त्याच्यावरच प्रथम चढाई करण्याचा त्यानें निश्चय केला. ३४,००० पायदळ व ८०० हत्ती घेऊन तो उदयगिरी जवळ पोहोंचला. त्यावेळीं तेथें १०,००० शिबंदी व ४०० स्वार होते. किल्ला फारच मजबूत असल्यानें जास्त फौजेची आंत अवश्यकता नव्हती. त्याला पक्का वेढा देऊन आंतील लोकांना उपाशी मारल्या वांचून तो पाडाव होणें शक्य नव्हतें.

कृष्णरायानें त्याला दीड वर्ष वेढा घातला, त्या अवसरांत त्यानें किल्ल्याजवळ पोहोंचतां यावें ह्मणून आसपासच्या घाट्या व पाहाड्या फोडवून प्रशस्त मार्ग करविले. हा किल्ला त्याकाळीं केवळ अभेद्य मानला जात होता. त्याच्यांत जाण्याला कायती एकच वाट होती. तीही एकेकट्यानेंच जातां यावें इतकी बिकट व निरुंद होती. त्या वाटेवर चांगला रुंद राजमार्ग करविला गेला. शिवाय दुसरेही चांगले रस्ते करविले गेले. त्यामुळें त्याचे लोक अगदीं तटाजवळ जाऊन पोहचूं लागले.

अखेर त्यानें त्याच्यावर मोठ्या शौर्यानें हल्ला करून तो हस्तगत केला. तेथें ओरीसाच्या राजाची आत किंवा मावशी—व कोणाच्या मतें त्याचा चुलताही होता. ते त्याच्या हातीं लागले त्या माणसांना योग्य मान व बरदास्त ठेवून त्यानें आपल्या बरोबर घेतलें.

नंतर त्यानें ' साळुवातिम्माला ' बोलावून घेतलें. आणि राजा नरसिंह यानें लिहून ठेविल्यापैकीं एक गोष्ट तर आपण उत्तम प्रकारें पार पाडली. तरी या यःकश्चित विजय प्राप्तीनें समाधान वाटत नाहीं. आपण ओरीसाच्या राज्यांत या पुढें शंभर कोस तरी वाढून चढाई करणार, सर्व सिद्धता करावी आणि सा॥ यां सैन्याला तनखा चुकती करून द्यावी, असें सांगितलें.

हा किल्ला घेतल्यावर त्यानें ' कोमडोवी '—कोंडावीड—शहरावर स्वारी केली. तं त्या वेळीं ओरीसाच्या राज्यांतील एक प्रमुख शहर होतें. त्यांनें त्याला वेढा दिल्याचें ऐकून ओरीसाचा राजा आपल्या राज्याचें रक्षण करण्यासाठीं ६०,००० पायदळ २०,००० स्वार व १,३०० हत्ती अशी भारी मोठी फौज घेऊन आला. हें ऐकतांच कृष्णरायानें विचार केला कीं, अशावेळीं वेढा देऊन स्वस्थ बसण्यापेक्षां पुढें वाढून राजाच्या फौजेशीं सामना करावा, नंतर परतून शहर काबीज करण्याला हवी तितकी सवड मिळेल. त्याप्रमाणें तो वेढा उठवून चार कोस सरून तळ देऊन राहिला. तरी शहरांतील लोक समुद्र किनाऱ्याकडे पळून न जावेत म्हणून, त्यानें त्याच्या जवळही थोडीशी फौज सोडली. तो एका नदीवर येऊन पोहोंचला. तिचें पाणी खारें होतें. तिला पाय-उतार होता. पलीकडच्या कांठीं ओरीसाचा राजा फौजेसह तळ देऊन राहिला होता. ( कोंडावीडपासून ४ कोस किंवा सुमारें १२ मैलांच्या आसमंतांत खारें पाणी असलेली नदी आढळत नाहीं. कदाचित येथ खारें पाणी म्हणजे मचूळ असा अर्थ घेऊन निर्वाह करावयाचा असेल.) कृष्णरायानें आपल्या फौजेचा तळ नदी कांठावर दिला होता. त्यानें ओरीसाच्या राजाकडे निरोप पाठविला कीं, ' तुम्हाला लढाई करण्याची इच्छा असेल तर, आम्ही आपली फौज येथून दोन कोस मागें नेतों. तुम्ही स्वस्थपणें नदी उतरून आल्यावर लढाईचें तोंड लागूं द्या. याला त्या राजानें कांहींच उत्तर पाठविलें नाहीं. एकदम लढाईची सिद्धता केली. हें पाहतांच कृष्णरायानें आपले हत्ती व स्वार यांच्या सुद्धां सारी फौज नदी पार उतरविण्याला प्रारंभ केला. नदी पार उतरतांना उभय पक्षांतील लोकांचें मोठ्या नेटानें युद्ध झालें. पुष्कळसे लोक ठार झाले. तरी कृष्णराय नदी पार उतरलाच. त्यानें कांठावरच पुनः मोठ्या शौर्यानें व धडाक्यानें लढाई करून ओरीसाच्या राजाचा पराभव केला, आणि त्याला पळवून लावलें; व त्याचे पुष्कळसे हत्ती व घोडे पाडाव केले.

नंतर त्यानें 'साळुवातिम्माला' म्हटलें, 'आतां मी पुनः परत त्या किल्ल्यावर जाऊन तेथील लोकांना माझ्या प्रतापाचा प्रत्यय दाखवितों. ' त्याप्रमाणें करून त्यानें पुनः दोन महिने त्याला वेढा दिला, व अखेर तो घेतला.

तेथील कुल अधिकार त्यानें ' साळुवातिम्मा' कडे सोंपला. ' साळुवातिम्मा '-नें आपल्या भावाला तेथें आपल्या वतीनें मुख्य अधिकारी नेमिलें व तो खुद्द राजा बरोबर ओरिसाच्या राज्यांत रवाना झाला. हा भाऊ सैन्यामध्यें एक सेनाध्यक्ष होता. कृष्णराय पुनः ती नदी उतरून ओरीसाच्या राजाच्या पाठीस लागला. त्याला तो परतून येईल असें वाटलें नव्हतें. कृष्णरायानें मार्गांतील व आसपासच्या सर्व प्रांताची धूळधाण केली. अखेर तो राजधानी कोंडापल्ली येथें पोहोंचला. तेथें राज्यांतील

प्रमुख सरदार व मांडलिक जमलेले होते. तो त्या शहराला तीन महिने घेरून राहिल्यावर, तें हातीं आलें. तेंही त्याच्या फौजेची संख्याच मोठी यामुळें. शौर्यानें लढल्यामुळें नव्हे. त्या ठिकाणचे पुष्कळसे मोठमोठे सरदार वगैरे त्याच्या हातीं लागले. त्यांच्यांतच राजाची एक राणी, एक राजपुत्र व सात प्रमुख सेनाध्यक्ष होते. त्या सर्वांना त्यानें बंदोबस्तानें विजयनगराला पाठविलें.

नंतर तो पुढें आणखी १०० कोस चाल करून गेला. व अखेर 'सायमानदेरी'—राजमहेंद्रीला पोहोंचला. तेथवर त्याला कोणी आडवें आलें नाहीं. तेथेंच तो सहा महिने ओरीसाच्या राजाची वाट पहात राहिला. तें शहर फारच मोठें होतें. 'तुह्मी लढाई देण्याला याल ह्मणून मी वाट पाहतों आहें, असें त्यानें ओरीसाच्या राजाकडे पुष्कळदां निरोप पाठविले. पण तो राजा कांहीं आला नाहीं. या शहरांत कृष्णरायानें पुष्कळशीं कामें केलीं, धर्मादाय दिला, व देवस्थानांना इनामें करून दिलीं. तसेंच तेथें एक नवें मंदिर बांधलें. तें फारच मोठें व सुरेख होतें. त्यालाही पुष्कळ उत्पन्न करून दिलें. त्या मंदिरांतच त्यानें एक शिलालेख कोरवून बसविला. त्याच्यांत लिहिलें होतें कीं 'हीं सारीं अक्षरें मिटून गेल्यावर कदाचित ओरीसाचा राजा विजयनगरच्या राजाशीं सामना करण्याला तयार झाला तर होईल. तो हा लेख मिटवील तर त्याच्या राणीला विजयनगरच्या सरकारी नालबंदाच्या स्वाधीन केलें जाईल.'

हें झाल्यावर तो परत फिरला. तिकडील प्रांताचा बराच मोठा हिस्सा त्यानें देवस्थान धर्मादायाकडे लावून दिला. नंतर तो विजयनगराला परत येऊन कांहीं काळ स्वस्थ राहिला.

ओरीसांतील मोठा किल्ला कोंडावीड याचा त्यानें पाडाव केला. त्यांत त्याच्या हातीं लागलेल्या ओरीसाच्या राजपुत्राला त्यानें एकदां समक्ष बोलावून आणून ह्मटलें, तुह्मी तरवार व जंबिये यांनीं लढण्याच्या कामीं फार पटाईत आहांत ह्मणें. तें तुमचें कौशल्य पाहण्यांत आलें तर मला आनंद होईल.' राजपुत्रानें उत्तर दिलें, 'महाराजाची आज्ञा होते त्याप्रमाणें यथाशक्ती करून दाखवीन. पण हा बेत उद्यांवर मुल्तवी ठेवावा. दुसरे दिवशीं राजानें त्याला पुनः बोलावणें पाठविलें. व आपल्या पदरीं या कामांत निष्णांत वस्ताद होता त्यालाही त्याच्या सामन्यासाठीं बोलावून तयार ठेविलें. राजपुत्रानें त्या इसमाला पाहिलें. आपण राजपुत्र आपल्या जोडीला राज कुलोत्पन्न मनुष्य पाठविण्याच्या ऐवजीं अशा यःकश्चित सामान्य माणसाला तयार ठेवल्याबद्दल तो कृष्णरायावर फारच नाराज होऊन त्याला ह्मणाला, 'राजकुलामध्यें उत्पन्न न झालेल्या सामान्य माणसाशीं सामना करून त्याच्या रक्तानें मी आपला हात विटाळवावा ही गोष्ट परमेश्वर माझ्या हातून न घडवो.' इतकें बोलून त्यानें स्वतःला मारून घेतलें. अशा तऱ्हेनें त्याचा अंत झाल्याचें ऐकून त्याच्या पित्यानें—ओरिसाच्या राजानें—'सालुवातिम्मा'च्या नांवें पत्र लिहिलें कीं माझा पुत्र तर मरण पावला पण स्त्री अद्यापि जिवंत आहे. ती कृष्णदेवरायाच्या कैदेंतून सुटून येण्याला काय दंड पडेल किंवा कोणत्या अटी मान्य कराव्या लागतील. त्यामें उत्तर धाडलें. 'आपण आपल्या कन्येचें कृष्णदेवरायाशीं लग्न करून यावें. ह्मणजे ते राणी साहेबांना सोडून देतील व घेतलेका

मुलुखही ठेवतील किंवा परत देतील.' ही गोष्ट मान्य झाली. मुलीचें लग्न ठरविण्या-साठीं विजयनगराला वकील धाडले गेले. कृष्णरायालाही, ही गोष्ट कबूल असल्याचें कळल्यावर, ओरीसाच्या राजानें मुलीला तिकडे पाठवून दिलें. नंतर कृष्णरायानें त्या नदी अलीकडचा मुलुख ठेवून बाकीचा परत दिला.

---

# भाग साहावा.

## ( ओरीसाच्या राजाशीं तह झाल्यावर, कृष्णराय 'कातुईर'च्या राज्यावर स्वारी करतो. )

कृष्णरायानें ओरीसाच्या राजाशीं तह करून त्याच्या कन्येशीं लग्न केलें, व त्याची राणी व नदीपारचा घेतलेला मुलुख त्याला परत दिला. याविषयीं मागील भागांत वर्णन आलेंच आहे. त्यानंतर त्यानें मोठीथोरली फौज तयार करून 'कातुईर' शहरावर स्वारी करण्याची तयारी केली. (हें कदाचित वेलोर असेल. हें शहर व तेथील मजबूत किल्ला हल्लींच्या उत्तर अर्काट जिल्ह्यांत आहे. त्या सुरेख किल्ल्याभोंवतीं खोल खंदक आहे. हें स्थळ कृष्णदेवरायानें तेथील एका रेड्डी संस्थानिकाकडून जिंकून घेतलें होतें अशी प्रसिध्दी आहे. 'कातुईर' म्हणजे कदाचित कोइमतूरही असेल.) तेथील संस्थानिक ५० वर्षांपासून फिरंट झालेला होता. हा प्रदेश कारोमांडल किनाऱ्यावर आहे. त्याच्यावर स्वारी करून त्यानें त्या प्रांतांतील एका प्रमुख शहराला वेढा घातला. तिकडील संस्थानिकही तेथेंच होता. त्या शहराचें नांव ( मूळांतच सुटलेलें आहे. कदाचित कांजीवरंम असेल. ) त्याच्या भोंवतीं पाणी आहे.

या शहरावर कृष्णरायानें हल्ला केला तेव्हां हिंवाळ्याचे दिवस होते. शहराभोंवतालच्या नदीला भारी पूर आलेला होता. तिच्यांतून पाणी भारीच वेगानें जात होतें, यामुळें कृष्णरायाला त्या शहराला कांहीं उपद्रव करितां आला नाहीं. त्याचे दिवस निष्कारण चालले होते. ही स्थिती पाहून त्यानें फौजेंतील लोकांच्या हातीं नदीच्या आसपास पुष्कळसे नवे लहान मोठे नाले खोदण्याला लाविले या योगें त्यानें त्या नदीच्या मुख्य पात्रावर हल्ला करण्याची तजवीज केली. त्या नव्या नाल्यांचें काम पूरें झालें तसें त्यांचीं तोंडें त्या नदीच्या पात्राला नेऊन भिडविलीं. त्याबरोबर तिचें पाणी त्या नव्या नाल्यांतून सपाटून वाहूं लागलें आणि लौकरच नदींतील पाणी ओसरून उतार झाला आणि शहराच्या तटबंदीला पोहोंचण्याला सोपें पडलें. अशा या नव्या नाल्या पन्नासावर होत्या.

त्या शहराच्या बचावाला एक लाख पायदळ व तीन हजार स्वार होते. ते भारी शौर्यानें व निकरानें लढले. तरी तें काबिज करून त्याच्यांत प्रवेश करण्याला रायाला विशेष अडचण पडली नाहीं. त्यानें शहरांत पोहोंचतांच त्या सर्वांची कत्तल करविली. तेथें त्याला पुष्कळच लूट हातीं लागली. त्यांत सोन्याचे परदाओ-होन-सोळा लक्ष होते. शिवाय हत्ती व घोडेही होते. सारा प्रदेश पूर्णपणें ताब्यांत आणिल्यावर रायानें त्याचे निरनिराळे विभाग आपल्या पदरच्या सेनाध्यक्षांच्यामध्यें वांटून दिले. तेथील मुख्य मालक संस्थानिक होता त्याला कैद करून त्यानें विजयनगरास पाठविलें. तिकडेंच तो पुढें मरण पावला.

या प्रांताचा योग्य बंदोबस्त केल्यावर कृष्णराय राजधानीला परत आला. तेथून त्यानें 'साळुवातिम्मा' याला खुद्द जाऊन कोंडावीड येथील व्यवस्था पाहण्यास पाठविलें. तोच तेथील मुख्य व जिम्मेदार अधिकारी नेमला गेला होता, पण त्यानें तेथें आपला भाऊ ठेविला होता, हें मागें लिहिलेंच आहे. ओरिसाच्या राज्यांतून परत आल्यावर कृष्णराय पुनः कधीं तिकडे गेला नाहीं.

'साळुवातिम्मा'ला कोंडावीडकडे जातांना मार्गांत इकडील मुसलमान राजाचा-सरदार 'मदारमुल्को'-मदारुल्मुल्क-आडवा आला. (तो बहुधां गोवळकोंड्याचा सुलतानकुली कुतुबशहाचा सरदार असावा.) त्याच्या बरोबर ६०,००० फौज होती. 'साळुवातिम्मा' पाशीं दोन लक्ष लोक असल्यानें, त्यानें त्याला जुमानलें नाहीं. त्यानें त्या सरदाराला व त्याच्या साऱ्या फौजेला कैद केलें. शिवाय त्याची स्त्री, पुत्र, व पुष्कळसे हत्ती, घोडे, खजीना, व जड जवाहीर, ही हातीं आलें. तें त्यानें रायाकडे पाठवून दिलें. कृष्णरायानें त्या सर्वांना कैदेंत ठेवण्याचा हुकूम दिला. तेथेंच ते पुढें मरण पावले. 'साळुवातिम्मा' आपल्या जहागीरीवर गेला. तेथें कांहीं महिने राहून त्यानें तेथील सारी व्यवस्था लाविली. व झगडे निवटिले. नंतर तो राजधानीला परत आला. तो यावेळीं साऱ्या राज्यामध्यें प्रमुख व प्रधान पुरुष होता. सबब रायानें त्याचें मोठ्या मानानें व समारंभानें स्वागत केलें.

---

## भाग सातवा.

### 'साळुवातिम्मा' परत आल्यावर कृष्णराय आदिलशाही अमलांतील रायचूर शहरावर स्वारी करण्याचा निश्चय करून पुष्कळ वर्षें चालत आलेला तह मोडण्याचा प्रयत्न करितो.

'साळुवातिम्मा' परत आला. राजानें त्याचें बहुमानानें स्वागत केलें. याला कांहीं दिवस लोटले. पुढें कृष्णरायानें त्याला म्हटलें, 'नरसिंहरायानें लिहून ठेविलेल्या सर्व गोष्टी करून टाकण्याचें माझ्या मनांत आहे. त्यांपैकीं रायचूर सर करणें ही एक गोष्ट आहे. तें शहर आदिलशाही अमलांतील एक प्रमुख शहर आहे. व तेथील किल्ला फारच मजबूत आहे. तें आदिलशाही सुल्तानांनीं इकडील पूर्वींच्या राजांकडून जिंकून घेतलेलें. आपल्या व त्या राज्यांमध्यें आज ४० वर्षें सारखा सलोखा चालत आलेला. तो कसा मोडावा कळत नाहीं.' 'साळुवातिम्मा'नें विनंती केली, 'तो तह व सलूख विवक्षित शर्थींवर ठरलेला होता. त्यापैकीं अशी एक शर्थ आहे कीं, उभयपक्षांकडील कोणी बंडखोर जमीदार, सेनाध्यक्ष वगैरे लोक परस्परांच्या आश्रयाला किंवा राज्यामध्यें जाऊन राहतील, व त्यांना स्वाधीन करण्याविषयीं मागणें होईल तर ते ताबडतोब दिले घेतले जावेत. या अन्वयें तह मोडण्याला हल्लीं सबळ कारणें आहेत. महाराजाच्या राज्यांतील पुष्कळसे जमीनदार, दिवाळखोर व कर्जबाजारी लोक आदिलशाही अमलांत पळून गेले आहेत. त्यांच्या विषयीं तिकडे मागणें करावें. तें त्यांनीं नाकबूल केलें म्हणजे आयतेंच चांगलें निमित्य सांपडेल.' राजाचे दुसरे बहुतेक मंत्री याच्या विरुद्ध होते. ही सल्ला त्यांना पसंत पडली नाहीं.

...... ग्रंथ संग्रहालय ......

याच सुमारास रायानें सैय्यद मेरकर नांवाच्या प्रतिष्ठित मुसलमानाला ५०,००० होन्न देऊन गोव्यास घोडे खरेदीला पाठविलें होतें. त्यानें यापूर्वी अनेक वेळां ही कामगीरी केली होती, सबब राजाचा त्याच्यावर विश्वास होता. तो गोव्याच्या अलीकडे दोन कोसांवर पोंडा येथें मुसलमान लोकांमध्यें पोहोंचला व तेथून राजानें दिलेल्या रकमेसह तो आदिलशहाकडे पळून गेला. कोणी ह्मणतात कीं, आदिलशहानें त्याला असें करण्याविषयीं लिहिलें होतें. राजाला हें वर्तमान कळतांच तो ह्मणाला, 'आदिलशहा आपला पुराणा दोस्त आहे. त्याला आपण त्या सैय्यदाला रकमेसह धाडून देण्याबद्दल लिहून पाठवूं' असें ह्मणून त्यानें पत्र लिहविलें कीं 'आज इतकीं वर्षें सारखा व कोण्याही कारणानें न बिघडलेला आपला परस्परांचा स्नेह व सलोखा मोडला जाण्याला तो दगाबाज सैय्यद कारण होणार नाहीं, अशी आशा व उम्मेद आहे. सबब त्याला ताबडतोप परत पाठविण्याची तजवीज व्हावी.

हें पत्र पोहोंचतांच आदिलशहानें आपल्या पदरचे काजी व दरबारांतील मंत्री यांना बोलावून घेऊन त्यांच्या समक्ष तें वाचविलें व त्याच्याविषयीं विचार चालविला. पुष्कळ वादाघाट होऊन अखेर 'त्या सैय्यदाला रायाकडे पाठविणें ठीक नाहीं. कारण तो मोठा धार्मिक, विद्वान, व खुद्द पैगंबराच्या वंशांतला आहे.' असें सर्वांचें मत पडलें. आदिलशहानें आपल्या या कृतीवर पांघरूण घालण्यासाठींच जणों त्या सैय्यदाला दाभोळ येथील मामला देऊन तिकडे पाठवून दिलें. व 'तो हुजूर रहात नाहीं व त्याच्याविषयीं हुजूर कांहींच खबर नाहीं. तो दाभोळाहून कोणीकडे पळून गेला पत्ता नाहीं.' अशा अर्थाचें उत्तर पाठविलें. तें घेऊन वकील परत आले तेव्हां राय फारच नाराज झाला. आजवरचा सलोखा इतःपर तुटला असें ठरवून त्यानें पदरचे सरदार व मंत्री वगैरेंचा दरबार भरविला व त्यांच्यांत तें आलेलें उत्तर वाचून दाखविलें. तें वाचून झाल्यावर रायानें ह्मटलें, 'आतां विशेष गडबड व कटकट न करितां सर्वांनीं ताबडतोप तयार व्हावें. आपण याचा पुरा सूड घेतल्यावांचून राहणार नाहीं.'

यावरही कांहीं मंत्री ह्मणाले, 'एवढ्याशा रकमेसाठीं असें करणें बरें दिसणार नाहीं. याबद्दल जगांत लोक काय ह्मणतील याचाही विचार व्हावा. इतकीं वर्षें चालत आलेला सलोखा असल्या क्षुल्लक बाबतीसाठीं तोडण्याचा निश्चय झाला असला तरी या मुसलमान लोकांना सत्य व न्यायबुद्धी मुळींच शिवून गेलेली नाहीं, हें लक्ष्यांत घ्यावें. त्या सैय्यदाच्या कामामध्यें दुसरेही

दोषी आहेत. याचा सूड घेण्यासाठीं होणाऱ्या युद्धामध्यें तो व त्याचे साथीदार हातीं लागले तर त्याचें पारपत्य होईल हें खरें, पण तो हातीं लागणार नाहीं हें ठरलेलें. तो फौजेपासून किती दूर व कोठें तरी दडी देऊन राहील, हें खास.' ('वारोस' यानें या सैय्यदाच्या प्रकरणासंबंधानें उल्लेख केला आहे तो असा:—विजयनगर व विजापूर या दरबारांच्या दरम्यान झालेल्या तहामध्यें परस्पराकडील गुन्हेगार व देणेंदार देण्या घेण्या विषयींही एक कलम असल्याविषयीं लिहून तो म्हणतो, या पाशामध्यें आदिलशहा खचित फसेल असें कृष्णरायाला माहित होतें. त्याच्या पदरीं फारां वर्षांपासून सैय्यद मेरकर नांवाचा मुसलमान व्यापारी काम करीत होता. त्याला त्यानें ४०,००० परदाओ दिले व गोव्यास जाऊन इराणी घोडे खरेदी करून आणण्याला पाठविलें. ही गोष्ट चांगली सर्वत्र मशहूर व्हावी म्हणून रायानें याविषयीं—आमच्या—पोर्तुगीज कप्तानाच्या नांवें पत्रें लिहिलीं. तो सैय्यद गोव्यापासून तीन कोसांवर पोंडा-नांवाच्या ठाण्यावर पोहोंचला. रायानें दिलेल्या भारी रकमेच्या लालचीला पडून किंवा कोणी म्हणतात नसें त्याला आदिलशहाचें पत्र आलें होतें म्हणून तो पोंड्याहून आदिलशहाकडे पळून गेला. तो मोठा संभाक्ति, सन्मान्य व पैगंबराच्या वंशांतला असें समजून, आदिल-शहानें त्याला चौल येथील ठाणेदारीवर धाडलें. पण पुढें तो लौकरच तेथूनही गायब झाला. कोणाच्या मतें आदिलशहाला त्याच्या जवळच्या त्या ४०,००० परदाओची लालच लागल्या-मुळें त्यानें ती काढून घेवबून त्याचा खून करविला.)

आपण दिलेल्या सल्लेचा रायाच्या मनावर कांहीं परिणाम न होतां युद्धच करण्याचा त्याचा निश्चय कायम आहे असें पाहून त्या मंत्र्यांनीं पुनः विनंती केली, 'युद्ध करावयाचेंच तर निदान त्या दाभोळच्या मार्गें तरी महाराजांनीं जाण्याचें करूंनये. रायचूरावर चढाई करावी कारण तें तुर्त आदिलशहाकडे असलें तरी, मूळचें आपल्याच राज्यांतलें. तिकडे चढाई झालेली पाहून आदिल-शहाला त्याच्या बचावासाठीं यावें लागेल. मग महाराजांना एकदमच दोघांवरही सूड घेतां येईल.'

हा विचार रायाला पसंत पडला. त्यानें स्वारीची तयारी केली. तसेंच, त्यानें 'माद्रेमलूखो,' 'डेमेलिको,' व 'दस्तूविरिडो,' या मुसलमान सुल-तानांना, व इतर मोठ मोठे राजे रजवाडे यांना या संबंधानं पत्रें पाठविलीं, व त्या पत्रांच्याद्वारें आदिलशहाचें वर्तन व त्याच्या मुळें आपण त्याच्याशीं युद्ध करण्याचें ठरविलें असल्याबद्दलची हकीकत कळवून दिली. त्यांच्याकडून पत्रें आलीं त्यांत, 'आपण करितां आहां हें योग्य आहे. आम्हीही आपल्याला या बाबतींत सहाय्य करण्याला तयार आहों वगैरे लिहिलें होतें. (माद्रे हा शब्द

वऱ्हाडच्या सुल्तान इमादउल्मुल्क, याचा द्योतक असावा. 'विरीडो' ह्मणजे बेदरचा बरीद-शाही सुल्तान डेमेलिन्नो व देस्तुर यांचा अर्थ लक्ष्यांत येत नाहीं. डेमेलिन्नो हा शब्द चुकून 'झेमुल्को' बद्दल लिहिला गेला असला तर, तो निजामशहाचा द्योतक होईल. पुष्कळशां पोर्तुगीज लेखकांनीं, निजामशहा यापैकीं पहिलें अक्षर गाळलेलें आहे. हींच नांवें पुन: पुढें थोड्याशा फरकानें आलेलीं आहेत, त्या वरून देस्तुई ह्मणजे गोवळकोंड्याचा सुल्तान कुली असेंच मानावें लागतें. ')

झेमुलुको याच्या बहिणीशीं आदिलशहाचें लग्न झालेलें होतें. यामुळें राजाच्या वकीलांबरोबर असा जबाब पाठविल्या नंतर सुद्धां त्याला आपल्या बहिणीच्या मदतीसाठीं कांहीं कुमक पाठविल्यावांचून गत्यंतर नव्हतें.

रायानें त्या सुल्तानांकडे व राजे रजवाड्यांकडे पत्रें पाठविलीं त्यांत तरी त्याचा मोठा धूर्तपणा व कावेबाजपणाच होता. आपला उद्देश कळवून त्यांना आपल्या पक्षाला मिळवून घेण्याचाच त्याचा हेतू होता. तसें न झालें तरी त्याला निदान त्यांची संमती व पसंती मिळवावयाची होती. त्यांच्या फौजेची त्याला तितकी अवश्यकता नव्हती. ते लोक आदिलशहाला मिळते तर, त्याला पुढें संपादन केल्या सारखें यश मिळालें नसतें. या वेळीं आदिलशहा इतर सर्व मुसलमानी सुल्तानांमध्यें विशेष प्रबळ असल्यानें बाकीचे सारे राजे रजवाडे त्याचा द्वेष व हेवा करीत होते. या मुसलमानांमध्यें परस्पर स्नेह व ईमान यांचें नांव नाहीं. ते एकमेकाला कुत्र्यासारखें डसत असतात. ते क्रमाक्रमानें नाश पावलेले पहाण्याची परस्परांना मोठी हौस असते. कृष्णरायानें सं. १५२२, सालच्या मे महिन्यांत शुद्ध द्वितीयेच्या दिवशीं आदिलशहाचा पराभव केला (ही तारीख व मित्ती सं. १५२० ची पाहिजे.)

आपल्या इष्ट देवतांना पूजा अर्चा बलिदान अर्पण करून, व होम हवन वगैरे सर्व यथासांग करविल्यानंतर, राय विजयनगराहून साऱ्या फौजेसह निघाला. त्या फौजेची व्यवस्था अशी होती :—

गारद्यांचा नायक-काम नायक-हा बरोबर ३०,००० पायदळ-तिरंदाज, ढाला-इत, बंदूकवाले व भालेवाले, १,००० स्वार, आणि ६ हत्ती घेऊन बिनीला चा-लला होता. त्याच्या मागून ५०,००० पायदळ, २,००० स्वार व २० हत्ती यांच्यासह त्रिंबकराय हा रवाना झाला. त्याच्यानंतर तिम्माप्पा नायकाची फौज होती. तिच्यांत ६०,००० प्यादे, ३,५०० स्वार व ३० हत्ती होते. अडाप्पा नायकाच्या हाता खालचे १००,००० पायदळ, ५,००० स्वार व ५० हत्ती यांच्या

पाठोपाठ चालले होते. त्याच्या मागून 'कोमडामारा' (या नांवाचा नीट पत्ता लागत नाहीं-कदाचित कुमाराम असेल.) नांवाचा सरदार आपल्या तैनातीचे १२०,००० शिपायी, ६,००० स्वार व ६० हत्ती घेऊन निघाला. त्या नंतर कोमार हा सेनाध्यक्ष ८०,००० शिपायी, २,५०० घोडे, व ४० हत्ती, यांच्यासह रवाना झाला. नंतर 'ओगेमूराहो'– (कदाचित तिम्माप्पाचा भाऊ गंडाराजा असेल.) विजयनगरचा किल्लेदार असलेला–याच्या तैनातीचे लोक व त्यांच्यावरील अंमलदार लोक होते. ह्यांची संख्या ३०,००० प्यादे, १,००० स्वार, आणि १० हत्ती, अशी होती. त्याच्या मागून राजाच्या मर्जीतले तिघे खवास-हिजडे- आपलें ४०,००० पायदळ, १,००० स्वार, व १५ हत्ती घेऊन होते. नंतर राजाच्या पानदानवाल्या हुजऱ्याच्या तैनातीचे १५,००० शिपायी, व २०० स्वार होते. त्यांच्याकडे हत्ती नव्हते. ('बार्बोस'च्या लिहिण्याप्रमाणें पुढें विजयनगरचें साम्राज्य नष्ट झाल्यावर मेदुरा येथें स्वतंत्र राजघराणें स्थापन करणारे पण पूर्वी मांडलिक असलेले राजे या पानदानवाल्या हुजऱ्याच्या वंशांतलेच होते, असें दिसतें.) 'कुमार बरका'-बहुधा कुमार वीरय्या–याच्या जवळचे ८,००० शिपायी, ४०० स्वार व २० हत्ती, तसेंच 'बेंगापूर'-बंकापूर-वाल्याचे व 'डोमर' चे (हंवळवाल्याचे), असंख्य लोक मिळून दुसऱ्या मार्गानें रवाना झाले. दहा दहा बारा बारा हजार लोक बाळगणारे संस्थानिक व सरदार दुसरे पुष्कळसे होते. त्यांचीं नांवें ठाऊक नसल्यानें तीं येथें दिलीं नाहींत. गारद्यांपैकीं ६,००० स्वार व ४०,००० पायदळ. साऱ्या राज्यांतील फौजेंतून जणों निवडून काढलेलें ढालाईत व तीरंदाज लोक–व ३०० हत्ती राजानें स्वतः बरोबर घेतले होते.

| नंबर. | नांव. | पायदळ. | स्वार. | हत्ती. |
|---|---|---|---|---|
| १ | काम नायक ... | ३०,००० | १,००० | ६ |
| २ | त्रिंबकराय ... | ५०,००० | २,००० | २० |
| ३ | तिम्माप्पा नायक ... | ६०,००० | ३,५०० | ३० |
| ४ | अडाप्पा नायक ... | १००,००० | ५,००० | ५० |
| ५ | कोंडामारा ... | १२०,००० | ६,००० | ६० |
| ६ | कोमारा ... | ८०,००० | २,५०० | ४० |
| ७ | गंडाराजा ... | ३०,००० | १,००० | १० |
| ८ | हिजडे-खवास ... | ४०,००० | १,००० | १५ |
| ९ | पानदानवाला हुजऱ्या | १५,००० | २०० | ० |
| १० | कुमार बरका ... | ८,००० | ४०० | २० |
| ११ | बंकापूरकर ... | ... | ... | ... |
| १२ | दहा बारा हजारी ... | ... | ... | ... |
| १३ | खुद्द राजा ... | ४०,००० | ६,००० | ३०० |
| | | ५७३,००० | २८,६०० | ५५१ |

फौजेंतील साऱ्या लोकांची शस्त्रास्त्रें एक नमून्याचीं व उत्तम होतीं. ज्यांनीं त्यांनीं आपापल्या तऱ्हेवर हत्यारें बांधलीं होतीं. तीरंदाज व बंदूकवाले यांच्या अंगांत रूदार डगले होते. ढालाईतांनीं कंबरेला तरवारी व जंबिये लटकाविले होते. त्यांना शरीराच्या बचावासाठीं चिलखतें घालावीं लागत नव्हतीं. ते आपल्या मोठाल्या ढालींच्या आड पुर्तेपणीं झांकले जात. घोड्यावर पूरा साज घातलेला होता व त्यांना झुली होत्या. स्वारांच्या अंगांत डगले, कुडतीं, व डोक्यांवर शिरस्त्राणें होतीं. तींही डगल्याप्रमाणेंच रूदार होतीं.

लढाऊ हत्तींच्या पाठीवरील हौद्यांत प्रत्येक बाजूला ४।८ माणसें बसून लढतात. हत्तींच्या सर्वांगावर मजबूत व जाडशी झूल असते. त्यांच्या दातांना घांसून तीक्ष्ण केलेले मोठाले सुरे बांधलेले असतात. त्यांच्यामुळें लढाईंत त्यांना चांगलाच नाश करितां येतो. या फौजेबरोबर पुष्कळशा तोफाही होत्या.
फौजेंतील लोकांबरोबर धोबी व कसबिणीही किती तरी होत्या. त्यांच्याविषयीं मी येथें कांहीं लिहीत नाहीं. खुद्द राजाबरोबर असल्या या लोकांची संख्या २०,००० वर होती!

अशा या प्रचंड जन समूहासाठीं भारबरदारी किती लागत असेल याची सहज कल्पना होऊं शकते. फौजेच्या मागून, पण राजा जाण्याच्या मार्गावर-काणीही तहानेनें मरूं नये म्हणून लोकांना पाणी पाजण्यासाठीं भरलेल्या मसका घेतलेले १०।१२,००० भिस्ती असतात. या साऱ्या अवाढव्य लष्करापुढें ३।४ कोस सुमारें ५०,००० टेहले पुढील व आजूबाजूच्या प्रदेशाची टेहळणी करीत चाल-लेले असतात. त्यांच्या दोहों बाजूंवर तिकडील प्रदेशांतले वाकबगार असे २,००० तीरंदाज स्वार ह्या टेहळ्यांची जणों हिफाजत करितात.

याप्रमाणें ते लोक विजयनगराहून निघाले. त्यांच्या अगोदर पुष्कळचसे लोक अवाडीला सामानसुमान घेऊन निघालेले होते. शिवाय या लष्करा-बरोबर व्यापारी लोकही कितीतरी चालले होते. यामुळें लष्करांत कोणाला कोठेंही हवें तें सामान मिळण्याला अडचण पडत नव्हती.

प्रत्येक सेनाध्यक्षाबरोबर त्याचे ठरलेले मोदी होते. ते त्यांच्या सर्व लोकांना लागेल तें सामान पुरवीत होते.

राजाच्या प्रत्येक मुक्कामावर त्याच्या निजण्या बसण्याच्या जागेसभोंवार कांट्याची वाड लावितात. तिच्या आंत त्याचे डेरे देतात.

या फौजेच्या मार्गांमध्यें आणखी एक चमत्कार पाहण्या जोगा होता.

फौज वाटेंत एका नाल्यावर पोहोंचली तेव्हां त्या नाल्यांत पोटरीबरोबर पाणी वहात होतें. पण अर्धी फौज पार उतरते तों पाणी वाहणें बंद झालें. बाकीच्या लोकांना पात्रांतील रेतींत झरे खोदून मिळेल तें थोडेंसें पाणी प्यावें लागलें!

याप्रमाणें फौजेसुद्धां कूचदरकूच करीत, रायचूरापासून कोसभरावर 'मौलावाडियम्' मलियाबाद-येथें रायानें तळ दिला व फौजेला विश्रांती दिली व तेथूनच रायचूराला वेढा देण्याची सर्व व्यवस्था चालविली. त्या अवसरांत त्याच्याकडे विजयनगरचे व डोम्मारचेही-(डंवळच्या राजाचे-) लोक आणि इतर बरेचसे सेनाध्यक्ष आपापल्या लोकांनिशीं येऊन दाखल झाले. पुढें लौकरच वेढ्याची सर्व तयारी झाली. ब्राह्मण मंडळींनीं देवतांची पूजाअर्चा, बलिदान, होमहवन, वगैरे संपवून, 'देवतांकडून विजयप्राप्तीविषयीं कौल मिळाले आहेत. आतांच शुभवेळा आहे, शत्रूवर चढाई करावी' असें राजाला सांगितलें.

रायानें पदरच्या मुसलमान लोकांना बिनीवर धाडलें; 'काम नायक' नांवाचा गारद्याचा अधिकारी होता. त्यानें आपल्या पथकाचा तळ रायचूराच्या कोटा बाहेरील खंदकाला भिडून दिला. बाकीच्या सेनाध्यक्षांनींही रायाच्या आज्ञेप्रमाणें आपापल्या पथकांचे तळ कायम केले. त्या शहराच्या कोटांतील बुरुजांवर लहान-मोठ्या तोफा व गरनाळा ठेवलेल्या होत्या. आंतील लोकांनीं मोठ्या आवेशानें त्या सार्‍या डागून व बंदूका आणि बाण चालवून शत्रूला खूप गरम सलामी दिली. तिच्यामुळें खंदकाजवळ पोहोंचलेल्या लोकांना भारीच त्रास झाला. त्यांतील पुष्कळ लोक पीछेहाट करण्याच्या बेताला आले. पण रायानें त्यांना रोकून, सांगून पाठविलें कीं, "लौकरच शहर काबिज करून त्याच्यांत प्रवेश करण्याचा विचार नसता तर, तुह्माला तिकडे पाठविलेंच नसतें. शहरांत प्रवेश करितां न आला, तर खुशाल तेथेंच मरा." तेव्हां निरुपायानें त्यांना शहरावर हल्ला करावा लागला. त्यांनीं मोठ्या नेटानें व शौर्यानें हल्ले केले. त्यांच्यांतही पुष्कळचसे लोक मारले गेले. आंतील लोकांना बचावाची सोय उत्तम होती व त्याविषयींच्या युक्त्या माहित होत्या. त्या ते अमलांतही आणीत होते. रायाच्या लोकांनींही हल्ले करण्यांत कसर मुळींच केली नाहीं. या हल्ल्यामध्यें हजारों लोक मारले जाऊनही कांहींच उपयोग होत नाहीं, हें पाहून सेनाध्यक्षांनीं हरतऱ्हेनें आपल्या लोकांना उत्तेजन देण्याची तजवीज चालविली होती. शहराचा तट व बुरुज यांच्यांतून दगड उखडून आणणाऱ्याकडून ते विकत घेत. त्यांच्या महत्वाप्रमाणें त्यांची किंमत १० पासून ५० फानम (एक लहानसें नाणें) दिली जात असे. या

तजवीजीमुळें तटाचा बराचसा भाग जागजागीं पाडला गेला. पण तें शहर मूळचेंच मजबूत, व आंतील रक्षक लोकही भारीच नेटानें, आवेशानें, व हुषारीनें लढत होते. त्यांनीं रायाच्या फौजेचा फडशा पाडला. तरी रायाचे लोक कचरले नाहींत, किंवा त्यांनीं हल्ले करणें सोडलें नाहीं. हळूहळू प्रत्येक नव्या हल्ल्याच्या प्रसंगीं ते अधिकाधिक धीट होत चालले होते. सेनाध्यक्षां-कडून त्यांना इनाम मिळे त्यामुळें त्यांची लालसाही वाढली होती. तिच्या योगानें त्यांना लढाईंत प्रथमच जातांना वाटणारी मरणाची भीती बरीच कमी झाली होती. तटाखालीं पडलेलीं प्रेतें ओढून आणण्याबद्दलही कांहीं ठरीव रकम मिळे. हें वेढ्याचें व लढाईचें काम ३ महिने जारी राहिल्यावर आदिल-शहा फौजेसह कुमकेला येत असल्याचें कळून आलें.

या वेळची रायचूर शहराची स्थिती व तेथील रक्षण करणारे लोक याविषयीं थोडी अधिक माहिती देणें इष्ट आहे. हें शहर एका विस्तीर्ण मैदानांत वसलेलें आहे. त्या मैदानाच्या दोहों बाजूला दोन मोठ्या नद्या-कृष्णा व तुंगभद्रा, आहेत. त्या मैदानां मध्यें झाडांचें नांव नाहीं. क्वचित स्थळीं खिरटीं झाडें झुडपें आहेत, व मध्यें मध्यें कुरुंदाच्या मोठमोठ्या टोळी पडले-ल्या आहेत. शहरापासून दोन्ही नद्या तीन तीन कोसांवर आहेत. (तेथून कृष्णा १२ व तुंगभद्रा २४ मैलावर आहे. ) कृष्णा नदी उत्तर सरहद्दीवर आहे. तिच्या पार आदिलशहाचा अंमल आहे. दक्षिणेकडील नदी तुंगभद्रा तिच्या पलीकडे नरसिंहाच्या राज्याची सरहद्द आहे. या दोन्ही नद्यांमधील या प्रशस्त व सपाटशा मैदानांत पुष्कळसे मोठे तलाव व विहिरी आहेत. शहरा-जवळ दोन मोठे तलाव व विहिरी आणि लहान लहान नाले व झरे आहेत. त्यांच्या आंत स्त्रियांच्या स्तनाप्रमाणें उन्नत अशी एक पहाडी आहे. शहरा-भोंवती एका बाहेर एक असे तीन कोट आहेत. त्यांच्या चिरेबंदी कामांत चुन्याचें नांव नाहीं. दगडाच्या आंतून मातीचा भराव आहे. त्याच्या आंतील उंच पहाडीवर एक बालेकिल्ला किंवा गढी बांधलेली आहे. त्या गढीमध्यें एक जिवंत पाण्याचा झरा आहे. अशा उंच व बिकट स्थळीं जिवंत पाण्याचा झरा राहणें हा एक अदभुत चमत्कार समजून, तें एक पवित्र स्थान मानलें जातें. या शिवाय शहरामध्यें तळीं, टांकीं, विहिरी कितीतरी आहेत. तेव्हां पाण्याची तूट पडून, हाल होऊन लोकांनीं शहर स्वाधीन करण्याची मुळींच भीती नव्हती. शहरामध्यें सर्व तऱ्हेची सामग्री पांच वर्षें पुरे इतकी होती. त्याच्यांत रक्षणाला ८,००० शिबंदी, ४०० स्वार व २० हत्ती होते. उल्हाटयंत्रें ३० होतीं. त्यांच्यां-

तूनं मोठमोठे दगड शत्रूवर फेंकले जात. त्यांच्यामुळें भारी नुकसान होत असे. तटामध्यें जागजागीं जवळ जवळ एकावरून दुसऱ्यावर बोलणें ऐकूं जाई, असे, बुरुज बांधलेले आहेत. त्या बुरुजांवर व मध्यें मध्येंही तोफखाना लावलेला होता. मोठ्या तोफा २००, शिवाय लहान तोफा कितीतरी होत्या.

सुलतानाची फौज येत असल्याचें कळलें व त्याच्याकडील एक सेनाध्यक्ष व त्याच्या बरोबरचे लोक आले. त्यांना आंत घेतल्यावर, शहराच्या लोकांनीं तटाचे दरवाजे दगडा चुन्यानें एकदम चिणवून टाकविले. लढाईचा मुख्य मारा पूर्व बाजूला होता. उत्तर व दक्षिण, या बाजूंकडे पहाड्या असल्यामुळें फार मजबूती झालेली आहे. शहराला चोंहीकडून वेढा पडला होता. राजाची छावणी पूर्व बाजूला होती. यामुळें मुख्य मारा व मोरचा त्याच बाजूनें होत होता.

---

# भाग आठवा.

## रायाच्या छावणीची मांडणूक.

रायाच्या छावणी भोंवतीं मोठी थोरली कांटेरी बागड लावलेली होती. तिला एकच दरवाजा असून तेथें खडा पाहारा असे. याच आवारांत राजाला स्नान घालणारा ब्राम्हण व त्याचे नित्य पूजेचे देव ठेवणारा उपाध्या, राजाच्या नेहमीं जवळ असणारे कामदार व अंतर्गृहांत राहणारे हिजडे इतके लोक राहण्याची सोय असते. त्याच्या बाहेर ठरीव जागीं पाहारे मुकरर आहेत. ते रात्रंदिवस पाहारा देतात. हे पाहारेवाले व खासगीकडील अंमलदार जवळ जवळच असतात. तेथून पुढें तोंडाला इतर सेनाध्यक्ष लोकांचे तळ, राजाच्या आज्ञे-प्रमाणें नेमलेल्या जागीं पडलेले होते. या सर्व लोकांच्या तळापलीकडे अगदीं पृथक जागीं टेहळे लोकांची राहण्याची जागा कायम केलेली होती. सारी रात्र फौजेच्या तळावर व सभोंवतीं पाहारा द्यावा, व कोणी हेर वगैरे लोक आले तर तपास ठेवून त्यांना पकडावें, हें त्या टेहळ्यांचें मुख्य काम होतें. सर्वांपलीकडे कपडे धूण्याला सोईवार पडे अशा जागीं धोबी लोकांची छावणी होती.

साऱ्या छावणीमध्यें व्यवस्थेशीर रस्ते करून तिचे निरनिराळे भाग केलेले होते. हर एक सेनाध्यक्षाच्या गोटांत स्वतंत्र बाजार असतो. तेथें सर्व तऱ्हेचें मांस, बकरीं, शेळ्या, बोकड, डुकरें, कोंबडीं, ससे, तीतर, व इतर पक्षी वगैरे मिळत होते. तेही मनमुराद. अगदीं विजयनगरांतल्या प्रमाणें. तऱ्हे

ऱ्हेचीं धान्यें, तांदूळ, कडधान्यें, मूग, मका, द्विदळ, वगैरे विपुळ मिळत होतीं असे नित्य अवश्य लागणारे जिन्नस तर मिळतच होते पण, दुसऱ्या एका बाजारांत हवा तो जिन्नस मिळत होता. आपल्या देशांत सहसा दुकानांत विक्रीस ठेवीत नाहींत, असेही किती तरी जिन्नस इकडे विकावयास ठेविलेले असतात. ते जिन्नस आपल्या देशांत विविक्षित लोकच विकतात. आपापल्या बाजारांत व रस्त्यावर निरनिराळे कारागीर लोकही आपलें काम करण्यांत निमग्न होते. माणिक, मोती, हिरे. वगैरे रत्नें व सोन्याचे व जडावाचे दागिनेही विक्रीला ठेवलेले होते. कापडाचा व्यापार करणारे लोकही होते. तेही किती तरी. कारण कापडाचा खप मनस्वी होत असे. तें सर्वांनाच लागणार. बहुतेक कापड सुती असतें.

गवत, कडबी, चारा, ही अतोनात विकत होते. रायचूराच्या आसपास सारा प्रदेश फारच विराण, रेताड, व रूक्ष आहे. अशा ठिकाणीं जमा होत असलेल्या या सामान सरंजामाचें यथार्थ व खरें वाटण्याजोगें वर्णन तरी कोण व कसें करणार, कोण जाणें. असल्या रूक्षस्थळीं या सर्व जिन्नसांची इतकी समृद्धी कशी झाली असेल, हें मोठेंच गूढ आहे. ५५१ हत्ती, ३२४०० घोडे, शिवाय ओझ्याचीं खेचरें व गाढवें, व सामान सरंजाम, डेरे तंबू, तोफा, यांची ने आण करण्याला लागणारे बैल, वगैरे जनावरांना दररोज किती गवत कडबा लागत असेल, याची कोणालाही सहज कल्पना होईल. खरी स्थिती माहीत नसणाऱ्याला येथील सर्व प्रकार पाहून, हल्लीं युद्ध चालू आहे व दररोज लढाया करीत असलेल्या फौजेच्या तळावर आपण राहतों आहों अशीं कल्पना सुद्धां न येतां, आपण एखाद्या मोठ्या आबाद व भरभराटीचा व्यापार चाललेल्या शहरांत वस्तीला आहोंत असेंच वाटेल.

या लोकांमध्यें उपयोगांत आणीत असलेले ढोल, नगारे, कर्णे, व इतर तऱ्हे तऱ्हेचीं वाद्यें यांच्याकडे नुसतें पहातच राहावें, असें वाटतें. कोठें एखादा हल्ला किंवा लढाई सुरू व्हावयाची असली तर, त्याच्या सूचनेसाठीं, प्रारंभीं या साऱ्या रणवाद्यांचा भारी व कानठळ्या बसविणारा गजर होतो. त्याच्यामुळें जणों आकाश कोसळतें असें वाटतें. ही वाद्यगर्जना चालली असतांना आकाशांत उडत असलेले पक्षी घाबरतात व गोंधळून जातात. फौजेच्या तळावरून पार उडून जाणें अशक्य होऊन, ते खालीं पडतात. असे पडलेले पक्षी-विशेषतः घारी फौजेंतील लोकांनीं पुष्कळशा धरल्या होत्या.

याविषयींचें वर्णन करावें तितकें थोडें. तें कधीं संपणार सुद्धां नाहीं. तेव्हां तें येथेंच पुरें केलेलें बरें.

# भाग नववा.

## रायचूर शहरावर हल्ला.

वर वर्णन केल्याप्रमाणें राय रायचूर शहराला वेढा घालून बसला होता. पुढें लवकरच त्याच्याकडे खबर आली कीं, आदिलशहानें कृष्णेच्या उत्तर तीरावर येऊन फौजेचा तळ दिला आहे. तो काय करितो, कोठें जाणार, काय बेत आहे याबद्दल गुप्तपणें चौकशी करून पक्की खबर आणण्यासाठीं त्यानें हेर पाठविले व त्याच्यावर चांगली पाळत ठेवविली. ही खबर छावणीभर पसरतांच चोहींकडे व विशेषतः शिपायी व खालच्या प्रतीचे लोक यांच्यामध्यें भारी गडबड उडाली. कारण त्यांना फार दिवसांपासून मुसलमान लोकांची भीती वाटत असे. ती कमी झाली नव्हती. त्यांच्या विषयीं त्यांचीं मनें सभय व साशंक होतीं. आदिलशहा बरेच दिवस राजा पुढें काय करितो याची वाट पहात तळावर पडून राहिला. आपणच पुढें वाढून रायावर त्याच्या छावणींतच हल्ला करावा किंवा कसें, याचा तो विचार करीत होता. आपण येऊन पोहोंचल्याची खबर लागतांच राय स्वतःच चालून येईल, असें त्याला व त्याच्या सरदारांना वाटत होतें. तसें झालें तर बसल्याजागीं नदीचा चांगला आश्रय असून बचावाची सोयही बरी आहे, असें मनांत आणून तेथेंच राहण्याचा त्यानें विचार केला होता. त्याच्या तळालगतच्या उताराशिवाय जवळ पास कोठें नदीला उतार नव्हता. त्या एका उताराचा पक्का बंदोबस्त करून, शत्रूला तो उतरतां न येण्याजोगा करून टाकला म्हणजे, त्या विकिर हिंदू काळ्या लोकांना त्यावरून पार होऊन येण्याचा हिय्या होणें मुळींच शक्य नाहीं, अशी त्याची समजूत होती.

शत्रूचा तळ नदीच्या पैलतीरावर पडल्याचें कळून आल्यावरही रायानें कांहींच हालचाल केली नाहीं. तो स्वस्थ व बेफिकिरसा होता. हें पाहून आदिलशहानें आपल्या सरदार लोकांना दरबारांत बोलावून पुढें काय करावें याविषयीं सल्ला मसलत चालविली. निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळीं मतें दिलीं. कारण प्रत्येकजण राय पुढें वाढून न येण्याचें कारण निरनिराळें समजत होता. तो 'आपल्या शत्रूला—आम्हाला—कांहींच माल समजत नाहीं, व आपण त्याच्यापेक्षां कितीतरी श्रेष्ठ आहो, हें आपल्या पदरच्या लोकांना दाखविण्यासाठींच तो असें करितो आहे,' असें बऱ्याच लोकांचें मत पडलें. नदी उतरण्याचाच अवकाश, तो आपल्यावर एकदम तुटून पडेल, असेंही त्यांना वाटत होतें. या सरदार लोकांमध्यें 'आमू-कोरतामू'–'अंकुशखान,' नांवाचा सरदार

प्रमुख होता. 'डामगुर्टर' हा गोवा येथें कप्तान असल्यावेळीं, तो पोंडा येथें सेनाध्यक्ष होता. (डामगुर्टर डीमानराय सं. १५१५ सालीं पोर्चुगालमधून हिंदुस्थानाला येण्याला निघाला. पुढील वर्षी कांहीं दिवस तो गोव्यास काम चलाऊ अधिकारी होता. सं. १५१६ च्या फेब्रवारीपासून सप्टेंबरपर्यंत मध्यतरीं त्यानें विजापूर दरबारच्या फौजेशीं पोंडा येथें लढाई करून बराच जय मिळविला होता. त्या फौजेचें आधिपत्य अंकुशखानाकडे होतें. त्याचें गोव्याच्या गव्हर्नराच्या पुतणीशीं लग्न झालें होतें. तो फारच क्रूर व व्यसनी असल्याचें वर्णन आहे.) दुसऱ्या कांहीं सरदार मंडळींचें मत निराळें होतें. ते म्हणत कीं, 'हा धिटाईचा प्रकार नसून राजा घाबरलेला आहे. आज फारा वर्षांपासून मुसलमानांनीं हिंदूंवर कितीदां तरी जय मिळविलेले. ते मनांत आणून तो वचकतो आहे. पूर्वींच्या लढांयांमध्यें काम केलेले पोक्त कसलेले जवांमर्द शिपाईही बरोबर आलेले आहेत. तरी हुजूरानीं एकदम नदी उतरून पुढें चढाई करावी. खाविंदानीं असा कच्चेपणा दाखविणें ठीक नाहीं. येथेंच जास्त दिवस पडून राहण्यांत, स्वतःचा फायदा, व शत्रूची खोड मोडण्याची ताकत, दोन्हीं घटणार. हुजूरची फौज हिंदू फौजेहून कमी आहे, तरी पण आपण त्यांच्याशीं कितीदां तरी लढाया मारल्या आहेत. याचें स्मरण दोन्हींकडील लोक विसरलेले नाहींत. यामुळें आपला पक्ष सरस आहे.'

शेवटीं आदिलशहानें फरमाविलें कीं सर्व फौजेची हजीरी घ्यावी. पुढें कसें काय करावयाचें तें नंतर ठरवूं. हजीरीनंतर कळून आलें कीं, पायदळ, तीरंदाज, बंदूकची, ढालाईत व भालेवाले मिळून १२००००, स्वार १८००० व हत्ती १५०, इतकी फौज आहे. हजीरीनंतर सुलतानानें सारी फौज स्वतः पाहिली. शिवाय त्याच्या जवळ भारी मोठा तोफखाना होता. त्याच्या जोरावर आपण नरसिंगाच्या राजाचा पराभव खास करूं अशी त्याला खात्री वाटली व तसें त्यानें बोलूनही दाखविलें. 'आपण आतांच नदी उतरून पार जाऊन लढाई देणार सबब सारें सैन्य सिद्ध व सज्ज होऊन नदी पलीकडे गेलें पाहिजे,' असा त्यानें हुकुम दिला. 'नदी पलीकडे फौजेचा तळ द्यावा, तेथून फौजेच्या तुकड्या पाठवून रायाच्या छावणीवर छापे घालवावे, व हल्ले करवावे, म्हणजे आपल्या पराभवाचें भय न राहतां, रायचूरही कबजांतून जाणार नाहीं, असें त्याला वाटत होतें.

असें ठरवून व यांत आपणाला खास यश येणार, असें समजून, तो नदी पार उतरला व त्यानें रायाच्या फौजेपासून तीन कोसांवर तळ दिला. त्याच्या सभोंवार चांगला रुंद खंदक खोदविला, सारा तोपखाना तोंडावर ठेवविला,

निरनिराळ्या पथकांच्या जागा व्यवस्थित कायम केल्या, आणि शत्रूनें हल्ला केलाच तर काय काय तजवीजी कराव्या, त्याविषयीं व्यवस्था लावली. हा छावणीचा तळ नदीच्या कांठाकांठानेंच दिलेला होता. कारण असें केल्यानें एक तर पाण्याचा पुरवठा उत्तम झाला होता व शत्रूला त्याच्या व नदीच्या दरम्यान येण्याला अवकाश राहिला नव्हता.

सुलतान नदी उतरून अलीकडे आला अशी खबर येतांच रायानें हुकुम दिला कीं, आपलें सारें सैन्य अगदीं तयार राहावें, पण शत्रूच्या पुढील हाल चालीविषयीं पक्की बातमी येईपर्यंत कोणीही जागचें हलूं नये. शत्रूनें मुकाम केला व आपल्या तळाची मजबूती केली असें समजलें तेव्हां, सारी फौज एक-सारखी पुढें वाढून जावी असा हुकुम सुटला. सर्व फौजेचे एकंदर ७ भाग केले होते.

श्रीरंगपट्टण येथील विस्तीर्ण राज्याचा मालक, कृष्णरायाचा मांडलिक, व श्वशूर, कुमार वीरय्या यानें बिनीचा आघाडीचा मान मिळण्याविषयीं विनंती केली. त्याच्या बरोबर त्याचे ३० करते संवरते पुत्र होते. राजानें त्याची विनंती मान्य केली व त्याला फौजेसह पुढें वाढून आदिलशहाच्या फौजेच्या अलीकडे एक कोसावर राहण्याची आज्ञा केली. आपण दुसरे दिवशीं सकाळींच लढाई सुरू करणार, सबब सैन्यांतील सर्व लोकांनीं पहांटेच उठून सज्ज व्हावें, असें रायानें सांगून पाठविलें. यावर मंत्री मंडळी व ब्राम्हण लोक यांनीं विनंती केली कीं, उद्यां शुक्रवार घात वार, परवां शनिवारीं वार शुद्धी आहे, तोंवर वाट पाहावी. हे लोक शनिवार शुभ व लाभदायक मानतात.

रायचूर शहरामध्यें एक हिजडा–खोजा–सरदार सेनाध्यक्ष होता. तो राजा रायचूर सोडून गेल्याचें पाहून तटांतील एक दरवाजा खोलवून कांहीं पायदळ, २०० स्वार व थोडेशे हत्ती, यांच्यासह बाहेर पडला व सारखा राजाच्या पाळतीवर नदीच्या कांठा कांठानें राहिला. त्याच्या बेताविषयीं लोक निरनिराळ्या कल्पना करीत होते. खरा बेत कोणालाच कळला नाहीं. राजानें मुकाम केला तसे त्यानेंही डेरे दिले. राजाकडील हालचाल व लढाईचा परिणाम याविषयीं तावडतोब खबर देण्यासाठीं त्यानें हेर सोडलेले होते. दोन्हीं सैन्यें लगोलग असल्यानें कोणीच शस्त्रास्त्रें ठेविलीं नाहींत किंवा कवचें काढलीं नाहींत. सारी रात्र एकमेकांची पाळत ठेऊन सारखे जागत राहिले होते.

शनिवारची पहांट होऊं लागली तसें रायाच्या फौजेंत रणवाद्यांचा गजर सुरू झाला. लोक जयघोष करूं लागले. त्याचा भारी व तुमुल ध्वनी होऊं लागला, त्यामुळें आकाश कोसळतें कीं काय असें वाटूं लागलें. त्यांतच घोड्यांचें खिंकाळणें, गडबड व धांदल, आणि हत्तींचे चित्कार सामिल झाले. या सर्व गडबड गोंधळीचें यथार्थ वर्णन कोण करील! या घनघोर शब्दामुळें सर्व लोक घाबरून जात होते. त्याचें साधें सरळ वर्णन सुद्धां ऐकणाऱ्याला किंवा वाचणाऱ्याला खरें वाटावयाचें नाहीं. तो प्रचंड ध्वनी उत्पादन करणारे देखील त्याच्यामुळें घाबरून जात मग इतरांची कथा काय? शत्रूच्या सैन्यांतूनही कमी ध्वनी होत होता असें नाहीं. त्यावेळीं बोलतांना उच्चारलेले शद्व ज्याचे त्यालाच ऐकूं येणें कठिण होतें. सर्व व्यवहार खुणांवर भागवावा लागत होता. छावणींतील सारी फौज लढाईच्या तोंडाला भिडेतों दोन तास दिवस आला. फौजेंतील आघाडीच्या दोन भागांतील लोकांनीं पुढें वाढून जावें, आणि शत्रू आडवा आला किंवा कसाही आढळला तर त्यांच्यांतून एक देखील मनुष्य जिवंत सोडूं नये, असा रायानें हुकुम दिला. त्याप्रमाणें अक्षरशः बजावणी झाली. रायाच्या लोकांनीं अशा कांहीं आवेशानें व त्वरेनें हल्ला केला कीं, बरेच लोक थेट शत्रूच्या छावणीच्या खंदकापुढील भरावावर जाऊन थडकले. राजा साऱ्या फौजेनिशीं एकदम आवेशानें नीट समोर हल्ला करील या समजुतीवर मुसलमानी फौजेची मांडणी केली गेली होती. कारण राय असेंच करणार अशी आदिलशहा व त्याची सरदार मंडळी यांची पक्की खात्री होती. म्हणून त्यांनीं सारा तोफखाना बार भरून सज्ज उभा केला होता. राजाच्या फौजेंतील लोक धीटपणें व उतावीळपणानें सारखे पुढें येऊन माऱ्यांत सांपडतांच एकदम साऱ्या तोफांनी सरबत्ती देऊन त्यांचा शेणसडा उडवावा, असा त्यांचा बेत होता. पण राजाची हल्ल्याची बदललेली तऱ्हा पाहतांच आदिलशहाला आपली मांडण बदलावी लागली. त्यानें तोफखान्याला सरबत्ती देण्याचा हुकुम दिला. ती सरबत्ती फारच भारी प्रमाणावर असल्यानें रायाच्या फौजेंतील किती तरी पायदळ, स्वार व हत्ती ठार होऊन भयंकर नाश झाला, आणि फौजेच्या या भागांना पिछेहाट करावी लागली. ही त्यांची धांदल व पीछेहाट पाहून मुसलमानी फौजेनें एकदम त्यांच्यावर धावा केला. त्यांच्यापुढें रायाच्या लोकांपैकीं एक सुद्धां स्वार टिकला नाहीं. समोर तोंड देऊन लढण्याला कोणी उरला नाहीं. सारी फौज उधळून पळूं लागली. मुसलमान लोक अर्ध कोसपर्यंत त्यांना कापून काढीत मागें लागले.

आपले लोक याप्रमाणें पळालेले पाहून राजा फारच संतापला व त्यांना लुच्चे, हरामखोर, दगाबाज, राजद्रोही म्हणून शिव्या देत मोठमोठ्यानें ओरडूं लागला. 'खरे आपल्याला साथ देणारे इमानदार कोण कोण आहेत ते पाहूं. सर्वांनाच कधींना कधीं मरणें आहे. तेव्हां पूर्वापार चालत आलेल्या मार्गानें, धैर्यानें नशिबाची गांठ घ्यावी हीच खरी मर्दुमकी आहे. खऱ्या वीराप्रमाणें समोर उभे राहून मारावें किंवा मरावें, बकऱ्यासारखी मान पुढें करून ती शत्रूला कापूं देणें योग्य नव्हे. मज बरोबर यावयाला कोण कोण तयार आहे पाहूं.' असेंही म्हणाला. त्याबरोबर त्याच्यासाठीं जिवास जीव देणारे सर्व सरदार, मांडलिक व सेनाध्यक्ष पुढें सरसावले. त्यांना राजानें पुनः म्हटलें 'साऱ्या जगांत थोर व श्रेष्ठ अशा राजाला आज आपण रणांगणांत चित्त केलें, अशी फुशारकी मारतां येण्याचा योग आदिलशहाला आला आहे; तरी पण त्याला आपण जिवंत धरला असें म्हणूं देणार नाहीं. आपण लढाईत ठार होऊं पण जिवंत हार जाणार नाहीं.' नंतर त्याने आपल्या बोटांतील एक आंगठी काढून ती एका हुजऱ्याजवळ दिली. त्याच्या देहावसानानंतर ती त्या हुजऱ्यानें नेऊन जनानखान्यांत दाखवावयाची होती. ती पाहतांच इकडील रिवाजाप्रमाणें राण्यांनीं चितारोहण करावें, असा ठराव होता.

तो घोड्यावर स्वार झाला, आणि फौजेचे बाकीचे सारे भाग बरोबर घेऊन त्यानें त्वेषानें चाल केली. आपल्याकडील कोणीही पळून जाईल त्याला तात्काळ ठार करावें, अशी त्यानें सक्त ताकीद केली व त्याप्रमाणें बजावणीही सुरू झाली. हें पाहतांच पळूं इच्छिणारे लोक निरुपायानें मागें परतले, व पाठीस लागलेल्या मुसलमान शिपायांवर नेटानें तुटून पडूं लागले. त्याबरोबर त्यांच्या समोर उभें राहून लढण्याला कोणी मुसलमान टिकेना. ते लोक राजाच्या हार खाल्लेल्या फौजेंतील लोकांमागें हाणमार करीत विखरलेले होते. त्यांच्यामध्यें मोठाच गोंधळ उडाला. त्यांचा सपाटून फडशा पडला. त्यांची छावणी चांगली मजबूत केलेली होती, पण तिच्या आश्रयाला जाऊन आंतून तिचें व आपलें संरक्षण करण्याचा प्रयत्न करण्याचें सुद्धां कोणाला भान उरलें नाहीं. ते पुरते भांबावून गेले. बचावाच्या आशेनें त्यांनीं नदींत उड्या टाकल्या. त्यांच्या पाठोपाठ राजाचे असंख्य लोक व पुष्कळसे हत्ती दवडले. त्या हत्तींनीं त्यांचा फारच नाश केला. पुष्कळांना सोंडेनीं पकडून तुकडे तुकडे केले. त्यांच्यावरील हौद्यांत बसलेल्या लोकांनींही असंख्य लोकांची कत्तल केली. याप्रमाणें भारी नेटानें व आवेशानें हल्ला करीत राजा फौजेसह थेट नदीपर्यंत पोहोंचला. तेथें होत असलेला

घोर संहार त्याच्या दृष्टीस पडला. कोठें छावणी सोडून पळून आलेल्या बायका-पोरांची गर्दी तर कोठें घोडीं व माणसें सारखीं बिलगलेलीं होतीं. नदींत अपरंपार पाणी असल्यामुळें त्यांना पलीकडे जातां येत नव्हतें. राजाच्या फौजेंतील लोक नदीकांठीं उभेच होते. ते कोणी डोकें वर काढलें किंवा कांठावर चढून येण्याचा यत्न केला कीं त्यांना ठार करीत. त्यांतील कोणी स्वाराच्या हातचे सुटून, नदीच्या डगरीवर चढूं लागत तोंच, पाय निसरून मागें माणसांवर पडत. यामुळें न घोडीं न माणसें बचावत होतीं. हत्ती पाण्यांत शिरून सांपडतील त्यांना सोंडेंत धरून चेंदा[illegible]दा करीत होते. हा सारा प्रकार पाहून राजाचें अंतःकरण कळवळलें, त्यानें आपले लोक परत फिरविले. "ज्यांचा कांहीं अपराध नव्हता व जे मरणाला पात्र नव्हते, असे किती तरी लोक आज व्यर्थ मारले गेले आहेत" असेही त्यानें मोठ्या कळवळ्यानें उद्गार काढले. त्याच्या आज्ञेप्रमाणें सर्व सेनाध्यक्षांनीं तावडतोब आपापले सैन्याचे विभाग मागें परतविले.

नंतर राजानें आदिलशहाच्या छावणींत जाऊन त्याच्या खाशा डेऱ्यामध्यें विश्रांती घेतली. तेव्हां त्याच्या पुष्कळशा सेनापतींनीं त्याला विनंती केली कीं 'अशा वेळीं आराम करणें ठीक नाहीं. शत्रूचा पुरता नाश करावा, आज्ञा व्हावी. आम्हींच हें काम करून येतो. स्वतः हें काम करण्याची मर्जी नसली तर आमच्यांपैकीं कोणालाही हुकूम व्हावा. दिवस बाकी आहे तोंवर शत्रूच्या पाठलागामध्यें कसर करणें योग्य नाहीं.' ते लोक याविषयीं उत्सुक व उतावीळ झालेले होते. त्यांनीं राजाला अशा सुस्तीबद्दल दोष दिला व नांवेंही ठेविलीं. त्यांना राजानें म्हटलें, 'ज्यांचा कांहींच कसूर नव्हता असे पुष्कळचसे लोक आज मारले गेले आहेत. आदिलशहानें आपली आगळीक केली, तिच्या बद्दल त्याला योग्य शिक्षा घडली आहे. शिवाय मागें रायचूर अद्यापि जोरांत आहे. अशा स्थितींत पुढें वाढणें योग्य नाहीं. यापेक्षां आतां सर्वांनीं सज्ज होऊन तें शहर पाडाव करावें. या पुढें वेढ्याचें काम वेगळ्या व व्यवस्थित तऱ्हेनें चालवावयाचें आहे.'

आदिलशहाची आज अतोनात खराबी झालेली, पुष्कळच लष्करी लोक ठार झालेले, इज्जत अब्रू धुळीस मिळालेली, व राजसत्ताही गर्कशी झालेली, तेव्हां त्यानें प्राण ठेवले नसतील, तो बहुधा लढाईंत पडला असेल, अशी या वेळीं राजाची समजूत झाली असावी. पण खरा प्रकार तसा नव्हता. या लढाईंत खुद्द आदिलशहा सामिल झालेला नव्हता. तो या दिवसभर बेळगांवयेथील सुभेदार आसदखान 'सेफाल्लारीम' 'सिपाहसालार' याच्या फौजेच्या आश्रयाला

राहिला होता. आजच्या लढाईच्या परिणामाबद्दल आसदखान साशंक व भयभीत होता. त्यानें युक्ति प्रयुक्तीनें आदिलशहानें स्वतःच्या रक्षणाची सर्व भिस्त आपल्याच फौजेकडे सोंपवावी अशी मांडणी केली होती. खुद्द त्याच्या जवळ त्याच्या पथकांतले ४०० स्वार होते. सारी फौज पराभूत होऊन उधळलेली पाहतांच, त्यानें आदिलशहाला विनंति केली कीं, 'खुदावंद, यावेळीं निभावून निघणें असलें तर, माझ्या मागून यावें.' हें ऐकून, छावणी, फौज, सामानसुमान, सरदार चटसारे सोडून, आदिलशहा एका हत्तीवर चढून त्याच्यामागें निघाला. त्याला पुनः नदीपार न नेतां दक्षिणतीरानेंच परभारें जाण्याचा आसदखानाचा विचार होता. सबब त्यानें पाय उताराबद्दल चौकशीच केली नाहीं. नदीच्या दक्षिण कांठा लगतचे पहाड उजवे टाकून त्यानें थेट विजापूराची वाट धरली. (हे पहाड रामदुर्ग, देवदुर्ग, गुरगुंटा वगैरे गांवांजवळचे असावेतसें दिसतें.)

रायचूराहून एक सेनाध्यक्ष २०० स्वार, कांहीं हत्ती, व पायदळ घेऊन निघाल्याचें मागें लिहिलें आहे त्याचें काय झालें असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. समरभूमीवरील प्रकाराविषयीं त्यानें बित्तंबातमी ठेवलीच होती. आदिलशहाचा पराभव झाल्याचें कळतांच तो पुनः रायचूराच्या आश्रयाला आला. तेथील दुसऱ्या एका सरदाराचें त्याच्याशीं नीट नव्हतें यामुळें तेथें तड झालेले होते. त्याला शहरांतील लोक शहरांत परत घेईनात, तेव्हां त्याला काळजी पडली. नदीच्या खालच्या अंगाला एक पाय उतार होता त्यानें नदी पार होऊन त्यानें आपला बचाव केला. तो रायचूरांतील सरदार कुल मालक बनून खूप गबर होऊं इच्छीत होता, म्हणूनच त्यानें त्याला आंत घेतलें नाहीं, असें पुष्कळांचें मत होतें.

---

# भाग दाहावा.

मुसलमान लोकांकडून मिळालेली लूट—राजा प्रेतें दहन करविण्याची व्यवस्था करवितो—'ख्रिस्तवाओ डी फिग्यूरिडो' यांची कामगिरी.

राजा छावणींत दाखल झाल्यावर त्यानें मुसलमान लोकांची सारी लूट एकत्र करण्याचा हुकूम दिला. आदिलशहाचे ५ सरदार पाडाव झाले होते. त्यांना कैद करून ठेविलें. त्याचे बहुतेक प्रमुख सरदार पडले होते त्यांचीं प्रेतें सांपडलीं. मुख्य सेनापती सलाबतखान याच्याबरोबर त्याचे ५०० खासे गारदी होते. ते मुसलमानांच्या नोकरींत राहून भ्रष्ट झालेले पोर्तुगीज लोक होते. फौजेचा पराभव झालेला पाहून त्यानें या गारद्यांनिशीं उधळलेल्या

शिपायांतून एक करोल तुकडी जमविण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला. कारण सारेलोक परागंदा झालेले. त्यांच्यांत स्वतःच्या प्राणरक्षणापरती दुसऱ्या कशाची पर्वा करणारा एक सुद्धां पुरूष सांपडणें कठिण होतें. पराभूत व पाडाव होण्यापेक्षां मरणें बरें, असें समजून तो जिवावर उदार होऊन, फारच नेटानें व शौर्यानें शत्रूवर तुटून पडला. त्यानें व त्याच्या बरोबरच्या गार्दी लोकांनीं शौर्याची व बहादूरीची कमाल करून शत्रूची अशी सपाटून कत्तल केली कीं तिच्यामुळें पुढें तो व त्याचे पोर्चुगीज लोक, यांची लोकांना चिरकालिक आठवण व दहशत राहिली. तो सारखी कत्तल करीत जात असतांना शत्रूनें त्याला निमूटपणें वाट दिली. तो थेट राजाच्या सभोंवारच्या गारद्यांपर्यंत पोहोंचला तोंच त्याचा घोडा ठार झाला. त्याला बचावण्याविषयीं त्याच्या पोर्चुगीज लोकांनीं अटोकाट जवांमर्दी केली व आड आलेल्यांची सफा कत्तल उडविली. येथवर कीं, त्यांच्या मागील मार्ग सारखा रुंद व मोकळा झाला होता. त्याच्यावर कोणी फिरकूं पावेना. त्यांनीं सलाबतखानाला दुसरा घोडा पैदा करून दिला. त्याच्यावर स्वार होतांच तो पुनः पिसाळलेल्या क्रूर लांडग्याप्रमाणें त्या जणों बकऱ्यांच्या कळपामध्यें सपाटा उडवूं लागला. तोंवर ते सारे लोक पार थकून गेले होते. त्यांच्या सर्वांगावर जखमा झाल्या होत्या. शत्रूनें त्यांना चोंहींकडून कोंडून सारखा मारा चालविला होता. शेवटीं सलाबतखान घोड्यासुद्धां खालीं पडला. त्याला सहाय्य करण्याला झटणारे सारे पोर्चुगीज गार्दी ठार झाले, व तो कितीतरी जखमा झालेला, शत्रूच्या हातीं लागला.

या वेळीं ४००० ओर्मझचे घोडे, १०० हत्ती, ४०० मोठ्या व पुष्कळच लहान तोफा, ९०० तोफांचे गाडे व रणगाडे, शिवाय किती तरी डेरे, मंडप, वगैरे लूट रायाच्या हातीं लागली. ओझ्याचे घोडे, तट्टें, बैल वगैरे जनावरें यांची गणतीच नव्हती. पुरूष, बायका, पोरेंही पुष्कळच हातीं लागलीं. त्यांतून रायानें बायकांना सोडून दिलें.

साऱ्या प्रेतांचें दहन व उत्तर क्रिया होई तों राजा छावणींतच राहिला. आपल्या कडील कामीं आलेल्या लोकांना गती मिळावी ह्मणून त्यानें बहुत दानधर्म करविला. त्याचे १६००० लोक मारले गेले होते. हें सर्व आटपल्यावर त्यानें रायचूराकडे परत मोर्चा फिरविला. आणि पूर्व स्थळीं येऊन छावणीची वगैरे व्यवस्था अगदीं पूर्ववत करविली.

रायःयांप्रमाणें विजयी होऊन परत आला त्यावेळीं 'खिस्तवाओ डी फिग्यूरिडो' त्याच्या भेटीसाठीं आले. त्यांनीं २५ पोर्तुगीज बंदूकवाले बरोबर आणिले होते. त्यांच्या जवळ ही स्वतःची बंदूक होती. त्यांचा सहवास राजाला फार आवडला. आपलें वैभव व प्रौढ प्रताप आणि या वेळ्याच्या संबंधाचें नामी युद्ध, 'खिस्तवाओ' यांच्या प्रत्यक्ष पाहण्यांत आल्याचें रायाला भारी समाधान वाटलें. त्यानें त्यांच्यासाठीं आदिलशहाकडील लुटींत सांपडलेले डेरे देववून, त्यांचा मुक्काम आपल्या गोटाजवळच राहावा, अशी आज्ञा केली. एकदां 'खिस्तवाओ' नीं शहर पाहण्यास जाण्याची इच्छा दर्शवून विनंती केली. तेव्हां रायानें त्यांना, 'तुम्ही हा विचार सोडून द्या. तुम्हाला कांहीं धक्का पोहोंचावा अशी आपली इच्छा नाहीं,' असें ह्मटलें त्यावर 'खिस्तवाओ 'नीं उत्तर दिलें, 'आम्हां पोर्तुगीज लोकांचा सारा धंदा लढाईचा. वेळ्याच्या जागीं जाऊन, मुसलमान लोकांना पाहून येण्याची स्वामींची परवानगी झाली तर मोठी कृपा समजूं.' तेव्हां रायानें परवानगी दिली व बरोबर कांहीं लष्करी लोकही धाडले.

'खिस्तवाओ' जपत जपत तटा अलीकडील खंदकाजवळ गेले. मुसलमान लोक निःशंक व मोकळेपणीं तटावर हिंडत फिरत होते. ते त्याच्या अगदीं माऱ्यांत उभे राहात, हें पाहून 'खिस्तवाओ' नीं आपल्या बंदूकवाल्यांकडून अशा नेमानें बंदूका डागणें सुरूं केलें कीं, त्या योगानें त्या मुसलमानांपैकीं पुष्कळचसे ठार झाले. त्यांनीं आजवर जणों बंदूकांचा मारा पाहिलाच नव्हता, किंवा बंदूकांच्या गोळ्या लागून माणसें मरतात, ही गोष्ट जणों त्यांच्या गांवीं-सुद्धां नव्हती, इतक्या बेपर्वाईनें ते तटावर उभे होते. हा विचित्र मारा पाहून त्यांनीं तटाचा तो भाग पार सोडून दिला. तसे राजाचे पुष्कळचसे लोक बिनदिक्कत व निर्धास्तपणें तटापर्यंत पोहोंचले व त्यांनीं त्याचा पुष्कळसा भाग पाडून टाकण्याला सुरुवात केली. 'खिस्तवाओ' आपल्या लोकांसह शहरांत घुसले अशी साऱ्या छावणीमध्यें खबर उडाली. ती राजाच्याही कानीं पडली. एकच गडबड उडाली. हे लोक कोण. ते रायाच्या पदरीं कसे व कधीं आले, हें शहरांतील लोकांना कांहींच कळेना. पण पूर्वीच्या लढाईच्या प्रसंगीं पोर्तुगीज लोकांनीं येतांच उडविलेल्या धुमाकुळाचें त्यांना स्मरण झालें व आतां मात्र आपली पुरी कमबख्ती आली, असें ते पक्के समजून चुकले. कारण त्यांच्या आश्रयानें रायाचे लोक खुशाल तटाला भिडून तो पाडूं लागले. तटाच्या आंतल्या आंगाला मातीची पुस्ती होती. खिंडार पडत

नं. ता.

असलेल्या भागाजवळ तोफा नव्हत्या. त[illegible]शी[illegible] रक्षक मारले गेले [illegible]ते जिवंत असतांना आंतील लोकांनीं आणून [illegible]लेले द[illegible]डी बाण, [illegible]णि बंदूकीच्या गोळ्या, हल्ला करणाऱ्यांवर घालीत होते. [illegible] रायाचे लोक तटाला येऊन भिडले तरी निदान त्यांना जखमा होण्याचा तरी संभव होता. पण 'ख्रिस्तवाओ'च्या लोकांच्या माऱ्यामुळें मुळीं त्या रक्षकांचें तटावर फिरकणेंच बंद झालें, व हिंदू फौजेला निर्धास्त तटाजवळ भिडतां येऊं लागलें होतें.

एकदां 'ख्रिस्तवाओ'नां बरोबर राहूं देऊन मुसलमान लोकांवर हल्ला करण्याला परवानगी द्यावी अशी रायाच्या प्रमुख सरदार लोकांनीं विनंती केली. त्यांची मर्जी राखण्यासाठीं त कांहीं दिवस त्यांच्या बरोबर जात होते. एके दिवशीं त्यांनीं आपल्या लोकांच्या तीन तुकड्या केल्या आणि तटावर तोंड काढणाऱ्या तुर्की लोकांपैकीं पुष्कळांना भराभर टिपून काढण्याचा सपाटा लावला. तसे पुढें कोणी तोंड करीना. असें झाल्यावर रायाच्या फौजेच्या तीन टोळ्यांनीं कुदळी व पाहरी घेऊन त्या तीन तुकड्यांच्या आश्रयानें त्याच्या समोरच्या तटाचे भाग खोदण्याला सुरुवात केली. रायाच्या बाकी फौजेंतील लोकांनाही स्वतःच्या हिंमतीवर नेटानें हल्ला करण्याविषयीं 'ख्रिस्तवाओ'नीं सांगून पाठविलें. तेव्हां संरक्षक लोकांनीं बाहेरचा कोट सोडून बायका मुलें अरकिल्ल्याच्या आश्रयाला पाठविलीं. आपल्या लोकांमध्ये उडालेली ही गडबड व घबराट पाहून शहरांतील मुख्य अधिकारी त्यांना हर तऱ्हेनें उत्तेजन देऊन मागें परतविण्याचा यत्न करूं लागला. त्यांतलेच कांहीं लोक त्यानें बरोबर घेतले व तटावर विशेष नेटाचा हल्ला चालला होता त्या जागेकडे तो जाण्यास निघाला. त्यानें जातां जातां त्या लोकांना, न भितां, पुढें होऊन लढण्याविषयीं विनविलें. तेव्हां त्याला कोणी ह्मटलें कीं, 'मदतीला आलेल्या फिरंगी लोकांचा मुख्य मारा तेथेंच आहे. कोणीही तटावर डोकें काढण्याचा अवकाश ते लोक तत्काल त्याला नेमके टिपून घेतात.' हें ऐकून, ते पोर्चुगीज लोक कोण व कसे आहेत तें पाहण्यासाठीं तो तटाच्या एका मेहरापींतून कांहींसा पुढें झुकला, तोंच एक बंदूकीचा गोळा लागून त्याचा कपाळ मोक्ष झाला. ती गोळी खुद्द 'ख्रिस्तवाओ'च्या हातची होती असें मुसलमान लोक ह्मणूं लागले.

याप्रमाणें मुख्य अधिकारी मारला गेल्यावर शहरांत हाःहाःकार उडाला. जिकडे तिकडे हलकल्होळ उठला. पहिल्या मुख्य बाहेरच्या कोटावर संरक्षणाला कोणीच राहिलें नाहीं. रायाच्या लोकांना वाटेल तसें करण्याला सवड सांपडली. शहरांतील हलकल्होळ व बाहेरील तटाची अरक्षित स्थिती त्यांना कळून आली. तसे तेही पुढें काय काय प्रकार होतो तो पाहण्यासाठीं, परत फिरले, व त्या दिवसाची लढाई थांबली.

# भाग अकरावा.

शहरांतील लोकांचें शरणयेण्याविषयीं बोलणें—त्यांनीं सांगून पाठविलेल्या शर्ती-
त्या राय कबूल करितो व त्यांना अभय देतो.

दुसरे दिवशीं—आदिलशहाच्या पराभवानंतर विसावे दिवशीं—शहरांतील लोकांनीं शहराच्या तटांतील एक दरवाजा खोलला. एक पांढरें निशाण पुढें घेऊन, हात वर उचलून, ' रायानें आपणावर दया करावी ' अशी प्रार्थना करीत ते लोक त्याच्या छावणीकडे गेले.

ते येत असल्याचें कळतांच रायानें 'साळुवा तिम्मा' ला त्यांची भेट घेण्यास सांगितलें. तो त्यांच्याकडे जाण्यास निघाला. त्याला पाहतांच राय आपल्यावर कृपा करील अशी त्यांना उम्मेद वाटूं लागली. राया पुढें पोहों-चल्या बरोबर त्यांनीं त्याच्या पुढें लोटांगण घातलें आणि दीनपणें रडत ओरडत 'आपल्यावर कृपा करावी,' म्हणून प्रार्थना केली.

रायानें त्यांना उठविण्याची आज्ञा केली. त्यानें त्यांचा जान व माल या विषयीं त्यांना अभय दिलें, व दुसरे दिवशीं शहरांत प्रवेश करण्याचें ठरवून, त्यांना परत पाठविलें. शहराचा कबजा घेण्यासाठीं त्यानें आपला एक सेनाध्यक्ष त्यांच्या बरोबर पाठवून दिला.

शहरांतील मुसलमान लोक याप्रमाणें रायाकडे गेले होते, तेथें त्यांनीं रायाच्या लष्करी सरदारांमध्यें 'ख्रिस्तवाओ डी फिग्यूरिडो' यांना समक्ष पाहिलें आणि रायाला म्हटलें कीं, 'हें शहर काबिज झालें तें या परकी फिरंगी गृहस्थानीं स्वांविदाच्या फौजेंत बरोबर राहून स्वतः आमच्या मुख्य सरदाराला व त्यांच्या फिरंग्यानीं आमच्या किती तरी मुसलमान लोकांना ठार केलें म्हणूनच आमच्या शहराचा सत्यानास उडाला, तो त्याच्या मुळेंच' यावर रायानें 'ख्रिस्तवाओ' कडे पहात गौरवानें मान हलवित, आपल्या लोकांना म्हटलें, 'अशा चांगल्या एकट्या माणसाच्या हातून सुद्धां कशी उत्तम कामगिरी होते—पाहिलीत ?!' नंतर राय आपल्या डेऱ्यावर परत गेला. शहरांतील लोक शहरांत परत गेले आणि रायाच्या सैन्यांत सर्वत्र आनंद महोत्सव सुरू झाला.

# भाग बारावा.

रायाचा रायचूर शहरांत विजय प्रवेश-तेथें त्याच्या प्रीत्यर्थ मोठा उत्सव समारंभ व थाटाची मेजवानी-तो तेथील बंदोबस्त व व्यवस्था करून देतो.

दुसरा दिवस उजाडला-रायानें आपला नित्य नेम व पूजा अर्चा आटपून अशा विजय प्राप्तीला अनुरूप असे विशेष होम हवन वगैरे विधी उरकले, आणि या विजयप्राप्ती संबंधें परमेश्वराचे आभार मानले. नंतर तो एका उमद्या घोड्यावर स्वार होऊन आपले मांडलिक राजे, सरदार सेनाध्यक्ष, खास गार्दी वगैरे बरोबर घेऊन शहराकडे गेला. शहरचे लोक त्याची मार्गप्रतिक्षा करीत होते. त्यांच्या मनाची खरी स्थिती व प्रवृत्ती या प्रसंगीं कशीही असली तरी त्यांच्या चेहऱ्यावर आनंद, धैर्य व उम्मेद, इत्यादि मनोविकार स्पष्ट होते. ते सुप्रसन्न दिसत होते. 'फार दिवसांनीं परमेश्वरानें आम्हांला असा हा उत्तम प्रजापालक पाठविला आहे, त्याचा अक्षय धन्यवाद असो,' याप्रमाणें मोठ-मोठ्यानें दुवा देत व धन्यवाद गात, ते लोक रायामागून चालले होते. त्यांनीं या व अशा शद्बांनीं दीनपणें प्रार्थना करीत, रायानें आपल्यावर क्षमा करावी व आपणाला प्राणदान द्यावें म्हणून खटपट चालविली होती. रायाची स्वारी अशा थाटांत बाले किल्ल्यावर पोहोंचली. तेथें त्याच्या आज्ञेप्रमाणें सर्व प्रमुख मुसलमान लोकांना बोलावून जमा केलें. त्यानें सर्वांना मालमत्ता सुरक्षित राहील अशाबद्दल आश्वासन दिलें, आणि म्हटलें, 'तुमची मालमत्ता व तुमचे स्वतःचे देह यांची वाटेल ती व्यवस्था करण्याला तुम्हाला मुभा आहे. येथेंच पूर्ववत राहणें असेल त्यानें खुशाल राहावें. जाणार असतील त्यांनीं सारी चीज वस्त घेऊन एकदम निघून जावें.'

हें ऐकतांच त्यांनीं हात उभारून मनापासून परमेश्वराचे धन्यवाद गाइले. रायानें आपल्याशीं असें नरम व दयाळू वर्तन केलें याबद्दल त्याच्यापुढें लोटांगणें घातलीं व त्याचे आभार मानले. हें चाललें असतांना लष्करी लोक शहरांत लूटमार करीत असल्याची खबर आली. तेव्हां रायानें तात्काळ ती बंद करविण्याची आज्ञा केली, आणि लुटलें गेलेलें सारें सामान ज्याचें त्याला परत देवविलें. अशा प्रसंगीं पराजित लोक प्राण वांचले व सुटका झाली तर मिळविली, असें समजत असतात. चीज वस्त मिळाली न मिळाली पर्वा करीत नाहींत. या वेळीं रायानें आज्ञा केली. असूनही बरीच चोरा पोरी व लूट

मार झाली. तरी पुढें याविषयीं रायाच्या कानीं कागाळया आल्या तेव्हां त्यानें असें वर्तन करणाऱ्या लोकांना खरपूस मार देवविला.

आदिलशहाचा असा हा पराभव झाल्याबद्दलची खबर थोड्या अवकाशांतच साऱ्या हिंदुस्थानभर पसरली. या वेळीं कृष्णरायाचें राज्य फारच विस्तृत झालेलें होतें, व तो महाप्रतापी महाराजा मानला जात होता. हें त्याच्या विजयाचें वर्तमान 'झेमुल्को-'माद्रेमुल्को'-'देसूती' व 'व्हिरिडो' वगैरे दक्षिणच्या-कलबुर्ग्याच्या-बादशहाच्या तावदार सुल्तानांला कळलें तेव्हां त्यांना कांहींसें समाधान वाटलें. नाहीं असें नाहीं. कारण ते आदिलशहाला पाण्यांत पहात होते तरी पण त्यांना यापासून स्वतःविषयीं काळजी, तगमग व भितीशी वाटूं लागली. त्यांनीं रायाकडे वकील पाठविले. ते त्याच्याकडे पोहोंचले. तोंवर राय रायचूरांतच होता. असलें मजबूत व बहुतेक अभेद्य तटबंदीदार शहर रायानें पादाक्रांत केलें, याबद्दल त्या वकीलांना आश्चर्य तर वाटलेंच पण याहूनही त्याचें तें अफाट सैन्य, कल्पनातीत वैभव व सामर्थ्य पाहून, ते अगदी थक्क होऊन गेले. रायाजवळ पोहोंचतांच त्यांनीं आपापल्या दरबाराकडून आणलेले खलीते पेश केले. ते रायानें तेव्हांच वाचविले. त्यांत त्या सुल्तानांनीं रायाला लिहिलें होतें कीं, 'आपण आदिलशहाचा पराभव करून त्याची खोड मोडली, हें ठीकच झालें. यांतच समाधान मानून पुढें युद्ध वाढवूं नय. त्याच्याकडून जिंकून घेतलेलें त्याचें त्यांना कृपा करून परत द्यावें आणि मनाचा मोठेपणा, औदार्य, व भलाई दाखवावी. असें झालें तर आम्हीं ही आपलें सारें म्हणणें या पुढें मान्य करीत राहूं. पण असें करण्याची आपली मर्जी नसली तर, आम्हां सर्वांना आदिलशहाच्या पक्षाला मिळून तें सारें त्याला परत देवविणें भाग पडेल. हें पक्के समजावं.'

त्या पत्रांतील अशा तऱ्हेचा हा मजकूर पाहून रायानें त्या सर्वांना पुढील मजकूराचें एकच उत्तर लिहून पाठविलें :—

'सन्मान्य 'माद्रे मुल्को,' 'झेमुल्को,' 'देसकार,' आणि 'व्हिरिडो' व इतर दक्षिणचे राजे लोक यांनाः-आपण पाठविलेले खलीते अवलोकनांत आले. त्यांतील मजकूराबद्दल आम्हीं आपले फार आभारी आहोंत. आदिलशहाविषयीं आपण लिहितां त्यास त्याच्याकडून जें कांहीं जिंकून घेण्यांत आलें तें त्याच्या हातून जाण्याची जिम्मेदारी त्याच्यावरच आहे. त्याच्याकडून घडलेल्या वर्तनाला हें अनुरूपच झालेलें आहे घेतलेलें त्याचें त्याला परत द्यावयाचें असें लिहितां त्यास तसें करणें आम्हांला वाजवी वाटत नाहीं. व न आम्हीं तसें करूं. आम्हीं

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

असें न केल्यास आपण आमच्या विरुद्ध जाऊन आदिलशहांचें सहाय्य करणार, असें लिहिलें, त्यास आपण इकडे येण्याची तसदी घेण्याची आवश्यकताच राहणार नाहीं. कारण आम्हीच आपला शोध करीत लौकरच आपल्याकडे येत आहों. तोंवर आपण आपल्या राज्यांत तरी स्थिर राहण्याचें धैर्य केलेंत, म्हणजे पुरे. हेंच आमचें आपल्याला उत्तर. कळावें.'

नंतर रायानें त्या वकीलांना रीतीप्रमाणें वस्त्रें व भेटी आणि त्याच्या खलीत्यांचीं उत्तरें देऊन, त्यांची बिदागी करण्याविषयीं आज्ञा केली.

---

# भाग तेरावा.

रायचूरांतून बरेच लोक निघून जातात त्यांच्याशीं रायाचें थोरपणाचें, योग्य, व गोडपणाचें वर्तन.

पुष्कळसे लोक रायचूर सोडून गेले. त्यांना तेथून निघण्याला जवळ साधन सामग्री कांहीं नव्हती. अशा सर्वांना प्रवासाचीं योग्य साधनें व शिधा सामग्री देण्याला रायानें आज्ञा केली. रायचूर व त्याच्या खालचा प्रांत यांची वसूल वासलात, हिफाजत व व्यवस्था लावणें आटपल्यावरही राजा कांहीं दिवस तेथेंच राहिला. त्यानें शहराच्या तटाची दागदूजी करविली, बंदोबस्ताला लागेल तितकी फौज व शिबंदी भरती करून ठेविली व नंतर तो विजयनगरला जाण्याला निघाला. तेथें त्याचें भारी थाटाचें व आनंद महोत्सव युक्त स्वागत झालें. त्याला किती तरी मेजवान्या दिल्या गेल्या. त्यानेंही लष्करी लोकांना मोठ्या उदारपणानें व सढळ हातानें इनामें वांटलीं.

हे महोत्सव व या मेजवान्या आटोपल्यावर तो नव्या शहराला गेला. आदिलशहाकडील वकील आले असून, त्यांची उतरण्या संवरण्याची व्यवस्था लावली गेली असल्याचें, तेथें त्याला कळविण्यांत आलें. हे वकील आल्याचें त्याला माहित नव्हतें असें नाहीं. पण त्यानें याविषयीं बुद्ध्या अजाणपणा दाखविला. कोणी वकील येतेवेळीं त्याची पेषवाई व स्वागत करण्याची वहिवाट नाहीं. तो वकील आलेला विजयनगरांतच होता. राय नव्या शहराला गेलेला पाहून तोही तिकडे गेला. त्यानें आपले डेरे त्या शहरालगतच लाविले. त्याचा खास डेरा फारच भव्य, सुरेख व उत्तम होता. तसा या प्रांतांत कधीं पूर्वीं पाहण्यांत आला नव्हता. त्या वकीलाचें नांव 'मत्तूकाटेम' होतें. त्याच्या बरोबर १५० स्वार,

पुष्कळसे नोकरचाकर, बरेचसे उंट, किती तरी भारबरदारीचीं जनावरें, आलेलीं होतीं. आदिलशहाच्या खास दरबारांतील दोघे चिटणीसही त्याच्या बरोबर होते. यावरून तो आपल्या मालकाकडून जणों पूर्ण अखत्यार घेऊन आलेला होता, असें दिसलें.

याप्रमाणें राहण्याउतरण्याची व्यवस्था झाल्यानंतर त्यानें रायाकडे आपण आल्याबद्दल वर्दी पाठवून दिली. तसेंच त्याला विनंती करून देवविली कीं, 'कृपा करून लौकरच दिवस ठरवून भेट घ्यावी व आपल्या कामाचा निकाल करून जलदी निरोप द्यावा.' त्यावर 'लौकरच भेटीसाठीं बोलाविलें जाईल, तुम्ही तरी इतक्यांतच आलेले-इतकी घाई कशाची-योग्य वेळीं सवडीनुरूप भेट घेऊन निरोप दिला जाईल.' असें रायाकडून उत्तर मिळालें. पुढें तो वकील एक महिनाभर तेथेंच स्वस्थ राहिला. त्याला रायाकडून पाचारण किंवा निरोप कांहीं आला नाहीं. किंवा कां व कधीं आलां व कसे आहां, हें सुद्धां कोणी पुसलें नाहीं. तो रोज राजवाड्यांत जात असे. रायाकडील हें वर्तन पाहून त्यानेंही, 'याबद्दल पुनः गोष्ट काढावयाची नाहीं, काय होतें तें पाहावयाचें, आणि रायाकडून आपण होऊन बोलावणें येई तों वाट पाहावयाची,' असें ठरविलें. तरी त्यानें प्रत्यहीं राजवाड्यांत जाऊन तेथें येणाऱ्या सरदार वगैरे लोकांना भेटण्याचा व त्यांच्याशीं बोलण्या चालण्याचा क्रम कायम ठेविला होता. पुढें एकदांचें एके दिवशीं, 'उद्यां दिवस ठीक आहे. तेव्हां तुम्हीं कां व कोणच्या कामासाठीं आलां आहां, तें ऐकून घेण्याची आमची मर्जी आहे,' असें रायानें त्याला सांगून पाठविलें. त्याप्रमाणें तो अशा प्रबल व प्रतापी महाराजाच्या भेटीला योग्य अशी सर्व तयारी व थाट करून निघाला. अशा प्रसंगीं अशा महत्वाच्या कार्याला उचित व अवश्य समजून त्यानें शहरांतील प्रमुख व प्रतिष्ठित मुसलमान लोकांनाही बरोबर घतलें होतें. रीतिप्रमाणें डंका निशाण, रणवाद्यें वगैरे लवाजमाही बरोबर होता. अशा थाटानें तो राजवाड्यांत पोंहोंचला. तेथें रायाच्या खासगीकडील सरदार व अधिकारी यांनीं त्याची रीतीप्रमाणें पेशवाई व स्वागत केलें. नंतर ते सारे पहिल्या दरवाजाच्या आंत जाऊन राजाच्या परवानगीची वाट पहात, आंतील दलानामध्यें बसून राहिले. त्यांना तेथवर आणण्याविषयीं रायानें आधींच आज्ञा केली होती. पुढें लौकरच त्यांना रायाच्या समक्ष आणण्याबद्दल परवानगी आली. वकीलानें आपल्या रिवाजाप्रमाणें रायाला आदबीनें सलाम वगैरे केला. रायाचें मंत्रीमंडळ त्याच्या भोंवतीं उभें होतें. 'आपल्या वकीलीचा मतलब काय असेल तो

सांगावा. आपण ऐकण्याला तयार व खूप आहों,' अशी रायानें आज्ञा केली. ती ऐकून वकीलानेंही अशा थोर व प्रतापी महाराजा समक्ष बोलतांना योग्य, गंभीर व विनीत, अशा रीतीनें आपण आणिलेला आपल्या मालकाचा निरोप रायाला सुनाविला, तो असा :—

---

## भाग चौदावा.

### रायापुढें वकील आपलें काम बजावितो.

तो म्हणाला,'महाराज,आमचे मालक आदिलशहा यांनीं मला आपल्याकडे धाडलें आहे. आपण प्रसन्न चित्तानें इन्साफ करावा अशी माझ्या मुखानें आपल्याला त्यांची विनंती आहे. आपण साऱ्या जगामध्यें थोर, प्रतापी, व सत्य आणि न्याय इन्साफ चाहणारे राज पुरुष असून आपल्याविषयीं आमच्या मनांत योग्य आदर व पूज्यभाव वसत आहे, असें, म्यां आपल्या मुखानें त्यांच्याकडून आपल्याला कळवावें, अशी त्यांनीं मला आज्ञा केली आहे. आपण निष्कारण त्यांच्याशीं असलेला शांततेचा स्नेहसंबंध व तह तोडला. तो आजकालचा नवीन नसून पूर्वापार व पुष्कळ वर्षांपासून चालत आलेला, आणि आपल्या पूर्वींच्या राजांनीं नेकीनें पाळलेला होता. आपण आपल्या राज्याची हद्द सोडून आमच्या राज्यांत स्वारी केली, व आमच्याशीं लढाई केली, ती कां, तें कळत नाहीं. आपण रायचूराला वेढा घातला अशी खबर आली तोंवर आम्हाला त्याच्या विषयीं बिलकूल शंका नव्हती. त्याच्या आसपासचा सारा प्रदेश आपण लुटून धूळधाण करून टाकीत आहां असें ऐकून आम्हांला त्याचा प्रतिकार करण्यासाठीं यावें लागलें. तेथें पोहोंचल्यावर आपण आमच्या दरबारचे सारे लोक ठार मारले व आमची छावणी लुटून गारत केली. या सर्व गोष्टींचे आपण खुद्द साक्षी आहांत. या सर्वांबद्दल योग्य मोबदला द्यावा, त्या वेळीं घेतलेलें सर्व सामान, डेरे, घोडे, हत्ती, तोफखाना, वगैरे परत करावें आणि रायचूर खालीं करून द्यावें. ही विनंती मान्य करून वर लिहिलेली सर्व मिळकत परत केलीत तर आम्ही आपले कायमचे एकनिष्ठ दोस्त राहूं. तसें आपण न केलें, व झालेली गोष्ट आपल्याला चांगली वाटत असली तरी, ती नेहमी गैरच समजली जाईल.' असें बोलून त्यानें आपलें भाषण संपविलें. यावर रायानें त्याला म्हटलें, 'आतां परत जा व विश्रांति घ्या. उद्यां तुम्हांला परत जाण्याला निरोप दिला जाईल.' नंतर रीतिप्रमाणें रेशमी झगा व इतर वस्त्रें, पोषाख व भेटी दिल्या गेल्यावर दरबार बरखास्त झाला.

# भाग पंधरावा.

राजा त्या वकिलाला दरबारांत जवाब देतो.

दुसरे दिवशीं दरबार भरवून रायानें त्या वकिलाला बोलावून घेतलें. त्याच्याशीं बराच वेळ इतर कांहीं गोष्टींविषयीं बोलणें झाल्यावर रायानें त्याला म्हटलें, 'आदिलशहाच्या विनंतीप्रमाणें सर्व कांहीं परत देण्याला व सलाबतखानालाही एकदम सोडून देण्याला आम्ही तयार आहों. पण त्यापूर्वीं आदिलशहानें खुद्द येऊन आमच्या पायां पडावें व आमचें वर्चस्व कबूल करावें.'

रायाकडून मिळालेलें हें उत्तर ऐकून वकील रीतीप्रमाणें निरोप घेऊन डेऱ्यावर परत गेला. झालेल्या प्रकाराबद्दल त्यानें तपशीलवार कैफियत लिहून तयार केली व ती बरोबर आलेल्यांपैकीं एका चिटणिसाच्या हातीं शहाकडे पुढें रवाना केली. तिचें थोड्याच दिवसांत आदिलशहाकडून उत्तर आलें. त्याच्यांत लिहिलें होतें कीं, 'आम्हाला विजयनगराला जातां येत नाहीं; तेव्हां रायाची भेट कशी व्हावी. तरी रायाच्या मर्जीप्रमाणें सर्व कांहीं करण्याला आम्ही अगदीं तयार व राजी आहों.' हें उत्तर घेऊन वकील रायाकडे गेला. आदिलशहानें समक्ष येऊन आपल्या पायां पडावें, ही गोष्ट, त्याच्याकडून जिंकून घेतलेला सर्व प्रांत व सर्व वस्तू, यांच्यापेक्षां रायाला अधिक महत्वाची वाटत होती. सबब त्यानें वकीलाला उत्तर दिलें कीं, 'ठीक आहे. तुम्ही जाऊन आदिलशहाला त्याच्या राज्याच्या सरहद्दीवर आणण्याची तजवीज करा. मीही तेथें लौकरच पोंहोंचतों.'

हें कबूल करून वकीलानें निरोप घेतला आणि आदिलशहाचें मन वळवून त्याला सरहद्दीवर आणण्याचा यत्न करण्यासाठीं तो रवाना झाला. इकडे राजाही लौकरच मुद्गल येथें गेला. तें शहर सरहद्दीजवळच होतें. तेथें आदिलशहा येण्याला तयार आहे, तो निघाला आहे, बहुतेक जवळ येऊन पोंहोंचला असावा, असें लोकांनीं रायाला सांगितलें. त्यावरून तो वाट पहात राहिला. पुढें कांहीं दिवसांनीं तो तसाच तांतडीनें त्याच्या भेटीसाठीं म्हणून पुढें निघाला, आणि दक्षिण देशच्या राजाच्या हद्दींत घुसला. तो या वेळीं आदिलशहाच्या भेटीसाठीं फारच उतावीळसा झालेला होता. पण आदिलशहाला त्याच्याकडे येण्याचें धैर्य होईना. इकडे रायाला मात्र, तो अमक्या मुक्कामावर आहे, तमक्या जागीं आहे, आतां येतो आहे, अशा खोट्याच खबरा मिळत, तसा तो पुढें पुढें वाढत थेट विजापुराला पोंहोंचला. हें शहर साऱ्या दक्षिण देशच्या राज्यामध्यें उत्कृष्ट आहे. तेथें आपल्या वडील इच्छेच्या बांधणीचे

पुष्कळसे वाडे व घरें आहेत. शिवाय अनेक बागबगीचे, द्राक्ष मंडप, आणि डाळिंबें, नारिंगें, लिंबें वगैरे तऱ्हे तऱ्हेच्या फळ झाडांच्या बागाही कितीतरी आहेत.

अशा त्या सुरेख व संपन्न शहरांतच आदिलशहाची वाट पहात राहिलेलें बरें, अथा रायानें विचार ठरविला. आदिलशहा आलाच तर, त्यानें आपणाला येथवर येण्याची तसदी देऊन असा हा भारी अपमान केला याबद्दल त्याला कैद करावें, किंवा ठार मारावें. असेंही त्यानें योजिलें होतें. तो आपला शत्रू येत नाहीं असें पाहून ही, तो तेथें पुष्कळ दिवस राहिला. पुढें पाण्याचा तोटा पडल्यामुळें त्याला परत जावें लागलें. विजापूर शहर एका मोठ्या मैदानामध्यें वसलेलें आहे. तेथें पावसाच्या सांठविलेल्या पाण्याशिवाय दुसरी पाण्याची सोय नाहीं. पावसाचें पाणी दोन मोठ्या तलावांमध्यें सांठविलें जातें. रायाला तेथें फार दिवस राहतां येऊं नये ह्मणून, त्या तलावांतील पाणी तेथील मुसलमानांनीं बुध्यां फोडून दिलें होतें. यामुळें रायाला परत जाणें भाग पडलें. तो तेथें थोडेच आठवडे राहिला तरी तेवढ्या अवकाशांतसुद्धां तें सारें शहर वैराणसें होऊन गेलें. अशी नासधूस करण्याविषयीं रायानें हुकुम दिला होता असें नाहीं. पण त्याच्या फौजेंतील लोकांनीं सर्पणासाठीं ह्मणून इतकीं कांहीं घरें पाडून टाकिलीं कीं, तीं पाहणाऱ्यांच्या मनाला भारी दुःख व उद्वेग होत असे. त्या लोकांना तरी निरुपायामुळेंच असें करावें लागलें, कारण त्या शहरांत व आसपासच्या प्रदेशांत सर्पण फारच दुर्मिळ असून, तें फार लांबून आणावें लागत असे. 'आमच्या सरदार व सेनाध्यक्ष आणि रयतलोकांच्या घरांनीं असा कोणचा अन्याय केला होता ह्मणून त्यांची अशी नासधूस करविली गेली ?' असें आदिलशहाकडून रायाला विचारणें झालें. राज महालामध्यें राजा रहात होता त्याच्या शिवाय इतर महाल व घरें शाबूत अशीं फारच थोडीं राहिलीं होतीं. त्याला रायानें उत्तर पाठविलें कीं, 'ही गोष्ट आपण करविली नाहीं किंवा आपल्या हुकुमानें झालेली नाहीं. तरी पण आपल्या लोकांकडून हें न घडावें असा बंदोबस्त करतां येणें शक्य नव्हतें.'

राय मुदगल येथें परत पोहोंचल्यावर आदिलशहा विजापुराला परत आला. तेथील झालेली धूळधाण पाहून तिच्याविषयीं सारा दोष त्यानें स्वतःकडे घेतला. तो ह्मणाला, 'आपण रायाकडे जातों तर असा प्रकार न होता. या पुढें तरी तसें करण्याची खबरदारी घेऊं. तसें करण्याला आपण तयार होतों पण आपणाला योग्य सल्ला मिळाली नाहीं.' याबद्दल त्यानें आपल्या दरबारी लोकांशीं वाटाघाट केली. त्यानें त्यांना ह्मटलें, 'रायाशीं आपला

कायमचा स्नेह भाव झाला तर आपल्या राज्याची स्थिती किती तरी निर्धास्त होईल. त्याच्याशीं दोस्ताना झाल्यानें आपणाला आपलें राज्य व वैभव हीं किती तरी वाढवितां येतील. राय नजर असल्याच्या आधारावर आपल्याला सार्‍या गोष्टी मर्जीप्रमाणें करितां येतील.'

या व अशाच इतर अनेक गोष्टींबद्दल तो नेहमीं आपल्या मंडळी बरोबर सल्ला मसलत करीत असे. बेळगांवचा सूभेदार आसद्खान त्याला समरांगणांतून पळवून सुरक्षित परत घेऊन आलेला होता. तो अशा सल्ला मसलतीच्या कामीं मोठा धूर्त व चलाख होता. त्यानें हीं भाषणें ऐकून म्हटलें, 'हुजूर खावंदाची परवानगी होईल तर, स्वतः विजयनगर येथें रायाकडे जाऊन, झालेल्या सर्व प्रकाराची निरवानिरव करून, खावंदाच्या मर्जीप्रमाणें सर्व जुळवून आणण्याला ताबेदार तयार आहे.' ही त्याची विनंती आदिलशहानें मान्य केली.

आसद्खानानें याप्रमाणें विजयनगराला जाण्याचा घाट घातला तो केवळ आदिलशहाचें हित करावें एवढ्याच हेतूनें नव्हता. हें काम दुसर्‍याही कोणाच्या हातून जुळलें असतें. त्याचा यांत एक दुष्ट व नीच असा अंतस्थ हेतू होता. रायानें सलाबतखानाला विजयनगरास कैदेंत ठेविलें होतें. त्याच्याशीं आसद्खानाचें हाड वैर होतें. कारण आसद्खानानें भित्रेपणानें आदिलशहाला अयोग्य सल्ला देऊन लढाईंतून पळवून नेलें व या मुळेच त्याचा पराजय होऊन सारी फौज गारत झाली, हें सलाबतखान समजून होता. तो कैदेंत होता तेथें त्याच्याकडे भेटीला स्वतःच होऊन किंवा इतरांनीं पाठविलेले लोक जात, त्यांच्या जवळ, तो या संबंधानें भारी रागानें व त्वेषानें बोलत असे. तो नेहमीं म्हणे, 'मला कैदेंतून सुटण्याची इच्छा असलीच तर ती इतक्याच साठीं कीं त्या नीच आसद्खानाचा सूड घेऊन त्याचा पुरा नाश करितां यावा. त्याच्याशीं आपण लढूं. ते कट्ट्या हाडवैरानुरूप. यांत कधीं कसर करणार नाहीं.' या सर्व गोष्टी आसद्खानाला कळल्या होत्या. सलाबतखान सुटला तर तो बोलल्याप्रमाणें करण्याला कधीं चुकणार नाहीं, हें तो पक्कें जाणून होता. म्हणून त्यानें आपल्या या हाडवैर्‍याचा प्राणघात करवून अरिष्ट टाळावें व निश्चिंत व्हावें, असा निश्चय केला होता. हें कपट काय घडून आलें तें पुढें लिहिण्यांत येईलच. या कारतांच आसद्खानानें आपणाला रायाकडे वकील नेमून पाठविण्याबद्दल आदिलशहाला विनंति केली व ती मान्य ही झाली.

# भाग सोळावा.

आसदखान आदिलशहाकडून वकील नेमून जातो — तो सलाबतखानाचा प्राण घेण्याची तजवीज करितो.

आदिलशहानें रवाना केल्याप्रमाणें आसदखान स्वार व नोकर चाकरांनिशीं रायाकडे दाखल होण्याला निघाला, त्या वेळीं राय मुदगल येथें होता आदिलशहाही त्याच्या बरोबर नदीपर्यंत गेला. तो आल्याचें कळल्यावर राजाच्या हुकुमाप्रमाणें त्याला शहरांत येऊं दिलें. पण पुढें बरेच दिवस त्याची राजाशीं भेट झाली नाहीं. पुढें पाचारण आल्यावर तो रायाकडे गेला. तेथें त्याचें बरेंचसें बोलणें झालें. त्यांत त्यानें आदिलशहाच्या हातून अशी गलती कशामुळें झाली, त्याबद्दल सविस्तर कारणें सांगून माफीशी मागितली. राजकारस्थानी भाषणें करण्यामध्यें तो भारी हुपार तसाच विलक्षण सभाधीट होता. राजे लोकांशीं भाषण करण्याची ढब त्याला उत्तम साधली होती. त्यानें आपल्या मिष्ट व मतलबी भाषणानें रायाच्या मनांत असलेला आदिलशहाविषयींचा सर्व राग व द्वेष पार घालविला. त्यानें त्याला सांगितलें कीं, 'आपल्याकडे कैदेंत असलेल्या सलाबतखानानें आदिलशहाकडे आपण रायाच्या भेटीला येऊं नये, आणि तर आपणाला ठार मारविण्याचा बेत आहे असें लिहून धाडलें होतें. हेंच तो न येण्याचें मुख्य व खरें कारण होतें.' असल्या भाषणांनीं त्यानें रायाचें मन सलाबतखानाविषयीं कलुषित करण्याचा क्रम चालविला. त्याचा प्राण घेतला जाण्याविषयीं ही त्याची खटपट चाललेली दिसून आली. रायानें त्याच्या भाषणावर विश्वास ठेविला, कारण आसदखानासारखा थोर व नामवर सरदार खऱ्या व्यतिरिक्त भाषण करील अशी त्याला कल्पनाच नव्हती. अखेर त्यानें रागाच्या सपाट्यांत सलाबतखानाचा शिरच्छेद करण्याविषयीं आज्ञा केली. ती तत्काल अमलांतही आली!

आपला मतलब साधला. या पुढें आपण रायाकडे राहणें ठीक व सुरक्षित नाहीं, असें आसदखानाला वाटलें. 'मला परत जाण्याला निरोप व्हावा. महाराज कृष्णातीरावर पोहोंचतात तोंवर मी आदिलशहालाही तेथें आणतों,' असा बहाणा करून त्यानें राजाजवळ निरोप मागितला. पण रायानें त्याला म्हटलें, 'इतकी उतावळी कां. आणखी कांहीं दिवस आनंदानें रहा. तुम्हाला कांहीं वस्तु दाखवावयाच्या आहेत व आणखी कांहीं गोष्टीबद्दल बोलावयाचें आहे.' आपली दगाबाजी बाहेर फुटेल अशी आसदखानाला भीती होती, व जास्त

दिवस राहण्यांत धोका होईल हेंही तो जाणून होता. या मुळें त्याच्या वर्तनांत फरक दिसूं लागला. सलाबतखानासंबंधानें त्यानें केलेली लबाडीही लौकरच उघडकीस आली. तेव्हां रायानें त्याला धरणें पाठविलें. पण या पूर्वींच त्यानें पोबारा केला होता. तो रात्रीच्या रात्रींच वाट चालून तसाच आदिलशहाकडे हजर झाला, आणि त्यानें त्याला कळविलें कीं, 'रायानें सलाबतखानाचा शिरच्छेद केला व माझीही तो वाट लावणार होता पण मी सुदैवानें निसटून आलों. खावंदानीं रायावर विश्वास ठेवूं नये. तो किती झालें तरी काळा काफर.' असें सांगून व आदिलशहाचें मन रायाविषयीं दूषित करून तो बेळगांवाला परत गेला व त्या शहराचा त्यानें पुरा बंदोबस्त केला.

पुढें आदिलशहानें त्याला हुजूर हजर होण्याविषयीं हुकूम केला, पण त्याची त्यानें कधींच बजावणी केली नाहीं. कारण आपली हरामखोरी व दगाबाजी पुरी प्रगट झाल्याचें त्याला कळून चुकलें होतें.

---

# भाग सत्रावा.

राय आदिलशहाला भेटण्यासाठीं आपल्या राज्याच्या सरहद्दीपर्यंत जातो-तो आला नाहीं असें पाहून त्याची झालेली स्थिती.

ठरल्याप्रमाणें कृष्णदेवराय आपल्या राज्याच्या सरहद्दीवर जाऊन पोहोंचण्यांत चुकला नाहीं. आसदखानानें त्याला तेथें आदिलशहा व त्याची आई यांना भेटीला आणण्याचें सांगितलें होतें. पण तेथें कोणीच आलेलें नव्हतें. हें पाहून, ही सारी आसदखानाची लबाडी व दगाबाजी असून, ही खटपट त्यानें केवळ सलाबतखानाचा घात व्हावा एवढ्या साठींच केलेली होती, असें रायाच्या स्पष्ट लक्ष्यांत आलें. त्याचा त्याला अतोनात संताप आला. त्यानें दक्खनी राज्यांत स्वारी केली व तो थेट कलबुर्ग्याला पोहोंचला. तें शहर त्यानें पाडाव केलें आणि त्याचा कोट जमीनदोस्त केला. शिवाय मार्गांतील पुष्कळशा शहरांचीही त्यानें तीच वाट लावली.

तेथूनही पुढें चढाई करून जाण्याचें त्याच्या मनांत होतें. पण तसें करणें त्याचे सरदार व मंत्री यांना पसंत पडलें नाहीं. त्यांनीं विनंती केली कीं, 'या वाटेंत पाणी मिळणार नाहीं. शिवाय आपण दोस्त समजत असलेल्या मुसलमान राजांना सुद्धां असें वाटेल कीं, आपण मूळचे एकाच बादशहाचे ताबेदार. त्यांपैकीं एकाचें राज्य आपण-रायांनीं-पाडाव केलें, तसेंच सर्वांचीं राज्यें घेतल्या वांचून

आपण राहणार नाहीं. याच्या प्रतिकारार्थ ते आदिलशहाशीं स्नेह व सल्ला करतील आणि सारे मिळून आपणावर तुटून पडतील. याचेंही मोठेंसें भय बाळगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. तरी पण, पाण्याच्या दुष्काळाला निरुपायानें भ्यालेंच पाहिजे. आतांच पाणी दुर्मिळ झालें आहे.' हे ऐकून रायाला त्यांची सल्ला मान्य करावी लागली.

कलबुर्गा येथें किल्ल्यामध्यें दक्कनच्या मूळ सुलतानाचे तिघे पुत्र होते ते रायाच्या हातीं लागले. त्यांतील वडील पुत्राला रायानें 'दक्कनच्या गादीवर बसविलें. त्यांचा बाप पूर्वींच वारला होता. त्याचा एक खर्ची दासीपुत्र होता. आदिलशहाच्या बहिणीशीं त्याचें लग्न झालेलें होतें. यामुळें आदिलशहाच्या मनांत त्यालाच गादीवर बसविण्याचें होतें. म्हणून त्यानें या तिघां औरस पुत्रांना या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें होतें. रायानें गादीवर बसविलेल्या शहाजाद्याला सर्व प्रजेनें मंजूर केलें. तसेंच राज्यांतील प्रमुख सरदार व मांडलिक त्याच्या ताबेदारींत हजर झाले. खुद्द आदिलशहासुद्धां रायाच्या धाकामुळें त्याला मुख्य मानूं लागला. (हें ऐतिहासिक दृष्ट्या खरें दिसत नाहीं.) बाकीच्या दोघां भावांना रायानें बरोबर नेऊन प्रत्येकाला सालीना ५०,००० होन्नाची नेमणूक करून दिली. तो त्यांना थोर राजपुत्र व महाराजे यांच्या बरोबरीचे लेखून त्यांचा तसाच मान ठेवितो. तेही त्या योग्यतेचे आहेत.

विजयनगर सोडून निघालेल्या वर्षींच राय तेथें परत आला. त्यानंतर त्याच्या व आदिलशहाच्या दरम्यान सल्ला किंवा युद्ध, या संबंधानें विशेष कांहीं घडलें नाहीं.

---

# भाग अठरावा.

राय आपल्या हयातींतच आपल्या सहा वर्षांच्या वयाच्या पुत्राला स्वतः राजपदावर स्थापन करितो.

याप्रमाणें या युद्धाचा शेवट लावून आपल्या शत्रूवर असा भारी विजय मिळविल्यानंतर, आपलें वय होत चाललें असें पाहून, वृद्धपणीं विश्रांती घ्यावी व आपल्या पश्चात् आपल्या पुत्रानेंच गादीवर बसावें यासाठीं, रायानें त्याला आपल्या हयातींतच गादीवर बसविण्याचें ठरविलें. तेव्हां त्या मुलाचें वय सारें सहा वर्षांचें होतें. आपल्यामागें काय होईल कोण जाणें असें रायाला वाटत होतें. त्यानें राजपद, सिंहासन, व तदनुषंगिक अधिकार व वैभव सोडून तें सर्व स्वतःच त्या मुलाला अर्पण केलें, व तो त्याचा दिवाण म्हणून काम पाहूं

लागला. त्याचा पूर्वापार दिवाण 'साळुवा तिम्मा,' त्याचा मंत्री-सल्लागार-झाला. 'साळुवा'च्या एका पुत्राला त्यानें अव्वल दर्जाचा सरदार व जहागीरदार केलें होतें. याप्रमाणें मुलाकडे सर्व अधिकार सोंपल्यावर कृष्णदेवराय या बदललेल्या परिस्थितीला येथवर अनुरूप वागूं लागला कीं, त्यानें स्वतः त्या बालराजाचा ताबेदार म्हणून, त्याला प्रणाम केला. राज्यपदासंबंधांत असा फेरबदल केल्यावर कृष्णरायानें त्या प्रीत्यर्थ सारखा आठ महिने खूप आनंद महोत्सव करविला. त्याच अवधींत तो बालराजा आजारी पडला व शेवटीं मरण पावला. पुढें लौकरच त्याला 'साळुवा'च्या पुत्रानें विष दिलें होतें, अशी रायाला बातमी लागली. याचा अर्थातच त्याला भारी त्वेष व क्रोध आला. ही गोष्ट निःसंशय खरी आहे अशी त्याची खात्री झाली. तेव्हां त्यानें साळुवा, त्याचा तो पुत्र, त्याचा बंधू, 'गांमडा राजा' आणि त्याचे आप्त इष्ट असलेले पुष्कळसे सेनाध्यक्ष व सरदार, यांना आपल्या समक्ष बोलावून घेतलें. त्यांनीं येऊन प्रणाम केल्यावर, त्यावेळीं हजर असलेले सर्व मांडलीक, राजे, सरदार, राज्यांतील प्रमुख लोक, आणि 'साळुवा' चे इतर आप्त इष्ट, या सर्वांच्या समक्ष त्यानें 'साळुवा' ला म्हटलें, 'मी तुला नेहमीं आपला मोठा इमानदार दोस्त मानीत आलों. आज ४० वर्षें या राज्यामध्यें तूं कुल मुखत्यार व प्रतिनिधी होतास. हें राज्य तूंच मला दिलेंस, हें खरें तरी याबद्दल तुझे मजवर उपकार आहेत, किंवा मी तुझा ऋणी आहें, असें नाहीं. असें करण्यांत त्वां आपल्या कर्तव्याविरुद्ध वर्तन केलेंस. तुझे मालक—माझे वडील बंधू-भुजबलराय—यानीं माझे डोळे काढण्याविषयीं तुला आज्ञा केली. त्याप्रमाणें करणें तुझें कर्तव्य. तें तूं केलें नाहींस. त्याच्या इच्छेविरुद्ध वागलास. उलट तूं एका शेळीचे डोळे काढवून ते त्यांना दाखवून त्यांना फसविलेंस, आणि त्यांची आज्ञा भंग करून राजद्रोही बनलास. तसेंच तुझ्या मुलांकरितां मी इतकें कांहीं केलें असतांना, माझा पुत्र मरण पावला तो तूं व तुझे पुत्र यांनीं दिलेल्या विषामुळेंच, अशी आतां मला पक्की खबर कळली आहे. यास्तव तुम्हा सर्वांना यावेळीं एकदम कैद करण्यांत येत आहे. असें बोलून त्यानें उठून त्यांच्यावर हात टाकला आणि त्या सर्वांना धरून कैद करविलें. यावेळीं असें करण्यापूर्वीं, त्यानें आसपासच्या प्रदेशांत पुष्कळसे पोर्तुगीज घोड्याचे सौदागर आलेले होते, त्या सर्वांना आपल्या सहाय्याला बोलाविलें होतें. याप्रमाणें ते बाप लेक कैद झाल्यावर ते तीन वर्षें तसेच कैदेत होते.

रायानें, 'कोंडेमरेड्डी'—कोदंड रेड्डी—याच्या एका पुत्राला आपला मुख्य मंत्री नेमिलें. कृष्णदेवरायाच्या बापाच्या हुकुमानें, याच 'कोंडेम रेड्डी' नें, नरसिंह-

रायाच्या पुत्राला, विश्वासघात करून, पेन्नागुंडी येथें बागेंत ठार मारविलें होतें. त्याचें मागें वर्णन आलेंच आहे.

पुढें थोड्या दिवसांनीं 'साळुवा' चा पुत्र दानायक, कैदेंतून निसटून एका पहाडाच्या आश्रयाला गेला. तेथें चोर, लुटारू, डाकू, यांच्या शिवाय दुसऱ्या कोणाची वस्ती नव्हती. त्या पहाडांत असलेल्या डोंगरी किल्ल्यावरील सेनाध्यक्षानें त्याचें स्वागत करून त्याला आश्रय दिला, व होईल तितकी मदत केली. तेथून त्यानें रायाच्या अमलांत फारच धुमाकुळ चालविला. रायाला त्याच्यावर बरीच फौज धाडावी लागली. त्या फौजेचा अधिकारी 'अजा बोयसा' नांवाचा होता. त्यानें जाऊन त्या किल्ल्याला वेढा घातला, आणि अखेर तो सर केला. त्यांतच दानायक त्याच्या हातीं पडला. त्याला त्यानें रायाकडे पाठविलें. याप्रमाणें तो पुनः कैद होऊन आल्यावर रायानें, 'साळुवा,' दानायक, व त्याचा दुसरा भाऊ कैदेंत होता अशा तिघांना समक्ष आणवून, वधस्थानीं पाठविलें व तेथें त्यांचे डोळे काढविण्याची सजा दिली. कारण या देशांत ब्राम्हणाला देहांत शासन देत नाहींत. त्या ऐवजीं तत्तुल्य तरी प्राण न जाईल अशी दुसरी शिक्षा देतात. नंतर रायानें त्यांना पुनः कैदेंत ठेविलें. तेथें 'तिम्मा' दानायक लौकरच मरण पावला. 'साळुवा' व 'गामडा गजा' पुढें आणखी कांहीं दिवस जिवंत होते. (मागें 'साळुवा तिम्माला' 'गुआंडेज' नांवाचा भाऊ असल्याचें लिहिलें आहे. यावरून त्याला हें नांव असलेला एक भाऊ व दुसरा मुलगा, असे होतेसें दिसतें. हें नांव बहुधा 'गंडाराजा' असावें. 'पायेस' यानें 'साळुवा तिम्मा' च्या भाचाचें नांव 'गामडा राजो' होतें व तो–पायेस–राजधानींत असतांना तेथील–विजयनगरचा–मुख्य अधिकारी–कोतवाल–होता, असें लिहिलें आहे.)

---

# भाग एकोणिसावा.

आदिलशहा रायचूरावर चढाई करितो--पण कृष्णराय येई तों वाट पहाण्याचें त्याला धैर्य न होतां तो पळून जातो.

या सुमाराला आदिलशहानें पुनः आपलें पायदळ, स्वार, हत्ती, अशी फौज जमा करून रायचूरावर चढाई केली. तें शहर रायाच्याच ताब्यांत होतें. हें ऐकून रायानें कोणाला न कळवितां घोड्यावर सामान घालण्यास सांगितलें आणि एकदम स्वार होऊन आदिलशहावर हल्ला करण्यासाठीं तडक रायचूरचा रस्ता धरिला. अशी खबर येतांच आदिलशहानें भिऊन माघार घेतली व तो विजापुराकडे पळून गेला. जातां जातां कृष्णरायानें वाटेंत पोर्तुगीज लोकांकडून

६०० घोडे खरेदी केले. त्यांची किंमत त्यानें पावणे पांच घोड्यांचे एक हजार होन्न, या भावानें दिली. (म्हणजे दर घोड्याला सरासरी २१० होन्न होतात. ही कैफियत लिहिणारा खुद्द घोड्याचा सौदागर होता. तो विजयनगरला विकाऊ घोडे आणीत असे. पुढें या घोड्यांची किंमत सरासरी रासी ६६ ते ८३ होन्न असल्याचें लिहिलें आहे.)

रायचूरास पोहोंचल्यावर रायानें आदिलशहाकडे निरोप पाठविला कीं, 'तुम्हीं दोन वेळां केलेले करार मदार व दिलेल्या आणा भाका मोडून युद्ध सुरू केलें, व वचन भ्रष्ट झाला आहां. सबब इतउत्तर अशा रीतीचें युद्ध चालविलें जाईल, कीं तुमची पुरी खोड मोडून तुम्हाला ताबेदारी करावयाला लाविलें जाईल, आणि बेळगांवचा किल्ला घेतल्याशिवाय लढाई बंद पडणार नाहीं.'

या वेळीं हिंवाळा सुरू झाल्यानें रायाला पुढें वाढून जाण्याला सवड नव्हती. म्हणून तो विजयनगराला परत गेला. तेथें त्यानें पुढील युद्धासाठीं भला मोठा तोफखाना तयार करविण्याचा हुकूम दिला. तसेंच गोवेंकराकडे वकील पाठवून त्यांनाही मदत करण्याविषयीं विनंती केली आणि या प्रीत्यर्थ, बेळगांव काबिज केल्यावर, त्यांना मुख्य घाटावरील टापू–गोव्याजवळचा कोंकणपट्टीचा प्रदेश–देण्याचें कबूल केलें. बळगांव गोव्यापासून पंधरा कोस आहे. तेथील मुख्य अधिकाऱ्याचा गोव्यालगतच्या कोंकणपट्टीवरही अंमल असतो. बेळगांवाखालच्या प्रदेशाची सरहद्द गोव्यापर्यंत आहे. गोव्याहून तीन कोसांवर पोंडा नांवाचा किल्ला आहे. तेथें बेळगांववाल्यांच्या हाताखालचा एक अंमलदार असतो. तोच आसपासचा घाटमाथा, तळघाटाचा प्रदेश व त्यांच्यांतील खेडीं पाडीं, यांच्या वसूल वासलातीचेंही काम पाहतो. या जागचे व इतर ठिकाणचे सेनाध्यक्ष, यांची नेमणूक आदिलशहाकडून होते, कारण हा सारा प्रदेश आदिलशहाच्या अंमलाखालीं आहे.

याप्रमाणें युद्धाची तयारी चालूं असतांना कृष्णदेवराय अजारी पडला. त्याला पोटशूळाची व्यथा झाली. विजयनगरचे पूर्वींचे राजे याच आजारानें मृत्यू पावत आले आहेत.

कृष्णदेवराय तरुण असतांना त्याची विजयनगर येथील एका वेश्येच्या कन्येशीं दोस्ती झालली होती तिच्यावर त्याचें अत्यंत प्रेम होतें. तिचें नांव 'चिन्नादेवी' प्रेमातिशयाच्या भरांत त्यानें तिला अनेक वेळ, आपण राज्यपदारूढ झाल्यावर तुझ्याशीं लग्न करूं, असें वचन दिलें होतें. तें प्रथम प्रथम थट्टेचेंच होतें. तरी तें त्यानें खरें केलें, असें इकडील इतिहासकारांनीं नमूद

केलें आहे. गादीवर बसल्यावर त्याला तरुणपणीचे छंद सोडावे लागले. तरी तो या स्त्रीविषयींचें प्रेम विसरला नाहीं. तो वाड्यांतून चोरून तिच्याकडे जात असे. त्याचा मुख्य मंत्री 'साळुवा तिम्मा' याला ही गोष्ट कळली. तेव्हां त्यानें त्याच्यावर पाळत ठेवून तो वेश्येच्या घरीं गेला असतांना तेथें त्यानें त्याला गांठलें आणि त्याची कान उघाडणी करून त्याला परत आणिलें. नंतर त्याला रायानें कळविलें कीं आपलें तिच्यावर अतिशयच प्रेम आहे, व आपण तिला तिच्याशीं लग्न करण्याचें वचन दिलें असून, तें पाळण्याचा आपला निश्चय आहे. 'साळुवा तिम्मा' नें त्याचा तो निर्धार पाहून हार खाल्ली, आणि कोणी नांवें न ठेवी अशा युक्तीनें ही गोष्ट पार पाडण्याचें कबूल केलें. त्यानें प्रथम नरसिंहरायाच्या घराण्यांतील एका अत्यंत रूपवती कन्येशीं रायाचें लग्न जुळवून आणिलें. लग्न समारंभ आटपल्यावर त्यानें तिला व त्या वेश्या कन्येला एकाच महालांत नेऊन ठेवविलें. त्या महालाला एक भलें मोठें, व उंच गोपूर बांधवून त्याच्यामध्यें त्या वेश्या कन्येची राहण्याची जागा करून दिली. पुढें रायाचीं आणखीही लग्नें झालीं. यांच्यामध्यें पुष्कळ बायका करणें भूषणावह समजतात. कृष्णरायानें चार बायका केल्या पण त्याचें या स्त्रीवर सर्वातिशायी प्रेम होतें. तिच्या प्रेमा खातर व सन्मानार्थ त्यानें एक नवें शहर वसविलें व त्याचें नांव 'नागलापुर' ठेविलें. त्याच्या भोंवती मोठा थोरला कोट बांधविला. साऱ्या राज्यांतील उत्तमोत्तम कोटांपैकींच तो एक आहे. त्या शहरामध्यें त्यानें एक पुष्कळच लांब रुंद आणि प्रशस्त असा रस्ता व बाजार तयार करवून त्याच्या दुतर्फा पक्कीं दगडी घरें बांधविलीं. तेथ लौकर व चांगली वस्ती व्हावी म्हणून त्यानें आपले सारे मांडलिक, राजे, सरदार, व प्रमुख लोक यांना तेथें आपापले वाडे व महाल बांधण्याची आज्ञा केली. ती त्यांनीं अमलांत आणिली. या शहरांतील मुख्य रस्ता व बाजार ४७०० कदम लांब व ४० कदम रुंद आहे. तो फारच सुरेख व प्रेक्षणीय आहे. या नव्या शहराचें काम पुरें करण्यांत त्यानें खर्चाकडे मुळींच पाहिलें नाहीं. हल्लींच येथें येणाऱ्या मालावरील जकातीचें उत्पन्न सालीना ४२००० होन होत आहे. या राज्यांत भारी जबर जकात द्यावी लागते. शहराच्या वेशींतून आंत येणाऱ्या सर्व मालावर शिरबोजा, पुरुष, बायका वगैरे सर्वांवर जकात पडते. ( नागलापुर म्हणजे हल्लींचें होसपेठ शहर. ४७०० कदम म्हणजे सव्वा दोन मैलांवर लांबी होते. हा रस्ता विजयनगराकडे जाण्याचाच असावा. हल्लीं त्याचें नांव निशाण नाहीं. )

या राजानें आपल्या कारकिर्दींत एक भला मोठा तलाव बांधविला तो दोन उंचशा पहाडांच्या रांगांमध्यें आहे. तो बांधणारीं माणसें आणि बांधण्याचें

साधन या राज्यांत मिळत नसल्यानें, रायानें, कांहीं पोर्चुगीज गवंडी पाठविण्या-बद्दल गोव्याच्या गव्हर्नराला लिहिलें तेव्हां त्यानें ' जोआओ डल्ला पांटे ' याला पाठविलें. तो दगडी बांध काम करविण्यामध्यें फार नामांकित होता. राजाच्या मनांत तो तलाव कसा बांधावयाचा होता, तें त्यानें त्याला सांगितलें. त्याप्रमाणें बांधला जाणें अशक्य असल्याचें कळून आलें, तरी सुद्धां त्यानें रायाला आपण तें करूं, असें आश्वासन दिलें. त्यानें पुष्कळसा चुना तयार करविण्याला सांगितलें. तें ऐकून रायाला हसूं आलें. कारण या देशांत घरें बांधतांना बांध कामांत चुना उपयोगांत आणण्याचें माहित नाहीं व त्याचा इकडे रिवाज नाहीं. ( इतर उपलब्ध कागद पत्रांवरून हा ' जोआओ डल्ला पांटे ' हिंदुस्थानांत फार दिवस राहिला नाहीं, असें दिसतें. ' पायस ' नें तयार होत असतांना पाहिलेलें व ' नूनीज ' यानें वर्णन केलेलें हें मोठें तलावाचें काम सं. १५२१ नंतर लौकरच सुरूं झालें असावें असें दिसतें. )

या तलावाच्या बांध कामासाठीं रायानें पुष्कळच मोठ मोठाले दगड आणून टाकविण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें बजावणी होऊन किती तरी अजस्र टोळ व दगड त्या खोऱ्यामध्यें टाकले गेले. पण ते सर्व चूर होऊन जात. दिवसां तयार करविलेलें सारें काम रात्रभरांत पुनः पडून जाई. हें पाहून राजाला भारी अचंबा वाटला. त्यानें या कामांतले दर्दी ज्योतिषी व शकुनज्ञ यांना बोलावून याबद्दल प्रश्न केला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं ' एवढें प्रचंड काम तयार होत असतांना तेथील स्थानदेवता व कुलदेवता यांना कांहींच पोहोंचलें नसल्यामुळें त्या प्रसन्न राहिल्या नाहींत. त्यांना नर, नारी, महिष, इत्यादिकांच्या रक्ताचा बळी अर्पण झाल्यावांचून कधीं काम तडीस जाणार नाहीं. ' यावर रायानें शिरच्छेदाला पात्र असे सारे कैदी तेथें आणवून त्यांना तेथें बळी देवविले. तेव्हांपासून काम सुरळीत चालूं लागलें. त्या खोऱ्याच्या मध्यें त्यानें एक भला थोरला आडवा बांध तयार करविला. तो चांगल्या मोठ्या धनुष्यापासून सोडलेल्या बाणाच्या टप्प्या इतका लांब व रुंद होता. त्याच्या मध्यें मोठ मोठीं दारें ठेवलेलीं होतीं. ( हीं बहुधा सांड मोऱ्यासाठीं असावींत. ) त्यांच्या खालीं नळ घातलेले होते. त्यांच्यांतून वाटेल तेव्हां पाणी सोडतां येत होतें. या तलावाच्या पाण्यामुळें शहरांत पुष्कळशा सुधारणा करितां आल्या. नाल्या खोदून त्यांच्यांतून बागबागीचे व भातखाचरें यांना पाणी देण्याची व्यवस्था केली गेली. पाणी पोहोंचलेल्या जमीनी सुधाराव्या म्हणून त्यानें त्या ९ वर्षें माफीनें दिल्या होत्या. आतां त्या चांगल्या सुधारल्यामुळें हल्लीं सुद्धां त्यांच्या पासून सालीना २०,००० होन वसूल येऊं लागला आहे.

या तलावाच्या वरच्या बाजूला चोहोंकडून उंचशा डोंगर पठारीचें कडें पडलेलें आहे. त्याच्यामध्यें दोन्ही बाजूस बुरूज असलेले दोन दरवाजे फार मजबूत व पक्के बांधलेले आहेत. तेथें आंतल्या अंगाला १००० शिपायांचा कायम पाहारा असतो. दोन्ही शहरांमध्यें कोणी माणूस किंवा कांहीं ही माल येण्या जाण्याचा हा एकच मार्ग आहे. बाकीचे रस्ते याच रस्त्याला या वेशीच्या बाहेर येऊन मिळतात. या वेशींतून येणाऱ्या मालावरील जकातीचा मक्ता सालीना १२००० होनांला दिला जातो. आंत येणाऱ्या प्रत्येक देशी किंवा परदेशी माणसाला मक्तेदार मागेल ती जकात दिल्यावांचून आंत सोडीत नाहींत. या दोन्ही शहरांमध्यें व्यापारी माल कांहीं पैदा होत नाहीं. सारा माल बाहेरून येतो, तो लमाणी बैलांवरून. इकडे ओझीं वाहण्याचें काम गुरांकडूनच घेतात. या दरवाजांतून दररोज दोन हजार ओझ्यांच्या बैलांची रहदारी असते. प्रत्येक बैला मागें ३ विंहटेम-सुमारें ४ आणे-जकात पडते. 'पोल्ड' किंवा बिना शिंगांच्या बैलांना जकात पडत नाहीं.

दोन्ही शहरांभोंवतीं शेत जमिन आहे. तिच्यांत गहूं, हरभरा, तांदूळ, ज्वारी, इत्यादि धान्यें चांगलीं पैदा करितात. इकडेहा सर्व लोकांमध्यें ज्वारीच खाण्याचा विशेष प्रघात आहे. बहुतेक साऱ्या देशांत पान विडे खातात. सदोदित बहुतेक लोकांच्या तोंडांत विडा असतो.

---

## भाग वीसावा.

कृष्णरायाच्या मरणानंतर त्याचा भाऊ अचेतराव-अच्युतराय-गादीवर बसविला जातो.

पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें कृष्णरायाला रोग होऊन त्यांतच त्याचा अंत झाला. तो अजारी पडला व जगण्याची आशा उरली नाहीं अशा स्थितींत त्यानें एक मृत्युपत्र केलें. त्यांत त्यानें असें लिहून ठेविलें होतें कीं, 'गादीवर बसल्या नंतर लौकरच आपण पूर्वींचा राजा भुजबलराय याचा पुत्र व आपले तीघे बंधू, यांना चंद्रगिरीच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवविलें. त्यांच्यापैकीं अच्युतरायाला आपल्या मागून गादीवर बसवावें. (तोच हल्लीं गादीवर आहे.) कारण आमचा पुत्र अगदीं अल्पवयी-दीड वर्षांचा-आहे. सर्व बंधूंमध्यें अच्युतरायच राज्याधिकाराला लायक होईलसा दिसतो.'

कृष्णराय मरण पावल्यानंतर अच्युतराय चंद्रगिरीवरून येऊन पोहोंचे पर्यंत मुख्य प्रधान 'सालुवा नाय' यानेंच राज्य कारभाराची कुल व्यवस्था चालविली

होती. कृष्णरायानें त्या मृत्युपत्रांत, ' अच्युतरायानें गादीवर बसल्यावर बेळगांव सर करावें व आदिलशहावर स्वारी करावी, ' असेंही लिहून ठेविलें होतें.

गादीवर बसल्यानंतर अच्युतराय फारच क्रूर व दुर्व्यसनी झाला. त्याच्या अंगीं खरेपणा फारच थोडा वास करितो. त्याचें दुर्वर्तन व दुष्टपणा पाहून सारे सरदार व सारी प्रजा बिथरली आहे. त्याच्या दोघां मेव्हण्याच्या मर्जी बाहेर तो कोणतीच गोष्ट करीत नाहीं. ( हे दोघे मेव्हणे कदाचित, राम, त्रिमल, व वेंकटाद्रि या तीघां बंधूंपैकीं पहिले दोघे असतील. त्यांना कृष्णदेवरायाच्या दोघी मुली दिलेल्या होत्या. ही कल्पना खरी धरली तर ते अच्युतरायापेक्षां त्याचा बंधू माजीराजा कृष्णरायाचे मेव्हणे होत. ) हे दोघेही मेव्हणें स्वभावानें भारी दुष्ट, काफर, मारवाडी, आहेत. या सर्व गोष्टी आदिलशहाच्या कानीं जातच होत्या. त्यावरून त्याचें महत्व व वजन ओळखून, व त्याच्यांत कांहीं राम नाहीं असें पाहून, आदिलशहानें त्याच्याशीं लढाई सुरू करण्याचें ठरविलें. कारण आतां आपल्याला यश येईल असें त्याला वाटूं लागलें होतें. राजाच्या मनाचा कलही लढाईच्या विरुद्ध असल्याचें त्याला कळून आलें होतें. त्यानें फौज तयार करून राजाच्या अमलांतील प्रांतावर स्वारी केली, आणि तो टाकोटाक विजयनगरापासून एक कोसावर येऊन दाखल झाला. त्यावेळीं अच्युतराय शहरांतच होता. त्याच्या जवळ फौजफांटा व युद्धाचा सरंजाम इतका भारी होता कीं त्यानें हिंमत करून मनावर घेतलें असतें तर त्याला आदिलशहाचा पाडाव करून त्याला सहज धरतां देखील आलें असतें. कारण आदिलशहा जवळ सारे २०००० स्वार व १२००० पायदळ इतकीच फौज होती. तिच्या सह त्यानें नागलापुरांत शिरून त्याची धूळधाण केली. त्याच्या विरुद्ध मुकाबला करण्याचा रायानें नुसता प्रयत्न सुद्धां केला नाहीं. त्याच्यामध्यें तितका उत्साह, तितकी आस्था, किंवा पाणी मुळींच नव्हतें. कांहीं शूर व पाणीदार सेनाध्यक्ष होते. त्यांच्या पथकांतील स्वारांच्या आदिलशहाच्या फौजेंतील लोकांशीं थोड्या बहुत झटापटी झाल्या. त्या सेनाध्यक्षांनीं रायाला विनंती केली कीं, ' महाराजांनीं आम्हांला त्याच्यावर हल्ला करण्याची नुसती परवानगी द्यावी. असल्या किरकिर बाबतींत खुद्द स्वारींनीं तसदी घेण्याची मुळीं अवश्यकता नाहीं. ' पण राजा अगदीं घाबरून गेला. त्यानें आपल्या दोघांही मेव्हण्याच्या सल्लेनें-आणि ते असल्या घाणेरड्या सल्ला थोड्या थोडक्या देत होते, असेंही नाहीं-आदिलशहाकडे तह करण्याविषयीं संदेश पाठविला. याचा आदिलशहाला अर्थातच भारी आनंद झाला. पुढें तह झाला व तो १०० वर्षें कायम राहावयाचें ठरलें. त्याच्या शर्ती अशा—१ राजानें दहा लक्ष

सुवर्णाचे होन, शिवाय सुमारें एक लक्ष होन किंमतीचें जवाहीर द्यावें, आणि २, रायचूर व त्याच्या खालचा सुमारें दीड लक्ष होन सालीना उत्पन्नाचा प्रदेश, कृष्णदेवरायानें जिंकून घेतलेला परत द्यावा. राजानें या शर्ती कबूल केल्या. आदिलशहाही इतकें विपुल द्रव्य मिळालेलें घेऊन परत गेला. हें झाल्यावर ही रायानें एक मोठा व दुसरे १५ मध्यम, हिरे, सुमारें एक लक्ष होनांपेक्षां जास्त किंमतीचे, त्याच्याकडे भेटीदाखल पाठविले! मोठ्या हिऱ्याचें वजन १३० 'मानगेल्लिनिस्' म्हणजे सुमारें १६२ काराट होतें. ('कोहीनूर' हिरा हिंदुस्थानांतून प्रथम इंग्लंडांत गेला ते वेळीं त्याचें वजन सारें १८६ काराट होतें.) हें आदिलशहाला दिलेलें सारें द्रव्य त्यानें सहा महिन्याच्या आंतच आपल्या सरदार, सेनाध्यक्ष, वगैरे लोकांकडून सक्तीनें व भारी जुलूम करून वसूल केलें आणि आपल्या खजीन्याची भरती केली, असें म्हणतात.

ह्या तह व असली रकमेची वसूली फौज, सेनाध्यक्ष आणि सारी प्रजा यांच्या मर्जीविरुद्ध केली गेल्यामुळें ते सारे भारी बेदिल झाले आहेत. या राज्याचा नाश व्हावयाचा असला तर तो या अच्युतरायाच्याच वेळीं, असें ते सारे समजून आहेत. कारण त्यानें, राज्यांतले प्रमुख लोक ठार मारविले, त्यांचीं मुलें माणसें धुळीस मिळविलीं व त्यांची माल मिळकत जप्त केली. हें सारें आपल्या मेव्हण्याच्या वाईट सल्लेमुळें. त्या दोघांचा त्याच्यावर भारीच पगडा बसलेला आहे.

एका रात्रीं त्यानें 'कृष्ण रानाके'–'कृष्णराय नायक'–याला धरवून आणविलें. पण तो राजसेवकांच्या हातीं पडण्यापूर्वीं त्यानें आपल्या २०० बायका स्वतःच ठार केल्या, आणि अखेर रायासमक्ष विष खाऊन प्राण दिला. त्याचें कारण राजा आपल्या पुत्राला आपल्या समक्ष ठार मारविणार असें त्याला कळलें होतें. त्या सरदाराचीं खाशीं हत्यारें–जंबिये, तरवारी, भाले, बरच्या, फरस वगैरे–सोन्याचें व जडावाचें बिनमोल काम केलेलीं होतीं. तीं सारीं रायानें विकून टाकलीं. त्याचे ३००० होन आले!

याप्रमाणें राज्यांतील प्रमुख माणसें नाहींशीं होऊन त्याला टेका देणारे कोणी राहिले नाहींत, म्हणून आदिलशहा रायाला करारनाम्याप्रमाणें लेखून दररोज नव्या नव्या मागण्या करितो व त्याचा पाणउतारा करीत असतो.

या राजाविषयीं जास्त कांहीं लिहिण्या जोगें नाहीं. अच्युतराय आपलें राज्य, वैभव व योग्यता यांचें हित होईल अशा गोष्टींची अत्यंत हेळसांड करीत आहे, असें सर्व लोक म्हणतात.

# भाग एकविसावा.

## रायाच्या दरबारी लोकांचें वर्तन—राजमहालांतील व्यवस्था.

(हें पुढील वर्णन अच्युतरायाच्या कारकिर्दी पुरतेंच लागू आहे.)

रायाच्या महालामध्यें त्याच्या खास वापरण्यांत येणारी ताटें, थाळें, वाट्या, झाऱ्या, वगैरे भांडीं. आणि चौरंग, अडण्या, तस्त, वगैरे उपकरणीं सोन्या रुप्याचीं आहेत. राण्यांचे पलंग चांदीच्या पत्र्यांनीं मढविलेले आहेत. प्रत्येक राणीचा पलंग व बिछाना वेगळा असतो. खास राजाचा पलंग सोन्याच्या खुरांचा व सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेला आहे. त्याच्यावर रेशमी गादी असून गिरद्यांना बारीक मोती गुंफलेले आहेत. असेच मोती गुंफलेल्या चार उशा पायगतीं असतात. पांघरण्यासाठीं एक रेशमी कपडा उशाला ठेविलेला असतो. रुप्याचे खांब व चौकट यांच्यावर रेशमी मच्छरदाणी लाग- केली असते. स्वारी शिकारीस जातांना मोठा पलंग बरोबर घेतलेला असतो. तो राहण्यासाठीं एक मोठासा लांखंडी मंडप केलेला आहे, तोही बरोबर नेतात.

या राजाच्या बायका पांचशें आहेत. त्यांच्यांतून हव्या तितक्याच रात्रीं त्याच्या- जवळ राहतात. तो मरण पावल्यावर त्याच्या बरोबर या सर्व बायका आपणाला जिवंत जाळून घेतात. तो फिरतीवर निघतो तेव्हां त्यांच्यांतून विशेष मर्जीतल्या २५।३० बायका पालख्यांत बसून त्याच्या बरोबर राहतात. पट्टराणीच्या पालखीवर ताल मश्रूची पामरी असते. तिला बारीक व मोठ्या मोत्यांची झालर लावलेली असून पालखीच्या दांडीवर सोन्याचें काम केलेलें असतें. इतर राण्यांच्या पालख्या रुप्याचें काम केलेल्या असतात. राजाची खास पालखी सारी सोन्याची आहे. ती इतर पालख्यांच्या उजवीकडे चालते. राजाचा पुत्र किंवा कन्या स्वारींत बरोबर असली तर तिच्यासाठीं हस्तीदंती व सोनेरी काम केलेला पलंग बरोबर असतो. फिरतीवर असतांना छावणी पडेल तेथें राजासाठीं दगड मातीचे महाल बांधतात व ते कापडांनीं मढवून श्रृंगारितात. राजा कधींही डेऱ्यामध्यें रहात किंवा निजत नाहीं.

राजवाड्यामध्यें मुख्य दरवाजाच्या आंत राण्यांच्या सेवा चाकरीमध्यें ५।६०० बायका किंवा हिजडे नोकर आहेत. सर्व राण्यांच्याकडे पृथक पृथक बायकांच नोकरी चाकरीवर असतात. राजाचे महाल टोलेजंग आहेत. त्यांच्यांत प्रशस्त व लांब रुंद दलानें बांधलेलीं आहेत. त्या महालांमध्यें आपल्या देशांतल्या- मठांप्रमाणें मोठे मोठे चौक असतात. त्या चौकांच्या बाजूला प्रशस्त सोपे बांधलेले

असतात. या चौसोप्यांमध्यें राजाच्या राण्या व त्यांच्या दासी राहतात. राजा शयनागाराला या चौसोप्यांमधून जातो त्यावेळीं या सर्व राण्या आपापल्या दाराशीं उभ्या राहून त्याचें स्वागत करितात. या मुख्य राण्या नव्हेत. मुख्य राण्या बहुशः राज्यांतील प्रमुख सरदार व सेनाध्यक्ष वगैरेंच्या मुली. असतात. राजमहालाच्या मुख्य दरवाजाच्या आंत २०० गाई राहतात. त्यांच्या दुधापासून राणिवशांतील स्त्रियांसाठीं दुभतें तयार होतें, म्हणे.

राजाला स्वतःच्या मुदबखाकडे निराळा खर्च पडत नाहीं. धान्य, मांस, कोंबड्या, वगैरे रोजची शिधासामग्री रोजच्यारोज सरदार लोकांकडून पोहोंचविली जाते. पाकशाळेमध्यें ४ मध्यम व दोन मुख्य अधिकाऱ्यांच्या हातांखालीं मिळून २०० चौकीदार राहतात. हल्लींच्या राजाजवळ 'पेड्डा नायक' व 'अजा' नायक, नांवाचें पहारेवाल्यांचे दोन मुख्य अधिकारी आहेत. ते फौजेच्या सेनाध्यक्षांपैकीं आहेत. चौकीदार लोकांचा प्रवेश पहिल्या ४।५ दरवाजांपर्यंतच. त्यांच्यापलीकडे बायका किंवा हिजडे यांच्या शिवाय इतरांचा रिघाव होत नाहीं.

राजाची स्वारी घोड्यावरून निघते तेव्हां त्याचे शरीर संरक्षक म्हणून खास पागेचे २०० स्वार व शिवाय १०० हत्ती बरोबर राहतात. या शिवाय ४०।५० सेनाध्यक्ष आपापल्या लोकांसह नेहमीं पाहाऱ्यावर राहतात ते निराळे. स्वारी बरोबर २,००० ढालाईत भले लोक दुतर्फा चालत असतात. सर्वांपुढ मुख्य 'अल्कैद'–भालदार–असतो. त्याच्या बरोबर ३० छडीबरदार स्वार असतात. मुख्य चोपदाराच्या हातीं निराळ्या तऱ्हेची चोबदार काठी असते. या राजाचा मुख्य चोपदार आहे त्याचें नांव 'चिन्यानायक.' पिछाडी देवडीच्या पाहारेवाल्यांबरोबर खासगीकडील अश्वशाळेचा मुख्य अधिकारी असतो. त्याच्या बरोबर २० स्वार राहतात. त्याच्या मागून १०० हत्तींवर प्रतिष्ठित व मानकरी लोक असतात. त्यांच्यापुढें खास राजाच्या स्वारीसाठीं ५ हत्ती अणि त्यांच्याही पुढं २५ निशाण बरदार स्वार राहतात. त्यांच्या बरोबरच डंका, नौबत, कर्णे, तुताऱ्या, वगैरे बादशाही वाद्यें वाजत चालतात. त्यांचा भारी आवाज होत असतो. त्या आवाजापुढें दुसरा शब्द ऐकूं येत नाहीं. सर्वांपुढं प्रचंड रणभेरी असतो. त्याचा आवाज फारच मोठा होतो. तो क्वचितच वाजवितात. त्याला 'पिना' म्हणतात. राजा स्वार हातात. बरोबरचे हत्ती, ढालाईत, स्वार व गारदी इत्यादिकांची हजिरी घेतो. त्यांत कोणी गैरहजर असला तर त्याला कडक शिक्षा होते व त्याची मालमिळकत जप्त होते.

# भाग बाविसावा.

राजा पुढें प्रणाम वगैरे करण्याची रीत-सरदारांनीं प्रणाम करण्याचे प्रकार.

प्रातःकाळीं दहा अकरा वाजण्याच्या सुमाराला सर्व सरदार वगैरे लोक राजवाड्यांत जातात. त्या वेळीं राजा जनानखान्यांतून बाहेर येतो. तो सिंहासनावर बसल्यावर दरबारच्या जागेचे दरवाजे उघडून त्या लोकांना आंत जाण्याची परवानगी होते. प्रत्येक जण पृथक पृथक जाऊन राजापुढें शिर नमवितो व दोन्ही हात वर उचलतो. यालाच इकडे 'सलाम' म्हणतात. राजाजवळ दहा बारा भालदार असतात. ते प्रत्येक सरदार किंवा सेनाध्यक्ष येतांच 'महाराज, अमके अमक सलाम करिताहेत, त्यांच्याकडे दृष्टी द्यावी,' असें मोठ्यानें ओरडतात.

विजयनगरचे राजे निवळ डामडौल व इतमाम यासाठींच पदरीं पुष्कळचसे हत्ती घोडे बाळगीत आले आहेत. नेहमीं ४००।५०० हत्ती व ८००।९०० घोडे बांधलेले असतात. त्यांच्या व त्यांच्यावरील नोकर चाकरांच्या पायीं भारी खर्च पडतो. हल्लींचा राजा अच्युतराय याच्या पदरीं ४०० हत्ती व ७०० वर घोडे आहेत. त्यांच्या व त्यांच्या कडील नोकरचाकर, आणि त्यांचा खुराक, यांच्या प्रीत्यर्थ दररोज २००० होन्न खर्च होतो. खास पागेचे व खानगी खर्चानें ठेविलल स्वार ६००० आहेत. त्याच्या पदरीं असलेल्या लोकांना १०००, ५००, ३०० व कमींत कमी १००, होन्न इतका पगार असतो. तो वर्षांतून एकदां मिळतो. ६००० स्वारांपैकीं राजाबरोबर नेहमीं २०० स्वार नोकरीवर हाजर असतात.

या देशांतील राजेलोकांना हवे तेव्हां हवे तितके शिपायी भरती करिता येतात. ते त्यांच्या राज्यांत मनमुराद मिळतात. त्यांना पगार देण्याला त्यांच्यापाशीं पैकाही उमाप आहे. या अच्युतरायाच्या पदरच्या साऱ्या सरदार व सेनाध्यक्षांनीं मिळून आपल्या पदरीं सहा लक्ष पायदळ व चोवीस हजार स्वार नोकर ठेवलेले आहेत. हे सरदार व सेनाध्यक्ष लोक जणों मक्तेदार आहेत. साऱ्या राज्यांतील प्रदेश त्यांच्याकडे वांटून व सोंपून दिलेला आहे. त्याच्या उत्पन्नांतून त्यांना हे लष्करी लोक बाळगून व स्वतःचा सर्व खर्च भागवून, शिवाय राजाला दरसाल साठ लक्ष होन्न नगदी पेशकष द्यावी लागते. एकंदर राज्यांतील जमीनीचें उत्पन्न एक कोटी वीस लक्ष होन्नांचें आहे म्हणें.

त्यांतून निमे राजाला देऊन बाकीचें ते ठेवितात. त्यांतूनच त्यांना फौज व हत्ती बाळगण्याचा खर्च करावा लागतो. या व्यवस्थेमुळें रयतेला भारी त्रास पडतो. जमीनी सोंपून घेणारे लोक रयतेवर फारच जुलूम जबरदस्ती करितात. राजाला सालीन साठ लक्ष होनाची रकम मिळते. तिच्यांतून त्याच्या स्वतःच्या खर्चाला पंचवीस लक्षांपेक्षां जास्त बचत रहात नाहीं. बाकीची रकम त्याला पायदळ, स्वार, हत्ती, घोडे, वगैरा बाळगण्याकडे खर्च करावी लागते.

राजकीय दरबार व जन्म गांठीच वगैरे उत्सव, तसेच धार्मिक रथोत्सव, वगैरे प्रसंगीं सर्व सरदार व सेनाध्यक्ष, यांना हुजूर हजर राहावें लागतें. त्यांच्यापैकीं दोनशेंवर लोक रायाजवळ बहुतेक नेहमीं हजर राहतात. त्यांना ठरावा बरहुकूम फौज व लवाजमा भरती करून बरोबर ठेवावा लागतो. कारण राजा वेळोवेळीं त्यांची हजिरी घेतो. त्यांत कोणाची कमताई दिसून आली तर तो तिच्याबद्दल त्यांना सक्त सजा करितो व त्यांची जहागीर व सरंजाम जप्त करितो. सरदार लोकांना आपापल्या ताब्यांतील प्रांतांतील शहरांत किंवा मुख्य गांवांत कायमपणें राहण्याची परवानगी मुळींच नसते. कारण ते तसे राहिले तर ताब्याबाहेर जाण्याचा संभव व भीती असते. मोठमोठे मांडलिक व राजे लोक यांना या संबंधांत माफी असते. त्यांना विशेष प्रसंगीं निमंत्रण होईल त्या शिवाय दरबारांत हजर राहावें लागत नाहीं. ते ठरलेली वार्षिक पेशकष आपल्या राजधानीहूनच पाठवितात. या पैकीं बंकापूर येथील राजानें मात्र नेहमीं बाहेर छावणी करीत राहण्याचा व वर्षांतून दोन वेळ दरबारांत हजर राहण्याचा ठराव आहे.

येथील रायाच्या ताबेदारींत, १ बंकापूर, २ गसोपा, किंवा गरिसोप्पा, ३ बांकानूर, ४ कालकू-कालीकट-आणि ५ भाटकल, येथील राजे आहेत. पण ते दरबारांत हजर होतात तेव्हां त्यांचा मान खुद्द राजा व इतर लोकही बाकीच्या सरदार व सेनाध्यक्षांपेक्षां विशेष ठेवितात असें नाहीं.

या राज्यांत हुजूर दरबारांत किंवा बाहेर राहणारे राजे, सरदार व सेनाध्यक्ष, यांच्या वतीनें रायाच्या दरबारांत एकेक वकील हाजर राहतो. ते वकील रायाची दिनचर्या नित्य नेमानें आपल्या मालकाकडे लिहून पाठवितात. राजदरबारांत घडणारी कोणचीही गोष्ट आपल्या धन्याला कळल्यावाचून राहूं नये, अशाविषयीं ते व्यवस्था ठेवितात. ते रात्रंदिवस राजवाड्यामध्यें हजर राहतात. राजा बाहेर स्वारी शिकारीवर जातो तेव्हां त्याच्या बरोबर चिटणीस-रोजनामचेनवीस-असतात. राजा कोणाशीं कांहीं बालला, त्यानें कोणावर कांहीं कृपा केली,

किंवा कोणाला कांहीं इनाम दिलें, कोणा बरोबर कशा विषयीं भाषण केलें, त्याचा काय निकाल झाला, किंवा रायानें काय करण्याचें योजिलें, वगैरे बद्दलची तपशीलवार हकीकत हे लोक लिहून ठेवितात. या लोकांचा भारी मान असतो. ते म्हणतात कीं, राजा केव्हां कांहीं बोलो, ते त्याचे बोल लिहून ठेवण्यासारखे असलेच पाहिजेत, व त्याच्या स्मरणार्थ लेखी दाखला ठेवणें महत्वाचें व अवश्य आहे. राजानें दिलेल्या देणग्या किंवा इनामें, किंवा तोंडीं हुकूम यांच्या संबंधानें लेखी हुकूम व सनदा यांचा दाखला, या रोजनिशांमध्यें झालेला असतो. अशा तऱ्हेनें कृपापात्र झालेल्या किंवा इनाम पावलेल्या इसमाला राजाकडून कधीं कधीं त्याच्या हातांतील आंगठीची लाखेवर मोहोर होऊन मिळते. ती त्याच्या दिवाणाजवळ राहते. त्या मोहोराच अससल सनदे दाखल समजतात. (येथें कांहींसा गैर समज झालेला दिसतो. नुसत्या लाखेवर मोहोर करून दिली न जातां ती सनदां पत्रांवरच करून दिली जात असावी.)

हे विजयनगरचे राजे गायी व बैल यांच्या मांसाशिवाय इतर सर्व तऱ्हेचें मांस खातात. साऱ्या राज्यांत कोठेंही गोवध होत नाहीं. कारण हे मूर्तिपूजक लोक गायी बैलांना पवित्र मानतात. बकरीं, डुकरें, हरिण, तितर, ससे, पारवे, बटेर, लवे, वगैरेंचें मांस ते खातात. इकडे कांहीं जातीचे लोक चिमण्या, मांजरें, उंदीर, सरडे, घोरपडी व गोयरे, यांनांही मारून खातात. हे सारे प्राणी शहरांतल्या बाजारांत विकावयास येतात.

सारी शिकार जिवंतच विकावयाला आणावयाची असते. यामुळें ग्राहकाला तिच्याबद्दल खात्री पटण्याला अडचण पडत नाहीं. हा नियम जंगली शिकारीला जास्त लागू आहे. (हल्लीं सुद्धां या देशांत जंगली शिकार--पक्षी--जिवंतच विकावयाला आणण्याचा रिवाज आहे. त्यांचे डोळे शिवून टाकतात.) नदींतील मासेही किती तरी विकावयास येतात. सर्व तऱ्हेची फळ फळावळ--द्राक्षें, नारिंग, लिंबे, संत्रे, डाळिंब, फणस, आंबे, वगैरे--बाजारांत विपुल, चांगली व स्वस्त मिळते. शहरांतील बाजारांत एका होनाला बारा जिवंत बकरीं मिळतात. तींच बाहेर-जंगला पहाडांत १४।१५ मिळतात, म्हणे. राजा नेहमीं एका विवक्षित झऱ्याचें पाणी पितो. तो झरा राजाच्या एका अतिशय विश्वासांतील इसमाच्या ताब्यांत ठेविलेला आहे. तेथील पाणी मोहरबन्द भांड्यांतून आणतात. तीं मोहरबन्द भांडीं देवडीवरील पाहाऱ्याच्या कुणाबणींच्या हवाली करितात. तेथून तीं दुसऱ्या अंतर्गृहांतील दासी व राजस्त्रिया यांच्या स्वाधीन केलीं जातात.

या राजाकडून कोणाला अतिशय श्रेष्ठ मान मरातब मिळतो तो चामराच्या जोडीचा. हीं चामरें सफेत वनगायीच्या पुच्छांचीं असतात. त्यांचे दांडे सोन्याचे व जडावाचे असतात. त्यांच्या बरोबर जडावाचीं कंकणेंही दिली जातात. ( हीं चामरें–चौऱ्या–हल्लीं देवालयांतील मूर्ती आणि मोठ मोठे राजे महाराजे, यांच्यावर ढाळण्याच्या कामीं उपयोगांत असलेलीं आढळून येतात. त्यांचा मूळ उपयोग माशा वारावयाचाच असावा हिंदू राजांच्या दरबारांत चौऱ्यांचा मान सर्वांत श्रेष्ठ होता. तो मुसलमानी दरबारांत मोर्चेलाकडे गेला. चामरें व चौऱ्या पुष्कळच सामान्य राजे रजवाडे ही वापरूं लागले. )

रायानें कोणाला आपल्या पायाचें चुंबन घेऊं देणें, हाही फारच उच्च प्रतीचा मान समजतात. राजा कोणालाही आपल्या हाताचें चुंबन घेऊं देत नाहीं. कोणी सरदार किंवा सेनाध्यक्ष यानें तशीच कांहीं महत्वाची कामगिरी बजाविली असेल किंवा ती त्याच्याकडून करविण्याचें राजाच्या मनांत असेल तेव्हां तो त्याला विशेष तऱ्हेचा पोषाख देतो. तो त्यांनींच स्वतः घालावयाचा असून भारी मानाचा समजला जातो. सरदार व सेनाध्यक्ष प्रतिवर्षीं राजाला ठरलेली पेशकष आणून देतात. त्यावेळींही त्यांना पोषाख देण्याचा रिवाज आहे. ही पेशकष सप्टेंबर महिन्यांत दाखल होते. त्यावेळीं महानवमीचा भारी उत्सव होतो. आमच्या 'माई मेरी' नें आपल्या पुत्राला–देवाच्या पुत्राला–नऊ महिने गर्भांत ठेविलें होते. त्या महिन्याच्या संबंधानें व सन्मानार्थ हा उत्सव करितात, असें कांहीं कांहीं लोक म्हणतात. दुसऱ्यांच्या मतें तो उत्सव त्यावेळीं सरदार व सेनाध्यक्ष पेशकष देण्याला येतात त्या संबंधानें होतो. हा महोत्सव पुढें लिहिल्याप्रमाणें होतो.

पहिल्या दिवशीं राजवाड्यापुढील मैदानांत नऊ सरदार किंवा सेनाध्यक्ष उंचसे नऊ मंडप तयार करवितात. ते एखादा बुरूज किंवा किल्ल्या सारखे दिसतात. त्या मंडपांना सुरेख व मोल्यवान कापड मढविलेलें असतें. त्या मंडपांत पुष्कळशा कलावंतिणी बसण्याची आणि तऱ्हे तऱ्हेचे चमत्कारिक खेळ व तमाशे चालू ठेवण्याची व्यवस्था केलेली असते. या मंडपाशिवाय प्रत्येक सरदार व सेनाध्यक्ष स्वतःचा निराळा किल्ला तयार करवितो. हे किल्ले ते स्वतः रायाला नेऊन दाखवितात. प्रत्येकाची तऱ्हा व व्यवस्था निराळी असते. ते सर्व सरदार व सेनाध्यक्ष उत्सवांत नऊ दिवस सारखे हजर असतात. या नऊ दिवस शहरांतील अधिकारी आपापले तमाशे घेऊन रात्रीं हजर राहतात. आपल्याकडेही बहुतेक असाच रिवाज आहे. या दिवसांत पुष्कळ

बलिदान व होम हवन होतें. पहिल्या दिवशीं नऊ नऊ रेडे, बकरीं, व बोकड, बळी देतात. त्यानंतर पुढें प्रतिदिवशीं पूर्व दिवसाच्या दुप्पट, याप्रमाणें बलिदान होतें. हें बलिदान आटपल्यावर प्रथम दिवशीं राजाचे खासे नऊ घोडे व नऊ हत्ती उत्तमोत्तम साज अलंकार व गुलाबाच्या फुलांचे हार घालून आणितात. त्यांच्यापुढें पुष्कळसा लवाजमा व नाकर चाकर घेऊन, खासगीकडील अश्वशाळेचा मुख्य अधिकारी, थाटानें चालत असतो. ते राजापुढें जाऊन प्रणाम करितात. नंतर आंतून पुष्कळसे उपाध्ये ब्राम्हण, तांबूल, अन्न, पाणी, अग्नि, व तऱ्हे तऱ्हेचीं परिमल द्रव्यें घेऊन येतात व ताडानें कांहीं मंत्र म्हणत आणिलेलें पाणी त्या हत्तीघोड्यांवर टाकतात. आपल्याकडील पाद्री लोक पवित्र जलाचें सिंचन करितात तशांतलाच हा प्रकार दिसतो. नंतर त्यांच्यावर गुलाबाचे हार टाकून फुलें उधळतात. हें सर्व रायाच्या समक्षच केलें जातें. तो यावेळीं जवळच रत्नखचित सिंहासनावर बसलेला असतो. उत्सवाच्या दिवसांखेरीज तो पुनः केव्हां या सिंहासनावर बसत नाहीं. हल्लींचा राजा अच्युतराय या सिंहासनावर बसत नाहीं. कारण त्याच्यावर बसणारा एकवचनी, अनृत भाषण न करणारा व नेहमीं सत्यच बोलणारा असावा लागतो. अच्युतराय तसा नाहीं. हा विधी चालू असतांना सुमारें १००० वर स्त्रिया मोठ्या थाटानें व समारंभानें राया समोरून नृत्य करीत जातात. सर्व तऱ्हेचे तयार करविलेले खेळ व तमाशे राजापुढें पेश होऊन गेल्यावर, उत्तमोत्तम रेशमी साज व सोन्याचे आणि जडावाचे अलंकार घालून सजविलेले रायाचे खासे घोडे त्याच्या पुढून मिरवत जातात. त्यांच्या मागून हत्ती व बैलांच्या जोड्याही तशाच उत्तम शृंगारलेल्या, राजवाड्यापुढील मैदानांतील आखाड्यांतून मिरवत नेतात. त्यांची हजीरी आटपल्यावर, रायाच्या राण्यांच्या पदरच्या अतिशय सुंदर आणि उत्तमोत्तम मोत्यांच्या व जडावाच्या दागिन्यांनी जणा लदलेल्या व मोत्यांच्या झालरींचें वगैरे काम केलेले उत्तम पोषाख घातलेल्या स्त्रिया हजरीला येतात. त्यांच्या हातीं सुवर्ण पात्रांमध्यें आरत्या असतात. त्यांच्या बरोबर राणी वशांतले नोकर चाकर व सर्व लवाजमा राहतो. कांहींच्या हातीं सोन्याच्या मुठीच्या छड्या व कांहींच्या हातीं मशाली असतात. त्यांची मिरवणूक झाल्यावर त्या जनानखान्यांत परत जातात. त्यांच्यामागोमाग राजाही जातो. या स्त्रियांच्या अंगावर इतके कांहीं सुवर्णाचे व रत्नखचित अलंकार लादलेले असतात कीं त्यांच्यामुळे कित्येकींना नीट चालतांही येत नाहीं.

या नऊ दिवसपर्यंत प्रत्यहीं राजाला आनंद होईल अशा तऱ्हेच्या नव्या नव्या गोष्टी योजून करून दाखविल्या जात असतात.

राजाच्या पदरीं १००० मल्ल-जेठी-नोकर आहेत. या उत्सवांत त्यांच्या प्रत्यहीं कुस्त्या होतात. त्या आपल्याकडच्या सारख्या होत नाहींत. हे मल्ल एकमेकांना कांटेदार चक्रांनीं जोरानें मारमारून जखमी करितात. सर्वांत जास्ती जखमा होतील त्यांना राजाकडून दुशाले वगैरे इनाम मिळतात. ( हीं चक्रें कशीं होतीं व त्यांचें मल्लयुद्ध कसें होत असे तें नीट लक्ष्यांत येत नाहीं. शिवाय ज्याला जास्त जखमा होतील म्हणजे जो जास्त हरेल त्याला इनाम दिलें जाणें चमत्कारिक दिसतें. ) या मल्लांवर ही एक हुद्देदार असतो. हे लोक राजदरबारांत दुसरी कांहीं नोकरी करीत नाहींत.

हा नऊ दिवसाचा उत्सव आटपला म्हणजे राय आपल्या सरदार व सेनाध्यक्षांच्या हाताखालच्या फौजेची हजीरी घेतो. फौज सुमारें दोन कोस, रस्त्याच्या दुतर्फा उभी केलेली असते. तिच्या मधून राजा घोड्यावरबसून मोठ्या समारंभानें जातो. रस्त्याच्या टोकाला उतरून हातीं धनुष्यबाण घेऊन तो तीन दिशेला तीन बाण मारतो. एक आदिलशहाला उद्देशून, दुसरा–कोटामुलाको–गोवळकोंड्याच्या कुतुबशहाला उद्देशून आणि तिसरा पोर्तुगीज लोकांना उद्देशून. त्यापैकीं सर्वांत दूरवर जाऊन पडलेल्या बाणानें उद्दिष्ट राजाशीं युद्ध चालू करण्याचा या राजांचा रिवाज आहे.

हें आटपल्यावर राजा महालांत परत येतो. त्या दिवशीं तो आणि राज्यांतील सर्व प्रजा उपवास करितात. दुसरे दिवशीं सर्व लोक नदीवर स्नानाला जातात. सरदार व जहागीरदार यांच्याकडून यावयाची पेशकष याच दिवसांत जमा होते. मागें वर्णन केल्याप्रमाणें राज्यांतील सारी जमीन राजाची. ती सरदार व जमीनदार यांना वाटून दिली गेली आहे. ती ते कुळांकडे सोंपतात. कुळें उत्पन्नांतून शेकडा नव्वद हिस्से त्यांना देतात. कुळांकडे त्यांची खानगी जमीन अशी मुळींच नसते. सारी जमीन राजाची समजली गेली आहे. सरदार व सेनाध्यक्ष यांना जी फौज बाळगावी लागते तिचा खर्च भागण्यासाठीं ही व्यवस्था केलेली आहे. ती फौज नेहमीं नोकरीचाकरी साठीं हजर व तयार ठेवण्याची जिम्मेदारी त्यांच्यावर असते.

प्रति शनिवारीं शहरांतील सर्व कलावंतिणीची राजवाड्यांतील मुख्य मंदिरांत–देवापुढें–नाच गाण्याची हजीरी होते. या राज्यांतले लोक दर शनिवारीं उपवास करितात. ते कांहीं खात नाहींत, पाणीसुद्धां पीत नाहींत. फार तर मुखवास व मुखशुद्धीसाठीं दोनचार लवंगा खातात.

हा राजा नेहमीं पुष्कळच दानधर्म करितो. राजाचे उपाध्ये व त्याच्याकडील हव्यकव्य करणारे, असे दोन तीन हजार ब्राम्हण राजवाड्यांत असतात.

ते फारच हलकट व नीच, पण पुष्कळच श्रीमान असतात. ते फार उन्मत्त व दांडगे असतात. प्रसंगविशेषीं राजद्वारावरील पाहरेवाले त्यांना राजवाड्यांत जाण्याची बंदी करण्यासाठीं धक्केही मारतात, तरी ते लोचटपणा करीतच असतात.

इकडील सरदार, सेनाध्यक्ष व प्रतिष्ठित आणि प्रमुख लोक ४ ते १२ मशालींचा उपयोग करितात. त्या त्यांच्या मानमान्यतेच्या मानानें कमी जास्ती असतात. तरी पहिल्या प्रतीच्या सरदारापुढें सुद्धां १२ हून जास्त मशाली असत नाहींत. राजापुढें १००।१५० मशाली असल्याच पाहिजेत, असा ठराव आहे. या राज्यांत मेण पुष्कळ पैदा होतें, पण त्याचा उपयोग करण्याचें इकडे माहित नाहीं.

कोणी व्यापारी किंवा सौदागर कांहीं माल किंवा घोडे विकावयास घेऊन आला तर, सुरुवातीला त्याच्यांतील उत्तमोत्तम माल किंवा घोडे राजाला नजर केल्याशिवाय गत्यंतर नसतें. अशी नजर नुसती राजालाच करूनही भागत नाहीं. ज्या ज्या कामदारांमार्फत सौदा व्हावयाचा असेल त्या सर्वांना लांच रुपवत दिल्यावाचून चालतच नाहीं. स्वतःचा कांहीं फायदा असल्याशिवाय ते लोक कोणचीही गोष्ट करीत नाहींत.

कोणाचें कांहीं नुकसान झालें किंवा इजा पोहोंचली असली व त्याला राजाकडे दाद मागावयाची असली तर तो राजद्वारीं जाऊन आडवा पडतो आणि कोणी पक्षीशी विचारपूस करी तों उठत नाहीं. खुद्द राजालाच कांहीं अर्ज करावयाचा असला तर तो एक भाल्यासारखी काठी हातांत घेऊन तिच्या टोंकाला एक झाडाची डहाळी बांधून मोठ्यानें ओरडत फिरतो. तें पाहून राजाच्या स्वारींतील लोक त्याला रस्ता देतात व तो राजाजवळ पोहोंचून अर्ज करितो. त्याचा बहुधा फारशी पंचायत न होतां जागच्या-जागींच निकाल होतो. राजाबरोबर स्वारींत पुष्कळ अधिकारी असतात, त्यांपैकीं कोणाला तरी राजा त्या अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणें निकाल करून बजावणी करून येण्याचा हुकूम देतो. अमुक प्रांतांत अमक्या रस्त्यावर आपली चोरी झाली अशी फिर्याद असली तर राजा तावडतोब त्या प्रांताच्या जहागीरदार सरदाराला—तो राजधानींत असला तर—बोलावणें पाठवून त्या चोराचा व चोरीचा पत्ता लावण्याचा हुकूम देतो. तें त्याच्या हातून घडून आलें नाहीं तर त्यालाच धरून कैदेंत टाकतात, व त्याची जिनगी जप्त करितात. मुख्य कोतवालाला राजधानींतील प्रत्येक चोरीचा पत्ता

लावून यावा लागतो. यामुळें चोऱ्या फार कमी होतात. कधीं काळीं चोरी झालीच तर थोडेसें इनाम व चोराची चेहरेपट्टी या लोकांना दिली म्हणजे ते मांत्रिक व जादूगार यांच्या द्वारें चोर शहरांत आहे किंवा कसें याचा तेव्हांच पत्ता लावून देतात. या देशांत जाडे जाडे मांत्रिक आहेत. यामुळें इकडे चोर फार कमी आहेत.

या राजाच्या पदरीं पगारदार ५०,००० शिपायी व ६,००० स्वार कायमचे भरती असतात. राजवाड्याची हिफाजत व चौकी पाहरा हीं कामें त्यांच्याकडे असतात. यापैकींच २०० स्वार राजा बाहेर पडतो तेव्हां त्याच्या बरोबर हजर राहतात. त्याच्या पदरीं भालेकरी व ढालाईत मिळून २०,००० आणि हत्तीवरील नोकर ३,००० आहेत. घोड्यांकडे १,६०० मोतद्दार व त्यांना फेर फटका करून तयार ठेवण्यासाठीं ३०० चाबूकस्वार आहेत. शिवाय लोहार, सुतार, गवंडी, परीट, वगैरे कारागीर व धंदेवाले लोक २,००० आहेत. या सर्वांना नियमित पगार मिळतो, तो राजवाड्याच्या देवडीवर वांटतात. ६,००० स्वारांना सरकारी घोडे मिळतात. त्यांच्यावर सरकारी छाप असतो. त्यांना दर महिन्याला चंदी चारा मिळतो. घोडा मेला तर त्याच्या चामड्याचा छाप असलेला तुकडा अश्वशाळेवरील मुख्य अधिकाऱ्यापुढें हजर केल्यावरच दुसरा घोडा मिळतो. या अधिकाऱ्याचें नांव 'मादा नाइक,' 'माद नायक' आहे. बहुतेक घोडे देशीच असतात. त्यांची किंमत प्रत्येकीं सरासरी ६६ पासून ८५ होन असते. रायाकडे प्रतिवर्षी परदेशी ओर्मझचें व स्वदेशी मिळून सुमारें १३,००० घोडे खरेदी होतात. त्यांतील सर्वोत्तम घोडे खाशा तबेल्यासाठीं ठेवून बाकीचे तो सरदार लोकांना विकतो. यांत त्याला पुष्कळ फायदा होतो. कारण त्यांच्यांतील उत्तम उत्तम घोडे काढून घेतल्यावरही तो बाकीचे घोडे २००।२०० होनास एकेक, असे त्यांना विकतो. त्यांच्या किंमतीची रकमही त्यांना सप्टेंबरच्या आंतच भरणा करावी लागते. याप्रमाणें मिळविलेल्या पैशांतून तो पोर्तुगीज लोकांकडून खरेदी करण्याच्या अरबी घोड्यांची किंमत काढतो. असा हा घोडे खरेदीचा सारा खर्च त्या सरदार व सेनाध्यक्ष लोकांवरच पडतो. राजाच्या खजीन्यांतून या प्रीत्यर्थ एक कवडीही बाहेर जात नाहीं.

राजवाड्यामध्यें ४,००० वर बायका राहतात. त्यांच्यामध्यें कांहीं नाटकशाळा आहेत. कांहीं स्त्रिया पालख्या व मेणे यांच्यांतून राण्यांना व राजवाड्याच्या हद्दींत खुद्द रायाला वाहून नेण्याचें भोयांचें काम करितात. राजवाडा व जनानखाना यांचीं आवारें फारच मोठीं आहेत. निरनिराळ्या आवारांमध्यें अंतरही

बरेंच अंतर आहे. यामुळें मेणे पाळखयांचा उपयोग करावा लागतो. कांहीं मल्लाचें काम करणाऱ्या व कांहीं ज्योतिष रमल वगैरे जाणणाऱ्यांही बायका आहेत. तसेंच जनानखान्यांतील कुल खर्च वेचयाचा हिशेब ठेवण्याचें काम, आणि राज्यकारभार संबंधीं तपशिलवार कैफियती व रोजची दिनचर्या लिहिण्याचें काम करणाऱ्याही बायकाच आहेत. त्यांनीं लिहिलेल्या व बाहेर रोजनामचेनवीसांनीं लिहिलेल्या वृत्तांचा पडताळा पाहिला जातो. त्यांच्यांत संगीत, नृत्य, व नानाप्रकारचीं वाद्यें यांचें वादन, यांमध्यें निपुण अशाही बायका आहेत.

शिवाय राजाच्या खास पाकशाळेकडे १० बायका आहेत. विशेष मेजवान्या वगैरे साठीं पृथक बायका नेमलेल्या आहेत. या दहा स्त्रिया खुद्द राजाशिवाय इतर कोणासाठीं स्वयंपाक करीत नाहींत. पाकशाळेच्या द्वारावर एक हिजडा नेहमीं पाहऱ्यावर राहतो. राजाच्या अन्नांत कोणी विष घालील या भीतीनें तो दुसऱ्या कोणाला पाकशाळत फिरकूं देत नाहीं. राजा भोजन करण्याच्या वेळीं सर्व लोक एकीकडे जातात. नंतर भोजनाची तयारी करण्याच्या कामावर नेमलेल्या बाया तेथें येऊन तयारी करितात. राजाचें भोजनपात्र ठेवण्याला एक सोन्याची गोल तिवई केलेली आहे. तिच्यावर सुवर्ण पात्रांमध्यें भोजनाचे पदार्थ वाढतात. सर्व पदार्थ मोठाल्या सोन्याच्या भांड्यांतून आणतात व ते लहान लहान भांड्यांतून वाढतात. यांतील कांहीं पात्रें जडावाचीं असतात. तिवईवर कपडा घालीत नाहींत. भोजनानंतर हात तोंड धुवून पुसण्यासाठीं मात्र कपड्याचा उपयोग होतो. राजा भोजन करीतअसतांना त्याच्या जवळ बायका व हिजडेच नोकरीवर असतात.

राण्या आपापल्या महालांमध्यें असतात. तेथें त्यांच्या सेवेंत त्यांच्या पृथक पृथक दासी असतात. प्रति दिवशीं रात्रीं जनानखान्यांत बंदोबस्त करण्यास चौकीदार, दरोगे, तपासनीस, सर्व बायकाच नेमलेल्या असतात, म्हणे.

एकदां वापरलेला कपडा राजा पुनः घालीत नाहीं. अंगांतून काढतांच तो एका अधिकाऱ्याकडे दिला जातो. तो त्याचा हिशेब ठेवितो. हे कपडे दुसऱ्या कोणाला वापरण्याला मिळत नाहींत. असली ही व्यवस्था मोठी भूषणावह समजतात. राजाचे कपडे फारच तलम रेशमी कापडाचे व जरीचें काम केलेले असतात. त्या प्रत्येक कपड्याची किंमत दहा परदाओ-होन्न-हून कमी नसते. राजा कधीं मधीं बाजूरी नांवाचा कपडा अंगांत घालतो. तो बंडी प्रमाणेंच पण खालच्या बाजूला कांहींसा घोळदार असतो. त्याच्या डोक्याला भरजरी टोपी-कुलाय-असते. तीही तो एकदांच उपयोगांत आणितो. तिची किंमत सुमारें २० क्रूझेडोस असते.

या राज्यांत गुन्हेगारांना पुढें लिहिल्याप्रमाणें शिक्षा देतातः--

चोरी-कितीही किंमतीच्या मालाची असो-ती करणाऱ्याचा एकेक हात पाय तोडतात. विशेषच भारी मालाची चोरी करणाऱ्याच्या हनुवटीखालीं गळ लावून त्याला फांसावर चढवितात. संभावित गरती स्त्री, किंवा कुंवारी कन्या, यांच्यावर बळजबरी किंवा अशाच तऱ्हेचा गुन्हा करणारालाही हीच सजा होते. राजद्रोह करणाऱ्या सरदार लोकांना जिवंत सुळावर चढवितात, म्हणजे त्याच्या पोटांत लांकडी सूळ खुपसतात. हाच अपराध कोणी सामान्य माणसानें केला तर त्याला बाजारांत चव्हाट्यावर नेऊन त्याची एकदम गर्दन मारवितात. खुनालाही हीच शिक्षा दिली जाते. पण द्वंद्वयुद्धामध्ये कोणी कोणाचा प्राण घेईल तर त्याला सजा होत नाहीं. उलट त्याचा बहुमान होतो आणि मारला गेलेल्याची माल मिळकत त्याला मिळते. तरी पण दिवाणाची परवानगी मिळविल्याशिवाय कोणालाही द्वंद्व युद्ध करतां येत नाहीं. दिवाणाकडून अशी परवानगी बहुतेक ताबडतोप मिळते. या सामान्य शिक्षांशिवाय इतर कांहीं चमत्कारिक शिक्षा दिल्या जातात. राजाच्या मर्जीला आलें व त्यानें हुकूम दिला तर, गुन्हेगाराला हत्तीच्या पायीं देतात. हत्ती त्याला चिरडून किंवा फाडून टाकतो. इकडील लोक राजाविषयीं भारीच पराधीन झालेले आहेत. कोणा एखाद्याला, 'तुला रायानें पाठीवर धोंडा घेऊन ओणवें उभें राहण्याची शिक्षा दिली आहे,' असें सांगितलें, तर तो सारा दिवस तसा निमूटपणें उभा राहील. सांगणारा मनुष्य पुनः परत जाऊन त्याला ऊठ म्हणे-पर्यंत तो जागचा हालणारसुद्धां नाहीं.

राज्यामध्यें फिरून राज्यकारभाराची व्यवस्था पाहणाऱ्या अमलदारां मध्यें दिवाण प्रमुख असतो. त्याला वरिष्ठ काय तो राजाच. याच्या खालोखाल प्रतवारीनें, खजीनदार, राजवाड्यांतील गारदी लोकांचा मुख्य हुद्देदार, जमादार व अश्वशाळेचा मुख्य अधिकारी या दरबारामध्यें वसूल बाकीचा हिशेब ठेवणारा किंवा तिच्याविषयीं तपासणी करून दाब ठेवणारा अधिकारी-दरबाराकडाल किंवा खासगीकडील-कोणी नाहीं.

मुख्य सरदार व सेनाध्यक्ष लोकांपैकीं कांहींविषयीं माहिती पुढें लिहिल्या प्रमाणें आहे :—

या सर्वांत मुख्य सरदार-हल्लींचा दिवाण मुख्य प्रधान सालुवा नायक, याला ११,००,००० होनांचें उत्पन्न आहे. त्याच्याकडे 'कारोमांडल-'चोल मंडल-'नागा पट्टाओ'-नागापट्टण,-तांजोर, 'बॉमगारिन,' 'दपटाओ,' 'त्रुगुराल' आणि 'कालिम' हे प्रदेश आहेत. हीं सर्व मोठमोठीं शहरें आहेत. या प्रदेशांचा विस्तार मोठा आहे. त्याची सरहद्द सीलोनापर्यंत लागली आहे. या प्रांताच्या

उत्पन्नांतून तिसरा हिस्सा राजाला नजर द्यावा लागतो. त्याला राजाच्या हुकुमानें ३०,००० पायदळ ३,००० स्वार, आणि ३० हत्ती, इतकी फौज बाळगावी लागते. तिचा सर्व खर्च बाकीच्या दोन हिशांतून करावा लागतो. तो वजा जातां राहिलेली बचत, हीच त्याचें निव्वळ उत्पन्न. तरीसुद्धां त्याच्या जवळ पुष्कळच शिल्लक राहते. कारण तो सारीच फौज भरती करून बाळगितो, असें नाहीं.

राजा या सरदारांची मालमत्ता वाटेल तेव्हां हरण करितो.

दुसरा सरदार 'अजा पाका तिम्माप्पा.' तो कृष्णरायाचा दिवाण होता. त्याचें उत्पन्न ८,००,००० होन्न आहे. त्याच्याकडे, हुडागिरि '–उदयगिरी–'कोंडोविम '–कोंडाविड–'पेन्ना गुंडिम'–पेन्नाकोंडा–'कोडेगराल'–नेलोर जिल्ह्यांतील कनीगिरी–आणि कडपा जिल्ह्यांतील 'सिदोटा'–सिधोटे किंवा 'सिद्धवट' इतकीं शहरें व त्यांच्या खालचा सर्व प्रदेश आहे. हीं शहरें कांहीं ओरीसाच्या राज्याच्या हद्दीला आणि कांहीं कन्याकुमारीच्या लगत्याला आहेत. कृष्णरायानें 'साळुवा तिम्मा ' चे डोळे काढविले, आणि याला दिवाणगिरी दिली त्या वेळीं त्यानें याला हे प्रांत जहागीर दिले. ते पूर्वी 'साळुवा तिम्मा' कडे होते. याला २५,००० पायदळ, १,५०० स्वार, आणि ४० हत्ती बाळगावें लागतात. तसेंच त्याला ३,००,००० होन्न सालिना पेशकष द्यावी लागते.

'गप्पा नायक' नांवाचा सरदार आहे. त्याला 'रोसायल,' 'तिप्पर' 'तिकत्रो, व 'बिगोलोम' हे प्रदेश जहागीर आहेत. त्यांची हद्द आदिलशहाच्या राज्यापर्यंत पोहोंचली आहे. त्या प्रांतांत गहूं चांगला पिकतो. शिवाय इतर धान्यें, तीळ, कापूस, गुरें ढोरें, बकरीं आणि शेळ्या, पैदा होतात. या कापसाचें चांगलें बारीक कापड तयार होतें. इकडे सारें कापड कापसाचेंच करितात.

या जहागीरीचा वसूल ६,००,००० होन्न आहे. त्यांतून चौथाई पेशकष द्यावी लागते. आणि २०,००० पायदळ, २,५०० स्वार, व २० हत्ती बाळगावे लागतात.

'लेपाप्पा नायक ' नांवाचा आणखी एक सरदार आहे. त्याच्याकडे 'बिमगापुर' (धारवाडच्या दक्षिणेस असलेलें बंकापूर) व त्याच्या खालचा प्रदेश आहे. तिकडील जमीनींत सर्व धान्यें पिकतात व गुरें चारण्याचीं कुरणेंही पुष्कळ आहेत. त्याचें उत्पन्न ३,००,००० होन्न असून त्याला ८०,००० होन्न पेशकष द्यावी लागते आणि पदरीं २०,००० पायदळ, १,२०० स्वार व हत्ती ठेवावें लागतात.

आमदारखान्यावरील मुख्य अधिकारी ' नरवर ' नांवाचा आहे. त्याच्या हाताखालीं 'ऑडेगमो' नांवाचें नवीन शहर, 'डिगौटी,' 'दारगुडाम' व 'अंत्तारव' हीं शहरें व त्यांच्या खालचा प्रदेश, तसेंच विजयनगरच्या प्रदेशाजवळचा भाग आहे. त्यांतील सारी जमीन लागण झालेली-पेराऊ-आहे. (या शहरांचा पत्ता लागत नाहीं, तीं विजयनगरापासून विशेष दूर असतील, असें वाटत नाहीं.) त्यांचा वसूल ४,००,००० होन्न होतो. त्यांतून २,००,००० होन्न रायाला पेशकष जातें. बाकीच्यांतून १२,००० प्यादे, ६०० स्वार, व २० हत्ती, इतक्यांचा खर्च करावा लागतो.

'चिन्नाप्पा' नांवाचा सरदार आहे. तो राजाचा खासगीकडील सेनाध्यक्ष-'मार्शल'-आहे. 'कोचाम'च्या मार्गावरील 'कलाले' शहर, त्याच्या खालचा प्रदेश व इतर बराचसा भाग त्याच्या अमलाखालीं आहे. त्यापासून त्याला ३,००,००० होन्नाचें उत्पन्न होतें. त्यांतून तिसरा हिस्सा पेशकष जातें. त्याला १०,००० पायदल व ८०० स्वार राहतात. ( म्हैसूरच्या दक्षिणेस सुमारें १५ मैलांवर 'कलाल' नांवाचा एक गांव आहे. तोच हा असेल. तो सं. १५०४ सालीं, विजयनगरच्या राजघराण्याशीं संबंध असलेल्या एका सरदारानें स्थापन केला, असें म्हणतात. )

'कृष्णाप्पा नायक' नांवाच्या सरदाराकडे 'ऑसेल' नांवाचें शहर आणि इतर कांहीं गांव आहेत. त्या गांवांचीं नांवें भारी अवघडशीं असल्यानें मीं तीं येथें दिलीं नाहींत. त्यांच्यापासून २०,००० होन्नांचें उत्पन्न येतें. त्यांतून ७,००० पेशकष द्यावी लागते. बाकीच्यांतून ७०० प्यादे व ५०० स्वार ठेवून राजाकडे नोकरी द्यावी लागते.

'बाजाप्पा नायक' या सरदाराकडे 'बोधिआल' नांवाचें शहर आणि त्याच्या खालचा प्रदेश आहे. तो समुद्र किनाऱ्यावर असलेल्या मंगळूर बंदराच्या लगत्यास आहे. तसेंच 'गुइआना' ही त्याच्याकडेच आहे. या भागांत मिरें, ऊंस, सणाचें कापड, अनेक तऱ्हेचे तांदूळ, वगैरे पैदा होतात. गहूं व इतर कापड होत नाहीं. मेण पुष्कळ सांपडतें. त्याचा वसूल ३,००,००० होन्न येतो. त्यांतून १०,००० होन्न पेशकष जातें. १०,००० पायदळ, ८०० स्वार, व १५ हत्ती, पदरीं बाळगून नोकरी द्यावी लागते. ( म्हैसूर संस्थानांत चितलदुर्ग जिल्ह्यांत चितलदुर्गापासून सुमारें ४२ मैलांवर, 'बुदेहाल' नांवाचें गांव आहे. तेंच बहुशः हें असेल तो गांव विजयनगरच्या राजांच्या पदरच्या कोणी सरदारांनीं वसविला, असें सांगतात. तेथें सोळाव्या शतकांतील शिलालेख पुष्कळसे आहेत )

'मल्लाप्पा नायक' हा कृष्णदेवरायाच्या पदरीं त्याच्या अश्वशाळेचा अधिकारी होता. त्याच्याकडे 'आनले' चा प्रदेश आहे. तो 'कालीकटच्या' अर्ध्या वाटेवर आहे. तेथें पुष्कळच लोखंड, कापूस व तांदूळ, आणि गायी, म्हशी, शेळया, बकरीं वगैरेची पैदायष आहे. त्याच्या १५,००० होन्न उत्पन्नांतून ५,००० पेशकष जाते, आणि त्याला ६,०० शिपायी व ४०० स्वार नोकरी-साठीं ठेवावे लागतात. (मूळ प्रतीची नकल करणाऱ्याच्या हस्त दोषानें हें नांव 'आवटी' याच्या ऐवजीं पडलें असावें, असें वाटतें. कोलार जिल्ह्यांत 'अवाटी' नांवाचें एक खेडें आहे. पंधराव्या शतकांत तें बरेंच मोठें व महत्वाचें गांव होतें. तें 'मोरसू वक्कलू' किंवा 'सात कुणबी' यांनीं, एक राजघराणें स्थापन केल्याविषयीं दाखला सांपडतो. त्या राज-घराण्याला वरील वर्णन बरेंच लागू पडतें).

राजाचा मुख्य सल्लागार व मंत्री 'आडाप्पा नायक' याला 'गाटे' हा प्रदेश जाहागीर आहे. तिकडे हिऱ्याच्या खाणी आहेत. त्यांच्यांतून हिरे काढतात. ('गाटे' म्हणजे घाट किंवा गुटी असावें. वज्र कारूर येथील सुप्रसिद्ध हिऱ्याच्या खाणी गुत्तीच्या आग्नेयीस सुमारें २० मैलांवर आहेत. तेथें एक चांगलाशा जुन्या किल्ल्याचा अवशिष्ट भाग आहे.)

या शिवायही कांहीं दुसरे प्रदेश त्याच्याकडे आहेत. त्या सर्वांचा त्याला ३,००,००० होन्न वसूल येतो. त्याशिवाय रत्नाच्या हिऱ्याच्या उत्पन्नाचीही मोठीच वसूलाची बाब आहे. त्या पेटे तो रायाला दर साल ४०,००० होन्न निराळे देतो. या खाणींत वीस 'मांगोलिन' किंवा सुमारें २५ 'कारट' यांहून अधिक वजनाचे हिरे निघतील ते सारे रायाला द्यावे लागतात. या नायकाच्या पदरीं ८,००० शिपायी, ८०० स्वार व ३० हत्ती, असतात. त्याला १,००,००० होन्न पेशकष द्यावी लागते.

'मुमडेगुएल'–मुद्गल–येथील जहागीरदार 'बाजाप्पा नायक' नांवाचा सरदार आहे. मुद्गल शहर पूर्वीं आदिलशहाच्या ताब्यांत होतें. रायचूर घेतल्या नंतर तें लौकरच कृष्णरायानें कबजांत आणिलें. तें मूळचें त्याच रायचूरच्या हद्दींतलें. मुद्गलचा किल्ला व त्याच्या खालचा आणि इतर बराचसा प्रदेश मिळून त्याला ४,००,००० होन्नाचें उत्पन्न आहे. त्याच्यांतून १,५०,००० होन्न पेशकष द्यावी लागते. बाकीच्या उत्पन्नांतून १,००० स्वार १०,००० पायदळ, व ५० हत्ती इतक्या फौजेनिशीं त्याला नोकरी द्यावी लागते.

याप्रमाणें या राज्यांतील सारा प्रदेश सुमारें दोनशेंहून जास्त सरदार व सेनापती यांच्यामध्यें वांटून दिला गेला आहे. हे सर्व लोक मूर्तिपूजक

आहेत. त्यांच्याकडे असलेला प्रदेश व त्या प्रदेशाचें उत्पन्न यांच्या मानानें त्यांनीं किती फौज बाळगावयाची, व पेशकष किती द्यावयाची, तें राजा स्वतः ठरवून देतो. ही पेशकष, मागें लिहिल्याप्रमाणें, सप्टेंबर महिन्यांत–नवरात्राच्या दिवसांत–भरणा करावयाची असते. भरणा झाल्याबद्दल दाखला किंवा पावत्या मिळत नाहींत. पेशकष दाखल न झाली तर मात्र सजा होते व सर्वस्व हरण केलें जातें. या राज्यांतले सरदार, सेनापती व बडे लोक, मेणे व पालख्यांत बसतात. त्या आपल्याकडील प्रेत वाहण्याच्या गाड्यांसारख्या असतात. त्यांना माणसें वाहून नेतात. वरिष्ट दर्जाच्या शिलेदारांशिवाय इतरांना मेण्यामध्यें बसण्याची परवानगी नाहीं. प्रमुख सरदार व सेनाध्यक्ष पालख्यांमध्यें बसतात. राजा नगरांतच असतो तेव्हां तेथें २०,००० मेणे व पालख्या जमलेल्या असतात.

विजयनगरच्या राज्याचें हल्लींचें वैभव व संपत्ती यां विषयींचें खरें वर्णन सुद्धां अतिशयोक्तीचें वाटण्याजोगें आहे. तरी इकडील वाकबगार लोक खात्रीनें सांगतात कीं, तें पूर्वीं किती तरी जास्त होतें.

या राज्यांत एका विविक्षित वर्णाचे–ब्राह्मण वर्णाचे–लोक आहेत. ते प्राणि हिंसा करीत नाहींत व हिंसेपासून पैदा होणारे पदार्थ खात नाहींत. हे लोक इकडील इतर सर्व लोकांपेक्षां श्रेष्ठ व उत्कृष्ठ असतात. ते स्वभावानें सच्चे, व चोख असतात. ते फार बुद्धिमान, कुशाग्रबुद्धी, व हिशेबाच्या कामीं फार हुषार असतात. ते व्यापार टापार करितात. त्यांची अंगकाठी सडपातळशीच तरी बांधेसूद असते. ते लोक काबाड कष्टाच्या व मेहेनतीच्या कामाला फारसे उपयोगाचे असत नाहींत. या लोकांमुळें व त्यांच्या कर्तबगारीवरच सारा राज्य कारभार चालतो. त्यांच्या मतें परमेश्वर त्रिमूर्ती तरी एकच आहे. त्या त्रिमूर्तींतील प्रमुख व्यक्तीला ते 'त्रिसेंबेंका'–त्र्यंबक,–ह्मणतात. दुसऱ्या एका पंथाचे लोक आहेत. ते कानडे आहेत. त्यांच्या मंदिरांमध्यें गायी, म्हशी, माकडें व भुतें यांच्या मूर्ती असतात. त्यांना ते फार मानतात व त्यांची पूजा करितात. या माकडांच्या प्रतिमांची ते पूजा करितात याचें कारण, त्यांच्या मतें, पूर्वकालीं त्यांना वाचा होती व त्यांच्याकडेच या सर्व भूमंडळाचें आधिपत्य होतें. त्यांच्या पुराणग्रंथांत सुरस व उदात्त स्वभावद्योतक कथा, तसेंच अनेक मूर्तींसंबंधीं वेडगळ आणि विश्वास ठेवण्याला अपात्र, अशींही वर्णनें भरलेलीं आहेत.

या विजयनगरच्या राज्यांत, किंबहुना या मूर्तिपूजकांच्या साऱ्याच देशामध्यें, माकडांना कोणी मारीत नाहीं. इकडे त्यांचा फारच सुकाळ आहे. सारे डोंगर त्यांनींच व्यापलेले आहेत.

दुसऱ्या एका वर्गाचे लोक आहेत त्यांना, 'तेलंगाल्ले'-तेलंगे-म्हणतात. त्यांच्यांत नवऱ्याच्या प्रेताबरोबर बायकोला जिवंत पुरण्याची चाल आहे.

विजयनगरचे राजे ब्राम्हण जातीचे आहेत-(ही चुकी आहे). बालब्रम्हचारी आणि स्त्रीचा संपर्क नसलेला अशा एका अति विद्वान ब्राम्हणाच्या तोंडून त्यांना नित्य पुराण श्रवण करावें लागतें. त्या पुराणकथनप्रसंगीं तो ब्राम्हण ईश्वराच्या आज्ञेनुसार वर्तन करावें, असें आपल्या पुराणग्रंथांत कथन केलें आहे, असें प्रतिपादन करीत असतो. त्या आज्ञा म्हणजे, प्राणिहिंसा न करणें, दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार न करणें, वगैरे होत.

हे लोक गायीला फारच थोर व पवित्र मानतात, येथवर कीं ते दररोज त्यांचें चुंबन करितात व तेंही त्यांच्या विवक्षित भागाचें, असें ही कोणी कोणी म्हणतात. पण या लोकांच्या भलाईकडे पाहून मी तें म्हणणें खरेंच आहे, असें खात्रीनें म्हणूं शकत नाहीं. त्यांचें मूत व शेण तीर्थजलाप्रमाणें पापक्षालनासाठीं उपयोगांत आणितात. आपल्या ब्राम्हण पुरोहितापुढें आपल्या पापाचा पाढा वाचून प्रायश्चित घ्यावें, अशीही त्यांच्या धर्मामध्यें आज्ञा आहे. पण ती केवळ धर्मशास्त्राप्रमाणें वागणारे लोक तेवढे पाळतात. बाकीचे पाळीत नाहींत. दुसऱ्या कोणाजवळ आपल्या पापाचा उच्चार करण्याची त्यांना लाज वाटते. स्वतःच परमेश्वरापुढें त्याचा उच्चार केलेला पुरे. कारण असें न करणाऱ्यावर ईश्वर कृपा करीत नाहीं, असें ते म्हणतात. या बाबतींतली धर्माज्ञा हे लोक एकना एका रीतीनें पण क्वचितच पाळतात, यामुळें एकंदरींत ते ती पाळीत नाहींत असें म्हटलें तरी चालेल.

हें विजयनगरचें राज्य मूर्तिपूजकांचें आहे. त्याच्यांत नवऱ्याच्या प्रेताबरोबर बायकांनीं जाळून घेण्याची चाल आहे. ती ते मोठी थोरपणाची समजतात. या स्त्रिया नवरा मरतांच इतर आप्त इष्टांबरोबर बेताचाच शोक करितात. फारच शोक करणारणीच्या मनांत आपल्या पतीच्या मागून त्याच्या सेवेला जाण्याचें नाहीं, असें मानूं लागतात. शोक करणें आटपल्यावर, त्यांचे आप्त त्यांना सहगमन करा, मागें राहून कुळाला बट्टा लावूं नका, असें सांगूं लागतात. नंतर मृताचा देह एका बिछान्यावर ठेवून त्याच्यावर टहाळ्यांचा मंडपी बांधून फुलांच्या माळा वगैरे घालतात. त्याच्या बायकोला एका कृश व निरुपयोगी घोड्यावर बसवितात. तिच्या अंगावर पुष्कळसे दागिने व हार घालून तिच्या एकाहातीं आरसा व दुसऱ्या हातांत एक पुष्पयुक्त शाखा देतात. तिच्या बरोबर तऱ्हे तऱ्हेचीं वाद्यें वाजवीत, तिचे आप्त इष्ट तिला मोठ्या थाटानें मिरवत नेतात. सर्वांपुढें एक-

जण लहानसें ढोलकें वाजवीत व भजनें गात चालत असतो, तो गाण्यांतच तिला 'तूं आपल्या पतीच्या भेटीला जात आहेस,' असें सांगतो. त्यावर तीही, 'होय, मी तशी चालले आहे,' म्हणून उत्तर देते. सर्व मंडळी, स्मशानांत पोहोंचल्यावर शवाचें दहन होईपर्यंत ती स्त्री वाजंत्री व भजन करणारे यांच्या मध्यें बसते.

चितेसाठीं एक मोठा थोरला खळगा खोदलेला असतो. त्याच्यांत पुष्कळच सरपण पेटविलेलें असतें. त्याच्यांत प्रेताचें दहन होतें. अग्नी देण्यापूर्वीं मृताची आई किंवा अगदीं जवळचा नातेवाईक डोक्यावर एक पाण्याचें मडकें आणि हातांत एक कोलीत घेऊन चितेला तीन प्रदक्षिणा करितो. प्रत्येक प्रदक्षिणेला मडक्याला एकेक भोंक पाडतात. तीन्ही प्रदक्षिणा झाल्यावर, तें मडकें फोडून टाकतात आणि कोलीत खड्ड्यामध्यें चितेवर टाकतात. प्रेताचें दहन झाल्यावर ती स्त्री व इतर मंडळी पुढें येतात. ती पाद प्रक्षालन करिते. नंतर एक ब्राम्हण तिच्याकडून त्यांच्या धर्मप्रमाणें कांहीं संस्कार करवितो. नंतर ती अंगावरचे सर्व दागिनें काढून आपल्या आप्त स्त्रियांना वांटून देते. तिला मुलें असलीं तर त्यांचें लालन पालन करण्याविषयीं ती सर्वांत वडील आप्तांना विनंती करिते. अंगावरील चांगलें वस्त्रसुद्धां काढून घेऊन तिला एक साधें पिवळें वस्त्र नेसावितात. तिचे आप्त तिचा एक हात धरितात, दुसऱ्या हातांत एक डहाळी-बहुधा तुळशीचें रोप-असतें. ती गीत गात व भजन करीत त्या चितेच्या खड्ड्यापर्यंत पळतच जाऊन थोडा उंचसा चबुत्रा केलेला असतो त्याच्यावर पोहोंचते. या पूर्वींच सर्व मंडळी चिते भोंवतीं तीन प्रदक्षिणा घालतात. त्या चबुत्र्यावर असतांना, चिताग्नी दृष्टी पडूं नये म्हणून तिच्या आड एक पडदा धरलेला असतो. या नंतर एक तांदळाची पोटली, एक विड्याची पुरचुंडी, तिची रोज वापरण्याची फणी आणि आरसा, इतके जिन्नस, ती पतीजवळ पोहोंचल्यावर कामीं यावे म्हणून, त्या चितेमध्यें टाकतात म्हणें. शेवटीं ती सर्वांचा शेवटचा निरोप घेते, आणि एक तेलाचें भांडें डोकीवर घेऊन, मोठ्या धैर्यानें व स्वस्थ चित्तानें त्या अग्निकुंडामध्यें उडी मारते. हें पाहून खरोखर भारी विस्मय व अचंबा वाटतो आप्त इष्ट अग्निकाष्ठें घेऊन उभेच असतात, तीं ते तिच्या मागोमाग आंत टाकतात आणि सारेजण मोठमोठ्यानें शोकाक्रोश करूं लागतात.

कोणी सरदार, सेनापती किंवा मोठा मनुष्य, मरण पावला म्हणजे त्याच्या असतील तितक्या साऱ्या स्त्रिया सती जातात. राजा मरतो तेव्हांही असेंच करितात. या मूर्तिपूजकांच्या साऱ्या राज्यांत ही चाल आहे. पण तेलुगा-तेलंग-जातीच्या लोकांमध्यें नवऱ्याच्या प्रेताबरोबर बायकोला पुरण्याची चाल

आहे. त्याही मोठ्या खुषीनें त्या गर्ते जवळ जातात. तेथें त्या प्रेतासाठीं व तिच्यासाठीं, अशा दोन मातीच्या बैठका केलेल्या असतात. त्यांच्यावर त्या दोघांना बसवितात व त्यांच्यावर हळूं हळूं माती लोटून त्यांना पुरून टाकतात. याप्रमाणें ती बायको नवऱ्या बरोबरच जिवंत पुरली जाते.

---

# भाग तेविसावा.

## ब्राह्मण लोकांमधील अंत्य विधी.

एखादा ब्राह्मण मरणोन्मुख होतांच त्याचा उपाध्या व इतर कांहीं ब्राह्मण त्याचें सांतवन करण्याला व त्याच्या प्रीत्यर्थ देवाची आराधना करण्याला बोलाविले जातात. ते त्याच्या आत्म्याला मुक्तिदायक भक्तिमार्गाचें प्रतिपादन व सदुपदेश करून मुक्ति प्राप्त होण्यासाठीं काय काय कर्मे व दानधर्म कसे कसे केले पाहिजेत, याचें विवेचन करितात. नंतर त्याचा क्षौर करवून त्याला स्नान घालतात. स्नानानंतर त्याच्या कडची एक सवत्स गाय मागवितात. ब्राह्मण कितीही गरीब झाला तरी त्याच्या घरीं एक सुद्धां गाय नाहीं असें क्वचितच घडतें. एक वस्त्र आणवून त्याचा एक पदर त्या गायीच्या गळ्याला बांधून, दुसरा त्याच्या हातीं देतात. नंतर तो आसन्न मरण गृहस्थ स्वतःला पुण्य लागावें ह्मणून, ती गाय वासरासकट आलेल्यापैकीं एका ब्राम्हणाला दान देतो. त्या बरोबरच त्याच्या हातून यथाशक्ति दान धर्म करवून ब्राम्हण भोजन घालवितात. या योगानें तो एकतर लौकरच क्रमाला, नाहींतर निकालाला लागतो, अशी समजूत आहे.

तो मरण पावला तर जवळच थोडीशी जागा शेणानें सारवून प्रेत तिच्यावर ठेवितात. मरण भूमीवरच आलें पाहिजे, तें इतर कशावर—खाट पलंग वगैरेवर— आलें तर पाप लागतें, असें मानतात. नंतर एक तिरडी तयार करून तिच्यावर पिंपळाच्या डाहाळ्या घालतात. प्रेताला स्वच्छ पाण्यानें स्नान घालतात, व त्याला चंदनाचें तेल माखून त्याच्या जवळ तुळशीच्या डिकशा ठेवतात, आणि त्याच्या भोंवतीं एक नवें वस्त्र गुंडाळून तें त्या तिरडीवर ठेवितात. कोणी अगदीं जवळचा नातेवाईक एका बाजूला व दुसरे तीघे ब्राम्हण बाकीच्या तीन्ही बाजूला, खांदे देऊन, तें प्रेत स्मशानांत नेतात. त्याच्या पुढें बरेचसे ब्राम्हण भजन करीत चालत असतात. सर्वांच्यापुढें मृताचा पुत्र असला तर तो किंवा लहान बंधू, निदान दुसरा कोणी जवळचा नातेवाईक, अग्नी असलेलें मडकें घेऊन चालतो. हाच अग्नी चिता पेटविण्याला द्यावयाचा असतो. स्मशानांत

9660
मुंबई शाखा

यथाशक्ती दानधर्म करितात. नंतर प्रेताला अग्नी देतात. पुरें दहन होई तों बरोबरची मंडळी तेथें राहून पुढें एखाद्या जलाशयावर स्नान करून आपापल्या घरीं जाते. अग्नी देणाऱ्याला पुढें नऊ दिवस मृत देह ठेविलेल्या भूमीजवळ निजावें लागतें. नऊ दिवस आटपल्यावर उपाध्ये, भिक्षुक व इतर विद्वान मंडळी जमून अग्नी देणाऱ्याकडून चौर करवितात. या नऊ दिवसांमध्यें गोर गरीबाला अन्नदान करितात व मृताचे कपडे, पलंग व बिछाना वगैरे दान करून शिवाय कांहीं दक्षिणाही वर देतात. मृत चांगला संपन्न असला तर बाग बगीचे व भूमी वगैरेही ब्राम्हणांना दान देण्याची चाल आहे.

शिवाय इतरही पुष्कळसा दान धर्म करितात. तोही ब्राम्हण मंडळीलाच. दहा दिवस आणि हा क्षौर विधी वगैरे झाल्यावर हे लोक पुनः स्मशानांत जातात. तेथें अग्नींतून राहिलेले अस्थींचे अवशिष्ट भाग आणि रक्षा यांच्यावर बरेच विधी व संस्कार केल्यावर ते सर्व एका मडक्यांत घालतात व तें मडकें नीटपणें एका खांचेंत पुरून ठेवितात. पुढें सवडीनुरूप एकाद्या पवित्र नदीमध्यें टाकण्यासाठीं त्या अस्थी पाठवितात. ही नदी–गंगानदी–गोव्यापासून १,००० कोसांवर आहे. तेथें एक फार मोठें देवालय आहे. त्याच्या दर्शनासाठीं असंख्य लोक जातात. तेथें मृत्यू येणाराचें तारण होऊन तो स्वर्गास जातो, तसेंच ज्याच्या अस्थी त्या नदींत प्रवाह होतात तोही स्वर्गाला जातो, असें हे लोक मानतात. असें आहे तरी फारच थोड्यांच्या अस्थी तेथें नेल्या जातात.

मृताचा वारस, पिता किंवा पुत्र, यांना मृताच्या पहिल्या दिवसापासून अकरा दिवसापर्यंत रोज २७ ब्राम्हण, नंतर एकवीसावे दिवसापर्यंत रोज ३, आणि पुढें १२ दिवसपर्यंत १, सत्तावीस दिवसपर्यंत पुनः ३, व महिना पूरा होई तों व शेवटच्या दिवशीं तीन, इतक्या ब्राम्हणांना भोजन घालावें लागतें. यापुढें वर्ष संपेपर्यंत दर महिन्याला तीन तीन, याप्रमाणें ब्राम्हण भोजन घालतात. हें सर्व ब्राम्हण भोजन त्या मृताच्या आत्म्याला सद्गती मिळावी म्हणून व त्या त्रिमूर्तीच्या नांवानें केलें जातें. वर्षानंतर विशेष कांहीं दान धर्म करीत नाहींत. फक्त मृताच्या मरण तिथीला ६ ब्राम्हणांना भोजन घालतात. त्यांतील तीघे ब्राम्हण त्रिमूर्तीच्या नांवाचे आणि बाकीचे मृताचा पिता, आजा व पणजा यांच्या नांवाचे असतात. हे सर्व त्या प्रसंगीं जणों सहभोजन करितात. असें केल्यानें ईश्वर प्रसन्न होतो म्हणे. या संबंधाचा खर्च भागविण्याला गरीब असतील ते इतरापाशीं भिक्षासुद्धां मागतात. यामुळें त्यांना हवी तेव्हढी मदत मिळते. भोजनापूर्वी या सहाही ब्राम्हणांचे पाय धूतात, आणि भोजनसमयींही निमंत्रित उपाध्याच्या हातून कांहीं ठराविक संस्कार करविण्यांत येतात.

समाप्त.